महादेव हरि वाठोडकर व्याख्यानम

वाकाटक नृपति आणि त्यांचा काल

प्रस्तुत पुस्तकांत वाकाटकांचा राजकीय इतिहास आणि तत्कालीन राज्यशासन, सामाजिक व धार्मिक परिस्थिति, संस्कृत व प्राकृत वाङ्मय, स्थापत्य, शिल्प व चित्रकला यांविषयी सर्व उपलब्ध माहिती दिली आहे. शेवटीं वाकाटक नृपति, त्यांचे अमात्य व मांडलिक यांचे सर्व कोरीव लेख प्रास्ताविक माहितीसह दिले आहेत.

" या पुस्तकाच्या योगाने आमच्या विश्व-विद्यालयीन व इतर विद्यार्थ्यांना भारतांतील प्राचीन काळच्या एका उज्ज्वल कीर्तीच्या राजवंशाविषयी साधार माहिती होऊन त्यांचें स्वदेशविषयक प्रेम व अभिमान वृद्धिंगत होतील. "

ले. क. के. तु. मंगळमूर्ति,
कुलगुरु, नागपूर विश्वविद्यालय

किमत पांच रुपये

व्याख्याते

वा. वि. मिराशी

महादेव हरि वाठोडकर व्याख्यानमाला, पुष्प ५

वाकाटक नृपति आणि त्यांचा काल

व्याख्याते :

महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी, एम्. ए.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि
विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
संस्कृत, पाली व प्राकृत विभागाचे अध्यक्ष, नागपूर विश्वविद्यालय.

नागपूर विश्वविद्यालय, नागपूर

१९५७

किंमत ५ रुपये

प्रकाशक :
रजिस्ट्रार, नागपूर विश्वविद्यालय,
नागपूर.

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी, बी. एस्‌सी.,
नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर.

पुरस्कार

भंडाऱ्याचे सेवानिवृत्त डिस्ट्रक्ट आणि सेशन्स जज्ज श्री. हरि महादेव वाठोडकर यांनी सन १९४२ मध्ये आपले वडील कै. महादेव हरि वाठोडकर यांच्या नांवें व्याख्यानमाला स्थापन करण्याकरिता कांही निधि नागपूर विश्वविद्यालयाच्या स्वाधीन केला. त्याच्या व्याजांतून 'महादेव हरि वाठोडकर व्याख्यानमाले'चें आयोजन केलें जातें. आतापर्यंत या मालेंत चार पुस्तकें प्रकाशित झालीं असून प्रस्तुत पुस्तक हें तींतील पांचवें पुष्प आहे व तें नागपूरचे सेवानिवृत्त प्राचार्य महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' या विषयावर गुंफलें आहे.

वाकाटक वंश हा विदर्भाच्या प्राचीन इतिहासांतील सुप्रसिद्ध राजवंश होय. वाकाटकांच्या काळाला 'सुवर्णयुग' म्हणण्यांत येतें; कारण त्या काळीं हिंदुधर्म, संस्कृत व प्राकृत वाङ्मय आणि स्थापत्य, शिल्प आणि चित्रकला यांचा भारतांत मोठा उत्कर्ष झाला. या राजवंशाचा इतिहास गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षांतच ज्ञात झाला आहे. सन १९१४ मध्ये डॉ. व्हिन्सेंट स्मिथने प्रकाशित केलेल्या आपल्या 'प्राचीन भारतीय इतिहास' या सुप्रसिद्ध इतिहासांत वाकाटकांचें नांवहि आलें नव्हतें. त्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत झालेल्या संशोधनावरून प्रस्तुत पुस्तक लिहितां आलें, यावरून या कालांत आपल्या वाकाटकविषयक ज्ञानांत किती प्रगति झाली तें दिसून येईल. तिचें बरेंचसें श्रेय प्रा. मिराशी यांना द्यावें लागेल, कारण त्यांतील पुष्कळशी माहिती त्यांच्याच परिश्रमाने उपलब्ध झाली आहे.

विद्वान् संस्कृत पंडित व उत्तम शिक्षक म्हणून प्रा. मिराशी यांनी या प्रदेशांत चांगली कीर्ति मिळविली आहे. त्यांच्या प्राचीनेतिहासविषयक संशोधनाने तर त्यांचें नांव अखिल भारतांत सुप्रसिद्ध झालें आहे. भारताच्या पुरातत्त्वखात्याने त्यांचा 'कलचुरि-चेदि संवताचे कोरीव लेख' हा बृहद्ग्रंथ आपल्या 'भारतीय-उत्कीर्ण-लेखसंग्रह' या सुप्रसिद्ध ग्रंथमालेंत प्रकाशित

केला आहे, व वाकाटकविषयक दुसरा ग्रंथ प्रकाशनास घेतला आहे. यावरून त्यांच्या संशोधनाचें महत्त्व ध्यानांत येईल. याशिवाय मौर्य, सातवाहन, गुप्त, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव इत्यादि अनेक राजवंशांचे कोरीव लेख व नाणीं यांवर त्यांनी दोनअडीचशें संशोधनपर लेख अनेक संशोधन मासिकांत प्रकाशित केले आहेत. अशा व्यासंगी विद्वानाचीं व्याख्यानें प्रस्तुत ग्रंथरूपाने नागपूर विश्वविद्यालयास प्रकाशित करतां येत आहेत याबद्दल मला आनंद वाटत आहे.

प्राचीन भारतीय इतिहासविषयक बहुतेक वाङ्मय इंग्रजींत असल्यामुळे तें सामान्य मराठी वाचकांस दुर्बोध असतें. स्वातंत्र्यप्रातीनंतर भारतीय भाषांचें महत्त्व वाढत आहे. अशा प्रसंगीं प्रा. मिराशी यांनी आपलीं व्याख्यानें मराठींत देण्याची समयज्ञता दाखविली याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. प्राचीन कोरीव लेख जागतिक विद्वानांच्या दृष्टीस पडावे म्हणून सामान्यतः इंग्रजींतच प्रकाशित होतात. मराठी वाचकांस त्यांचेंहि ज्ञान व्हावें व अभ्यासकांस ते सर्व लेख एकत्र मिळावे या हेतूने ते या व्याख्यानांच्या शेवटीं एकत्र दिले आहेत. अशा तऱ्हेचें कोरीव लेखांसह सर्वांगीण ऐतिहासिक माहितीचें पुस्तक कोणत्याहि भारतीय राजवंशाविषयी आतापर्यंत मराठींत प्रसिद्ध झालें नाही. यांतहि प्रस्तुत पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे.

या पुस्तकाच्या योगाने आमच्या विश्वविद्यालयीन व इतर विद्यार्थ्यांना आपल्या प्रदेशांतील एका उज्ज्वल कीर्तीच्या राजवंशाविषयी साधार माहिती होऊन त्यांचें स्वदेशविषयक प्रेम व अभिमान वृद्धिंगत होतील, अशी आशा आहे. प्रा. मिराशी यांनी अशा रीतीने नागपूर विश्वविद्यालयाच्या कार्यांत हातभार लावला याबद्दल विश्वविद्यालय त्यांचें व प्रस्तुत मालेचे निर्माते श्री. हरि महादेव वाठोडकर यांचेंहि सदैव ऋणी राहील.

नागपूर,
२० डिसेंबर १९५७

के. तु. मंगळमूर्ति
कुलगुरु,
नागपूर विश्वविद्यालय

प्रारंभीं

नागपूर विश्वविद्यालयानें एखाद्या पुरातत्त्वविषयावर चार व्याख्यानें 'महादेव हरि वाठोडकर व्याख्यानमाले'मध्ये देण्याविषयी १९५५ च्या सप्टेंबर महिन्यामध्ये मला विनंती केली. त्या व्याख्यानांकरिता मी 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' हा विषय घेऊन तीं नागपूर विश्वविद्यालयाच्या सभागृहांत दिनांक ५, ६, ७ व ९ मार्च १९५६ या दिवशीं दिलीं. त्यांचें पुस्तक आता प्रसिद्ध होत आहे.

भारताच्या प्राचीन इतिहासांत गुप्त–वाकाटक कालाची 'सुवर्णयुग' म्हणून ख्याति आहे. या काळांत भारतांत विशाल साम्राज्यें उत्पन्न होऊन सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली. हिंदु धर्म, संस्कृत विद्या व कला यांना उदार राजाश्रय मिळून त्यांचा अभूतपूर्व उत्कर्ष झाला, भारताचा परदेशाशीं व्यापार वाढून देशांत सर्वत्र समृद्धि वाढली आणि भारतीय संस्कृतीचा इतर देशांत प्रसार होऊन भारताची कीर्ति दिगन्तीं पसरली. या सर्वांगीण उन्नतीचें श्रेय उत्तर भारतांत राज्य करणाऱ्या गुप्त सम्राटांप्रमाणे दक्षिण भारताच्या वाकाटकांनाहि दिलें जातें. विशेषतः अजंटा येथील कांही सर्वोत्कृष्ट लेणीं त्यांच्या काळांत निर्माण झाल्यामुळे त्यांचें नांव सर्व जगांत सुप्रसिद्ध झालें आहे.

पण या वाकाटक नृपतींच्या कालाचा सांगोपांग इतिहास अद्यापि इंग्रजींतहि लिहिला गेला नाही. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत वाकाटकांचे अनेक कोरीव लेख प्रकाशांत आल्यामुळे व इतरहि संशोधन झाल्यामुळे त्यांच्या इतिहासाविषयी बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. म्हणून त्यांचा इतिहास लिहिणें आता शक्य झालें आहे. महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांतील या उज्ज्वल कालखंडाविषयी मराठी वाचकांस माहिती व्हावी म्हणून मी प्रस्तुत व्याख्यानें मराठींत देण्याचें ठरविलें. तीं लिहून काढल्यावर त्यांचा कांही भाग मी प्रस्तुत व्याख्यानमालेचे निर्माते श्री. हरि महादेव वाठोडकर यांना वाचून दाखविला. तेव्हा त्यांनी त्यांत विपुल संदर्भ आलेले पाहून वाकाटकांचे कोरीव लेख त्या व्याख्यानांच्या शेवटीं जोडावे अशी सूचना केली आणि तिला नागपूर विश्वविद्यालयाच्या कुलगुरूंचीहि संमति मिळाली. तदनुसार मी ते लेख प्रास्ताविक माहितीसह येथे दिले आहेत. त्यांमध्ये पुष्कळ नवीन संशोधन आढळेल. हे लेख अनेक संशोधन मासिकांत विखुरले

असून त्यांतील बरेचसे आता दुर्मिळ झाले आहेत. प्रस्तुत पुस्तकांत ते एकत्र दिले असल्यामुळे भावी अभ्यासकांस ते उपयुक्त होतील अशी आशा आहे. हें पुस्तक छापलें जात असतां वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनाचा आणखी एक ताम्रपट छिंदवाडा जिल्ह्यांतील पांढुर्णा गावानजीक सांपडला. त्याविषयी संक्षिप्त माहिती शेवटीं परिशिष्टांत दिली आहे.

कविकुलगुरु कालिदासाच्या रघुवंशांतील इन्दुमतीस्वयंवरविषयक सर्ग विद्यार्थिदशेंत माझ्या वाचनांत आले, तेव्हापासून मला विदर्भाविषयी विशेष प्रेम वाटूं लागलें. पुढे नोकरीच्या निमित्ताने विदर्भांत वास्तव्य होऊन मला त्याच्या प्राचीन इतिहासाचा व्यासंग करण्याचा योग आला. वाकाटकांच्या प्रकाशित झालेल्या एकूण सव्वीस लेखांपैकी निम्मे मी स्वतः संपादिले आहेत व तत्कालीन वाङ्मयादिकांविषयी थोडेंबहुत संशोधन केलें आहे. अशा रीतीने विदर्भाचें ऋण मला अंशतः फेडतां आलें याबद्दल अत्यानंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तकांत वाकाटकांचा राजकीय इतिहासच आला नसून तत्कालीन राज्यशासन, सामाजिक व धार्मिक परिस्थिति, संस्कृत व प्राकृत वाङ्मय, स्थापत्य, शिल्प व चित्रकला यांविषयीहि सर्व उपलब्ध माहिती दिली आहे. शेवटीं वाकाटककालीन स्थापत्य, शिल्पें व चित्रें यांचे नमुने दिले आहेत. त्यांपैकी क्रमांक ४ ते ६ यांचीं छायाचित्रें भारतीय पुरातत्त्वखात्याच्या संमतीने दिलीं आहेत; क्रमांक ७ व ९ ते १३ यांचीं चित्रें श्री. यज्दानींच्या 'अजंटा' या पुस्तकांतून घेण्याबद्दल आंध्र राज्याच्या पुरातत्त्वखात्याने संमति दिली. या दोघांचाहि मी अत्यंत आभारी आहे. अजंट्याच्या सोळा व सतरा क्रमांकांच्या लेण्यांच्या मानचित्रांत त्या लेण्यांतील चित्रांचे क्रमांक घालून त्यांची सूची त्यासमोर जोडली आहे. त्यांवरून व सहाव्या प्रकरणांतील वर्णनावरून वाचकांस प्रस्तुत पुस्तकाच्या साहाय्याने तीं चित्रें अजंटा येथे ओळखतां येतील. प्रस्तुत व्याख्यानमालेचे निर्माते श्री. हरि महादेव वाठोडकर यांच्या उदार देणगीने या पुस्तकाचें प्रकाशन होत आहे याबद्दल त्यांचे, व नागपूर विश्वविद्यालयाचे कुलगुरु ले. क. के. तु. मंगळमूर्ति यांनी आपल्या पुरस्काराने त्यास भूषविलें याबद्दल त्यांचेहि मी मनःपूर्वक आभार मानतों.

वा. वि. मिराशी

ग्रंथनामांचे संक्षेप

तळटीपांत कांही ठिकाणीं संदर्भग्रंथांचीं नांवें पूर्ण दिलीं आहेत. पण अनेक ठिकाणीं येणाऱ्या ग्रंथनामांचे व इतर संक्षेप खाली दिल्याप्रमाणे योजावे लागले आहेत.

अजंटा—श्री. गुलाम यज्दानी कृत 'अजंटा' (हैदराबाद संस्थानाने प्रकाशित केलेलें).

ॲ. भा. ओ. री. इ.—ॲनाल्स् ऑफ दि भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिटयूट.

आ. स. रि.—आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट.

इ.—इत्यादि.

इं. अ.—इंडियन ॲंटिक्वरी.

इं. हि. क्वा.—इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली.

ए. इं.—एपिग्राफिया इंडिका.

ए. हि. डे.—एन्शन्ट हिस्टरी ऑफ दि डेक्कन् (जूव्हो डुब्रुइल कृत).

कॉ. इ. इं.—कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इन्डिकॅरम्.

का. मी.—काव्यमीमांसा (राजशेखरकृत, गायकवाड्स् ओरिएंटल सीरीज).

ज. ए. सो. बें.—जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल.

ज. न्यू. सो. इं.—जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इन्डिया.

ज. रॉ. ए. सो.—जर्नल् ऑफ् दि रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन.

डा. क. ए.—डायनॅस्टीज् ऑफ दि कलि एज् (पार्जिटर–संपादित).

न्यू. हि. इं. पी.—न्यू हिस्टरी ऑफ दि इन्डियन पीपल (मुजुमदार व पुसाळकर यांनी संपादिलेलें).

प्रो. रि. आ. स. वे. इं.—प्रोग्रेस रिपोर्ट ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया.

सूचना

दुसऱ्या विभागांतील कोरीव लेखांचें वाचन करतांना खालील संकेत ध्यानांत ठेवावे—

(१) चौकोनी [ ] कंसांतील अक्षरें अस्पष्ट आहेत असें समजावें.

(२) चौकोनी कंसांतील अक्षरें तारकांकित [*] केलीं असल्यास तीं मुळांत नाहीत किंवा नष्ट झालीं आहेत व म्हणून संपादकानें सुचविलीं आहेत, असें समजावें.

(३) वाटोळ्या ( ) कंसांतील अक्षरें मूळच्या अशुद्ध अक्षरांच्या जागीं शुद्ध म्हणून सुचविलीं आहेत असें समजावें.

अनुक्रमणिका

विभाग पहिला : वाकाटक नृपति आणि त्यांचा काल

विभाग दुसरा : वाकाटक नृपति, त्यांचे मांडलिक व सचिव यांचे कोरीव लेख

ज्येष्ठ शाखा

वाकाटक नृपतींचे लेख

विभाग पहिला

वाकाटक नृपति आणि त्यांचा काल

(व्याख्यानें)

वाकाटक नृपति आणि त्यांचा काल

प्रास्ताविक

प्राचीन काळीं भारतांत जीं अत्यंत बलाढ्य व सुसमृद्ध अशीं साम्राज्यें अस्तित्वांत आलीं त्यांमध्ये वाकाटक साम्राज्याचा अन्तर्भाव होतो. इ. स. २५० पासून सुमारें ५५० पर्यंत वाकाटकांनी विदर्भावर राज्य केलें. या सुमारें तीनशें वर्षांच्या काळांत वाकाटकांनी आपली सत्ता नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरविली. नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या मालव, मेकल व चेदि या देशांनीहि वाकाटकांचें स्वामित्व कांही काळ मान्य केलें होतें. या राजांचा संस्कृत व प्राकृत कवींना उदार आश्रय होता. त्या काळांतल्या विदर्भांतील वाङ्मयनिर्मितीमुळे वैदर्भी व वच्छोमी रीतींना प्राधान्य प्राप्त होऊन कालिदासासारख्या महाकवींना त्यांमध्ये आपलीं काव्यें रचण्याची स्फूर्ति झाली. वाकाटकांनी स्वतः जीं काव्यें रचलीं त्यांची प्रशंसा बाण व दण्डी यांसारख्या कवींनी आणि कुन्तक व हेमचन्द्र यांसारख्या आलंकारिकांनी मुक्तकंठाने केली आहे. त्यांनी बांधलेलीं उत्तुंग देवालयें आता अस्तित्वांत नाहीत, पण त्यांच्या अवशेषांमध्ये सापडलेल्या शिल्पकृतींनी तज्ज्ञ कलाकोविदांची दृष्टि आकर्षित केली असून त्यांच्या मतें या शिल्पांची गणना प्राचीन काळच्या उत्कृष्ट कलाकृतींमध्ये करतां येईल. त्यांच्या मांडलिकांनी व अमात्यांनी अजंटा व गुलवाडा येथील टेकड्यांत जीं विहार व चैत्य लेणीं कोरविलीं

च शिल्पचित्रादिकांनी भूषित करविलीं त्यांची आजहि अखिल जगतांत प्रशंसा होते. तेव्हा ' इ. स. च्या तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत दक्षिणेंत जे राजवंश झाले त्यांमध्ये वाकाटक राजवंश हा सर्वश्रेष्ठ असून त्याच्या कामगिरीने अखिल दक्षिण भारताच्या संस्कृतीवर फार मोठा परिणाम झाला आहे ' असे जे उद्गार एका सुप्रसिद्ध फ्रेंच इतिहासकाराने काढले आहेत[1] त्यांमध्ये मुळीच अतिशयोक्ति नाही.

तथापि सुमारें सवाशें वर्षांपूर्वी या नामांकित राजवंशाचें नांवहि कोणास माहीत नव्हतें. तें द्वितीय प्रवरसेनाच्या सन १८३६ मध्ये सांपडलेल्या सिवनी ताम्रपटावरून प्रथम ज्ञात झालें. या वंशाचा संस्थापक विन्ध्यशक्ति याचें नांव पुराणांत येतें खरें, पण त्या ठिकाणचे अशुद्ध पाठ व त्यांचे चुकीचे अन्वयार्थ यामुळें तो विन्ध्यशक्ति यवन किंवा ग्रीक वंशांतील होता असें समजण्यांत आलें होतें. अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील कोरीव लेखांत वाकाटकांची वंशावळ आरंभापासून शेवटच्या हरिषेण नृपतीपर्यंत दिली आहे. या लेखाचा अभ्यास केल्यावरहि डॉ. भाऊ दाजी यांनी सन १८६२ मध्ये असें म्हटलें होतें की ' वाकाटक नृपति हे यवन किंवा ग्रीक वंशाचे असून त्यांनी वैदिक यज्ञ करण्यांत तसेंच बौद्ध धर्माच्या उत्तेजनार्थ मोठमोठीं च अतिशय खर्चाचीं कामें करण्यांत पुढाकार घेतला होता'. नंतरच्या संशोधनावरून आता सिद्ध झालें आहे की, या वंशाचा मूळ पुरुष विन्ध्यशक्ति हा ब्राह्मणजातीय होता. कारण त्याचें वर्णन उपरिनिर्दिष्ट अजंट्याच्या लेखांत ' द्विज ' असें केलें आहे. वाकाटकांचें विष्णुवृद्ध गोत्रहि त्यांच्या बहुतेक ताम्रपटांत उल्लेखिलेलें आढळतें. तेव्हा सातवाहनांप्रमाणे वाकाटक हेहि ब्राह्मण होते, हें आता सर्वमान्य झालें आहे. संशोधनाने झालेला केवढा हा मोठा फरक ! या एका उदाहरणावरून गेल्या पन्नास वर्षांत संशोधकांच्या परिश्रमांनी

१ प्रा. जुव्हो डुब्रुइल, एन्शन्ट हिस्टरी ऑफ दि डेक्कन, पृ. ७१.

त्या राजवंशाविषयींच्या आपल्या माहितींत किती भर पडली आहे, याची कोणालाहि कल्पना करतां येईल.

वाकाटकांची माहिती झाली तरी त्यांचा काल पुष्कळ वर्षें अनिश्चित होता. याचीं कारणें अनेक आहेत. उत्तर भारतांतील गुप्त नृपतींप्रमाणे वाकाटकांनी आपला स्वतंत्र संवत् सुरू केला नव्हता. त्यांच्या सर्व दानपत्रांतील कालनिर्देश त्या त्या राजांच्या राज्यारंभापासूनच्या वर्षांत केला आहे. त्यामुळे त्यांचा कालनिश्चय त्यांच्या कोरीव लेखांच्या अक्षरवटिकेवरून करावा लागे. वाकाटकांचे बहुधा सर्व लेख पेटिकाशीर्षक लिपींत (box-headed characters मध्यें) कोरले आहेत. ही लिपि थोड्याच काळांत कायम ठशाची बनून गेली होती. म्हणून तिच्यावरून लेखांचा कालनिश्चय करण्यांत सुविख्यात लिपिशास्त्रज्ञांतहि मतभेद होत. डॉ. बुल्हरच्या मतें वाकाटक नृपति इ. स. च्या पांचव्या शतकांत होऊन गेले.[१] याच्या उलट डॉ. फ्लीट[२] व डॉ. कीलहॉर्न[३] यांच्या मतें त्यांचा काल खिस्तोत्तर आठवें शतक हा होता. वाकाटकांच्या ताम्रपटांत द्वितीय प्रवरसेनाच्या मातामहाचें नांव महाराजाधिराज देवगुप्त असें येतें.[४] डॉ. फ्लीटच्या मतें हा देवगुप्त म्हणजे बिहार प्रदेशांतील देवबारुणार्क गांवच्या कोरीव लेखांत[५] उल्लेखिलेला मगधनृपति आदित्यसेनाचा पुत्र महाराजाधिराज देवगुप्त हा असावा. हा मगधनृपति

१ इं. अँ., पु. १२, पृ. २३९ इ.

२ कॉ. इ. इं., पु. ३, प्रस्तावना, पृ. १५.

३ ए. इं., पु. ३, पृ. २६०.

४ पाहा 'महाराजाधिराज श्रीदेवगुप्तसुतायां प्रभावतीगुप्तायामुत्पन्नस्य......वाकाटकानाम्परममाहेश्वरमहाराजश्रीप्रवरसेनस्य वचनात्...(क्र. ४, ओ. ११–१२).

५ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. २१३ इ.

देवगुप्त सातव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेल्यामुळे वाकाटक राजे खिस्तोत्तर सातव्या-आठव्या शतकांत राज्य करीत होते असें डॉ. फ्लीटने प्रतिपादिलें. सन १९१२ मध्ये पुण्यास एका तांबटाच्या घरीं प्रभावती-गुप्तेचा ताम्रपट सापडला. त्याच्या वाचनावरून डॉ. फ्लीटचें मत चुकीचें ठरलें. डॉ. का. बा. पाठक व रा. ब. का. ना. दीक्षित यांनी प्रथम इंडियन् अँटिक्वरी [पु. ४१ (१९१२), पृ. २१५] मध्ये या ताम्रपटावरील लेखाचा सारांश प्रसिद्ध केला व पुढे कांही वर्षांनी तो संपूर्ण लेख एपिग्राफिया इंडिका (पु. १५, पृ. ३९ इ.) मध्यें संपादिला. या ताम्रपटांत वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन याची पट्टराणी (अग्र-महिषी) व युवराज दिवाकरसेन याची माता प्रभावतीगुप्ता ही गुप्त नृपति महाराजाधिराज द्वितीय चंद्रगुप्त याची कन्या होती असें स्पष्ट म्हटलें असल्यामुळे गुप्त व वाकाटक राजवंशांचा परस्पर संबंध ज्ञात होऊन त्यायोगें प्रथमच वाकाटकांचा काळ निश्चित झाला. यामुळे वाकाटकांच्या इतिहासांत या ताम्रपटाला विशेष महत्त्व आहे. या ताम्रपटांत उल्लेखिलेल्या गावांचा शोध त्या वेळीं लागला नव्हता, तो पुढे मला लावतां आला. त्यावरून तो ताम्रपट मूळचा आपल्या विदर्भांतील वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तहसिलींतील, हें सिद्ध झालें आहे.[1] ताम्रपट मूळच्या ठिकाणाहून शेंकडों मैल दूर कसे सांपडतात, याचें हें उत्तम उदाहरण आहे. असो.

पुणें ताम्रपटाने वाकाटकांचा काळ निश्चित झाल्यावर त्यांच्या इतिहासाविषयींच्या आपल्या ज्ञानांत उत्तरोत्तर जास्त भर पडत गेली. डॉ. व्हिन्सेंट स्मिथ् याने सन १९१४ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या अर्ली हिस्टरी ऑफ् इंडिया (भारताचा प्राचीन इतिहास) या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तींत वाकाटकांवर एक ओळहि लिहिली नव्हती, पण पुढे त्यानेच रॉयल् एशियाटिक सोसायटीच्या सन १९१४ च्या

१ ए. इं., पु. २६, पृ. १५९ इ.

जर्नल मध्ये (पृ. ३१७ इ.) त्या वेळेपर्यंत सापडलेल्या वाकाटकांच्या सर्व ताम्रपटांचा व शिलालेखांचा अभ्यास करून वाकाटकांच्या इतिहासावर माहितीपूर्ण लेख लिहिला. तेव्हा वाकाटकांचें भारताच्या प्राचीन इतिहासांतील स्थान निश्चित झालें. यानंतर डॉ. कृष्णस्वामी आयंगार[1] व प्रो. जूव्हो डुब्रुइल[2] यांनीहि आपल्या लेखांनी या राजवंशावर अधिक प्रकाश पाडला. पण या सर्वांपेक्षा कै. डॉ. काशीप्रसाद जायसवाल यांनी वाकाटकांच्या उज्ज्वल इतिहासाकडे विद्वानांचें लक्ष जास्त वेधलें व भारतीय इतिहासांतील त्यांचें योग्य स्थान त्यांस प्राप्त करून दिलें. सन १९३३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या ' ख्रिस्तोत्तर १५० ते ३५० या काळांतील भारतीय इतिहास ' या इंग्रजी ग्रंथाला त्यांनी ' नाग-वाकाटकांच्या साम्राज्याचा काल ' असें दुसरें नांव देऊन समुद्रगुप्ताच्या उदयापूर्वी साठ वर्षें वाकाटक नृपति हेच भारतांत सम्राट् पदवीचे अधिकारी होते असें प्रतिपादिलें. डॉ. जायसवालांच्या प्रतिपादनाचें सार त्यांच्या खालील शब्दांत देतां येईल. ' वाकाटक नृपति विन्ध्यशक्तीचा पुत्र प्रथम प्रवरसेन याने आपली विशिष्ट राज्यशासनविषयक कल्पना प्रसृत केली. ती कल्पना ही की, अखिल भारतावर हिंदूंचें साम्राज्य असावें व त्यांत धर्मशास्त्रांना उच्च मान दिला जावा. दुसरी गोष्ट ही की, ख्रिस्तोत्तर २५० च्या सुमारास संस्कृत भाषेच्या व वाङ्मयाच्या अभिवृद्धीची चळवळ सुरू झाली व पन्नास वर्षांत तिला चांगलाच जोम येऊन पुढे गुप्त नृपतींनी तिला राजाश्रय दिला. तिसरी गोष्ट ही की त्या काळीं वर्णाश्रम धर्माचें पुनरुज्जीवन होऊन सनातन धर्माला विशेष प्राधान्य मिळालें. कुशाण राजांच्या कारकीर्दीत समाजांत जे अवगुण उत्पन्न झाले होते त्यांचें परिमार्जन करावें अशी वाकाटक साम्राज्यांतील लोकांची मागणी होती. हिंदु समाजाची ती शुद्धि चळवळ होती आणि तिला सम्राट् प्रवरसेनाच्या राजवटींत

१ ए. इं., पु. १, पृ. ७१ इ. २ ए. हि. डे., पृ. ७१ इ.

मोठाच जोर चढला. चौथी गोष्ट ही की, स्वतः वाकाटकांच्या राज्यांत असलेल्या अजंटा येथील लेण्यांत शिल्पकला व चित्रकला यांचें पुनरुज्जीवन झालें. संस्कृत भाषेच्या पुनरुज्जीवनाप्रमाणें या हिंदु कलांच्या उत्कर्षांचें सारें श्रेय आधुनिक लेखक गुप्तांस देतात, पण खरें पाहिलें तर तें श्रेय वाकाटकांचें आहे.'[१] नाग, वाकाटक व पल्लव अधिपतीं-विषयींच्या डॉ. जायसवालांच्या बऱ्याचशा कल्पना परीक्षणान्तीं निर्मूल ठरल्या आहेत; तथापि त्यांनी केलेल्या वाकाटकांच्या ओजस्वी वकिलीमुळे त्या राजवंशाला प्राधान्य प्राप्त होऊन त्याच्या कामगिरीकडे लोकांचें लक्ष वेधलें गेलें यांत संशय नाही.

यानंतरच्या वाकाटकांच्या इतिहासाविषयीच्या आपल्या ज्ञानांत विदर्भातील अकोला जिल्ह्याच्या वाशीम गावांत द्वितीय विन्ध्यशक्तीच्या सन १९३९ मध्ये सापडलेल्या ताम्रपटाने महत्त्वाची भर घातली. यापूर्वी ज्यांनी ज्यांनी वाकाटकांच्या इतिहासावर कांही लिहिलें होतें त्या सर्वांनी वाकाटक वंश जवळ जवळ शेवटपर्यंत अभंग राहिला होता असें प्रतिपादिलें होतें. वास्तविक पाहतां याविरुद्ध पुरावा पुराणांत व अजंटयाच्या सोळाव्या लेण्यांतील लेखांत उपलब्ध होता. पुराणांत उल्लेखिलेला विन्ध्यशक्तीचा पुत्र प्रवीर हा वस्तुतः वाकाटक सम्राट् प्रथम प्रवरसेनच होय. या प्रवीराला चार पुत्र होते व ते चारहि राजे झाले असें पुराणें सांगतात.[२] अजंटयाच्या उपरिनिर्दिष्ट लेखांतील वाकाटक नृपतींची वंशावळ सिवनी, चम्मक इत्यादि त्या काळापर्यंत सापडलेल्या ताम्र-

---

१ हि. ऑ. इं., पृ. ९५.

२ पाहा—विन्ध्यशक्तिसुतश्चापि प्रवीरो नाम वीर्यवान् ।
भोक्ष्यते च समाः षष्टि पुरिकां चनकां च वै ॥
यक्ष्यते वाजपेयैश्च समाप्तवरदक्षिणैः ।
तस्य पुत्रास्तु चत्वारो भविष्यन्ति नराधिपाः ॥
डा. क. ए., पृ. ५०.

पटांतील वंशावळीशीं जमत नव्हती; तथापि या विरोधी पुराव्याकडे दुर्लक्ष करून वाकाटकांची एकच शाखा राज्य करीत होती असें सर्व इतिहासकारांनी प्रतिपादिलें होतें. वाशीमचा ताम्रपट एपिग्राफिया इंडिकामध्ये (पु. २६, पृ. १३७ इ.) प्रसिद्ध करतांना मी असें सिद्ध केलें की, प्रथम प्रवरसेनाच्या निधनानंतर वाकाटकवंशाच्या चार शाखा झाल्या. या प्रवरसेनाला चार मुलगे होते हें पुराणांतील विधान खरें दिसतें. त्यांपैकी दोघांचीं नांवें आपणांस माहीत आहेत--(१) ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र हा आपल्या पित्याच्या हयातींत मृत्यु पावल्यामुळें त्याचा मुलगा प्रथम रुद्रसेन यानें नन्दिवर्धन शाखा स्थापिली; (२) दुसरा मुलगा सर्वसेन याचा उल्लेख वाशीमच्या ताम्रपटांत आला आहे. हा वत्सगुल्म ऊर्फ वाशीम शाखेचा संस्थापक झाला. हा सर्वसेन व त्याचा पुत्र विन्ध्यसेन ऊर्फ विन्ध्यशक्ति यांचा नामोल्लेख अजंटयाच्या उपरिनिर्दिष्ट लेखांत होता, पण तो लेख आता शीर्ण झाल्यामुळे त्या वाकाटक नृपतींचीं नांवें डॉ. भाऊ दाजी, पंडित भगवानलाल इंद्रजी व डॉ. बुल्हर यांना वाचतां आलीं नव्हतीं हेंहि मी त्या लेखांत दाखवून दिलें. वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेच्या अमलाखाली उत्तर विदर्भ, व वत्सगुल्म शाखेच्या अमलाखाली गोदावरीच्या तीरापर्यंत पसरलेला दक्षिण विदर्भ होता असें दिसतें. प्रवरसेनाचे दुसरे दोन मुलगे कोठे राज्य करीत होते हें अद्यापि निश्चित नाही. त्यांपैकी एक गोदावरीच्या दक्षिणेस कुन्तल देशावर व दुसरा दक्षिण कोसलावर (छत्तीसगडावर) राज्य करीत असावा. कुन्तल देशांत त्यानंतर लौकरच राष्ट्रकूट नृपति मानाङ्क याने राज्य स्थापिलें. त्यामुळे तेथील वाकाटक शाखेचें उच्चाटन झालें असावें हें मी 'मानपुरचे राष्ट्रकूट' या लेखांत नंतर दाखविलें.[1] या मानाङ्काने आपल्या नांवाने मानपुर नामक नगर स्थापून तेंच आपल्या राजधानीचें स्थान केलें. हें मानपुर म्हणजे मुंबई प्रदेशांच्या सातारा जिल्ह्यांतील माण नदीच्या

१ अॅ. भां. इ., पु. २५, पृ. ३६ इ.

तीरावरचे माण असावें. यानंतर सन १९४५ ते १९५१ या काळांत हैदराबादचे माझे स्नेही श्री. हुरमुज् कौस व हैदराबाद म्यूझियमचे क्यूरेटर श्री. ख्वाजा मुहम्मद अहमद यांनी हैदराबाद संस्थानांत कोंडापूरच्या उत्खननांत व इतरत्र सापडलेलीं शक नृपति माण महिष यांचीं व त्याच्या कांही वंशजांचीं नाणीं मजकडे वाचनार्थ पाठविलीं. त्यांवरून हैदराबाद संस्थानच्या दक्षिण भागांत राज्य करणाऱ्या शक नृपतीं-विषयीं माहिती जमवितां आली.[1] कुन्तल देशांतील हे राष्ट्रकूट व शक राजे वाकाटकांचे दक्षिण दिशेचे प्रत्यन्तनृपति होते तसेच बस्तर जिल्हा व त्याच्या पूर्वेचा कांही प्रदेश यांवर राज्य करणारे नल राजे हे वाकाटकांचे पूर्वेकडील प्रत्यन्तनृपति होते. नलांचे कांही कोरीव लेख[2] व नाणीं[3] मध्यप्रदेशांत व इतरत्र गेल्या पंचवीस तीस वर्षांत सापडलीं आहेत त्यांवरूनहि वाकाटकांच्या इतिहासावर थोडाबहुत प्रकाश पडला आहे.

वाकाटकांच्या इतिहासाच्या या सिंहावलोकनावरून गेल्या सवाशें वर्षांत या राजवंशाविषयीं आपलें ज्ञान कसें हळू हळू वाढत गेलें आहे, हें ध्यानांत येईल. वाकाटकांच्या इतिहासाचे कांही कोनेकोपरे अद्यापि अंधारांत आहेत. त्यावर भावि कालांतील संशोधनाने प्रकाश पडेल अशी आशा आपण करूं या. तथापि उपलब्ध झालेल्या माहितीवरून त्या इतिहासाची रूपरेषा आता बरीच स्पष्ट झाली आहे व वाकाटकांच्या कामगिरीचें मूल्यमापन करणेंहि शक्य झालें आहे. असा प्रयत्न यापुढे केला आहे.

---

१ इं. हि., क्वा. पु., २२, पृ. ३४ इ.; ज. न्यू. सो. इं., पु.११, पृ. १ इ.; पु. १२, पृ. ८७ इ.; पु. १२, पृ. ९ इ.; पु. १५, पृ. १ इ.

२ ए. इं., पु. २१, पृ. १५३ इ.; पु. २८, पु. १२ इ.

३ ज. न्यू. सो. इं., पु. २९ इ.

१. राजकीय इतिहास

वाकाटक नृपतींचा कालानुक्रम

पुणें ताम्रपटावरून वाकाटक नृपति सामान्यतः गुप्तांचे समकालीन होते हें निश्चित झालें.[1] तथापि त्यांतील प्रत्येक राजाच्या कारकीर्दीचीं वर्षें अद्यापि अनिर्णीत असून अनुमानानेच ठरवावीं लागतात. तरीहि वाकाटक कालगणनेचे कांही टप्पे आता निश्चित झाले आहेत. डॉ. जायसवालांच्या मतें सन २५० च्या सुमारास सुरू झालेला तथाकथित कल्चुरि–चेदि संवत् मूळचा वाकाटकांनी स्थापला होता. हें मत आता कोणीहि मानत नाही. कारण स्वतः वाकाटकांच्याच दानपत्रांत या संवताचा उपयोग केलेला आढळत नाही. तथापि सातवाहन नृपतींच्या अस्तानंतर सन २५० च्या सुमारास उत्तर महाराष्ट्र, गुजराथ व कोंकण या प्रदेशांवर जशी आभीरांची सत्ता पसरली तशी विदर्भावर वाकाटकांचीहि पसरली असावी, असें दिसतें. आद्य वाकाटक नृपति प्रथम विन्ध्यशक्ति याने सुमारें वीस वर्षें (सन २५० ते २७०) राज्य केलें असावें. पुराणांत त्याची म्हणून उल्लेखिलेली ९६ ही वर्षगणना[2] त्याच्या कारकीर्दीची नसून ती त्याच्या वयोमानाची असावी, हें उघड आहे. या विन्ध्यशक्तीचा मुलगा प्रथम प्रवरसेन याने साठ वर्षें राज्य केलें असें पुराणें सांगतात.[3] या

१ कॉ. इ. इं., पु. ४, प्रस्तावना, पृ. ३१ इ.

२ पाहा–'ततः कोलिकिलेभ्यश्च विन्ध्यशक्तिर्भविष्यति ।
समाः षण्णवतिं भूत्वा पृथिवीं तु समेष्यति ॥डा. क.ए., पृ.४८.

३ पूर्वोक्त, पृ. ५०.

प्रवरसेनाने चार अश्वमेध व अनेक वाजपेयादि श्रौत याग केल्याचा उल्लेख वाकाटकांच्या बहुधा सर्व ताम्रपटांत आढळतो. म्हणून ही वर्षसंख्या असंभवनीय वाटत नाही. तेव्हा प्रथम प्रवरसेनाने सन २७० ते ३३० पर्यंत राज्य केलें असावें. प्रवरसेनाच्या दीर्घ कारकीर्दीमुळे त्याचा ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र त्याच्या हयातींतच निधन पावला होता. प्रवरसेनानंतर त्याच्या साम्राज्याची वाटणी होऊन उत्तर विदर्भावर त्याचा नातू व गौतमीपुत्राचा मुलगा प्रथम रुद्रसेन हा राज्य करूं लागला. त्याची कारकीर्द सुमारें वीस वर्षांची झाली असें मानल्यास तिचा शेवट सन ३५० च्या सुमारास झाला असावा. वाकाटक ताम्रपटांतील वर्णनाने या अनुमानास दुजोरा मिळतो. प्रथम रुद्रसेनाचा पुत्र प्रथम पृथिवीषेण सन ३५० च्या सुमारास गादीवर आला त्यावेळीं वाकाटक राज्यस्थापनेपासून शंभर वर्षें झालीं होतीं.[४] वाकाटकांच्या ताम्रपटांतहि प्रथम पृथिवीषेणाच्या काळीं राज्याचा खजीना व सैन्य शंभर वर्षें सतत वृद्धि पावत होतीं असें म्हटलें आहे. या पृथिवीषेणाने दीर्घ काल राज्य केलें असें दिसतें. कारण त्याला त्याच्या हयातींत पुत्रपौत्र झाले होते, असें त्याचें वर्णन ताम्रपटांत केलें आहे. शिवाय त्याचा पुत्र द्वितीय रुद्रसेन हा गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याचा जामात होता. वाकाटक व गुप्त राजवंशांचा हा वैवाहिक संबंध द्वितीय चन्द्रगुप्ताने सन ३९५ च्या सुमारास शक क्षत्रपांवर केलेल्या स्वारीच्या निमित्ताने घडून आला असावा, असें व्हिन्सेंट स्मिथ्ने केलेलें अनुमान[६] बरोबर दिसतें. यानंतर लौकरच सन ४०० च्या सुमारास प्रथम पृथिवीषेणाची कारकीर्द समाप्त होऊन द्वितीय रुद्रसेन गादीवर आला असावा. त्याने फारच थोडा काल (सुमारें सन ४०० ते ४०५) पर्यंत

---

४ पाहा–वर्षशतमभिवर्द्धमानकोशदण्डसाधनसन्तानपुत्रपौत्रिणः . . . वाकाटकानाम्महाराजश्रीपृथिवीषेणस्य . . . । क्रमांक ३, ओ.११.

५ क्रमांक २, ओ.७-९ पाहा. ६ ज. रॉ. ए. सो. १९१४, पृ. ३१७ इ.

राज्य केलें असें दिसतें. कारण तो निधन पावला त्यावेळीं त्याचे मुलगे दिवाकरसेन व दामोदरसेन ऊर्फ द्वितीय प्रवरसेन हे अत्यंत अल्पवयी होते. यांपैकी पहिल्या मुलाच्या नांवें युवराजजननी म्हणून प्रभावतीगुप्ता निदान तेरा वर्षे राज्यकारभार पाहात होती, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

पुणें ताम्रपट दिवाकरसेनाच्या राज्यारंभापासून तेराव्या वर्षी दिला होता. त्यानंतर लौकरच दिवाकरसेन निधन पावला असावा. कारण त्याचा दुसरा एकहि ताम्रपट अद्यापि मिळाला नाही. तेव्हा दिवाकरसेनाची कारकीर्द सन ४०५ ते ४२० या अवधींत झाली असावी. त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ दामोदरसेन ऊर्फ द्वितीय प्रवरसेन हा गादीवर बसला. याचे अनेक ताम्रपट सापडले आहेत. त्यांपैकी शेवटचा पट्टन ताम्रपट त्याच्या कारकीर्दीच्या सत्ताविसाव्या वर्षी दिला होता. तेव्हा द्वितीय प्रवरसेनाने सन ४२० ते ४५० पर्यंत सुमारें तीस वर्षे राज्य केलें असें अनुमान करतां येतें. त्यानंतर त्याचा मुलगा नरेन्द्रसेन व नातू द्वितीय पृथिवीषेण यांनी प्रत्येकीं वीस वर्षे राज्य केलें असें मानल्यास द्वितीय पृथिवीषेणाच्या कारकीर्दीचा शेवट सन ४९० च्या सुमारास झाला असावा. या राजाच्या कारकीर्दीचा सन ४७० ते ४९० हा अनुमानाने ठरविलेला काल व्याघ्रदेव नामक त्याच्या मांडलिकाच्या कालाने समर्थित होतो. हा व्याघ्रदेव उच्चकल्पवंशी असून त्याचे शिलालेख मध्यप्रदेशाच्या उत्तर भागांत नचना[3] व गंज[4] येथे सापडले आहेत. व्याघ्रदेवाच्या जयनाथ नामक मुलाचे ताम्रपट गुप्तसंवत् १७४ व १७७ या वर्षी दिले होते. त्यावरून त्याने गुप्तसंवत् १७० ते १९० पर्यंत राज्य केलें असावें. तेव्हा त्याचा पिता व्याघ्रदेव याचा काळ गुप्त संवत् १५० ते १७० किंवा इ. स. ४७० ते ४९० हा येतो. याच कालांत द्वितीय पृथिवीषेण राज्य करीत होता, असें आपण अनुमानाने

१ क्रमांक २, ओ. २२. २ क्रमांक १३, ओ. ४३.
३ क्रमांक १९–२०. ४ क्रमांक २१.

ठरविलें आहे. तेव्हा हा व्याघ्रदेव या पृथिवीषेणाचा मांडलिक असणें सुतराम् शक्य आहे. याप्रमाणे सन ४९० च्या सुमारास या ज्येष्ठ शाखेचा अस्त झाला असावा.

आता वत्सगुल्म शाखेच्या नृपतींच्या कालाचा विचार करूं. या शाखेचा संस्थापक सर्वसेन हा ज्येष्ठ शाखेच्या प्रथम रुद्रसेनाचा समकालीन होता. त्याने सुमारें सन ३३० ते ३५५ या कालांत राज्य केलें असावें. त्याचा मुलगा विन्ध्यसेन ऊर्फ द्वितीय विन्ध्यशक्ति याने आपला वाशीम ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या सदतिसाव्या वर्षी दिला होता.[1] त्यावरून त्याने दीर्घ काळ—चाळीस-पंचेचाळीस वर्षें—राज्य केलें असावें. तेव्हा त्याचा काळ सन ३५५ ते ४०० हा मानण्यांत हरकत नाही. त्याच्या मुलाचें प्रवरसेन असेंच नांव होतें. हा वत्सगुल्म शाखेचा द्वितीय प्रवरसेन होय. हा तरुणपणींच कालवश झाला असावा. कारण त्याचा मुलगा आठ वर्षांचा असतांना गादीवर आला असें अजंटयाच्या सोळा नंबरच्या लेण्यांतील लेखांत म्हटलें.[2] त्या लेखांत या बालराजाचें नांव नष्ट झालें आहे. या शाखेच्या द्वितीय प्रवरसेनानें सन ४०० ते ४१० व त्याच्या मुलाने ४१० ते ४५० या कालांत राज्य केलें असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही. यानंतर गादीवर आलेल्या देवसेनाने सुमारें सन ४५० ते ४७५ व त्याचा मुलगा हरिषेण याने सुमारें सन ४७५ ते ५०० या कालांत राज्य केलें असावें.

हरिषेण हा या शाखेचा शेवटचा ज्ञात राजा होय. दण्डीच्या दशकुमारचरितांतील आठव्या उच्छ्वासांत एका विदर्भ नृपतीची गोष्ट आली आहे. तींत ऐतिहासिक सत्य बरेंच दिसतें. या गोष्टीवरून हरिषेणानंतर त्याच्या पुत्राने अल्प काळ सुमारें सन ५०० ते ५१० पर्यंत राज्य केलें असें दिसतें. त्यानंतर कांही काळाने राज्यक्रांति होऊन विदर्भावर कलचुरींची सत्ता प्रस्थापित झाली असावी.

ज्ञात वाकाटक नृपतींचा कालानुक्रम खालीलप्रमाणें ठरवितां येतो—

१ क्रमांक २२, ओ. २९. २ क्रमांक २४, ओ. ८.

प्रथम विन्ध्यशक्ति (सन २५० ते २७०)

प्रथम प्रवरसेन (सन २७० ते ३३०)

- (ज्येष्ठ शाखा)
  (गौतमी पुत्र)
  - प्रथम रुद्रसेन (सन ३३० ते ३५०)
  - प्रथम पृथिवीषेण (सन ३५० ते ४००)
  - द्वितीय रुद्रसेन (सन ४०० ते ४०५)
    - दिवाकरसेन (सन ४०५ ते ४२०)
    - दामोदरसेन ऊर्फ द्वितीय प्रवरसेन (सन ४२० ते ४५०)
      - नरेन्द्रसेन (सन ४५० ते ४७०)
      - द्वितीय पृथिवीषेण (सन ४७० ते ४९०)
- (वत्सगुल्म शाखा)
  - सर्वसेन (सन ३३० ते ३५५)
  - द्वितीय विन्ध्यशक्ति (सन ३५५ ते ४००)
  - द्वितीय प्रवरसेन (सन ४०० ते ४१०)
  - पुत्र (नाम अज्ञात) (सन ४१० ते ४५०)
  - देवसेन (सन ४५० ते ४७५)
  - हरिषेण (सन ४७५ ते ५००)
  - पुत्र (नाम अज्ञात) (सन ५०० ते ५१०)

वाकाटकांचें मूलस्थान

वाकाटक हे मूळचे उत्तर भारतांतील असें प्रचलित मत आहे. उदाहरणार्थ, वाकाटकांवरील लेखांत व्हिन्सेंट स्मिथ्ने म्हटलें आहे की, वाकाटक नृपति विन्ध्यशक्ति व त्याचा पुत्र प्रथम प्रवरसेन हे पुराणांत उल्लेखिलेले विन्ध्यशक्ति व प्रवीर असल्यास या राजवंशाचें मूलस्थान मध्यभारतांत कोठे तरी शोधलें पाहिजे.[१] जायस्वालनी याच्याहि पुढे जाऊन प्रतिपादिलें की, ज्याप्रमाणें त्रैकूटक हें वंशनाम 'त्रिकूट' यापासून बनलें आहे त्याप्रमाणे वाकाटक हें वकाट किंवा वाकाट पासुन उत्पन्न झालें असावें. झांशी जिल्ह्यांत चिरगांवच्या पूर्वेस, पूर्वीच्या ओरछा संस्थानांत, बागाट नामक गाव अद्यापि विद्यमान आहे तेंच वाकाटकांचें मूलस्थान वाकाट असावें, असें जायसवालांचें मत होतें. 'वाकाटक वंशाच्या ब्राह्मण संस्थापकानें विन्ध्यशक्ति असें सार्थ नांव धारण करून वाकाट या स्वतःच्या मूलस्थानावरून आपलें वंशनाम बनविलें' अशी या नांवाची उपपत्तिहि जायसवालांनी दिली आहे.[२] इतरहि बहुतेक लेखकांनी या प्रश्नाचा बारकाईने विचार न करतां वाकाटक हे मूळचे उत्तरभारतीय होते हेंच मत स्वीकारलें आहे. हें मत ज्या प्रमाणांवर आधारलें आहे त्यांचें प्रथम परीक्षण करूं या.

वाकाटकांच्या उत्तरभारतीयत्वाच्या प्रमाणांचें परीक्षण

(१) या मताचा मुख्य आधार म्हणजे पुराणांतील खालील श्लोक होत[३] —

१ ज. रॉ. ए. सो. १९१४, पृ. ३२९.
२ हि. ऑ. इं., पृ. ६७ इ.
३ डा. क. ए., पृ. ४९–५०.

नृपान्वैदिशिकाश्चापि भविष्यांस्तु निबोधत ।
शेषस्य नागराजस्य पुत्रः परपुरञ्जयः ॥
भोगी भविष्यते राजा नृपो नागकुलोद्वहः ।
सदाचन्द्रस्तु चन्द्रांशो द्वितीयो नखवांस्तथा ॥
धनधर्मा ततश्चापि चतुर्थो वङ्गरः स्मृतः ।
भूतिनन्दस्ततश्चापि वैदिशे तु भविष्यति ॥
तस्य भ्राता यवीयांस्तु नाम्ना नन्दियशाः किलः ।
तस्यान्वये भविष्यन्ति राजानस्ते त्रयस्तु वै ॥
दौहित्रः शिशुको नाम पुरिकायां नृपोऽभवत् ।
विन्ध्यशक्तिसुतश्चापि प्रवीरो नाम वीर्यवान् ॥
भोक्ष्यते च समाः षष्टिं पुरीं काञ्चनकां च वै ।
यक्ष्यते वाजपेयैश्च समाप्तवरदक्षिणैः ।
तस्य पुत्रास्तु चत्वारो भविष्यन्ति नराधिपाः ॥

या उताऱ्याचा आरंभ ‘ विदिशेच्या भावी राजांची माहिती ऐका’ अशा शब्दांनी केला असून त्याच्या शेवटीं विन्ध्यशक्ति व प्रवीर (किंवा प्रवरसेन) या वाकाटक नृपतींचीं नांवें आलीं आहेत. तेव्हा हे राजे विदिशा (सध्याचें भिलशाजवळचें बेसनगर) या नगरीपासून कोठे तरी जवळच राज्य करीत असावे असें अनुमान सामान्यतः केलें जातें, पण तें बरोबर दिसत नाही. या उताऱ्यांत अनेक प्राचीन राजांचीं नांवें उल्लेखिलीं आहेत, पण उपरिनिर्दिष्ट दोन वाकाटक राजांशिवाय इतर कोणाहिबद्दल इतरत्र माहिती मिळत नाही. शिवाय या उताऱ्याच्या आरंभींच्या ‘नृपान् वैदिशिकांश्चापि भविष्यांस्तु निबोधत ’ या वाक्याचा संबंध कोठपर्यंत आहे हेंहि स्पष्ट नाही. या उताऱ्यांतील सर्वच राजे विदिशेस राज्य करीत नव्हते, हें पार्जिटरलाहि पटलें होतें; कारण त्याने

याचें शीर्षक 'विदिशा व इतर ठिकाणचे राजवंश' असें दिलें आहे. विशेष लक्षांत घेण्याची गोष्ट ही की, यांतील पांचव्या श्लोकांत पुरिकेचा अधिपति शिशुक याचा निर्देश आहे. हरिवंशांतील वर्णनाप्रमाणें पुरिका ही नगरी ऋक्षवत् पर्वताच्या पायथ्याशीं वसली होती.[४] ऋक्षवत् हें सातपुडा पर्वताचें प्राचीन नाम.[५] तेव्हा पुरिका ही विन्ध्य पर्वताच्या दक्षिणेस होती यांत संशय नाही. वरील उताऱ्यांत शिशुकानंतर विन्ध्यशक्तिसुत प्रवीराचें (म्हणजे प्रवरसनाचें) नांव आलें आहे, याचें कारण तो शिशुकानंतर पुरिकेसच राज्य करीत असावा. याच नगरीचा निर्देश पुढील श्लोकांतहि केला आहे. त्याच्या द्वितीयार्धाचा शुद्ध पाठ 'भोक्ष्यते च समाः षष्टिं पुरिकां चनकां च वै' असा असावा ही जायसवालांची सूचना[६] आहे. हा पाठ स्वीकारल्यास वाकाटक नृपति प्रवीर किंवा प्रवरसेनाचें नांव या उताऱ्यांत शिशुकानंतर कां येतें त्याची उपपत्ति लावतां येतें. प्रवरसेनाने शिशुकाचें राज्य खालसा करून पुरिका ही आपल्या विस्तृत राज्याची दुसरी राजधानी केली असावी. तेव्हा या उताऱ्यावरून वाकाटक मूळचे मध्यभारतांतील हें मुळीच सिद्ध होत नाही.

(२) दुसरें एक प्रमाण कधी कधी देण्यांत येतें. तें हें की प्रयागच्या स्तंभलेखांत समुद्रगुप्ताने आर्यावर्ताच्या ज्या अनेक राजांचा उच्छेद केला त्यांमध्ये रुद्रदेव नामक राजा आहे. तो वाकाटक नृपति प्रथम रुद्रसेन असावा. हें समीकरण मान्य केल्यास समुद्रगुप्ताच्या पूर्वी उत्तर भारतांत प्रथम प्रवरसेन व प्रथम रुद्रसेन यांनी राज्य केलें असें सिद्ध होईल.

४ हरिवंश, विष्णुपर्व, अ. ३८, श्लो. २२.

५ ऋक्षवत् पर्वतांतून तापी, पयोष्णी व निर्विन्ध्या ह्या नद्या निघतात, असें विष्णुपुराणांत म्हटलें आहे (तापीपयोष्णीनिर्विन्ध्याप्रमुखा ऋक्षसम्भवाः।). त्यावरून हें स्पष्ट दिसेल.

६ हि. ऑ. इं., पृ. १८, टीप २.

पण हें समीकरणच असंभवनीय आहे. कारण या आद्य वाकाटक नृपतींचा एकहि कोरीव लेख अद्यापि उत्तर भारतांत सापडला नाही. प्रथम रुद्रसेनाचा एकच लेख आतापर्यंत मिळाला आहे. तो म्हणजे चांदा जिल्ह्यांतील देवटेक येथे सापडलेला शिलालेख[1] होय. त्यावरून हा रुद्रसेन आर्यावर्तांतील नृपति नसून तो विदर्भावर राज्य करीत होता, हें उघड आहे. शिवाय, प्रयागच्या स्तंभलेखांत म्हटल्याप्रमाणे समुद्रगुप्ताने या रुद्रसेनाचा समूळ उच्छेद केला असता तर त्याचा मुलगा प्रथम पृथिवीषेण यानें आपला मुलगा द्वितीय रुद्रसेन याच्याकरिता प्रभावती गुप्ता ही गुप्त राजकन्या पसंत केली नसती, हें डॉ. अळतेकरांचें म्हणणेंहि[2] बरोबर दिसतें. तेव्हा प्रयागच्या स्तंभलेखांत उल्लेखिलेला आर्यावर्तनृपति रुद्रदेव हा वाकाटक प्रथम रुद्रसेन असणें शक्य दिसत नाही.

(३) कोणत्याहि राजाच्या राज्याचा विस्तार ठरविण्याचें निश्चित साधन म्हणजे त्याच्या शिलालेखांचीं मूळ ठिकाणें होय. ताम्रपट व नाणीं हीं सहज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतां येत असल्यामुळें तीं त्यांच्या मूळ ठिकाणांहून शेंकडों मैल दूर सापडूं शकतात. वाकाटकांचा एकही शिलालेख विंध्य पर्वताच्या उतरेस सांपडला नाही. पण विन्ध्यप्रदेशांतील नचना व गंज या दोन गांवीं वाकाटक महाराज पृथिवीषेण याचा मांडलिक व्याघ्रदेव याचे दोन शिलालेख[3] सापडले आहेत. कांही विद्वानांच्या मतें हा राजा सन ३५० ते ४०० या काळांत होऊन गेलेला प्रथम पृथिवीषेण असावा. या दोन शिलालेखांवरून उत्तर भारतांत वाकाटकांचें साम्राज्य गुप्तांच्या उदयापूर्वी होतें, असें अनुमान केलें

१ क्रमांक १.

२ न्यू. हि. इं. पी., पु. ६, पृ. १०५.

३ क्रमांक २० व २१.

जातें. अलीकडे एका विद्वानाने या शिलालेखांच्या अक्षरवटिकेचा पुरावा या अनुमानाला उपोद्बलक म्हणून पुढे मांडला आहे, पण तो निर्णायक नाही हें मी इतरत्र[१] दाखविलें आहे. प्रथम पृथिवीषेणाच्या काळीं किंवा तत्पूर्वी वाकाटकांच्या साम्राज्याचा विस्तार उत्तर भारतांत झाला होता, याला यत्किंचितहि पुरावा नाही. याच्या उलट असें सिद्ध करतां येतें की, हा व्याघ्रदेव म्हणजे उच्चकल्प नृपति व्याघ्र असावा. या व्याघ्राच्या जयनाथ नामक मुलाचे ताम्रपट विंध्यप्रदेशांत नचना–गंज याच्या जवळपास सापडले आहेत.[२] त्यांतील कालोल्लेखावरून व्याघ्र हा खिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या अंतिम पादांत होऊन गेला असावा, असें दिसतें. अर्थात् तो सन ४७० ते ४९० या काळांत होऊन गेलेल्या द्वितीय पृथिवीषेणाचाच मांडलिक असणें शक्य आहे. शेवटीं शेवटीं वाकाटकांचें साम्राज्य विन्ध्यपर्वताच्या उत्तरेस पसरलें होतें, याला आणखीहि पुरावा आहे. बालाघाट ताम्रपटांत द्वितीय पृथिवीषेणाचा पिता नरेन्द्रसेन याचें वर्णन 'कोसलामेकलामालवाभ्यर्चितशासनः' या शब्दांत केलें आहे.[३] त्यावरून विन्ध्य पर्वताच्या उत्तरेचे मेकला व मालव देशांचे अधिपति नरेन्द्रसेनाचे मांडलिक होते, असें स्पष्ट दिसतें. अलिकडे सापडलेल्या बम्हनी ताम्रपटावरूनहि पाण्डववंशी भरतबल नामक मेकला देशाचा अधिपति नरेन्द्रसेनाचें वर्चस्व कबूल करीत होता असें दिसतें.[४] तेव्हा नरेन्द्रसेनाचा मुलगा द्वितीय पृथिवीषेण याने मेकला देशाच्या उत्तरेस आपलें साम्राज्य पसरवून उच्चकल्प नृपति व्याघ्र यास आपलें स्वामित्व कबूल करावयास लावलें असलें तर त्यांत आश्चर्य नाही. व्याघ्र नांवाचा दुसरा कोणी राजा विन्ध्यप्रदेशांत होऊन गेलेला आपणांस

१ क्रमांक २० वरील विवेचन पाहा.

२ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ११७ व १२१.

३ क्रमांक १७, ओ. २७–२८.

४ क्रमांक १८, ओ. ३१–३४.

माहीत नाही. तेव्हा नचना व गंज येथील शिलालेखांत उल्लेखिलेला व्याघ्रदेव व उच्चकल्पवंशी व्याघ्र हे एकच असावेत. अर्थातच हा व्याघ्रदेव ज्याचा मांडलिक होता तो पृथिवीषेण द्वितीय पृथिवीषेणच असला पाहिजे. तो प्रथम पृथिवीषेण असूंच शकत नाही. आणि म्हणून वाकाटकांचें राज्य आरंभीं उत्तर भारतांत होतें हें ठरविण्यास या शिलालेखांचा पुरावा निरुपयोगी आहे.

(४) मागे म्हटल्याप्रमाणे एखादा राजवंश कोठे राज्य करीत होता हें ठरविण्यास त्याच्या ताम्रपटांच्या व नाण्यांच्या प्राप्तिस्थानाचा पुरावा खात्रीलायक होऊं शकत नाही. असें असलें तरी या प्रश्नाच्या निर्णयास आवश्यक अशीं इतर प्रमाणें नसतील तर असा पुरावाहि विचारांत घेतला पाहिजे. वाकाटकांचा फक्त एकच ताम्रपट उत्तर भारतांत सापडला आहे. तो म्हणजे द्वितीय प्रवरसेनाचा इंदूर ताम्रपट होय.[१] हा ताम्रपट कै. वामनशास्त्री इसलामपूरकर यांच्या संग्रहांत होता. हे शास्त्री भारतांतील अनेक प्रदेशांत-विशेषतः महाराष्ट्रांत-हिंडून प्राचीन संस्कृत ग्रंथांचीं हस्तलिखितें व ऐतिहासिक साधनें जमवीत असत. इंदूरला त्यांच्या संग्रहांत असलेले दोन ताम्रपट मूळचे खानदेशांतील असून त्यांत उल्लेखिलेली कांही गावेंहि खानदेशांत अद्यापि सापडतात, हें मी इतरत्र दाखविलें आहे.[२] वाकाटकांचे इतर सर्व ताम्रपट विदर्भांत सापडले असल्याने हा इंदूर ताम्रपट मूळचा विदर्भांतीलच असावा असें अनुमान करण्यास हरकत नाही. त्या ताम्रपटांत उल्लेखिलेलें एकहि गाव अद्यापि कोणी नर्मदेच्या उत्तरेस असलेलें दाखविलें नाही.[३]

---

१ क्रमांक ९.

२ कॉ. इ. इं., पु. ४, पृ. ४ इ.

३ त्यांतील कांही गावें बालाघाट जिल्ह्यांत सापडतात, हें मी पुढे त्या ताम्रपटावरील प्रास्ताविक लेखांत दाखविलें आहे.

नाण्यांची गोष्टहि अशीच आहे. जायसवालांनी उत्तरभारतीय घडणीचीं कांही नाणीं वाकाटकांचीं होतीं, असें प्रतिपादिलें आहे.[1] त्यांपैकी एकावर 'प्रवरसेनस्य' अशीं अक्षरें असून ७६ या वर्षसंख्येचा निर्देश आहे आणि दुसऱ्यावर 'रुद्र' अशीं अक्षरें व १०० अशी वर्षसंख्या दिसते, असें जायसवालांचें म्हणणें होतें. हे दोन्ही कालनिर्देश सन २५० च्या सुमारास सुरू झालेल्या तथाकथित कलचुरि–चेदि संवताचें असून, तो संवत् वस्तुतः वाकाटकांचा होय, असें जायसवालांनी प्रतिपादिलें आहे. या नाण्यांवरील अक्षरांचें व वर्षसंख्यांचें जायसवालांनी केलेलें वाचन व संवताचा निर्णय बरोबर असल्यास त्या पुराव्यावरून वाकाटक नृपति प्रथम प्रवरसेन व प्रथम रुद्रसेन याच्या काळीं या राजवंशाची सत्ता उत्तर भारतांत पसरली होती हें सिद्ध होईल. पण जायसवालांचें वाचन व त्याचा त्यांनी लावलेला अर्थ इतर विद्वानांना पटला नाही. डॉ. अळतेकरांनी दाखविल्याप्रमाणें[2] जायसवाल ज्याला प्रवरसेनाचें नाणें समजतात तें वस्तुतः वीरसेनाचें आहे. ज्या आकृतींचा अर्थ ते ७६ असा करतात त्या वास्तविक कठड्याने वेष्टित अशा झाडाचीं पानें होत. तथाकथित रुद्रसेनाच्या नाण्यावर 'रुद्र' अशीं अक्षरें नसून 'त्रिरत्न' आकृति आहे. ज्या आकृतीचा अर्थ ते १०० असा करतात ती वस्तुतः स्वस्तिकाची आहे. तेव्हा हीं नाणीं वाकाटकांनी पाडलीं होतीं, असें समजण्यास यत्किंचितहि आधार नाही. खरें पाहिलें असतां वाकाटकांनी स्वतः नाणीं पाडलीं नसून आपल्या राज्यांत गुप्तांच्या नाण्यांचा प्रसार चालू ठेवला होता, असें दिसतें. द्वितीय चन्द्रगुप्ताचीं सोन्याचीं कित्येक नाणीं विदर्भांत सापडलीं आहेत पश्चिम क्षत्रपांचीं चांदीचीं नाणींहि त्यांच्या राज्यांत चालत असावीं. कारण अशा नाण्यांचे कांही संचय छिंदवाडा व इतर

१ हि. ऑ. इं. पृ. ५२ इ.

२ ज. न्यू. सो. इं., पु. ५, पृ. १३० इ.

जिल्ह्यांत सापडले आहेत. उपरिनिर्दिष्ट नाण्यांवरील वर्षसंख्यांचें जायस-वालांचें वाचन बरोबर मानलें तरी तीं वर्षें इ. स. २५० च्या सुमारास सुरू झालेल्या तथाकथित कलचुरि संवताचीं असणें शक्य नाही; कारण तो संवत् वाकाटकांनी चालू केला नव्हता व त्यांच्या ताम्रपटांत त्याचा उपयोग कोठेहि केलेला आढळत नाही. वाकाटकांच्या सर्व दानपत्रांत त्या त्या राजाच्या राज्यारंभापासूनचीं वर्षेंच उल्लेखिलीं आहेत. वस्तुतः तो संवत् वाकाटकांच्या अस्तानंतरच विदर्भात आला. या संवताचा एकच लेख विदर्भात सापडला आहे. तो कलचुरि नृपति कृष्णराज याच्या स्वामिराज नामक मांडलिकाचा आहे.[1] तेव्हा हीं नाणीं वाकाटकांचीं असें समजण्यास व त्यांच्या पुराव्यावरून वाकाटक हे मूळचे उत्तर भारतांतील, असें मानण्यास यत्किंचित्‌ही आधार नाही.

येथवर वाकाटकांचें मूलस्थान उत्तर भारतांत असणें शक्य नाही, हें दाखविलें. आता याच्या पुढे जाऊन ते मूळचे दक्षिण भारतांतील होते हें सिद्ध करणारीं प्रमाणें पुढे मांडतों.

वाकाटक मूळचे दक्षिण भारतांतील

(१) वाकाटक हें नांव ज्यांत उल्लेखिलेलें आहे असा सर्वांत प्राचीन शिलालेख आन्ध्र प्रदेशाच्या गुंटूर जिल्ह्यांतील अमरावती गावांत एका अष्टकोनी स्तंभखंडावर कोरला आहे.[2] तो प्राकृतमध्ये असून त्याची अक्षरवटिका खिस्तोत्तर तिसऱ्या शतकांतील आहे. त्याचें वाचन येणेंप्रमाणें—

लेख क्रमांक १२६—

ओळ १--.....गामे वाथवस गहपतिस वाकाटकस गहपतिकिनि
२--......ना थेरेन बोधिकेन भरियाय चमुनाय सभतुकेहि

---

१ कॉ. इ. इं., पु. ४, पृ. ६११

२ अमरावती स्कल्प्चर्स इन दि मद्रास गव्हर्नमेंट म्यूझियम्, पृ. ३०४.

३--......केहि सनातिमितबंधवेहि च अपनो आयुवधनिक-

हा लेख दुर्दैवाने खंडित आहे. तथापि अवशिष्ट भागावरून त्याचा आशय वाकाटक नामक गृहपति (गृहस्थ) व त्याच्या दोन भार्या—चमुना व दुसरी—यांचें दानकृत्य त्या स्तंभावर कोरणें हा होता, हें उघड आहे. हें दानकृत्य बोधिक नामक थेराच्या म्हणजे भिक्षूच्या उपदेशाप्रमाणें केलें होतें व त्याचा उद्देश दात्यांचे व त्यांचे ज्ञातिजन, मित्र व बांधव यांचें आयुष्य वृद्धिंगत व्हावें, हा होता. या लेखावरून वाकाटक नामक कोणी गृहपति आपल्या दोन भार्यांसह अमरावती या बौद्धांच्या पुण्यक्षेत्रीं गेला होता व तेथे त्याने स्वतःच्या, आपल्या भार्यांच्या, नातेवाइकांच्या व मित्रांच्या दीर्घायुष्याकरिता कांही दानकृत्य केलें होतें, हें उघड आहे. या लेखांत वाकाटक हें वंशनाम नसून व्यक्तिनाम आहे. हा वाकाटक जेथे राहत होता त्या स्थलाचें नांव पहिल्या ओळीच्या आरंभीं कोरलें होतें, पण तें आता नष्ट झालें आहे. प्राचीन काळीं प्रवास करणें किती कष्टप्रद होतें हें लक्षांत घेतां हा वाकाटक नामक गृहपति जवळच्याच एखाद्या प्रदेशांतून अमरावती येथे गेला असावा, असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाहीं. या बाबतींत विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही की, अमरावतीच्या कोरीव लेखांत दक्षिण भारतांतीलच देश, नद्या व स्थलें—जसें द्रविड देश, कृष्णा व गोदावरी नद्या, धनकटक व कंटकशैल नगरें—यांचा उल्लेख आढळतो. उत्तर भारतांतील फक्त राजगृह व पाटलिपुत्र या नगरांचाच उल्लेख मला आढळला. हीं नगरेंहि ज्या भिक्षूंनी किंवा त्यांच्या शिष्यांनी अमरावती येथे दानकृत्यें केलीं त्यांच्या वर्णनांतच उल्लेखिलीं आहेत. तेव्हा १२६ क्रमांकाच्या लेखांत उल्लेखिलेला गृहपति वाकाटक हा दक्षिण भारताचा रहिवासी असावा, हें अनुमान सयुक्तिक दिसेल.

अक्षरवटिकेवरून या लेखाचा काल खिस्तोत्तर तृतीय शतक असा ठरविण्यांत आला आहे. तेव्हा सन २५० च्या सुमारास उदयास

आलेल्या विन्ध्यशक्तीच्या कालाजवळ याचा काळ येतो. गुप्त नामक पुरुषापासून जसा गुप्त वंश उदयास आला त्याप्रमाणेच या वाकाटक गृहपतीपासून वाकाटक वंशाची उत्पत्ति झाली असावी. या वाकाटकाचा सामाजिक दर्जा किंवा राजकीय अधिकार कसा होता, हें समजण्यास आज कांही साधन नाही, तथापि ज्या अर्थी त्याचें नांव एका सुविख्यात राजवंशाने घेतलें त्याअर्थी तो तसाच महत्त्वाचा पुरुष असला पाहिजे, असें अनुमान करण्यास हरकत नाही. हा वाकाटक तेव्हा बौद्धधर्मी होता, पण त्याचें किंवा त्याच्या वंशजांचें धर्मपरिवर्तन होऊन ते वैदिक धर्माचे एकनिष्ठ अनुयायी बनले, असें दिसतें, भारताच्या प्राचीन इतिहासांत अशीं धर्मपरिवर्तनाचीं अनेक उदाहरणें आढळतात.

(२) याशिवाय वाकाटकांच्या दक्षिणात्यत्वाचीं अनेक गमकें दृष्टीस पडतात. वाकाटकांच्या ताम्रपटांतील अनेक तांत्रिक संज्ञा पूर्वीच्या शिवस्कंदवर्मा नामक पल्लव नृपतीच्या हीरहडगळ्ळी[१] मयिदवोलू[२] ताम्रपटांत आढळतात. त्यांपैकी कांही खाली दिल्या आहेत.

वाकाटकांच्या वाशीम ताम्रपटांतील संज्ञा		पल्लवनृपतींच्या ताम्रपटांतील समानार्थक संज्ञा
१	अरट्ठसंविनयिक	अरठ्ठसंविनयिक
२	अलवणकेण्णक्खनक	अलोणगुलच्छोभं
३	अपुप्फक्खीरग्गहण	अदूधदधिगहणं
४	अभडप्पावेस	अभडपपेसं
५	अपरंपरगोव्रलिवर्द्द	अपारंपरबलिवद्दगहणं
६	अखट्टाचोल्लकविणेसिक	अकरयोल्लकविनेसिखट्टावासं

या संज्ञांतील साम्य निःसंशय आश्चर्यकारक आहे. त्यांवरून पल्लव व वाकाटक नृपतींचा कांही तरी संबंध असावा असें वाटतें.

---

१ ए. इं., पु. २, पृ. ५. २ पूर्वोक्त, पु. ५, पृ. ८७.

कदाचित् या दोघांनीहि या संज्ञा पूर्वकालीन सातवाहन लेखांतून घेतल्या असतील. मात्र अशा तऱ्हेच्या संज्ञा उत्तरभारतांतील कोणत्याहि प्राचीन ताम्रपटांत आढळत नाहीत, हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

(३) तसेंच 'हारीतीपुत्र' व 'धर्ममहाराज' या पदव्या वाशीम ताम्रपटांत वाकाटक नृपति प्रथम प्रवरसेन, सर्वसेन व द्वितीय विन्ध्यशक्ति यांस लावलेल्या दिसतात.[१] त्याहि वाकाटकांच्या दाक्षिणात्यत्वाचें एक अचूक गमक आहेत; कारण या पदव्या विण्हुकड सातकर्णि,[२] पल्लव,[३] कदम्ब[४] व आद्य चालुक्य[५] या दाक्षिणात्य नृपतींनाच लावलेल्या आढळतात. त्या कोणत्याहि उत्तरभारतीय नृपतींच्या ताम्रपटांत आढळत नाहीत.

(४) शेवटचें प्रमाण हें की, वाकाटकांनी दक्षिण भारतांतील एका वंशाच्या पुरुषांस सतत अनेक पिढया आपल्या सचिवपदावर नेमलें होतें. या वंशाचें नांव वल्लूर असून तें त्याच्या दक्षिण दिशेंतील (दिशि दक्षिणस्यां) मूळच्या निवासस्थानावरून पडलें होतें. वल्लूर हें गाव नक्की कोठे होतें याचा शोध अद्यापि लागला नाही. तथापि तें हैदराबाद संस्थानांत हैदराबादच्या ईशान्येस ४० मैलांवर असलेलें वेलूर असणें अशक्य नाही. या वंशाचा मूळ पुरुष यज्ञपति नामक ब्राह्मण होता. त्याचा पुत्र देव हा प्रथम विन्ध्यशक्ति याचा व कांही काळ त्याचा मुलगा प्रथम प्रवरसेन याचाहि समकालीन होता. हा देव अत्यंत धार्मिक, राजनीतिनिपुण व कर्तबगार पुरुष होता. त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक कृत्यांत निमग्न होऊन गेलें, असें घटोत्कच लेण्यांतील

---

१ क्रमांक २२, ओ. १–४.

२ इं. अँ., पु. १४, पृ. ३३३

३ ए. इं., पु. १, पृ. ५ इ.

४ पुर्वोक्त, पु. ६, पृ. ८६ इ.

५ कॉ. इ. इं., पु. ४, क्रमांक २७, ओ. ३.

लेखांत[१] म्हटलें आहे. वाकाटक ताम्रपटांतील वर्णनावरूनहि या काळांत वैदिक धर्माला अत्यंत भरभराट प्राप्त झाली होती, असें दिसतें. वाकाटक साम्राज्याचा खरा संस्थापक प्रथम प्रवरसेन याने चार अश्वमेध, तसेंच अग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, षोडशी, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव व साद्यस्क्र हे श्रौतयाग केले होते.[२] उत्तर किंवा दक्षिण भारतांतहि इतके श्रौतयाग विष्णुकुंडिवंशी प्रथम माधववर्म्याखेरीज दुसऱ्या कोणाहि राजाने केल्याचें इतिहासांत नमूद नाही. हे यज्ञ करण्यांत वल्लूरच्या देव ब्राह्मणाने प्रवरसेनास उत्तेजन दिलें असावें. या देवाचा मुलगा रवि याने त्या सर्व प्रदेशावर स्वामित्व प्रस्थापित केलें, असें घटोत्कच लेण्यांतील लेखांत म्हटलें आहे. हा रवि वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा संस्थापक सर्वसेन याचा समकालीन होता. तेव्हा त्याने सर्वसेनास नवीन प्रदेश जिंकून आपल्या राज्याचा विस्तार वाढविण्यास मदत केली, असें दिसतें. या वंशाचे शेवटचे दोन पुरुष हस्तिभोज व वराहदेव हे अनुक्रमें वाकाटक नृपति देवसेन व हरिषेण यांचे मुख्य सचिव होते. तेव्हा राजांचे व सचिवांचे असे हे दोन वंश हे एकाच काळीं उदयास आले असून कित्येक पिढ्या एकमेकांशीं संलग्न होते, असें दिसून येईल. त्यांपैकी सचिववंश हा हैदराबाद संस्थानांतील वल्लूरनामक गावाचा मूळचा रहिवासी होता, हें मागे दाखविलें आहे. राजवंशाचा संस्थापक गृहपति वाकाटक याच्या मूलस्थानाचें नांव अमरावती येथील क्रमांक १२६ च्या लेखांत कोरलें होतें, पण तें आता नष्ट झालें आहे. पण तें गावहि दक्षिणच्याच मध्यभागांत कोठे तरी होतें, असें अनुमान करण्यास हरकत नाही. तसें मानल्यास सातवाहनांच्या अस्तानंतर लागलीच वाकाटक वंशाचा विदर्भांत उदय कसा झाला, याची उपपत्ति लावतां येते.

वरील विविध प्रमाणांवरून वाकाटक मूळचे दक्षिण भारतांतील होत हें दिसून येईल.

---

१ क्रमांक २५, ओ. ५. २ क्रमांक, ३, ओ १–२.

आद्य नृपति

खिस्तोत्तर तृतीय शतकाच्या मध्याच्या सुमारास दक्षिण भारताच्या इतिहासाचें एक नवीन पर्व सुरू झालें. तत्पूर्वी साडेचार शतकांच्या दीर्घ कालांत दक्षिण भारतांत ज्यांनी आपली साम्राज्यसत्ता गाजविली त्या सातवाहन वंशाचा सन २५० च्या सुमारास अस्त झाला. पुराणांतील निर्देशाप्रमाणे चतुर्थ पुळुमावि हा आन्ध्र (म्हणजे सातवाहन) वंशाचा शेवटचा राजा होय. त्याचा प्रस्तरलेख आन्ध्र प्रदेशाच्या बेल्लारी जिल्ह्यांतील अडोनी गावीं व त्याचीं नाणीं विदर्भाच्या अकोला जिल्ह्यांतील तऱ्हाळा गावीं सापडलीं आहेत.[२] त्यावरून त्याचें साम्राज्य उत्तरेंत नर्मदा नदी पासून दक्षिणेंत तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें असें दिसतें. त्याच्या निधनानंतर त्याच्या साम्राज्याचे अनेक तुकडे होऊन भिन्न भिन्न प्रदेशांत लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलीं. आंध्रांचें (सातवाहनांचें) राज्य नष्ट झाल्यावर त्यांचे भृत्य (सेवक) आभीर, श्रीपर्वतीय, आन्ध्र, गर्दभिल, शक, यवन, तुषार, मुरुण्ड व हूण हे उदयास आले असें पुराणें सांगतात.[३] पुराणांतील या विधानास कोरीव लेख व नाणीं यांचीं थोडीबहुत पुष्टि मिळाली आहे. आभीर राजांनी उत्तर महाराष्ट्र, कोंकण व गुजराथ यांवर आपली सत्ता प्रस्थापित केली[४] तर श्रीपर्वतीय किंवा इक्ष्वाकुवंशी

---

१ या शिलालेखाचे संपादक डॉ. वि. स. सुखठणकर यांनी हा लेख वासिष्ठीपुत्र द्वितीय पुळुमावि याचा असावा असें म्हटलें आहे. पण अक्षरवटिकेवरून तो चतुर्थ पुळुमावीच्या काळचा दिसतो.

२ ज. न्यू. सो. इं., पु. २, ढ. ९२, तऱ्हाळ्याच्या नाण्यांवर या राजाचें नांव 'पुळुहामवि' असें आढळतें.

३ डा. क. ए., पृ. ४५ इ.

४ कॉ. इ. इं., पु. ४, प्रस्तावना, पृ. ३३ इ.

राजांनी कृष्णा नदीच्या दक्षिण खोऱ्यांत आपला अंमल बसविला[1], असें कोरीव लेखांवरून स्पष्ट दिसतें. तसेंच हैदराबाद संस्थानच्या दक्षिण भागांत शक राजे याच काळांत उदयास आले, हें त्यांच्या नाण्यांच्या प्राप्तिस्थानांवरून आता सिद्ध झालें आहे.[2] या वंशाचा संस्थापक मान महिष हा होता. याची प्रबल सत्ता व प्रभाव यामुळे पुराणांतील वंशावळींत नामोल्लेख होण्याचा मान त्याला मिळाला आहे. सातवाहनांच्या काळीं हा महासेनापतिपदावर होता. पुढे स्वतंत्र झाल्यावरहि त्याने कांही काळ आपल्या नाण्यांवर ती पदवी चालू ठेवली, असें दिसतें. याच काळांत गर्दभिल, यवन, तुषार, मुरुंड व हूण यांचाहि उदय झाला असें जें पुराणांत म्हटलें आहे, त्याला अद्यापि इतर पुरावा मिळला नाही. याच सुमारास शक राजे उदयास आले असें पुराणें सांगतात. हें विधान मध्यभारतांत शकवंशी श्रीधरवर्म्यांचे जे शिलालेख व स्तंभलेख मिळाले आहेत त्यांनी समर्थित होतें. हा श्रीधरवर्मा आरंभीं महादण्डनायक असून पुढे त्याने राजा ही पदवी धारण केली असें दिसतें.[3] सातवाहनानंतर उदयास आलेल्या राजवंशांमध्ये वाकाटकांचें नांव पुराणांमध्ये येऊं नये हें आश्चर्य आहे. पुराणांत विन्ध्यशक्तीचा उल्लेख आहे खरा, पण तो सातवाहनानंतर उदयास आलेल्या किलकिल (किंवा कोलिकिल) राजानंतर होऊन गेला, असें पुराणें सांगतात.[4] पण या किलकिल (किंवा कोलिकिल) राजांचा इतरत्र कोठेहि पत्ता लागत नाही.

---

१ ए. इं., पु. २०, पृ.

२ ज. न्यू. सो. इं., पु. १५, पृ. १ इ.

३ कॉ. इ. इं., पु. ४, प्रस्तावना, पृ. ३८ इ.

४ पाहा ‘ ततः कोलिकिलेभ्यश्च विन्ध्यशक्तिर्भविष्यति । ’ डॉ. क. ए., पृ. ४८.

प्रथम विन्ध्यशक्ति

प्रथम विन्ध्यशक्ति हा वाकाटक वंशाचा पहिला राजा. याचें नांव पुराणांत तसेंच अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील लेखांत आलें आहे. अजंट्याच्या लेखांत याला द्विज म्हणजे ब्राह्मण म्हटलें असून त्याचें वर्णन ' वाकाटकवंशकेतुः ' (वाकाटक वंशाचें मानचिह्न) या शब्दांत केलें आहे.[1] नंतरच्या दानपत्रांत वाकाटकांचें विष्णुवृद्ध गोत्रहि उल्लेखिलें आहे. गृहपति वाकाटकाचा व या विन्ध्यशक्तीचा कसा संबंध होता, हें सांगतां येत नाही. पण महासेनापति शक मान महिष याच्याप्रमाणे विन्ध्यशक्तिहि सातवाहनांच्या राजवटींत मोठ्या अधिकारावर असावा व त्यामुळे त्याला पुढे राज्यसत्ता बळकावणें शक्य झालें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

विन्ध्यशक्ति हा मूळचा कोठला याविषयी विद्वानांत एकवाक्यता नाही. पुराणांतील वर्णनावरून तो विदिशेचा असावा असें अनुमान कांहींनी केलें आहे.[2] पण तें बरोबर नाही. विदिशेच्या राजांच्या वर्णनांत विन्ध्यशक्तीचा उल्लेख येत नसून त्याचा पुत्र प्रथम प्रवरसेन याचा येतो आणि त्याचें कारण हें की विदिशेच्या नाग राजाचा दौहित्र ज्या पुरिका नगरींत राज्य करीत होता ती प्रवरसेनाने जिंकून तेथे आपली राजधानी केली. मागे सांगितल्याप्रमाणे हैदराबाद संस्थानांतील ज्या वल्लूर गावच्या एका सचिव कुलाने वाकाटक राजघराण्याची अनेक पिढ्या एकनिष्ठपणें सेवा केली त्या गावाच्या जवळपास वाकाटकांच्या मूलस्थानाचा शोध केला पाहिजे. पुराणांत प्रथम प्रवरसेनाच्या पुरिका व चनका या दोन राजधान्यांचा उल्लेख आहे. यांपैकी चनका ही पुरातन राजधानी असून तेथूनच विन्ध्यशक्ति राज्य करीत असावा.

---

१ क्रमांक २४, ओ. २.

२ न्यू. हि. इं. पी., पृ. ९६.

अजंट्याच्या लेखांत विन्ध्यशक्तीची मोठी स्तुति केली आहे- 'त्याने मोठमोठया लढायांत विजय मिळवून आपलें सामर्थ्य वाढविलें होतें. तो क्रुद्ध झाला म्हणजे प्रत्यक्ष देवांनाहि अनिवार्य होत असे, त्याच्या घोडयांच्या टापांनी उडविलेल्या धुळीने आकाशांत सूर्य झाकून जात असे. त्याच्या शौर्याने पराभूत झालेले शत्रु त्याच्या पुढे विनम्र होत' इत्यादि वर्णन अजंठयाच्या लेखांत आलें आहे.[1] त्याच्या राज्याचा विस्तार केवढा होता, हें समजण्यास आज साधन नाही. कांही विद्वानांच्या मतें त्याचें खरें नांव दुसरेंच असून विन्ध्यपर्वतापर्यंत आपली सत्ता पसरविल्यावर तिचें द्योतक म्हणून 'विन्ध्यशक्ति' हें बिरुद त्याने धारण केलें होतें.[2] पण पुराणांतील वर्णनावरून हा राज्यविस्तार विन्ध्यशक्तीच्या कारकीर्दींत झाला नसून तो त्याच्या पुत्राच्या—प्रथम प्रवरसेनाच्या—काळीं झाला होता असें दिसतें तथापि विन्ध्यशक्तीने विदर्भाचा बराचसा भाग जिंकला असणें संभवनीय आहे. वाकाटकांच्या दानपत्रांत विन्ध्यशक्तीचें नांव येत नाही. त्यांतील वंशावळ प्रथम प्रवरसेनापासून सुरू होते. अजंट्याच्या लेखांतहि विन्ध्यशक्तीची राजशब्दोपाधि उल्लेखिली नाही. यावरून विन्ध्यशक्तीला राज्याभिषेक झाला नसावा, असें अनुमान कांही विद्वानांनी केलें आहे. पण त्यांत तथ्य दिसत नाही. वाकाटकांच्या दानपत्रांत विन्ध्यशक्तीचा उल्लेख येत नाही, याचें कारण वाकाटक साम्राज्याचा खरा संस्थापक विन्ध्यशक्ति नसून त्याचा पुत्र प्रवरसेन हा होता. अजंट्याचा लेख पद्यमय असल्याने त्यांत विन्ध्यशक्तीच्याच नव्हे तर त्याच्या वंशजांच्याहि बाबतींत

---

१ पाहा–'महाविमर्देष्वभिवृद्धशक्तिः क्रुद्धस्सुरैरप्यनिवार्य्यवीर्य्यः।...रणदानशक्तिर्द्विजऽप्रकाशो भुवि विन्ध्यशक्तिः॥ रणेषु हर्युद्धतरेणुजालसञ्छादितार्क्कस्स च [कर्म]..।........नरातीन् कृत्वाभिवादप्रवणांश्चकार॥ क्रमांक २४, ओ. २ व ४.

२ पूर्वोक्त, पृ. ९७.

राजशब्दोपाधि लावलेली आढळत नाही. तेव्हा विन्ध्यशक्तीने विदर्भांत स्वतंत्र राज्य स्थापलें नसेल, असें मानण्यास यत्किंचितहि आधार नाही. तो सन २५० ते २७० या काळांत होऊन गेला असावा. पुराणांत त्याची म्हणून उल्लेखिलेली षाण्णव ही वर्षसंख्या त्याच्या कारकीर्दीची नसून त्याच्या आयुर्मानाची आहे.

प्रथम प्रवरसेन

विन्ध्यशक्तीनंतर गादीवर बसलेला प्रथम प्रवरसेन हा वाकाटक वंशांतील सर्वश्रेष्ठ नृपति होय. याने आपलें साम्राज्य अनेक दिशांत पसरलें. त्याने उत्तरेंत नर्मदेपर्यंत स्वाऱ्या करून पुरिका नगरी काबीज केली. पुराणांतील वर्णनावरून त्या ठिकाणीं विदिशेच्या नागराजाचा दौहित्र शिशुक हा राज्य करीत होता असें दिसतें. प्रवरसेनाने त्याला पदच्युत करून तो प्रदेश आपल्या राज्यास जोडला. त्यानंतर त्याने पुरिका ही आपली राजधानी केली. ही नगरी ऋक्षवत् किंवा सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी होती असें हरिवंशांत म्हटलें आहे.[२] प्रवरसेनाच्या इतर स्वाऱ्यांबद्दल मात्र आपणांस कांही माहिती नाही. कांही विद्वानांनी असें प्रतिपादिलें आहे की प्रवरसेनाने आपले समकालीन सौराष्ट्र व माळवा येथील पश्चिम क्षत्रप द्वितीय रुद्रसिंह आणि द्वितीय रुद्रदामन् यांचा पराभव केला होता व त्यामुळेच त्यांनी आपल्या पूर्वजांप्रमाणे 'महाक्षत्रप' ही पदवी धारण केली नव्हती.[३] पण यावि-

---

१ पाहा—समाः षण्णवतिं भूत्वा पृथिवीं तु समेष्यति ।
डा. क. ए., पृ. ४८.

२ पाहा—'ऋक्षवन्तं समभितस्तीरे तत्र निरामये ।
निर्मिता सा पुरी राज्ञा पुरिका नाम नामतः ॥
हरिवंश,विष्णुपर्व, अध्याय ३८, श्लो. २१–२२.

३ न्यू. हि. इं. पी., पु. ६, पृ. ५८ इ.

षयी निश्चित प्रमाण उपलब्ध नाही. उपरिनिर्दिष्ट क्षत्रपांनी या काळांत 'महाक्षत्रप' ही वरिष्ठ पदवी धारण केली नव्हती हें खरें, पण त्याचें कारण त्या सुमारास मध्य भारतांत शक नृपति श्रीधरवर्मन् हा उदयास येऊन त्याने आपलें स्वातंत्र्य उद्घोषित करून माळव्यांतील पश्चिम क्षत्रपांच्या सत्तेस पायबंद घातला होता, हें होय.[1] प्रवरसेनाने नर्मदेच्या उत्तरेस स्वाऱ्या करून बघेलखंड येथे आपली सत्ता प्रस्थापित केली होती, असेंहि कांही विद्वानांनी प्रतिपादिलें आहे, पण तेंहि बरोबर दिसत नाही. बघेलखंडांतील वाकाटक साम्राज्याच्या विस्ताराचें गमक म्हणून नचना व गंज येथील व्याघ्रदेवाच्या शिलालेखांचा निर्देश करण्यांत येतो.[2] हा व्याघ्रदेव स्वतःस वाकाटक महाराज पृथिवीषेणाचा अंकित किंवा मांडलिक म्हणवतो. पण हे शिलालेख प्रथम पृथिवीषेणाच्या काळचे नसून त्याच्यानंतर शंभर सवाशें वर्षांनी होऊन गेलेल्या द्वितीय पृथिवीषेणाच्या काळचे आहेत हें मी इतरत्र सिद्ध केलें आहे.[3] तेव्हा प्रथम प्रवरसेनाने नर्मदेच्या उत्तरेस आपली सत्ता पसरविल्याचें कांही प्रमाण उपलब्ध नाही.

प्रवरसेनाने पश्चिमेचे महाराष्ट्र, गुजराथ, कोंकण हे प्रदेश जिंकले असणेंहि असंभवनीय आहे. कारण या प्रदेशांवर त्या काळीं आभीरांचें बलाढ्य राज्य होतें. मात्र दक्षिणेंत उत्तर कुन्तलांतील कोल्हापूर, सातारा, सोलापूर या भागांत प्रवरसेनाने आपली सत्ता पसरविली असावी. पूर्वेस दक्षिण कोसल, कलिंग व आन्ध्र या देशांतील लहान लहान राजांनीहि प्रवरसेनाचें वर्चस्व कबूल केलें असावें. पण या काळांतील फारच कमी लेख उपलब्ध झाल्याने प्रवरसेनाच्या साम्राज्याच्या निश्चित मर्यादा सांगणें कठीण झालें आहे.

---

१ कॉ. इ. इं., पु. ४, प्रस्तावना, पृ. ३८ इ.

२ हि. क. इं. पी., पु. ३, पृ. २२०

३ क्रमांक १९–२०, प्रस्तावना पाहा.

प्रथम प्रवरसेन हा धार्मिक वृत्तीचा राजा असून वैदिक धर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याने स्वतः अनेक श्रौत याग केले. त्याच्या वंशजांच्या बहुधा सर्व ताम्रपटांत त्याने केलेल्या चार अश्वमेधांचा व सप्तसोम संस्थेचा[1] उल्लेख आढळतो. पुराणांत त्याच्या वाजपेय यज्ञांचा[2] व त्यांत त्याने दिलेल्या बहुमूल्य दक्षिणांचा मुद्दाम निर्देश केला आहे. या वाजपेय यज्ञांच्या अनुष्ठानानंतर त्याने सम्राट् ही अत्यंत मानार्ह पदवी धारण केली. उत्तर किंवा दक्षिण भारतांतील इतर कोणाहि प्राचीन राजाने ही पदवी धारण केल्याचें इतिहासांत नमूद नाही. पूर्वीच्या नृपतींप्रमाणें त्याने आपल्या धर्मविजयित्वाची निदर्शक अशी 'धर्ममहाराज' ही उपाधिहि धारण केली. तसेंच विण्हुकड सातकर्णि राजाप्रमाणे तो आपणांस 'हारीतीपुत्र' म्हणवून घेई. या दोन उपाधींचा उल्लेख वाशीम ताम्रपटांत आला आहे.[3] त्या त्याच्या दाक्षिणात्यत्वाच्या सूचक आहेत.

चार अश्वमेध यज्ञ करून प्रवरसेनाने दक्षिण भारतांत आपलें सम्राट् पद उद्घोषित केलें. नंतर आपल्या सत्तेला जास्त बळकटी आणण्याकरिता त्याने उत्तर भारतांतील भारशिवाशीं वैवाहिक संबंध जोडला. भारशिव हे

---

१ हे सात सोमयाग येणेप्रमाणे—अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ्य, षोडशी, वाजपेय, अतिरात्र अणि आप्तोर्याम. वाकाटकांच्या लेखांत अत्यग्निष्टोमाशिवाय बाकीच्या सर्व यागांचा उल्लेख आढळतो. त्याशिवाय त्यांत बृहस्पतिसव व साद्यस्क्र यांचा निर्देश असतो. क्रमांक ३, ओ. १–२ पाहा.

२ वायुपुराणांच्या एका हस्तलिखितांत 'वाजपेयैः' बद्दल 'वाजिमेधैः' असा पाठ आहे. डा. क. ए., पृ. ५०, टीप ३५ पाहा.

३ क्रमांक २२, ओ. १ व ३. या पदवीचा अर्थ अद्यापि अनिश्चित आहे.

नागवंशी असून मूळचे विदर्भांतील असावे. कारण भारनृपति भगदत्त याचा खिस्तोत्तर द्वितीय शतकांतील एक शिलालेख मध्यप्रदेशाच्या भंडारा जिल्ह्यांतील पौनी गावीं सापडला आहे.[१] नंतर त्यांनी उत्तरेंत स्वाऱ्या करून तेथे आपलें राज्य स्थापलें असें दिसतें. भारशिवांचा 'अधिराज' (अधिपति) भवनाग याचीं तांब्याचीं नाणीं मध्य भारतांतील सुप्रसिद्ध नागराजधानी पद्मावती (सध्याचें पदमपवाया) येथे सापडलीं आहेत.[२] वाकाटक ताम्रपटांतील वर्णनावरून हे भारशिव शिवोपासक होते असें दिसतें. ते आपल्या खांद्यावर सदैव शिवलिङ्ग धारण करीत असल्या-मुळे भगवान शंकरांनी प्रसन्न होऊन त्यांना राजपद दिलें होतें असें वाकाटकांच्या ताम्रपटांत म्हटलें आहे.[३] त्यांनी दहा अश्वमेध केले होते व आपल्या पराक्रमाने भागीरथीचें पवित्र जल आणवून स्वतःला मूर्धाभिषेक करवून घेतला होता. या वर्णनावरून भारशिवांनी मध्य-भारतांतून परकी कुशाण सम्राटांना पिटाळून सर्व हिंदूंना पवित्र वाटणारीं प्रयाग व काशी हीं पुण्यक्षेत्रें स्वतःच्या अमलाखाली आणलीं होतीं, असें दिसतें. भारशिवनृपति भवनाग हा प्रथम प्रवरसेनाचा सम-कालीन होता. त्याने आपली मुलगी प्रवरसेनाचा ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र यास दिली.[४] या वैवाहिक संबंधाने उत्तर भारतांतील प्रबळ नाग

---

१ ए. इं., पु. २४, पृ. ११

२ ज. न्यू. सो. इं., पु. ५, २१ पृ. इ.

३ पाहा—'असंभारसन्निविष्टशिवलिङ्गोद्वहनशिवसुपरितुष्ट-समुत्पादितराजवंशानां पराक्रमाधिगतभागीरथ्यमलजलमूर्द्धाभि-षिक्तानान्दशाश्वमेधावभृथस्नातानाम्भारशिवानाम्महाराजश्रीभवनाग-दौहित्रस्य गौतमीपुत्रस्य···। क्रमांक ३, ओ. ३–६.

४ पूर्वोक्त, ओ. ७.

राजसंघाचें पाठबळ मिळाल्यामुळे वाकाटक राजसत्ता दृढमूल होण्यास साहाय्य झालें असावें आणि म्हणूनच या संबंधाचा निर्देश गौतमीपुत्राच्या वंशजांच्या सर्व ताम्रपटांत केलेला आढळतो. प्रवीराने (म्हणजे प्रथम प्रवरसेनाने) साठ वर्षे राज्य केलें असें पुराणें सांगतात.[१] प्रवरसेनाने चार अश्वमेध केले असल्यामुळे त्याची कारकीर्द इतकी दीर्घकाळ चालली असली तर त्यांत आश्चर्य नाही.

प्रवरसेनाचा देव नामक अत्यंत धार्मिक, विद्वान् व कर्तबगार प्रधान मंत्री होता. त्याचें वर्णन घटोत्कच लेण्यांतील लेखांत आलें आहे.[२] त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक कृत्यांच्या अनुष्ठानांत गुंतलें होतें, असें त्यांत म्हटलें आहे. प्रथम प्रवरसेनाच्या कारकीर्दीतील अनेक श्रौत यज्ञांचें अनुष्टान या विद्वान् व धर्मशील मंत्र्याच्या उपदेशानुसार झालें असावें.

प्रवरसेनाला चार पुत्र होते व ते सर्व राजे झाले असें पुराणांत म्हटलें आहे.[३] सन १९३९ पर्यंत—वाशीम ताम्रपट मिळण्यापूर्वी—या विधानावर कोणाचाहि विश्वास बसत नव्हता. कारण वाकाटक साम्राज्याचे इतके लौकर तुकडे पडले होते, याला कोणताहि पुरावा मिळाला नव्हता. वाशीम ताम्रपटावरून असें स्पष्ट दिसून आलें की प्रवरसेनाचा गौतमीपुत्राशिवाय सर्वसेन नामक आणखी एक मुलगा होता.[४] त्याचें नांव अजंटयाच्या सोळा क्रमांकाच्या लेखांतहि आलें

---

१ डा. क. ए., पृ. ५०.

२ क्रमांक २५, ओ. ५.

३ तस्य पुत्रास्तु चत्वारो भविष्यन्ति नराधिपाः।
डा. क. ए., पृ. ५०.

४ क्रमांक २२, ओ. ४.

आहे, हें मी दाखविलें आहे.[१] तेव्हा प्रवरसेनाच्या निधनानंतर त्याच्या विस्तृत साम्राज्याची वाटणी त्याच्या चार मुलांत झाली असावी. ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र अगोदरच निधन पावला असल्याने त्याचा मुलगा रुद्रसेन गादीवर आला. तो कदाचित् पुरिका येथूनच राज्य करीत असेल किंवा त्याने आपली राजधानी नागपूरपासून २८ मैलांवर असलेल्या नन्दिवर्धन (सध्याचें नगरधन) या नगरींत नेली असेल. त्याच्या अमलाखाली उत्तर विदर्भ होता. दुसरा मुलगा सर्वसेन याने अकोला जिल्ह्यांतील वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) येथे आपली राजधानी स्थापून दक्षिण विदर्भावर राज्य केलें. शेवटचे दोन मुलगे नक्की कोठे राज्य करीत होते हें माहीत नाही. त्यांपैकी एक कृष्णानदीच्या खोऱ्यांत उत्तर कुन्तलावर राज्य करीत असावा, व दुसऱ्याने दक्षिण कोसल (छत्तीसगढ) वर आपली सत्ता प्रस्थापित केली असावी. या दोन शाखांचें राज्य लौकरच संपुष्टांत आल्यामुळे त्यांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत, असें दिसतें. उत्तर कुन्तलांत सन ३७५ च्या सुमारास मानाङ्क नामक राष्ट्रकूट नृपति उदयास येऊन त्याने तेथील वाकाटक शाखेचा उच्छेद केला असावा.[२] दक्षिण कोसलांत नलवंशी व इतर राजे यांनी आपली सत्ता स्थापल्यामुळे तेथूनहि वाकाटकांचें उच्चाटन झालें, असें दिसतें. पुराणांत दक्षिण कोसलच्या नलवंशी राजांचा उल्लेख आहे[३] त्यावरून हे राजे खिस्तोत्तर चौथ्या शतकांत उदयास आले असें दिसतें. त्यांचा एक ताम्रपटहि विदर्भांत सापडला आहे.[४] त्याचा उल्लेख पुढे येईल.

---

१ क्रमांक २४, ओ. ६.

२ अॅ. भां. ओ. री. इ., पु. २५, पृ. ३६ इ.

३ डा. क. ए., पृ. ५१.

४ ए. इं., पु. १९, पृ. १०० इ.

वाकटकांची ज्येष्ठ शाखा

प्रथम प्रवरसेनाचा ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र हा पित्याच्या हयातींत कालवश झाला होता. म्हणून सन ३३० च्या सुमारास प्रवरसेनाच्या निधनानंतर त्याचा नातू प्रथम रुद्रसेन हा गादीवर आला. याच्या वंशजांच्या सर्व लेखांत याचें वर्णन 'भारशिव महाराज भवनाग याचा दौहित्र' असें केलें आहे.[१] तेव्हा याला पद्मावतीच्या नागराजाचा प्रबळ आधार होता असें दिसतें. याचा फक्त एकच लेख आतापर्यंत सापडला आहे. चांदा जिल्ह्यांतील देवटेक गावीं एका विशाल शिलेवर 'प्राण्यांचें बंधन व हिंसा कोणीहि करूं नये' अशी पुण्यश्लोक अशोकाची आज्ञा जाहीर करणारा लेख त्याच्या विदर्भांतील महामात्राने कोरविला होता. त्याचा बराचसा भाग छिलून टाकून प्रथम रुद्रसेनानें त्याच शिलेवर आपला लेख कोरविला आहे. लेखाचा उद्देश त्या ठिकाणीं राजा रुद्रसेनाचें धर्मस्थान (देवालय) होतें, हें जाहीर करणें हा होता. रुद्रसेन हा भगवान् शंकराने दक्षयज्ञाचा विध्वंस करण्याकरितां उत्पन्न केलेल्या महाभैरवाचा भक्त होता. त्याला अशोकाच्या अहिंसाधर्माबद्दल मुळीच आस्था वाटत नव्हती. म्हणून त्याने प्राण्यांचें बंधन व हिंसा यांना मनाई करणारा अशोकाचा लेख स्वतःच्या लेखाला जागा करण्यासाठी नष्ट करविला असला तर त्यांत आश्चर्य नाही.

हा रुद्रसेन गुप्त सम्राट् समुद्रगुप्त याचा समकालीन होता. त्या काळीं नर्मदेच्या उत्तरेस अनेक राज्यांची उलथापालथ होत होती. वैशालीच्या बलाढ्य लिच्छवींच्या साहाय्याने समुंद्रगुप्ताने उत्तर भारतांतील अनेक देश जिंकून आपल्या राज्यास जोडले. त्याने आर्यावर्ताच्या

१ क्रमांक ३, ओ. ७.

२ क्रमांक १.

ज्या राजांचा समूळ उच्छेद केला त्यांमध्ये नागदत्त, गणपति नाग व नागसेन हे नाग राजे होते. यांपैकी गणपति नाग हा पद्मावती येथे राज्य करीत होता असें दिसतें. कारण त्याचीं नाणीं त्या ठिकाणीं सापडलीं आहेत[२]. तो भारशिव नृपति भवनागाचा उत्तराधिकारी असावा. इतर नाग राजे मध्य भारतांत लहान लहान प्रदेशांवर राज्य करीत असावे. या राजांना साहाय्य करण्याकरितां रुद्रसेनाने कोणते प्रयत्न केले हें समजण्यास आज साधन नाही. तथापि अखेरीस झालेल्या त्यांच्या उच्छेदामुळे रुद्रसेनाला उत्तर भारतांतील नाग राजांच्या आधाराला मुकावें लागून त्याचें सामर्थ्य कमी झालें असलें तर त्यांत आश्चर्य नाही.

आर्यावर्त किंवा उत्तर भारत यांतील राजांना पादाक्रान्त करून समुद्रगुप्त दक्षिण दिग्विजयाकरिता निघाला. त्याने प्रथम दक्षिण कोसल देशावर चाल केली. या देशाचा राजा महेन्द्र वाकाटकांच्या पूर्वेकडील प्रत्यन्त-नृपति असून तो बहुधा त्यांना कारभार देत असावा. रुद्रसेनाने गुप्तांच्या आक्रमणास तोंड देण्यास त्याला कांही साहाय्य केलें की नाही हें माहीत नाही. पण शेवटीं महेन्द्राचा पराजय होऊन त्याला समुद्रगुप्ताचें वर्चस्व मान्य करावें लागलें व त्या गुप्त नृपतीला महाकान्तारचा व्याघ्रराज व इतर दक्षिणापथाचे राजे यांच्यावर स्वारी करण्यास आपल्या राज्यांतून वाट द्यावी लागली.

समुद्रगुप्ताच्या या विजयाने वाकाटकांच्या सामर्थ्यास मोठाच धक्का बसला. महाकान्तारचा (सध्याच्या बस्तर जिल्ह्याचा) व्याघ्रराज, कुराळचा मण्टराज, पिष्टपुरचा महेन्द्रगिरि यासारख्यांनी वाकाटकांचें

---

१ का. इं. इ., पु. ३, पृ. ७.

२ ज. न्यू. सो. इं., पु. ५, पृ. २१ इ.

वर्चस्व झुगारून देऊन गुप्तराजांचें स्वामित्व कबूल केलें.[1] त्यामुळे या ज्येष्ठ शाखेचें राज्य नर्मदा नदी आणि इन्ध्याद्रि पर्वतराजि यांमधील प्रदेशांत मर्यादित झालें.

रुद्रसेनाचें राज्य याप्रमाणें बरेंच लहान झालें असलें तरी त्याने आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें आणि इतर अनेक दाक्षिणात्य नृपतीं-प्रमाणे बलाढ्य समुद्रगुप्तापुढे आपली मान वाकविली नाही. दक्षिणा-पथाच्या राजांनी समुद्रगुप्ताला जो संघटित प्रतिकार केला त्याने सावध होऊन अलेक्झांडरप्रमाणे समुद्रगुप्तानेहि कदाचित आपली विजयतृष्णा आवरली असेल. त्याने पश्चिमेच्या क्षत्रप नृपतींचा पराभव केला नव्हता. वाकाटकांचें राज्य दक्षिणेस क्षत्रपांच्या राज्याला लागून असल्या-मुळे पुढेमागे त्यांच्याशीं युद्धाचा प्रसंग आल्यास वाकाटकांची मदत बहुमोल ठरण्याचा संभव होता. या कारणामुळेहि कदाचित् समुद्रगुप्ताने त्यांच्याशीं प्रत्यक्ष हातघाईचा प्रसंग टाळला असावा. कारण कांही असो, वाकाटकांनी बलाढ्य गुप्तांचें वर्चस्व कबूल केलें असल्याचा यत्किंचितहि पुरावा नाही. गुप्तांच्या मांडलिकांप्रमाणें वाकाटकांनी

१ दक्षिण कोसलांत गुप्तांचें वर्चस्व होतें हें द्वितीय भीमसेनाच्या आरंग ताम्रपटांत गुप्त संवताचा उपयोग केला आहे त्यावरून स्पष्ट दिसतें. ए. इं., पु. ९, पृ. ३४२ इ. पाहा. त्यांत उल्लेखिलेलें गुप्त संवताचें वर्ष २८२ नसून १८२ आहे हें मी दाखविलें आहे. ए. इं., पु. २६, पृ. २२८.

२ प्रथम रुद्रसेनाला देवटेकच्या लेखांत 'राजन्' व त्याच्या वंशजांच्या लेखांत 'महाराज' म्हटलें आहे. त्यावरून वाकाटक राजे मांडलिक होते, असें कांही विद्वानांनी अनुमान केलें आहे, पण तें बरोबर नाही. दक्षिणेंत बलाढ्य सार्वभौम राजेहि 'महाराज' हीच पदवी धारण करीत असत, हें अकरा अश्वमेध करणाऱ्या विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्याच्या उदाहरणावरून दिसून येईल.

गुप्त संवताचा उपयोग आपल्या एकाहि लेखांत केला नाही. त्यांनी दानपत्रांत कालनिर्देशार्थ आपापल्या राज्यारंभापासूनचीं वर्षेंच उल्लेखिलीं आहेत. त्यांनी स्वतःची नाणीं पाडलीं नसल्यामुळे क्षत्रपांच्या नाण्यांप्रमाणें गुप्तांच्या नाण्यांचा प्रसार त्यांच्या राज्यांत चालू होता, पण ही गोष्ट त्यांच्या मांडलिकत्वाची निदर्शक होती, असें दिसत नाही. तथापि गुप्त सम्राटाशीं त्यांचे संबंध सलोख्याचेच होते, यांत संशय नाही.

सन ३५० च्या सुमारास प्रथम रुद्रसेनाचा पुत्र प्रथम पृथिवीषेण हा गादीवर आला. याचे लेख अद्यापि सापडले नाहीत. तथापि याच्या वंशजांच्या लेखांत याचें वर्णन केलें आहे, त्यावरून हा शिवोपासक होता, व सत्य, ऋजुत्व, कारुण्य, शौर्य, विक्रम, बुद्धिमत्त्व, योग्य जनांविषयी परमादर, मनोनैर्मल्य इत्यादि गुणांविषयी त्याची ख्याति होती असें समजतें. याची तुलना अजातशत्रु धर्मराजाशीं केली आहे व याला धर्मविजयी म्हटलें आहे.[१] त्यावरून त्याने कधीहि परराज्यापहरणाकरिता युद्ध केलें नव्हतें असें म्हणतां येतें. हा पृथिवीषेण गादीवर आला त्यावेळी वाकाटक राज्यस्थापनेपासून शंभर वर्षे झालीं होतीं. त्याचा खजिना भरला होता व सैन्यहि मोठें व जय्यत तयार होतें, असें वर्णन वाकाटकांच्या दानपत्रांत केलें आहे. उत्तरेंत समुद्रगुप्त व त्याचा पुत्र द्वितीय चन्द्रगुप्त यांनी चढाईचें धोरण स्वीकारून अनेक राजांना जिंकलें होतें व आपल्या राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या. याच्या उलट पृथिवीषेणाने शांततेचें धोरण स्वीकारून प्रजेच्या कल्याणाकडे आपलें सर्व लक्ष दिलें असें वाकाटक दानपत्रांतील त्याच्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें.

---

१ पाहा– 'सत्थार्ज्जवकारुण्यशौर्य्यविक्क्रमनयविनयमाहात्म्य-धीमत्त्वपात्रगतभक्तित्वधर्मविजयित्वमनोनैर्म्मल्यादिगुणैः समुपेतस्य वर्षशतमभिवर्द्धमानकोशदण्डसाधनपुत्रपौत्रिणः युधिष्ठिरवृत्तेर्व्वाकाटकानाम्महाराजश्रीपृथिवीषेणस्य...। क्रमांक ३, ओ. ७–१०.

प्रथम पृथिवीषेणाने दीर्घ काल राज्य केलें असावें. सन ४०० च्या सुमारास त्याच्या कारकीर्दीचा शेवट झाला. त्याच्या चारपांच वर्षांपूर्वी सन ३९५ च्या सुमारास[1] द्वितीय चन्द्रगुप्ताने माळवा व सौराष्ट्र या प्रदेशांवर राज्य करणाऱ्या क्षत्रपांवर युद्ध पुकारलें. हे क्षत्रप वाकाटकांचे उत्तरेकडील प्रत्यन्तनृपति होते. त्यांनी गुजराथ, माळवा, सौराष्ट्र या भागांत तीन शतकांहून अधिक काळ राज्य केलें होतें व आपली सत्ता दृढमूल केली होती. तेव्हा त्यांच्याशीं होणाऱ्या युद्धांत गुप्तांनी प्रबळ वाकाटक नृपतींचें साहाय्य मागितलें असल्यास नवल नाही. गुप्त–वाकाटकांच्या या युतीमुळे क्षत्रपांचा सहज पाडाव झाला. आणि उत्तर भारतांत गुप्तांचें राज्य निष्कंटक झालें. नंतर चन्द्रगुप्ताने माळवा आपल्या राज्यास जोडून उज्जयिनी येथे आपली राजधानी केली. या प्रसंगीं वाकाटकांशीं घडून आलेल्या मैत्रीस चिरस्थायी रूप देण्याकरिता चन्द्रगुप्ताने आपली मुलगी प्रभावतीगुप्ता पृथिवीषेणाचा पुत्र राजकुमार द्वितीय रुद्रसेन यास दिली. माळवा व विदर्भ यांवर राज्य करणाऱ्या राजवंशांचा या प्रसंगीं जसा वैवाहिक संबंध घडून आला होता तसाच प्रकार पांच शतकांपूर्वी शुंगांच्या राजवटींतहि झाला होता. त्याचें स्मरण या प्रसंगीं झालें असल्यास नवल नाही. या पुरातन घटनेवर आधारलेलें कविकुलगुरु कालिदासाचें 'मालविकाग्निमित्र' नाटक रुद्रसेन–प्रभावतीगुप्ता यांच्या विवाहाच्या मंगल प्रसंगीं उज्जयिनीस प्रथम रंगभूमीवर आलें असावें. अशाच विवाहोत्सवांत राजशेखराची विद्धशालभंजिका, बिल्हणाचें कर्णसुन्दरी इत्यादि संस्कृत नाटकांचे पहिले प्रयोग झाले, हें इतिहासज्ञांस माहीत आहे.

आपल्या पित्याप्रमाणे प्रथम पृथिवीषेण हाहि शिवोपासक होता.[2] प्रथम प्रवरसेनाच्या काळीं वाकाटकांची राजधानी पुरिका येथे होती.

---

१ मागे, पृ. १० पाहा.

२ क्रमांक ३, ओ. ८.

त्याच्या निधनानंतर वाकाटक साम्राज्याची विभागणी झाली त्यावेळीं किंवा पुढे प्रथम पृथिवीषेणाच्या कारकीर्दींत ती नागपूरपासून सुमारें २८ मैलांवरच्या नन्दिवर्धन (किंवा नगरधन) नगरीं नेण्यांत आली. या नगराच्या सभोंवार घुघुसगड, भिवगड इत्यादि किल्ले अद्यापि विद्यमान आहेत.[1] संरक्षणाच्या दृष्टीने नन्दिवर्धन उपयुक्त वाटल्यामुळे राजधानी करिता तें नगर पसंत केलें असावें.

प्रथम पृथिवीषेणानंतर त्याचा पुत्र द्वितीय रुद्रसेन राज्य करूं लागला. याचा पिता व पितामह हे शिवोपासक होते, पण हा स्वतः चक्रपाणीचा (विष्णूचा) भक्त होता व त्याच्या प्रसादाने आपणास राज्यैश्वर्य प्राप्त झालें अशी याची श्रद्धा होती.[2] या राजाच्या धार्मिक श्रद्धेंत हा जो बदल घडून आला त्याचें कारण त्याची अग्र-महिषी (पट्टराणी) प्रभावतीगुप्ता ही असावी. ही स्वतः आपला सुविख्यात पिता गुप्तसम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य या प्रमाणें विष्णू-पासक होती. ती नन्दिवर्धन राजधानीपासून तीन मैलांवर असलेल्या रामगिरीवर (सध्याच्या रामटेकवर) स्थापिलेल्या भगवान् रामचंद्राच्या पादुकांची निस्सीम भक्त होती. त्या ठिकाणींच तिने आपले दोन्ही ताम्रपट[3] प्रबोधिनी एकादशीस उपास करून द्वादशीस पारण्याच्या प्रसंगीं दिले आहेत.

राज्यारंभानंतर लौकरच, सन ४०५ च्या सुमारास, द्वितीय रुद्र-सेनाचें देहावसान झालें असावें. यावेळीं त्याला दोन मुलगे, एक दिवाकर-सेन व दुसरा दामोदरसेन ऊर्फ प्रवरसेन असे, झाले होते. ते दोन्ही

१ वेल्स्टेड्चा याविषयीं लेख ज. ए. सो. बें., (नूतन माला), पु. २२, पृ. ५८ इ. पाहा.

२ पाहा—भगवतश्चक्रपाणेः प्रसादोपार्ज्जितश्रीसमुदयस्य महा-राजश्रीरुद्रसेनस्य. . .। क्रमांक ३, ओ. १०.

३ क्रमांक २, ओ. १४, आणि क्रमांक ८, ओ. ३१.

अल्पवयी असल्यामुळे त्यांतील वडील मुलगा दिवाकरसेन याच्या नांवाने प्रभावतीगुप्ता स्वतः राज्यकारभार पाहूं लागली. तिने दिवाकरसेनाच्या राज्यारंभापासून तेराव्या वर्षी नन्दिवर्धनाहून दिलेल्या पुणें ताम्रपटावरून[1] ती द्वितीय चन्द्रगुप्ताची कन्या होती हें प्रथम माहीत झालें आणि वाकाटकांच्या कालाला निश्चितपणा आला. वाकाटकांचे इतर ताम्रपट पेटिका-शीर्षक लिपींत (box-headed characters मध्ये) कोरले आहेत. पण हा पुणें ताम्रपट कीलकशीर्षक लिपींत (nail-headed chracters मध्ये) कोरला असून त्यावरील लेखाच्या आरंभीं इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे वाकाटकांची वंशावळ दिली नसून गुप्तांची दिली आहे.[2] त्यावरून प्रभावतीगुप्ता राज्यकारभार पाहत होती त्याकाळीं वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें चांगलेंच प्रस्थ होतें, हें उघड आहे. चन्द्रगुप्ताने तिला राज्यकारभारांत मदत करण्याकरिता आपल्या पदरचे विश्वासू अधिकारी व मुत्सद्दी पाठविले होते, असें दिसतें. त्यांमध्ये कविकुलगुरु कालिदास हाहि एक असावा. विदर्भांत असतांना त्याने आपलें सर्वोत्कृष्ट खण्डकाव्य 'मेघदूत' हें रचलें. यांतील शापित यक्ष रामगिरीजवळच्या आश्रमांत राहत होता, असें त्यांत वर्णिलें आहे.[3] रामगिरि (सध्याचें

---

१ पाहा--'महाराजाधिराजश्रीचन्द्रगुप्तस्तस्य दुहिता धारणसगोत्रा नागकुलसम्भूतायां श्रीमहादेव्यां कुबेरनागायामुत्पन्ना उभयकुलालङ्कारभूता अत्यन्तभगवद्भक्ता वाकाटकानाम्महाराजश्रीरुद्रसेनस्याग्रमहिषी युवराजश्रीदिवाकरसेनजननी श्रीप्रभावतीगुप्ता...। क्रमांक २, ओ. ६–१०.

२ प्रभावतीगुप्तेने यानंतर अनेक वर्षांनी दिलेल्या ऋद्धपुर ताम्रपटांतहि अशीच वंशावळ दिली आहे. तिला आपल्या गुप्तवंशजत्वाचा फार अभिमान होता, असें दिसतें.

३ मेघदूत, श्लो. १. रामगिरीच्या स्थाननिश्चयाविषयी माझा 'मेघदूतांतील रामगिरि' (संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. ५३ इ.) पाहा.

रामटेक) वाकाटक राजधानी नन्दिवर्धन येथून जवळच असल्यामुळे हा कवि तेथे गेला असतां त्या काव्याची कल्पना त्याला सुचली असावी, असें अनुमान करण्यास हरकत नाही. रघुवंशाच्या अठराव्या सर्गांत सहा वर्षांच्या सुदर्शन नामक बालराजाचें मनोरम वर्णन आलें आहे[१] तें कालिदासाला वाकाटक राजकुमार दिवाकरसेन याच्या दरबारीं प्रत्यक्ष पाहिलेल्या दृश्यावरून सुचलें असावें.

दुर्दैवाने दिवाकरसेन हाहि अल्पायुषी झाला. सन ४२० च्या सुमारास त्याच्या अकालीं निधनानंतर त्याचा धाकटा भाऊ दामोदरसेन हा गादीवर बसला. राज्यारोहणप्रसंगीं त्याने प्रवरसेन हें आपल्या सुविख्यात पूर्वजाचें नांव धारण केले.[२] त्याच नांवाने त्याचे सर्व ताम्रपट दिले आहेत. या राजाचीं बारा तेरा दानपत्रें उपलब्ध झालीं असून[३] त्यांत विदर्भाच्या अमरावती, वर्धा, नागपूर, बैतूल, भंडारा आणि बालाघाट जिल्ह्यांतील गावें दान दिल्याचे उल्लेख आहेत. त्यांपैकी शेवटचें पट्टन ताम्रपटावरील दानपत्र त्याच्या राज्यारोहणापासून सत्ताविसाव्या वर्षीं दिलें होतें.[४] तेव्हा या द्वितीय प्रवरसेनाने सुमारें तीस वर्षे—सन ४२० ते ४५० पर्यंत—राज्य केलें असावें.

---

१ रघुवंश, सर्ग १८, श्लो. ३९–४८.

२ कांहींच्या मतें प्रभावतीगुप्तेला दिवाकरसेन, दामोदरसेन व प्रवरसेन असे तीन मुलगे होते. पण दामोदरसेनाचा एकहि कोरीव लेख अद्यापि सापडला नाही. शिवाय प्रवरसेन हा दामोदरसेनाहून निराळा असता तर ऋद्धपुर ताम्रपटांत त्याच्याहि नांवामागे 'वाकाटकानां महाराजः' ही उपाधि लावली असती. पण ती लावली नाही यावरून दामोदरसेन व प्रवरसेन एकच होत, असें दिसतें.

३ क्रमांक ३ ते १५.

४ क्रमांक १३, ओ. ४३–४४.

द्वितीय प्रवरसेन आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षापर्यंत तरी जुनी राजधानी नन्दिवर्धन येथूनच राज्य करीत होता. कारण त्या वर्षीचे त्याचे दोन बेलोरा ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिले होते.[१] त्यानंतर त्याने आपल्या नांवें प्रवरपुर नामक नवीन नगर स्थापून तेथें आपली राजधानी नेली. प्रवरपुराहून त्याने दिलेला पहिला ताम्रपट त्याच्या कारकीर्दीच्या अठराव्या वर्षींचा[२] आहे. त्यावरून त्याच्या राज्यारोहणानंतर ११ व १८ या वर्षांच्या मध्यंतरीं केव्हा तरी वाकाटक राजधानी प्रवरपुरास हलविली असावी. प्रवरपुर हें वर्धा जिल्ह्यांतील वर्ध्याजवळचें पवनार असावें असें अनुमान तेथील अवशेषांवरून करतां येतें.[३]

द्वितीय प्रवरसेन हा शिवोपासक होता. भगवान् शंकराच्या कृपाप्रसादाने आपणांस आपल्या राज्यांत कृतयुग स्थापन करतां आलें असें त्याने आपल्या ताम्रपटांत म्हटलें आहे.[४] हा मोठा दानशूर होता. त्याने दिलेले बारा तेरा ताम्रपट आतापर्यंत उपलब्ध झाले आहेत. वाकाटक वंशाच्याच नव्हे, तर इतर प्राचीन भारतीय वंशाच्या कोणाहि राजाचीं इतकीं दानपत्रें क्वचितच सापडलीं असतील. कालिदास वाकाटक दरबारीं होता त्या काळांत त्याच्याशीं याचा संबंध येऊन याला कवित्वाची स्फूर्ति झालेली दिसते. याच्या अनेक प्राकृत गाथा 'गाथासप्तशतीं'त घातल्या आहेत.[५] हा स्वतः शिवभक्त होता तरी आपल्या विष्णूपासक मातेच्या–प्रभावतीगुप्तेच्या–आज्ञेवरून याने भगवान् रामचंद्राच्या चरित्रावर 'सेतुबंध' काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचलें. गादीवर आल्यावर लौकरच त्याने या काव्याच्या रचनेस आरंभ केला,

१ क्रमांक ४–५.
२ क्रमांक ६, ओ. ६०.
३ पुढे, प्रकरण ६ पाहा.
४ पाहा 'शम्भोः प्रसादधृतकार्तयुगस्य' क्रमांक ३, ओ. १२.
५ परिशिष्ट पाहा.

असें त्या काव्याच्या पहिल्या आश्वासांतील नवव्या गाथेवरून दिसतें. तें रचतांना त्याला अनेकदा अडचणी येत होत्या, अनेक चुका होत होत्या व तें काव्य पूर्ण करणें कठीण जात होतें, असें त्याने स्वतःच सांगितलें आहे. अशा प्रसंगीं कविकुलगुरु कालिदासाचें त्याला बहुमोल साहाय्य झालें असावें. या कारणाने हें काव्य प्रवरसेनाच्या नांवावर मोडत असलें तरी तें त्याच्याकरिता विक्रमादित्याच्या आज्ञेने कालिदासाने रचलें होतें, अशी समजूत प्रचलित झाली. तिचा उल्लेख त्या काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या अखेरीस व रामदास नामक टीकाकाराच्या टीकेच्या आरंभींहि आढळतो. राजधानी प्रवरपुराला नेल्यावर तेथे प्रवरसनाने आपल्या मातेच्या इच्छेवरून भगवान् रामचंद्राचें उत्तुंग देवालय बांधलें व त्याला सुंदर शिल्पांनी भूषित केलें. त्याचे कांही अवशेष पवनार येथे अलीकडे सापडले आहेत.

द्वितीय प्रवरसेनानंतर सन ४५० च्या सुमारास त्याचा मुलगा नरेन्द्रसेन गादीवर आला. त्याचा एकहि लेख अद्यापि मिळाला नाही. तथापि त्याचें नांव त्याचा मुलगा द्वितीय पृथिवीषेण याच्या बालाघाट ताम्रपटांत आलें आहे.[1] त्याचा मांडलिक मेकल देशाधिपति भरतबल ह्यानेहि आपल्या बम्हनी ताम्रपटांत त्याचा प्रच्छन्न रीतीनें उल्लेख केला आहे.[2] बालाघाट ताम्रपटांत म्हटलें आहे की त्याने आपल्या अंगच्या गुणांनी आपल्या वंशाच्या राज्यलक्ष्मीचें अपहरण केलें होतें. या वर्णनावरून त्याच्या राज्यारंभीं कलह उत्पन्न झाला असावा व नरेन्द्रसेनाने आपल्या वडील भावास बाजूस सारून गादी बळकावली असावी असें अनुमान डॉ. कीलहॉर्नने केलें आहे.[3] इतर कांही विद्वानांनी

१ क्रमांक १७, ओ. ३०.

२ क्रमांक १८, ओ. ३२–३४.

३ ए. इं., पु. ९, पृ. २६९.

हा वडील भाऊ म्हणजे अजंट्याच्या सोळा नंबरच्या लेण्यांतील ज्याचें नांव आता नष्ट झालें आहे तो असावा असें म्हटलें आहे.[१] पण हीं दोन्ही अनुमानें सयुक्तिक दिसत नाहीत. कारण एक तर असें की या राज्यविषयक कलहाचा इतरत्र कोठेहि पुरावा आढळत नाही. शिवाय अजंट्याच्या लेखांतील वंशावळ नन्दिवर्धन–प्रवरपुर शाखेची नसून वत्सगुल्म शाखेची आहे हें आता निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. तेव्हा बालाघाट ताम्रपटांतील वर्णन काव्यमय समजून त्याचा अर्थ नरेन्द्रसेनाने आपल्या अंगच्या गुणांनी राज्यलक्ष्मीला आकर्षित केलें एवढाच घेतला पाहिजे. या तऱ्हेचीं वर्णनें इतर कोरीव लेखांतहि आढळतात. असो.

नरेन्द्रसेनाचा विवाह अज्झितभट्टारिका या कुन्तल राजकन्येशीं झाला होता. ती बहुधा मानपुरच्या तत्कालीन राष्ट्रकूट नृपतीची कन्या असावी. कुन्तल देशांत सातारा, कोल्हापूर, सोलापूर या कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्यांतील प्रदेशाचा अंतर्भाव होत असे. कोल्हापूरजवळच्या एका खेडयांत कांही वर्षांपूर्वी पांडरंगपल्ली ताम्रपट सापडला होता. त्यांत या वंशाचा मूळ पुरुष मानाङ्क याचें 'समृद्ध कुन्तल देशाचा अधिपति' असें वर्णन आलें आहे.[२] त्याने आपल्या नांवें मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली. म्हणून या घराण्यास

---

१ कृष्णस्वामी आयंगार याचें एन्शन्ट् इंडिया, भाग १, पृ. १३२ पाहा.

२ डॉ. दिनेशचंद्र सरकार 'श्रीमत्कुन्तलानां प्रशासिता' याचा अर्थ 'समृद्ध कुन्तलांना शासन करणारा' असा करतात. पण तो बरोबर नाही. शास् धातुला देशवाचक नाम कर्म असतें तेव्हा बहुधा त्याचा अर्थ 'त्यावर राज्य करणें' असा असतो. रघुवंश, सर्ग ६, श्लो. ७६ इ. पाहा.

'मानपुरचे राष्ट्रकूट' अशी संज्ञा मिळाली आहे.[१] हे राष्ट्रकूट बरेच प्रबळ असून त्यांचें राज्य वत्सगुल्मच्या वाकाटक शाखेच्या राज्याला लागून असल्यामुळे त्यांचे वाकाटक राजांशीं अनेकदा खटके उडाले असले तर त्यांत आश्चर्य नाही. त्यांचे उल्लेख दोन्ही राजवंशांच्या कोरीव लेखांत आढळतात. द्वितीय चन्द्रगुप्ताच्या काळीं हें राष्ट्रकूट घराणें गुप्तांच्या राजनैतिक वजनाखाली आलें होतें, व त्या नृपतींच्या तंत्राने तेथील राज्यकारभार चालत होता, असें कांही प्राचीन आख्यायिकांवरून दिसतें. द्वितीय चंद्रगुप्ताने आपल्या दरबारच्या कविकुलगुरु कालिदासास वकील म्हणून कुन्तलेशाच्या राजसभेंत पाठविलें होतें. कालिदासाने तेथील परिस्थितीचें निरीक्षण करून 'कुन्तलेश तुमच्यावर राज्यकारभाराचा भार टाकून स्वतः विलासांत मग्न असतो' असा अहवाल आपल्या स्वामीस सादर केला, असें त्या कवीच्या 'कुन्तलेश्वर-दौत्य' नामक ग्रंथांतील जे उतारे अलीकडे सापडले आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें.[२] हा कुन्तलेश राष्ट्रकूट नृपति देवराज असावा. चन्द्रगुप्ताच्या मदतीने राष्ट्रकूट व वाकाटक या राजघराण्यांतील वितुष्ट नाहीसें होऊन त्यांच्यामध्ये वैवाहिक संबंधहि घडून आला. वाकाटक नृपति नरेन्द्रसेन याने ज्या अज्झितभट्टारिका नामक कुन्तल राजकन्येशीं

---

१ अॅ. भां. ओ. री. इ., पु. २५, पृ. ३६ इ., यांतील माझा 'मानपुरचे राष्ट्रकूट' हा लेख पाहा.

२ पाहा— 'असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलितनयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि ।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

यासंबंधी जास्त विवेचन माझ्या 'संशोधनमुक्तावलि, सर पहिला', पृ. ६५–६८ वर सापडेल.

विवाह केला होता[1] ती राष्ट्रकूटवंशी देवराजाचा मुलगा अविधेय याची कन्या असावी. हा अविधेय सुमारें सन ४४० ते ४५५ या काळांत होऊन गेला.

नरेन्द्रसेनानें आपल्या राज्याच्या पूर्व व उत्तर दिशांस आक्रमक धोरण अवलंबिलें होतें असें दिसतें. त्याचा मुलगा द्वितीय पृथिवीषेण याच्या बालाघाट ताम्रपटांत नरेन्द्रसेनानें शौर्यानें आपल्या शत्रूंचा पराभव केला होता व कोसला, मेकला व मालव या देशांचे अधिपति त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानत होते, असें वर्णन आलें आहे.[2] यांपैकी मालवदेश पश्चिम क्षत्रपांच्या उच्छेदापासून स्वतः गुप्तांच्या अमलाखाली होता. ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हूणांच्या स्वाऱ्यांमुळे गुप्त साम्राज्य खिळखिळें झालें. आणि जरी स्कंदगुप्तानें मोठ्या शौर्यानें त्यांच्या टोळ्यांच्या लाटा थोपवून धरल्या होत्या तरी देशांत एकंदरींत अस्थैर्य व अशांतता यांचें वातावरण उप्तन्न झालें होतें. याचें प्रमाण मन्दसोर येथील विक्रम संवत् ५२९ च्या शिलालेखांत सापडतें.[3] त्यांत म्हटलें आहे की विक्रम संवत् ४९३ ते ५२९ यांमधील ३६ वर्षांच्या अल्पावधींत दशपुर येथें कित्येक राजे होऊन गेले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या विक्रमसंवत् ५२४ च्या मंदसोर शिलालेखांत म्हटलें आहे की दशपुर (मन्दसोर) येथील गुप्तांचा मांडलिक प्रभाकर याला आपल्या स्वामीच्या अनेक शत्रूंशीं लढावें लागलें होतें. यांपैकी कांहींनी वाकाटक नृपति नरेन्द्रसेनाचें स्वामित्व स्वीकारून गुप्तांचें जोखड टाकून देण्याचा प्रयत्न केला असावा माळव्यामध्ये आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांत नरेन्द्रसेनास शेवटीं किती यश आलें तें सांगतां येत नाही.

---

१ क्रमांक १७, ओ. ३०–३१

२ पूर्वोक्त, ओ. २७–२८.

३ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ७९ इ.

मेकला हा अमरकंटकच्या सभोवारचा प्रदेश. अमरकंटक येथे उगम पावणाऱ्या नर्मदा नदीला मेकलसुता म्हणतात, हें प्रसिद्ध आहे. गुप्तांच्या उदयापूर्वी हा प्रदेश मघ राजांच्या अमलाखाली होता. या राजांचें साम्राज्य उत्तरेस फत्तेपूरपासून दक्षिणत बान्धवगड पर्यंत पसरलें होतें.[1] या प्रदेशांत त्यांचे शिलालेख व नाणीं सापडलीं आहेत. मघांचा उच्छेद कल्यानंतर समुद्रगुप्ताने त्यांच्या राज्यांतील सुपीक वत्सदेश आपल्या राज्यास जोडला आणि बघेलखंडाचा डोंगराळ प्रदेश आपल्या परिव्राजक, उच्चकल्प व पांडववंशी मांडलिकांमध्ये वाटून दिला. हे पांडववंशी राजे पूर्वी मघांचे मांडलिक होते. बांधवगड येथे सापडलेल्या एका शिलालेखांत राजा वैश्रवण व त्याचा पिता महासेनापति भरतबल यांचा उल्लेख आहे. ते पांडववंशी असून मघ राजांचे सेनानायक व मांडलिक असावे असें दिसतें. गुप्तांच्या उदयानंतर त्यांनी त्यांचें अधिपत्य स्वीकारलें असावें. विन्ध्यप्रदेशांत अमरकंटकच्या उत्तरेस कांही मैलांवर असलेल्या बम्हनी गावीं सापडलेल्या ताम्रपटांत[2] खालील वंशावळ दिली आहे—जयबल–त्याचा पुत्र वत्सराज–त्याचा पुत्र नागबल–त्याचा पुत्र भरतबल. यांपैकी पहिले दोन गुप्तांचे मांडलिक असावे. हूणांच्या स्वाऱ्यांमुळे गुप्त साम्राज्य डळमळूं लागलें त्या काळांत नागबलाने गुप्तांचें वर्चस्व झुगारून आपल्या सामर्थ्याची निदर्शक अशी 'महाराज' पदवी धारण केली. त्यानें दक्षिण कोसलचा राजा प्रथम भीमसेन याची कन्या लोकप्रकाशा हिच्याशीं आपला मुलगा भरतबल याचा विवाह करून कोसल देशाच्या राजघराण्याशीं वैवाहिक संबंध जोडला. भरतबल हा सन ४६० ते ४८० या काळांत होऊन गेला

---

१ इंडिका (इंडियन हिस्टॉरिकल रीसर्च सोसायटीचा रौप्यमहोत्सव ग्रंथ) (पृ. २६८ इ.) मधील माझा लेख पाहा.

२ क्रमांक १८.

असावा. याने आपल्या ब्रम्हनी ताम्रपटांत आपला सम्राट् वाकाटक नरेन्द्रसेन याचा प्रच्छन्न रीतीने उल्लेख केला आहे.[१] तेव्हा यानेहि गुप्तांचें सर्वस्व टाकून देऊन वाकाटकांशी संधान बांधलेलें दिसतें. बालाघाट ताम्रपटांत मेकलाधिपति नरेन्द्रसेनाच्या आज्ञा शिरसावंद्य मानीत असे, असें म्हटलें आहे. त्याने या अनुमानास पुष्टि मिळते.

कोसला म्हणजे दक्षिण कोसल किंवा छत्तीसगड. यामध्ये रायपूर, दुर्ग व बिलासपुर जिल्ह्यांचा अन्तर्भाव होतो. मागे सांगितल्याप्रमाणे ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकांत या प्रदेशांत महेन्द्र नामक राजा राज्य करीत होता. समुद्रगुप्ताने त्याचा पराभव करून त्याला आपलें स्वामित्व कबूल करावयास लावलें. त्याच्या वंशजांनी साम्राज्यसत्तेचें चिन्ह म्हणून गुप्त संवताचा स्वीकार केला. या काळांत गुप्तांची सत्ता निर्बल होऊं लागल्यामुळे मेकलाधिपतीप्रमाणे कोसला देशाच्या राजानेहि वाकाटकांचें मांडलिकत्व स्वीकारलें असावें. या वंशांतील द्वितीय भीमसेन नामक राजाने आपल्या गुप्त संवत् १२२ (इ. स. ५२१-०२) या वर्षी[२] दिलेल्या ताम्रपटांत आपली वंशावळ दिली आहे, तिजवरून हें घराणें कोसला देशांत निदान सहा पिढ्या राज्य करीत होतें असें समजतें. या वंशांतील प्रथम भीमसेन हा वाकाटक नरेन्द्रसेनाचा समकालीन व

---

१ पाहा–'योसौ संपूर्णशक्तित्रयविनिपतितानेकसामन्तमूर्द्धभ्रोद्घृष्टोत्फुल्लपद्मद्युतिचरणयुगाक्रान्तदिक्चक्रवालः । सोम्यः सोयञ्च वंशः प्रभव इति जनैः कीर्त्यते यस्य चोच्चैः स श्रीमान् सार्वभौमप्रथितगुणगणोदीर्णवैरो नरेन्द्रः ॥' क्रमांक १८, श्लो. ११. या श्लोकांतील 'नरेन्द्र' शब्दावर श्लेष आहे. त्याचे (१) राजा भरतबल, आणि (२) वाकाटक सार्वभौम नृपति नरेन्द्रसेन असे, दोन अर्थ विवक्षित आहेत.

२ ए. इं., पु. २६, पृ. २२७ इ.

मांडलिक होता असें दिसतें. याशिवाय, मालव देशांत नरेन्द्रसेनाने आपलें वर्चस्व स्थापन केलें तेव्हा माहिष्मती (महेश्वर) या नगराच्या सभोंवारचा अनूप देशहि आपल्या राज्यास जोडला असावा.

नरेन्द्रसेन गादीवर आला तेव्हा त्याचें बरेंच वय झालें असावें; कारण त्याचा पिता द्वितीय प्रवरसेन याने दीर्घकाळ राज्य केलें होतें. नरेन्द्रसेनाची कारकीर्द वीस वर्षे चालून सन ४७० च्या सुमारास समाप्त झाली असावी. तिचा शेवट होण्यापूर्वी वाकाटक राज्यावर एक गंडांतर आलें. नलवंशी भवदत्तवर्मा याने वाकाटकांच्या मुलखावर स्वारी करून त्याचा बराचसा भाग काबीज केला. नल राजे कोसला देशांत राज्य करीत होते असें पुराणें सांगतात.[1] पुराणांतील या विधानाला नलांच्या कोरीव लेखांच्या व नाण्यांच्या प्राप्तिस्थानांवरून दुजोरा मिळतो. वराह, भवदत्तवर्मा व अर्थपति या तीन नलराजांचीं सोन्याचीं नाणीं मध्यप्रदेशाच्या बस्तर जिल्ह्यांतील कोंडेगांव तहसिलींत एडेंगा येथे सापडलीं होतीं.[2] या राजांपैकी वराह हा सर्वांत अगोदर आणि अर्थपति सर्वांत नंतर राज्य करीत असावा. भवदत्तवर्म्यांने वाकाटकांच्या मुलखावर स्वारी करून नन्दिवर्धन या त्यांच्या पूर्वीच्या राजधानीपलीकडचाहि प्रदेश काबीज केला. त्याचा एक ताम्रपट अमरावती जिल्ह्यांत ऋद्धपुर येथे सापडला आहे.[3] त्यामध्ये भवदत्तवर्म्यांने यवतमाळ जिल्ह्यांतील कदंबगिरिग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. भवदत्तवर्मा प्रयागला यात्रेच्या निमित्ताने गेला असतां तेथे त्याने आपल्या व आपल्या राणीच्या पुण्योपार्जनाकरिता हें दान दिलें होतें. त्याचा

---

१ डा. क. ए., पृ. ५१

२ या नाण्यांवरचा माझा लेख (ज. न्यू. सो. इं., पु. १, पृ. २९ इ.) पाहा. नल नृपतींविषयी सविस्तर माहितीकरितां 'संशोधनमुक्तावलि : सर दुसरा', पृ. ७९ इ. पाहा.

३ ए. इ., पु. १९, पृ. १०० इ.

ताम्रपट भवदत्तवर्म्याचा पुत्र अर्थपति याने नन्दिवर्धनाहून दिला आहे.[1] या ताम्रपटांतील स्थानोल्लेखावरून वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेच्या अमलाखालील बराचसा प्रदेश नलराजांनी जिंकला होता, हें स्पष्ट आहे.

स्वतः वाकाटकहि या काळांत आपल्या घराण्याला वाईट दिवस आले होते, हें मान्य करतात. नरेन्द्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याचें 'निमग्न वंशाचा उद्धर्ता' असें वर्णन त्याच्या बालाघाट ताम्रपटांत केलें आहे.[2] या बिकट प्रसंगीं त्याने आपली राजधानी प्रवरपुराहून हलवून भंडारा जिल्ह्यांतील आमगांवजवळ पद्मपुर नगरीं नेली असें दिसतें. त्या ठिकाणाहून देण्याकरिता कोरलेला एक अपूर्ण ताम्रपट दुर्ग जिल्ह्यांत सापडला आहे.[3] या नगरीं आपलें सामर्थ्य वाढवून द्वितीय पृथिवीषेणाने नल राजांस विदर्भांतून हाकून लावलें, एवढेंच नाही तर शत्रूच्या राज्यावर स्वारी करून त्यांची राजधानी पुष्करी ही उद्ध्वस्त केली. नल नृपति स्कन्दवर्मा याच्या आंध्र प्रदेशांतील पोडागड येथे सापडलेल्या शिलालेखांत शत्रूने पुष्करी उद्ध्वस्त केल्याचा उल्लेख आहे.[4] हा शत्रु द्वितीय पृथिवीषेणच असावा.

या विजयानंतर द्वितीय पृथिवीषेणाने पद्मपुराहून पुनः आपली राजधानी प्रवरपुरास नेली किंवा नाही तें सांगतां येत नाही. तथापि पद्मपुरास या निमित्ताने जें महत्त्व प्राप्त झालें तें पुढे दीर्घ काळ टिकलें. त्या ठिकाणीं विद्वान् ब्राह्मण येऊन राहूं लागले. सुप्रसिद्ध संस्कृत कवि भवभूति याचा पितामह गोपाल याने पद्मपुरास वाजपेयादि श्रौत याग

१ डॉ. दि. चं. सरकार अर्थपति हा भवदत्तवर्म्याचा नातु होता असें म्हणतात, पण तें चूक आहे. इं. हि. क्वा., पु. २६, पृ. १४२ इ.

२ क्रमांक १७, ओ. ३३.

३ क्रमांक १६, ओ. १.

४ ए. इं., पु. २१, पृ. १५६.

केल्याचा उल्लेख 'महावीरचरिता'दि नाटकांत आढळतो.[1] हें पद्मपुर दक्षिणापथांतील विदर्भांत होतें असें भवभूतीने आपल्या नाटकांत सांगितलें आहे.[2] आमगांवाजवळच्या पद्मपुरांत अद्यापि विशाल इमारतींचे अवशेष व प्राचीन मूर्ति आढळतात.[3] त्यावरून तेंच भवभूतीचें जन्मस्थान असावें असें अनुमान करतां येतें.

द्वितीय पृथिवीषेणाने उत्तरेंतहि आपली सत्ता दृढ केली व मेकला देशाच्या उत्तरेच्या चेदि देशापर्यंत आपलें साम्राज्य वाढविलें. त्याचा मांडलिक व्याघ्रदेव याचे दोन शिलालेख विन्ध्यप्रदेशांत नचना व गंज येथे सापडले आहेत.[4] हा व्याघ्रदेव उच्चकल्पवंशी असावा. कारण या राजवंशाचे कित्येक ताम्रपट त्या प्रदेशांत सापडले आहेत,[5] त्यांमध्ये व्याघ्र नामक राजाचा उल्लेख आहे. या व्याघ्राचा पुत्र जयनाथ हा सुमारें गुप्त संवत् १७० ते १९० (इ. स. ४९० ते ५१०) या कालांत राज्य करीत होता. तेव्हा त्याचा पिता व्याघ्र ह्याचा काळ गुप्त संवत् १५० ते १७० (इ. स. ४७० ते ४९०) हा येतो. याच काळांत द्वितीय पृथिवीषेण राज्य करीत असल्यामुळे हा उच्चकल्पवंशी व्याघ्रच त्या वाकाटक नृपतीचा मांडलिक असावा. पांडववंशी राजांप्रमाणे उच्चकल्प राजेहि प्रथम गुप्त सम्राटांचे मांडलिक होते, पण पुढे ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या अखेरीस गुप्तांची सत्ता निर्बल झाल्यावर त्यांनी वाकाटकांचें वर्चस्व मान्य केलें असावें.

---

१ महावीरचरित (निर्णयसागर प्रत, १९१०), पृ. ७.

२ मालतीमाधव (निर्णयसागर प्रत, १९००), पृ. ७.

३ माझा 'भवभूतीचें जन्मस्थान' हा लेख पाहा. 'संशोधन-मुक्तावलि : सर पहिला,' पृ. ७६ इ.

४ क्रमांक २० व २१.

५ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ११७ इ.

वाकाटक राजे सामान्यतः शिवोपासक होते. याला दोनच अपवाद माहीत आहेत. एक द्वितीय रुद्रसेन व दुसरा द्वितीय पृथिवीषेण. बालाघाट ताम्रपटांत या पृथिवीषेणाचें वर्णन 'परमभागवत' (विष्णूचा निस्सीम उपासक) असें केलें आहे.[1] त्याचा अंत सन ४९० च्या सुमारास झाला असावा. यानंतर या ज्येष्ठ शाखेचा प्रदेश वत्सगुल्म शाखेच्या हरिषेण नृपतीच्या साम्राज्यांत विलीन झाला असावा.

याप्रमाणें जवळ जवळ १६० वर्षांच्या (सुमारें सन ३३० ते ४९० पर्यंत) शासनानंतर या ज्येष्ठ शाखेचा अस्त झाला. या शाखेंत शूर, राज्यशासनकुशल, दानशील आणि साहित्य व शिल्पादि कला यांचे उदार आश्रयदाते असे पुरुष उत्पन्न होऊन त्यांनी आपल्या घराण्याची कीर्ति दिगन्तीं पसरविली. त्यांनी बांधलेलीं देवालयें आता विद्यमान नाहींत, पण रामटेक व पवनार येथे जे अवशेष सापडले आहेत त्यांवरून तत्कालीन शिल्पांची रमणीयता अजमावतां येते. त्यांच्या काळीं अनेक काव्यें निर्माण होऊन वैदर्भी रीतीला सर्वत्र मान्यता मिळाली. त्यांपैकी दोनच काव्यें सध्या अवशिष्ट आहेत. एक कालिदासाचें संस्कृतांतील मेघदूत व दुसरें द्वितीय प्रवरसनाचें महाराष्ट्री प्राकृतांतील सेतुबंध किंवा रावणवहो. या काव्यांच्या योगें या ज्येष्ठ शाखेचें नांव संस्कृत व प्राकृत वाङ्मयांच्या इतिहासांत अजरामर झालें आहे.

वाकाटकांची वत्सगुल्मशाखा

सन १९३९ मध्यें वाशीम ताम्रपट[2] मिळेपर्यंत या वत्सगुल्म शाखेविषयी मुळीच माहिती नव्हती. या शाखेच्या कित्येक नृपतींचीं नावें अजंठ्याच्या सोळा नंबरच्या लेण्यांतील लेखांत[3] आलीं आहेत

१ क्रमांक १७, ओ. ३४.
२ क्रमांक २२.
३ क्रमांक २४.

खरीं, पण तो लेख अत्यंत खराब झाल्यामुळे तीं नांवें बरोबर वाचतां आलीं नव्हतीं. आता वाशीम ताम्रपटांतील माहितीवरून अजंट्याच्या लेखांतील खरीं राजनामें उपलब्ध झालीं आहेत. त्यांवरून इंध्याद्रि पर्वतराजीच्या दक्षिणेस वाकाटकांची दुसरी शाखा राज्य करीत होती हें सिद्ध झालें आहे.

या शाखेचा संस्थापक प्रथम प्रवरसेनाचा पुत्र सर्वसेन हा होता. याचें नांव वाशीम ताम्रपटांत तसेंच अजंट्याच्या लेखांतहि आलें आहे. हा प्रवरसेनाचा धाकटा मुलगा असावा. याच्या अमलाखालचा प्रदेश उत्तरेस इंध्याद्रि पर्वतराजीपासून दक्षिणेस गोदावरी नदीपर्यंत पसरला होता. या प्रदेशावर आपलें स्वामित्व प्रस्थापित करण्यामध्ये याला सोम नामक ब्राह्मणाला क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या रवि या सचिवाचें साहाय्य झालें होतें.[1] या रवीचे वंशज वत्सगुल्मच्या वाकाटकांचे कित्येक पिढ्यांपर्यंत मुख्य प्रधान झाले व त्यांची त्यांनी एकनिष्ठपणें सेवा केली.

सर्वसेनाने आपल्या राजधानीकरिता वत्सगुल्म या प्राचीन पुण्यक्षेत्राची निवड केली. हें वत्सगुल्म म्हणजे सध्याचें अकोला जिल्ह्यांतील वाशीम होय. याच्या सभोवतालच्या प्रदेशाला वात्सगुल्मक असें म्हणत. याचा उल्लेख वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त आला आहे.[2] वत्सगुल्माची पवित्र क्षेत्र म्हणून ख्याति होती. 'वत्सगुल्ममाहात्म्यां'त म्हटलें आहे की त्या ठिकाणीं वत्स नामक ऋषीने आपल्या आश्रमाजवळ देवांच्या गुल्मांची (म्हणजे समूहांची) वस्ती करविली होती म्हणून त्याला वत्सगुल्म हें नांव पडलें. 'कामसूत्रा'च्या जयमंगला नामक टीकेंत या स्थलनामाची दुसरीच व्युत्पत्ति दिली आहे त्या टीकेंत म्हटलें

---

१ क्रमांक २५, ओ. ७.

२ कामसूत्र (काशी संस्कृत सीरीज), पृ. २९१.

आहे कीं वत्स व गुल्म हे सख्खे भाऊ असून दक्षिणापथाचे राजपुत्र होते. त्यांनी वसविलेल्या देशास 'वत्सगुल्म' हें नांव पडलें.[१] वाकाटकांच्या राजवटींत वत्सगुल्म राजधानीची विद्या व संस्कृति यांचें प्रमुख केंद्र म्हणून मोठी ख्याति झाली व तेथील उत्कृष्ट प्राकृत काव्यामुळे 'वच्छोमी' रीति सर्वत्र मान्यता पावली.[२]

दक्षिण भारतांतील प्रथेला अनुसरून प्रथम प्रवरसेनाने 'धर्म-महाराज' ही पदवी धारण केली होती तीच सर्वसेनानेंहि स्वीकारली. अजंटा लेखांतील याचें वर्णन ठरीव ठशाचें आहे. त्याने 'हरिविजय' नामक काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचलें होतें. त्याची स्तुति संस्कृत कवि व आलंकारिक यांनी मुक्तकंठाने केली आहे. सर्वसेनाने सुंदर प्राकृत गाथाहि रचल्या होत्या. त्यांपैकी कांहींचा अन्तर्भाव 'गाथासप्तशतीं'त केला आहे. सर्वसेनाने सुमारें सन ३३० ते ३५५ पर्यंत राज्य केलें असावें.

सर्वसेनानंतर विन्ध्यसेन गादीवर बसला. वाशीम ताम्रपटांत याचें नांव (द्वितीय) विन्ध्यशक्ति असें झालें आहे. याने चढाईचें धोरण स्वीकारलें असावें, कारण याने कुन्तलेशाचा पराभव केला असें अजंट्याच्या लेखांत म्हटलें आहे. मागे सांगितल्याप्रमाणे या काळांत कुन्तल देशांत एक राष्ट्रकूट घराणें उदयास आलें. त्याचा मूळ पुरुष मानाङ्क याने बहुधा प्रथम प्रवरसेनाच्या दुसऱ्या एका मुलाच्या ताब्यांत असलेला गोदावरीच्या दक्षिणचा प्रदेश जिंकला व इतरहि विजय संपादन केले. त्याच्या एका वंशजाच्या लेखांत मानाङ्काचें 'समृद्ध अशा कुन्तल देशाचा

---

१ 'बृहत्कथे'मध्ये वत्स व गुल्म हे ब्राह्मण असून गुणाढ्यांचे मातुल होते असें म्हटलें होतें. कथासरित्सागर, १, ६, ९ व बृहत्कथामंजरी १, ३, ४ पाहा.

२ राजशेखर, कर्पूरमंजरी, १, १.

अधिपति' आणि 'विदर्भ व अश्मक देशांचा विजेता' असें वर्णन केलें आहे.[१] अश्मक देश गोदातीरी असून त्यांत अहमदनगर व बीड जिल्ह्यांचा अन्तर्भाव होत होता. अश्मकाधिपति वत्सगुल्मच्या वाकाटकांचा मांडलिक होता असें दिसतें. मानाङ्काने आपल्या नांवें मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली. हें मानपुर सातारा जिल्ह्यांतील माण नदीच्या काठचें सध्याचें माण गांव असावें. मानाङ्काच्या वंशजांचे कांही ताम्रपट मुंबई प्रदेशांत सापडले आहेत. त्यांच्या अक्षरवटिकेवरून मानाङ्क ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या अखेरच्या पादांत राज्य करीत असावा. तेव्हा तो विन्ध्यसेनाचा समकालीन होता असें दिसतें. विन्ध्यसेन व मानाङ्क हे दोघेहि परस्परांचा पराभव केल्याची बढाई मारतात. तेव्हा त्यांपैकी कोणालाहि पूर्ण विजय प्राप्त झाला नसावा. मानाङ्काचा पुत्र देवराज याच्या कारकीर्दींत हें कुन्तलांतील राष्ट्रकूट घराणें गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्ताच्या राजनैतिक वर्चस्वाखाली आलें व त्यांचा कारभार चन्द्रगुप्ताच्या सल्ल्याप्रमाणें होऊं लागला, अर्थातच तें वत्सगुल्मच्या वाकाटकांना विरोधी राहिलें नाही.[२]

विन्ध्यसेनाने वाशीम ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या ३७ व्या वर्षीं वत्सगुल्म राजधानीहून दिला होता.[३] त्यांतील लेखांत नान्दीकट विषयांतील (म्हणजे जिल्ह्यांतील) एक गाव दान दिल्याचा निर्देश आहे. हें नान्दीकट म्हणजे हैदराबाद संस्थानांतील सध्याचें नांदेड होय. या ताम्रपटांतील लेखाच्या आरंभींचा राजवंशप्रशस्तिपर भाग संस्कृतमध्ये असून नंतरचा दानविषयक भाग प्राकृतमध्ये आहे. यापूर्वीचे शिलालेख व ताम्रपट बहुधा प्राकृतमध्येच लिहिले असत.

---

१ अॅ. भां. ओ. री. इ., पु. २५, पृ. ३१ इ.

२ 'संशोधनमुक्तावलि', सर पहिला, पृ. ६५ इ., यामधील माझा 'कालिदासाचें कुन्तलेश्वरदौत्य' हा लेख पाहा.

३ क्रमांक २२, ओ. २८.

तेव्हा या ताम्रपटावरून वाकाटकांच्या काळीं संस्कृत भाषा राजदरबारीं हळू हळू कशी मान्यता पावूं लागली, तें स्पष्ट दिसतें. आपल्या दोन पूर्वजांप्रमाणे विन्ध्यसेनानेंहि 'धर्ममहाराज' ही पदवी धारण केली होती. घटोत्कच लेण्यांतील लेखांत त्याचा प्रधान प्रवर याचा उल्लेख आहे.[१] विन्ध्यसेन हा नन्दिवर्धनाच्या प्रथम पृथिवीषेणाचा समकालीन होता. तेव्हा पृथिवीषेणाच्या प्रमाणे त्याच्याहि कारकीर्दीचा शेवट सन ४०० च्या सुमारास झाला असावा.

विन्ध्यसेनानंतर त्याचा पुत्र द्वितीय प्रवरसेन हा गादीवर आला. याच्या कारकीर्दीविषयी फारशी माहिती नाही. अजंटयाच्या लेखांत म्हटलें आहे कीं हा आपल्या उत्कृष्ट व उदार राज्यशासनाने कीर्तिमान् झाला. याने सुमारें ४०० ते ४१५ पर्यंत पंधरा वर्षेंच राज्य केलें असावें; कारण हा निधन पावला तेव्हा याचा मुलगा केवळ आठ वर्षांचा होता. याच्या श्रीराम नामक सचिवाचा उल्लेख घटोत्कच लेण्यांतील लेखांत आला आहे.

द्वितीय प्रवरसेनानंतर वत्सगुल्मच्या गादीवर बसलेल्या बालराजाचें नांव अजंटयाच्या लेखांत नष्ट झालें आहे. तथापि त्याने उत्तम रीतीनें राज्य केलें असें त्यांत म्हटलें आहे. त्याच्या सचिवाचें नांव कीर्ति असें होतें, हें घटोत्कच लेण्यांतील लेखावरून कळतें. त्यानंतर सन ४५० च्या सुमारास त्याचा पुत्र देवसेन हा गादीवर आला याचा एकच अपूर्ण ताम्रपट दक्षिण विदर्भांत कोठे तरी सापडलेला आता लंडनच्या ब्रिटिश म्यूझियममध्ये आहे.[२] तो वत्सगल्माहून दिला होता. त्यावरून वत्सगुल्म ही या शाखेची राजधानी शेवटपर्यंत राहिली असें स्पष्ट दिसतें.

देवसेनाच्या हस्तिभोज नामक अत्यंत दक्ष, विनीत व गुणी असा सचिव होता. देवसेनाने त्याच्यावर सर्व राज्यकारभार सोपवून

---

१ क्रमांक २५, ओ. ९.

२ क्रमांक २३.

स्वतः ऐषआरामांत काळ घालविला. हस्तिभोजानेहि मातापित्याप्रमाणे प्रजेचें पालन केलें. तो सर्वांना प्रिय झाला. त्याच्याकडे सर्वांना जाण्यास मुक्तद्वार असे, असें अजंठ्याच्या लेखांत म्हटलें आहे.[1] घटोत्कच लेण्यांतील लेखांतहि याची प्रशंसा आली आहे. हे दोन्ही लेख त्याचा पुत्र वराहदेव याने कोरविले होते.

सन ४७५ च्या सुमारास देवसेनानंतर त्याच्या पुत्र हरिषेण गादीवर आला. हा या शाखेचा अंतिम ज्ञात राजा होय. हा शूर व महत्त्वाकांक्षी असून त्याने आपल्या राज्याच्या सर्व दिशांस विजय संपादन केले. याच्या विजयांचें वर्णन अजंठ्याच्या लेखांत १४–१५ ओळींत आलें होतें. पण दुर्दैवाने त्याचा बराचसा भाग आता नष्ट झाला आहे. अवशिष्ट भागांत त्याने जिंकलेल्या किंवा करभार द्यावयास लावलेल्या विदर्भाच्या चारी दिशांस असलेल्या खालील देशांचा निर्देश आहे. उत्तरेस अवन्ति (माळवा); पूर्वेस कोसला (छत्तीसगड व त्यालगतचा प्रदेश); कलिंग (ओरिसाचा कांही भाग) व आन्ध्र; पश्चिमेस लाट (मध्य व दक्षिण गुजराथ) व त्रिकूट (नाशिक जिल्हा); आणि दक्षिणेस कुन्तल (दक्षिण महाराष्ट्र).[2] तेव्हा उत्तरेस माळव्यापासून दक्षिणेस कुन्तलापर्यंत व पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंतच्या विशाल भूभागावर हरिषेणाची सत्ता अबाधितपणें चालत होती.

हा विस्तृत प्रदेश हरिषेणाने आपल्या स्वतःच्या अमलाखाली आणला होता, असें दिसत नाही. प्राचीन भारतीय परंपरेस अनुसरून त्याने या प्रदेशांच्या राजांस जिंल्यावर त्यांना वार्षिक करभार देण्याच्या अटीवर त्यांचीं राज्यें परत केलीं असावीं. हरिषेणाने अवन्ति

---

१ क्रमांक २४, ओ. १०–१३

२ पूर्वोक्त, ओ. १४.

देश (माळवा) जिंकला होता, त्या अर्थी त्याने ज्येष्ठ शाखेच्या अमलाखालचा उत्तर विदर्भ आपल्या राज्यांत सामील करून घेतला होता, हें उघड आहे. हरिषेणाच्या स्वाऱ्यांमुळे कलिंग व आंध्र देशांत राज्यक्रांति होऊन नवीन राजवंश उदयास आले असें दिसतें; कारण याच काळांत सन ४९८ मध्ये कलिंग देशांत गंगांच्या राज्यस्थापनेचा निदर्शक गंग संवत् सुरू झाला.[१] आन्ध्र देशांत स्वकालीन शालंकायनवंशी राजास पदच्युत करून हरिषेणाने त्याचें राज्य विष्णुकुंडीवंशी गोविंदवर्म्यास दिलें. या गोविंदवर्म्याच्या प्रथम माधववर्मा नामक पुत्राने वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता.[२] ती हरिषेणाची मुलगी किंवा जवळची आप्त असावी. दक्षिण कोसलांत आरंग ताम्रपटांत उल्लेखिलेल्या जुन्या राजवंशाचा अस्त होऊन शरभपुरचें राजघराणें उदयास आलें.[३] पश्चिमेस ऋषीक (खानदेश)चा राजा हरिषेणाचा मांडलिक होता हें त्याने अजंट्याच्या सतराव्या लेण्यांत कोरविलेल्या लेखावरून स्पष्ट आहे.[४] दक्षिणेस राष्ट्रकूट घराणें हरिषेणाचें मांडलिकत्व स्वीकारून राज्य करीत होतें, तें पुढे दीर्घकाळ टिकलें. हरिषेणाने सुमारें सन ४७५ ते ५०० पर्यंत राज्य केलें असावें.

हरिषेणाचा वराहदेव नामक अत्यंत धार्मिक, उदार व दक्ष सचिव होता. राजाला तसेंच प्रजेलाहि तो प्रिय झाला होता. तो उपरि-

---

१ ए. इ., पु. २६, पृ. ३२६–३३६, यांतील 'गंगसंवताचा आरंभकाळ' हा माझा लेख पाहा.

२ ए. इ., पु. ४, पृ. १०३.

३ या राजांच्या काळाविषयी माझा लेख 'महाकोसलांतील तीन राजवंश' (बुलेटिन ऑफ दि डेक्कन कॉलेज रीसर्च इन्स्टिटयूट्, पु. ८, पृ. ४७ इ.) पाहा.

४ क्रमांक २६, ओ. २१.

निर्दिष्ट हस्तिभोजाचा पुत्र असून बौद्धधर्मानुयायी होता. त्याने अजंठ्याचें सोळा क्रमांकाचें लेणें खोदवून त्याला शिल्पचित्रादिकांनी भूषविलें. त्यांत त्याने कोरविलेल्या लेखावरून वत्सगुल्म शाखेची बरीचशी माहिती मिळाली आहे. त्याने अजंठ्याच्या पश्चिमेस १० मैलांवरच्या गुलवाडयाच्या टेकडींत घटोत्कच लेणें खोदवून त्यांत आपल्या वंशाचा आरंभापासून वृत्तांत देणारा लेख कोरविला होता. तो सध्या जीर्णावस्थेंत असला तरी तत्कालीन इतिहासास अत्यंत उपयुक्त आहे.

हरिषेण हा या वत्सगुल्म शाखेचा अन्तिम ज्ञात राजा होय. यानंतर एकदोन राजे झाले असावे. पण त्यांचीं नांवेंहि आपणांस माहीत नाहीत. शेवटीं सन ५५० च्या सुमारास माहिष्मतीच्या कलचुरींनी वाकाटकांच्या अस्तानंतर विदर्भांत राज्य स्थापलें असें दिसतें. कटच्चुरि किंवा आद्य कलचुरि वंशाचा पहिला ज्ञात राजा कृष्णराज याचें राज्य उत्तरेस विदिशेपासून दक्षिणेस कऱ्हाड नाशिकपर्यंत व पश्चिमेस मुंबईपासून पूर्वेस अमरावती-बैतूलपर्यंत पसरलें होतें.[1] त्याचीं नाणीं या सर्व भागांत सापडलीं आहेत. तेव्हा वाकाटक साम्राज्याच्या नाशानंतर या कलचुरि नृपतीने विदर्भांत आपली सत्ता स्थापिली होती यांत संशय नाही. ८-१० वर्षांपूर्वी स्वामिराज नामक राजाचा ताम्रपट नन्दरधन किंवा नगरधन येथे सापडला होता. तो त्या राजाने कलचुरि संवताच्या ३२२ (सन ५७३-७४) या वर्षी दिला होता. या संवताचा हा एकच लेख विदर्भांत सापडला आहे.[1] कलचुरि राजांचे बहुतेक लेख या संवताचेच आहेत. तेव्हा स्वामिराज हा कलचुरि नृपति कृष्णराज (सन ५५०-५७५) याचा मांडलिक होता, हें उघड आहे.

---

१ का. इ. इं., पु. ४, प्रस्तावना, पृ. ४६ इ.

२ पूर्वोक्त, पृ. ६११ इ.

हरिषेणानंतर लौकरच त्याच्या विस्तृत साम्राज्याचा नाश कसा झाला हें इतिहासांत नमूद नाही. तथापि वाकाटकांच्या अस्तानंतर शंभरसवाशें वर्षांतच लिहिलेल्या दण्डीच्या 'दशकुमारचरितां'त एका विदर्भ नृपतीची कथा आली आहे, तींत वर्णिलेली राजकीय परिस्थिति वाकाटकांच्या अन्तिम काळांतील दिसते. तिजवरून कांही अनुमानें काढतां येतात[१].

दशकुमारचरिताच्या शेवटच्या म्हणजे आठव्या उच्छ्वासांत मगधाचा पदच्युत नृपति राजहंस याच्या राजवाहन नामक पुत्राचा अनुयायी विश्रुत याची कथा दिली आहे. तिजवरून असें दिसतें की, एका काळीं दक्षिणेंत एक विशाल साम्राज्य होतें. या साम्राज्याचा अधिपति स्वतः विदर्भावर राज्य करीत होता. आणि त्याच्या मांडलिकांच्या अमलाखाली कुन्तल (दक्षिण महाराष्ट्र), अश्मक (गोदावरीच्या दक्षिण तीरावरील प्रदेश), ऋषीक (खानदेश), मुरल (गोदावरीजवळचा प्रदेश), नासिक्य (नाशिक), कोंकण इत्यादि प्रदेश होते. तेव्हा या विदर्भ नृपतीचें साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत व पश्चिमेस अरबीसमुद्रापासून पूर्वेस निदान वाइनगंगा नदीपर्यंत पसरलें होतें. एक तरुण राजपुत्र आपल्या सुविख्यात पित्यानंतर या विशाल साम्राज्याचा अधिपति झाला. हा राजपुत्र बुद्धिमान् व कलानिपुण होता, पण त्याचें दण्डनीतीकडे (राज्यशास्त्राकडे) मुळीच लक्ष नव्हतें. त्याच्या पित्याच्या वृद्ध मंत्र्याने त्याला अनेकदा दण्डनीतीचा अभ्यास करण्याविषयीं उपदेश केला, पण तो आपल्या पैशुन्यपंडित व बाहेरख्याली अशा खुशमस्कऱ्याच्या तंत्राने चालत असल्याने त्याने त्या उपदेशाकडे दुर्लक्ष केलें आणि राज्यकारभाराकडे मुळीच लक्ष न देतां तो विषयोपभोगांत व नाना प्रकारच्या व्यसनांत आपला काळ घालवूं लागला. त्याचे

१ या कथेंतील ऐतिहासिक माहितीविषयीं माझा लेख ('संशोधनमुक्तावलि, सर दुसरा', पृ. ८४–१००) पाहा.

अधिकारी व प्रजाजनहि त्याच्या व्यसनांचें अनुकरण करूं लागले. त्यामुळें राज्यांत सर्वत्र अव्यवस्था व अंदाधुंदी माजली. ही संधि साधून शेजारच्या अश्मक देशाच्या राजाने आपल्या मंत्र्याचा मुलगा विदर्भ-राजाच्या दरबारीं पाठविला. तो त्या नृपतीची मर्जी संपादन करून त्यास अनेक व्यसनांत जास्तच गुंतवूं लागला. तसेंच त्याने अनेक उपायांनी विदर्भराजाच्या सैनिकांचा नाश आरंभिला. शेवटीं त्या राज्यांत सर्वत्र अतिशय अव्यवस्था माजली आहे असें पाहून अश्मकाधिपतीने वनवासी देशाच्या (मुंबई प्रदेशांतील उत्तर कानडा जिल्ह्याच्या) राजाला विदर्भावर स्वारी करण्यास चिथावलें. वनवासी नृपतिविदर्भावर मोठ्या सैन्यासह चाल करून आला व त्याने विदर्भाचा दक्षिण भाग काबीज केला. तेव्हा विदर्भनृपतीने आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि आपल्या सर्व सामन्तांना आपल्या साहाय्यास बोलावलें. त्याप्रमाणें अनेक सामन्त जमा झाले. त्यांमध्ये विश्वासघातकी अश्मक राजा प्रथम येऊन पोचला. त्याखेरीज कुन्तल, मुरल, ऋषीक, नासिक्य, कोंकण इत्यादि देशाचे मांडलिकहि विदर्भसम्राटाच्या साहाय्यास आले. या सामन्तांच्या मदतीने शत्रूशीं सामना देण्याकरितां विदर्भनृपतीने वरदा (वर्धा) नदीच्या तीरावर आपल्या सैन्याचा तळ दिला. अश्मकाधिपतीने कुन्तलनृपतीला विदर्भनृपतीविरुद्ध फितविलें आणि इतर सामन्तांच्या मनांतहि असंतोष उप्तन्न केला. त्यामुळे विदर्भनृपति शत्रूशीं लढत असतां त्याच्या सामन्तांनीच त्याच्या पिछाडीवर हल्ला केला. त्यामुळे त्याचा पराभव होऊन तो त्या लढाईंत मारला गेला. नंतर अश्मकाधिपतीने इतर सामन्तांत लुटीच्या विभागानिमित्त कलह उत्पन्न करून त्यांचा परस्परांकडून नाश करविला. शेवटीं त्याने वनवासीनृपतीला लुटीचा थोडासा भाग देऊन परत पाठविलें. व स्वतः विदर्भाचें राज्य बळकावलें. मध्यंतरीं विदर्भाच्या वृद्ध मंत्र्याने राणी व तिचीं दोन मुलें--मुलगा व मुलगी--माहिष्मतीस पोचविलीं. तेथे विदर्भनृपतीचा सावत्र भाऊ राज्य करीत होता. त्याने त्यांस आश्रय दिला. पण पुढे त्यास

राणीच्या सौंदर्याचा मोह पडून त्याने तिच्यावर वाईट नजर ठेवली. पण तिने त्याची निर्भर्त्सना केली. तेव्हा त्याने राजपुत्राला ठार मारण्याचा बेत केला. पण विश्रुताने त्याचा पक्ष घेऊन राजालाच ठार केलें व राजपुत्राला माहिष्मतीच्या गादीवर बसविलें.

येथपर्यंतची हकीकत 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत आली आहे. तो उच्छ्वास अपूर्ण असल्यामुळे दण्डीने या गोष्टीचा शेवट कसा केला होता, राजकुमारास विदर्भांची गादी परत मिळवून देण्यांत विश्रुतास यश मिळालें किंवा नाही, हें समजण्यास साधन नाही.

सन ५०० च्या सुमारास हरिषेणाच्या मृत्यूनंतर विदर्भांत उत्पन्न झालेल्या परिस्थितीचें यथार्थ प्रतिबिम्ब वरील कथेंत पडलेलें दिसतें. त्यापुढील काळांत दक्षिणेंतील साम्राज्यसत्तेचें केन्द्र माहिष्मती, बदामी, मान्यखेट, कल्याणी इत्यादि ठिकाणीं स्थापन झालें, पण तें वाकाटक काळानंतर विदर्भांत कधीहि नव्हतें. शिवाय या कथेंत उल्लेखिलेलीं कांही देशनामें नंतरच्या काळांत प्रचारांतून गेलीं असें दिसतें. उदाहरणार्थ, ऋषीक हें देशनाम घ्या. ह्या देशाचा उल्लेख महाभारत, रामायण आणि बृहत्संहिता या ग्रंथांत तसेंच पुळुमावीच्या नाशिक लेण्यांतील लेखांत येतो, पण नंतरच्या ग्रंथांत व कोरीव लेखांत तो मुळीच आढळत नाही. या प्रमाणांवरून विश्रुतचरितांतील घटना खिस्तोत्तर सहाव्या शतकांत घडली असावी असें अनुमान करतां येतें. दण्डीचे पूर्वज विदर्भांचे रहिवासी होते.[१] म्हणून त्याला या कथेंत उल्लेखिलेल्या देशांतील त्या काळच्या परिस्थितीबद्दल विश्वसनीय माहिती असल्यास नवल नाही.

दण्डीच्या कथेवरून असें, स्पष्ट दिसतें की उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत पसरलेलें विशाल वाकाटक साम्राज्य हरिषेणाच्या

१ 'अवन्तिसुन्दरीकथे'मध्ये दण्डीचा पणजा संस्कृत कवि दामोदर हा अचलपुरीं राहत होता असें म्हटलें आहे. हें अचलपुर विदर्भांतील असावें.

पुत्राच्या नादानीमुळे आणि सामन्तांच्या फितुरीमुळे एकाएकीं कोलमडून पडलें. दण्डीची कथा अपूर्ण राहिल्यामुळे हरिषेणाच्या नातवाला शेवटीं विदर्भाचें राज्य परत मिळालें किंवा नाही, तें कळत नाही. कदाचित् तें विष्णुकुंडिवंशी प्रथम माधववर्म्याच्या साहाय्याने त्याला मिळालें असेल; कारण हा आन्ध्र राजा हरिषेणाचा नातलग होता.[१] त्याने अकरा अश्वमेध व अनेक श्रौत याग केले होते, असें तत्कालीन कोरीव लेखांत वर्णन आहे. तेव्हा तो अत्यंत बलाढ्य होता यांत संशय नाही. या राजाच्या मदतीने वाकाटक राजपुत्राला आपलें पैतृक राज्य मिळालें असलें तरी तें त्याच्या किंवा त्याच्या पुत्राच्या हातीं पुष्कळ काळ राहिलें असण्याचा संभव नाही. कारण मागे सांगितल्याप्रमाणे कलचुरिवंशी कृष्णराजाने माहिष्मतीस आपली सत्ता दृढ करून सन ५५० च्या सुमारास उत्तर महाराष्ट्र व विदर्भ हे देशहि आपल्या राज्यास जोडले. सोमवंशी, गंग व विष्णुकुंडि नृपतींनी पूर्वेकडील कोसल, कलिंग व आन्ध्र देशांत आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. दक्षिणेंत कुन्तलाधिपति राष्ट्रकूटहि हळूहळू प्रबळ होऊं लागले. अशा रीतीने सुमारे तीनशें वर्षांच्या उज्ज्वल शासनानंतर सन ५५० च्या सुमारास वाकाटकांचा वंश नामशेष झाला.

---

१ चिक्कुल्ल ताम्रपटांतील 'विष्णुकुंडिवाकाटकवंशद्वयालङ्कृतजन्मनः' हें या माधववर्म्याचें वर्णन पाहा. ए. इं., पु. ४, पृ. १९६.

२. राज्यशासन

वाकाटकांच्या नन्दिवर्धन व वत्सगुल्म या दोन शाखांच्या खास अमलाखालील प्रदेश उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पश्चिमेस ऋषीकाच्या (खानदेशाच्या) पूर्व सीमेपासून पूर्वेस दक्षिण कोसलाच्या (छत्तीसगडाच्या) पश्चिम सीमेपर्यंत पसरला होता. या विस्तृत प्रदेशाचे 'राष्ट्र' किंवा 'राज्य' या नांवाचे विभाग पाडले होते. त्यांपैकी कांहींचा उल्लेख कोरीव लेखांत येतो. उदाहरणार्थ, बेलोरा ताम्रपटांत पाक्कण राष्ट्राचा,[१] चम्मक ताम्रपटांत भोजकट राज्याचा[२] आणि दुदिया ताम्रपटांत आरम्भि राज्याचा[३] निर्देश आहे. तत्कालीन मांडलिकांचीं राज्यें सामान्यतः लहान असल्याने त्यांचे विभाग त्या त्या दिशांवरून उल्लेखिले जात. उदाहरणाथ, पांडववंशी भरतबलाच्या बम्हनी ताम्रपटांत उत्तर राष्ट्राचा[४] आणि महाजयराजाच्या आरंग ताम्रपटांत,[५] तसेंच महासुदेवराजाच्या रायपूर ताम्रपटांत पूर्वराष्ट्राचा[६] उल्लेख आहे. वाकाटकांच्या ताम्रपटांत मात्र या तऱ्हेचे विभाग आढळत नाहीत. या 'राष्ट्रां'चे किंवा 'राज्यां'चे सध्याच्या जिल्ह्यांप्रमाणे पोटविभाग असत. त्यांना 'विषय' अशी संज्ञा असे. उदाहरणार्थ, मेकला देशाच्या उत्तर-राष्ट्र नामक विभागांत असलेल्या पञ्चगर्ता विषयाचा उल्लेख बम्हनी ताम्रपटांत[७] आला आहे. विषयांच्या नांवांच्या शेवटीं सामान्यतः 'कट'

---

१ क्रमांक ५, ओ. १३.
२ क्रमांक ६, ओ. १८.
३ क्रमांक १०, ओ, १३.
४ क्रमांक १८, ओ. ३४.
५ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. १९३.
६ पूर्वोक्त, पृ. १९८.
७ क्रमांक १८, ओ. ३४–३५.

किंवा ‘ कटक ’ हा शब्द दिसतो. उदाहरणार्थ, भोजकट[1] (अमरावती जिल्हा), बेन्नाकट[2] (भंडारा व बालाघाट जिल्हा), नाङ्गरकटक,[3] आणि नान्दीकट[4] (नांदेड) हीं विषयनामें पहा. एखादा विषय फार मोठा असल्यास त्याचे दिशांस अनुलक्षून लहान लहान भाग पाडले जात. तिरोडी ताम्रपटांत बेन्नाकटच्या अपरपट्टाचा[5] (पश्चिम भागाचा) उल्लेख आहे. विषयांचेहि ‘ आहार आणि ‘ भोग ’ किंवा ‘ भुक्ति ’ असे लहान विभाग असत. वाकाटक ताम्रपटांत सुप्रतिष्ठाहार या एकत्र ‘ आहारा ’चा उल्लेख आहे[6] त्यांमध्ये सध्याच्या हिंगणघाट, वरोडा व यवतमाळ तहसिलींचा कांही भाग मोडत होता. आहार आणि भोग किंवा भुक्ति यांचा परस्पर संबंध कसा होता हें ठरविण्यास वाकाटकांच्या लेखांत साधन नाही. वाकाटकांच्या ताम्रपटांत बेण्णाकार्पर-भोग,[7] लोहनगरभोग[8] व हिरण्यपुरभोग[9] अशा तीन भोगांचा व असिभुक्ति[10] या एकाच भुक्तीचा उल्लेख आहे. कांही लेखांत ‘ मार्ग ’ नामक विभागाचा उल्लेख आढळतो. हा विभाग ‘ विषया ’पेक्षा लहान आणि ‘भुक्ती’पेक्षा मोठा असे.[11] भोग किंवा भुक्ति विभागांत

१ भोजकट नांवाचें नगर कृष्णाचा मेहुणा रुक्मी याने स्थापिलें, असें हरिवंशांत (विष्णुपर्व, ६०, श्लो. ३२) म्हटलें आहे.

२ क्रमांक ११, ओ. १३. ३ क्रमांक २३, ओ. २.

४ क्रमांक २२, ओ. ५. ५ क्रमांक ११, ओ. १३.

६ क्रमांक २, ओ. १०; क्रमांक ३, ओ. १७; क्रमांक १२, ओ. १७.

७ क्रमांक ७, ओ. १७–१८.

८ क्रमांक १३, ओ. २०. ९ क्रमांक १०, ओ. १६.

१० क्रमांक ४, ओ. १३; क्रमांक ५, ओ. १३.

११ प्राचीन काळीं ‘ पथका ’ प्रमाणे ‘ मार्ग ’ याचा अर्थ भूविभाग असाहि असे, हें अनेक लेखांवरून दिसतें. उदाहरणार्थ, शरभपुरीय

(पुढे चालू)

नगरें, उपनगरें व गावें असत. नगरांच्या व उपनगरांच्या शेवटीं पुर, किंवा नगर असा शब्द असे. उदाहरणार्थ, अश्वत्थनगर, हिरण्यपुर, चन्द्रपुर हीं नांवें पहा. नवीन नगरांचीं नांवें बहुधा तीं वसविणाऱ्यांच्या नांवांवरून ठेवलीं जात. उदाहरणार्थ, द्वितीय प्रवरसेनाने वसविलेल्या नगराचें प्रवरपुर हें नांव पाहा. गावांच्या नावाच्या शेवटीं 'ग्राम' (उदाहरणार्थ, दङ्गुणग्राम, शीर्षग्राम, मण्डुकिग्राम), 'खेट' किंवा 'खेटक' (जसें वरदाखेट, अश्वत्थखेटक), 'वाटक' (जसें बोंथिक-वाटक, पवरज्जवाटक इ.) आणि 'वीरक' (जसे, करज्जवीरक, दर्भ-वीरक, इ.) यांपैकी एखादा शब्द असे. कांही विभागांचीं नांवें त्यांत असलेल्या गावांच्या संख्येवरून पडलीं होतीं. उदाहरणार्थ, प्रवरेश्वरषड्-विंशतिवाटक[1] हें नांव पहा. प्रथम प्रवरसेनाने आपल्या नांवें प्रवरेश्वर

(मागील पानावरून पुढे चालू)
राजांच्या एका ताम्रपटांतील 'सुन्दरामार्गीय' हा उल्लेख घ्या. ह्या राजांच्या ताम्रपटांत भूविभागदर्शक तद्धित रूपांचा (उ. विषयीय, भोगीय इ.) उल्लेख आढळतो. त्यासारख्या 'मार्गीय' या उल्लेखा-वरून 'मार्ग' याचा अर्थ 'भूविभाग' असा स्पष्ट दिसतो. वाकाटकांच्या लेखांत असे अनेक मार्ग उल्लेखिले आहेत. उदाहरणार्थ, बेलोरा ताम्रपटांतील (क्र. ४ व ५, ओ. १३) शैलपुरमार्ग, ऋद्धपुर ताम्रपटांतील (क्र. ८, ओ. १२) कौशिकमार्ग, इंदूर ताम्रपटांतील (क्र. ९, ओ. ८) गेपुरमार्ग, पट्टन ताम्रपटांतील (क्र. १३, ओ. २०) वरदाखेटमार्ग, पाटणा संग्रहालय ताम्रपटांतील (क्र. १४, ओ. २ व ६) सुन्धातिमार्ग व यशपुरमार्ग, वाशीम ताम्रपटांतील (क्र. २२, ओ. ५) नान्दीकटांत अन्तर्भूत असलेला उत्तरमार्ग आणि इंडिया ऑफीस ताम्रपटांतील (क्र. २३, ओ. १) नांगरकटांत असलेला उत्तर-मार्ग हे पाहा.

१ क्रमांक ५, १४.

नामक शिवालय जेथे बांधलें होतें त्या विभागाला हें नांव दिलें होतें.

सातवाहनांच्या काळीं भौगोलिक नांवें प्राकृतांत होतीं. वाकाटकांनी आपल्या कोरीव लेखांकरिता संस्कृतचा उपयोग केला असल्याने त्यांतील नांवें त्या भाषेंत आहेत. अजंट्याचीं लेणीं जिच्यामध्ये आहेत त्या सातमाला पर्वतराजीला 'सह्यपाद' असें अजंट्याच्या लेखांत[१] म्हटलें आहे. कांही नद्यांचीं त्या काळचीं नांवें आता पूर्णपणें बदललीं आहेत. उदाहरणार्थ, जांब ताम्रपटांत ज्या नदीचें 'उमा' असें नांव आलें आहे[२] तिला आता वन्ना म्हणतात. त्याप्रमाणेंच चर्म्माङ्क (हल्लीचें चम्मक) गाव ज्या नदीच्या तीरावर होतें तिला पूर्वी 'मधुनदी' असें नांव होतें,[३] पण तिला आता चन्द्रभागा म्हणतात. कांही नद्यांचीं पूर्वीचीं नांवें सध्या थोडीं बहुत बदललीं असलीं तरी ओळखतां येतात. उदाहरणार्थ पूर्वीची 'बेण्णा'[४] ही सध्याची वाइनगंगा, व पूर्वीची 'हिरण्या'[५] ही सध्याची इरई होय.

वाकाटकांच्या काळीं इतर देशांतल्या प्रमाणे विदर्भांतहि राजसत्ताक पद्धति प्रचलित होती. राजाच्या हातीं मुख्य सत्ता असे पण त्या सत्तेलाँ स्मृतींतील नियमांचें नियंत्रण असे. वाकाटकांच्या लेखांत मंत्रिपरिषदेचा कोठेहि उल्लेख नाही. तेव्हा लोकसभेचा नाही हें सांगणें नकोच. तथापि तत्कालीन राजांचा कारभार केवळ स्वेच्छेनुसार किंवा जुलमी होता असें नाही. धर्मशास्त्रांनी व अर्थशास्त्रांनी भारतीय राजांना लोककल्याणकारी राज्याचें ध्येय सदैव उपदेशिलें होतें. कालिदासादि संस्कृत कवींनी आपल्या काव्यनाटकादि ग्रंथांत त्याचाच पुरस्कार केला.

---

१ पाहा—'नित्यं वितानार्थधिया वहद्भिरम्भोधरैः श्रीसति सह्यपादे', क्रमांक २६, ओ. २३.

२ क्रमांक ३, ओ. १७. ३ क्रमांक ६, ओ. १८.

४ क्रमांक ११, ओ. १३. ५ क्रमांक १२, ओ. १.

आहे.[1] वाकाटकांनी हें ध्येय कृतींत आणण्याचा प्रयत्न केला होता, असें दिसतें. सर्व राजांच्या शासनाविषयी आपणांस माहिती नाही, पण प्रथम पृथिवीषेणाचें जें वर्णन अनेक ताम्रपटांत आढळतें तें सामान्यतः तत्कालीन शासनपद्धतीचें सूचक असावें. हा पृथिवीषेण शौर्य, बुद्धिमत्त्व, राजनीतिनैपुण्य या बाबतींतच नव्हे तर सत्यवादित्व, ऋजुत्व, दयाशीलत्व या गुणांमुळेहि प्रसिद्धीस आला होता. आपण स्वतः धर्मविजयी आहों याचा त्याला यथार्थ अभिमान होता.[2] याचा अर्थ असा की त्याने कधीहि लोभाने किंवा बलात्काराने परराज्यापहरण केलें नव्हतें. तो योग्य जनांचा आदर करीत असे आणि अजातशत्रु युधिष्ठिराप्रमाणें त्याचें वर्तन असे. द्वितीय प्रवरसेनाने आपल्या उत्कृष्ट राज्यशासनाने प्रजेला आपण कृतयुगांत राहत आहों असें भासविलें होतें.[3] इतर राजांच्या शासनाविषयी कोरीव लेखांतून माहिती मिळत नाही, पण विरुद्ध पुराव्याच्या अभावीं त्यांनीहि हेंच ध्येय आपणांपुढे ठवलें होतें असें म्हणण्यास हरकत नाही. वाकाटक नृपति हरिषेण याचें वर्णन त्याच्या एका मांडलिकाच्या लेखांत 'प्रजेचा हितकारी' असें केलें आहे.[4] वाका-

---

१ उदाहरणार्थ, रघुवंशांतील खालील श्लोक पाहा--

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ।
स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥

(सर्ग १, श्लो. २४).

२ क्रमांक ४, ओ. ८. प्रथम प्रवरसेन आणि त्याचे कांही वंशज यांनी आपल्या धार्मिकत्वाची आणि वैदिक धर्मानुयायित्वाची निदर्शक अशी 'धर्ममहाराज' ही पदवीं धारण केली होती.

३ पाहा-- 'शम्भोः प्रसादधृतकार्त्तयुगस्य. . .प्रवरसेनस्य' क्रमांक ३, ओ. ११-१२.

४ पाहा 'हरिषेणे हितकारिणि प्रजानाम्' क्रमांक २६, ओ. २१.

टक राजांचे सचिवहि याच उद्देशाने प्रेरित झालेले दिसतात. देवसेनाचा सचिव हस्तिभोज याविषयी अजंटा लेखांत म्हटलें आहे की प्रजेच्या हिताची इच्छा त्याच्या मनांत सदैव असल्यामुळे व आणि तो तिचें पालन उत्तम रीतीने करीत असल्यामुळें तो सर्व लोकांना त्यांच्या मातापित्याप्रमाणें प्रिय झाला होता आणि त्यांना त्याच्याकडे केव्हाहि निःसंकोचपणें जातां येत असे.

उत्तर भारतांत त्या काळीं कुशाण व गुप्त राजांनी[1] शाहानुशाही, परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर, यांसारख्या अत्युच्च पदव्या धारण केल्या होत्या, पण वाकाटक राजे स्वतंत्र असूनहि त्यांनी राजन् किंवा महाराज या पदवीपेक्षा उच्चतर पदवीचा अभिलाष धरला नाही.[2] तसेंच त्यांनी आपण देवाचे अवतार आहों असेंहि कधी म्हटलें नाही. आपणांस आपल्या इष्ट देवतेच्या कृपाप्रसादाने राज्यलक्ष्मी प्राप्त झाली अशी त्यांची श्रद्धा होती. उदाहरणार्थ, द्वितीय रुद्रसेनाविषयी म्हटलें आहे की त्याला त्याचें ऐश्वर्य भगवान् चक्रपाणीच्या (विष्णूच्या) प्रसादाने प्राप्त झालें होतें.[3] द्वितीय प्रवरसेनाच्या एका

---

१ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ८.

२ वाकाटक ताम्रपटांत द्वितीय चंद्रगुप्ताला 'महाराजाधिराज' आणि तत्कालीन वाकाटक नृपतीला 'महाराज' ही पदवी लावली आहे. त्यांवरून ते गुप्तांचे मांडलिक असावे असा कांहींनी तर्क केला आहे, पण तो बरोबर नाही; कारण समुद्रगुप्त व चंद्रगुप्त यांच्या उदयापूर्वीहि वत्सगुल्म शाखेच्या नृपतींनी 'महाराज' हीच पदवी धारण केली होती. त्या वेळीं गुप्तांच्या वर्चस्वाचा प्रश्नच नव्हता. प्रथम प्रवरसेनाने मात्र वाजपेय यज्ञ केल्यावर सम्राट् पदवी घेतली होती.

३ पाहा—'भगवतश्चक्रपाणेः प्रसादोपार्जितश्रीसमुदयस्य' क्रमांक ३, ओ. १३.

ताम्रपटांत सांगितलें आहे कीं भगवान् शंकराच्या प्रसादाने त्याला शूलायुध मिळालें होतें.[१] मेकला देशाचे पांडववंशी नृपति ह्यांचा पूर्वी गुप्तसम्राटांशीं संबंध आला असल्यामुळें गुप्तांप्रमाणे त्यांनीहि मोठमोठ्या पदव्या धारण केल्या होत्या. उदाहरणार्थ, भरतबल याने आपल्या ताम्रपटांत स्वतःचें ' परमगुरुदेवताधिदैवतविशेष ' (अत्यंत सन्माननीय देवता व परमदेवता) असें वर्णन केलें आहे.[२] या भरतबलाची राणी लोकप्रकाशा हिचें ' अमरजकुलजा ' (दैवी कुळांत जन्म पावलेली) असें वर्णन केलें आहे.[३] वाकाटकांनी आपल्या कोरीव लेखांत कोठेंहि एखाद्या सुप्रसिद्ध पौराणिक वंशाशीं आपला संबंध जोडलेला दिसत नाही उलट ते आपणांस इतर दाक्षिणात्य नृपतीप्रमाणे 'हारितीपुत्र' म्हणवत. पण त्यांचे मेकलादेशाधिपति मांडलिक आपण सोमवंशी पांडवकुलांत जन्मलों असें दिमाखाने सांगत. महाकान्तारचे (बस्तर जिल्ह्याचे) तत्कालीन राजेहि आपण नलवंशी आहों असे सांगण्यांत भूषण मानीत.[४]

वाकाटकांच्या दानपत्रांत तीन प्रकारांच्या मांडलिकांचा उल्लेख आहे : (१) सम्राटाने आपणांस जिंकण्याचा निश्चय केला आहे असें समजल्याबरोबर ज्यांनी त्याचें वर्चस्व स्वीकारलें ते; (२) सम्राटाने ज्यांच्यावर चाल केली असतां शरण आले ते; आणि (३) ज्यांना सम्राटाने शौर्याने जिंकलें असे.[५] उत्तर भारतांतल्या गुप्त साम्राज्यातल्यापेक्षा वाकाटकांच्या साम्राज्यांत मांडलिकांवर कमी बंधनें होतीं, असें दिसतें; कारण त्यांच्या कोरीव लेखांत सम्राटाचा नामोल्लेखहि

---

१ पाहा–'शम्भोःप्रसादधृतशूलायुधस्य', क्रमांक १४, ओ. १.
२ क्रमांक १८, ओ. ९ व १४.
३ क्रमांक १८, ओ. १९.
४ ए. इं, पु. १९, पृ. १०२.
५ क्रमांक ८, ओ. २६–२७.

आढळत नाही.[१] मात्र त्यांना सम्राटाला करभार द्यावा लागत असावा. तसेंच सम्राटाने कोणावर युद्ध पुकारलें किंवा साहाय्याकरितां बोलाविलें तर सैन्यासह यावें लागे, असें दिसतें.[२]

वाकाटकांच्या शासनपद्धतीविषयी आपणांस फारशी माहिती मिळत नाही. गुप्तांच्या दानपत्रांत व ताम्रपटांच्या मुद्रांवरील लेखांत त्यांच्या राण्यांचा निर्देश आढळतो, तसा वाकाटकांच्या दानपत्रांत आढळत नाही. याला अपवाद फक्त दोनच राण्यांचे आहेत—द्वितीय रुद्रसेनाची अग्रमहिषी प्रभावतीगुप्ता[३] व नरेन्द्रसेनाची राज्ञी अज्झितभट्टारिका.[४] यांपैकी पहिली मोठी कर्तबगार स्त्री असून तिने आपला अज्ञान मुलगा दिवाकरसेन याच्या नांवें निदान तेरा वर्षें राज्यकारभार पाहिला होता. इतर राण्यांनी कधी राज्यशासनांत भाग घेतला होता, असें दिसत नाही. युवराज आपल्या पित्यास राज्यकारभारांत मदत करीत असावा, पण त्याचाहि उल्लेख कोरीव लेखांत येत नाही.[५]

राज्यकारभाराकरिता अनेक मंत्र्यांचें व अधिकाऱ्यांचें साहाय्य लागत असावें, पण त्यांपैकी फारच थोडयांचा उल्लेख कोरीव लेखांत येतो.

---

१ क्रमांक २५, ओ. २१ मध्ये वाकाटक सम्राटाचा स्पष्ट निर्देश आला आहे. क्रमांक १८, ओ. ३२—३४ मध्ये त्याचें नांव श्लेषाने सूचित केलें आहे. शरभपुरीय राजे बहुधा वाकाटकांचे मांडलिक होते, पण त्यांच्या लेखांत वाकाटक सम्राटांचा नामनिर्देश येत नाही.

२ 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत विदर्भावर परकी राजाने स्वारी केली तेव्हा विदर्भाचे सामन्त आपल्या सम्राटाच्या साहाय्यार्थ जमा झाल्याचें वर्णन आहे.

३ क्रमांक २, ओ. ९.

४ क्रमांक १७, ओळ ३१.

५ नलनृपति भवदत्तवर्म्याचा ऋद्धपुर ताम्रपट त्याच्या अर्थपति नामक पुत्राने दिला होता. हा त्या वेळीं युवराज असावा.

'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत वाकाटककालीन परिस्थिति वर्णिली आहे. त्यामध्ये मंत्री (सल्लामसलत देणारा) व अध्यक्ष (भिन्न भिन्न खात्यांचे मुख्य) यांचा उल्लेख आहे, पण ते कोरीव लेखांत आढळत नाहीत. अजंठ्याच्या क्रमांक १६ च्या लेण्यांतील लेखांत सचिवाचा निर्देश आहे.[१] देशाचे राष्ट्र किंवा राज्य या नांवाचे मोठे विभाग होते, त्यांवरील मुख्यास 'राज्याधिकृत' म्हणत. तिरोडी ताम्रपटांत उल्लेखिलेला चमिदास हा राज्याधिकृत होता.[२] वाकाटकांच्या बहुतेक दानपत्रांत सर्वाध्यक्षाचा उल्लेख आढळतो.[३] हा तत्कालीन सचिवालयाचा (सेक्रेटरीयटचा) मुख्य असून त्याला कुलपुत्र नामक खालचे अधिकारी नेमण्याचा व त्यांना राजाज्ञा कार्यान्वित करण्याकरिता जरूर ते आदेश देण्याचा अधिकार असे.[४] कुलपुत्रांकडे अनेक कामें असत. त्यांचें मुख्य काम राज्यांत शांतता व सुव्यवस्था राखणें, हें असे. याकरितां त्यांच्या हाताखाली भट व छात्र दिले असत.[५] भट म्हणजे सैनिक आणि छात्र म्हणजे पोलिस शिपाई. कांही लेखांत 'छात्र' बद्दल चाट ही संज्ञा योजिली आहे. हे कुलपुत्र, भट व छात्र, अलीकडील तहसीलदारांप्रमाणे, आपापल्या विभागांत दौरा करून जमीनमहसूल व राज्याचे इतर कर वसूल करीत असत. त्यांना उघडकीस आलेलें भूमिगत द्रव्य जप्त करण्याचा, मिठाच्या व इतर खाणी चालविण्याची व्यवस्था करण्याचा व राज्याच्या कामाकरिता वेठबिगार धरण्याचा हक्क असे.[६] आपापल्या विभागांत राज्याच्या कामाकरिता ते दौरा करीत असतां त्यांच्या राहण्याचा व जेवणाचा खर्च गावकऱ्यांस करावा लागे. त्यामुळे

---

१ क्रमांक २४, ओ. १५. ३ क्रमांक ३, ओ. २० पाहा.
२ क्रमांक ११, ओ. ३३. ४ पूर्वोक्त संदर्भ पाहा.
५ पाहा—' आज्ञासञ्चारिकुलपुत्राधिकृता भटाश्छात्राश्च ' क्रमांक ३, ओ. २१.
६ क्रमांक ३, ओ. २६.

गावकऱ्यांस अनेकदा बराच त्रास व खर्च सहन करावा लागे. म्हणून जेव्हा राजेलोक ब्राह्मणांना अग्रहार म्हणून गाव किंवा जमिनी देत तेव्हा कुलपुत्रादिकांना त्यांच्याकडून वरील बाबींकरितां द्रव्य घेण्यास किंवा त्यांच्या अग्रहारांत प्रवेश करण्यास मनाई असे. मात्र त्या अग्रहारांत शिरलेल्या कोणा मनुष्यास राजद्रोह, ब्रह्महत्या, चोरी, परदाराभिमर्श यांसारख्या गुन्ह्यांबद्दल अटक करावयाची असेल तर भट व छात्र (किंवा चाट) यांस अग्रहारांत प्रवेश करण्यास बंदी नसे.[1] ज्यास अग्रहार दिला आहे तो ब्राह्मण जोंपर्यंत राजद्रोहाचें कृत्य करीत नसे किंवा इतर गावच्या लोकांविरुद्ध कांही गुन्हा करीत नसे तोंपर्यंत भट व छात्र यांच्या कडून त्रास होण्याची त्याला मुळीच भीति नसे. या कारणास्तव कुलपुत्र, भट व छात्र यांस प्रत्येक दानपत्राची माहिती देणें अवश्य असे.

वाकाटकांच्या काळीं रज्जुक नामक आणखी एक अधिकारी होता. त्याचें नांव फक्त एकाच ताम्रपटांत आलें आहे.[2] 'रज्जुक' हा शब्द 'रज्जू' दोरी, यापासून बनला आहे. तेव्हा हा अधिकारी आरंभीं जमिनीचें मोजमाप करून त्यावरील सारा ठरविण्याचें काम करीत असावा. अशोकाच्या शासनलेखांत रज्जुकांचा निर्देश आढळतो. मौर्य-काळीं हे रज्जुक मोठे राज्याधिकारी असून त्यांचा अधिकार लाखों लोकां-वर चालत असे. त्यांना योग्य वाटे त्याप्रमाणें लोकांच्या निग्रहानुग्रहाचा त्यांस अधिकार असे. कालान्तराने त्यांचा अधिकार कमी झाला असावा, कारण वाकाटकांच्या ताम्रपटांत उल्लेखिलेला रज्जुक हा एक लेखक होता. बम्हनी ताम्रपटांत 'राहसिक' नामक अधिकाऱ्याचा निर्देश आहे.[3] तो राजाचा खास चिटणीस किंवा गुप्त पत्रादिकांचा लेखक दिसतो.

---

१ पाहा—'राज्ञां सप्ताङ्गे राज्ये अद्रोहप्रवृत्तानां अब्रह्मघ्न-चौरपारदारिकराजापथ्यकारिप्रभृतीनां सङ्ग्राममकुर्व्वतां अन्यग्रामेष्वनपराद्धानां आचन्द्रादित्यकालीयः।' क्रमांक ६, ओ. ४०–४३.

२ क्रमांक ९, ओ. ३४. ३ क्रमांक १८, ओ. ४८ पाहा.

वाकाटककालीन कोरीव लेखांत उल्लेखिलेले मुख्य लष्करी व पोलीस अधिकारी म्हणजे सेनापति[1] व दण्डनायक हे होत. बहुतेक सर्व दानपत्रांत सेनापतीचा उल्लेख आढळतो. कारण तीं त्याच्या कचेरींत लिहिलीं जात[2]. वाकाटक राजांप्रमाणे त्यांच्या लष्करी अधिकाऱ्याचीहि पदवी साधी होती. उत्तर भारतांत गुप्तांनी आपल्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांच्या करिता कुमारामात्य, सान्धिविग्रहिक, महादण्डनायक यासारख्या मोठमोठ्या अधिकारसंज्ञा उपयोगांत आणल्या[3], पण वाकाटकांनी पूर्वींच्याच साध्या संज्ञा चालू ठेवल्या. अधिकाऱ्यांच्या बदल्या वरचेवर होत असाव्या. कारण द्वितीय प्रवरसेनाच्या राजवटींत सेनापतिपदावर निरनिराळे पुरुष भिन्न भिन्न काळीं होते, तसेंच तोच पुरुष त्या पदावर भिन्न भिन्न वर्षीं होता. उदाहरणार्थ, चित्रवर्मा हा प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या अकराव्या व तेराव्या वर्षीं,[4] चप्प हा अठराव्या व पंचविसाव्या वर्षीं,[5] नमिदास व चमिदास तेवीसाव्या वर्षीं[6] आणि कात्यायन सत्ताविसाव्या[7] वर्षीं सेनापतिपदावर होते. कधी कधी राजा स्वतः दानपत्राची आज्ञा सेनापतीस देत असे तेव्हा 'आज्ञा स्वयम्' असे शब्द दानपत्राच्या शेवटीं लिहिले जात. इतर वेळीं जो राजाज्ञा सेनापतीच्या कचेरींत कळवी त्यास दूतक

१ उदाहरणार्थ, क्रमांक ५, ओ. ३० पाहा.

२ याज्ञवल्क्यस्मृति, अध्याय २, श्लो. ३१९–३२०, या श्लोकांवरील मिताक्षरेंत उद्धृत केलेल्या एका स्मृतिवचनांत म्हटलें आहे की, दानपत्र सन्धिविग्रहकारी किंवा परराष्ट्रमंत्री याने लिहावें.

३ कॉ. इ. इं., पु. ३, पृ. १०.

४ क्रमांक ५, ओ. ३०; क्रमांक ६, ओ. ६०.

५ क्रमांक ७, ओ. ३५ आणि क्रमांक १२, ओ. ४२.

६ क्रमांक १०, ओ. २८, आणि क्रमांक ११, ओ. ३३.

७ क्रमांक १३, ओ. २४.

किंवा आज्ञप्ति अशी संज्ञा असे.[1] एका ताम्रपटांत ज्यांनी राजशासन ताम्रपटावर कोरवून तयार करविलें त्यांचींहि नांवें दिलीं आहेत.[2] कधी कधी जो सोनार ताम्रपट कोरी त्याचेंहि नांव शेवटी लिहिलें जाई.[3]

ब्रम्हनी ताम्रपटांत कांही ग्रामाधिकाऱ्यांचा उल्लेख आला आहे.[4] 'ग्रामकूट' हा सध्याच्या पाटलाप्रमाणे गावांतील मुख्य अधिकारी होय. 'द्रोणाग्रनायक' हा दान दिलेलें गाव ज्यांत अन्तर्भूत असे त्या द्रोणाग्राचा (किंवा द्रोणमुखाचा) प्रमुख असावा,[5] कारण यालाहि दानपत्राची माहिती दिली जात असे. याशिवाय ब्रह्मनी ताम्रपटांत 'देववारिक' नामक अधिकाऱ्याचा निर्देश आहे. हा व 'दौवारिक' एकच असावेत. दौवारिक किंवा प्रतीहार हा गावांतील पोलिस ठाण्याचा मुख्य असून ग्रामकूटाला जमीनमहसूल व कर वसूल करण्यांत व गावांत शांतता व सुव्यवस्था राखण्यांत मदत करीत असावा.[6] 'गण्डक' हे इतर ताम्रपटांतल्या भटांप्रमाणे सैनिक असावे. हे अधिकारी गावांत शांतता राखून करवसूली करीत असें दिसतें.

आयस्थानें--वाकाटकांच्या कोरीव लेखांत कांही आयस्थानांचा निर्देश आहे. राज्याचें मुख्य उत्पन्न जमीन महसूल व प्रत्यक्ष कर

---

१ सामन्तवर्म्याच्या पोन्नुटूरु ताम्रपटांत 'दूतका'च्या बद्दल 'राजाज्ञाप्रद' शब्दाचा उपयोग केला आहे.

२ क्रमांक १३, ओ. ४६–४७.

३ क्रमांक १३, ओ. ४५–४६; क्रमांक १८, ओ. १९.

४ क्रमांक १८, ओ. ३५.

५ कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत (शामशास्त्रीसंपादित द्वितीयावृत्ति, पृ. ४६) 'चतुःशतग्राम्या द्रोणमुखम्' द्रोणमुख म्हणजे ४०० ग्रामांतील मुख्य ठिकाण, असें म्हटलें आहे.

६ दौवारिक याचा समानार्थक प्रतीहार हा शब्द या अर्थी 'शुक्रनीतिसारां'त (२, १२०–२१; १७०–७५) योजिला आहे.

यांपासूनच होत असलें पाहिजे. त्यांना 'क्लृप्त' व 'उपक्लृप्त' अशा संज्ञा वाकाटक ताम्रपटांत लावल्या आहेत. क्लृप्त किंवा निश्चित कर याचा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत आला आहे.[१] त्याचा अर्थ जमिनीचा सारा असा असावा. उपक्लृप्त म्हणजे मनुस्मृति ७, १३१-१३२ या श्लोकांत सांगितलेले विविध प्रकारचे किरकोळ कर असावे.[२] एका ताम्रपटांत[३] 'सपञ्चाशत्कः' (पन्नासाव्या भागासहित) अशी संज्ञा योजिली आहे. तिचा अर्थ मनुस्मृतीच्या (अ. ७, श्लो. १३०) 'पञ्चाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः' या पंक्तीच्या साहाय्याने लावला पाहिजे. गावांत पशूच्या विक्रीने प्राप्त झालेल्या धनावर तसेंच इतर रीतीने मिळालेल्या रोख पैशांवर हल्लीच्या प्राप्ति-करासारखा हा शेकडा दोन टक्के कर द्यावा लागे असें दिसतें. याशिवाय गुप्त धन किंवा निक्षेप उघडकीस आल्यावर त्याच्यावर राजाचा हक्क असे. मिठाच्या खाणींचें उत्पन्न सरकारच्या मालकीचें असे. बुलढाणा जिल्ह्यांत लोणार येथे व इतरत्रहि मिठाच्या खाणी कांही दिवसांपूर्वी-पर्यंत चालू होत्या. दारु गाळण्याचा अधिकार राजाकडे असे. याशिवाय अनेक किरकोळ कर असत. ते वाकाटक दानपत्रांत 'पुष्पक्षीरसन्दोह' या शब्दांनी सूचित केले आहेत.[४] मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायांतील ११८ व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे हे कर ग्रामाधिकारी वसूल करी

---

१ अर्थशास्त्र, पृ. ६०.

२ पाहा— 'आददीताथ षड्भागं द्रुमांसमधुसर्पिषाम् ।
गन्धौषधिरसानां च पुष्पमूलफलस्य च ॥
पत्रशाकतृणानां च चर्मणां वैदलस्य च ।
मृन्मयानां च भाण्डानां सर्वस्याश्ममयस्य च ॥'
मनु. ७, १३१-१३२.

३ क्रमांक १४, ओ. १०.

४ उदाहरणार्थ, क्रमांक ५, ओ. २० पाहा.

व स्वतःचा पगार म्हणून ते घेत असे. याखेरीज सार्वजनिक कामांकरिता लोकांना वेठीने कामास लावण्याचा अधिकार राजाकडे असे. मागे सांगितल्याप्रमाणे राजाचे अधिकारी व शिपाई दौऱ्यावर असत तेव्हा त्यांच्या घोडयांना व बैलांना वैरण पुरविणें, त्यांच्या आसनाकरिता चामडीं देणें, व त्यांच्या सैपाकाकरिता जळणाची तजवीज करणें याबद्दल गावकरी लोक जबाबदार असत.[1] अग्रहार गावांत मात्र हे कर वगैरे राजास द्यावे लागत नसत. ते अग्रहाराच्या मालकास मिळत.

तत्कालीन इतर राजवंशांप्रमाणे वाकाटक वंशांत कधी गृहकलह झाल्याचें नमूद नाही. वाकाटकांचें राज्यशासन कार्यक्षम असून त्यायोगें प्रजाजनांस समृद्धि, शांतता व सुव्यवस्था यांचा लाभ झाला होता, असें दिसतें. अजंटयाच्या सोळा क्रमांकाच्या लेखांत म्हटल्याप्रमाणे वाकाटकांचे सचिव हे आपल्या उत्कृष्ट शासनाच्या योगें प्रजाजनांना त्यांचे मातापिता व मित्र यासारखे वाटूं लागले.[2] त्यांनी देशाचा राज्यकारभार न्यायाने चालविला व आपल्या गुणांनी, पुण्योपार्जनाने आणि कीर्तीने स्वतःस उज्ज्वल केलें. रघुवंशांत विदर्भ देशाची ‘सौराज्यरम्य’[3] व विदर्भराजधानीचें ‘समृद्ध’ असें वणन करताना[4] कविकुलगुरु कालिदास स्वकालीन वाकाटकनृपतींच्या उत्कृष्ट राज्यशासनाची प्रशंसा करीत होता, असें वाटल्याशिवाय राहत नाही.

---

१ पूर्वोक्त ओ. २०–२१.

२ पाहा—‘तथैव लोकस्य हिताशयत्वात्सुखेन सम्यक्परिपालनेन । पितेव मातेव सखेव नित्यं प्रियोभिगम्यश्च बभूव सत्यम् ॥’ क्रमांक २४, ओ. १२.

३ पाहा— ‘सौराज्यरम्यानपरो विदर्भान्’, रघुवंश, सर्ग ५, श्लो. ६०.

४ ‘ऋद्धां विदर्भाधिपराजधानीम्’ रघुवंश, सर्ग ५, श्लो. ४०.

३. सामाजिक परिस्थिति

वाकाटकांच्या कोरीव लेखांवरून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर फारसा प्रकाश पडत नाही. त्या काळींहि हिंदू समाजांत वर्णव्यवस्था प्रचलित होती, पण ती थोडीबहुत लवचिक होती. त्या काळचे कांही राजवंश ब्राह्मणजातीय व कांही क्षत्रियजातीय होते. वाकाटक नृपति हे स्वतः ब्राह्मण असून त्यांचें गोत्र विष्णुवृद्ध होतें.[1] मेकला-देशावर राज्य करणारे त्यांचे मांडलिक आपण सोमवंशी पांडवांचे वंशज आहों असें मानीत.[2] अर्थातच ते क्षत्रियजातीय होते. महाकांताराचे (हल्लीचा बस्तर जिल्हा व त्याच्या पूर्वेचा कांही प्रदेश याचे) अधिपति स्वतःस नलनृपतीचे वंशज म्हणवत. तेहि क्षत्रियांमध्येच गणले जात असावे. शरभपूरचे राजे आणि ऋष्टीक देशाचे अधिपति कोणत्या जातीचे होते हें समजण्यास साधन नाही.

सामान्यतः आपापल्या जातींमध्ये विवाहसंबंध करण्याची प्रवृत्ति होती, तरी क्वचित् अनुलोमपद्धतीचे विवाहहि होत असत.[3] उदाहरणार्थ, द्वितीय रुद्रसेन या ब्राह्मणजातीय वाकाटक राजपुत्राचा विवाह प्रभावती-गुप्ता या वैश्य राजकन्येशीं झाला होता. या विवाहानंतर तिला किंवा तिच्या अपत्यांना कोणताहि हलका दर्जा प्राप्त झाला नाही. ती आपल्या

---

१ क्रमांक ३, ओ. २.   २ क्रमांक १८, ओ. ३२–३३.

३ असे विवाह धर्मशास्त्रसंमत होते. मनुस्मृति, अध्याय ३, श्लो. १३ पाहा.

पतीची अग्रमहिषी (पट्टराणी) झाली आणि दिवाकरसेन व दामोदरसेन हे तिचे पुत्र यथाकाल विदर्भाच्या गादीवर बसले. दुसरा आन्तर्जातीय विवाह घटोत्कच लेण्यांतील लेखांत उल्लेखिला आहे. वल्लूरच्या विद्वान् ब्राह्मण कुळांतील सोम याने ब्राह्मण व क्षत्रियजातीय स्त्रियांशीं विवाह केला होता. ब्राह्मण स्त्रियांपासून त्याला झालेल्या पुत्रांनी वेदविद्येंत पारंगत होऊन आपल्या वल्लूर कुलाला कीर्तिमान् केलें. क्षत्रिय पत्नी-पासून झालेल्या रवि नामक पुत्राच्या ठिकाणीं राजचिन्हें दिसत होतीं. त्याने सभोंवरच्या सर्व प्रदेशावर आपला अंमल बसवला.[1] तो पुढे वाकाटक राजाचा सचिव झाला असें दिसतें. त्याच्या वंशजांनीहि वाकाटक राजांची सेवा एकनिष्ठपणें केली असावी. त्यांपैकी शेवटच्या दोघांचें वर्णन अजंटा व गुलवाडा येथील लेखांत आलें आहे.

जे ब्राह्मण वेदशास्त्रांत पारंगत होत त्यांस समाजांत अत्यंत मानाचें स्थान असे. कांही ब्राह्मण एकापेक्षा अधिक वेदांचें अध्ययन करीत, त्यांच्या नांवामागे 'द्विवेद' यासारखें उपपद लावीत.[2] हीं उपपदें अद्यापि आडनांवें झालीं नव्हतीं. कांही ब्राह्मण श्रौत व गृह्य यागांचें पौरोहित्य करीत. गणयागासारख्या कांही यागांचें अनुष्ठान दुसऱ्या-करिता करणें धर्मसूत्रांत निषिद्ध मानलें असल्याने ते याग करणाऱ्यांना मोठमोठीं दानें मिळत,[3] पण त्यांना समाजांत मान्यता नसे, व श्राद्धादि प्रसंगीं त्यांना आमंत्रण मिळत नसे. कांही ब्राह्मण नैष्ठिक ब्रह्मचर्याचें पालन करीत. जांब ताम्रपट ज्याला दिला होता तो कालुट्टक ब्राह्मण अशा तऱ्हेचा ब्रह्मचारी दिसतो. कांही ब्राह्मण आपल्या विशुद्ध धार्मिक आचरणाबद्दल प्रसिद्ध होते. प्रभावतीगुप्तेचा पुणें ताम्रपट ज्याला दिला तो आचार्य चनालस्वामी या तऱ्हेचा ब्राह्मण दिसतो.[4] त्याला

---

१ क्रमांक २५, ओ. ७–८.
२ क्रमांक ३, ओ. १९.
३ क्रमांक १२, ओ. २२.
४ क्रमांक २, ओ. १४.

'भगवद्भक्त' असें विशेषण लावलें आहे. हा रामगिरि येथे राहत होता, व त्याच्यावर भगवान् रामचंद्राच्या पादुकांच्या पूजाअर्चेची व्यवस्था सोपविली होती असें दिसतें. कारण प्रभावतीगुप्तेने आपलें दान भगवान् रामचंद्राच्या पादमूलांना (पादुकांना) अर्पण करून मग तें त्याला दिलें होतें.

कोरीव लेखांवरून विदर्भांतील तत्कालीन ब्राह्मणांविषयी कांही माहिती मिळते. त्यांच्या नांवाच्या शेवटीं शर्मन्, आर्य, आचार्य, स्वामिन् यासारखा एखादा शब्द असे. ते भिन्न भिन्न वेदांचे आणि शाखांचे किंवा चरणांचे अनुयायी होते.[1] सर्वच लेखांत ब्राह्मणांच्या वेदशाखांचा उल्लेख केला नसल्याने ही माहिती अर्थातच त्रोटक आहे, पण मिळतात त्या उल्लेखांवरून कांही अनुमानें काढतां येतात. वाकाटकांच्या लेखांत ऋग्वेदी व सामवेदी ब्राह्मणांचा स्पष्ट उल्लेख कोठेहि येत नाही, हें आश्चर्य आहे. यजुर्वेदाच्या शाखांपैकी तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण बरेच आढळतात. त्यांना सहा दानपत्रें दिलीं होतीं.[2] एक ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यन्दिन शाखेचा होता. तो मेकला देशांत राहत असे.[3] दुसरे दोन दान दिलेले ब्राह्मणहि वाजसनेय शाखेचे किंवा शुक्ल यजुर्वेदाचे असावे, कारण त्यांच्या गोत्राच्या मागे 'वाजि' हें उपपद लावलें आहे.[4] अथर्ववेदीय ब्राह्मण सध्या अत्यंत अल्पसंख्य

---

१ द्वितीय प्रवरसेनाचा चम्मक ताम्रपट अनेक गोत्रांच्या व चरणांच्या हजार ब्राह्मणांना दिला होता. पण त्यांत ज्या थोड्या ब्राह्मणांचा नामनिर्देश आला आहे त्यांच्या वेदांचा व शाखांचा उल्लेख नाही.

२ क्रमांक ३ ते ५, ७, ८ व १४.

३ क्रमांक १८, ओ. ३९–४०.

४ क्रमांक ९, ओ. १५ आणि क्रमांक १२, ओ. २१.

आहेत. पण त्या काळीं ते तसे नव्हते. कारण वाकाटकांचे तिरोडी व वाशीम ताम्रपट या वेदाच्या ब्राह्मणांना दिले होते.[१] यांपैकी एक ब्राह्मण बालाघाट जिल्ह्यांत व दुसरा अकोला जिल्ह्यांत राहत होता.

कांही ब्राह्मण राज्यशासनांत उच्च पदांवर असावे. कोरीव लेखांत राजसेवकांच्या जातीचा उल्लेख कोठेहि येत नसल्यामुळे या बाबतींत फारशी माहिती मिळत नाही. तथापि प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांत दूतक म्हणून उल्लेखिलेला देवनन्दस्वामी हा ब्राह्मण असावा.[२] तसेंच ज्यांच्या नांवाच्या शेवटीं दास आहे असे कांही दानपत्रांचे लेखकहि ब्राह्मण असण्याचा संभव आहे.[३]

वर्णव्यवस्थेंत ब्राह्मणांनंतर क्षत्रियांचें स्थान येतें. बरेचसे क्षत्रिय राज्यशासनांत नियुक्त केले असावे. द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या अकराव्या व तेराव्या वर्षीं दिलेल्या दानपत्रांत उल्लेखिलेला सेनापति चित्रवर्मा[४] हा त्याच्या नांवावरून क्षत्रिय दिसतो. दुसरे कित्येक सेनापति जसें चमिदास, नमिदास, बाप्पदेव व कात्यायन—हेहि क्षत्रिय असण्याचा संभव आहे, पण त्यांविषयीं निश्चित सांगणें अशक्य आहे. ऋद्धपुरच्या ताम्रपटाचा लेखक प्रभुसिंह हा त्याच्या नांवावरून क्षत्रिय दिसतो.[५]

इतर जातींविषयीं आपणांस फारशी माहिती मिळत नाही. द्वितीय प्रवरसेनाच्या इंदूर ताम्रपटांत चन्द नामक श्रीमंत व्यापाऱ्याचा [वाणिजकाचा] उल्लेख आहे.[६] त्याने एका गावाचा अर्धा भाग विकत

१ क्रमांक ११ व २२. २ क्रमांक ८, ओ. ३१.

३ कालिदासाचें नांव या प्रकारचें आहे आणि तो ब्राह्मण होता हें सुप्रसिद्ध आहे. क्रमांक १३ च्या लेखकाचेंहि नांव कालिदासच होतें.

४ क्रमांक ५, ओ. ३०; क्रमांक ६, ओ. ६०.

५ क्रमांक ८, ओ. ३२. ६ क्रमांक ९, ओ. २०.

घेऊन ब्राह्मणास दिला होता. कांही ताम्रपटांत ज्यांनी ते कोरले त्या सुवर्णकारांचा [सोनारांचा] उल्लेख आढळतो,[१] पण ज्यांनी अजंटा व गुलवाडा येथील सुंदर लेणीं कोरविलीं आणि चित्रांनी व शिल्पकृतींनी भूषित केलीं ते सूत्रधार, शिल्पकार व चित्रकार दुर्दैवाने अज्ञात राहिले आहेत.

अजंट्याच्या सतराव्या लेण्यांतील लेखांत हरिषेणाच्या मांडलिकाने आपल्या बंधूच्या अकालीं निधनाने अत्यंत दुःखित होऊन कित्येकांस पुष्कळ पैसा खर्च करून बंधमुक्त केल्याचें वर्णन आलें आहे.[२] या बंदींचें वर्णन 'भयविप्लुताक्षान्' ज्यांचे नेत्र भीतीमुळे अश्रुपूर्ण झाले आहेत असें केलें आहे. त्या लेखांतील इतर श्लोकांप्रमाणे हा श्लोकहि खंडित झाल्यामुळे येथे कोणत्या बंदींचें वर्णन आहे तें स्पष्टपणें समजत नाही. हे बंदी कदाचित् खासगी कुटुंबांतील दास असतील. प्राचीन काळीं भारतांत दाससंस्था अस्तित्वांत होती, यांत संशय नाही. दासाला धन-स्वामित्वाचा अधिकार नसे.[३] त्याला घरचें काम करावें लागे. सामान्यतः त्याला चांगल्या रीतीने वागविलें जाई; म्हणून मॅगेस्थेनीस सारख्या परदेशी लेखकांनी भारतांत दाससंस्था किंवा गुलामगिरी अस्तित्वांत नाही, असें म्हटलें आहे. या दासांच्या मुक्ततेचे अनेक उपाय होते. ज्यांना बला-त्काराने दास केलें असेल किंवा जे चोरांनी विकल्यामुळे दास बनले असतील[४] त्यांस राजाने बंधमुक्त करावें असें याज्ञवल्क्यस्मृतींत

१ क्रमांक १३, ओ. ४५–४६.

२ पाहा–' ··· भयविप्लुताक्षान् । अन्मूमुचद्वित्तविसर्गशक्त्या पुत्रानिवेष्टान् करुणाभिमृष्टः ।' क्रमांक २६, ओ. १७.

३ पाहा–भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः ।
यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम् ॥
मनुस्मृति, अध्याय ९, श्लोक ४१६.

४ याज्ञवल्क्यस्मृति, अध्याय २, श्लोक २८०.

म्हटलें आहे. एखाद्या प्रसंगीं दासाने आपल्या धन्याचा प्राण वांचविला तर त्याला स्वातंत्र्य मिळे. पैशाकरिता जो विकला गेला असे त्याच्या स्वामीला धन देऊन त्याची मुक्तता करतां येत असे. 'मृच्छकटिकां'तील शर्विलक अशाच उपायाने आपल्या प्रेमपात्राची वसन्तसेनेच्या दास्यांतून मुक्तता करण्याचा प्रयत्न करीत होता. अजंठ्याच्या लेखांत उल्लेखिलेले दास हे या शेवटच्या प्रकाराचे असावे. हरिषेणाच्या मांडलिकाला त्यांची दया घेऊन त्याने अशा अनेक दासांना पैसे भरून बंधमुक्त केलें व त्यांना स्वतंत्र नागरिकांचें पद प्राप्त करून दिलें असें दिसतें.

कोरीव लेखांत लोकांची राहणी, त्यांचीं वस्त्रें व अलंकार, केशरचना, शिरोभूषणें, शस्त्रास्त्रें, घरें, त्यांतील नित्योपयोगी सामान, भांडीं, वाद्यें इत्यादिकांचे उल्लेख येत नाहीत. या माहितीकरिता आपणास तत्कालीन वाङ्मय, शिल्पें व चित्रें यांकडे वळलें पाहिजे. वाकाटकांच्या काळीं विदर्भांत अनेक संस्कृत व प्राकृत काव्यें रचलीं होतीं. पण त्यांतील बहुतेक सर्व आता नष्ट झालीं. कालिदासाचें 'मेघदूत' नामक संस्कृत काव्य व प्रवरसेनाचें 'सेतुबंध' हें प्राकृत काव्य एवढींच तत्कालीन काव्यें आता उपलब्ध आहेत. कालिदासाचीं इतर काव्यें व नाटकें हीं विदर्भाबाहेर, माळव्यांत, लिहिलीं गेलीं. त्यामुळे त्यांतील वर्णन विदर्भाला सर्वस्वी लागू पडेल असें निश्चितपणें म्हणतां येत नाही. तथापि त्यांचाहि तारतम्याने उपयोग करण्यास हरकत नसावी. तत्कालीन सामाजिक परिस्थिति समजून घेण्याचें उत्तम साधन म्हणजे अजंठ्याचीं सोळा, सतरा व एकोणीस क्रमांकांचीं लेणीं हें होय. हीं लेणीं इतरत्र दाखविल्याप्रमाणे वाकाटक काळांत कोरलीं होतीं व त्यांतील चित्रेंहि त्याच काळांत काढलीं होतीं. सुदैवाने हीं लेणीं व त्यांतील बरीचशीं चित्रें अद्यापि सुस्थितींत आहेत. तेव्हा तत्कालीन सामाजिक परिस्थिति समजण्यास त्यांचा बराच उपयोग होण्यासारखा आहे.

वाकाटकांच्या काळीं देवालयें दगडांनी, क्वचित् विटांनी, बांधण्याची पद्धत प्रचारांत येऊं लागली होती. या मंदिरांचें वर्णन इतरत्र केलें आहे. पण राजवाडे, श्रीमंत व गरीब लोकांचीं घरें हीं बांधण्याकरिता दगडमातीचा उपयोग सर्रास केला जात होता, असें दिसत नाही. अजंट्याच्या उपरिनिर्दिष्ट लेण्यांतील चित्रांवरून तत्कालीन राजवाडे, घरें, दुकानें वगैरे लाकडाचीं असत, असें दिसतें. बौद्ध लोकांचीं चैत्यें वाकाटककालांत व तत्पूर्वींहि पर्वतांत कोरलीं जात असत, पण त्यांत अनावश्यक असलेल्या तुळया, कडया वगैरेहि कोरल्या जात त्यांवरून त्यांमध्ये तत्पूर्वीच्या लांकडी चैत्यांचें अनुकरण केलें होतें हें स्पष्ट दिसतें. किंबहुना कार्ल्यांसारख्या कांही अत्यंत प्राचीन चैत्य लेण्यांत अद्यापि कांही लांकडी भाग अवशिष्ट आहेत, त्यांवरूनहि ही गोष्ट स्पष्ट होते.

अजंटयाच्या लेण्यांतील चित्रांवरून तत्कालीन राजवाडे व श्रीमंत लोकांची घरें उंच लांकडी खांबावर उभारलीं असत असें दिसतें.[1] हे खांब तीन ठिकाणीं, खाली, मध्यभागीं व शिरोभागीं, कोरीव कामाच्या किंवा रंगाच्या पट्टयांनी सुशोभित केलेले असत. त्यांच्या खाली उथळया असत. वरील शीर्षकें (capitals) गोल, चपटया किंवा उभट आकाराचीं असत. छावणीवर चैत्यवातायनाच्या आकृतींनी दिवाणखान्यांना (आस्थानमंडपांना) शोभिवंत केलें जाई. दिवाणखाने बहुवा चौकोनी,

१ कांही लहान, एकच खोलीच्या व वर घुमट आणि त्यावर आमलक व कळस असलेल्या इमारती मधून मधून अजंटयाच्या चित्रांत दिसतात. उदाहरणार्थ, भाग ३, प्लेट ६१ व भाग ४, प्लेट ४४(अ) पाहा. त्या देवकुली किंवा लहान देवळें असतील. बुद्धगयेच्या प्राचीन मंदिरावर असाच घुमट व कळस होता. फर्ग्यूसन, हिस्टरी ऑफ् इंडियन अँड ईस्टर्न आर्किटेक्चर, दुसरी आवृत्ति, पु. १, पृ. ७८ पाहा.

क्वचित् गोल आकाराचे, असत. सोळा क्रमांकाच्या लेण्यांत जेथे शुद्धोदन राजाला मायादेवी आपलें स्वप्न सांगत आहे तो दिवाणखाना वाटोळा दाखविला आहे.[१] दिवाणखान्यांत भिन्न भिन्न रंगाचे पडदे सोडून त्यांना सुशोभित करण्यांत येई.[२] कांही घरांवर तिकोनी छपराचे कबुतरखाने असत.[३] त्यांचें वर्णन कालिदासाने आपल्या मेघदूतांत 'तां कस्यांचिद्भवनवलभौ सुप्तपारावतायां नीत्वा रात्रिं' इत्यादि शब्दांनी केलें आहे.[४] राजवाड्याच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जाण्याकरिता जे दरवाजे असत त्यांवर लांबट पिपाच्या आकारानें (barrel-shaped) छप्पर असे व त्याला दोन्ही बाजूंनी चैत्यवातायनांच्या आकृतींनी सुशोभित केलें असे.[५] जरूर तेव्हा खांबांवर शामियाने (उपकार्या) व तंबू (पटमंडप) उभारले जात. त्यांचा उल्लेख कालिदासाच्या रघुवंशांत विदर्भराजाने केलेल्या अजाच्या स्वागताच्या वर्णनांत आला आहे.[६] दुकानें लहान लहान व चौकोनी असून त्यांच्या पुढील बाजूस उन्हापावसापासून संरक्षण करण्याकरिता बासावर कापडाच्या किंवा तट्टयाच्या झापड्या लावत. गरिबांचीं घरें हल्लीप्रमाणे गवताच्या छपरांचीं असत.[७]

दिवाणखान्यांतील सामान (फर्निचर) साध्या प्रकारचें असे. बसण्यास चौरंगासारखे कातीव पायांचे मंच असत. त्यांना पाठीमागे टेकण्याकरिता गोल आकाराची पाठ व पुढे पाय टेकण्याकरिता पादपीठ

१ अजंटा, भाग ३, प्लेट ६१.

२ अजंटा, भाग ४, प्लेट १७ (अ).

३ अजंटा, भाग ३, प्लेट ६३.

४ मेघदूत, श्लो. ४०.

५ अजंटा, भाग ३, प्लेट ५०; भाग ४, प्लेट २१.

६ रघुवंश, सर्ग ५, श्लोक ६३ व ८३.

७ अजंटा, भाग ४, प्लेट ४ (क).

असे. मंचावर टेकण्याकरिता हल्लीसारखे वाटोळे लोड असत. सैंपाकघरांत शिंक्यावर एकावर एक भांडीं रचून ठेवण्याची पद्धत हल्लीप्रमाणेंच प्रचलित होती.[१] भोजन करताना बसण्यास चौरंग व पुढे ताट ठेवण्याकरिता वाटोळया आकाराचें लहानसें मेज असे.[२]

अजंटयाच्या लेण्यांतील चित्रांवरून तत्कालीन समाजांतील भिन्न भिन्न वंशांच्या लोकांची कल्पना करतां येते. कांही लोक काळया वर्णाचे, खुजे व चपटया नाकाचे असे दाखविले आहेत.[३] हे या प्रदेशांतील मूळचे आदिवासी होत. कांही नागवंशी होते. अजंटयाचीं लेणीं ज्यांनी कोरलीं ते या वंशाचे असावे. म्हणूनच त्यांनी अनेक लेण्यांत डोक्यावर फणा असलेल्या नागराजांचीं शिल्पें कोरलीं आहेत व चित्रें काढलीं आहेत.[४] राजे, राण्या, ब्राह्मण, दास, दासी वगैरे आर्य वंशाचे लोक सर्वत्र आढळतात. हे गौरवर्णी, उंच व देखणे आहेत. याशिवाय शक, कुशाण, पल्हव, ग्रीक वगैरे परदेशी लोकहि महाराष्ट्रांत येऊन स्थायिक झाले होते. त्यांचीं चित्रेंहि कांही ठिकाणीं आढळतात. सतरा क्रमांकाच्या लेण्यांत बुद्ध धर्मोपदेश करीत असतां त्याच्या श्रोतृवर्गांत बिंबिसार, अजातशत्रु, वगैरे राजांबरोबर कांही दाढीमिशा असलेले, डोक्यावर उंच निमुळता टोप आणि अंगांत पूर्ण बाह्यांचे कोट घातलेले कांही पुरुष बसलेले दाखविले आहेत.[५] ते या परदेशी वर्गाचे प्रतिनिधि असावे. याशिवाय एकदोन ठिकाणीं रुंद चेहऱ्याचे बारीक मिशा व डोळे असलेले व लांब अंगरखा घातलेले असे पुरुष दिसतात, ते चिनी असावे असा श्री. यजदानी यांचा तर्क आहे.[६] पवित्र बौद्ध स्थलांची यात्र

१ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ५.

२ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ३६.

३ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट १५.

४ पुढे, प्रकरण ६ पाहा. ५ अजंटा, भाग ४, प्लेट ३९.

६ अजंटा, भाग ४, पृ. ४६, प्लेट २३.

करण्याकरिता अनेक चिनी लोक भारतांत येत असत, हें सुप्रसिद्ध आहे.

अजंट्यांतील शिल्पें व चित्रें यांवरून वाकाटककालीन स्त्री-पुरुषांच्या वस्त्रालंकारांची उत्तम कल्पना करतां येते. बहुतेक स्त्रीपुरुष आंखूड अन्तरीयक (अधोवस्त्र) नेसलेले दाखविले आहेत. हें गुडघ्याच्या वर असे म्हणून याला अर्धोरुक अशी संज्ञा असे. बाणानें आपल्या हर्षचरितांत[१] याचें वर्णन 'प्रकटितोरुत्रिभाग' (ज्यामध्ये मांडीचा तृतीयांश उघडा आहे) असें केलें आहे. हें वस्त्र भिन्न भिन्न रंगांच्या पट्ट्याचें असे. पवनार येथे सापडलेल्या शिल्पपट्टांतील राम, लक्ष्मण, भरत व सीता यांचीं वस्त्रेंहि याच प्रकारचीं आडव्या पट्ट्यांची दाखविलीं आहेत, पण तीं जास्त रुंद[२] जवळ जवळ घोट्यापर्यंत खाली आलेलीं दिसतात. या वस्त्राचा एक शेवट डाव्या मांडीवरून जाऊन त्याचा मागे कच्छ (कासोटा) होत असे. दुसरा शेवट दोन्ही मांड्यांना मागून पुढून वेष्टून नंतर मागे खोवून खाली शेपटासारखा लोंबत असे. या प्रकारच्या परिधानपद्धतींत पुढील भागीं निऱ्या दिसत नसत, पण पाठीमागे मात्र अधोवस्त्राचा शेवट शेपटासारखा लोंबत असे. उत्तर हिंदुस्थानांतील अन्तरीयक नेसण्याची पद्धत याच्या उलट होती. त्याच्या निऱ्यांचे सोगे पुढे सुटलेले सांची व भरहूत येथील शिल्पांत आढळतात. अजंट्याच्या वाकाटककालीन लेण्यांत अशा तऱ्हेच्या पुढील निऱ्या कोठेहि दिसत नाहीत,[३] पण मागील शेपटासारखे सोगे मात्र अनेक ठिकाणीं दाखविले आहेत.[४]

---

१ हर्षचरित (निर्णयसागर, १९१२), पृ. २२.

२ प्लेट 'भरतभेट' पाहा.

३ अजंट्याच्या यापूर्वीच्या नवव्या क्रमांकाच्या लेण्यांत अशा निऱ्या दाखविल्या आहेत. अजंटा, भाग ३, प्लेट १६ पाहा.

४ अजंटा, भाग ४, प्लेट ४८, ६५ इ.

दाक्षिणात्यांच्या या परिधानपद्धतीचें विनोदी वर्णन कल्हणाने खालील श्लोकांत[1] केलें आहे—

> क्षितिभृद्दाक्षिणात्यानां तिर्यक्त्वज्ञापनाय सः ।
> पुच्छं महीतलस्पर्शि चक्रे कौपीनवाससि ॥

(दाक्षिणात्य लोक पशु आहेत हें दाखविण्याकरिता त्या काश्मीरच्या राजाने त्यांना आपल्या लुंगीचा शेवट जमिनीला स्पर्श होईल इतका लांब ठेवणें भाग पाडलें.)

स्त्रियांचीहि अधोवस्त्र नेसण्याची पद्धत याच तऱ्हेची होती, हें कांही चित्रांत त्या पाठमोऱ्या बसल्या किंवा उभ्या असतां त्यांच्या खाली लोंबणाऱ्या कासोट्यावरून दिसतें. कांही स्त्रिया मात्र अधोवस्त्र कच्छरहित पद्धतीने नेसत असत हेंहि अजंठ्याच्या लेण्यांतील चित्रांवरून स्पष्ट आहे. कांही पुरुष हल्लीच्या हाफपँट सारखा मांडचोळणा घालीत व तो कटिबंधाने कमरेंत बांधत. त्याला 'चंडातक' असें म्हणत. सतरा क्रमांकाच्या लेण्यांतील उजव्या भिंतीजवळच्या खांबावरील यक्ष अशा तऱ्हेचें चंडातक नेसला आहे. बाणाच्या 'हर्षचरितां'तील वर्णनावरून स्त्रियाहि अशा तऱ्हेचें चंडातक नेसून त्यावर पायघोळ कंचुक किंवा झगा घालत असें दिसतें.

पुरुष घोड्यावर बसतांना किंवा शिकारीला गेले असतां तुमान घालून वर पूर्ण बाह्यांचा गुडघ्यापर्यंत खाली आलेला कोट घालत असें दिसतें. सतराव्या क्रमांकांतील लेण्यांत मृगजातकांत शिकारीला गेलेल्या

---

१ राजतरंगिणी, ४, १८०.

२ अजंटा, भाग ४, प्लेट ६३; पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ५४.

३ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ७०.

४ पूर्वोक्त, चित्रांक ६८.

५ हर्षचरित (निर्णयसागर, १९१२), पृ. ३१–३२.

राजाचा पोषाख या तऱ्हेचा आहे.[१] अनेक नाण्यांवर गुप्तनृपतींचा पोषाखहि याच तऱ्हेचा आहे, हें सांगणें नको. कांही चित्रांत नोकरांनीहि पूर्ण बाह्यांचे अंगरखे घातलेले आढळतात.

पुरुष सामान्यतः उत्तरीय वापरीत. तें जानव्याप्रमाणे डाव्या खांद्यावरून व उजव्या कांखेखालून जाई.[२] त्यामुळे उजवा हात मोकळा राहत असे. कांही चित्रांत हें उत्तरीय पुनः दुमडून डाव्या खांद्यावर टाकलेलें दिसतें.[३] कांही लोक उत्तरीयाची पट्टी करून तें वैकक्षकासारखें वापरीत[४] तर इतर कांही तें कमरेला बांधून बद्धपरिकर होत.[५] म्हैसूरच्या राजदरबारांत सर्व सेवकांनी अशा रीतीने बद्धपरिकर होऊन राहिलें पाहिजे असा नियम आहे. कांही लोक एकच लांब वस्त्र नेसून त्याचाच नंतर उत्तरीया-सारखा उपयोग करीत.[६] कांही पुरुष पूर्ण बाह्यांचा अंगरखा घालून वर उत्तरीय पांघरत. सतराव्या लेण्याच्या हंसजातकांतील प्रधानाचा पोषाख या तऱ्हेचा आहे.[७]

अजंट्याच्या लेण्यांतील चित्रांत अनेक राजा, राणी वगैरे श्रीमंत स्त्रीपुरुषांच्या शरीरांचा वरचा भाग अनावृत दाखविला आहे, असें वाटतें. त्यांच्या दासदासी मात्र वस्त्रावृत दिसतात. सकृद्दर्शनीं हें चमत्कारिक वाटतें. पण त्याचें कारण चित्रकाराचा उद्देश

---

१ अजंटा, भाग ४, प्लेट ६८ (क).

२ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट २३; पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ६६.

३ अजंटा, भाग ३, प्लेट ४८.

४ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ४ (क).

५ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट २१ (ब).

६ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट १५.

७ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट १७ (अ).

समाजाच्या या वरच्या थरांतील स्त्रीपुरुषांनी अत्यंत तलम वस्त्रें वापरलीं आहेत हें दाखविण्याचा होता हें होय. संस्कृत कवींच्या काव्यांत या वस्त्रांचें वर्णन करतांना तीं 'निःश्वासहार्य'[१] (केवळ श्वासानेहि उडून जाणारीं), 'निर्मोकलघुतर'[२] (सापाच्या कातीपेक्षा अधिक तलम) होतीं, असें म्हटलें आहे. तसेंच तीं वापरलीं असतांहि आंतील कुचमण्डल, मांड्या, अंगाला लावलेलें चंदन, वापरलेले अलंकार इत्यादि स्पष्ट दिसत, असें वर्णन अनेक ठिकाणीं आढळतें. तोच प्रकार चित्रकारांनीहि आपल्या चित्रांत दाखविला आहे.

कांही स्त्रिया आपल्या स्तनांवर रुंद पट्टी बांधत असत. अशा पट्ट्यांना 'पयोधरपट'[३] असें म्हणत. मरणोन्मुख सुंदरीच्या चित्रांत तिला पंख्याने वारा घालणाऱ्या स्त्रीने अशा तऱ्हेचा पयोधरपट वापरलेला दाखविला आहे.[४] विश्वन्तर जातकाच्या चित्रांत जूजक राजदरबारांत पैसे घेतो त्यावेळीं राजाजवळ बसलेल्या राणीनेहि असाच पयोधरपट धारण केला आहे.[५] शाकुंतल नाटकांत शकुन्तला प्रियंवदेने आपलें वल्कल घट्ट बांधलें आहे, अशी तक्रार करते. त्यावर प्रियंवदा म्हणते,

---

१ पाहा--

'अथास्य रत्नग्रथितोत्तरीयमेकान्तपाण्डुस्तनलम्बिहारम् ।
निःश्वासहार्यांशुकमाजगाम घर्मः प्रियावेषमिवोपदेष्टुम् ॥'
रघुवंश, सर्ग १६, श्लो. ४३.

२ पाहा--'धौतधवलनेत्रनिर्मितेन निर्मोकलघुतरेण कञ्चुकेन तिरोहिततनुलता, छातकञ्चुकान्तरदृश्यमानैराश्यानचन्दनधवलैरवयवैः...' हर्षचरित, पृ. ३१-३२.

३ प्रियदर्शिका, अंक २, श्लो. ७.

४ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ३४.

५ पूर्वोक्त, चित्रांक ६७.

' पयोधरविस्तारयितृकमात्मनो यौवनमुपालभस्व ' (स्तन मोठे करणाऱ्या आपल्या यौवनाला दोष दे), असा प्रसंग कालिदासाने घातला आहे.[१] त्या ठिकाणींहि पयोधरपट विवक्षित आहे यांत संशय नाही. या पटाची गांठ पाठीवर बांधीत असल्यामुळे ती सैल करण्याकरिता शकुंतलेला आपल्या सखीची मदत घ्यावी लागली, हें उघड आहे. चोळी (कूर्पासक) घालण्याचा प्रघात सार्वत्रिक होता असें दिसत नाही. तथापि कांही स्त्रिया तिचा उपयोग करीत यांत संशय नाही. सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील चित्रांत मायादेवी शुद्धोदन राजाला आपलें स्वप्न सांगत आहे त्या ठिकाणीं जवळ उभ्या राहिलेल्या स्त्रीने चोळी घातलेली दाखविली आहे,[२] तसेंच सतराव्या लेण्यांतील विश्वंतर जातकाच्या एका चित्रांत दान मागण्यासाठी अनेक याचक जमले आहेत. त्यांमध्ये कडेवर मूल असलेल्या एका स्त्रीने वर रंगीत फुलें काढलेली चोळी किंवा अर्धबाह्यांचे जाकीट घातल्याचें दाखविलें आहे.[३] याच लेण्यांतील सिंहलावदानांत तर हल्ली महाराष्ट्रीय स्त्रिया घालतात त्याप्रमाणें खणांची हिरवी चोळी घातलेली एक स्त्री दाखविली आहे.[४] परदेशी शक व कुशाण जातीच्या स्त्रिया चोळीऐवजी अर्धबाह्यांचें जाकीट घालत असें दिसतें. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत त्या प्रकारच्या स्त्रीचें चित्र रंगविलें आहे.[५]

मुलांची नेसण्याची पद्धत पुरुषांच्या सारखीच असे हें सिद्धार्थ (गौतम) याच्या बाळपणाचीं चित्रें सोळाव्या लेण्यांत काढलीं आहेत त्यांवरून स्पष्ट होईल. कांही मुलांच्या अन्तरीयाचे मागचे शेपटे स्पष्ट

---

१ शाकुंतल, अंक १.

२ अजंटा, भाग ३, प्लेट ६२.

३ अजंटा, भाग ३, प्लेट ६४.

४ अजंटा, भाग ४, प्लेट ६४ (अ).

५ अजंटा, भाग ३, प्लेट ६६.

दिसतात.[१] कांहींनी उत्तरीयासारखा स्कार्फ खांद्यावर टाकलेला दिसतो. सिद्धार्थ शाळेंत शिकत असतां त्याने पूर्ण बाह्यांचा अंगरखा घातलेला दाखविला आहे, तर त्याच्या कांही मित्रांच्या कमरेच्या वरचा भाग उघडा आहे.

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुद्ध तीन वस्त्रें वापरीत असे—(१) अन्तरावासक (याला ह्युएनत्संग निवासन म्हणतो) किंवा अधोवस्त्र, हें कमरेंत पट्ट्यानें बांधलें असे; (२) उत्तरासंग, याचें दुसरें नांव संकक्षिका असावें. बाणाने उत्तरासंगाचा उल्लेख केला आहे. हें उत्तरीयासारखें पांघरलें जात असे; आणि (३) संघाटी किंवा लांब अंगरखा. अजंट्याच्या लेण्यांत कांही ठिकाणीं गौतम बुद्धाने उत्तरासंग पांघरलें आहे,[२] तर कांही ठिकाणी पायघोळ अंगरखा घातला आहे, असें दिसतें.[३]

अजंट्याच्या चित्रांत स्त्रीपुरुषांची विविधप्रकारची केशरचना व शिरोभूषणें दिसतात. सोळा व सतरा लेण्यांतील चित्रांत कोठेहि पुरुषांनी शिरोवेष्टनें किंवा पागोटीं घातलेलीं आढळत नाहीत. राजे लोक डोकीवर रत्नजडित उंच मुकुट घालीत.[४] क्वचित् एकच रुंद सोन्याचा पट्ट कपाळावर बांधून राजत्व दाखविलें जाई. इतर मंत्री, अधिकारी व सामान्य जन आपले केस मानेवर, पाठीवर किंवा छातीवर सोडीत. कांही लोक केसांवर कापडाची किंवा रेशमी वस्त्राची पट्टी बांधत. तिचें वर्णन बाणाने ‘धौतदुकूलपट्टिकापरिवेष्टितमौलिः’ अशा शब्दांनी केलें आहे. सतराव्या लेण्यांत बुद्ध धर्मोपदेश करीत असतां त्याच्या श्रोतृवृंदामध्ये बिंबिसार राजाजवळ बसलेल्या एका उच्च दर्जाच्या पुरुषाने अशी शुभ्र

१ अजंटा, भाग ३, प्लेट ६३.
२ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ३९.
३ अजंटा, भाग ३, प्लेट ५३, ७४; भाग ४. प्लेट ४१.
४ अजंटा, भाग ४, प्लेट १५.

दुकूलपट्टिका बांधली आहे. तिच्या खाली त्याचे केस लहान लहान झुपक्यांनी कपाळावर पडलेले दिसत आहेत.[१] परकी शक, कुशाण व पल्हव राजांपैकी कांहींच्या डोक्यावर वर निमुळते होत. गेलेले टोप आहेत तर कांहींनी रुंद वाटोळ्या टोप्या घातल्या आहेत.[२] ब्राह्मणांच्या डोक्यावर शेंडीची गाठ असे.[३] तशीच गांठ सिद्धार्थांच्या सहाध्यायी मुलांच्या डोक्यावर दाखविली आहे.[४] कांही मुलांच्या कानांवर झुलपें (काकपक्षक) आहेत. अशीं पांच झुलपें ठेवण्याचा प्रघात होता, हें 'पञ्चचूडः' या भवभूतीने लवाला लावलेल्या विशेषणावरून स्पष्ट दिसतें.[५] कांही शिल्पांत पूर्णभद्र, पञ्चिक वगैरेंच्या डोक्यावर हल्ली न्यायाधीश केसांची टोपी (विग्) घालतात तशी केशरचना दिसते.[६] बौद्ध भिक्षु केशकर्तन करीत असत, पण अजंट्याच्या चित्रांत सर्वांनी पूर्णपणें मुंडन केलेलें दिसत नाही. श्रावस्ती येथे बुद्धाने चमत्कार दाखवून नग्न क्षपणकांना निरुत्तर केलें त्या प्रसंगाच्या चित्रांत ते क्षपणक मात्र मुंडितशिर दाखविले आहेत.[७] गौतम बुद्ध, ऋषि, मुनि वगैरेंच्या डोकीवर जटा आहेत.

स्त्रियांची केशरचना विविध प्रकारची असे. अजंट्याच्या लेण्यांत स्त्रियांच्या केशरचनेचे व शिरोभूषणांचे इतके विविध व सुंदर प्रकार दिसतात की त्यांनी प्रेक्षकांचें मन आश्चर्यचकित होतें.[८] विशेषतः

---

१ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ३९.

२ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ३९ पाहा.

३ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट २३.

४ पूर्वोक्त, भाग ३, प्लेट ६३.

५ उत्तररामचरित, अंक ५, श्लोक २. कालिदासाने यांना 'काकपक्षक' म्हटलें आहे. रघुवंश, सर्ग ११, श्लोक १,

६ अजंटा, भाग ४, प्लेट ७५ (अ).

७ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ४३ (ब).

८ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक २७.

लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की अजंट्याच्या सोळा व सतरा क्रमांकांच्या लेण्यांत बहुधा कोठेहि स्त्रियांनी डोकीवरून पदर घेतलेला किंवा अवगुंठन (बुरखा) केलेलें दिसत नाही. क्वचित् परकी दासदासींनी डोकीवर टोकाची वाटोळी टोपी घातली आहे. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत अशा ओबडधोबड चेहऱ्याच्या दासीच्या डोकीवर तुरा असलेली उंच वाटोळी टोपी आहे. फक्त एका ठिकाणीं बुद्ध धर्मोपदेश करीत असतां त्याच्या श्रोतृवर्गांत बसलेल्या एका पार्थियन स्त्रीने कशीदा काढलेली टोपी घातली आहे, तिला सफेत जाळीचा पडदा लावला आहे असें श्री. यजदानी म्हणतात.[१] हा अपवाद सोडला तर इतर कोठेहि स्त्रियांचें अवगुंठन दिसत नाही. हल्लीहि महाराष्ट्रांत हीच पद्धत आहे. पण हल्ली महाराष्ट्रीय स्त्रिया कपाळावर कुंकु किंवा तिलक लावतात तसें मात्र या लेण्यांतील चित्रांत कोठेहि दिसत नाही. उत्तरेंत कांही ठिकाणीं भालप्रदेशावर तिलक लावण्याची पद्धत होती हें कालिदासाच्या 'रघुवंशा'वरून दिसतें. अठराव्या सर्गांत (श्लो. ४४) सुदर्शन नामक बालराजाचें वर्णन करतांना कालिदास म्हणतो—

> निर्वृत्तजाम्बूनदपट्टशोभे न्यस्तं ललाटे तिलकं दधानः ।
> तेनैव शून्यान्यरिसुन्दरीणां मुखानि स स्मेरमुखश्चकार ॥

[त्या सुदर्शन राजाच्या ललाटावर सोन्याचा पट्टा बांधून तिलक लावला, तेव्हा स्मितमुखी त्या बालराजाने शत्रूंच्या स्त्रियांचीं मुखें तिलकरहित केलीं. (त्याने आपल्या सर्व शत्रूंचा निःपात केला.)]

याच्या उलट दहाव्या लेण्यांतील चित्रांत पुरुषांच्या डोकीवर पागोटें, स्त्रियांच्या डोकीवर पदर व भालप्रदेशावर मोठा वाटोळा तिलक आढळतो.[२] तसेंच पुरुषाच्या व स्त्रियांच्या वस्त्रांच्या निऱ्या व सोगे पुढे

१ अजंटा, भाग ३, प्लेट ६६.

२ अजंटा, भाग ४, पृ. ६७, प्लेट ४० (अ).

सोडलेले दिसतात.[१] दहाव्या लेण्यांतील चित्रें खिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास म्हणजे सोळा व सतरा क्रमांकांच्या लेण्यांच्या अगोदर जवळ जवळ साडेसहाशें वर्षें कोरलीं होतीं असें तेथील लेखांच्या अक्षरवटिकेवरून दिसतें. या दीर्घ कालांत महाराष्ट्रांत शिरोवेष्टनें, अवगुंठन, तिलक वगैरेंच्या बाबतींत फरक पडला किंवा पूर्वींच्या लेण्यांचे चित्रकार उत्तरभारतीय असल्यामुळे त्यांनी आपल्या प्रदेशांतील पद्धतीस अनुसरून चित्रें काढलीं, हें समजत नाही.

वाकाटक काळीं स्त्रीपुरुषांना अलंकारांची मोठी आवड होती असें दिसतें. व्यापारी, सामान्य व गरीब लोक यांच्या अंगावर दागिने दिसत नाहीत; पण राजे, राजपुत्र, उच्चपदस्थ अधिकारी, राण्या, श्रीमंत लोकांच्या स्त्रिया, त्यांच्या दासी यांनी विविध प्रकारचे अलंकार घातलेले अजंट्याच्या चित्रांत आढळून येतात. राजे लोक उंच रत्नजडित मुकुट घालीत हें मागे सांगितलें आहेच. त्यांच्या कानांत रत्नजडित कुंडलें व गळयांत रत्नांचे व मोत्यांचे अनेक हार असत. बाहूंवरच्या रत्नयुक्त अंगदांना मोत्यांचे लोंबते पदर लावले असत.[२] इंदुमतीस्वयंवरांत एका राजाने आपल्या रत्नजडित अंगदाच्या टोकांत अडकलेला हार पुनः व्यवस्थित करून ठेवल्याचें वर्णन कालिदासाने केलें आहे.[३] हातांत एक दोन सुवर्णवलयें असत.[४] रामगिरीवर प्रियाविरहाने कृश झालेल्या यक्षाच्या मनगटांतून कनकवलयें गळून पडल्यामुळें तीं मनगटें रिक्त दिसूं लागलीं असें वर्णन मेघदूतांत[५] आलें आहे. बोटांत अंगुलीयकें

१ अजंटा, भाग ३, प्लेट २४,

२ पूर्वोक्त, भाग ४, प्लेट ३९.

३ रघुवंश, सर्ग ६, श्लोक १४.

४ अजंटा, भाग ४, प्लेट ३९.

५ 'कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः,' मेघदूत, श्लोक २.

(अंगठ्या) घालत. शाकुंतलांत दुष्यन्ताने शकुंतलेला दिलेलें अंगुलीयक हरवल्यामुळे झालेला घोटाळा सर्वविदित आहे. वक्षःस्थलावर यज्ञोपवीता-सारखा घातलेला अनेक पदरांचा मोत्यांचा हार असे.[१] त्याला मुक्ता-वैकक्षक म्हणत. सतराव्या लेण्यांतील बुद्धाच्या धर्मोपदेशाच्या वेळीं जमलेल्या राजांचें किंवा त्याच लेण्यांतील आकाशांतून उडणाऱ्या इंद्राचें चित्र पाहिलें असतां तत्कालीन श्रीमंत लोकांच्या आभरणांची कल्पना येईल. मुलांचेहि अलंकार बहुतांशीं याच प्रकारचे असत. हें यशोधरा व राहुल बुद्धाला सामोरे जातात त्या चित्रावरून दिसून येईल.[२]

स्त्रियांचे अलंकार अत्यंत सुंदर व विविध प्रकारचे असत, अजंट्याचा बहुतेक चित्रांत स्त्रियांनी आपल्या केसांत सध्याच्या बिंदी-सारखा अलंकार घातलेला दिसतो. त्याला ललाटिका म्हणत; कारण तो ललाटावर (कपाळावर) केसांत सभोवार बांधला जात असे. त्याचा एक पदर सीमन्त किंवा भांग याच्या अनुरोधाने जोडला जात असे, म्हणून याचें वर्णन बाणाने ' सीमन्तचुम्बि तिलकमणि ' असें केलें आहे या ललाटिकेला पुढील भागीं मोत्यांचा झुपका किंवा रत्नजडित सोन्याचें पदक जोडत असत. तें भालप्रदेशावर लोंबत असे, म्हणून त्याला 'चटुला-तिलक' अशी संज्ञा असे.[३] 'हर्षचरिता'च्या प्राचीन टीकेंत[४] त्याचें पुढील वर्णन केलें आहे--

> सुवर्णशृङ्खलाबद्धो नानारत्नौघमंडितः ।
> ललाटलम्ब्यलंकारश्चटुलातिलको मतः ॥

(सोन्याच्या सांखळींत नाना प्रकारचीं रत्नें ओवून ललाटावर लोंबता ठेवलेल्या अलंकाराला चटुलातिलक म्हणतात.) अशा प्रकारचें

१ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ५९.

२ पूर्वोक्त, चित्रांक ७२.

३ हर्षचरित, पृ. ३२.

४ 'हर्षचरिता'वरची शंकरकवीची टीका, पृ. ३२.

शिरोभूषण स्त्रियांप्रमाणे मुलेंहि धारण करीत. यशोधरा व राहुल या दोघांनीहि तें घातलें आहे.[१] कांही स्त्रिया मोत्यांचें जाळें केसांत घालत. त्याचें वर्णन कालिदासाने 'मुक्ताजालग्रथितमलकं' अशा शब्दांनी केलें आहे. गळ्यांत नाना प्रकारचे एक किंवा अनेक पदरांचे हार घालत. कांहींत मोत्यांच्या एकसरांत मध्ये मोठा इंद्रनीलमणि बसविला असे. त्याचा उल्लेख कालिदासाने आपल्या मेघदूतांत 'एकं मुक्तागुणमिवः भुवः स्थूलमध्येन्द्रनीलम्' असा केला आहे.[२] कांही कंठिकेंत (गळसरींत) माणिक व पाचू हीं रत्नें ओवलीं असत, तर कांही सोन्याच्या पुतळयांच्या बनविल्या असत. त्यांना 'निष्ककण्ठी' असें नांव असे. प्राचीन काळचीं अनेक भारतीय व परदेशी सोन्याचीं नाणीं वरच्या भागीं भोक पाडलेलीं सापडलीं आहेत. तीं अशा निष्ककण्ठयांत ओवलीं असावीं हें उघड आहे.

अजंटयाच्या लेण्यांत कोठेंहि स्त्रियांच्या नाकांत नथ दिसत नाही. त्या मुळे त्यावेळीं नथ घालण्याचा प्रघात नव्हता हें उघड आहे. कानांत मात्र वाटोळीं मोठीं कुंडलें घालीत. बाहूंवर कोपराच्या वर रत्नजडित केयूर असे. त्याला मोत्यांचे लोंबते पदर लावले असत. हातांत अनेक वलयें घालत. यशोधरेने आपल्या हातांत या वलयांशिवाय वर्तुलाकार कडयांचा बनविलेला अलंकार सध्याच्या पाटलीच्या जागीं घातला आहे.[३] कमरेंत नाना प्रकारच्या रत्नांनी बनविलेल्या अनेक पदरी रशना असत. त्यांना मणिमेखला म्हणत. कांही रशनांना बारीक सोन्याच्या किंकिणी लावत, तेव्हा त्यांना 'कांची' असें म्हणत. स्त्रिया घरांत फिरतांना या कांचीच्या आवाजाने हंसांना आकृष्ट करीत, असें

---

१ पंतप्रतिनिधि, 'अजंठां', चित्रांक ७२.

२ मेघदूत, श्लोक ४८.

३ पंतप्रतिनिधि, 'अजंठा', चित्रांक ७२.

वर्णन कालिदासानें केलें आहे. पायांत एक दोन वलयें घालत.[1] उत्तर भारतांत हातांत व पायांत अनेक बोजड वलयें घालण्याचा प्रघात होता, असें सांची व भरहूत येथील शिल्पांवरून दिसतें. तसा प्रकार महाराष्ट्रांत या कालांत होता, असें दिसत नाही. एकंदरींत महाराष्ट्रांतील स्त्रियांच्या अंगावरचे अलंकार नाजुक व सुंदर होते यांत संशय नाही.

पुरुष बाहेर जातांना जें चप्पल घालीत त्याचा पट्टा त्यांच्या घोट्याजवळ पायाभोवती बांधला जात असे.[2] लढाईला किंवा शिकारीला जातांना तरवार कमरेला बांधत व खंजीर कमरपट्ट्यांत खोवीत असत. घोड्यावरचें जीन, लगाम, लेंडी वगैरे सामान हल्ली-प्रमाणेच असे,[3] पण रिकिब मात्र कोठेहि दिसत नाही. रिकिब भारतांत फार उशीरा आली असें दिसतें, बसावयाच्या घोड्याला अलंकारांनी सुशोभित करीत. बाणांचा भाता खोगीराच्या बाजूला बांधला जात असे. सैनिक तो आपल्या पाठीला बांधत असत. हत्तीच्या गंडस्थलावर व सोंडेवर सोन्यामोत्यांचे अलंकार, मोठमोठीं पदकें वगैरे घालून त्यांना सुशोभित करीत, पण कालिदासाने मेघदूतांत (श्लो. १९) वर्णिल्याप्रमाणे त्याच्या अंगावर रंगीत वेलपत्ती काढल्याचें चित्रांत कोठें दिसत नाही. तसेंच हत्तीवर हौदा किंवा अंबारी घातल्याचें कोठेंहि दिसत नाही.

युद्धाच्या शस्त्रास्त्रांपैकी तरवारी, धनुष्यें, बाण, भाले, बरच्या, खंजीर यांचीं चित्रें आलीं आहेत. तरवारी बहुधा वाकड्या आकाराच्या असत. क्वचित सरळ आकाराच्याहि म्यानांत घालून घोडेस्वारांनी आपल्या पट्ट्यांना बांधलेल्या दिसतात. ढाली बहुधा वाकड्या चौकोनी आयत आकाराच्या, व क्वचित् वाटोळ्याहि आढळतात.

१ अजंटा, भाग ३, प्लेट ६२.
२ अजंटा, भाग ४, प्लेट ६८ (क).
३ अजंटा, भाग ४, प्लेट ६८ (क).

घरगुती सामानापैकी छऱ्या बहुधा चौकोनी, चौरस किंवा आयत आकाराच्या दिसतात. राजत्वाचें चिन्ह म्हणून राजा व राणी यांच्या डोकीवर धरलेलें छत्र मात्र वाटोळया आकाराचें असे. चवऱ्या हल्ली सारख्याच होत्या, पण पंखे मात्र लांबट चौकोनी असत.

वाद्यांपैकी मृदंग, शंख, झांजा, मुरली, एकतारी किंवा दोनतारी यांचीं चित्रें आहेत. मृदंग गळयांत पट्टयांनी समोर बांधून वाजविला जात असे.

जनावरांपैकी हत्ती, घोडे, गाय, बैल, वाघ, सिंह, हरिण, माकड, कुत्रे हे चित्रांत रंगविलेले दिसतात. उंट मात्र कोठेहि आढळत नाहीत. जलचर प्राण्यांमध्ये मासे, कांसव व सुसरी दिसतात. इतर स्थलचर व जलचर प्राण्यांचीं चित्रें प्रसंगाभावीं काढलेलीं दिसत नाहीत.

---

१ पंतप्रतिनिधि, 'अजंठा', चित्रांक ३२.

४. धार्मिक परिस्थिति

वाकाटकांच्या काळीं अभूतपूर्व धार्मिक जागृति झाली होती. वाकाटकवंशाचा मूळपुरुष गृहपति वाकाटक हा बौद्धधर्मानुयायी होता. तो आन्ध्रदेशाच्या गुंटूर जिल्ह्यांतील अमरावती या पुण्यक्षेत्रीं यात्रे-करितां गेला असतां तेथें त्यानें आपण, आपल्या दोन पत्नी, नातलग व इष्टमित्र यांना दीर्घायुष्य प्राप्त व्हावें म्हणून कांही दान केलें, तें तेथील स्तूपाच्या खांबावरील लेखांत नमूद केलें आहे.[१] हें दान बौद्ध थेर (भिक्षु) बोधिक याच्या सांगण्यावरून त्यानें दिलें असें त्या लेखांत म्हटलें आहे. या गृहपति वाकाटकाच्या वंशजांचें लौकरच धर्मपरिवर्तन होऊन ते वैदिक व पौराणिक धर्माचे एकनिष्ठ अनुयायी बनले. त्यांचा या धर्माला जो उदार आश्रय प्राप्त झाला त्याचें बरेंचसें श्रेय वल्लूरच्या अत्यंत धार्मिक व विद्वान् ब्राह्मण घराण्याला दिलें पाहिजे.[२] या घराण्याची विद्वत्तेबद्दल ख्याति कित्येक पिढया टिकून होती. या घरा-ण्याचा मूळ पुरुष यज्ञपति हा आद्य वाकाटक नृपति प्रथम विन्ध्यशक्ति याचा समकालीन होता. विन्ध्यशक्तीनें शत्रूंचा पाडावा केल्यावर अनेक यज्ञयागादि केले ते बहुधा याच्याच उपदेशावरून असावे. यज्ञपतीचा मुलगा देव याचें तत्कालीन राजदरबारीं मोठें वजन होतें. त्याच्या प्रभावा-मुळे राजापासून यःकश्चित् प्रजाजनापर्यंत सर्व लोक धार्मिक कृत्यांमध्ये

१ ए. इं., पु. १५, पृ. २५८ इ.
२ क्रमांक २५, ओ. ८.

गढून गेलेले असत असें घटोत्कच लेण्यांतील लेखांत म्हटलें आहे.[१] वाकाटकांच्या लेखांवरूनहि त्या काळीं मोठीच धर्मजागृति झाली होती, असें दिसतें. विन्ध्यशक्तीचा पुत्र प्रथम प्रवरसेन याने विजयप्राप्तीनंतर चार अश्वमेध आणि अग्निष्टोमादि सातहि सोमयाग केले.[२] त्याच्या वाजपेययज्ञांचा व त्यांत त्याने दिलेल्या उदार दक्षिणांचा उल्लेख पुराणांतहि आला आहे. प्रथम प्रवरसेनानंतर कोणा वाकाटक नृपतीने श्रौत याग केल्याचा उल्लेख नाही. ते गृह्य याग करीत यांत संशय नाही; कारण द्वितीय प्रवरसेनाने आपल्याकरितां गणयाग करवून ब्राह्मणाला एक गाव दान दिला होता असें जांब ताम्रपटावरून दिसतें.[३] नंतरच्या वाकाटक नृपतींनी स्वतः मोठमोठे श्रौत याग केले नसले तरी त्यांनी विद्वान् ब्राह्मणांना ते याग करण्यांत भरपूर आर्थिक साहाय्य दिलें होतें.[४] द्वितीय प्रवरसेनाच्या चम्मक ताम्रपटांत हजार ब्राह्मणांना आठ हजार निवर्तनें भूमि दिल्याचा उल्लेख आहे.[५] या राजाचे, त्याची माता प्रभावतीगुप्ता हिचे, तसेंच वत्सगुल्म शाखेच्या राजांचे अनेक ताम्रपट सापडले आहेत. त्यांमध्ये त्यांनी ब्राह्मणांना सबंध गाव किंवा त्यांतील कांही जमीन दिल्याचा उल्लेख आहे.

---

१ पाहा–' सराजकं राष्ट्रमुपेत्य यस्मिन्धर्म्या ः क्रिया ः पार्थ इव प्रचक्रे । पूर्वोक्त, ओ. ५

२ उदाहरणार्थ, क्रमांक ३, ओ. १ पाहा.

३ क्रमांक ३, ओ. १९.

४ सुप्रसिद्ध संस्कृत नाटककार भवभूति याचे पूर्वज अत्यंत धर्मशील व विद्वान् ब्राह्मण असून उदुम्बर गावीं राहत होते. त्यांना वाकाटक नृपतींनी पद्मपुर या आपल्या राजधानीस बोलावून आश्रय दिला होता, असें दिसतें. त्यांनी त्या ठिकाणीं वाजपेय यासारखे श्रौत याग केले होते.

५ क्रमांक ६, ओ. २० निवर्तनाचें कोष्टक असें–
१० हस्त = १ वंश; २० चौरस वंश = निवर्तन.

वाकाटकांच्या काळीं पौराणिक हिंदु धर्माचाहि मोठा उत्कर्ष झाला. त्यांच्या राज्यांत सर्वत्र अनेक हिंदु देवांचीं देवालयें बांधलीं गेलीं. बहुतेक वाकाटक राजे शिवोपासक असल्याने इतर देवांच्या पेक्षा भगवान् शंकराचीं देवालयें पुष्कळच निर्माण झालीं असावीं. पण कोरीव लेखांच्या अभावीं त्यांची फारशी माहिती मिळत नाही. अनेक श्रौत याग करून सुविख्यात झालेल्या प्रथम प्रवरसेनाने वर्धा जिल्ह्यांत भगवान् शंकराचें देवालय बांधून त्याला प्रवरेश्वर असें नांव दिलें होतें. तें ज्या सव्वीस गावांच्या विभागांत होतें त्याला त्याच्या योगें 'प्रवरेश्वर-षड्विंशतिवाटक' असें नांव पडलें होतें. असें बेलोरा ताम्रपटावरून समजतें.[१] प्रवरसेनाचा पुत्र प्रथम रुद्रसेन हा महाभैरवाचा भक्त होता. त्याने चांदा जिल्ह्यांतील चिक्कम्बुरि (सध्याचें चिक्कमारा) येथे एक धर्म-स्थान (देऊळ) बांधलें असल्याचा उल्लेख देवटेक येथील शिलालेखांत आढळतो.[२] हें देऊळ अर्थांतच महाभैरवाचें असावें. शंकराच्या प्रमाणें विष्णूचीं देवालयेंहि त्या काळीं बांधलीं होतीं. वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन हा बहुधा आपली अग्रमहिषी प्रभावतीगुप्ता हिच्या प्रभावा-मुळे विष्णूपासक बनला होता. प्रभावतीगुप्ता ही रामभक्त होती.[३] ती नंदिवर्धन राजधानी पासून केवळ तीन मैलांवर असलेल्या रामगिरीवर भगवान् रामचंद्राच्या दर्शनास जात असे. त्या काळीं रामगिरीवर श्री-रामप्रभूचें उत्तुंग देवालय बांधलें असावें. त्यामध्ये रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे.[४] कविकुलगुरु कालिदासानेहि या 'रघुपतिपदां'चा

---

१ क्रमांक ४, ओ. १३; क्रमांक ५, ओ. १४. शंकराचीं नांवें सामान्यतः ईश्वरशब्दान्त आणि विष्णूचीं स्वामिन्‌शब्दान्त असतात. तेव्हा प्रवरेश्वर हें शिवनाम असावें.

२ क्रमांक १, ओ. ६.

३ 'अत्यन्तभगवद्भक्ता' हें प्रभावतीगुप्तेचें विशेषण पाहा. क्रमांक २, ओ. ८.

४ क्रमांक २, ओ. १४.

उल्लेख आपल्या मेघदूत काव्यांत केला आहे.[१] प्रभावतीगुप्तेचे आतापर्यंत सांपडलेले दोन्ही ताम्रपट तिने कार्त्तिक शुक्ल एकादशीस उपास करून द्वादशीस पारण्याच्या वेळीं रामगिरीवर दिले होते.[२] एकांत रामगिरिस्वामीच्या (म्हणजे भगवान् रामचंद्राच्या) पादमूलांचा स्पष्ट उल्लेख आहे.[३] दुसऱ्यांतील दानहि भगवंताच्या पादमूलांना निवेदून एका भगवद्भक्त आचार्याला दिलें होतें. द्वितीय प्रवरसेनाच्याहि एका ताम्रपटांत या पादमूलांचा उल्लेख आहे. त्यांत दिलेल्या गावांचा अर्धा भाग चंद्र नामक वाण्यानें विकत घेऊन दान दिला होता.[४] विष्णूचें आणखी एक देवालय अश्वत्थखेटक (बैतूल जिल्ह्यांतील सध्याचें पट्टन) येथे होतें. त्यांतहि महापुरुषाच्या [विष्णूच्या] पादुकांचीच पूजा केली जात असे. त्या देवळाला जोडून असलेल्या अन्नसत्राकरितां द्वितीय प्रवरसेनानें कांही भूमि दान दिली होती.[५]

श्रीरामचंद्राचें आणखी एक उत्तुंग देवालय वर्ध्याजवळ पवनार येथे धाम नदीच्या तीरावर, जेथे सध्या श्री. विनोबाजींचा आश्रम आहे त्या ठिकाणीं, होतें असें दिसतें. त्याला रामायणांतील विविध प्रसंगाच्या शिल्पकृतींनी भूषित केलें होतें. त्यांपैकी कांही शिल्पें थोड्या वर्षांपूर्वी तेथे सापडलीं होतीं. देवगड येथील गुप्तकालीन देवालयांतल्याप्रमाणे ही शिल्पें श्रीरामचंद्राच्या देवालयाच्या भिंतींत बसविलीं असावीं. मागे सांगितल्याप्रमाणे हें पवनार म्हणजे द्वितीय प्रवर-

---

१ पाहा ‘ वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ’ मेघदूत, श्लो. १२.

२ क्रमांक २, ओ. १४; क्रमांक ८, ओ. ३१.

३ पाहा—‘ रामगिरिस्वामिनः पादमूलात् ’ क्रमांक ८, ओ. १.

४ क्रमांक ९, ओ. २०.

५ क्रमांक १३, ओ. २२–२३.

६ याच्या शिल्पपट्टांचें वर्णन पुढे सहाव्या प्रकरणांत केलें आहे.

सेनाने आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षानंतर आपल्या नांवें वसविलेलें प्रवरपुर असावें. तेथे त्याने आपली राजधानीहि नेली होती. प्रवरपुरचें हें देवालय द्वितीय प्रवरसेनाने आपली माता प्रभावतीगुप्ता हिच्या सांगण्यावरून बांधलें असावें. ही राजमाता रामभक्त होती हें आपण मागे पाहिलेंच आहे. वाकाटकांची राजधानी रामगिरीस होती तोंपर्यंत तिला आपलें इष्टदैवत भगवान् रामचंद्र यांच्या पादुकांचें दर्शन तीन मैलांवरच्या रामगिरीवरील देवालयांत जाऊन घेतां येत असे; पण जेव्हा राजधानी प्रवरपुरास हलविली गेली, तेव्हा आपल्या पुत्राबरोबर तेथे रहावयास गेलेल्या प्रभावतीगुप्तेला श्रीरामप्रभूच्या दर्शनाकरिता तेथे त्या देवाच्या देवालयाची जरूरी भासली असावी. तिच्या इच्छेस अनुसरून मातृभक्त प्रवरसेनाने प्रवरपुरला श्रीरामचंद्राचें एक भव्य मंदिर उभारून तें शिल्पादिकांनी सुशोभित केलें असावें. धाम नदीच्या काठावर श्री. विनोबाजींचा आश्रम एका कृत्रिम टेकडावर बांधला आहे. त्याच्या आवारांतच हीं शिल्पें सापडलीं असल्याने त्या ठिकाणींच हें देवालय होतें असें अनुमान करण्यास हरकत नाही.[१]

वाकाटकांच्या राज्यांत हिंदु धर्माप्रमाणे बौद्ध धर्महि प्रचलित होता. संसारांतील आपत्तीमुळे आरोग्य, ऐश्वर्य, जीवित इत्यादिकांची क्षणभंगुरता ज्यांस पटली आहे अशांस त्या धर्माचें विशेष आकर्षण असे. हरिषेण नृपतीचा सचिव वराहदेव याला ऐहिक वस्तूंचें क्षणभंगुरत्व पटल्यामुळे त्याने अजंटा येथे आपल्या मातापित्यांना उद्देशून एक भव्य विहार लेणें कोरविलें, व तें गवाक्षें, दरवाजे, सुंदर चित्रावलि, अप्सरांच्या व इतर मूर्ति इत्यादिकांनी सुशोभित केलें.[२] त्याच्या

---

१ या प्रश्नाची सविस्तर चर्चा 'पवनार येथील प्राचीन अवशेष' (संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १७७ इ.) या लेखांत आहे.

२ पाहा– 'गवाक्षनिर्यूहसुवीथिवेदिकासुरेन्द्रकन्याप्रतिमाद्यलङ्कृतम् । मनोहरस्तम्भविभङ्गभूषितं निवेशिताभ्यन्तरचैत्यमन्दिरम् ।' क्रमांक २४, ओ. १८.

मागील बाजूस बुद्धमूर्ति असून जवळच पाण्याचें टाकें व नागराजाची मूर्ति असलेलें लहानसें लेणें कोरलें आहे. हें सुंदर लेणें त्याने बौद्ध संघाला अर्पण केलें.

वराहदेवाने अजंटयाच्या पश्चिमेस सुमारें दहा मैलांवर गुलवाडा येथे आणखी एक विहार लेणें कोरविलें.[1] त्याला आता घटोत्कच लेणें असें नांव आहे. याच्याहि आंत मागील बाजूस धर्मचक्रप्रवर्तन-मुद्रा असलेली भव्य बुद्धमूर्ति आहे. हें लेणें सुंदर शिल्पांनी व उत्तम नक्षीकाम केलेल्या स्तंभांनी सुशोभित केलें आहे, पण यांत चित्रें नाहीत. यांतील लेखांत वराहदेवाने आपल्या पूर्वजांची माहिती दिली होती, पण तो लेख आता फारच खंडित झाला आहे. जवळच आणखी एक लहानसें विहार लेणें आहे. तेंहि याच सचिवाने खोदून बौद्ध संघास अर्पण केलें असावें.

अजंटयाचीं आणखी दोन लेणीं वाकाटककालीन आहेत. तीं म्हणजे क्रमांक १७ चें विहार लेणें व क्रमांक १९ चें चैत्य लेणें हीं होत. हीं दोन्ही लेणीं हरिषेणाचा मांडलिक असलेल्या ऋषीक देशाच्या एका अधिपतीने कोरविलीं होतीं. त्याने १७ क्रमांकाच्या लेण्यांत आपल्या पूर्वजांचा व आपला वृत्तांत देणारा लेख कोरविला होता, पण दुर्दैवाने तो आता फार खंडित झाला आहे. अवशिष्ट भागावरून असें दिसतें की या राजाला आपला धाकटा भाऊ रविसांब याच्या अकालीं निधनाने अत्यंत दुःख झालें. संसाराची असारता पटल्यामुळे त्याने अत्यंत धार्मिकपणाने आपलें आयुष्य घालविण्याचा निश्चय केला. आणि अनेक स्तूप व विहार यांनी पृथ्वीला सुशोभित केलें. त्याने अजंटा येथे भगवान् बुद्धाचें चैत्य आंत असलेला एकाश्म (monolith) मंडप कोरविला. तेंच सतरा क्रमांकाचें लेणें होय. जवळच त्याने गोड, हलकें, स्वच्छ व थंडगार पाणी असलेलें सुंदरसें

---

१ क्रमांक २५, ओ. १८.

टाकें कोरविलें. तसेंच त्याच्या पश्चिमेस त्याने एक भव्य गन्धकुटीहि खोदविली. तिला आता क्रमांक एकोणीसचें चैत्य लेणें म्हणतात. हीं लेणीं त्यांतील सुंदर शिल्पें व चित्रें यायोगें सुप्रसिद्ध झालीं आहेत.[१]

अजंट्याच्या सतराव्या लेण्यांतील लेखांत म्हटल्याप्रमाणे या ऋषीकाधिपतीने आपल्या देशांत अनेक विहार व चैत्यें बांधलीं होतीं, पण त्यांचा मागमूसहि आता लागत नाही.

वाकाटक नृपति व त्यांचे मांडलिक यांच्या दानपत्रांचें बारकाईने निरीक्षण व पृथक्करण केल्यास तत्कालीन धार्मिक प्रवृत्तीवर थोडा-बहुत प्रकाश पडेल. यासोबत जोडलेल्या सव्वीस लेखांपैकी नऊ लेख अपूर्ण तरी आहेत किंवा दानाचा ज्यांत उल्लेख नाही, असे आहेत. उरलेल्या सतरापैकी तीन लेखांत बौद्ध संघाला दिलेलीं विहार—चैत्यांची दानें नमूद केलीं आहत,[२] आणि बाकीच्या चौदांत हिंदू देवांना किंवा ब्राह्मणांना दिलेलीं दानें उल्लेखिलीं आहेत. यावरून त्या काळीं एकंदरीने बौद्ध धर्माची पिछेहाट होत असून हिंदु धर्म जोराने पुढे येत होता, असें दिसून येईल.[३] हीं दानें कोणत्या तिथीस दिलीं होतीं, तें पाहणेंहि मनोरंजक होईल. बौद्ध संघाला दिलेल्या विहार चैत्यांच्या दानविषयक लेखांत तिथीचा किंवा प्रसंगाचा उल्लेख नाही. ब्राह्मणांना दिलेल्या दोन दानपत्रांत ऋतु, पक्ष, दिन यांच्या निर्देशाने काल सांगितला असल्याने त्यांच्या तिथीचा पत्ता लागत नाही.[४] बाकी राहिलेल्या बारांपैकी फक्त दोन दानपत्रांत दानतिथीचा स्पष्ट निर्देश आहे.[५] इतरांत तें दान जेव्हा लेखनिविष्ट केलें त्या तिथीचाच फक्त

१ क्रमांक २६, ओ. १२ इ.

२ क्रमांक २४, २५ व २६.

३ या पूर्वीच्या सातवाहनकाळांतील बहुतेक कोरीव लेखांत बौद्धसंघाला दिलेलीं दानें उल्लेखिलीं आहेत.

४ क्रमांक १० आणि २२.

५ क्रमांक २ व ७.

निर्देश आढळतो. तथापि त्या तिथीवरूनहि तें दान कोणत्या प्रसंगीं केलें होतें याचा अंदाज करतां येतो. उदाहरणार्थ एखादें दान शुक्ल किंवा कृष्ण पक्षाच्या द्वादशीस किंवा त्रयोदशीस लेखनिविष्ट केलें असल्यास दात्याने त्या पूर्वीच्या एकादशीस उपास करून नंतरच्या द्वादशीस पारण्याच्या वेळेस तें दान दिलें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाही. अशा रीतीने निरीक्षण केल्यास उपर्युक्त बारा दानांपैकी नऊ दानें खालील एकादशीच्या पारण्यांच्या प्रसंगीं दिलीं होतीं असें आढळून येईल.

एकादशीचें नांव		एकूण दानसंख्या
१ ज्येष्ठ शु. दि. ११ (सध्याची निर्जला)	...	एक[१]
२ भाद्रपद व. दि. ११ (सध्याची इंदिरा)	...	एक[२]
३ आश्विन शु. दि. ११ (सध्याची पाशांकुशा)	...	एक[३]
४ कार्त्तिक शु. दि. ११ (सध्याची प्रबोधिनी)	...	चार[४]
५ माघ व. दि. ११ (सध्याची विजया)	...	एक[५]
६ फाल्गुन शु. दि. ११ (सध्याची आमलकी)	...	एक[६]

यावरून त्या काळीं एकादशी व्रताला किती महत्त्व आलें होतें तें दिसून येईल. सर्व एकादशींमध्ये कार्त्तिक शुक्ल पक्षांतील प्रबोधिनी एकादशी अत्यंत पुण्यप्रद गणली जात असे, असें दिसतें; कारण जवळ जवळ निम्मीं दानें तिच्या पारण्याच्या प्रसंगीं दिलीं होतीं. या एकादशीचा उल्लेख कालिदासाने आपल्या मेघदूतांत केला आहे.[७] त्यांतील वर्णना-

---

१ क्रमांक ६. २ क्रमांक १८.

३ क्रमांक ३. ४ क्रमांक २, ४, ५ व ६.

५ क्रमांक ११. ६ क्रमांक ७.

७ पाहा—शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शाङ्‍र्गपाणौ ।

मेघदूत, श्लोक ११५.

नुसार यक्षाचा शाप त्या तिथीस संपणार होता. चातुर्मासांतील निद्रेनंतर भगवान् विष्णु त्या तिथीस आपल्या भुजगशयनावरून उठतात अशी त्या काळींहि समजून होती. तिचाहि निर्देश कालिदासाने केला आहे.

एक दानपत्र ज्येष्ठ शुक्ल दशमीस 'विषुववाचनक' ब्राह्मणास दिलें होतें. तें मेषसंक्रान्तीच्या प्रसंगीं असावें. राहिलेलीं दोन दानें एखाद्या विशिष्ट पुण्य तिथीस दिलीं होतीं असें दिसत नाही.[1]

दानपत्रांच्या वरील पृथक्करणावरून कांही आश्चर्यकारक गोष्टी स्पष्ट होतात. बहुतेक वाकाटक नृपति परममाहेश्वर म्हणजे भगवान् शंकराचे अत्यंत भक्त होते. पण देवटेकचा लेख-ज्यामध्ये प्रथम रुद्रसेनाने बांधलेल्या शिवालयाचा उल्लेख होता तो-सोडल्यास आतापर्यंत उपलब्ध झालेल्या एकाहि लेखांत त्या देवाला उद्देशून दिलेल्या दानाचा उल्लेख आढळत नाही. तसेंच एकाहि दानपत्रांत सूर्यग्रहणाच्या किंवा चंद्रग्रहणाच्या प्रसंगीं दान दिल्याचा निर्देश नाही. नंतरच्या काळांत चंद्रसूर्यग्रहणें व संक्रान्ति हेच मुख्यतः दानाचे प्रसंग आढळतात. एकादशीच्या पारण्याच्या निमित्ताने दिलेलीं दानें क्वचितच आढळतात. यावरूनहि कालाच्या ओघांत धर्मश्रद्धेचे विषय कसे बदलतात, हें दिसून येईल.

---

१ क्रमांक ९ व १३. यांपैकी पहिलें दान वैशाख कृष्ण ५ ला दिलें होतें. तेव्हा तें संकष्ट चतुर्थीस गणपतिपूजेनिमित्त दिलें होतें, असें म्हणणें शक्य आहे. पण त्या काळीं गणपतिपूजेला इतकें महत्त्व आलें होतें काय याचा संशय आहे. त्या काळच्या दानपत्रांच्या आरंभीं गणपतीला बहुधा नमन नसतें.

५. संस्कृत व प्राकृत वाङ्मय

खिस्तोत्तर चौथ्या व पांचव्या शतकांत भारतांत संस्कृत वाङ्मयाची अभूतपूर्व निर्मिति झाली हें आता सर्वांस माहीत झालें आहे. याचें श्रेय मुख्यतः गुप्त व वाकाटक राजवंशांना दिलें पाहिजे. कारण त्यांनी आपल्या दरबारीं संस्कृत कवींना उदार आश्रय दिला होता. या वंशांतील कांही राजे तर स्वतः उत्कृष्ट कवि होते. गुप्त सम्राट् समुद्रगुप्त याला त्याच्या उत्कृष्ट काव्यांमुळे 'कविराज' ही सार्थ पदवी मिळाली होती. त्याच्या काव्यांतील सुंदर कल्पना आत्मसात् करून त्या आपल्या ग्रंथांत योजण्यांत विद्वानांना धन्यता वाटे, इत्यादि वर्णन प्रयागच्या त्याच्या प्रशस्तींत आलें आहे.[१] समुद्रगुप्ताचा पुत्र द्वितीय चंद्रगुप्त याने तर उज्जयिनीच्या विद्वत्सभेपुढे स्वतः काव्यकार म्हणून परीक्षा दिली होती, अशी आख्यायिका राजशेखराने आपल्या 'काव्यमीमांसें'त दिली आहे.[२] 'कवीन्द्रवचनसमुच्चया'दि प्राचीन सुभाषितसंग्रहांत कांही सुभाषितें विक्रमादित्याच्या नांवावर दिलीं आहेत, तीं या चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचीं असावीं.[३] त्यांवरून त्याच्या काव्यप्रतिभेची प्रतीति येते. स्वतः राजेलोकांनी अशा रीतीने काव्यनिर्मितींत

---

१ पाहा—' विद्वज्जनोपजीव्यमानानेककाव्यक्रियाभिः प्रतिष्ठितकविराजशब्दस्य ' कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ८.

२ पाहा—' श्रूयते चोज्जयिन्यां काव्यकारपरीक्षा—
इह कालिदासमेण्ठावत्रामररूपसूरभारवयः। हरिदासचन्द्रगुप्तौ परीक्षिताविह विशालायाम् ॥ ' काव्यमीमांसा, पृ. ५५.

३ कवीन्द्रवचनसमुच्चय (प्रो. थॉमसने संपादित), प्रस्तावना, पृ. १६० इ.

भाग घेतल्यावर त्यांच्या अधिकारीवर्गानें व प्रजाजनांनीहि तसेंच केलें असल्यास नवल नाही.[1] सांधिविग्रहिक, कुमारामात्य, महादण्डनायक, यांसारख्या मोठमोठया पदांवर असलेले हरिषेण, कौत्स, शाब यांसारखे गुप्तांचे अधिकारी काव्यरचनेंत निपुण होते, असें त्यांच्या वर्णनावरून व त्यांच्या काव्याचे जे नमुने अवशिष्ट आहेत, त्यांवरून म्हणतां येतें.[2]

ही स्थिति उत्तर भारतांतच होती असें नाही. दक्षिणेंतील वाकाटक नृपतीहि काव्यरचनेंत मागे नव्हते. त्यांच्या दरबारीं इतर ललितकलांप्रमाणें काव्यनिर्मितीलाहि उत्तेजन दिलें जात असे. वाकाटकांच्या पूर्वींचे सातवाहनादि राजांचे लेख प्राकृतांत असत. पण वाकाटकांचे बहुधा सर्व लेख संस्कृतमध्ये लिहिले आहेत. याला केवळ एकच अपवाद वाशीम दानपत्राचा आहे, पण याहि दानपत्रांतील आरंभींचा राजवंशवर्णनाचा भाग संस्कृतांत असून पुढील दानविषयक भाग मात्र प्राकृतांत आहे. त्यावरून राजांच्या दानपत्रांच्या बाबतींत संस्कृत भाषा हळू हळू प्राकृतभाषेची जागा कशी घेऊं लागली होती, तें स्पष्ट दिसतें. वाकाटकांचीं सर्व दानपत्रें गद्यामध्ये धोपट मार्गानें लिहिलीं असल्यामुळे त्यांत काव्यमय वर्णनांचा पूर्णपणें अभाव आहे. पण त्यांवरून वाकाटक नृपतींना संस्कृत काव्याची मुळीच अभिरुचि नव्हती असें अनुमान काढणें बरोबर होणार नाही. श्रीधरदासाच्या 'सदुक्तिकर्णामृतांत'त युवराज दिवाकराच्या नांवावर एक सुभाषित दिलें आहे.[3] हा युवराज दिवाकर म्हणजे ज्याच्या नांवाने प्रभावती-

१ पाहा—राजनि कवौ सर्वो लोकः कविः स्यात्। का.मी., पृ.५४.

२ कॉ. इ. इं., पु. ३. पृ. ९–१२; ३५.

३ 'सदुक्तिकर्णामृतांत' (२, ३१, ४) 'परुषाभिधानम्' या शीर्षकाखालीं खालील श्लोक युवराज दिवाकराच्या नांवावर दिला आहे—

तनुर्लीना तल्पे प्रियसहचरीहस्तकलना-
न्निजस्थानेङ्गानि श्वसितमपि तस्याः श्रमपदे ।
क्व सा कान्तिर्याता बत न शपथैस्तां स्वयमपि
प्रतीमः स्त्रीहत्यां तदपि तव चेतो नटयति ॥

गुप्ता निदान तेरा वर्षे राज्यकारभार पाहत होती, तो दिवाकरसेनच असावा. यावरून कांही वाकाटक राजे स्वतः संस्कृत काव्यनिर्मिति करीत असत हें दिसून येईल. वाकाटकांच्या उदार आश्रयाच्या योगाने त्या काळीं विदर्भांत अनेक उत्कृष्ट संस्कृत काव्यें निर्माण झालीं असावीं. नाही तर दण्डीसारख्या आद्य आलंकारिकांनी आपल्या ग्रंथांत वैदर्भी रीतीची उत्कृष्ट रीति म्हणून स्तुति केली नसती. कविकुलगुरु कालिदास हा माळव्यांतला कवि. पण त्यालाहि वैदर्भी रीतीची श्रेष्ठता पटून त्याने आपलीं काव्यें व नाटकें याच रीतींत लिहिलीं.[१] त्यावरूनहि विदर्भांतील तत्कालीन संस्कृत काव्यांची उत्कृष्टता अनुमानिता येईल.

विदर्भांतील हीं काव्यें कालाच्या ओघांत नष्ट झालीं आहेत. तथापि कालिदासाचें 'मेघदूत' हें त्या कवीने विदर्भांत असतांना रचलें असल्यामुळे त्याला वैदर्भ काव्य म्हणणें चूक होणार नाही. या काव्याचा विषय असा आहे की, कुबेराच्या शापामुळे ज्याचा प्रभाव नष्ट झाला आहे असा एक यक्ष रामगिरीच्या आश्रमांत येऊन राहतो. आषाढ महिन्यांत मेघाच्या दर्शनाने त्याला आपल्या प्रियेचा विरह दुःसह होऊन तो त्या मेघामार्फत अलकेंतील आपल्या प्रियेला संदेश पाठवतो. रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या मार्गावर लागणारे पर्वत, नद्या, देश, नगरें वगैरेंचें सुंदर वर्णन करून नंतर यक्ष अलकेंतील आपल्या निवासस्थानाचें व विरहाने कृश झालेल्या आपल्या पत्नीचें कारुण्योत्पादक शब्दचित्र काढून तिला कळवावयाचा आपला निरोप मेघास सांगतो. इतरत्र दाख-

---

१ कालिदासाने आपलीं काव्यें वैदर्भी रीतींत लिहिलीं हें सुप्रसिद्ध आहे. 'अवन्तिसुन्दरी' कथेंतील खालील श्लोक पाहा—

लिप्ता मधुद्रवेणासन्यस्य निर्विषया गिरः ।
तेनेदं वर्त्म वैदर्भं कालिदासेन शोधितम् ॥

विल्याप्रमाणें[1] हा रामगिरि म्हणजे नागपूरपासून २८ मैलांवरचें रामटेक होय. पुण्यक्षेत्र म्हणून त्याची ख्याति आजपर्यंत टिकली आहे. वाकाटकांचीं कित्येक दानपत्रें या टेकडीवरच्या रामगिरिस्वामीच्या (म्हणजे श्रीरामचंद्राच्या) पादुकांजवळ दिलीं होती. हें स्थान ज्येष्ठ वाकाटकशाखेची तत्कालीन राजधानी नंदिवर्धन (सध्याचें नन्दरधन किंवा नगरधन) या नगरापासून अवघें तीन मैल असल्यामुळे कालिदास वाकाटक दरबारीं असतांना तेथे अनेकदा गेला असावा, तेथे मेघदूत काव्याची कल्पना त्याला सुचली असावी व त्याने तें काव्य नन्दिवर्धनास त्याचा मुक्काम असतांना लिहून पुरें केलें असावें. विदर्भांत रचलेल्या या काव्याची स्तुति सर्वांनी मुक्तकंठाने केली आहे. कालिदासाने एवढेंच काव्य लिहिलें असतें तरी त्याची कीर्ति अजरामर झाली असती. 'मेघाला अलकेच्या मार्गावर लागणाऱ्या नदीपर्वतादिकांच्या वर्णनाची तसेंच विरहिणी यक्षपत्नीच्या करुणामय स्थितीच्या शब्दचित्राची स्तुति कितीहि केली तरी ती कमीच होईल. कालिदासाच्या सर्व काव्यांत अर्थगौरव, कल्पनावैभव आणि रसव्यञ्जकत्व या गुणांत मेघदूत श्रेष्ठ ठरेल असें भारतीय साहित्यसमीक्षकांचें मत आहे. ही प्रशंसा अवास्तव नाही.'[2] असें डॉ. कीथ यांनी म्हटलें आहे. तें सर्वमान्य होण्यासारखें आहे.

मागे सांगितल्याप्रमाणे वाकाटकांचे सर्व लेख गद्यांत आहेत. पण त्यांच्या मंत्र्यांचे व मांडलिकांचे लेख पद्यांत असून त्यांना शब्दार्थालंकारांनी रम्यता आली आहे.[3] त्यांतील कांही श्लोक वैदर्भी रीतीचीं उत्तम उदाहरणें म्हणून देतां येतील.

---

१ संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. ५३ इ.

२ कीथ, हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, पृ. ८६.

३ क्रमांक २४–२६. सोळाव्या लेण्यांच्या लेखांतील यमकावरून वाकाटक नपति 'सर्वसेना'चें नांव माझ्या प्रथम ध्यानांत आलें.

वाकाटकांच्या राजवटींत प्राकृत काव्यालाहि उत्तम बहर आला होता. हे राजे केवळ विद्वानांचे व कवींचे आश्रयदाते नसून त्यांनी स्वतःहि उत्तम काव्यें व सुभाषितें रचलीं होतीं. या सर्वांत वत्सगुल्म-शाखेचा संस्थापक सर्वसेन हा आद्य कवि होय. याने 'हरिविजय' हें प्राकृत काव्य रचलें होतें. आनंदवर्धन, हेमचंद्र इत्यादि आलंकारिकांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून व उद्धृत केलेल्या गाथांवरून सर्वसेन हा 'हरिविजय' या प्राकृत काव्याचा कर्ता म्हणून पूर्वीं माहीत होता, पण तो राजा होता ही अत्यंत महत्त्वाची व अन्यत्र दुष्प्राप्य अशी माहिती दण्डीच्या 'अवन्तिसुन्दरीकथा' या गद्यग्रंथांतील एका खंडित श्लोका-वरून मिळाली.[१] सर्वसेन या नांवाचा एकच राजा वाशीम ताम्रपटावरून इतिहासज्ञांस माहीत झाला आहे. तो वत्सगुल्म शाखेचा संस्थापक होता. तोच 'हरिविजया'चा कर्ता असला पाहिजे.

'हरिविजय' काव्य सध्या उपलब्ध नाही. तथापि त्याचा विषय, भाषा, स्वरूप इत्यादिकांविषयी बरीचशी माहिती नंतरच्या आलंकारिकांच्या ग्रंथांतील अवतरणांवरून आपणांस मिळते. इ. स. च्या सातव्या शतकांतल्या दण्डीने सर्वसेन राजाच्या 'हरिविजया'ची प्रशंसा मागे उल्लेखिलेल्या श्लोकांत केली होती, पण तो श्लोक आता अत्यंत त्रुटित झाल्यामुळे त्यावरून आपणांस जास्त माहिती मिळत नाही. यानंतर नवव्या शतकांतला विख्यात साहित्यसमीक्षक आनंदवर्धन याने 'हरिविजया'चा उल्लेख अनेक ठिकाणीं केला आहे. 'कवीने एखादें ऐतिहासिक कथानक आपल्या काव्याचा विषय म्हणून पसंत केलें असल्यास त्यांतील इष्टरसविरोधी प्रसंग गाळून तद्रसपरिपोषक अशा काल्पनिक घटनांची योजना करावी. कारण कवीला आपल्या काव्यां-

---

१ राज्ञा श्रीसर्वसेनेन. . . . .।
. . . . विजयं हरेः ॥

मध्ये रसोत्पत्ति करावयाची असते, इतिहास शिकवावयाचा नसतो.'[१] असा उपदेश आनंदवर्धनाने केला आहे, व याचीं उदाहरणें म्हणून कालिदासाच्या प्रबंधांचा व सर्वसेनकृत 'हरिविजया'चा निर्देश केला आहे. 'हरिविजयां'त वर्णिलेलें मूळ ऐतिहासिक कथानक कोणतें, त्यांतील कोणता भाग सर्वसेनाने गाळला व कोणते प्रसंग नवीन घातले ही माहिती आनंदवर्धनाच्या ग्रंथावरुन आपणांस मिळत नाही; पण ती त्याचा टीकाकार सुविख्यात काश्मीरी ग्रंथकार अभिनवगुप्त याच्या टीकेंतील एका विधानावरून आपणांस मिळते. अभिनवगुप्त म्हणतो, 'हरिविजयांत पारिजातहरणाचा प्रसंग पत्नीच्या अनुनयाकरिता योजिला आहे; पण इतिहासावरून तसें दिसत नाही.'[२] या विधानावरून श्रीकृष्णाने इंद्रावर स्वारी करून पारिजात वृक्ष भूतलीं आणला या कथानकावर 'हरिविजय' काव्याची रचना झाली होती हें उघड आहे. या कथानकाचें मूळचें रूप काय होतें तें निश्चितपणें सांगतां येत नाही. महाभारतांत दोन ठिकाणीं श्रीकृष्णप्रशंसेंत पारिजातहरणाचा उल्लेख आला आहे; पण तेथे तें सत्यभामेच्या अनुनयाकरिता केलें होतें, असा निर्देश नाही. सध्याच्या हरिवंशाच्या मुंबई पाठांत या कथेचीं दोन रूपें दिसतात. पहिलें रूप विष्णुपर्वाच्या ६४व्या अध्यायांत आढळतें. त्यांत वर्णिलें आहे की, श्रीकृष्ण नरकासुराचा वध करून सत्यभामेसह स्वर्गांत गेला. तेथे इंद्राच्या उद्यानांत पारिजात वृक्ष पाहून त्याने तो उपटून गरुडावर घातला व आपल्या बरोबर

---

१ हें काव्य आता उपलब्ध नसल्याने सर्वसेनाने यांत कोणते काल्पनिक प्रसंग घातले होते, हें समजण्यास साधन नाही. तथापि त्यांत सात्यकीला निसृष्टार्थदूत म्हणून इंद्राकडे पाठविलें होतें, असें एका संदर्भावरून दिसतें. तो या काल्पनिक प्रसंगांपैकी एक असावा.

२ ध्वन्यालोक (निर्णयसागर प्रत, १९११), पृ.१४८.

द्वारकेस नेला. मागाहून इंद्राला तें समजल्यावर त्याने त्या कृत्याला संमति दिली. पारिजातहरणाच्या कथेचें हें साधें रूप प्राचीन दिसतें. व एका श्लोकावरून (द्रोणपर्व, अ. ११, श्लो. २३) हेंच रूप 'महाभारत'कर्त्यालाहि माहीत होतें असें दिसतें. याच कथेचें दुसरें विस्तृत रूप 'हरिवंशा'च्या ६५–७५ या अकरा अध्यायांत वर्णिलें आहे व तेंच आपणां सर्वांना परिचित आहे. ती कथा अशी:—'एके दिवशीं नारदाने स्वर्गीय पारिजाताचीं फुलें कृष्णास अर्पण केलीं. तीं त्याने रुक्मिणीस दिलीं. तें समजल्यावर सत्यभामा रागावली. तिला प्रसन्न करण्याकरता कृष्णाने पारिजात वृक्ष स्वर्गातून खाली आणण्याचें तिला वचन दिलें व इंद्राचा पराजय करून तें पार पाडलें.' मूळ कथानकांत प्रियानुनय हें पारिजातहरणाचें कारण म्हणून दाखविलें नव्हतें. त्या प्रसंगाची योजना सर्वसेनाने आपल्या 'हरिविजय' काव्यांत रसोत्पत्तीकरिता प्रथम केली हें अभिनवगुप्ताच्या टीकेवरून स्पष्ट दिसतें. पुढे तो प्रसंग हरिवंशादि ग्रंथांत घातला असावा. कालिदासाच्या 'शाकुंतलां'तील कांही प्रसंग व शारद्वत, शाङ्र्गरव, प्रियंवदा, गौतमी इत्यादि पात्रेंहि 'पद्मपुराणां'त घेतलेलीं आढळतात. तसाच प्रकार याहि बाबतींत झालेला दिसतो.

आनंदवर्धनाने दुसऱ्या एका ठिकाणीं 'हरिविजया'चा उल्लेख केला आहे. ध्वनिकाव्याच्या एका प्रकाराचें उदाहरण देतांना त्याने खालील गाथा 'हरिविजयां'तील म्हणून दिली आहे—[1]

चूअंकुरावअंसं छणपसरमहग्घमणहरसुरामोअम् ।
असमप्पिअं पि गहिअं कुसुमसरेण महुमासलच्छिमुहम् ॥

वसंतऋतूच्या आरंभीं आम्रमंजरी फुटून सर्वत्र सुगंध दरवळला असतां मदन कामिजनांचा चित्तविक्षेप करतो, ही कल्पना या गाथेंत आलंकारिक भाषेंत ग्रथित केली आहे. या गाथेवरून 'हरिविजय'

१ ध्वन्यालोक, पृ. १२७.

काव्य महाराष्ट्री–प्राकृत भाषेंत रचलें होतें असें स्पष्ट दिसतें. 'सज्जेइ सुरहिमासो' इत्यादि आणखीहि एक वसंतऋतुवर्णनपर गाथा आनंदवर्धनाने उदाहरण म्हणून दिली आहे.[1] ती 'हरिविजयां'तून घेतली असा स्पष्ट निर्देश नसला तरी ती त्या काव्यांतीलच असावी. कारण त्या काव्यांत वसंतऋतूचें वर्णन आलें होतें हें वरील गाथेवरून तसेंच हेमचंद्राच्या 'काव्यानुशासनां'तील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें.

यानंतरचा सर्वसेनाचा उल्लेख दहाव्या शतकांतल्या कुन्तकाच्या 'वक्रोक्तिजीवितां'त आढळतो. कुन्तकाने काव्याच्या शैलीचे किंवा मार्गांचे वैचित्र्यमार्ग, सुकुमारमार्ग व मध्यममार्ग असे तीन प्रकार मानले आहेत. त्यांपैकी 'सुकुमारमार्गाचीं उदाहरणें म्हणून कालिदास, सर्वसेन इत्यादिकांचीं काव्यें पहावीं, तीं सहज सौकुमार्याने अत्यंत सुंदर झालीं आहेत' असें म्हणून कुन्तकाने सर्वसेनाला कालिदासाच्या जोडीस बसविलें आहे.[2] यानंतर अकराव्या शतकांतील सुप्रसिद्ध धारानृपति भोज याने आपल्या 'सरस्वतीकण्ठाभरण' व 'शृंगारप्रकाश' या दोन्ही अलंकारग्रंथांत 'हरिविजयां'तून अनेक गाथा उद्धृत केल्या आहेत. त्यांपैकी एक उदाहरणार्थ घेऊं—

> **सुरकुसुमेहिं कळुसिअं जइ तेहिं चिअ पुणो पसायामि तुमं ।**
> **तो पेम्मस्स किसोअरि अवराअस्स अ ण मे कअं अणुरूपं ।।**

या गाथेचा संदर्भ भोजाने दिला नाही; तथापि अर्थाकडे लक्ष देतां ही गाथा कृष्णाने सत्यभामेला उद्देशून म्हटली असावी असें दिसतें. कृष्ण म्हणतो, 'कृशोदरि सत्यभामे ! मी रुक्मिणीला परिजात-

---

१ ध्वन्यालोक, पृ. १०६, २३६ इ.

२ पाहा—एवं सहजसौकुमार्यसुभगानि कालिदाससर्वसेनादीनां काव्यानि दृश्यन्ते । वक्रोक्तिजीवित (डॉ. डे यांनी संपादिलेलें), पृ. ७१.

पुष्पें दिलीं म्हणून तूं रागावलीस. आता तुला प्रसन्न करण्याकरितां मी तींच पुष्पें तुला आणून दिलीं तर माझें कृत्य तुझ्यावरील माझ्या प्रेमाला व माझ्या अपराधाला साजेसें होणार नाही.' ' म्हणून मी पारिजात वृक्षच आणून तुझ्या अंगणांत लावतों ', असा कृष्णाचा अभिप्राय दिसतो.

यानंतर अकराव्या शतकांतल्या अभिनवगुप्तालाहि ' हरिविजय ' काव्य माहीत होतें, हें मागे दाखविलें आहेच. तदुत्तरकालीन बाराव्या शतकांत होऊन गेलेल्या हेमचंद्राने तर आपल्या ' काव्यानुशासना'वरील टीकेंत ' हरिविजया'चा ठिकठिकाणीं उल्लेख केला आहे. त्यावरून त्या काव्याविषयी खालील माहिती मिळते[१] :--

' हरिविजय ' हें काव्य आरंभापासून अखेरपर्यंत एकाच स्कन्धक नामक छंदांत रचलें होतें. त्यांत कांही ठिकाणीं दिसणाऱ्या गलितक छंदांतील गाथा दुसऱ्या कोणी तरी प्रक्षिप्त केल्या होत्या. त्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या गाथेंत ' उत्साह ' शब्द ग्रथित केला होता. त्याचें कथानक सत्यभामेला प्रसन्न करण्याकरितां इंद्राचा पराजय करून कृष्णाने पारिजात वृक्ष स्वर्गांतून भूमीवर आणला, असें होतें. कृष्णाने प्रथम सात्यकीला आपला निसृष्टार्थदूत म्हणून शिष्टाई करण्याकरितां इंद्राकडे पाठविलें; पण इंद्र त्याचें ऐकेना म्हणून त्याने त्याच्यावर स्वारी केली. ' हरिविजयां'त नगरवर्णन, नायकवर्णन, वसन्तऋतुवर्णन, सूर्यास्तवर्णन, वाहनवर्णन इत्यादि विषय आले होते.

वरील विवेचनावरून ' हरिविजय ' काव्य प्राकृतांत असलें तरी ' रघुवंश ', ' किरातार्जुनीय ', ' शिशुपालवध ' इत्यादि संस्कृत महाकाव्यांप्रमाणेंच त्याचें स्वरूप होतें व महाकाव्यांत जरूर असणाऱ्या सर्व

---

१ श्री. रसिकलाल पारीख यांनी संपादिलेलें हेमचंद्राचें 'काव्यानुशासन,' पृ. ४५७ इ.

विषयांचें वर्णन त्यांत आलें होतें हें दिसून येईल. किंबहुना हें काव्य विद्यमान सर्व संस्कृत व प्राकृत काव्यांत प्राचीनतम असल्यानें[1] त्यानेंच महाकाव्यरचनेची प्रथा पाडून दिली व तदनंतरच्या कालिदास-प्रवरसेनादि कवींनी त्याचें अनुकरण केलें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

सर्वसेनानें केवळ 'हरिविजय' काव्यच लिहिलें नसून कांही प्राकृत सुभाषितेंहि रचलीं होतीं, असें दिसतें. 'गाथासप्तशती' किंवा 'सत्तसई' नामक प्राकृत सुभाषितसंग्रह प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ इ. स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकांत होऊन गेलेल्या हाल नामक सातवाहनवंशी राजानें रचला अशी परंपरागत समजूत असली तरी त्यांत अनेक उत्तरकालीन कवींच्या गाथा समाविष्ट झाल्या आहेत हें त्यांतील कविनामांच्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें.[2] निर्णयसागरनें छापलेल्या 'गाथासप्तशतीं'-तील कविनामांच्या सूचींत सर्वसेनाचें नांव दिसत नाही. पण अलीकडे पंजाबमध्ये सप्तशतीच्या कांही भागावरील पीतांबराची टीका छापली आहे. तिजवरून निर्णयसागर प्रतींतील क्रमांक ५०४ व ५०५ या गाथा सर्वसेनानें रचल्या होत्या असें दिसतें. भुवनपाल नामक दुसऱ्या एका टीकाकारानें २१७ व २३४ या क्रमांकांच्या आणखी दोन गाथा सर्व-सेनाच्या नांवावर दिल्या आहेत. यावरून सर्वसेनानें प्राकृत सुभाषितेंहि रचलीं होतीं व त्यांतील कांही 'गाथासप्तशतीं'त घेतलीं गेलीं असें

१ विमलसूरिकृत 'पउमचरिउ' हें महावीराच्या निर्वाणानंतर ५३० या वर्षीं लिहिलें गेलें असें मानण्यांत येतें, पण हा त्याचा काळ संशयास्पद आहे. डॉ. याकोबीं यांचे मतें तें काव्य ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत किंवा त्यानंतर रचलें गेलें असावें.

२ यासंबंधीं सविस्तर विवेचन माझ्या 'गाथासप्तशतीचा काळ' या लेखांत आढळेल. संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १०४ इ.

स्पष्ट दिसतें. या सुभाषितांतहि सर्वसेनाचे प्रतिभा, मार्मिक निरीक्षण, समर्पक शब्दयोजना इत्यादि गुण आढळतात. उदाहरणार्थ, खालील गाथा घ्या—

जस्स जहं विअ पढमं तिस्सा अंगम्मि णिवडिआ दिट्ठी ।
तस्स तहिं चेअ ठिआ सव्वंगं केण वि ण दिट्ठं ॥

एका अत्यंत सुंदर स्त्रीला पाहून येण्याविषयी पाठविलेल्या आपल्या सहचरांना नायकाने तिच्या रूपाविषयी विचारलें असतां ते म्हणतात, 'आमच्यापैकी प्रत्येकाची दृष्टि तिच्या अवयवावर प्रथम जेथे पडली तेथेच ती खिळून राहिली. तिचें समग्र रूप कोणीच पाहिलें नाही.' शब्दयोजना साधीच पण किती अर्थवाही आहे ! याच कवीची दुसरी एक गाथा पाहा—

अज्जं पि दाव एक्कं मा मं वारेहि पिअसहि रुअंतिं ।
कल्लि उण तम्मि गए जइ ण मुआ ता ण रोइस्सं ॥
(अद्यपि तावदेकं मा मां वारय प्रियसखि रुदतीम् ।
कल्ये पुनस्तस्मिन् गते यदि न मृता तदा न रोदिष्यामि ॥)

(हे प्रियसखि, अश्रु गाळणाऱ्या माझें आजच्या दिवशीं तरी निवारण करूं नको. उद्या माझे पति परगांवी गेल्यावर जर मी गतप्राण झालें नाही तर रडणार नाही.)

सर्वसेन व त्याचे वंशज यांच्या राजवटींत वत्सगुल्म हें विद्येचें केंद्र बनलें. तेथे रचलेलीं प्राकृत काव्यें व सुभाषितें यांच्या योगे वच्छोमी (वात्सगुल्मी) नामक नवीन रीति प्रचारांत आली व वैदर्भी रीतीचा पर्याय बनली. राजशेखराने आपल्या 'कर्पूरमंजरी' नामक प्राकृत नाटकाच्या आरंभींच्या श्लोकांत वच्छोमीचा या अर्थी निर्देश केला आहे.

वत्सगुल्माच्या सर्वसेनाप्रमाणे ज्येष्ठ शाखेच्या द्वितीय प्रवरसेनानेहि प्राकृत काव्यरचना करून कीर्ति मिळविली होती. तो

महाराष्ट्री प्राकृतांत रचलेल्या 'सेतुबंध' किंवा 'रावणवहो' या सुप्रसिद्ध काव्याचा कर्ता होय. कांही विद्वानांच्या मतें हा प्रवरसेन काश्मीरचा द्वितीय प्रवरसेन नामक राजा असून त्याने तें काव्य वितस्ता नदीवर पूल बांधला त्या प्रसंगाच्या स्मरणार्थ रचलें होतें.[१] पण हें मत बरोबर दिसत नाही; कारण 'राजतरंगिणींत' हा पूल बांधल्याचा उल्लेख आहे,[२] पण 'सेतुबंधा'चा नाही. शिवाय हें काव्य महाराष्ट्री प्राकृतांत आहे. ही गोष्टहि लक्षांत घेतली पाहिजे. या काव्याविषयी दुसरें एक मत आहे तेंच खरें दिसतें. या काव्याचा टीकाकार रामदास याने आपल्या टीकेच्या आरंभीं असें म्हटलें आहे की 'हें काव्य कालिदासाने महाराज प्रवरसेनाकरिता महाराजाधिराज विक्रमादित्याच्या आज्ञेने रचलें.'[३] हा प्रवरसेन वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेन मानला तरच या आख्यायिकेची उपपत्ति लावतां येते; कारण तो द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्याचा दौहित्र होता. या चन्द्रगुप्ताचा आश्रित कालिदास नन्दिवर्धन या वाकाटकांच्या राजधानींत कांही काळ राहत असावा. तेथे असतांना रामगिरीस (सध्याच्या रामटेकास) गेल्यावर त्याला मेघदूत काव्याची कल्पना सुचली असावी व विदर्भांतच त्याने तें काव्य पूर्ण केलें असावें, हें मागे दाखविलें आहे. तेव्हा त्याने विदर्भांतील आपल्या मुक्कामांत 'सेतुबंध' काव्य स्वतः रचलें नसलें तरी द्वितीय प्रवरसेनास तें रचण्यांत मदत केली असावी, असें दिसतें. हें मत मान्य

---

१ मॅक्डोनेल्, हिस्टरी ऑफ् संस्कृत लिटरेचर, पृ. ३३१–३२, व कीथ, हिस्टरी ऑफ् संस्कृत लिटरेचर, पृ. १३२ इ. पाहा.

२ राजतरंगिणी, ३, ३५४.

३ पाहा–' इह तावन्महाराजप्रवरसेननिमित्तं महाराजाधिराजविक्रमादित्येनाज्ञप्तो निखिलकविचक्रचूडामणिः कालिदासमहाशयः सेतुबन्धं प्रबन्धं चिकीर्षुः . . .मङ्गलमाचरन्नाह ' सेतुबन्ध, पृ. ३.

केल्यास 'प्रवरसेन हा भोजदेव होय' ह्या रामदासाने उल्लेखिलेल्या कांही प्राचीन टीकाकारांच्या म्हणण्याचाहि अर्थ लावतां येतो. कारण भोज हें विदर्भाच्या प्राचीन राजवंशाचें नांव होतें. 'सेतुबंधा'च्या पहिल्या आश्वासांतील नवव्या गाथेवरून प्रवरसेनाने गादीवर आल्यावर लौकरच या काव्याच्या रचनेस सुरवात केली आणि तें रचीत असतां त्याला अडचणी येत होत्या, मध्येच खंड पडे किंवा चुकांची दुरुस्ती करावी लागे, असें दिसतें.[१] अशा प्रसंगीं त्याला कालिदासाचें साहाय्य झालें असावें आणि तेंच रामदासाने उल्लेखिलेल्या आख्यायिकेंत, तसेंच प्रत्येक आश्वासाच्या शेवटच्या कविनामोल्लेखांत, नमूद केलेलें दिसतें.[२]

'सेतुबंध' हें महाकाव्याला उचित अशा विदग्ध शैलींत रचलें असून त्यांत श्लेष व समास प्राचुर्याने आढळतात. संस्कृताचा ज्याला चांगलाच परिचय आहे अशा वाचकांसाठी तें रचलेलें दिसतें. त्यांत संस्कृत महाकाव्यांत आवश्यक गणलेल्या सर्व विषयांचें वर्णन आलें आहे. अनेक संस्कृत कवि व आलंकारिक यांनी त्याची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. सुप्रसिद्ध संस्कृत कवि बाणभट्ट आपल्या 'हर्षचरिता'च्या एका प्रास्ताविक श्लोकांत म्हणतो की, ज्याप्रमाणे पूर्वी भगवान् रामचंद्राची कपिसेना सेतूच्या योगें समुद्र पार करून गेली, त्याप्रमाणें प्रवरसेनाची कीर्ति या सेतूने (म्हणजे सेतुबंध काव्याने) समुद्रपार गेली.[३] सुविख्यात साहित्यसमीक्षक आनंदवर्धनाने या काव्यांतील एका प्रसंगाची

१ पाहा–'अहिणवराआरद्धा चुक्कक्खलिएसु विघडिअपरिट्ठविआ। मेत्तिव्व पमुहरसिआ णिव्वोढुं होइ दुक्करं कव्वकहा॥

२ पाहा–'श्रीप्रवरसेनविरचिते कालिदासकृते दशमुखवधे महाकाव्ये...'

३ पाहा 'कीर्तिः प्रवरसेनस्य प्रयाता कुमुदोज्ज्वला।
सागरस्य परं पारं कपिसेनेव सेतुना॥
हर्षचरित, उच्छ्वास, १, श्लो. १४.

मनसोक्त स्तुति केली आहे. ‘ लंकेंत रावणाच्या बंदींत असतांना एकदा सीतेला रामाचें मायावी शिर दाखविण्यांत आलें. त्या प्रसंगीं सीतेने जो शोक केला त्याचें वर्णन करीत असतां अनेक अर्थालंकार कवीच्या (म्हणजे प्रवरसेनाच्या) मनश्चक्षूपुढे अहमहमिकेने येत होते, असें दिसतें ’ असें आनंदवर्धनाने म्हटलें आहे.[1]

या काव्याशिवाय द्वितीय प्रवरसेनाने प्राकृत गाथाहि रचल्या होत्या. त्यांपैकी कांही पूर्वोक्त ‘ गाथासप्तशतीं ’त घेतल्या आहेत. या ग्रंथाच्या निर्णयसागर आवृत्तीच्या सूचींत ४५, ६४, २०२, २०८ आणि २१६ या क्रमांकांच्या पांच गाथा प्रवरसेनाच्या नांवावर दिल्या आहेत. पीतांबर त्यांत ४८१ आणि ५६५ या आणखी दोन गाथांची भर घालतो. याशिवाय भुवनपाल हा टीकाकार क्रमांक ४६, १२६, १५८, २०३, २०९, ३२१, ३४१, ५६७ आणि ७३४ या गाथाहि प्रवर, प्रवरराज किंवा प्रवरसेन या नांवावर देतो. हा प्रवरराज किंवा प्रवरसेन सेतुबंधाचा कर्ता वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनच असला पाहिजे.

पीतांबराच्या टीकेंत प्रवरसेनाच्या नांवावर दिलेली खालील गाथा पाहा—

> **गंधं अग्धाअंतअ पक्ककलंबाण वाहभरिअच्छ ।**
> **आससु पहिअजुआणअ घरिणिमुहं मा ण पेच्छिहिसि ।।**
> **[गन्धमाजिघ्रन् पक्वकदम्बानां बाष्पभृताक्ष ।**
> **आश्वसिहि पथिकयुवन्, गृहिणीमुखं मा न प्रेक्षिष्यसे ।।]**

---

१ पाहा—‘ अलङ्कारान्तराणि हि निरूप्यमाणदुर्घटनान्यपि रससमाहितचेतसः प्रतिभानवतः कवेरहंपूर्विकया परापतन्ति ।...यथा मायारामादिशिरोदर्शनह्वलायां सेतौ । ध्वन्यालोक, पृ. ८७. ह्या गाथा सेतुबन्ध, आश्वास ११ मधील क्रमांक ५२–८६ ह्या होत.

(हे तरुण पथिका ! कदम्बाच्या विकासित पुष्पांचा वास घेत असतां तुझ्या डोळयांत अश्रु उभे राहिले आहेत. धीर धर. नाही तर तुला आपल्या पत्नीचें मुख दिसणार नाहीं.)

वर्षारंभीं कदम्बवृक्ष फुललेले पाहून प्रियाविरहाने व्याकुळ झालेल्या तरुण पथिकाचें सांत्वन कोणी स्त्री या गाथेंत करीत आहे.

अज्जं गओत्ति अज्जं गओत्ति अज्जं गओत्ति गणरीए ।
पढमं विवअ दिअहद्धे कुड्डो रेहाहिं चित्तलिओ ।।
[अद्य गत इत्यद्य गत इत्यद्य गत इति गणनशीलया ।
प्रथम एव दिवसार्धे कुड्यं रेखाभिश्चित्रितम् ।।]

(आजचा दिवस गेला, आजचा दिवस गेला, आजचा दिवस गेला, अशी गणना करणाऱ्या त्या स्त्रीने पहिल्या अर्ध्या दिवसांतच सर्व भिंत रेखांनी भरून टाकली.)

आपला प्रियकर गावीं गेल्यावर त्याची पत्नी त्याच्या परत येण्याच्या दिवसाची किती उत्कंठेने वाट पाहत आहे, याचें मनोरम चित्र या गाथेंत काढलें आहे.

वाकाटक नृपति सर्वसेन व द्वितीय प्रवरसेन यांच्या या गाथा त्यांच्या पूर्वी तीन शतकें होऊन गेलेल्या सातवाहन नृपति हाल याच्या 'गाथासप्तशतीं'त सापडाव्या हें सकृद्दर्शनीं आश्चर्यकारक वाटण्याचा संभव आहे. पण 'गाथासप्तशती' हा प्राकृत गाथासंग्रह आता मूळच्या स्वरूपांत राहिला नाही हें उघड आहे. डॉ. वेबरने दाखविल्याप्रमाणें याच्या सहा सात आवृत्त्या झाल्या होत्या. एकंदर सातशें गाथांपैकी फक्त ४३० गाथा सर्व आवृत्त्यांत आढळतात. त्या तेवढया मूळ ग्रंथांतल्या असाव्या. नंतरच्या काळांत मधून मधून कांही गाथा त्यांतून गाळून दुसऱ्या त्यांच्या जागीं घालण्यांत आल्या, हें उघड आहे. या गाथांमध्ये कोणत्याहि कथानकाचा संबंध येत नसल्यामुळे एखादी गाथा गाळणें किंवा नवीन घालणें मुळीच कठीण जात नसे. मी इतरत्र

दाखविल्याप्रमाणें या ग्रंथांत भवभूतीचा समकालीन वाक्पतिराज याच्याहि कांही गाथा आढळतात. हा वाक्पतिराज इ. स. च्या आठव्या शतकांत म्हणजे द्वितीय प्रवरसेनानंतर तीनशें वर्षांनंतर होऊन गेला. तेव्हा 'गाथासप्तशतीं'त उपर्युक्त दोन वाकाटक नृपतींच्या गाथा सापडव्यात यांत मुळीच आश्चर्य नाही.

सर्वसेन व द्वितीय प्रवरसेन हे अनुक्रमें वत्सगुल्म व नन्दिवर्धन शाखेचे राजे होते. या दोन शाखांशिवाय वाकाटक वंशाच्या आणखी दोन शाखा बहुधा गोदावरीच्या दक्षिणेस कुन्तल देशांत व विदर्भाच्या पूर्वेस कोसल देशांत राज्य करीत होत्या. त्यांचें राज्य लौकरच नष्ट झालें म्हणून त्यांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नसावे. तथापि या शाखांतहि कांही राजे झाले असले पाहिजेत. वत्सगुल्म व नन्दिवर्धन शाखांच्या बहुतेक सर्व राजांचीं नांवें सेनपदान्त आहेत. तेव्हा या अज्ञात राजांचीं नांवें त्यासारखींच होतीं, असें अनुमान करण्यास हरकत नाही. 'गाथासप्तशती'च्या सूचीमध्ये अशीं पांच नांवें आढळतात. ती अशीं— जयसेन (गाथा १७०), मकरन्दसेन (गा. ६, ८० व ९०), सत्यसेन (गा. २३३ व २९८), मल्लसेन (गा. २३७) आणि वसन्तसेन (गा. ३२३), यांपैकी सर्व नाही, तरी कांही नांवें राहिलेल्या दोन वाकाटक शाखांच्या राजांचीं किंवा राजकुमारांचीं असण्याचा संभव आहे.

मागे सांगितलेल्या सेतुबंध काव्याशिवाय ' सेतु ' नामक आणखी एक प्राकृत ग्रंथ वाकाटकांच्या कालांत रचला गेला होता, असें दिसतें. ' अवन्तिसुन्दरीकथे'च्या प्रास्ताविक भागांत प्राचीन संस्कृत व प्राकृत ग्रंथकारांच्या प्रशंसापर श्लोक आले आहेत. त्यांमध्ये पुढील श्लोक आढळतो—

सेतुरूपेण तिष्ठन्तो लोके सद्वस्तुदर्शिनः ।
षट्पञ्चाशत् प्रमाणत्वं गता नः कविपुङ्गवाः ।।

या श्लोकांत ज्या छप्पन्न कविपुङ्गवांचा म्हणजे श्रेष्ठ कवींचा उल्लेख आहे, त्यांना वस्तूंचें सत्स्वरूप ज्ञात होतें व ते स्वतःच्या विषयांत प्रमाणकोटीस पोचले होते, असें म्हटलें आहे. दुसरी एक महत्त्वाची माहिती यांत सांगितली आहे ती ही की ते निधनानंतरहि 'सेतु'रूपाने या जगांत राहत होते. अर्थातच 'सेतु' हें त्यांच्या ग्रंथाचें नांव दिसतें.

'अवन्तिसुन्दरीकथे'च्या प्रास्ताविक श्लोकांतील कवि कालक्रमानुसार प्रशंसिलेले दिसतात. 'सेतु'ग्रंथविषयक वरील श्लोक सर्वसेनाच्या 'हरिविजया'च्या प्रशस्तीनंतर आणि कालिदासाच्या ग्रंथांच्या वर्णनापूर्वी घातला आहे. तेव्हा हा 'सेतु' ग्रंथ वाकाटक कालांतील असला पाहिजे. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की त्याच्या कर्त्यांच्या नांवासारखेच छप्पण्णय (संस्कृत, षट्पञ्चाशत्) हें कविनाम उद्द्योतनसूरीच्या 'कुवलयमालें'तील खालील गाथेंत आढळतें--[1]

पालित्तयसालाहणछप्पण्णयसीहनायसद्देण ।
संखुद्धमुद्धसारंग उव्व कह ता पयं देमि ॥

उद्द्योतनसूरि म्हणतो, 'पालित्तय, सालाहण आणि छप्पण्णय यांच्या सिंहाच्यासारख्या गर्जनेने भयभीत झालेला हरिणासारखा मी कसें बरें पुढे पाऊल टाकूं ?'

या गाथेंत उल्लेखिलेल्या तीन कवींपैकी पालित्तय (पादलिप्त)[2] आणि सालाहण (सातवाहन) हे दोन सुप्रसिद्ध प्राकृत कवि होते. पादलिप्त किंवा श्रीपालित हा सातवाहनवंशी हालनृपतीच्या दरबारचा कवि होता. या कवीच्या कांही गाथा 'गाथासप्तशतीं'त घेतल्या

---

१ काव्यमीमांसा (श्री. दलाल यांनी संपादिलेंली प्रत), टिप्पणी, पृ. १२ पाहा. कुवलयमालेचा रचनाकाल शके ७०० (इ. स. ७७८) हा आहे.

२ पादलित्त हा 'तरंगवती' कथेचा कर्ता होता.

आहेत. सातवाहन हा तर 'गाथासप्तशती'कार हालच होय. या दोन कवींच्या सारखें छप्पण्णय हेंहि एका प्राकृत कवीचें नांव असावें. 'कुवलयमाले'त त्याची स्तुति खालील गाथेंत केली आहे--

छप्पण्णयाण किं वा भन्नइ कयकुंजराण भुवणंमि ।
अन्नो वि छेयभणिओ अज्ज वि उवमिज्जए जेहिं ॥

(कविश्रेष्ठ छप्पण्णयांविषयीं काय सांगावें ? आजहि विदग्धोक्तीच्या बाबतींत कोणाला उपमा द्यावयाची असल्यास त्यांचीच द्यावी लागते.)

या गाथेचा विचार करतांना सकृद्दर्शनींच एक गोष्ट ध्यानांत येते ती ही की, उद्द्योतनानें छप्पण्णयाचें वर्णन करतांना अनेकवचनाचा उपयोग केला आहे. हे आदरार्थी अनेकवचन नव्हे; कारण उद्द्योतनानें इतरत्र पालित्तय, हाल, बाण, देवगुप्त या श्रेष्ठ कवींविषयीं किंबहुना स्वतःचा गुरु हरिभद्र याविषयीहि रचलेल्या गाथांत अनेकवचन योजिलेलें नाही. तेव्हा छप्पण्णय (षट्पञ्चाशत्) हें नांव एका कवीचें नसून कविमंडळाचें असावें. या छप्पन्न कवींनी आपली रचना सामुदायिक नांवाखाली प्रकाशित केली होती, असें दिसतें.

या छप्पन्न कवींचा 'सेतु' हा ग्रंथ द्वितीय प्रवरसेनाच्या नांवावर मोडणारा 'सेतुबंध' असणें शक्य दिसत नाही. 'सेतुबंध' या प्राकृत काव्याची रचना 'कुमारसम्भव', 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध' या काव्यांसारखी आहे. त्याच्या 'आश्वासां'त सर्वत्र जी उद्देशाची व रचनेची एकता आहे तशी छप्पन्न कवींनी रचलेल्या काव्यांत आढळणें शक्य नाही. यांत विविध विषयांचें वर्णन आलें असलें तरी त्याचे भाग छप्पन्न निरनिराळ्या कवींनी स्वतंत्रपणे रचून मागाहून एकत्रित केलेले दिसत नाहीत. अशा प्रकारच्या कृतींत शैलीची व वर्णनाची एकरूपता राहणें शक्य नसतें. शिवाय सेतुबंध काव्याची स्तुति ज्या अनेक उत्तरकालीन ग्रंथकारांनी केली आहे त्यांपैकी कोणीहि

तें काव्य अनेक कवींनी मिळून रचलें, असा प्रत्यक्षाप्रत्यक्ष उल्लेख केला नाही. तेव्हा छप्पन्न कवींचा ग्रंथ हें 'सेतुबंध' काव्य असणें शक्य नाही.

छप्पन्न कवींचा सेतुग्रंथ सुभाषितसंग्रहात्मक असावा, असें वाटतें. अशा तऱ्हेच्या ग्रंथांत कथानकाचा संबंध येत नसल्याने अनेक कवींच्या कृति एकत्रित करतां येतात. उद्द्योतनसूरीने केलेल्या छप्पन्न कवींच्या वर्णनावरूनहि वरील अनुमान सयुक्तिक दिसेल. तो म्हणतो, 'छप्पन्न कवि दिवंगत झाल्याला आज पुष्कळ काळ लोटला. पण अद्यापि कोणी छेकोक्ति रचली की तिची त्यांच्या कृतीशीं तुलना करण्यांत येते.' या वर्णनावरून छप्पन्न कवींची कृति छेकोक्तिमय किंवा सुभाषितसंग्रहस्वरूपाची होती हें उघड आहे.

वाकाटककाळीं असा सुभाषितसंग्रह रचला असणें अशक्य नाही. मागे दाखविल्याप्रमाणे वाकाटक नृपति सर्वसेन व द्वितीय प्रवरसेन यांनी अनेक स्फुट प्राकृत गाथा रचल्या होत्या. इतरहि अनेक अज्ञात कवींनी त्या काळीं अशा प्रकारच्या गाथा रचल्या असाव्या. या गाथा त्या काळीं अनेक गाथासंगृहांत संग्रहीत केल्या होत्या, असें दिसतें. हालाच्या सप्तशतीचें प्राचीन नांव 'कोश' किंवा 'गाथाकोश' होतें, हें मी इतरत्र दाखविलें आहे. तेव्हा छप्पन्न कवींनी आपल्या गाथांचा संग्रह 'सेतु' या नांवाने प्रसिद्ध केला असला तर त्यांत आश्चर्य नाही. हा ग्रंथ 'छप्पन्न कवींचा' म्हणून प्रसिद्ध झाला असावा. कालांतराने तो प्रचारांतून गेल्यावर त्यांतील कांही गाथा हालाच्या 'सप्तशतीं'त घेतलेल्या दिसतात. दण्डी व उद्द्योतनसूरि यांनी केलेल्या छप्पन्न कवींच्या स्तुतीचा हाच अर्थ समाधानकारक वाटतो.

---

६. स्थापत्य, शिल्प आणि चित्रकला

स्थापत्यादि कलांमध्ये वाकाटक कालाची कामगिरी इतर क्षेत्रांतल्यापेक्षा कमी नव्हती. वाकाटककाळीं अनेक देवालयें बांधलीं गेलीं होतीं; त्यांपैकी कांहींचा उल्लेख त्यांच्या कोरीव लेखांत येतो. उदाहरणार्थ, प्रथम प्रवरसेनाने बांधलेलें प्रवरेश्वराचें देवालय[1], रामगिरीवरचें रामगिरिस्वामीचें देवालय[2] आणि अश्वत्थखेटकांतील महापुरुषाचें (विष्णूचें) देवालय.[3] याशिवाय प्रवरपुर येथे द्वितीय प्रवरसेनाने श्रीरामचंद्राचें उत्तुंग देवालय आपल्या मातेकरिता बांधलें होतें. पण हीं सर्व देवालयें आता स्मृतिशेष झालीं आहे. रामगिरीवर अद्यापि श्रीरामचंद्राचें देवालय आहे, पण त्याच्या स्वरूपांत आता फार बदल झाला आहे. विदर्भांतील अवशेषांची अद्यापि पद्धतशीर संपूर्ण पाहणी न झाल्यामुळे वाकाटककालीन इमारतींचे अवशेष कोठे असल्यास ते अद्यापि ज्ञात झाले नाहीत. सध्या तरी विदर्भांत एकाच ठिकाणीं तत्कालीन स्थापत्यकलेचे अवशेष दिसतात. रामटेक (प्राचीन रामगिरि) येथे वराह दरवाजाच्या ईशान्येस एका टेकडीवर एका वाकाटककालीन देवळाचे भग्न अवशेष अद्यापि विद्यमान आहेत. त्या ठिकाणीं पूर्वीं एक मंदिर होतें असें दिसतें, पण त्यापैकी आता एक लहानसा मंडप तेवढा

१ क्रमांक ४, ओळ १३.

२ क्रमांक ८, ओळ १.

३ क्रमांक १३, ओळ २२.

जीर्णावस्थेंत उभा आहे.[१] तो बाजूंनी उघडा आहे. त्याला सहा खांब असून त्यांपैकी चारांवर पद्मबंधाचें कोरीव काम आहे, पण बाकीचे दोन खांब साधे आहेत. मंडपाचें छत इतर ठिकाणच्या गुप्तकालीन मंदिरांच्या प्रमाणें सपाट आहे[२]. ह्या मंडपरूपी देवालयांत पूर्वी कोणत्या मूर्तीची स्थापना केली होती हें समजण्यास आता साधन नाही. पण तें विष्णूच्याच एखाद्या अवताराचें असावें यांत संशय नाही. कारण जवळच चतुर्भुज त्रिविक्रमाची सुंदर मूर्ति भग्नावस्थेंत विद्यमान आहे.[२] त्याच्या शिरावर किरीटमुकुट असून सभोंवती तेजोवलय दाखविलें आहे. कानांत कुंडलें आणि गळयांत पदकसहित मुक्ताहार आहे. वैजयन्तीमाला दोन्ही पायांवर लोंबती दाखविली आहे. कमरेला उदरबंध असून अधोवस्त्र रशनेने बांधलें आहे आणि त्याचे सोगे खाली सुटले आहेत. त्रिविक्रमाचे सर्व हात आता भग्न झाले आहेत, पण त्यांचे रत्नजडित अंगद (बाहुभूषणें) अद्यापि दिसत आहेत. त्रिविक्रमाचा डावा पाय भूमीवर रोवला आहे. उजवा पाय आकाश व्यापण्याकरिता वर उचलला होता, पण तो आता भग्न झाला आहे. त्रिविक्रमाची उभी राहण्याची ढब त्याचा निश्चय व्यक्त करीत आहे. त्याच्या मुद्रेवरहि तो व्यक्त होत असावा, पण ती आता अस्पष्ट झाली आहे त्रिविक्रमाच्या पाया-

---

१ कनिंग्ह्याम्, आ. स. रि., पु. ७, पृ. ११२.

२ प्लेट १ पाहा.

३ श्री. आ. रा. देशपांडे यांच्या ‘भग्नमूर्ति’ नामक काव्यग्रंथांत या मंडपाचें तसेंच त्रिविक्रम मूर्तीचें चित्र दिलें आहे(पृ. १ व ८ पाहा). त्या मूर्तीचें मूळ रूप कसें असेल याची कल्पना करून तिचेंहि चित्र त्यांनी पृ. १८ वर दिलें आहे. त्यांत त्रिविक्रमाचा उजवा पाय बलीच्या डोक्यावर ठेवल्याचें दाखविलें आहे, पण सामान्यतः हा पाय आकाश मोजण्याकरिता वर उचलेला असतो. ग. ह. खरे, ‘मूर्तिविज्ञान’, पु. ५६ पाहा. मूळ मूर्तीला हात किती होते हें स्पष्ट नाही.

जवळ बलिराजा त्रिभंग अवस्थेमध्यें विनम्रभावानें उभा राहे. जवळच त्याच्या राणीची मूर्ति होती पण ती आतां अगदी अस्पष्ट झाली आहे. या त्रिविक्रमाचें शिल्प शाबूद असतें, तर गुप्तकालीन शिल्पांमध्ये तें अत्युत्कृष्ट गणलें गेलें असतें यांत संशय नाही.

रामगिरीप्रमाणे प्रवरपुर येथेहि भगवान् रामचंद्राचें मंदिर होतें; पण तें आता नष्ट झालें आहे. त्याला सुशोभित करण्याकरिता लावलेल्या शिल्पपट्टांपैकी कांही अलीकडे श्रीविनोबाजींच्या आश्रमाच्या परिसरांत खणतांना सांपडले आहेत. त्यांमध्ये रामजन्म, वनवासगमन, भरतभेट, सुग्रीववालियुद्ध, वालिवध इत्यादि रामचरित्रांतील विविध प्रसगांचे शिल्पपट्ट आहेत, त्यांवरून हें मंदिर श्रीरामचंद्राचें होतें यांत संशय नाही. या शिल्पाचें वर्णन मी इतरत्र[1] केलें आहे, पण त्यांतील एक दोन येथे देऊं.

यांपैकी एका शिल्पपट्टाकरिता श्री विनोबाजींनी लहानशी झोंपडी बांधून तींत तें ठेवलें आहे व त्याला 'भरतभेट' असें नांवहि दिलें आहे. या शिल्पपट्टांत चार मूर्ति स्पष्ट दिसतात[2]. त्या डावीकडून सीता, राम, भरत व लक्ष्मण यांच्या होत. या शिल्पांच्या निर्मितीला सुमारें दीड हजार वर्षें झाल्यामुळे ह्या मूर्ति आता बऱ्याच अस्पष्ट झाल्या आहेत, तथापि अजूनहि त्यांच्या मुखावरील भाव स्पष्ट दिसतात. सीतेनें आपल्या उजव्या हातानें रामाचा उजवा हात धरला आहे. राम भरताशी बोलत असून त्यानें आपला डावा हात भरताच्या उजव्या हातावर ठेवला आहे. रामाच्या मुद्रेवर गांभीर्याची छटा आहे. भरतानें आपली मान किंचित् वांकविली असून त्याच्या मुखावर रामाच्या भेटीचा आनंद व्यक्त झाला आहे. लक्ष्मणानें मात्र तोंड फिरविलें असून त्याची मुद्रा उदासीनतेची आहे. सीतेच्या बाजूस आणखी एक व्यक्ति होती,

१ 'पोतदार सन्मान ग्रंथ,' मराठी विभाग, पृ. १ ई; 'सरूप-भारती,' पृ. २७१ इ.

२ प्लेट २ पाहा.

पण ती अर्धछिन्न झाली आहे. सर्व मूर्तींचे वेश अगदी साधे आहेत. त्या सर्वांनी फक्त अधोवस्त्र नेसलें आहे. तें अजंटयाच्या लेण्यांतल्या सारखें आहे. राम व लक्ष्मण यांच्या डोक्यावर जटा आहेत. भरताचे केस मात्र लांब सडक असून ते त्याच्या खांद्यावर पडले आहेत. सर्व मूर्तींचें शरीर बांधेसूद आहे. लक्ष्मणाचें शरीर तर पीळदार दाखविलें आहे. या शिल्पांत कोठेहि कृत्रिमता दिसत नाही.

हा शिल्पपट्ट भरतभेटीचा आहे. ही भेट चित्रकूट पर्वतावर झालेली होय. मातुलनगराहून भरत अयोध्येस आल्यावर त्यास राम, लक्ष्मण व सीता यांचें वनवासगमन व दशरथाचें निधन यांची वार्ता समजली. लागलीच तो आपले मंत्री, सैन्य व अयोध्येचे प्रजाजन यांसह रामाला परत आणण्याकरिता निघाला. राम तेव्हा चित्रकूट पर्वतावर होता. दुरून धुळीचा लोट दिसतांच त्याने लक्ष्मणाला वृक्षावर चढून कोण येत आहेत तें पाहण्यास सांगितलें. लक्ष्मणाने कोविदारध्वजांकित सेना पाहून भरतच येत असावा असें अनुमान केलें. तो रामाला म्हणाला, ' स्वतःला राज्याभिषेक झाला असतांहि त्याने संतुष्ट न होतां भरत हा आपणा दोघांना मारण्यासाठी येत आहे. हा आपला शत्रु असल्यामुळे त्याला ठार मारण्यांत कांहीच दोष नाही.' रामानें ' भरत आपणांस अयोध्येस परत नेण्यासाठी येत असावा ' असें सांगून लक्ष्मणाचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला,[१] पण त्याच्या मनांतील अढी गेली नाही. ही लक्ष्मणाची मनोवृत्ति प्रस्तुत शिल्पपट्टांत उत्तम रीतीने दाखविली आहे. राम व भरत प्रेमानें परस्परांशीं बोलत असतां लक्ष्मण त्यांच्याकडे न पाहतां विरुद्ध दिशेस पाहत आहे. त्यावरून त्याच्या मनांतील राग व्यक्त झाला आहे.

---

१ पाहा–संपन्नं राज्यमिच्छंस्तु व्यक्तं प्राप्याभिषेचनम् ।
आवां हन्तुं समभ्येति कैकेय्या भरतः सुतः ॥
वाल्मीकिरामायण, २, ९६, १७.

दुसरा शिल्पपट्ट वालिवधाचा आहे. सीतेच्या शोधार्थ राम व लक्ष्मण हिंडत हिंडत किष्किन्धेस आले. तेथे हनुमानाची व त्यांची गांठ पडून त्याच्या मध्यस्थीने त्यांचें सुग्रीवाशीं सख्य झालें. सुग्रीवाची पत्नी रुमा हिला वालीने पळविली असल्याने तोहि दुःखी होता. त्याने सीतेचा शोध करण्यांत मदत करण्याचें वचन देऊन वालीचें पारिपत्य करण्यांत रामाची मदत मागितली. रामाने ती देण्याचें कबूल केल्यावर सुग्रीवाने वालीला युद्धाचें आव्हान दिलें. त्यांच्या युद्धांत सुग्रीवाचा पराजय होत आहे असें पाहतांच रामाने वृक्षाआडून बाण मारून वालीला घायाळ केलें. वाली जमिनीवर पडलेला पाहून राम व लक्ष्मण जवळ आले. तेव्हा वालीने आपण निरपराधी असतांना रामाने आपणांस बाण मारला याबद्दल त्याची निर्भर्त्सना केली. तेव्हा 'तूं आपल्या भावाच्या पत्नीशी व्यभिचार करतोस, तेव्हा तुला दंड करणेंच योग्य' असें रामाने आपल्या कृत्याचें समर्थन केलें.[1] तो प्रसंग या दुसऱ्या शिल्पपट्टांत दाखविला आहे.

या शिल्पपट्टांत वाली जमिनीवर पडलेला दिसत आहे. रामाच्या बाणाने घायाळ झाल्यामुळे रक्तस्रावाने तो व्याकुळ झाला होता. तथापि डाव्या हातावर भार टाकून तो अर्धवट उठून बसला आहे व उजव्या हाताने मान सावरून रामाकडे पाहत आहे. राम 'प्रत्यालीढ' स्थानांत उभा आहे. त्याचा डावा पाय पुढे असून वांकला आहे. डावा हात मांडीवर टेवला आहे. उजव्या हातांत कांही वस्तु आहे. रामाच्या मुद्रेवर तिरस्कारयुक्त अभिमान आहे. त्याचें शरीर सौष्ठव-

१ पाहा—तदेतत्कारणं पश्य यदर्थं त्वं मया हतः।
भ्रातुर्वर्तसि भार्यायां त्यक्त्वा धर्मं सनातनम् ॥
न हि लोकविरुद्धस्य लोकवृत्तादपेयुषः।
दण्डादन्यत्र पश्यामि निग्रहं हरियूथप ॥
वाल्मीकिरामायण, ४, १८, १८ व २१.

२ प्लेट ३ पाहा.

युक्त आहे. त्याच्या उभे राहण्याच्या ढबीमुळे उजव्या छातीजवळचा भाग फुगीर झाल्याचें दाखविलें आहे. यांत शिल्पकाराची निरीक्षण-शक्ति, शरीरशास्त्रज्ञान व शिल्पकौशल्य स्पष्टपणे दिसून येतात. रामाच्या गळ्यांत एक साधा हार व कमरेला उदरबंध दाखविला आहे. त्याच्या मागील बाजूस लक्ष्मण व सुग्रीव उभे आहेत. जवळच मोठ्या आकाराचीं फुलें कोरून त्यायोगें ज्या वृक्षांमागून रामाने बाण मारला ते दाखविले आहेत. साधेपणा, स्वाभाविकता, संयम, धार्मिकता हे गुप्तकालीन शिल्पांचे विशेष मानण्यांत येतात. ते सर्व या शिल्पपट्टांत आढळतात.

वाकाटक नृपतींनी बांधलेलीं देवालयें आता अस्तित्वांत नाहींत, तथापि त्यांच्या मांडलिकांच्या राज्यांतील दोन देवालयें सुदैवाने अद्यापि विद्यमान आहेत. त्यांवरून तत्कालीन मंदिरांची कल्पना करतां येते.

यांपैकी पहिलें देवालय जबलपुर जिल्ह्यांत बहुरीबंद जवळ तिगवा येथे आहे. तिगवा हें 'त्रिग्राम' याचें अपभ्रष्ट रूप होय. तिगवा, अंगोवा व देवरी मिळून हे तीन गांव होतात. असें सांगतात की, जवळच असलेल्या बहुरीबंद येथे एक मोठें नगर होतें व तिगवा आदि गांव त्याच्या परिसरांत मोडत होते. कनिंगह्यामने सन १८७३-७४ मध्ये तिगवा येथील अवशेष पाहिले, तेव्हा त्याला तेथे अडतीस देवळांचे पायवे आढळले. त्यांपैकी कांही देवळें चार फूट लांब व रुंद इतकीं लहान, तर कांही १५ फूट लांबी रुंदीचीं होतीं. त्यांपैकी अनेक देवळांचे दगड प्रॅट नामक रेल्वे ठेकेदाराने रेल्वेच्या बांधकामाकरिता वाहून नेले असें कनिंग्ह्यामला सांगण्यांत आलें.[1]

तिगव्याला एक प्राचीन देवालय मात्र अद्यापि सुस्थितींत असून तें गुप्तकालीन देवालयाचा उत्तम नमुना म्हणून मानण्यांत येतें. खिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या आरंभीं हा प्रदेश परिव्राजक नृपतींच्या

१ कनिंगह्याम्, आ. स. रि., पु. ९, पृ. ४२.

राज्यांत मोडत होता. परिव्राजक नृपति संक्षोभ याने गुप्त संवत् १९९ (इ. स. ५१८) मध्ये आपल्या डभाला (किंवा डाहल) देशांतील त्रिपुरी (सध्याचा तेवर) विषयांतील (जिल्ह्यांतील) दोन गावें दान दिलीं होतीं. त्यावरून या प्रदेशावर परिव्राजकांचें राज्य त्या काळांत होतें यांत संशय नाही. पण त्यापूर्वीं हा भाग पांडववंशी राजांच्या राज्यांत मोडत असावा. या राजांची राजधानी बांधवगड येथे होती, असें दिसतें. तिगवा बांधवगडच्या पश्चिमेस सुमारें ६५ मैलांवर आहे. ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकांत या भागांत पांडववंशी राजेच प्रबळ होते असें बह्मनी ताम्रपटावरून[२] दिसतें. त्या काळीं उच्चकल्प व परिव्राजक राजे हे बांधवगडच्या उत्तरेस खो, उचहरा इत्यादि प्रदेशांवर राज्य करीत होते असें त्यांच्या ताम्रपटांच्या प्राप्ति-स्थानांवरून अनुमान करतां येतें.[३] त्यांचें राज्य दक्षिणेस बहुरीबंदपर्यंत पसरलें होतें, असें दिसत नाही. मेकल देशावर राज्य करणारे पांडववंशी नृपति वाकाटक सम्राट् नरेन्द्रसेन याचे मांडलिक होते, असें बालाघाट ताम्रपटांत म्हटलें आहे.[४] पांडववंशी भरतबल हा आपल्या बह्मनी ताम्रपटांत नरेन्द्रसेनाची प्रच्छन्न स्तुति करतांना दिसतो त्यावरूनहि त्याने त्याचें स्वामित्व कबूल होतें असें अनुमान करतां येतें.[५] तिगवा बहुधा भरतबलाच्या राज्यांत मोडत असल्यामुळे तेथील देवालय वाकाटककालीन स्थापत्याचा नमुना समजण्यास हरकत नाही.

तिगव्याचें हें देवालय सध्या कंकाली देवीचें म्हणून प्रसिद्ध आहे.[६] ह्याची लांबी व रुंदी १२ फूट ९ इंच असून वरती सपाट छत आहे.

---

१ ए. इं., पु. ८, पृ. २८४ इ.
२ क्रमांक १८.
३ फ्लीट्, गु. इ. पृ. ९३–१३५.
४ क्रमांक १७, ओ. २८.
५ क्रमांक १८, ओ. ३४.
६ कनिंग्ह्याम्, आ. स. रि., पु. ९, प्लेट ११ पाहा.

देवळाच्या समोर व्हरांडा असून त्याला चार स्तंभ आहेत.[१] मधल्या दोन स्तंभांमधील अंतर २ फूट ९ इंच असून डाव्या व उजव्या बाजूंच्या दोन दोन स्तंभांमधील अंतर २ फूट ६ इंच आहे. अशा तऱ्हेचा फरक सांची, उदयगिरी, एरण इत्यादि ठिकाणच्या गुप्तकालीन देवळांतहि दिसतो, म्हणून ही त्या काळच्या देवळांची खूण समजली जाते.

हे चारी स्तंभ एकसारखे आहेत. फक्त त्यांच्या शीर्षभागांत किंचित् फरक आहे. हे स्तंभ खालील भागीं चौकोनी असून त्यावर अष्टकोनी केले आहेत. या भागावर पद्मबंध (lotus motif) कोरून त्यांना शोभा आणली आहे. त्यावरच्या भागावर उभा गलथा कोरलेला दिसतो; त्यावरचा भाग वर्तुलाकार व पद्मपत्रांकित असून नंतर पुनः बारीक गलथ्याने युक्त होऊन शेवटीं चौकोनी झाला आहे. त्यावर स्तंभाचे चौकोनी शीर्षक (capital) आहे. या शीर्षकाच्या खालच्या भागावर दोन दोन चैत्य वातायनें (chaitya windows) खोदून त्याला शोभिवंत केलें आहे. वरच्या भागाच्या प्रत्येक बाजूवर परस्पर विरुद्ध दिशांस तोंड केलेले दोन सिंह व त्यांमध्ये एक वृक्ष दाखविला आहे. हा वृक्ष आम्र, ताल इत्यादि प्रकारचा प्रत्येक शीर्षकावर भिन्न भिन्न प्रकारचा आहे. कोपऱ्यावर दोन बाजूंच्या दोन सिंहांना एकच तोंड दाखविलें आहे. हें सिंहांकित शीर्षक इराणी पद्धतीचें असून तें प्रस्तुत देवालयाच्या प्राचीनत्वाचें गमक आहे. एरण येथील गुप्तकालीन मंदिराच्या स्तंभांवर या तऱ्हेचेंच शीर्षक आहे.

तिगवाच्या या मंदिराचें गर्भगृह ८ फूट लांब व ७½ फूट रुंद आहे. त्याच्या दरवाजाच्या चौकटीला पाकळ्यांमध्ये कोरलेल्या सीताफळांच्या आकृतींनी सुशोभित केलें आहे. दरवाजाच्या चौकटीवरची पट्टी (लिंटल्) दोन्ही बाजूस वाढवून तिच्या खालीं डाव्या बाजूस गंगा व उजव्या बाजूस यमुना या नदीदेवतांचे सुंदर शिल्पपट्ट बसविले आहेत. दरवाजाच्या बाजूच्या गंगायमुनांच्या मूर्ति हें गुप्तकालीन

१ प्लेट ४ पाहा.

मंदिरांचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. उत्तरकालीन मंदिरांत या मूर्ति खालीं उंबरठ्याच्या बाजूस बसविलेल्या असतात. गंगेची मूर्ति एका मनुष्यास गिळणाऱ्या मकरावर उभी आहे. तिच्या डाव्या बाजूस एका स्त्रीची आकृति हातांत कांही उपायन घेऊन उभी आहे. त्याच्यावर गंगेने आपला उजवा हात ठेऊन त्याचा स्वीकार केला आहे. उजव्या बाजूस चामरधारी सेवक उभा आहे. गंगेच्या मूर्तीवर सीताफळाच्या झाडाची कमान झाली आहे. आणि ती आपल्या उजव्या हाताने एक सीताफळ तोडीत असलेली दाखविली आहे.[1]

गंगेने अनेक अलंकार धारण केले आहेत. तिच्या केशपाशांत मुक्तायुक्त ललाटिका, कानांत वर्तुलाकार कुण्डल, गळयांत मुक्ताफलकहार, भुजांवर केयूर, मणिबंधांत वलयें, कमरेंत रशना आणि पायांत नूपुर आहेत. गळयांत गुडघ्यापर्यंत लोंबणारी माला आहे. तिच्या मुखावर प्रसन्नता विलसत आहे. तिची उभे राहण्याची ढब त्रिभंग पद्धतीची आहे. गंगेची ही मूर्ति तत्कालीन शिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे.

दरवाज्याच्या उजव्या बाजूस यमुनेची मूर्तिहि अशाच प्रकारची आहे. ती कूर्मावर उभी असून तिच्या वर आम्रवृक्षाने कमान केली आहे. तिने आपल्या डाव्या हाताने आम्रवृक्षाची शाखा धरली असून उजव्या हाताने ती आम्रफल तोडीत आहे. तिच्या डाव्या बाजूस पुरुषाची व उजव्या बाजूस स्त्रीची आकृति आहे. तीं दोघेंहि कमलदंडावर उभीं आहेत.

दरवाजाच्या गणेश पट्टीवर सात चौकोनी ठोकळे दाखविले आहेत.[2] ते या ठिकाणीं केवळ शोभेकरिता असले तरी पूर्वी हीं देवालयें लांकडाचीं बांधलीं जात याचे ते निदर्शक आहेत; कारण त्यावेळीं बाहेर आलेल्या

१ प्लेट ५ पाहा.

२ कनिंग्ह्याम्, आ. स. रि., पु. ९, प्लेट १० पाहा.

कड्यांचीं तीं चौकोनी टोंकें असत. अशाच प्रकारचे आणखी तेरा ठोकळे सर्वांत वरच्या पट्टीवरहि दाखविले आहेत.

तिगव्याचें हें मन्दिर खिस्तोत्तर पांचव्या शतकांतलें असावें. कांही काळाने त्याच्या व्हरांड्याला दोन्ही बाजूंनीं बंद करून त्याच्या आंतल्या बाजूस शिल्पपट्ट बसविण्यांत आले. डावीकडे वरच्या बाजूस कालीची अष्टभुजा मूर्ति आहे. तिच्या हातांत ढाल, पट्टिश, धनुष्य इत्यादि आयुधें असून सभोंवार अस्थिपंजर झालेले गण तिची प्रार्थना करीत आहेत. खालच्या शिल्पपट्टावर भगवान् विष्णूची शेषशायी चतुर्भुज मूर्ति कोरली आहे. त्याच्या नाभींतून निघालेल्या कमलदंडावर ब्रह्मदेव बसला आहे. लक्ष्मी भगवान् विष्णूचे पाय चुरीत आहे. उजव्या बाजूच्या वरील शिल्पपट्टांत कालीची दुसरी मूर्ति असून खालील शिल्पपट्टांत विष्णूच्या वराह अवताराची मूर्ति आहे.

व्हरांड्याच्या एका स्तंभावर 'सिद्धिः [।*] शेतभद्रस्थान-सामान्यभट्टपुत्र उमदेवः। कर्ण्णकुब्जसनीपः' असा तीन ओळींचा लेख आहे.[१] त्याच्या अक्षरवटिकेवरून तो सातव्या–आठव्या शतकांतील असावा. त्याच काळांत हे नंतरचे शिल्पपट्ट व्हरांड्याच्या दोन्ही बाजूस बसविले असावे. याच्याहि नंतर कांही काळाने बसविलेला शिल्पपट्ट डाव्या बाजूस आहे. त्यावर बुद्धमूर्ति दिसते.

वाकाटक नृपतींच्या काळचें दुसरें एक मंदिर नचना येथे आहे. नचना हें विन्ध्यप्रदेशांत गंज या गावापासून पश्चिमेस दोन मैलांवर आहे. नचना व गंज या दोन्ही ठिकाणीं वाकाटक नृपति (द्वितीय) पृथिवीषेण याचा मांडलिक उच्चकल्पवंशी व्याघ्रदेव याचे दोन शिलालेख सांपडले आहेत. तेव्हा हा प्रदेश पांचव्या शतकांच्या

---

१ कझिन्स्, प्रो. रि. आ. स. वे. इं., १९०३–४, पृ. ५५. माझें वर दिलेलें वाचन फोटोवरून केलें आहे.

२ पाहा – 'वाकाटकानां महाराजश्रीपृथिवीषेणपादानुध्यातो व्याघ्रदेवो मातापित्रोः पुण्यार्थं कृतमिति'। क्रमांक २०–२१.

चतुर्थ पादांत वाकाटक साम्राज्यांत समाविष्ट होता, यांत संशय नाही. नचना गावांत कनिंगह्यामला दोन देवालयें आढळलीं. त्यांपैकी अगोदरचें देवालय वाकाटककालीन असावें. त्याला आता पार्वतीचें देवालय असें म्हणतात, पण आंतील पीटावर कोणत्याच देवतेची मूर्ति नाही. हें देवालय अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. गुप्त–वाकाटककालीन देवालयें सपाट छपराचीं असतात.[1] मागे वर्णिलेलें तिगवा येथील देवालय याच प्रकारचें आहे; पण या नचन्याच्या देवालयाच्या गर्भगृहावर एक खोली बांधली आहे.[2] या खोलींत जाण्यास जिन्याची सोय केलेली सध्या तरी दिसत नाही. त्यावरून तिचा उद्देश गर्भगृहाचें स्थान उपासकांस दुरून कळावें एवढाच दिसतो. कालांतराने या खोलीच्या जागीं शिखर आलें व त्याचे भिन्न भिन्न प्रकार उत्तर व दक्षिण भारतांत प्रचलित झाले. तेव्हा नचना येथील हें देवालय तिगव्याच्या देवालयानंतरचें व देवगड येथील गुप्तकालीन शिखरयुक्त देवालयाच्या[3] पूर्वीचें असलें पाहिजे. त्याचा काळ पांचव्या शतकाचा अखेर मानण्यास हरकत नाही.

नचन्याच्या देवालयाचें आणखी एक वैशिष्ट्य हें की त्याला आच्छादिलेला प्रदक्षिणापथ आहे. सांची, तिगवा, एरण इत्यादि ठिकाणच्या देवळांना आच्छादिलेला प्रदक्षिणापथ नाही. नचना येथील देवालयाचें गर्भगृह जवळ जवळ चौरस आकाराचें आहे. त्याची लांबी १५ फूट ९ इंच व रुंदी १५ फूट आहे. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणेकरिता

---

१ अजंटाच्या १६ क्रमांकाच्या लेण्यांतील एका चित्रांत देवळांवर घुमटाच्या आकाराचें शिखर व त्यावर आमलक दिसतो. यज्दानी, अजंटा, पु. ३, प्लेट ६१ पाहा.

२ राखालदास बॅनर्जी, दि अेज् ऑफ दि इंपीरिअल् गुप्ताज्, प्लेट ३ पाहा.

३ वत्स, दि गुप्त टेंपल् अॅट् देवगड, पृ. ८.

पांच फूट रुंदीचा मार्ग आहे. तो तीन फूट जाडीच्या भिंतींनी वेष्टिला आहे. पुढील भिंतीला गर्भगृहाच्या दरवाज्यासमोर प्रवेशद्वार असून त्याच्या पुढे बारा फूट लांबी रुंदीचा अनाच्छादित चौथरा आहे. त्यावर जाण्याकरिता साडेचार फूट उंचीच्या पायऱ्या आहेत.

गर्भगृहाच्या दरवाजाच्या चौकटीच्या आंतील पट्टीवर सुंदर नक्षीकाम असून बाहेरील पट्टीवर मिथुनें (स्त्री व पुरुष यांची जोडपीं) कोरलीं आहेत. चौकटीच्या दोन्ही बाजूस छावणीच्या (लिंटल्च्या) उंचीवर तिगव्याच्या देवळांतल्याप्रमाणें गंगा व यमुना यांच्या मूर्ति आहेत. सर्व मूर्तींचें खोदकाम साधेपणा, अकृत्रिमता, सौंदर्य इत्यादि गुणांनी युक्त आहे.[१]

प्रकाशाकरिता प्रदक्षिणापथाच्या बाहेरील भिंतींस चैत्यवातायनें असून त्याच्या समोरच गर्भगृहाच्या भिंतीस चौकोनी छिद्रांच्या जाळया बसविल्या आहेत. गर्भगृहावरील खोलीचें, तसेंच प्रदक्षिणापथावरचेंहि छपर सपाट आहे. प्रदक्षिणापथाच्या भिंतींना बाहेरच्या बाजूस मोठमोठया प्रस्तरांचा आकार दिला असून त्यांतील गुहांत सिंह, अस्वल, हरिणें, माकडें, मोर इत्यादि पशुपक्ष्यांप्रमाणें यक्ष, गण, स्त्री व पुरुष दाखविले आहेत. एका ठिकाणीं गोवर्धनोद्धाराचा शिल्पपट्ट दिसतो. मागील भिंतीवर नाग, नागी आणि नागबालक यांचा शिल्पपट्ट आहे. त्यांच्या हातांत उपायनांचीं वाटोळीं तबकें आहेत. गर्भगृहावरच्या खोलीच्या पुढील भिंतीला दरवाजा आहे, पण तिच्या भिंतीच्या आंतील व बाहेरील बाजूंवरहि नक्षीकाम नाही.

नचना येथील देवालयाच्या बाहेरच्या भिंतींना पर्वतांत खोदलेल्या लेण्यांचा आकार दिला होता. भारतीय देवालयें कालान्तराने लेण्यांतून उत्क्रांत झालीं याचें हें निदर्शक आहे. भारतांतील अत्यंत प्राचीन मंदिरें म्हणजे पर्वतांत खोदलेलीं विहार व चैत्य लेणीं हीं होत. या तऱ्हेच्या स्थापत्यकलेंतहि विदर्भाचे कारागीर निष्णात होते. अजंटा यथील सोळा,

---

१ प्लेट ६ पाहा.

सतरा व एकोणीस क्रमांकांचीं लेणीं स्थापत्य व चित्रकला या दोन्ही दृष्टींनी अजंट्याच्या इतर सर्व लेण्यांपेक्षा, किंबहुना भारतांतील कोणत्याहि ठिकाणच्या लेण्यांपेक्षां उत्कृष्ट आहेत असे बर्जेसने[1] म्हटलें आहे. हीं तीन्ही लेणीं वाकाटक कालांत खोदलीं होतीं.

यांतील सोळा नंबरचें लेणें वाकाटक नृपति हरिषेण याच्या वराहदेव नामक सचिवानें आपल्या मातापित्यांच्या पुण्योपचयाकरिता खोदविलें होतें.[2] अजंट्याच्या सर्व लेण्यांत हें कांही बाबतींत अत्युत्कृष्ट गणलें जातें. या लेण्याच्या समोरील व्हरांडा ६५ फूट लांब आणि १० फूट, ८ इंच रुंद असून त्याला मध्ये सहा साधे अष्टकोनी स्तंभ आणि प्रत्येक टोंकास एक एक सुबक कोरीव काम केलेला अर्धस्तंभ होता. त्यांपैकी आता एकच स्तंभ अवशिष्ट आहे. या व्हरांड्यांतून आंतील मंडपास जाण्यास तीन दरवाजे आहेत. त्यांपैकी मधला दरवाजा मोठा आणि बाजूचे दोन लहान आहेत. मधल्या आणि बाजूच्या दरवाजांमध्ये दोन्ही बाजूस एक एक खिडकी आहे.[3] मोठ्या दरवाजाच्या चौकटीच्या बाजूच्या बारीक स्तंभांवर दोन्ही बाजूंस मकरवाहना गंगेची मूर्ति खोदली आहे.[4] आंतील मंडपाचा पुढील संपथ (Corridor) मागील संपथापेक्षा जरा जास्त लांब—७४ फूट—आहे. शिवाय या संपथाच्या छतावर तुळया व कड्या लांकडी कामांत दिसतात तशा दाखविल्या आहेत. पूर्वी प्रचलित असलेल्या लांकडी छताचें अनुकरण लेणीं कोरतांना केलें गेलें याचें हें निदर्शक आहे. तुळयांच्या शेवटास ब्रॅकेट असून त्यावर गण किंवा गन्धर्व-अप्सरांचें मिथुन कोरलें आहे.

---

१ बर्जेस्, दि केव्ह टेंपल्स् ऑफ इंडिया, पृ. ३०४.

२ क्रमांक २४, ओ. १८.

३ प्लेट ७ पाहा.

४ इतरत्र बहुधा डाव्या बाजूस गंगेची आणि उजव्या बाजूस यमुनेची मूर्ति असते.

मंडपाचा हॉल ६६ फूट ३ इंच लांब, ६५ फूट २ इंच रुंद आणि १५ फूट ३ इंच उंच आहे. याला एकंदर वीस खांब असून त्यांपैकी सोळा साधे अष्टकोनी आहेत, पण पुढील आणि मागील ओळींतील मधले दोन दोन खांब खालीं चौकोनी, त्यावर अष्टकोनी व नंतर षोडशकोनी होऊन शेवटीं पुनः चौकोनी झाले आहेत. त्यानंतर त्यांच्यावर शीर्षक (Capital) व ब्रॅकेट दाखविले आहेत. या खांबांना पत्रबंध व गलथा यांनी सुशोभित केलें आहे. मागच्या संप-थाच्या पाटीमागे चैत्यमंदिर (गर्भगृह)असून त्यांत जाण्याला तीन दरवाजे आहेत. मध्यभागीं भगवान् बुद्धाची भव्यमूर्ति धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेंत सिंहासनावर बसलेली दाखविली आहे. बुद्धाच्या मुखाभोंवती तेजोवलय असून त्याच्या दोन बाजूस वज्रपाणि व पद्मपाणि चामरें घेऊन उभे आहेत. सभोंवार प्रदक्षिणेकरिता जागा आहे.

मंडपाच्या दोन बाजूंस प्रत्येकीं सहा, मागील भिंतींत दोन व व्हरांड्याच्या दोन बाजूंस दोन अशा एकंदर सोळा लहान खोल्या भिक्षूंकरिता खोदल्या आहेत.

या सोळाव्या लेण्यांत सुंदर चित्रें काढलीं होतीं. त्यांचा उल्लेख त्यांतील कोरीव लेखांत ' सुवीथि ' शब्दानें केला आहे.[१] या चित्रांपैकी बरीचशीं आतां अंशतः किंवा पूर्णपणें नष्ट झालीं आहेत. तथापि अवशिष्ट चित्रावरूनहि तत्कालीन चित्रकारांच्या उत्कृष्ट कलेची कल्पना करतां येते.

सोळाव्या लेण्यांतील चित्रांचा विशेष हा कीं त्यांतील बहुतेक बुद्धाच्या शेवटच्या जन्मांतील प्रसंगांविषयीं आहेत. क्वचित् त्याच्या पूर्वजन्मांतील प्रसंग (किंवा जातककथा) चित्रांचे विषय झाले आहेत,

---

१ क्रमांक २४, ओ. १९. उत्तररामचरितांतील पहिल्या अंकांत ' वीथिका ' हा शब्द याच अर्थी योजिला आहे. 'त्रिकांडशेषां'त वीथिका शब्दाचा हाच अर्थ दिला आहे.

पण अशीं चित्रें एकंदरींत थोडीं आहेत, आणि त्यांतील बहुतेक व्हरांड्यांत काढलीं आहेत. उदाहरणार्थ, नरमांसभक्षक सौदास राजाला पश्चात्ताप करावयास लावलेल्या सुतसोमाची जातककथा[1] व्हरांड्यांतील समोरच्या स्तंभांवरच्या छावणीवर चित्रित केली आहे. हस्तिजातक[2] (ज्यांमध्ये एका हत्तीने बुभुक्षित प्रवाशाचे प्राण वांचविण्याकरिता आत्मयज्ञ केला) आणि महाउम्मग्ग जातक[3] (ज्यामध्ये महोसध नामक बालकाने मोठमोठ्या बिकट प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें दिलीं) यांच्या कथाहि व्हरांड्याच्या भिंतीवरच चित्रांनी सांगितल्या आहेत.

मंडपांत प्रवेश केल्यावर उजव्या बाजूच्या भिंतीवरील चित्रें ओळीने पाहत गेल्यास तीं गौतम बुद्धाच्या चरित्रांतील घटनांना अनुलक्षून क्रमाने काढलीं आहेत हें लागलीच ध्यानांत येतें. मंडपांतील उजव्या बाजूच्या दुसऱ्या व तिसऱ्या खोलीवरच्या भिंतीवर बुद्धजन्माचा देखावा चित्रित केला आहे. राजप्रासादातील एका चौकोनी शयनागारांत मायादेवी पलंगावर झोंपली आहे. जवळच तिच्या दोन दासी जमिनीवर निद्रावश झाल्या आहेत. हें दृश्य मायादेवीच्या स्वप्नाचें असावें. पण येथील बराचसा भाग आता खराब झाल्यामुळे मायादेवीला स्वप्नांत दिसलेला श्वेत हत्ती नष्ट झाला आहे. जवळच्या दुसऱ्या चित्रांत एका वर्तुलाकार मंडपांत मायादेवी आपला पति शुद्धोदन यास गेल्या

१ पालिजातक, क्रमांक ५३७; जातकमाला क्र. ३१.

२ जातकमाला, क्र. ३०.

३ पालिजातक, नं. ५४६.

४ यज्दानींनी आपल्या ‘अजंटा’, पु. ३, या ग्रंथांत डाव्या बाजूने चित्रांच्या वर्णनास आरंभ केल्यामुळे त्यांचा क्रम उलटा झाला आहे. चित्रांच्या स्थानाकरिता प्लेट ७ पाहा. यापुढे वर्णिलेल्या चित्रांच्या प्लेटी श्री. यज्दानींच्या ‘अजंटा,’ पु. ३ व ४ यांना जोडलेल्या आढळतील, त्या पाहाव्या.

रात्रीं आपणांस पडलेलें स्वप्न सांगत आहे. जवळच कांही बसलेल्या व इतर उभ्या राहिलेल्या तिच्या दासी व सेवकजन तिचें भाषण एकाग्र चित्ताने ऐकत आहेत.

यानंतरच्या चित्रांत डाव्या बाजूस असित ऋषि नुकत्याच जन्मलेल्या बालकाला मांडीवर घेऊन त्याचें एकाग्रतेने निरीक्षण केल्यावर त्याचें भविष्य सांगत आहे. जवळच्या दुसऱ्या चित्रांत लहानगा गौतम पाटीवर धुळाक्षरें शिकत आहे. त्याने उंच कोनाची टोपी घातली आहे. तिला आडवी फीत बांधली आहे. जवळच बसलेल्या मुलाने मात्र टोपी घातली नसल्याने त्याच्या डोक्यावरची शिखा स्पष्ट दिसत आहे तोहि लिहिणें वाचणें शिकत आहे.

याच्या खालच्या चित्रांत गौतम प्रत्यालीढ स्थानांत उभा असून धनुर्विद्या शिकत असल्याचें दाखविलें आहे. त्याच्या डाव्या बाजूच्या चित्रांत गौतमाने म्हातारा, व्याधिग्रस्त व मृत मनुष्य यांना पाहिल्यावर त्याला संसाराविषयीं निर्वेद उत्पन्न झाला असें दाखविलें होतें. पण हा भाग आता अत्यंत खराब झाला आहे.

यानंतरच्या चित्रांत गौतमाला ज्ञानप्राप्ति झाल्यावर त्रपुष व भल्लिक या दोन व्यापाऱ्यांनी त्याला मध व तांदळाचे अपूप खावयास दिले आणि सुजाता नामक एका कुलीन तरुण स्त्रीने पायसाची भिक्षा घातली, यांचीं दृश्यें दाखविलीं आहेत. यानंतर बुद्ध राजगृहांत भिक्षेला गेला त्या प्रसंगाचें चित्र काढलें आहे. या चित्रांत तत्कालीन सपाट छपरांचीं घरें, त्यांचें उन्हापावसापासून संरक्षण करण्याकरिता लावलेले लांकडी छज्जे, बाजूचें जाळीचें काम इत्यादि गृहस्थापत्याचे विशेष उत्तम रीतीने दाखविले आहेत.

मंडपाच्या मागील भिंतीवर चैत्यमंदिराच्या दरवाजाच्या दोन्ही बाजूस बुद्धाच्या धर्मोपदेशाच्या प्रसंगांचीं चित्रें आहेत. चैत्यमंदिरांत

भगवान् बुद्ध धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेंत सिंहासनावर बसला असल्यामुळे बाहेर दरवाजाच्या दोन्ही बाजूंस हीं चित्रें काढण्यांत चित्रकारांनी विशेष औचित्य दाखविलें आहे यांत संशय नाही. यांपैकी डाव्या बाजूच्या चित्रांत अजातशत्रु बुद्धाच्या दर्शनास आपल्या लवाजम्यासह गेला त्याचें चित्र आहे. तें आता फार खराब झालें असलें तरी त्यांत उंची झूल व मौल्यवान् मोत्यांच्या माळा घालून सजविलेले अनेक हत्ती, त्यांच्या बरोबर चालणारे पदाति, ढाल तलवार घेतलेले सैनिक, वाद्यें वाजविणारे वाजंत्री इत्यादिकांच्या गर्दीमुळे तत्कालीन राजेलोकांच्या छबीन्याची उत्तम कल्पना येते. संस्थानांच्या विलीनीकरणापूर्वी त्यांच्या राजधानींत पौरजनांना अशा छबीन्यांचीं दृश्यें विजयादशमीसारख्या प्रसंगविशेषीं दिसत असत, त्यांची आठवण हें चित्र पाहून होते.

जवळच बुद्धाच्या धर्मोपदेशाचें चित्र आहे भगवान् बुद्ध सिंहासनावर बसला असून त्याचे पाय दोन नागांनी ज्याचा नाल धरला आहे अशा प्रफुल्ल कमलावर ठेवले आहेत. बुद्धाच्या दोन बाजूस पद्मपाणि व वज्रपाणि उभे आहेत. सभोवार अनेक स्त्रीपुरुष व भिक्षु भक्तियुक्त चित्ताने भगवंताचें प्रवचन ऐकत आहेत. सिंहासनाच्या जवळ डाव्या बाजूस एक किरीटधारी पुरुष विनम्रभावाने धर्मोपदेश श्रवण करीत बसला आहे, तो मगधनृपति अजातशत्रु असावा. त्याच्या पाठीमागे त्याच्या राण्याहि बसल्या आहेत.

दरवाजाच्या उजव्या बाजूस असेंच बुद्धाच्या धर्मोपदेशाचें चित्र आहे, पण तें आता फार खराब झालें आहे. त्यामध्ये अनेक किरीटधारी पुरुष व भिक्षु भगवान् बुद्धाचा धर्मोपदेश एकाग्र चित्ताने श्रवण करीत आहेत असें दाखविलें आहे. हें दृश्य तुषित नामक दिव्य लोकांत जाऊन बुद्धाने धर्मोपदेश केला त्या प्रसंगाचें असावें.

आता आपण मंडपांतील डाव्या भिंतीवरील चित्रें पाहत पाहत आंतून बाहेर येऊं. डाव्या बाजूच्या खोलीवरच्या भिंतीवरील हवेंत

उड्डाण करणाऱ्या अप्सरेचें चित्र प्रेक्षणीय आहे. तिच्या डोक्यावर लोंबणारे कुरळे केस, केशपाशांतील ललाटिका, बुचडयावरील पुष्पमाला, कानांतील लोंबणारीं कुंडलें, गळ्यांतील मोठया रत्नांचा एकसर, बाहूंवरील केयूर, हातांतील कंकण आदि अलंकार आणि नेसलेलें पट्ट्यांचें अर्धोरुक (गुडघ्यापर्यंतचें अधोवस्त्र) उत्तम रीतीनें दाखविलीं आहेत.

याच्या पलीकडे चौथ्या खोलीवरच्या भिंतीवरचें मूळचें चित्र खराब झाल्यामुळे एक दोन शतकानंतर तेथे मानुषी बुद्धांच्या आकृति दोन रांगांत रंगविण्यांत आल्या. खालच्या रांगेंत वाटोळ्या आसनावर लोडाशीं टेकून बसलेल्या चार बुद्धांच्या आकृति असून त्यांच्या डोक्यावर तीन तीन छत्रें आहेत. वरच्या रांगेंत सात आठ बुद्धांच्या छत्ररहित आकृति आहेत. ह्या आकृति सांप्रदायिक पद्धतीच्या असून तेथील रंगवलेल्या लेखांवरून त्या सहाव्या शतकांत भदन्त धर्मदत्त आणि भदन्त बापुक यांनी काढविल्या होत्या, असें समजतें.[1]

यापलीकडे दुसऱ्या व तिसऱ्या खोल्यांवरच्या भिंतींवर गौतम बुद्धाचा मावसभाऊ नन्द याच्या धर्मप्रवेशाचीं चित्रें काढलीं आहेत. भगवान् बुद्ध ज्ञानप्राप्तीनंतर कपिलवस्तूला आला, तेव्हा नंदाचा यौवराज्याभिषेक होत होता, त्याचें चित्र प्रथम दिसतें. बुद्ध राजवाडयांत आला तेव्हा त्याला त्याची पत्नी व पुत्र (राहुल) सामोरे आले. त्यानंतर त्याने नन्दाला भेटून त्याच्या हातांत आपलें भिक्षापात्र दिलें. तेव्हा त्याने भिक्षु होण्याचें कबूल केलें. नंतर त्याचें मुंडन करण्यांत येऊन त्याला दीक्षा देण्यांत आली; पण पुढे त्याला आपल्या अत्यन्त सुंदर पत्नीची आठवण होऊन तो खिन्न झाला. तेव्हा बुद्धाने त्याला दिव्य लोकांत नेऊन तेथील अप्सरा दाखविल्या. त्यांच्या प्राप्तीकरितां त्याने भिक्षु म्हणून राहण्याचें कबूल केलें. ही कथा[2] या चित्रांत सांगि-

१ यजदानी, अजंटा, पु. ३, पृ. ९४ इ.

२ सौन्दरनन्द, सर्ग ४–५.

तली होती, पण चित्रें आता खराब झाल्यामुळे ती कथा अतिशय खंडित झाली आहे.

या कथेंतील शेवटच्या प्रसंगाचें चित्र मात्र अद्यापि चांगल्या स्थितींत असून सर्व तज्ज्ञांनी त्याची मुक्त कंठाने स्तुति केली आहे. नन्दाने भिक्षु म्हणून राहण्याचा निश्चय केल्यावर त्याचा मुकुट त्याची पत्नी सुन्दरी हिच्याकडे एका सेवकाने आणला. तो पाहून सुन्दरी शोकाने मरणोन्मुख झाली.[1] हा प्रसंग मंडपाच्या पुढल्या गॅलरीच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर चित्रित केला आहे.[2]

सुन्दरी एका सखल आसनावर लोडाला टेकून बसली आहे. मरणोन्मुख अवस्थेंत असल्यामुळे तिची मान खाली गळली आहे. तिच्या अर्धवट मिटलेल्या डोळयांवरून तिचा शक्तिपात सूचित झाला आहे. ती खाली पडूं नये म्हणून एका दासीने तिला मागून सावरून धरलें आहे. तिच्या उजव्या बाजूस बसलेली दासी तिच्याकडे दुःखपूर्ण दृष्टीने पाहत आहे. तिने आपला एक हात सुन्दरीच्या हातावर ठेविला असून, ती तिची नाडी पाहत आहे. दुसरा हात शोकाने धडधडणाऱ्या आपल्या छातीवर ठेवला आहे. जवळच उभ्या असलेल्या पंखेवाल्या दासीच्या विकलांगत्वावरून तिच्या मनांतील चिन्ता व्यक्त होत आहे. तिच्या बाजूस असलेल्या सेवकांच्या मुखांवरहि सुन्दरीच्या अवस्थेबद्दल दुःख व काळजी स्पष्ट दिसत आहेत. उजव्या बाजूस बाहेरच्या अंगणांत उभ्या असलेल्या दोन दासी सुन्दरीच्या अवस्थेबद्दल आपसांत चर्चा करीत आहेत. मंडपावर बसलेला मोरहि दुःखाने विह्वल झाला आहे.

---

१ या प्रसंगाचें 'सौंदरनन्दां'तील (६, ३२) वर्णन पाहा—
सन्दृश्य भर्तुश्च विभूषणानि वासांसि वीणाप्रभृतीश्व लीलाः । तमो विवेशाभिननाद चोच्चैः पङ्कावतीर्णेव च संससाद ॥

२ पंतप्रतिनिधि, अजंठा, पृ. ५५ समोरील चित्रांक ३४ पाहा.

तो आपली मान लांब करून जणूं काय या दासींचें बोलणें ऐकण्याचा प्रयत्न करीत आहे, असें वाटतें.[1]

या चित्राची प्रशंसा अनेक पाश्चात्य कलाकोविदांनी केली आहे. ग्रिफिथ म्हणतो, 'शोक, कारुण्य आणि स्पष्ट रीतीने कथाकथनाची पद्धत या बाबतींत या चित्राला मागे टाकणारी कृति कलेच्या इतिहासांत सापडणार नाही. फ्लॉरेन्स्‌चे चित्रकार यापेक्षा चांगल्या आकृति कदाचित् काढूं शकले असते आणि व्हेनिसच्या कलाकारांना कदाचित् त्यांत यापेक्षा जास्त चांगले रंग भरतां आले असते; पण त्यांपैकी कोणालाहि यांतील भावना यापेक्षा जास्त उत्तम रीतीने व्यक्त करतां आल्या नसत्या.'[2] या चित्रांत वाकाटककालीन चित्रकारांनी उच्चांक गाठला असें म्हणण्यास हरकत नाही.

सोळा क्रमांकाच्या लेण्यापुढून पायऱ्यांनी खाली उतरलें असतां नागराजाचें लहानसें लेणें लागतें. त्याचा उल्लेख उपरिनिर्दिष्ट वराहदेवाच्या लेखांत केला आहे.[3] एका नागाने केलेल्या वेटोळ्यावर नागराज बसला असून त्याच्या शिरावर उंच रत्नजडित मुकुट आहे. त्यावर त्या नागाने आपली फणा पसरली आहे. अजंट्याचीं लेणीं नाग कारागिरांनी खोदलीं असल्याने त्यांमध्ये अशा नागराजांच्या प्रतिमा अनेक ठिकाणीं कोरल्या आहेत.

क्रमांक १६ च्या लेण्याजवळचीं क्रमांक १७ व १९ हीं लेणींहि वाकाटककालांत खोदलीं होतीं. सतराव्या लेण्याच्या व्हरांड्यांतील लेखावरून तीं वाकाटक नृपति हरिषेणाच्या मांडलिकाने रविसांब नामक आपल्या लहान भावाच्या अकालीं निधनाने संसाराची असारता पट-

---

१ प्लेट ८ पाहा.

२ बर्जेस, के. टे. इं., पृ. ३०७.

३ पाहा—नागेन्द्रवेश्मादिभि[रप्यलङ्कृतम्] ॥ क्रमांक २४, ओ. २०–२१.

त्यावर भिक्षुसंघाकरितां खोदविलीं होतीं असें कळतें. यांपैकी १७ क्रमांकाचें लेणें विहारपद्धतीचें असून १९ क्रमांकाचें चैत्यपद्धतीचें आहे.[1]

१७ क्रमांकाचें विहार लेणें सामान्यतः १६ क्रमांकाच्या लेण्यासारखेंच आहे. याचा व्हरांडा ६४ फूट लांब व १० फूट रुंद असून त्याला समोर सहा साधे अष्टकोनी स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. या बाजूच्या अर्धस्तंभावर सुंदर कोरीव काम केलें आहे. व्हरांड्यांतून मागील मंडपांत जाण्याला मध्यभागीं एक मोठा, आणि डाव्या बाजूला लहान दरवाजा आहे. लहान व मोठ्या दरवाजांमध्ये डाव्या बाजूस एक खिडकी आहे. तसेंच उजव्या बाजूस एक रुंद आणि दुसरी अरुंद अशा दोन खिडक्या आहेत. आंतील मंडप ६४ फूट लांब, ६२ फूट रुंद आणि १३ फूट उंच आहे. त्याला एकूण वीस स्तंभ आहेत.[2] त्यांपैकी पुढील व मागील रांगेंतील मधल्या दोन दोन स्तंभांशिवाय बाकी सर्व अष्टकोनी आहेत. हे चार स्तंभ मात्र खाली चौकोनी, पुढे अष्टकोनी व नंतर षोडशकोनी झाले असून त्यांवर जास्त नकशीकाम आहे. सर्व स्तंभ विविध प्रकारच्या वेलपत्ती, आकृति व चित्रें यांनी सुशोभित केले आहेत. मंडपाच्या मागील बाजूस १७ फूट, ९ इंच लांब व ८ फूट, ५ इंच रुंद, असें अंतराल आणि त्याच्या मागे १७ फूट, ९ इं. × १९ फू., ६ इं., या आकाराचें चैत्यमंदिर (गर्भगृह) आहे. या चैत्यमंदिराच्या दरवाजाच्या चौकटीच्या तीन्ही उभ्या पट्ट्यांना वेलपत्ती, विविध मुद्रांतील बसलेले व उभे बुद्ध इत्यादिकांनी सुशोभित केलें आहे.

---

१ क्रमांक २६, ओ, २४–२५. श्री. यजदानींच्या मतें अजंटाच्या १७ क्रमांकाच्या लेण्यांत उल्लेखिलेली गन्धकुटी ही एकोणीस क्रमांकाचें चैत्यलेणें नसून, तें दुसरेंच, आता नष्ट झालेलें, लेणें असावें. पण या तर्कास कांही आधार नाही; कारण तसें असतें तर त्या लेण्याचे कांही तरी अवशेष दिसले असते.

२ या लेण्याचें मानचित्र, प्लेट ९ पाहा.

छावणीच्या उंचीवर दोन्ही बाजूंस मकरवाहना गंगेची मूर्ति आहे. चैत्य-मंदिरांतील आसनाच्या दोन्ही बाजूंवर मकराच्या तोंडांतून एक मनुष्य जीव वांचविण्याकरिता बाहेर उडी मारीत आहे असें दाखविलें आहे. आसनाच्या समोरील भागावर दोन बाजूंस एक एक हरिण आणि मध्ये चक्र कोरून गौतम बुद्धाने सारनाथ येथील मृगवनांत भिक्षूंना प्रथम धर्मोपदेश केला तो सूचित केला आहे. भगवान् बुद्धाची मूर्ति अत्यंत भव्य आहे. तो योगासनांत बसला असून त्याचे हात धर्मचक्रप्रवर्तन-मुद्रेंत आहेत, म्हणजे उजव्या हाताचा अंजठा व तर्जनी यांमध्ये डाव्या हाताची करंगळी धरून तो बौद्ध धर्माचीं तत्त्वें मोजून सांगत आहे, असें दाखविलें आहे. बुद्धाच्या मूर्तीच्या डाव्या बाजूस पद्मपाणि बोधि-सत्त्व आणि उजव्या बाजूस वज्रपाणि बोधिसत्त्व यांच्या उभ्या मूर्ति आहेत. त्यांनी डाव्या हातांत चामर आणि उजव्या हातांत आपलें लांछन (पद्म किंवा वज्र) धरलें आहे. तसेंच आसनाच्या दोन बाजूंस दोन सेवकांच्या लहान मूर्ति असून त्यांपैकी एकाच्या हातांत बुद्धाचें भिक्षापात्र आहे. दुसऱ्याच्या हातांतील वस्तु आता भग्न झालेली आहे. बुद्धाच्या मुखाभोवतीं तेजोवलय असून दोन बाजूंस आकाशांतून एक एक विद्याधर उपायन घेऊन येऊन तें बुद्धाला अर्पण करीत असलेला दाखविला आहे.

या विहार लेण्यांत व्हरांड्याच्या दोन बाजूंना दोन, मंडपाच्या दोन बाजूंच्या भिंतींत प्रत्येकी सहा अशा बारा, आणि मंडपाच्या मागील भिंतींत दरवाजाच्या प्रत्येक बाजूस दोन, अशा एकंदर अठरा खोल्या भिक्षूंकरितां कोरल्या आहेत. व्हरांड्याजवळ एक सुंदर पाण्याचें टाकें आहे, त्याला जाण्यासाठी पायऱ्या या व सोळा क्रमांकाच्या लेण्यामधील जागेंत केल्या आहेत. व्हरांड्याच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्यांत भिंतीवर पेटिका-शीर्षक लिपींत लेख कोरला आहे. त्यांत या टाक्याचा उल्लेख आहे.[१]

---

१ पाहा -- न्यवीविशत्साधुलघुप्रसन्नशीतप्रकामाम्बुमहा-निधानम् ॥ क्रमांक २६, ओ. २६.

सतरा क्रमांकाचें लेणें ऋषीक देशाच्या राजाने आपल्या भावाच्या अकालीं मृत्यूमुळे शोकविह्वल होऊन भिक्षुसंघाकरितां कोरविलें होतें. तो ज्ञान, औदार्य, दया, आनंद, मैत्री, क्षमा, धैर्य, चातुर्य इत्यादि गुणांमुळे प्रसिद्ध झालेल्या साधूंची सेवा करीत असे असें त्याच्या कोरीव लेखांत म्हटलें आहे.[१] अशा गृहस्थाने खोदविलेल्या लेण्यांत उपरिनिर्दिष्ट गुणांचा उपदेश करणाऱ्या जातककथा चित्रित केल्या जाव्या यांत नवल नाही. सोळाव्या क्रमांकाच्या लेण्यांत गौतम बुद्धाच्या शेवटल्या जन्मांतील प्रसंगांविषयींच्या चित्रांना प्राधान्य दिलें आहें हें आपण मागे पाहिलें. प्रस्तुत विहार लेण्यांत तशीं चित्रें थोडीं असून, बहुतेक जातककथाविषयकच आहेत हें दिसून येईल.[२]

व्हरांड्याच्या मागील भिंतीवर विश्वंतरजातक कथेचीं[३] चित्रें आहेत. संजय नामक राजाला विश्वंतर नांवाचा मुलगा होता. हा लहानपणापासून दानशील होता. संजयाने आपल्या मुलाकरितां अत्यंत मौल्यवान् असा रत्नहार करविला होता, पण तो विश्वंतराने आपल्या दायांना देऊन टाकला. अशी गोष्ट नऊ वेळां घडली. संजयाजवळ एक श्वेत गन्धहस्ती होता. तो अवर्षण झालें असतां पाऊस पाडत असे. विश्वंतराने तोहि ब्राह्मणांना देऊन टाकल्यावर त्या राज्यांतील प्रजाजन त्यावर खवळून उठले. त्यांना शांत करण्याकरितां संजयाला आपला पुत्र विश्वंतर व त्याची पत्नी मद्री यांस हद्दपार करावें लागलें. राज्याबाहेर जातांना त्याला चार ब्राह्मण भेटले. त्यांनी मागितल्यावरून त्याने आपल्या रथाचे घोडे त्यांना देऊन टाकले आणि तो आपली पत्नी आणि दोन मुलें–कुमार जाली आणि कुमारी कृष्णाजिना–यांना घेऊन पुढे

१ क्रमांक २६, ओ. १४.

२ प्लेट ९ मध्ये या चित्रांची स्थानें दाखविलीं आहेत.

३ जातकमाला, क्रमांक ९ पाहा.

पायीं चालूं लागला. नंतर त्याच्याकडे एक जूजक नांवाचा ब्राह्मण याचक येऊन त्या दोन मुलांना आपल्या पत्नीच्या सेवेसाठी मागूं लागला. तेव्हा विश्वंतराने तीं मुलेंहि त्याला देऊन टाकलीं. तें पाहून त्याच्या दानशीलत्वाने चकित झालेला इंद्र त्याचें सत्त्व हरण करण्याकरिता ब्राह्मणाचें रूप धारण करून त्याच्याकडे आला आणि आपल्याकरिता त्याची पत्नी मद्री मागूं लागला. तेव्हा विश्वंतराने तिचेंहि त्याला दान दिलें. तेव्हा इन्द्राने संतुष्ट होऊन 'तुला आपलीं अपत्यें व राज्यहि प्राप्त होतील' असा वर दिला. इकडे ज्याला तीं मुलें दान दिलीं होतीं तो ब्राह्मण संजय राजाकडे येऊन धनाच्या लोभाने त्यांना राजास विकण्यास तयार झाला. राजाने त्याला खूप संपत्ति देऊन मुलांना विकत घेतलें आणि विश्वंतराला परत बोलावून गादीवर बसविलें.

दानपारमितेची ही विश्वंतरकथा हरिश्चन्द्रकथेसारखीच अत्यंत हृदयस्पर्शी आहे. ती बौद्धधर्मीयांत अत्यंत लोकप्रिय झाली होती. तिचीं चित्रें या लेण्याच्या व्हरांड्याच्या मागील भिंतीवर काढलीं आहेत. विश्वंतर राजकुमाराकडे दान मिळविण्याकरिता आलेल्या शेंकडो याचकांची गर्दी, त्याचें व त्याच्या पत्नीचें वनवासगमन, आकाशांतून उडत येणारा इंद्र[1] व त्याच्या अप्सरा, यांचीं चित्रें अत्यंत मनोवेधक झालीं आहेत.

मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूस खिडक्यांवर गौतमबुद्धाच्या चरित्रांतील एका प्रसंगाचीं चित्रें काढलीं आहेत. देवदत्त नामक बुद्धाचा नातेवाईक भिक्षु झाला होता. त्याला भिक्षुसंघाचा नायक होण्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून त्याने बुद्धाला तसें करण्याविषयीं विनवणी केली. पण बुद्धाने तें मान्य केलें नाही. तेव्हा देवदत्ताने अजातशत्रु राजाकडे जाऊन बुद्धाला मारण्याचा कट केला. बुद्ध राजगृहांत भिक्षेला

---

१ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ५९ पाहा.

गेला असतां देवदत्ताने राजाला त्याच्यावर नालगिरि नामक मदोन्मत्त हत्ती सोडावयास लावलें. पण नालगिरि भगवंताला पाहतांच नम्र झाला आणि पुनः आपल्या तबेल्यांत परत गेला, ही कथा या चित्रांत सांगितली आहे.

डाव्या बाजूच्या चित्रांत राजप्रासादाच्या दुसऱ्या मजल्यावर देवदत्त अजातशत्रूला आपली मसलत सांगत आहे. खालच्या मजल्यावरील राजपुत्राला व राजस्त्रियांना त्याचा सुगावा लागल्यामुळे ते सर्व जण भगवंताच्या सुरक्षिततेविषयीं चिंताग्रस्त झालेले त्यांच्या मुद्रेवरून दिसत आहेत. उजव्या बाजूच्या चित्रांत तबेल्यांतून सुटलेला मदोन्मत्त हत्ती सैरावैरा धावून लोकांना पायाखाली तुडवीत, घोडे, माणसें वगैरेंना सोंडेंत धरून फेकत असलेला दाखविला आहे. रस्त्यावरील घरांच्या वरच्या मजल्यांतील स्त्रीपुरुष हें दृश्य अत्यंत भयग्रस्त मनाने पाहत आहेत. इतक्यांत पलीकडे भगवान् बुद्धाला पाहतांच नालगिरि क्षणार्धांत शांत होऊन त्याच्यापुढे नम्र होतो, आणि बुद्ध त्याच्या गंडस्थलाला आपल्या हाताने स्पर्श करून आशीर्वाद देतो. हें पाहतांच लोकांचीं मुखें आनंदाने प्रफुल्ल होतात व ते भक्तिभावाने हात जोडून भगवंताला नमस्कार करतात असें दृश्य दिसतें.[१] या चित्रांतहि चित्रकाराने दृष्टिक्रम (perspective), भावचित्रण, रंगसंगति यांतील आपलें कौशल्य उत्तम रीतीने दर्शविलें आहे.

व्हरांड्याच्या डाव्या कडेकडील भिंतीवर एका भव्य चक्राचें चित्र आहे. हें चित्र क्रांतिवृत्ताचें आहे, अशा समजुतीने कांहीं पाश्चात्य विद्वानांनी या लेण्याला 'क्रांतिवृत्ताचें लेणें' असें नांव दिलें होतें. पण हें चित्र क्रांतिवृत्ताचें नसून संसाराचें आहे. संसाराला पुष्कळदा चक्राची उपमा देतात. भगवद्गीतेंतहि 'एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।' (अध्याय ३, श्लोक १६) या श्लोकांत सृष्टींतील घडामोडींना चक्राची

१ यजदानी, अजंटा, ३, प्लेट ७४ पाहा.

उपमा दिली आहे. या लेण्यांतील चक्रासारखें चक्र तिबेटांत रंगविलेलें दृष्टीस पडलें आहे आणि तेथे त्याला संसाराचें चित्र हेंच नांव दिलें आहे.

या भव्य चक्राचे आठ भाग करण्याचा उद्देश होता असें दिसतें, पण त्याचे पांचच भाग चक्राच्या तुंब्यापासून परिधीपर्यंत जाणाऱ्या अरांनी विभागले आहेत. बाकीचे तीन भाग खिडकी मध्ये आल्यामुळे रंगविले गेले नसावे. या चक्रामध्ये खेडेगावांतल्या तसेंच नगरांतल्या व राजप्रासादांतल्या जीवनाचे विविध पैलू, उदाहरणार्थ, शेतकऱ्यांचीं घरें, त्यांचें साधें जीवन, त्यांचीं जनावरें, नगरांतील नाचरंग व प्रेमी युगलांचे विविध विलास, अरण्यांतील प्रशांत स्थलीं आत्मानात्म विचारांत गुंतलेले ऋषिगण, इत्यादिकांचीं चित्रें आहेत. हें सबंध चक्र कोणा भयंकर आकाराच्या प्राण्याच्या (दैवाच्या ?) हाताने फिरविलें जात आहे.[1] असें दाखविलें आहे.

सतराव्या क्रमांकाच्या प्रस्तुत लेण्यांत अजंठ्याच्या इतर कोणत्याहि लेण्यांतल्या पेक्षा जास्त चित्रें सध्या अस्तित्वांत आहेत. त्यांपैकी बहुतेक जातककथांचीं आहेत. या जातककथांच्या चित्रांचा उपयोग धार्मिक प्रवचनांमध्ये दया, शान्ति, मैत्री, परोपकार इत्यादि गुणांचें महत्त्व भिक्षूंच्या व श्रावकांच्या मनावर ठसविण्याकरिता होत असला पाहिजे. या कथांचें या प्रकारचें तात्पर्य 'जातकमाला'दि ग्रंथांत प्रत्येक कथेच्या शेवटीं सांगितलें असतें

सतराव्या क्रमांकाच्या लेण्यांतील प्रत्येक जातककथेच्या चित्रांचें सविस्तर वर्णन करणें येथे शक्य होणार नाही. म्हणून त्या चित्रांच्या स्थलांचा निर्देश करून त्यांच्या जातककथा संक्षिप्त रूपाने दिल्या आहेत. कांही महत्त्वाच्या व सुस्थितींत असलेल्या चित्रांचें मात्र वर्णन खाली केलें आहे. या लेण्याच्या मानचित्रांतहि या चित्रांचें स्थान दर्शविलें आहे.[2]

---

१ पूर्वोक्त, पु. ४, प्लेट ४–६ पाहा. २ प्लेट ९ पाहा.

षड्दन्तजातक—या जातकाचीं चित्रें मंडपाच्या पुढील भिंतीच्या आंतील भागावर मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूस कोरलीं आहेत. यांत एका राणीने आपला पूर्वजन्मांतला पति षड्दन्त हत्ती याचे दांत कापून आणविले, पण ते पाहतांच तिला आपल्या दुष्कृत्याचा पश्चात्ताप होऊन ती भग्नहृदय होऊन मरण पावली, अशी कथा आहे.[1]

महाकपिजातक—या जातकाचीं चित्रें मंडपाच्या पुढील भिंतीच्या आंतीस बाजूस मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूस रंगविलीं आहेत. यांत एका महाकपीने आपल्या देहाचा पूल करून आपल्या कळपांतील वानरांना वांचविलें अशी कथा आहे.[2]

हस्तिजातक—या जातकाचीं चित्रें वरील चित्राशेजारींच दरवाजाजवळ काढलीं आहेत. यांत अरण्यांत क्षुधेने मुमूर्षु झालेल्या व्यापाऱ्यांचे प्राण वाचविण्याकरिता एका हत्तीने आत्महत्त्या केली अशी कथा आहे.[3]

हंसजातक—या जातकाचीं चित्रें मंडपाच्या डाव्या बाजूच्या दुसऱ्या खोलीजवळील भिंतीवर रंगविलीं आहेत. याची कथा येणेप्रमाणें[4]—धृतराष्ट्र आणि सुमुख नांवाचे दोन सुंदर हंस आपल्या अनुयायांसह मानससरोवरांत राहत होते. काशीच्या ब्रह्मदत्त राजाने त्यांची कीर्ति ऐकून त्यांना आपल्या राज्यांत येण्याचें प्रलोभन म्हणून मानससरोवरापेक्षाहि रमणीय असें सरोवर तयार केलें. कांही हंसांनी तें पाहिल्यावर तेथें जाण्याचा हंसराजास आग्रह केला. तेव्हा त्याने त्यास संमति दिली आणि ते सर्व त्या सरोवरांत विहार करण्याकरिता आले. ही वार्ता

१ पालिजातक, क्रमांक ५१४.

२ पालिजातक, क्रमांक ४०७; जातकमाला, क्रमांक २७.

३ जातकमाला, क्रमांक ३०.

४ पालिजातक, क्रमांक ५३३; जातकमाला, क्रमांक २२.

समजतांच राजाने हंसराजास पकडण्याकरिता एका निषादास पाठविलें. त्याने पसरलेल्या जाळयांत धृतराष्ट्र हंस अडकला. तेव्हा त्याचे अनुयायी उडून गेले, पण त्याचा प्रधान सुमुख मात्र त्याला सोडून जाईना. त्याची स्वामिनिष्ठा पाहून निषादाला गहिवर आला. त्याने हंसराजालाहि मुक्त केलें. पण त्या दोघांनी निषादाला राजाने देऊं केलेलें बक्षीस मिळावें म्हणून त्याच्याबरोबर आपण होऊन जाण्याचें ठरविलें. राजसभेंत त्यांना घेऊन निषाद आला तेव्हा तो वृत्तांत ऐकून राजाला फार आश्चर्य वाटलें. त्याने हंसराजाला बसावयास सुवर्ण सिंहासन व त्याच्या मंत्र्याला त्याच्या जवळच दुसरें आसन दिलें. मग हंसराजाने राजाला राजधर्माचा उपदेश केला.

प्राचीन काळीं हें हंसजातक अत्यंत लोकप्रिय असावें, कारण तें अजंटयाच्या अनेक लेण्यांत चित्रित केलें आहे. प्रस्तुत चित्रांत हंसराजाला पकडतांच इतर हंसांची भीतीने उडालेली गाळण, जीव वाचवण्यासाठी उडून जाण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न, निषादाची काळीकभिन्न मूर्ति, राजसभेंत हंसराज व त्याचा प्रधान बोलत असतां त्यांच्या उपदेशाचा सभेंतील राजा, राणी, मंत्री व सेवक यांच्या मनावर झालेला परिणाम इत्यादिकांचें चित्रण चित्रकाराने मोठया कुशलतेने केलें आहे. सभामंडपांतील लाकडी खांबावरील नक्षीकाम, त्यांत शोभेसाठी लोंबत ठेवलेले विविधरंगाचे पडदे, राजा, राणी, प्रधान इत्यादिकांचीं आसनें ठेवण्याची पद्धत, राजाचा मुकुट, स्त्रीपुरुषांची वस्त्र नेसण्याची पद्धत इत्यादिकांवरून तत्कालीन राजदरबारांतील रीतिरिवाजांची माहिती होते. चित्रकारांनी राजसभेंतील दृश्यें पाहिलीं असल्यामुळे त्यांचें अनुकरण आपल्या चित्रांत केलें असलें तर नवल नाही.

विश्वन्तरजातक— या जातकाचीं कांही चित्रें या लेण्याच्या व्हरांडयाच्या भिंतीवर काढलीं आहेत, पण तेथे ती कथा सविस्तर चित्रित करण्यास पुरेशी जागा नव्हती, म्हणून तींतील कांही प्रसंग येथे दाखविले.

आहेत. या जातकाने मंडपांतील डाव्या बाजूच्या ३ ते ६ या खोल्यांवरची सबंध भिंत व्यापिली आहे. या ठिकाणचीं अनेक चित्रें उत्कृष्ट आहेत. विशेषतः विश्वन्तर राजपुत्र जूजक ब्राह्मणाला आपलीं मुलें दान देत आहे तो प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी झाला आहे. शेवटच्या चित्रांत जूजक राजसभेंत येऊन शेंकडो नाणीं घेऊन विश्वन्तराचीं बालकें त्यांचा पितामह संजय राजा यास परत देत आहे तें दृश्य तर अप्रतिम वठलें आहे. चित्रकाराने जूजकाचें चित्र फार कुशलतेने काढलें आहे.[1] पुढले दात अर्धवट पडले आहेत असें त्याचें विरूप तोंड, त्याची बकऱ्याच्या-सारखी वाढलेली दाढी व लांब मिशा, टक्कल पडलेलें डोकें, क्वचित् खिळ्या सारखे उभे असलेले डोक्यावरचे राठ केस, मागील अनेक गाठी दिलेली त्याची शेंडी, राजसभेंत आल्यावरहि न मिटलेली त्याची चौकोनी छत्री, खजिनदार त्याच्या उपरण्यांत नाण्यांचें भांडें रिकामें करीत असतां आणखी नाण्यांच्या लोभाने त्याने राजाकडे लावलेले डोळे, हें दृश्य पाहतांना त्याच्याविषयीं प्रेक्षकांच्या मनांत अत्यंत तिरस्कार उत्पन्न होतो. राजा त्याच्याकडे किंचित् रागाने व तिरस्काराने पाहत आहे. त्याने उजव्या हातांत नाणें धरलें आहे. जणूं काय 'हें घे तुझें शेवटचें नाणें' असें तो तिरस्काराने ब्राह्मणास म्हणत आहे. जवळ बसलेल्या राणीलाहि ब्राह्मणाच्या लोभीपणाचें आश्चर्य वाटत असलेलें तिच्य मुद्रेवरून दिसत आहे.

महाकपिजातक (दुसरें)—या जातकाचें चित्र मंडपाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर शेवटच्या खोलीजवळ रंगविलें आहे.[2] यामध्ये अरण्यांत वाट चुकल्यामुळे क्षुधेने व्याकुळ झालेल्या ब्राह्मणास एका वानराने आपल्या पाठीवर बसवून दरींतून बाहेर काढलें. पण त्या ब्राह्मणाने कृतघ्नपणाने त्याच्या मांसाच्या लोभाने त्या वानरासच मार

१ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ६७.

२ पालिजातक, क्रमांक ५१६; जातकमाला, क्रमांक २४.

ण्याचा प्रयत्न केला. तथापि त्या वानराने क्षमा करून त्याला अरण्यांतून बाहेर जाण्याची वाट दाखविली अशी कथा आहे.

सुतसोमजातक--या जातकांच्या चित्रांचा आरंभ मंडपाच्या डाव्या बाजूच्या भिंतींच्या उजवीकडच्या शेवटास होऊन तीं मागील भिंतीवर अन्तरालाच्या डाव्या बाजूवर पसरलीं आहेत. यांत सौदास नामक राजाला सुतसोमाने धर्मोपदेश करून नरमांसभक्षणापासून परावृत्त केलें अशी कथा आहे.[1]

मागे सांगितल्याप्रमाणे या सतराव्या लेण्याच्या मंडपांत सर्व भिंतींवर जातककथांचीं चित्रें रंगविलीं आहेत. पण अंतरालाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर व चैत्यमंदिराच्या (गर्भगृहाच्या) दरवाजाच्या डाव्या बाजूस मात्र गौतम बुद्धाच्या शेवटल्या जन्मांतील प्रसंगांचीं चित्रें काढलीं आहेत. सोळाव्या लेण्यांतील चित्रांतील योजना याच्या उलट आहे हें मागे दाखविलें आहेच.

अन्तरालाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर बुद्धाने ज्ञानप्राप्तीनंतर तुषित नामक दिव्य लोकांत जाऊन तेथे असलेल्या आपल्या मातेला व देवदेवींना धर्मोपदेश केला त्याचें चित्र आहे. त्यानंतर तो पृथ्वीतलावर आला. तेव्हा त्याच्या दर्शनार्थ अनेक राजे, राण्या, सरदार इत्यादि लोक हत्ती वगैरेंवर बसून आल्याचें दाखविलें आहे. त्यानंतर खालच्या भागांत बुद्ध धर्मोपदेश करीत आहे. त्याच्या डाव्या बाजूस बिंबिसारादि राजेलोक आहेत. त्यामध्ये एक वायव्य प्रांतातला शककुषाणादि वंशांतला दिसतो. त्याच्या दाढीमिशा प्रामुख्याने दिसत असून त्याच्या डोक्यावर उंच टोकाची टोपी आहे. अशीच टोपी घातलेले दोन घोडेस्वारहि डाव्या बाजूस दिसतात. वाकाटकांच्या दरबारीं अशा शककुषाणांच्या राजदूतांचें येणेंजाणें असावें. त्यांना तेथे व इतरत्र पाहिल्यामुळे चित्रकाराने तशा राजांचा व सैनिकांचा अन्तर्भाव बुद्धाच्या

१ पालिजातक, क्रमांक ५३७; जातकमाला, क्रमांक ३१

श्रोतृवृंदांत केलेला दिसतो. डाव्या बाजूस राजांबरोबर कांही राण्याहि बसल्या आहेत.[१]

बुद्धाच्या उजव्या बाजूस भिक्षुगण बसला आहे. त्यामध्ये दोन भिक्षूंच्या आकृत्या उठून दिसतात. ते सारिपुत्र व मौद्गलायन नामक मुख्य बुद्धशिष्य असावे. सारिपुत्राच्या डाव्या बाजूस बसलेला पहिला भिक्षु बुद्धाचा पट्टशिष्य आनंद असावा. भगवान बुद्ध धर्मचक्रप्रवर्तन-मुद्रेत सिंहासनावर प्रलम्बपादासनांत बसला असून त्याच्या डावीकडे पद्मपाणि व उजवीकडे वज्रपाणि चामरें घेऊन उभे आहेत. सर्वांनी आपले हात जोडले आहेत. त्यांचे डोळे भगवान् बुद्धाकडे लागले आहेत. आनंदाच्या हातांच्या मुद्रेवरून तो मात्र बुद्धाने विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देत आहे असें दिसतें.

अन्तरालाच्या मागील भिंतीवर चैत्यमंदिराच्या डाव्या बाजूस गौतमबुद्ध ज्ञानप्राप्तीनंतर पित्याच्या निमंत्रणावरून कपिलवस्तूस गेला असता भिक्षा मागत मागत राजवाड्यांत गेला. त्या प्रसंगाचें चित्र आहे.[२] भगवान् बुद्ध नगरांत आला असून आपल्या प्रासादांत येण्याचा संभव आहे याची आगाऊ माहिती लागल्यामुळे त्याच्या यशोधरा नामक पत्नीने स्वतः उत्तम वस्त्रालंकार धारण केले आणि आपला सात वर्षांचा पुत्र राहुल यालाहि सुंदर वस्त्रालंकारांनी भूषित करून ती बुद्धाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत राहिली. प्रस्तुत चित्रांत भगवान् बुद्ध भिक्षा मागण्याकरिता उभा असलेला दाखविला आहे. त्याची आकृति भव्य आहे व ती त्याच्या आध्यात्मिक श्रेष्ठत्वाची द्योतक आहे. त्या मानाने यशोधरा व राहुल यांच्या आकृति चित्रकाराने मुद्दामच लहान काढल्या आहेत. बुद्धाच्या डोक्यावर जटा असून त्याच्या मुखाभोंवतीं तेजोवलय आहे. त्याने लांब भगवा अंगरखा

१ यजदानी, अजंटा, पु. ४, प्लेट ३८–३९.

२ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक ७२. प्रस्तुत पुस्तकांतील प्लेट ११ पाहा.

घातला असून उजव्या हातांत हिरव्या रंगाचें भिक्षापात्र धरलें आहे. त्याची मुद्रा प्रशांत आहे. यशोधरेने राहुलाला पुढे करून त्याच्या करितां तरी बुद्धाने पुनः स्वगृहीं यावें असें सूचित केलें आहे. राहुल दोन्ही हात पसरून बुद्धाकडे आपला दायभाग मागत आहे. यशोधरेचे आणि त्याचे डोळे बुद्धाकडे लागले आहेत. तो काय म्हणेल तें ऐकण्याविषयीं तीं दोघींहि उत्सुक झालेलीं त्यांच्या चर्येवरून दिसत आहे.

यशोधरा व राहुल यांच्या वस्त्राभरणांवरून विदर्भांतील तत्कालीन तद्विषयक पद्धति माहीत होते. यशोधरेने आपल्या केसांत सध्याच्या बिंदीसारखा अलंकार घातला असून तिच्या गळयांत पदकयुक्त कण्ठिका आहे. बाहूंवर रत्नजडित केयूर आणि कमरेला सुंदर रशना आहे. हातांत अनेक सुवर्ण कंकणें असून त्यांच्या मागे पाटलीसारखा कडया जोडलेला अलंकार आहे. राहुलाच्याहि केसांत ललाटिका असून त्याने अंगांत सध्याच्या गंजिफ्रॉकसारखा पण खाली विभागलेला अंगरखा घातला आहे. दोघांचेंहि अधोवस्त्र पिवळया रंगाचें आहे. डाव्या बाजूला एका विद्याधराने बुद्धावर छत्र धरलें आहे आणि आकाशांतून पुष्पमालांची वृष्टि होत आहे असें दाखविलें आहे.

अन्तरालाच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर श्रावस्ती येथे बुद्धाने बिंबिसार राजाच्या विनंतीवरून एक चमत्कार करून दाखविला, त्याचें चित्र आहे. या चित्रांत संघांत फूट पाडूं इच्छिणाऱ्या कित्येक नग्न श्रमणांचें आव्हान स्वीकारून बुद्धाने अन्तरालांत अनेक रूपें धारण केल्याचें दाखविलें आहे.

शरभजातक—या जातकाचीं चित्रें अंतरालाच्या उजवीकडे मंडपाच्या मागील भिंतीवर काढलीं आहेत.[1] या जातकांत शिकारीस गेलेला एक राजा खोल गर्तेत पडला असतां एक हरिण त्याला बाहेर

---

१ पालिजातक, क्रमांक ४८३; जातकमाला, क्रमांक २५.

काढतो व नंतर त्याच्या उपदेशावरून तो राजा आपल्या नगरांतील लोकांना पंच शीलांचें आचरण करण्याविषयी आज्ञा करतो अशी कथा आहे. हीं चित्रें आता बरींच अस्पष्ट झालीं आहेत.

मातृपोषकजातक—या जातकाचीं चित्रें मंडपाच्या मागील भिंतींतील दोन खोल्यांवर काढलीं आहेत. आपल्या अंध मातेची सेवा करणाऱ्या हत्तीस शिकाऱ्यांनी पकडून आणलें असतां तो पुढे ठेवलेल्या पक्वान्नांकडे ढुंकूनहि पाहत नाही, पण पुढे राजाज्ञेने त्याला मोकळें सोडल्यावर तो धावत जाऊन आपल्या मातेला भेटतो याचें येथे सुंदर चित्र काढलें आहे.[1] या चित्रांत चित्रकाराने हत्तीचें बारकाईने निरीक्षण केलेलें दिसून येतें. हत्ती रागावला असतां सोंड वळवून घेतो, दुःखी असतां ती खाली लोंबकळत सोडतो, आणि आनंदांत असतां ती पुढे करून चालतो हें चित्रकाराने सुंदर रीतीने दाखविलें आहे.

मत्स्यजातक—या जातकाचें चित्र अन्तरालाच्या उजव्या बाजूस मंडपाच्या मागील भिंतीच्या टोंकास काढलें आहे. या जातकांत एका मत्स्यरूपी बोधिसत्त्वाने अवर्षणकाळीं स्वतःच्या अहिंसाव्रताच्या बळावर पाऊस पाडून तळ्यांतील जलचर प्राण्यांचे प्राण वांचविले अशी कथा आहे.[2]

श्यामजातक—या जातकाचें चित्र मत्स्यजातकाच्या खाली काढलें आहे. यांतील कथा रामायणांतील श्रवणाच्या कथेसारखी आहे. श्याम आपल्या अंध मातापित्यांना कावडींतून नेत असे. एकदा पाण्याने लोटा भरीत असतां तो वाराणसीच्या राजाकडून चुकीने मारला जातो. पण पुढे देवांच्या कृपेने तो जिवंत होतो व त्याच्या मातापित्यांनाहि दृष्टि येते अशी यांत कथा आहे.[3]

---

१ पालिजातक, क्रमांक ४५५.

२ पालिजातक क्रमांक ७५; जातकमाला, क्रमांक १५.

३ पालिजातक, क्रमांक ५४०.

महिषजातक—याचें चित्र मंडपांत उजव्या बाजूच्या भिंतीवर रंगविलें आहे. एक माकड रेडयाचा जन्म घेतलेल्या बोधिसत्त्वाला अनेक प्रकारें त्रास देत असे. त्याने त्याला क्षमा केली होती. पण तो जेव्हा दुसऱ्या रेडयाला तसाच त्रास देऊं लागला तेव्हा त्याला त्याचें प्रायश्चित मिळालें, अशी कथा यांत आहे.[1]

सिंहलावदान—याची कथा दिव्यावदानांत (क्रमांक ३६, पृ. ५२३-२८) सांगितली आहे. पण तिच्यांत आणि अजंट्यांतील चित्रांनी सांगितलेल्या कथेंत कांही ठिकाणीं फरक आहे. या जातकांत सिंहल नामक राजकुमाराने ताम्रपर्णी द्वीपावर चाल करून तेथील नर-मांसभक्षक राक्षसींस पिटाळून लावलें, आणि तेव्हापासून त्या द्वीपास सिंहलद्वीप असें नांव पडलें अशी कथा आहे. या जातकाचीं अनेक चित्रें मंडपाच्या उजव्या भिंतीवर काढलीं आहेत.[2]

शिबिजातक—याची कथा मंडपाच्या उजव्या बाजूच्या आणि समोरच्या भिंतीवर चित्रित केली आहे. शिबि राजाने ब्राह्मणाचें रूप घेऊन आलेल्या इन्द्राला आपले दोन्ही डोळे काढून दिले. पुढे इन्द्राने संतुष्ट होऊन त्याची दृष्टि पूर्ववत् केली अशी यांत कथा आहे.[3]

रुरुजातक—या जातकाचीं चित्रें मंडपाच्या पुढील भिंतीवर आंतील बाजूस मुख्य दरवाज्याच्या डाव्या बाजूस काढलीं आहेत. बोधिसत्त्व रुरुरूपाने जन्मला होता. एकदा त्याने नदींत बुडत असलेल्या मनुष्याला वांचविलें, पण त्याने त्याचा विश्वासघात करून बक्षिसाच्या लोभाने त्याचें निवासस्थान त्याला पकडूं इच्छिणाऱ्या राजास दाखवून दिलें अशी कथा यांत आहे.[4]

---

१ पालिजातक क्रमांक २७८; जातकमाला क्रमांक ३३.

२ दिव्यावदान, क्रमांक ३६; पालिजातक, क्रमांक १९६.

३ पालिजातक, क्रमांक ४९९; जातकमाला, क्रमांक २.

४ पालिजातक, क्रमांक ४८२; जातकमाला क्रमांक २६.

ऋक्षजातक—याचें चित्र मंडपाच्या पुढील भिंतीच्या आंतील बाजूस दरवाज्याच्या उजवीकडे दोन खिडक्यांमधील भागांवर रंगविलें आहे. यामध्ये एका अस्वलाने जाळयांत सांपडलेल्या हरिणाला सोडविल्याचें दृश्य आहे.

न्यग्रोधमृगजातक--याचीं चित्रें वरील भिंतीवर दरवाजा आणि जवळची खिडकी यांमध्ये काढलीं आहेत. यांमध्ये न्यग्रोधमृग एका गर्भिणी मृगीचा प्राण वाचविण्याकरिता आपण तिच्या बदलीं राजाच्या खाटिकखान्यांत गेला अशी कथा आहे. या जातकाचीं चित्रेंहि बरींच खराब झालीं आहेत.[1]

या जातकांच्या चित्रांशिवाय मंडपाच्या छताला व स्तंभांना विविध प्रकारच्या नकशीकामानें भूषविलें आहे. छतावर एकांत एक अशीं सात वर्तुळें असून त्यांना अलंकारांनी, वेलपत्तींनी, विविधप्रकारचे जलचर व स्थलचर प्राणी (उदाहरणार्थ, मासे, हरिण, रेडे, हत्ती, सिंह, मोर इत्यादि) ज्यांमध्ये गुंफले आहेत अशा वेलांनी शोभा आणली आहे.[2] मधून मधून शंख व कमळ या पवित्र पदार्थांच्या आकृति काढल्या आहेत. यांमध्ये कोठेहि भडक रंगांचा उपयोग केला नाही. उलट एकमेकांच्या संगतीने खुलतील अशाच रंगांची योजना केली आहे. वर निर्दिष्ट केलेलें सप्तभागात्मक मोठें वर्तुळ एका मोठ्या चौकोनांत बसविलें आहे. त्याच्या चारी कोनांत वर्तुळाबाहेर राहिलेल्या जागेंत उपायनें घेऊन आकाशांतून येणाऱ्या गन्धर्वांच्या सुंदर आकृति रंगविल्या आहेत.

क्रमांक १९ चें लेणें हेंहि ऋषीक देशाच्या मांडलिकाने खोदवून बौद्ध संघास अर्पण केलें होतें. क्रमांक १७ च्या विहारलेण्यांतील

१ पालिजातक क्रमांक १२.

२ यजदानी, अजंटा, पु. ४, प्लेट ७४.

कोरीव लेखांत त्याचा 'गन्धकुटी' म्हणून उल्लेख आहे.[१] अजंटा येथे चार चैत्यलेणीं आहेत त्यांपैकी हें कालानुक्रमानें तिसरें असून अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. हें बाहेर तसेंच आंतहि उत्कृष्ट कोरीव कामानें भरलें आह. याच्या समोर सुंदर द्वारमंडप (पोर्च) असून त्याच्या वाटोळया स्तंभांना उभ्या गलथ्यांनी आणि आडव्या कमलबंधाच्या पट्ट्यांनी सुशोभित केलें आहे. त्यांच्या शीर्षभागीं देवालयांच्या शिखरावर असतो तसा आमलक आहे. त्यावरच्या छावणीला चैत्यवातायनाच्या आकृतींच्या पट्ट्यांनी सुशोभित केलें आहे.

या चैत्य लेण्याचा दर्शनी भाग खालपासून वरपर्यंत कोरीव कामानें भरून गेला आहे. त्यामध्ये बसलेल्या व उभ्या अशा विविध मुद्रांमधील बुद्धमूर्ति, चैत्यवातायनांच्या आकृति, मिथुनें इत्यादिकांची रेलचेल आहे. मध्यभागीं घोडयाच्या नालाच्या आकाराचें मोठें चैत्यवातायन आहे. त्याच्या आंतील बाजूस लाकडी कामांत दिसतात तशा कडया कोरून दाखविल्या आहेत. या चैत्यवातायनामुळे आंतील गंधकुटीस भरपूर प्रकाश मिळण्याची सोय झाली आहे. या वातायनाच्या डाव्या बाजूस कुबेराचा सेनापती पञ्चिक आणि उजव्या बाजूस पूर्णभद्र यांच्या सुंदर मूर्ति कोरल्या आहेत.[२]

या दर्शनी भागाच्या डाव्या बाजूस काटकोन करून कोरलेल्या भागांत खालच्या बाजूस एका उंच आसनावर नागराज आणि त्याची राणी यांच्या मूर्ति कोरल्या आहेत.[३] नागराजाच्या मस्तकावर नागानें आपल्या सात फणा पसरल्या आहेत. त्याच्या राणीच्या डोक्यावरहि

---

१ क्रमांक २६, ओ. १७.

२ यजदानी, अजंटा, पु. ४, प्लेट ७५.

३ पंतप्रतिनिधि, अजंठा, चित्रांक १८.

एकफणा आहे. नागराजाच्या डोक्यावर उंच रत्नजडित मुकुट असून गळयांत रत्नहार व पुष्पमाला आहे. त्याच्या राणीनेंहि रत्नजडित मुकुट घातला असून तिच्या गळयांत अनेक अलंकार आहेत. नागराजाच्या डाव्या बाजूस चामरधारी सेवक उभा आहे. सोळा क्रमांकाच्या लेण्याजवळ नागराजाचें लेणें आहे, हें मागे सांगितलें आहेच.

गन्धकुटीच्या किंवा चैत्य लेण्याच्या आंतील भाग २४ फूट रुंद, ४६ फूट लांब आणि २४ फूट, ४ इंच उंच आहे. या पूर्वीचीं ९ आणि १० क्रमांकांचीं चैत्य लेणीं साधीं होतीं, पण हें सर्वत्र कोरीव कामाने भरून गेलें आहे. याला ११ फूट उंचीचे पंधरा खांब आहेत. ते खाली चौकोनी, नंतर अष्टकोनी आणि त्यावर वाटोळे झाले आहेत. वाटोळया भागावर उभा किंवा तिरकस गलथा असून त्याला सुंदर कोरीव कामाच्या आडव्या पट्टयांनी सुशोभित केलें आहे. या भागावर सुंदर आमलक आणि त्यावर दोन्ही बाजूला ब्रॅकेट असलेलें शीर्षक आहे. या शीर्षकावर मध्यभागीं बुद्धाची मूर्ति आणि ब्रॅकेटवर स्वारांसहित हत्ती, शार्दूल किंवा उडणाऱ्या गंधर्वांच्या मूर्ति आहेत. त्यावरच्या छावणीवर ५ फूट उंचीचा कठडा असून त्यांत बसलेल्या व उभ्या बुद्धांच्या मूर्ति कोरल्या आहेत.

या गन्धकुटींतील चैत्यांत दोन खांबांवरील कमानींत बुद्धाची उभी मूर्ति कोरली आहे. बुद्धाने पायापर्यंत लोंबणारा लांब अंगरखा घातला आहे. त्याच्या डोक्यावर कुरळे केस असून त्याची मुद्रा अत्यंत शांत आहे. चैत्याच्या घुमटावर हर्मिका आणि तिच्यावर तीन छत्रें आहेत. हीं छत्रें, तसेंच गन्धकुटीच्या आंतील कमानी पूर्वीच्या चैत्य लेण्यांत लाकडाच्या असत, पण या लेण्यांत त्या दगडांतच कोरून दाखविल्या आहेत. किंबहुना, या लेण्यांत लाकडाचें कोणतेंच काम अवशिष्ट राहिलें नाहीं.

अजंट्याच्या लेण्यांची कीर्ति त्यांतील शिल्पें व चित्रें यांच्या योगें लौकरच दूरवर पसरली आणि भारतांतील इतर प्रदेशांतूनच नव्हे तर सिंहलद्वीप, अफगाणिस्थान, मध्य आशिया, चीन इत्यादि दूरदूरच्या देशांतील चित्रकार चित्रकलेंत नैपुण्य मिळविण्यासाठी अजंट्यास येऊं लागले असें दिसतें. मध्यभारतांतील बाघ येथील लेण्यांत आणि दक्षिण भारतांतील सित्तनवाल लेण्यांत, तसेंच सिंहलद्वीपांतील सीगिरिया, अफगणिस्थानांतील बामियान, मध्य आशियांतील तुरफान आणि चीन देशांतील तुन् हुआंग या ठिकाणांतील फ्रेस्कोमध्ये (भित्तिचित्रांत) अजंट्याच्या कलेचें अनुकरण केलेलें किंवा त्यांवर तिचा प्रभाव पडलेला दिसतो, असें तज्ज्ञांनी दाखविलें आहे. त्यावरूनहि वरील अनुमान सयुक्तिक दिसेल. वाकाटक नृपति देवसेन व हरिषेण हे स्वतः बौद्ध धर्मी झाले नसले तरी भारतीय परंपरेस अनुसरून त्यांचा त्या धर्मा-सहि आश्रय असावा. हरिषेणाचा मंत्री वराहदेव याने बहुधा बौद्ध धर्म स्वीकारला असावा. अजंट्याचें सोळा क्रमांकाचें लेणें त्याने आपल्या हस्तिभोज नामक पित्याच्या स्मरणार्थ कोरविलें होतें; त्या अर्थी हस्ति-भोजहि बौद्धधर्मी असण्याचा संभव आहे. तसें नसतें तर वराहदेवाने बौद्ध लेणें न कोरवितां एखादें हिंदु देवालय आपल्या पित्याच्या पुण्यो-पार्जनाकरिता बांधलें असतें. हस्तिभोज व वराहदेव या प्रभावी सचिवांचें साहाय्य मिळाल्यामुळे अजंट्याच्या कलेची कीर्ति दूरवर पसरली असावी. खानदेशांतील मांडलिक राजांचाहि त्या धर्मास आश्रय होता, हें सतरा व एकोणीस क्रमांकांच्या लेण्यांवरून स्पष्ट आहे. या राजांच्या व मंत्र्यांच्या उदार आश्रयाच्या योगाने अजंट्याच्या चित्रकलेची कीर्ति सर्वत्र पसरण्यास मदत झाली असावी.

याशिवाय अजंट्याच्या पश्चिमेस दहा मैलांवर जंजाल नामक गावाजवळ असलेलीं घटोत्कच लेणीं वाकाटक नृपति हरिषेण याचा मन्त्री वराहदेव याने खोदविलीं होतीं; तीं एका खोल अशा दरी-प्रदेशांत आहेत.

पूर्वी येथे तीन लेणीं होतीं असें दिसतें. त्यांपैकी आता दोनच अवशिष्ट आहेत. तिसऱ्या लेण्याच्या फक्त कांही खुणा तेवढ्या दिसतात. राहिलेलीं दोन्ही लेणीं विहार पद्धतीचीं आहेत. त्यांपैकी एक लहान असून त्याचे पुढील स्तंभ नष्ट झाले आहेत. एक अर्धस्तंभ व दुसऱ्या एका स्तंभाचें शीर्षक कालाच्या तडाख्यांतून वाचले आहेत.

मोठें लेणें मात्र बरेंचसें शाबूत आहे. त्याच्याहि व्हरांड्याचे सर्व खांब नष्ट झाले आहेत. त्या व्हरांड्याच्या उत्तरेच्या बाजूला एक खंडित लेख दिसतो. त्यामध्ये वराहदेवाची आरंभापासून वंशावळ दिली आहे. त्याच्या खालचा भाग अतिशय खराब झाला असल्यामुळे वराहदेवाने कोणत्या उद्देशाने हें लेणें खोदविलें व कोणत्या बौद्ध भिक्षुसंघास दिलें ही माहिती आता नष्ट झाली आहे.

हें लेणें सामान्यतः अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यासारखें, विहार पद्धतीचें आहे, पण तें त्याच्या पेक्षा आकाराने मोठें आहे. व्हरांड्याच्या दोन्ही बाजूंस एक एक देवकुली (chapel) असून तिला पुढील भागांत मध्ये दोन स्तंभ आणि बाजूस दोन अर्धस्तंभ आहेत. तींत मागील बाजूस एक लहान खोली (cell) आहे. व्हरांड्यांतून आंतील मंडपास जाण्याकरिता मध्यभागीं एक मोठा दरवाजा आणि दोन बाजूस दोन लहान दरवाजे आहेत. मोठ्या आणि लहान दरवाजांमध्ये प्रकाशाकरिता एक खिडकी आहे.[1] मधल्या दरवाजाच्या चौकटीवर सुंदर नक्षीकामाच्या दोन पट्ट्या आहेत. तिसऱ्या पट्टीवर बसलेल्या व उभ्या बुद्ध मूर्ति, मिथुन वगैरे कोरून तिला शोभिवंत केलें आहे. छावणीच्या उंचीवर दोन्ही बाजूस एक एक देवता आहे, पण अजंट्याच्या लेण्यांतल्याप्रमाणे तिचें वाहन मकर नसून वराह आहे. हें लेणें वराहदेवाने खोदविलें याचें तें सूचक असावें. बाजूच्या दरवाजांना व

१ मानचित्र, क्र. १३.

खिडक्यांना पद्मासनस्थ बुद्धमूर्तियुक्त चैत्यवातायनांनी व त्यावर गोलाकृतींनी सुशोभित केलें आहे.[१]

आंतील मंडपाला चार ओळींमध्ये विभागलेले वीस स्तंभ आहेत. प्रत्येक बाजूचे मधले दोन आणि कोपऱ्यांतील दोन स्तंभ एका पद्धतीचे आणि राहिलेले दुसऱ्या पद्धतीचे आहेत; पहिल्या प्रकारचे स्तंभ खाली चौकोनी, नंतर अष्टकोनी व षोडशकोनी झाले आहेत. त्यावरच्या भागावर बत्तीस उभे गलथे असून नंतर ते स्तंभ षोडशकोनी व अष्टकोनी होऊन शेवटीं चौकोनी झाले आहेत. त्यावर साधें शीर्षक व दोन्ही बाजूस ब्रॅकेट आहेत. मागील भिंतींत मध्यभागीं अन्तराल व त्यामागे चैत्यमंदिर आहे. त्याच्या दोन्ही बाजूंस तसेंच डाव्या व उजव्या बाजूच्या भिंतींतहि मध्यभागीं व्हरांड्यांतल्याप्रमाणे देवकुली आहेत. याशिवाय उजव्या भिंतींत चार व डाव्या भिंतींत सहा लहान खोल्या आहेत मागील व पुढील स्तंभांच्या रांगेंत भिंतींत अर्धस्तंभ कोरले आहेत. त्यांपैकी पुढील डाव्या बाजूच्या अर्धस्तंभावर बुद्धाची मूर्ति आणि तिच्यावर ' ये धर्मा हेतुप्रभवाः ' इत्यादि श्लोक आहे. याशिवाय उजव्या बाजूच्या पुढील कोपऱ्यांत स्तूप आणि बाजूच्या भिंतींत उभ्या व बसलेल्या बुद्धाच्या मूर्ति कोरल्या आहेत. त्या नंतरच्या असाव्या.

मंडपाच्या मागील भिंतींत मध्यभागीं असलेल्या चैत्य मंदिरांत सिंहासनावर बुद्धाची भव्य मूर्ति धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेंत कोरली आहे. त्याच्या उजव्या बाजूस वज्रपाणि चामर घेऊन उभा आहे. डाव्या बाजूसहि चामरधारी पद्मपाणि असावा, पण त्याच्या हातांत कमळ दिसत नाही. सिंहासनाच्या खालील भागावर दोन हरिणांच्या मध्ये धर्मचक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस शिष्य व श्रावक गुडघे टेकून बसलेले दाखविले

---

१ दि घटोत्कच केव्ह इन्स्क्रप्शनस् (हैदराबाद आर्किऑलॉजिक सीरीज), प्लेट ४ व ५.

आहेत. बुद्धाच्या डोक्याभोवती प्रभावलय असून त्याच्या दोन्ही बाजूंस विद्याधर व विद्याधरी आकाशांतून माला घेऊन पूजेकरिता येत असलेले दाखविले आहेत.[१]

प्रस्तुत लेण्यांत व सोळा क्रमांकाच्या लेण्यांत कांही बाबतींत फरक आहे. स्थापत्यशैलीवरून तें अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यापूर्वीचें असावें, असें कांही विद्वानांचें मत होतें, पण त्यांतील कोरीव लेखावरून तें त्या लेण्याच्याच काळचें–खिस्ती शकाच्या सहाव्या शतकाअखेरचें–असावें असें स्पष्ट दिसतें.

---

१ दि घटोत्कच केव्ह इन्स्क्रिप्शन्स्, प्लेट ३.

परिशिष्ट

वाकाटक नृपतींच्या प्राकृत गाथा

['गाथासप्तशती' मध्ये वाकाटक नृपतींच्या नांवांवर बऱ्याच गाथा दिल्या आहेत. या गाथांच्या कर्त्यांच्या बाबतींत टीकाकारांत एकवाक्यता आढळत नाही. अनेक संस्कृत सुभाषित-संग्रहांमध्येहि असाच मतभेद आढळतो. तथापि उपलब्ध माहिती वाचकांपुढे मांडण्याच्या उद्देशाने खालील गाथासूच्या तयार केल्या आहेत. यांत निर्णयसागर आवृत्ति (गंगाधर टीकेसहित), पीतांबराची 'गाथासप्तशतीप्रकाशिका,' वेबर-संपादित आवृत्ति आणि भुवनपालाची टीका या चार ग्रंथांतील माहिती संकलित केली आहे. ज्या टीकाकाराने किंवा संपादकाने जसा कविनामाचा उल्लेख केला आहे, तसा प्रत्येक गाथेला अनुलक्षून तळटीपेंत दिला आहे. तसें करतांना खालील संक्षेप योजले आहेत—

गं.—(गंगाधराच्या टीकेची सूची, निर्णयसागर आवृत्ति, सन १९११)

पी.—पीतांबराची 'गाथासप्तशतीप्रकाशिका' (सं. जगदीशलाल शास्त्री, लाहोर, १९४२)

वे.—वेबरने संपादिलेलें हालाचें गाथासप्तशतक (Das Saptaśatakam des Hala, Leipzic, 1881)

भु.—भुवनपालाची गाथासप्तशतीवरील टीका (Weber, Indische Studien, Vol. XVI, 1883).

टीकाकाराच्या नांवापुढील संख्या त्या गाथाचा क्रमांक दर्शविते.

सर्वसेनाच्या गाथा

१ अज्जं पि दाव एक्कं मा मं वारेहि पिअसहि रुअंतिं ।
कल्लि उण तम्मि गए जइ ण मुआ ता ण रोइस्सं ॥

---

१ सर्वसेनस्य । (पी., ५०४); विक्रान्तभानोः (भु., ५३१)

(अद्यापि तावदेकं मा मां वारय प्रियसखि रुदतीम् ।
कल्ये पुनस्तस्मिन्गते यदि न मृता तदा न रोदिष्यामि ॥)

२ एहि त्ति वाहरंतम्मि पिअअमे उअह ओणअमुहीए ।
विउणावेढिअजहणत्थलाइ लज्जोणअं हसिअं ॥
(एहीति व्याहरति प्रियतमे पश्यतावनतमुख्या ।
द्विगुणावेष्टितजघनस्थलया लज्जावनतं हसितम् ॥)

३ जस्स जहिं चिअ पढमं तिस्सा अंगम्मि णिवडिआ दिट्ठी।
तस्स तहिं चेअ ठिआ सव्वंगं केण वि ण दिट्ठं ॥
(यस्य यत्रैव प्रथमं तस्या अङ्गे निपतिता दृष्टिः ।
तस्य तत्रैव स्थिता सर्वाङ्गं केनापि न दृष्टम् ॥)

४ तं मित्तं काअव्वं जं किर वसणम्मि देसआलम्मि ।
आलिहिअभित्तिवाउलअ व्व ण परम्मुहं ठाइ ॥
(तन्मित्रं कर्तव्यं यत्किल व्यसने देशकालेषु ।
आलिखितभित्तिपुत्तलकमिव न पराङ्मुखं तिष्ठति ॥)

प्रवरसेनाच्या गाथा

१ अज्जं गओत्ति अज्जं गओत्ति अज्जं गओत्ति गणरीए ।
पढम च्चिअ दिअहद्धे कुड्डो रेहाहिं चित्तलिओ ॥
(अद्य गत इत्यद्य गत इत्यद्य गत इति गणयन्त्या ।
प्रथम एव दिवसार्द्धे कुड्यं रेखाभिश्चित्रितम् ॥)

---

२ सर्वसेनस्य । (पी., ५०५); शिवराजस्य । (भु. ५३२)
३ सर्वसेनस्य । (भु., १८०); अद्धराअस्स । (गं., २३४)
४ सर्वसेनस्य । (भु., १६३); पालितस्य (गं. २१७)
१ पवरसेणस्य । (गं. २०८); नागहस्तिनः । (भु. १५५).

२ अप्पच्छन्दपहाविर दुल्लहछम्भं जणं वि सग्गन्त ।
आआसपहेहिँ भमन्त हिअअ कइआवि भज्जिहिसि ॥
(आत्मच्छन्दप्रधावनशील दुर्लभलम्भं जनमपि मृगयमाण ।
आकाशपथैर्भ्रमद्धृदय कदापि भङ्क्ष्यसे ॥)

३ अवहत्थिऊण सहिजम्पिआइँ जाणं कए ण रमिओसि ॥
एआइँ ताइँ सोक्खाइँ संसओ जेहिँ जीअस्स ॥
(अपहस्तयित्वा सखीजल्पितानि येषां कृते न रमितोसि ।
एतानि तानि सौख्यानि संशयो यैर्जीवस्य ॥)

४ अहव गुण च्चिअ सहुआ अहवा गुणअण्णुओ ण सो लोओ ।
अहवेम्हि णिग्गुणा वा बहुगुणवन्तो जणो तस्स ॥
(अथवा गुणा एव लघवोऽथवा गुणज्ञो न स लोकः ।
अथवास्मि निर्गुणा वा बहुगुणवाञ्जनस्तस्य ॥)

५ उअरिदरदिट्ठथण्णुअणिलुक्कपारावआणँ विरुएहिँ ।
णित्थणइ जाअवेअणँ सूलाहिण्णं व देउलअम् ॥
(उपरीषद्दृष्टशंकुनिलीनपारावतानां विरुतैः ।
निस्तनति जातवेदनं शूलाभिन्नमिव देवकुलम् ॥)

६ कलहन्तरे वि अविणिग्गआइं हिअअम्मि जरसुवगआइं ।
सुअणकआइँ रहस्साइँ डहइ आउक्खए अग्गी ॥

---

२ पवरसेणस्य । (गं. २०२); राघवदेवस्य (भु. १४७).
३ प्रवरराजस्य । (भु. ३५९); देवस्स (गं. १५८).
४ प्रवरसेनस्य । (भु. १४८); चन्दहत्थिस्स (गं. २०३).
५ पवरसेणस्स । (गं. ६४); प्रवरसेनस्य (वे. ६४);
पालिकत्तस्य । (भु. ६६).
६ प्रवरराजस्य । (भु. २६०); हालस्स (गं., ३२१).

(कलहान्तरेऽप्यविनिर्गतानि हृदये जरामुपगतानि।
सुजनश्रुतानि रहस्यानि दहत्यायुःक्षयेऽग्निः)

७ कल्लं किर खरहिअओ पवसिहइ पिओ त्ति सुणइ जणम्मि।
तह वड्ढ भअवइ णिसे जह से कल्लं च्चिअ ण होई॥
(कल्यं किल खरहृदयः प्रवत्स्यति प्रिय इति श्रूयते जने।
तथा वर्धस्व भगवति निशे यथा तस्य कल्यमेव न भवति॥)

८ गज्ज महं च्चिअ उवरिं सव्वत्थामेण लोहहिअअस्स।
जलहर लम्बालइअं मा रे मारेहिसि वराइम्॥
(गर्ज ममैवोपरि सर्वस्थाम्ना लोहहृदयस्य।
जलधर लम्बालकिकां मा रे मारयिष्यसि वराकीम्॥

९ गंधं अग्घाअंतअ पक्ककलंबाणं वाह भरिअच्छ।
आससु पहिअजुआणअ घरिणिमुहं मा ण पेच्छिहिसि॥
(गन्धमाजिघ्रन्पक्वकदम्बानां बाष्पभृताक्ष।
आश्वसिहि पथिकयुवन् गृहिणीमुखं मा न प्रेक्षिष्यसे॥)

१० जइ ण छिवसि पुप्फवइं पुरओ ता कीस वारिओ ठासि।
छित्तोसि चुलचुलंतेहिँ धाविऊण अम्ह हत्थेहिं॥

---

७ प्रवरराजस्य (भु. ४८); लंपस्स (वे., ४६); निष्पटस्स (गं. ४६).

८ प्रवरस्य (भु. ४३०); कलशस्स (पी. ५६६).

९ प्रवरसेनस्य। (पी. ५६६); विषगन्धेः। (भु. ४२९).

१० प्रवरसेनस्य (पी. ४९३).

(यदि न स्पृशसि पुष्पवतीं पुरस्तत्किमिति वारित-
स्तिष्ठसि ।
स्पृष्टोसि चुलचुलायमानैर्धावित्वास्माकं हस्तैः ॥)

११ णइऊरसच्छहे जोव्वणम्मि अइपवसिएसु दिअएसु ।
अणिअत्तासु अ राईसु पुत्ति किं दड्ढमाणेण ॥
(नदीपूरसदृशे यौवने अतिप्रोषितेषु दिवसेषु ।
अनिवृत्तासु च रात्रिषु पुत्रि किं दग्धमानेन ॥)

१२ ण वि तह पढमसमागमसुरअसुहे पाविएवि परिओसो।
जह बीआदिअह सविलक्खलक्खिए वअणकमलम्मि॥
(नापि तथा प्रथमसमागमसुरतसुखे प्राप्तेऽपि परितोषः।
यथा द्वितीयदिवससविलक्षलक्षिते वदनकमले ॥)

१३ तुह दंसणे सअण्हा सद्दं सोऊण णिग्गआ जाइं ।
तइ वोलीणे ताइं पआइँ वोढव्विआ जाआ ॥
(तव दर्शने सतृष्णा शब्दं श्रुत्वा निर्गता यानि ।
त्वयि व्यतिक्रान्ते तानि पदानि वोढव्या जाता ॥)

१४ दूईकज्जाअण्णणपडिरोहं मा करेहिइ इमं ति ।
उत्थंघेइ व तुरिअं तिस्सा कण्णुप्पलं पुलओ ॥
(दूतीकार्याकर्णनप्रतिरोधं मा करिष्यति इदमिति ।
उत्क्षिपतीव तूर्णं तस्याः कर्णोत्पलं पुलकः ॥)

---

११ प्रवरराजस्य । (वे. ४५); पवणराअस्स । (गं. ४५)
कविराजस्य । (भु. ४७).

१२ प्रवरसेनस्य । (भु. १५६); भाणुसत्तिणो । (गं. २०९).

१३ प्रवरसेनस्य । (भु. ५३५).

१४ प्रवरराजस्य । (भु. ४२३).

१५ पत्तिअ ण पत्तिअन्ती जइ तुज्झ इमे ण मज्झ रुअईअे ।
पुट्ठीअ बाहबिन्दू पुलउब्भेएण भिज्जन्ता ॥
(प्रतीहि न प्रतीयन्ती यदि तवेमे न मम रोदनशीलायाः ॥
पृष्ठस्य बाष्पबिन्दवः पुलकोद्भेदेन भिद्यमानाः ॥)


१६ परिओसविअसिएहिं भणिअं अच्छीहिं तेण जणमज्झे ।
पडिवण्णं तीअ वि उव्वमन्तसेएहिँ अंगेहिं ॥
(परितोषविकसिताभ्यां भणितमक्षिभ्यां तेन जनमध्ये ।
प्रतिपन्नं तयाप्युद्वमत्स्वेदैरङ्गैः ॥)

१७ वोलीणालक्खिअरूअजोव्वणा पुत्तिकं ण दुम्मेसि ।
दिट्ठा पणट्ठपोराणजणवआ जम्मभूमि व्व ॥
(व्यतिक्रान्तालक्षितरूपयौवना पुत्रि कं न दुनोषि ।
दृष्टा प्रणष्टपौराणजनपदा जन्मभूमिरिव ॥)

१८ सा तुज्झ वल्लहा तं सि मज्झ वेसो सि तीअ तुज्झ अहं ।
बालअ फुडं भणामो पेम्मं किर बहुविआरं त्ति ॥
(सा तव वल्लभा त्वमसि मम द्वेष्योसि तस्यास्तवाहम् ।
बालक स्फुटं भणामः प्रेम किल बहुविकारमिति ॥)

---

१५ प्रवरसेनस्य । गं. २१६); हालस्य (भु. १६२).
१६ प्रवरराजस्य । (भु. २९०).
१७ प्रवरराजस्य । (गं. ३४०); विश्वसेनस्य (भु. २८९).
१८ प्रवरसेनस्य । (भु. १३५); उजयस्य । (वें. १२६).



१. रामटेक येथील त्रिविक्रमाची मूर्ति




प्लेट क्र. २


भरतभेट




प्लेट क्र. ३ वालिवध



प्लेट क्र. ४. तिगवा येथील देवालय




प्लेट क्र.५. तिगवा येथील देवालयांतील गंगेची मूर्ति



प्लेट क्र. ६. [illegible] येथील देवालयाचा दरवाजा



प्लेट क्र. ८ मरणोन्मुख सुंदरी



प्लेट क्र.७. अजंटा येथील क्रमांक १६ च्या विहार लेण्याचें मानचित्र

अजंटचाच्या क्रमांक सोळाच्या लेण्यांतील चित्रांची सूची
(चित्रांचे क्रमांक मानचित्रांतल्या प्रमाणें)

क्रमांक

१ मायादेवीचें स्वप्न.

२ असित ऋषीची भेट.

३ गौतमाचा विद्याभास व धनुर्वेदाभ्यास.

४ वृद्ध, व्याधिग्रस्त व मृत मनुष्यांचें दर्शन.

५ त्रपुष व भल्लिक यांची भेट; सुजातेचें पायसदान.

६ बुद्धाचा धर्मोपदेश.

७ अजातशत्रूची बुद्धाशीं भेट.

८ अप्सरा; बुद्धाचा धर्मोपदेश.

९ मानुषी बुद्ध.


१० बुद्धाचें कपिलवस्तूस आगमन; नन्दाचा अभिषेक व संन्यासाश्रमस्वीकार.

११ मरणोन्मुख सुन्दरी.

१२ महाउम्मग्ग जातक.

१३ हस्तिजातक.

१४ बुद्धाचा तुषित स्वर्गांत उपदेश.



प्लेट क्र. ९. अजंटा येथील क्रमांक १७ च्या विहार लेण्याचें मानचित्र

अजंटयाच्या क्रमांक सतराच्या लेण्यांतील चित्रांची सूची
(चित्रांचे क्रमांक मानचित्रांतल्या प्रमाणें)

क्रमांक

१ व २ विश्वन्तर जातकांतील कांही प्रसंग.

३ हवेंत उडणारा इन्द्र व अप्सरा.

४ मानुषी बुद्ध.

५ गन्धर्व व अप्सरा बुद्धाची पूजा करीत आहेत.

६ नालगिरि हत्तीचें दमन.

७ संसारचक्र.

८ षड्दन्तजातक.

९ महाकपिजातक.

१० हस्तिजातक.

११ हंसजातक.

१२ विश्वन्तरजातक.

१३ सुतसोमजातक.

१४ बुद्धाचा तुषित स्वर्गांत धर्मोपदेश; सारिपुत्रप्रश्न.

१५ बुद्ध, यशोधरा व राहुल.

१६ श्रावस्तींतील चमत्कार.

१७ शरभजातक.

१८ मातृपोषकजातक.

१९ मत्स्यजातक.

२० श्यामजातक.

२१ महिषजातक.

२२ सिंहलावदान.

२३ शिबिजातक.

२४ मृगजातक.

२५ ऋक्षजातक.


२६ न्यग्रोधमृगजातक.




प्लेट क्र. १०. लोभी ब्राह्मण जूजक



प्लेट क्र. ११. बुद्ध, यशोधरा आणि राहुल




प्लेट क्र. १२. अजंटा येथील क्रमांक १९ च्या चैत्य लेण्याचा दर्शनी भाग



प्लेट क्र. १३ घटोत्कच लेण्याचें मानचित्र

पद्मपुरात् प्लेट क्र. १४ वाकाटकांचा दुर्ग येथे सापडलेला अपूर्ण ताम्रपट



या ताम्रपटावरील पहिल्या ओळींत प्रथमच 'पद्मपुराहून' असा निर्देश आहे. नंतर वाकाटक राजांची वंशावळ दिली आहे.

लिपी---पेटिकाशीर्षक : भाषा संस्कृत. काळ---इ. स. चें पांचवें शतक.

विभाग दुसरा

वाकाटक नृपति, त्यांचे मांडलिक व सचिव
यांचे
कोरीव लेख

वाकाटक नृपतींचे कोरीव लेख

नन्दिवर्धन शाखा

१. प्रथम रुद्रसेनाचा देवटेक शिलालेख

उपलब्धि—देवटेक हें नागपुरच्या आग्नेय दिशेस सुमारें पन्नास मैलांवर एक लहानसें गाव आहे. तेथे एक जीर्णावस्थेंत असलेलें देऊळ आहे. त्याच्याजवळ कोरीव लेख असलेली एक मोठी शिला पडली होती. ती आता नागपूरच्या संग्रहालयांत आणून ठेवली आहे. सन १८७३–७४ मध्ये कनिंग्हामचा सहाय्यक बेग्लर हा देवटेकला गेला होता. त्याने कनिंग्हामच्या आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, (पु. ७, पृ. १२३–२५) मध्ये या देवळाचें व तेथील शिलेचें वर्णन दिलें आहे. बेग्लरने पेन्सिलने घेतलेल्या ठशांवरून कनिंग्हामने त्या शिलेवरील दोन कोरीव लेखांची यथादृष्ट प्रत (eye-copy) आणि त्यांचें वाचन कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय–उत्कीर्ण–लेख–संग्रह, पहिली आवृत्ति, पृ. २८–२९) मध्ये प्रसिद्ध केलें. हे कोरीव लेख महत्त्वाचे आहेत, तरी प्रस्तुत लेखकाने अखिल–भारतीय प्राच्यविद्यापरिषदेच्या सन १९३५ मध्ये म्हैसूरला भरलेल्या अधिवेशनांत त्यांच्यावर आपला लेख वाचला तोंपर्यंत त्यांच्याकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नव्हतें. हे लेख त्या अधिवेशनाच्या अहवालामध्ये छापांसहित प्रसिद्ध केले आहेत.

प्रस्तुत लेखक ऑक्टोबर १९३५ मध्ये देवटेकला गेला होता. त्यावेळीं त्याने या लेखांचे जे छाप घेतले त्यांवरून कनिंग्हामने प्रसिद्ध केलेल्या यथादृष्ट प्रतींतल्या पेक्षा कांही अधिक अक्षरें वाचतां आलीं.

उलट पक्षीं देवटेकच्या मुलांनी व गुराख्यांनी त्या शिलेचा बसण्याकरिता उपयोग केल्यामुळे तिच्यावरील पहिल्या लेखाच्या शेवटल्या ओळींतील कांही अक्षरें कनिंग्हामच्या काळीं वाचतां येत तीं आता शिलेच्या पृष्ठभागाचा टवका गेल्यामुळे नष्ट झालीं आहेत. या शिलेचें वर्णन बेग्लरने पुढील शब्दांत केलें आहे—'ही शिला असमान्तरभुजाकृति (trapezium) व खरबरीत सैकत प्रस्तराची असून एका विशाल चिंचेच्या वृक्षाखाली गावाच्या वाटेवर पडली आहे. तिचा विश्रांतीकरिता व बसण्याकरिता उपयोग करण्यांत येतो. या कारणाने तिचा पृष्ठभाग गुळगुळीत झाला आहे. या शिलेची लांबी नऊ फूट व रुंदी एका शेवटास साडेतीन फूट आणि दुसऱ्या शेवटास दोन फूट दहा इंच आहे. तिच्यावर दोन कोरीव लेख आहेत.'

शिलेवरील दोन लेख—हे दोन लेख भिन्न काळांतले आहेत. त्यांपैकी अगोदरचा लेख लांबीच्या बाजूने लिहिला असून त्याच्या चार ओळी आहेत. त्याने शिलेच्या रुंदीची १ फूट १० इंच जागा व्यापली असून त्या खालची १ फूट ६ इंच जागा रिकामी आहे. या लेखाची लिपी ब्राह्मी असून बहुतेक अक्षरें अशोकाच्या गिरनार प्रस्तर लेखांतल्या सारखीं आहेत. भाषाहि गिरनार लेखांतल्या सारखी आद्य प्राकृत आहे. या लेखाच्या निदान पहिल्या तीन ओळी शिलेच्या उजव्या कडेपर्यंत कोरल्या होत्या असें दिसतें. कारण त्यांतील कांही अक्षरें अद्यापि शिलेच्या उजव्या बाजूकडच्या भागांत मधून मधून दृष्टीस पडतात. या अक्षरांचा नंतरच्या कोरीव लेखाशी कांही संबंध नाही. शिवाय या अगोदरच्या लेखाच्या पहिल्या दोन ओळींतलीं अक्षरें बरीच शाबूत असून वाचतां येतात, पण त्यांचा अर्थ पूर्णपणें लागत नाही. त्यावरूनहि त्यांचा उजवीकडचा भाग नष्ट झाला आहे असें दिसतें. आणखी असें की लांबीच्या बाजूने लेख लिहिण्यास सुरवात करून तो उजवीकडच्या शेवटापर्यंत न नेतां लेखक मध्येच कां थांबला याची उपपत्ति लागत नाही. म्हणून 'अगोदरच्या लेखाचा भाग नष्ट

होऊं नये किंवा त्याच्या वाचनांत अडथळा येऊं नये अशा रीतीने नंतरचा लेख कोरला आहे ' हें बेग्लरचें म्हणणें मनाला पटत नाही. उलट, अगोदरच्या लेखाचा भाग छिलून टाकून त्या ठिकाणीं नंतरचा लेख कोरला होता असें स्पष्ट दिसतें.

पहिला लेख—या अगोदरच्या लेखाचा उद्देश (अशोकाच्या पांचव्या स्तंभलेखांतल्याप्रमाणें कांही ऋतूंत किंवा कदाचित् वर्षभरहि) प्राण्यांचें बंधन व हिंसा करूं नये, केल्यास अमुक शिक्षा होईल अशी एका स्वामीची (अधिपतीची) आज्ञा चिकम्बुरी येथे जाहीर करणें हा असावा. या स्वामीचें नांव या लेखांत आलें नाही, पण चौथ्या ओळींत त्याला 'राजा' असें म्हटलें आहे. तिसऱ्या ओळींत अमात्यांचा उल्लेख आहे. त्यांच्याकडे या राजाज्ञेची अंमलबजावणी करण्याचें काम असावें. शेवटच्या ओळींत चौदाव्या वर्षाचा निर्देश आहे. हें शासनवर्ष दिसतें. या वर्षी हा लेख प्रस्तुत शिलेवर कोरला असावा.

हा लेख पुण्यश्लोक अशोकाच्या अभिषेकानंतर चौदाव्या वर्षी त्याच्या विदर्भांतील धर्ममहामात्राने कोरविलेला दिसतो. अशोकाच्या पांचव्या प्रस्तरलेखावरून त्याने आपल्या अभिषेकानंतर तेराव्या वर्षी म्हणजे प्रस्तुत लेख लिहिण्याच्या अगोदर एक वर्ष धर्ममहामात्रांची नियुक्ति केली होती. तेव्हा विदर्भांतील धर्ममहामात्राने आपल्या प्रभूची आज्ञा सर्व प्रजाजनांना माहीत व्हावी या हेतूने चिकम्बुरी येथे हा लेख कोरविला असावा. देवटेकजवळच चिकमारा नांवाचें गाव अद्यापि अस्तित्वांत आहे. तेंच पूर्वीचे चिकम्बुरी. प्राचीन काळीं हें बरेंच महत्त्वाचें ठिकाण किंवा यात्रेचें स्थान असावें; म्हणून अशोकाच्या धर्ममहामात्राला त्या ठिकाणीं राजाज्ञा जाहीर करण्याची जरूरी वाटली असें दिसतें.

दुसरा लेख—या शिलेवरील दुसरा लेख तिच्या अरुंद कडेकडील भागावर रुंदीच्या बाजूने कोरला आहे. त्याच्या सहा ओळी आहेत. अगोदरच्या लेखाप्रमाणे याचाहि बराचसा भाग खराब झाला

आहे. पहिल्या पांच ओळींतील बरीचशीं अक्षरें शिलेचा पृष्ठभाग घासून गेल्यामुळे नष्ट किंवा अस्पष्ट झालीं आहेत. शिवाय या लेखाच्या मध्यभागीं पाणी जाण्याकरिता एक पन्हळ खोदली आहे. तिच्यामुळेहि कांही अक्षरें नष्ट झालेलीं दिसतात.

अक्षरवटिका व भाषा—समुद्रगुप्ताच्या एरण लेखांतल्या प्रमाणे ह्या लेखाची अक्षरवटिका खिस्तोत्तर चौथ्या शतकांतील पेटिका-शीर्षक लिपीची आहे. पांचव्या ओळींतील 'वंश'–मधील तिकोनी 'व', चौथ्या ओळींतील त्रिभागी 'य' आणि पांचव्या ओळींतील बिनगाठीचा 'न' हीं अक्षरें उल्लेखनीय आहेत. भाषा संस्कृत असून सर्व लेख गद्यांत आहे.

उद्देश—या लेखाचा उद्देश चिकम्बुरि येथे रुद्रसेन राजाने एक धर्मस्थान किंवा देवालय बांधलें हें जाहीर करण्याचा असावा. या लेखा-जवळच एक जीर्णावस्थेंत असलेलें लहान देऊळ विद्यमान आहे. त्याच्यासमोर पूर्वी एक लहानसा मंडप होता असें दिसतें. त्याचे अवशेष तेथे पडले आहेत. हें देऊळ अगदी साधें आहे. त्यावर नक्षी-काम मुळीच दिसत नाही. त्याच्या दरवाज्याच्या चौकटीचे दोन भाग तेथे पडले आहेत त्यांवरून त्या चौकटीवर वेलपत्ती कोरली होती असें दिसतें. सध्याच्या देवळाचा दरवाजा लहान असून त्याची रुंदी ४ फूट ४ इंच व उंची सुमारें चार फूट आहे. चौकटीच्या वरच्या पट्टीवर द्विभुज गणपतीची लहानशी मूर्ति आहे. देवळाचें शिखर पिरॅमिड पद्धतीचें आहे. यासारखीं देवळें जवळच्या पानोरी, आर्मोरी इत्यादि गावांत आढळतात. सध्या देवळांत गणपतीची एक मूर्ति बसविली आहे, पण ती नंतरची दिसते. हें देवालय श्रीशंकराचें असावें. शंकराची पिंडी जवळपास दिसत नाही, पण तेथे असलेल्या शाळुंकेवरून ती बरीच मोठी, सुमारें तेरा इंच व्यासाची असावी. अशीं शिवलिंगें रामटेकजवळ मनसर येथेहि आढळतात. देवळाजवळ नंदीची एक भग्न मूर्ति आहे, तिजवरूनहि हें देवालय पूर्वी शंकराचें असावें असें दिसतें.

सध्याचें देवालय वाकाटक काळाइतकें प्राचीन नाही, पण हें स्थान प्राचीन आहे यांत संशय नाही. वाकाटककालीन देवालय जीर्ण झाल्यावर नंतरच्या काळांत त्याच ठिकाणीं हें छोटें देवालय उभारलेलें दिसतें.

कालनिश्चय—या लेखांत कालनिर्देश नाही, पण त्यांत रुद्रसेन राजाचें नांव आलें आहे. चौथ्या ओळींत राजवंशाचें नांव कोरलें होतें, पण तें आता नष्ट झालें आहे. तथापि अक्षरवटिकेवरून कनिंग्हामने हा लेख वाकाटकवंशी प्रथम रुद्रसेनाचा असावा असा तर्क केला होता. त्यावेळच्या कल्पनांप्रमाणे हा रुद्रसेन कैलकिल यवनांपैकी असून तो इसवी सन १७० च्या सुमारास होऊन गेला असें कनिंग्हामने प्रतिपादिलें. हा काळ अर्थातच चूक आहे. तथापि हा लेख वाकाटकवंशी प्रथम रुद्रसेनाने कोरविला होता हा कनिंग्हामचा तर्क बरोबर आहे. वाकाटकवंशांत रुद्रसेन नांवाचे दोन राजे होऊन गेले : (१) प्रथम प्रवरसेनाचा नातू आणि उत्तराधिकारी प्रथम रुद्रसेन आणि (२) त्याचा नातू आणि गुप्तसम्राट् द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्य याचा जामात द्वितीय रुद्रसेन. यापैकी पहिला स्वामिमहाभैरवाचा भक्त अर्थात् शिवोपासक होता, तर दुसरा आपल्या प्रभावतीगुप्ता नामक पत्नीच्या प्रभावामुळे चक्रपाणीचा म्हणजे विष्णूचा उपासक झाला होता. प्रस्तुत लेखांत बहुधा शिवालय बांधल्याचा उल्लेख असावा; कारण मागे सांगितल्याप्रमाणे त्याच्या जवळचें देवालय भगवान् शंकराचें होतें म्हणून हा लेख प्रथम रुद्रसेनाचाच असला पाहिजे. अक्षरवटिकेवरूनहि हाच काळ सिद्ध होतो.

लेखाचें महत्त्व--प्रस्तुत लेख हा वाकाटकांच्या सर्व ज्ञात कोरीव लेखांत कालक्रमाने पहिला आहे. तसेंच वाकाटकांचा हा एकच शिलालेख आतापर्यंत सापडला आहे. या दोन्ही दृष्टींनी त्याचें महत्त्व आहे. या शिलालेखावरून प्रथम रुद्रसेन हा नर्मदेच्या दक्षिणेस विदर्भात राज्य करीत होता हें उघड आहे. अर्थातच हा रुद्रसेन आणि ज्याचा

समुद्रगुप्ताने समूळ उच्छेद केला तो आर्यावर्तनृपति रुद्रदेव हे एक असणें शक्य नाही.

आता एकच प्रश्न शिल्लक राहतो. तो हा की रुद्रसेनाने या शिळेवर रुंदीच्या बाजूने व अरुंद टोकावर हा लेख कां कोरला असावा ? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण नाही. वाकाटकांच्या काळीं वैदिक धर्माचें व संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन झालें हें सर्वविश्रुत आहे. वाकाटकांनी स्वतः पशुयज्ञ केले. तेव्हा त्यांना अशोकाने उपदेशिलेल्या अहिंसाधर्माविषयीं आदर वाटणें शक्य नव्हतें. म्हणून जेव्हा प्रथम रुद्रसेनाने आपल्या इष्टदेवतेचें मंदिर उभारलें आणि तें जाहीर करण्याकरिता लेख कोरविण्याचें ठरविलें तेव्हा तेथे पडलेल्या विशाल शिलेवरील अगोदरचा लेख छिलून टाकून त्या जागीं आपला लेख कोरविण्यांत त्याला कोणताहि किंतू वाटला नसावा. ही शिला उभी करून तिचें रुंद टोंक जमिनींत गाडलें गेलें असावें. वाकाटकांचा लेख अरुंद टोकास सुरू होऊन शिलेच्या मध्य भागापर्यंत पूर्ण झाल्याने जमिनींत गेलेला त्याच्या खालचा अशोककालीन लेख छिलून टाकण्याची जरूरी वाटली नसावी. म्हणून त्या अगोदरच्या लेखाचा कांही भाग अद्यापि अवशिष्ट राहिला आहे.

स्थलनिश्चय—दोन्ही लेखांत **चिकम्बुरि** हें एकच स्थलनाम उल्लेखिलें आहे. तें देवटेकजवळचें हल्लीचें चिकमारा होय. चिक्कम्बुरि हें नगर निदान सहाशें वर्षे भरभराटींत होतें असें दिसतें. कारण अशोकाच्या महामात्राप्रमाणे वाकाटक प्रथम रुद्रसेनालाहि तेथे आपला लेख कोरविणें आवश्यक वाटलें. प्राचीन काळीं त्याचा विस्तार बराच मोठा असून त्यामध्ये हल्लीच्या देवटेक गावाचाहि अन्तर्भाव होत असावा, असें दिसतें.

वाचन

१ चिक्कम्बुरि . स . . .
२ . [स] ज . . . . .

३ प्रवरस . . . सस्यार्य

४ . . . .

५ . . . वंश[जा*]तस्येदं[1] रुद्र-

६ सेनरा[ज्ञः][2] [स्व*]धर्म्मस्थानं(नम्) [।*]

---

२. प्रभावतीगुप्तेचा पुणें ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट पुणें येथें बळवंत भाऊ नगरकर नामक तांबटाच्या घरीं सांपडला. हा गृहस्थ मूळचा अहमदनगरचा असून प्रस्तुत ताम्रपट त्याच्या घरीं कित्येक पिढ्यांपासून होता असें समजतें. तथापि हा ताम्रपट मूळचा वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तहसिलींत असावा असें वाटतें; कारण पुढे दाखविल्याप्रमाणें त्यांत उल्लेखिलेलीं बहुतेक गावें त्या तहसिलींत अद्यापि दाखवितां येतात. या ताम्रपटाचा सारांश प्रथम प्रा. का. बा. पाठक यांनी इंडियन अँटिक्वरी, पु. ४१ (१९१३), पृ. २१४–१५, मध्ये प्रसिद्ध केला. त्याच्या महत्त्वामुळे विद्वानांचें लक्ष त्याच्याकडे लागलीच आकर्षित झालें आणि व्हिन्सेंट स्मिथने त्याचा उपयोग रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नल (सन १९१४, पृ. ३१७ इ.) मधील 'मध्यप्रांत–वऱ्हाड मधील वाकाटक राजवंश' या आपल्या लेखाकरिता केला. नंतर प्रा. का. बा. पाठक व रा. ब. का. ना. दीक्षित यांनी हा ताम्रपट एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ४० इ., मध्ये इंग्लिश भाषांतर व ठसे यांसह प्रसिद्ध केला. त्याच ठशांवरून त्याचें वाचन येथे केलें आहे. ताम्रपट सध्या कोठे आहे हें माहित नाही.

---

१ 'वाकाटकवंशजातस्येदं' असें वाचावें.

२ 'रुद्रसेनराजस्य' असें वाचावें.

वर्णन—या ताम्रपटाचे दोन पत्रे असून त्यांची लांबी ९$\frac{१}{४}$ इं. व रुंदी ५$\frac{३}{४}$ इं. आहे. ते पाव इंच जाड व पाऊण इंच व्यास असलेल्या एका कडींत ओवले असून तिचीं टोकें डागाने जोडलीं आहेत. ही कडी ताम्रपटाच्या पत्र्यांना एका बाजूस पाडलेल्या अर्धा इंच व्यासाच्या छिद्रांतून जाते. तिला एक अंडाकृति (oval) मुद्रा जोडली आहे. तिची लांबी २$\frac{७}{८}$ इं. आणि रुंदी २$\frac{१}{८}$ इं. आहे. मुद्रेवर चार ओळींचा कोरीव लेख असून त्याच्यावर चंद्रसूर्यांच्या आकृति व खाली एक पुष्पाकृति कोरली आहे. ताम्रपटाचे पत्रे व कडी यांचें वजन ९७ तोळे आहे.

प्रस्तुत लेख पत्र्यांच्या आंतील बाजूस कोरला आहे. पहिल्या पत्र्यावर दहा आणि दुसऱ्यावर बारा ओळी आहेत. पहिल्या पत्र्यावरील अक्षरें दुसऱ्या पत्र्यावरील अक्षरांपेक्षा जरा मोठ्या आकाराचीं आहेत. हा लेख बऱ्या स्थितींत आहे.

अक्षरवटिका—या लेखाची लिपी कीलशीर्षक (nail-headed) प्रकारची आहे. बहुतेक अक्षरांच्या शिरावर उलटा त्रिकोण कोरला आहे. कांहीं अक्षरें मात्र वाकाटकांच्या इतर लेखांतल्याप्रमाणे पेटिकाशीर्षक प्रकारचीं आहेत. उदाहरणार्थ मुद्रेवरील पहिल्या ओळींतील 'वाकाटक' हीं अक्षरें आणि पहिल्या पत्र्याच्या पहिल्या ओळींतील आरंभींचें 'सिद्धम्' मधील 'सि' हें अक्षर पाहा. या अक्षरांच्या शिरावर पेटिका कोरली आहे इतकेंच नाही, तर त्यांपैकी कांहींच्या आकृतिहि या लेखांत इतरत्र दिसतात त्याप्रमाणें नसून पेटिकाशीर्षक लिपींतल्या प्रमाणेंच आहेत. उदाहरणार्थ, 'व' आणि 'स' हीं अक्षरें पाहा. तेव्हा असें दिसतें की या ताम्रपटाच्या लेखकाने प्रस्तुत लेख पेटिकाशीर्षक लिपींत लिहिण्यास आरंभ केला, पण त्या लिपीची त्याला सवय नसल्याने त्याने लागलीच ती सोडून स्वतःला जास्त परिचित असलेल्या कीलशीर्षक लिपींत बाकीच्या मुद्रेचा व लेखाचा भाग लिहिला. हा लेखक बहुधा उत्तर भारतांतील असावा; कारण तेथे ही कीलशीर्षक लिपी त्या काळांत प्रचलित होती.

प्रस्तुत लेखांत उत्तरी व दक्षिणी वळणाच्या अक्षरांचें मिश्रण झालें आहे. त्यांतहि उत्तरी वळणाचीं अक्षरें जास्त प्रमाणांत आहेत. उदाहरणार्थ, ग 'व' 'स' यांच्या डावीकडच्या बाजूस गाठ आहे; 'ण' च्या वरच्या आडव्या रेघेचे आणि मधल्या उभ्या रेघेचे दोन भाग झाले आहेत; 'श' व 'ण' यांना गाठ आहे. पण 'त' व 'म' यांना नाही; 'ल' चा उजवीकडचा दंड लहान झाला आहे आणि 'ह' चा खालचा भाग डावीकडे एकदम वळविला आहे. दक्षिणी वळणांच्या अक्षरांमध्ये खालील विशेष उल्लेखनीय आहेत—'अ', 'क' आणि 'र' यांच्या उभ्या दंडाचा खालचा भाग डावीकडे वळविला आहे; 'ड' चा पृष्ठभाग वाटोळा आहे; व्यंजनयुक्त ऋकार बहुधा डाव्या बाजूला वळविलेल्या वक्र रेषेने दाखविला आहे. जिह्वामूलीयाचें चिह्न बाराव्या व पंधराव्या ओळींत, आणि उपध्मानीयाचें सहाव्या ओळींत आलें आहे.

भाषा—-मुद्रेवरील व पत्र्यांवरील लेख संस्कृत भाषेंत आहे. मुद्रेवरील लेख पद्यांत आहे. पण पत्र्यांवरील लेख, शेवटच्या शापाशीर्वादात्मक श्लोकाव्यतिरिक्त, गद्यांत आहे. खालील लेखनविशेष उल्लेखनीय आहेत. नान्दिवर्द्धनात् (ओ. १) यासारख्या ठिकाणीं रेफानंतर व्यंजनाचें द्वित्व झालें आहे, आणि द्रिष्टम् (ओ. २–३) मध्ये 'ऋ'बद्दल 'रि'चा उपयोग केला आहे.

विषय—-प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' (पाहिलें आहे) या शब्दाने होतो. त्यावरून हें दानपत्र पूर्ण होऊन सचिवालयांत नोंदलें गेलें होतें हें दिसतें. हा ताम्रपट 'युवराजजननी' प्रभावतीगुप्तेने नान्दिवर्धनाहून दिला होता. प्रभावतीगुप्ता ही वाकाटक महाराज (द्वितीय) रुद्रसेन याची अग्रमहिषी (पट्टराणी) आणि युवराज दिवाकरसेन याची जननी असून आपल्या अल्पवयी मुलाकरितां राज्यकारभार पाहत होती असें यांतील वर्णनावरून समजतें. ह्या ताम्रपटांत प्रभावतीगुप्तेने कार्त्तिक शुक्ल द्वादशीस भगवद्भक्त आचार्य चनालस्वामी यास दङ्गुण ग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. त्या राजमातेने हें दान

प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याच्या प्रसंगीं दिलेलें दिसतें. प्रभावतीगुप्ता ही अत्यन्त भगवद्भक्त होती. तिने हें दान प्रथम भगवंताच्या पादमूलांस (पादुकांस) अर्पण करून नंतर तें उपरिनिर्दिष्ट आचार्यास दिलें, असें यांत म्हटलें आहे. हीं पादमूलें रामगिरीवरील भगवान् रामचंद्राचीं असावीं, कारण या राजमातेनें आपला दुसरा ताम्रपट या स्थानाहूनच दिला आहे. दान दिलेला दङ्गुण-ग्राम सुप्रतिष्ठ नामक आहारांत विलवणकाच्या पूर्वेस, शीर्षग्रामाच्या दक्षिणेस आणि कदापिञ्जनाच्या उत्तरेस होता. ह्या ताम्रपटाचा काल तेरावें वर्ष असा दिला आहे. तें वर्ष युवराज दिवाकरसेनाच्या शासनाचें असावें. ताम्रपटाचा लेखक चक्रदास हा होता.

चर्चा--प्रस्तुत लेखांत प्रभावतीगुप्ता आपलें वर्णन वाकाटक महाराज (द्वितीय) रुद्रसेन याची अग्रमहिषी असें करते, पण त्याच्या प्रास्ताविक भागांत ती वाकाटकांची वंशावळ देत नसून आपल्या माहेरची-गुप्तनृपतींची-देते. हाच प्रकार तिच्या ऋद्धपुरच्या ताम्रपटांतहि आढळतो. तिला आपण गुप्तवंशांत जन्मलों याचा विशेष अभिमान वाटत होता यांत संशय नाही.

या ताम्रपटांतील वंशावळ गुप्तांचा आदिराज घटोत्कच याच्या पासून सुरू होते. नंतर त्याचा पुत्र महाराज (प्रथम) चंद्रगुप्त; त्याला महादेवी कुमारदेवी पासून झालेला पुत्र, लिच्छविदौहित्र, अनेक अश्व-मेध याग करणारा, महाराजाधिराज समुद्रगुप्त; त्याचा पुत्र परम भागवत (भगवान् विष्णूचा एकनिष्ठ उपासक) महाराजाधिराज (द्वितीय) चंद्रगुप्त; त्याला महादेवी कुबेरनागेपासून झालेली कन्या नागकुलोत्पन्न प्रभावतीगुप्ता-अशी वंशावळ या ताम्रपटांत दिली आहे. प्रभावतीगुप्ता ही धारण गोत्राची व वाकाटक महाराज (द्वितीय) रुद्रसेन याची अग्रमहिषी असून युवराज दिवाकरसेनाची माता होती असेंहि पुढील वर्णनावरून समजतें.

प्रस्तुत ताम्रपटांतील गुप्त नृपतींचें वर्णन खुद्द गुप्तांच्या कोरीव लेखांतील वर्णनाशीं पूर्णपणें जुळत नाही. त्यामध्ये गुप्तवंशसंस्थापक

महाराज गुप्त याचा उल्लेख नाही. दुसरें असें की प्रथम चन्द्रगुप्तानें 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली होती असें गुप्तलेखांवरून समजतें. पण येथें त्याला 'महाराज' ही खालची पदवी दिली आहे. शिवाय द्वितीय चंद्रगुप्ताचें वर्णन करतांना 'पृथिवीवर अप्रतिरथ,' 'सर्व राजांचा उच्छेद करणारा', 'ज्याच्या यशानें चारी समुद्रांच्या पाण्याची चव घेतली आहे असा' 'कोटयवधि गाई व हजारों सुवर्ण नाणीं देणारा' हीं गुप्तलेखांत सामान्यतः समुद्रगुप्तालाच लावलेलीं विशेषणें योजिलीं आहेत. प्रस्तुत वंशावलिवर्णनांत अशा चुका असल्या तरी हें दानपत्र खरें आहे, बनावट नाही, यांत संशय नाही. कारण हेंच वर्णन प्रभावती-गुप्तेच्या ऋद्धपुर ताम्रपटांतहि आढळतें.

कालनिश्चय--प्रस्तुत ताम्रपटाच्या योगानें वाकाटकांचा काळ निश्चित करतां आला. यामुळे त्याचें महत्त्व विशेष आहे. या ताम्रपटाच्या उपलब्धीपूर्वी सापडलेल्या द्वितीय प्रवरसेनाच्या सर्व ताम्रपटांत प्रभावतीगुप्तेचें वर्णन 'महाराजाधिराज देवगुप्ताची कन्या' असें केलें होतें. फ्लीटनें हा देवगुप्त व देववारुणार्क येथील स्तंभलेखांत उल्लेखिलेला उत्तरकालीन गुप्तनृपति महाराजाधिराज देवगुप्त हे एकच मानून वाकाटक नृपति आठव्या शतकांत होऊन गेले असें प्रतिपादिलें होतें. कीलहॉर्न व सुकथनकर यांनीहि तें मत स्वीकारलें होतें. प्रस्तुत ताम्र-पटांत प्रभावतीगुप्ता ही द्वितीय चंद्रगुप्ताची कन्या होती असें स्पष्ट म्हटल्यामुळे ती ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या अखेरीस होऊन गेली हें निर्विवादपणें सिद्ध झालें. त्यानंतर देवराज (किंवा देवगुप्त) हें चंद्रगुप्ताचें आवडतें नांव होतें हेंहि सांची शिलालेखावरून माहीत झालें आहे. म्हणूनच वाकाटक ताम्रपटांत त्या गुप्तनृपतीचा उल्लेख त्या नांवानें केलेला असावा.

स्थलनिश्चय--प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **नन्दिवर्धन** हें रा. ब. हीरालालनी रामटेक जवळचें नंदरधन किंवा नगरधन होय असें म्हटलें होतें. त्यानंतर उपलब्ध झालेल्या अनेक

प्रमाणांवरून तें खरें ठरलें आहे. पण इतर गावांचा पत्ता लागला नव्हता. सन १९४० सालीं जांब ताम्रपट प्राप्त झाल्यावर मला त्यांतहि **सुप्रतिष्ठाहाराचा** उल्लेख आढळला. त्यामुळे प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या गावांचा शोध मला लावतां आला. हीं गावें वर्धा जिल्ह्यांतील हिंगणघाटाजवळ सापडलीं. **विलवण** हें हिंगणघाटाच्या पश्चिमेस अडीच मैलांवरचें वणी, आणि **कदापिञ्जन** हें आग्नेय दिशेस सुमारें तीन मैलांवरचें कदाजन असावें. तेव्हा प्राचीन **दङ्गुण** गावाच्या जागींच सध्याचें हिंगणघाट आहे, असें दिसतें. कालान्तराने दङ्गुण याचें हिंगण असें रूपान्तर होऊन त्या ठिकाणीं वन्ना नदीला उतार असल्यामुळे ‘हिंगण’ नांवाला ‘घाट’ शब्द जोडला असावा. त्याजवळचीं कांही ग्रामनामेंहि ‘घाट’ शब्दान्त आहेत. जांब ताम्रपटांत सुप्रतिष्ठाहारांतील म्हणून उल्लेखिलेलीं गावेंहि सध्याच्या हिंगणघाट तहसिलींत सापडतात, म्हणून प्राचीन **सुप्रतिष्ठाहारांत** सामान्यतः हिंगणघाट तहसिलींतला प्रदेश अंतर्भूत होत होता असें अनुमान करतां येतें. प्रस्तुत ताम्रपट पुण्यासारख्या दूर ठिकाणीं सापडला असला तरी तो मूळचा हिंगणघाट तहसिलींतील हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ द्रिष्टस्[2] [।*] सिद्धम् [।*] जितम्भगवता [।*] स्वस्ति [।*] नान्दिवर्द्धनादासीद्[3]गुप्तादि[राजो] म[हाराज]–

१ एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ४२ समोरील ठशांवरून.

२ ‘दृष्टम्’ वाचावें. हा शब्द दुसऱ्या व तिसऱ्या ओळींच्या समासा (margin) मध्ये कोरला आहे.

३ ‘नन्दिवर्द्धनात्’ असें वाचावें. क्रमांक ३, ओळ १ पाहा.

२ श्रीघटोत्कचस्तस्य सत्पुत्रो महाराजश्रीचन्द्रगुप्तस्तस्य सत्पुत्रो–

३ नेकाश्वमेधयाजी लिच्छविदो(दौ)हित्रो महादेव्यां कुमारदेव्यामुत्पन्नो

४ महाराजाधिराजश्रीसमुद्रगुप्तस्तत्प(त्स)त्पुत्रस्तत्पाद-परिगृहीतः

५ पृथिव्यामप्रतिरथस्सर्व्वराजोछे(च्छे)त्ता चतुरुदधिस-लिलास्वादित–

६ यशा[1] नेकगोहिरण्यकोटिसहस्रप्रदः परमभागवतो महारा–

७ जाधिराजश्रीचन्द्रगुप्तस्तस्य दुहिता धारणसगोत्रा नागकुलसम्भू–

८ ताया(यां) श्रीमहादेव्यां कुबेरनागायामुत्पन्नोभय-कुलालङ्कारभूतात्यन्तभगवद्भक्ता

९ वाकाटकानां महाराजश्रीरुद्रसेनस्याग्रमहिषी युवराज–

१० [श्री]दिवाकरसेनजननी श्रीप्रभावति(ती)गुप्ता सुप्रतिष्ठाहारे

दुसरा पत्रा

११ विलवणकस्य पूर्व्वपार्श्वे शीर्षग्रामस्य दक्षिणपार्श्वे कदा-पिञ्जनस्यापरपा[र्श्वे]

१२ सिदिविवरकस्योत्तरपार्श्वे दङ्गुणग्रामे ब्राह्मणाद्यान्ग्रा-मकुटुम्बिनxकुशल–

---

१ 'अनेक' असें वाचावें.

१३ मुक्त्वा समाज्ञापयति [।*] विदितमस्तु वो यथायं ग्रामोस्माभिः स्वपुण्याप्यायना[र्त्थं]

१४ कार्त्तिकशुक्लद्वादश्या(श्यां) भगवत्पादमूले निवेद्य भगवद्भक्ताचार्यचनालस्वामिनेपूर्व्व-

१५ दत्त्या उदकपूर्व्वमतिसृष्टो[1]यतो भवद्भिःरुचितमर्य्यादया सर्व्वाज्ञाऽकर्तव्या[:*] पूर्व्व-

१६ [राज्ञा[2]]नुमतांश्चात्र चातुर्विद्याग्रहारपरिहारान्वितरामस्तद्यथाभटछत्र[3]प्रावेश्यः

१७ अचारासनचर्म्माङ्गारकिण्वक्रे[4]णिखनकः

अपा[र*]म्पर[:*] अख[5]निमेध्यः अपुष्पक्षीरस[न्दोहः]

१८ सनिधिस्सोपनिधिस्सकृप्तोपकृप्तः[6] [।*] न(त)देष भविष्यद्राजभिस्संरक्षितव्य[:*] परिवर्द्धि-

१९ यितव्यश्च [।*] यश्चास्मच्छासनमगणयमानस्स्वल्पामप्यत्राबाधा(धां) कुर्य्यात्कारयीत वा[7]

---

१ '–मतिसृष्टः ।' असें वाचावें.

२ 'राजा– असें वाचावें.

३ '–च्छात्र–' असें वाचावें.

४ 'क्लिन्न' असें वाचावें.

५ पूर्वीच्या संपादकांनी हा शब्द 'अपशु–' असा वाचला आहे, पण त्यांच्या ठशांवरून वरील वाचनच बरोबर दिसतें.

६ 'सक्लृप्तोपक्लृप्तः' असें वाचावें.

७ 'कारयेद्वा' असें वाचावें.

२० तस्य ब्राह्मणे(णै)रावेदितस्य सदण्डनिग्रहं कुर्य्याम [।*]
व्यासगि(गी)तश्चात्र श्लोको भवति [।*]

२१ स्वदत्ताम्परदत्ता(त्तां) वा यो हरेत वसुन्धरां(राम्)
[।*] गवा (वां) शतसहस्रस्य हन्तुर्हरति दुष्कृतम्[1]
[।।*]

२२ संवत्सरे च त्रयोदशमे[2] लिखितमिद(दं) शासनम(म्)
[।*] चक्कदासेनोत्कट्टितम् [।*]

मुद्रा

१ वाकाटकललामस्य
२ [क्र]मप्राप्तनृपश्रिय[:।*]
३ जनन्या युवराजस्य
४ शासनं रिपुशास[न][म्[3]।।*]

---

३. द्वितीय प्रवरसेनाचा जांब ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तहसिलींत हिंगणघाटच्या ईशान्येस सुमारें ७ मैलांवर जांब गावचे मोकासदार श्री. बाबुराव माधवराव अठोळे यांचे घरीं असलेला सन १९४० मध्ये माहीत झाला. तो मी एपिग्राफिया इंडिका, पु. २२६, पृ. १५५ इ.

---

१ वृत्त : अनुष्टुभ्.

२ 'त्रयोदशे' असें वाचावें.

३ वृत्त : अनुष्टुभ्.

मध्ये ठशांसह प्रकाशित केला आहे. त्याच ठशांवरून तो येथे संपादिला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून प्रत्येकाची लांबी ८ इंच व रुंदी ४·११ इंच आहे. पहिल्या आणि चौथ्या पत्र्याच्या एका बाजूवर आणि बाकीच्या दोन पत्र्यांच्या दोन्ही बाजूंवर लेख कोरला आहे. हा ताम्रपट माझ्या दृष्टीस पडला तेव्हा त्याचे पत्रे एका कडींत गोविले होते, पण तिला पूर्वी जोडलेली मुद्रा उपलब्ध झाली नाही. सर्व पत्रे चांगल्या स्थितींत आहेत. त्यामुळे वाचनाविषयीं कोठेहि संदेह नाही. सर्व पत्र्यांचें वजन १८५ तोळे आणि कडीचें १६ तोळे आहे.

अक्षरवटिका—संपूर्ण लेख ३६ ओळींचा असून पत्र्यांच्या कोरलेल्या बाजूंवर प्रत्येकीं सहा ओळी आहेत. लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत–'ज' च्या शिरावर पेटिका कोरली नसून कांही ठिकाणीं ती त्याच्या पाठीमागे कोरली आहे. उदाहरणार्थ, ७ व ८ ओळींतील 'महाराज' शब्द पाहा; उपध्मानीयाचें चिह्न १३, १५ आणि ३३ ओळींत आलें आहे; त्या सर्व ठिकाणीं त्याच्या शिरावर पेटिका कोरली आहे; अन्त्य 'म्' लहान आकारांत कोरला असून 'सिद्धम्' (ओ. १) मध्ये त्याच्या शिरावर पेटिका दिसते; व्यंजनयुक्त औकार सर्वत्र द्विभागयुक्त आहे; 'ख'च्या खालीं गांठ नाही; 'ड' व 'द' कांही ठिकाणीं भिन्न चिन्हांनी दर्शविले आहेत, पण 'मण्डुकि', (ओ. १८) आणि 'कौण्डिन्य' (ओ. २९) मध्यें 'द' चेंच चिन्ह 'ड' करितां योजिलें आहे. संयुक्त व्यंजनांतील खाली कोरलेला तकार कांही ठिकाणीं ग्रंथियुक्त दिसतो; विराम चिह्नाकरितां एक किंवा दोन बिंदूंचा उपयोग केला आहे, पण बहुतेक ठिकाणीं ते निरर्थक आहेत.

भाषा—लेखाची भाषा संस्कृत आहे. ३४–३५ ओळींतील शापाशीर्वादात्मक श्लोकांखेरीज बाकीचा सर्व भाग गद्यांत आहे.

लेखनाचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—रेफाच्या पूर्वी व नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे; ओळ ६ मध्ये 'थ्य' मधील थ् चें द्वित्व झालें आहे; आणि १३, १५ व ३३ ओळींत 'प्' च्या पूर्वीच्या विसर्गाचें उपध्मानीयांत रूपांतर झालें आहे.

विषय– प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने होतो. नंतर हा ताम्रपट देणाऱ्या वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनाची वंशावळ वाकाटक महाराज सम्राट् प्रथम प्रवरसेनापासून दिली आहे. हा प्रवरसेन विष्णुवृद्ध गोत्राचा असून त्याने अग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, षोडशिन्, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव, साद्यस्क्र व चार अश्वमेध हे श्रौत याग केले होते. त्याच्यानंतर त्याचा पौत्र, आणि भारशिव महाराज भवनाग याच्या कन्येपासून गौतमीपुत्राला झालेला पुत्र प्रथम रुद्रसेन हा गादीवर आला. भारशिव राजाचा वंश त्यांनी आपल्या स्कंधावर शिवलिंग धारण केल्यामुळे संतुष्ट झालेल्या भगवान् शंकराने उत्पन्न केला होता, भारशिवांनी आपल्या सामर्थ्याने प्राप्त करून घेतलेल्या भागीरथीजलाने स्वतःस मूर्धाभिषेक करून घेतला होता आणि दहा अश्वमेध याग केले होते, ही माहिती भारशिवांच्या वर्णनांत दिली आहे. महाराज प्रथम रुद्रसेन हा स्वामिमहाभैरवाचा परमभक्त होता. त्यानंतर त्याचा पुत्र वाकाटक महाराज परममाहेश्वर (भगवान् शंकराचा परम भक्त) प्रथम पृथिवीषेण राज्य करूं लागला. त्याच्या अंगीं सत्यवादित्व, ऋजुत्व, कारुण्य, शौर्य, विक्रम, नीतिनैपुण्य, विनय, माहात्म्य (थोरपणा), बुद्धिमत्ता, योग्य जनांविषयी आदर, धर्मविजयित्व, मनोनैर्मल्य इत्यादि गुण होते; त्याची वर्तणूक युधिष्ठिरासारखी होती; त्याच्याजवळ शंभर वर्षें साठत आलेला कोश व सैन्य होतें; आपल्या हयातींत पुत्र व पौत्र पाहण्याचें भाग्य त्याला लाभलें होतें, इत्यादि माहिती प्रथम पृथिवीषेणाच्या वर्णनांत दिली आहे. त्यानंतर त्याचा पुत्र वाकाटक महाराज द्वितीय रुद्रसेन गादीवर आला. याने आपलें ऐश्वर्य भगवान् चक्रपाणीच्या (विष्णूच्या) प्रसादाने

मिळविलें होतें. त्याच्यानंतर त्याला महाराजाधिराज देवगुप्ताची कन्या प्रभावतीगुप्ता हिच्यापासून झालेला वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेन राज्य करूं लागला. हा परममाहेश्वर असून, याने भगवान् शंकराच्या प्रसादाने आपल्या राज्यांत कृतयुग स्थापित केलें होतें. प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेला द्वितीय प्रवरसेनाचा मातामह देवगुप्त हा सुप्रसिद्ध गुप्त-सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य होय हें मागे दाखविलें आहे.

उद्देश--प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश द्वितीय प्रवरसेनानें सुप्रतिष्ठ आहारांतील कोथुरक गाव दान दिला हें नमूद करणें हा होता. हा गाव उमानदीच्या पश्चिमेस, चिञ्चापल्लीच्या उत्तरेस, बोन्थिक-वाटकाच्या पूर्वेस आणि मण्डुकिग्रामाच्या दक्षिणेस होता. हें दान तैत्तिरीय शाखेच्या कौंडिन्यगोत्री कालुट्टक नामक गणयाजी ब्राम्हणास दिलें होतें. द्वितीय प्रवरसेनाने प्रस्तुत ताम्रपट आपल्या शासनाच्या दुसऱ्या वर्षीं आश्विन शुक्ल द्वादशीस नन्दिवर्धन येथे विजयी धर्म-स्थानाच्या ठिकाणीं दिला आणि त्याचा लेखक नागवर्मा नामक होता असें यांत म्हटलें आहे.

चर्चा--दान दिलेल्या ब्राह्मणाला 'गणयाजी' असें विशेषण लावलें आहे, त्यावरून हें दान एका गणयागाच्या अनुष्ठान प्रसंगीं दिलें असून तो याग कालुट्टक ब्राह्मणाने केला होता असें अनुमान करतां येतें. मनुस्मृतीमध्ये (अध्याय ३, श्लोक १६४) गणांच्या याजकाला श्राद्धप्रसंगीं ब्राह्मण म्हणून बोलावूं नये असें म्हटलें आहे. तेथील 'गणानां चैव याजकः' या शब्दप्रयोगाचा अर्थ टीकाकारांनी भिन्न भिन्न प्रकारें केला आहे; पण हा गणयाग म्हणजे बौधायन धर्मसूत्रांत वर्णिलेला गणहोमच असावा हें डॉ. बुल्हरचें मत बरोबर दिसतें. त्या धर्मसूत्रांत म्हटलें आहे की हे गणहोम प्रत्येकाने स्वतः करावयाचे असतात. एखाद्या ब्राह्मणाने आपले माता, पिता व गुरु यांकरितां ते केल्यास हरकत नाही, पण दुसऱ्या कोणाकरितां ते करूं नयेत. कोणी लोभाने ते दुसऱ्याकरितां केल्यास तो पापी होऊन

विष भक्षण केलेल्या मनुष्याप्रमाणे नाश पावतो. बौधायनानें पुढे असेंहि म्हटलें आहे की कोणाला स्वतःच्या पापाची निष्कृति करावयाची असल्यास त्याने हे गणहोम दुसऱ्याकडून करविल्यास हरकत नाही, त्याने स्वतःच कष्ट सहन केले पाहिजेत असें नाही. बौधायन धर्मसूत्राचा टीकाकार गोविंदस्वामी याने यांतून असा अर्थ काढला आहे की एखाद्या श्रीमान् मनुष्याने ब्राह्मणाला धन देऊन त्याच्याकडून गणहोम करविल्यास तो पापमुक्त होतो, पण त्या ब्राह्मणाला तें पाप लागतें. या कारणास्तवच लोभाने दुसऱ्याकरिता गणयाग करणाऱ्या ब्राह्मणांना श्राद्धाला बोलावूं नये असें मनूने म्हटलें असावें. अर्थातच असे याग करण्याकरिता क्वचितच एखादा ब्राह्मण तयार होई आणि म्हणून जो तें याग करी त्याला दक्षिणाहि चांगली मिळे. हाच प्रकार मृत मनुष्याच्या प्रथम सांवत्सरिक श्राद्धप्रसंगीं किंवा ग्रहणप्रसंगीं दिलेल्या दानांच्या बाबतींत आढळतो. प्रस्तुत ताम्रपट ज्याला दिला होता त्या कालुट्टक ब्राह्मणाने द्वितीय प्रवरसेनाकरिता असा गणयाग केल्यामुळे त्याला दक्षिणा म्हणून त्यांत उल्लेखिलेला गाव दान दिला असावा.

स्थलनिश्चय--प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **नन्दिवर्धन** हें सध्याचें नागपूर जिल्ह्यांतील नन्दरधन किंवा नगरधन होय हें मागे दाखविलें आहे. दान दिलेलें **कोशुरक** गाव सध्या अस्तित्वांत नाही. त्याच्या जागीं जांबच्या वायव्येस सुमारें अडीच मैलांवर वन्ना नदीच्या काठीं मनगांव हें वसलेलें दिसतें. कारण त्याच्या मर्यादेसाठी प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलीं सर्व गावें मनगांवच्या सभोवार त्या त्या दिशांस सापडतात. उदाहरणार्थ, **चिंचापल्ली** हें मनगांवच्या दक्षिणेस दीड मैल्यांवर असलेलें वन्ना नदीच्या उजव्या तीरावरचें चिंचोली गाव असावें. **बोथिकवाटक** हें सध्याचें मनगावच्या ईशान्येस असलेलें बोथड, आणि **मंडुकिग्राम** हें मनगावच्या उत्तरेस दोन मैलांवरचें मांडगाव असावें. वर्धा जिल्हा गॅझेटीयरमध्ये मांडगाव

हें वन्ना नदीवर तपश्चर्या करणाऱ्या मांडवऋषीने वसविलें होतें अशी जनश्रुति दिली आहे. पण प्रस्तुत ताम्रपटावरून त्या गावाचें प्राचीन नांव मण्डुकिग्राम होतें असें दिसतें. तीन सीमांचीं हीं तीन गावें निश्चित झाल्यामुळे दान दिलेल्या गावाची पूर्वसीमा म्हणून उल्लेखिलेली **उमा नदी** ही सध्याची वन्ना होय हें सहजच सिद्ध होतें. हीं गावें ज्यांत अन्तर्भूत होत तो **सुप्रतिष्ठ आहार** म्हणजे सध्याचा हिंगणघाट तहसील होय हें पूर्वी दाखविलें आहे.

वाचन[१]

पहिला पत्रा

१ द्रि(दृ)ष्टम् [।*] सिद्धम् [।*] स्वस्त (स्ति) नन्दिवर्द्ध-
नात् [।*] अग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्यतिरात्र-

२ वाजपेयबृहस्य(स्प) तिसवसाद्यस्क्रचतुरश्वमेधयाजिनः[२] विष्णुवृद्ध-

३ सगोत्रस्य सम्राट्[३] वाकाटकानाम्महाराजश्रीप्रवरसेनस्य सूनो सूनो[४]

४ अत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य ।।[५] असंभारसन्निवेशित[६]-
शिवलिङ्गो-

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १६० च्या समोरील ठशांवरून.

२. येथे आणि पुढेहि कित्येक स्थलीं सन्धि केले नाहीत.

३. 'सम्राजो' असें वाचावें.

४. 'सूनोः सूनोः' असें वाचावें.

५. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

६. 'अंस-' असें वाचावें.

५ [द्व]हनशिवसुपरितुष्टसमुत्पादितराजवंशानाम् पराक्क-
माधिगतभागीर-

६ रत्थ्यमलजलमूर्द्धाभिषिक्तानां दशाश्वमेधावभृथस्ना-
ताना(नां) भारशिवानां

दुसरा पत्रा : पहिली बाजू

७ महाराजश्रीभवनागदौहित्रस्य गौतमि(मी)पुत्रस्य ।[1]
वाकाट-

८ कानाम्महाराजश्रीरुद्रसेनस्य सूनोः अत्यन्तमाहेश्वरस्य ॥[1]

९ सत्यार्ज्जवकारुण्यशौर्य्यविक्कमनयविनयमाहात्म्यधीमत्व-
(त्स्य)–

१० पात्रगतभ[क्ति]त्वधर्म्मविजयित्वमनोनैर्म्मल्यादिगुणै-
स्समु–

११ पेतस्य ॥[1] व[र्ष]शतमभिवर्द्धमानकोशदण्डसाधनसन्तान-

१२ पुत्रपौत्रिण[:] युधिष्ठिरवृत्तेर्व्वाकाटकानाम्महाराज-
श्रीपृथिवी–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१३ सेनस्य[2] सूनोर्भगवतश्चक्कपाणे × प्रसादा(दो)पार्जित-
श्रीसमुदयस्य

१४ महाराजश्रि(श्री)रुद्रसेनस्य सूनोः महाराजाधिराज-
श्रीदेवगुप्त–

---

१. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

२. 'श्रीपृथिवीषेणस्य' असें वाचावें.

१५ सुताय(यां) प्रभावतीगुप्ताय(या)मुत्पन्नस्य ।[1] शम्भोः प्रसादधृति(त)कार्त्त-

१६ युगस्य ।[1] वाकाटकानाम्परममाहेश्वरमहारा[ज*] श्रीप्रवरसेन-

१७ स्य वचना[त्*] सुप्रतिष्ठाह(हा)रे । उमानद्या अपर-पार्श्वे ।[1] चिंचापल्या[2]

१८ उत्तरे पार्श्वे ।[1] बोन्थिकवाटकस्य ।[1] पूर्व्वे पार्श्वे । मण्डुकि-ग्रामस्य

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१९ दक्षिणे पार्श्वे ।[1] कोथुरकग्राम ग्रामः कौण्डिन्यसगोत्र ।[1] तैत्तिरिकगणयाजि-

२० कालुट्टकब्रह्मचारिणे[3] दत्ताः(त्तः) [।*] यतोस्मत्सन्तकाः सर्व्वाध्यक्षनियोगनियुक्ता

२१ आज्ञासंचारिकुलपुत्राधिकृताः भट्टा[4]श्छात्राश्च विषुतपूर्व्व-याज्ञाज्ञापयि-

२२ तव्या[5] विदितमस्तु वः यथेहास्माभिरात्मनो धर्म्मायुर्ब्बल-विजयैश्वर्य्यवि-

---

१. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

२. 'चिंचापल्ल्या' असें वाचावें.

३. 'तैत्तिरीयसब्रह्मचारिणे गणयाजिकालुटकाय' असें वाचावें.

४. 'भटा–' असें इतर ताम्रपटांतल्याप्रमाणें वाचावें.

५. 'विश्रुतपूर्व्वयाज्ञयाज्ञापयितव्याः ।' असें वाचावें.

२३ वृद्धये इहामुत्रहितार्त्थमात्मानुग्रहाय वैजयिके धम्म- (र्म्म)स्थाने अपूर्व्वद-

२४ त्या (त्त्या) उदकपूर्व्वमतिसृष्टः [।*] यथास्योपचिता[1] पूर्व्वराजानुमताश्चातुर्वैद्य-

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२५ ग्रामसम्यर्यादान्वितरामस्तद्यथा[2] अकरदायि[3] अभटच्छत्र-[4] प्रावेश्य[:] अपा-

२६ रम्परगोबलवर्द्द[:*][5] अपुष्पक्षीरसन्दोह[:*] अचा (चा)- रासनचर्म्माङ्गार[:*] अल-

२७ लवणक्लिन्नक्लेनीखनकः[6] सर्व्ववेष्टिपरिहारपरिहृतः[7] सनिधिः

२८ सोपनिधि[:*] सक्लिप्तोपक्लिप्त[:][8] आचन्द्रा- दित्यकालि(ली)यः पुत्रपौत्रानु [गा*]-

---

१. '–स्योचितां' असें वाचावें.

२. '–मर्य्यादां विताराम–' असें वाचावें.

३. 'अकरदायी' असें वाचावें.

४. 'च्छात्र'– असें इतर ताम्रपटांतल्याप्रमाणें वाचावें.

५. '–बलीवर्द्दः' असें.

६ 'क्रेणिखनकः' असें वाचावें.

७. 'विष्टि–' असें वाचावें.

८. 'सक्लृप्तोपक्लृप्तः' असें वाचावें.

२९ भिक: भुञ्जता (तो) न केनचिद्व्याघातयितव्य: सर्व्वक्र- (क्रि) याभिस्संरक्षितव्य[:*]

३० परिवर्द्धयितव्यश्चा (श्च) [।*] यश्चास्मच्छासनमग- णयमान: स्वल्पामपि परिबाधां

चौथा पत्रा

३१ कुर्य्यात्कारयित वा[1] तस्य ब्राह्मणैर्व्वेदितस्य सदण्डं निग्रहं कुर्य्याम ॥

३२ अस्मिश्च धर्म्मादिरकरणे अतीतानेकराजदत्तां सञ्चिन्तन- परिपालन[2]

३३ कृतपुण्यानुकीर्त्तनपरिहारात्र्थं न कीर्त्तयाम: [।*] व्याहृति (ती) तश्चात्र श्लोकःप्रमाणी-

३४ कर्त्तव्य[:] [।*] स्वदत्तां परदत्तां वा हरेद्यो वै वसुन्धरा[म्*] । गवां शतसहस्रस्य

३५ हन्तुर्हरति दुष्कृतं (तम्) ।[3] [।१॥*] संवत्सरे द्वितीये अश्वयुज[4]मासशुक्लद्वादश्या (श्यां)

३६ चक्कदेवदूतक:[5] नागवर्म्मणा लिखित[म्] ॥❀॥[6]

---

१. '–त्कारयेद्वा ' असें वाचावें.

२. '–राजदत्तसञ्चिन्तनपरिपालनं ' असें वाचावें.

३. वृत्त : अनुष्टुभ्.

४. ' आश्वयुज–' असें वाचावें.

५. ' चक्कदेवदूतकं ' असें वाचावें.

६. या दोन विरामचिन्हांमध्ये एक पुष्पाकृति कोरली आहे.

४, ५. द्वितीय प्रवरसेनाचे दोन बेलोरा ताम्रपट

उपलब्धि—हे दोन ताम्रपट वर्धा जिल्ह्याच्या आर्वी तहसिलींतील बेलोरा नामक गावीं श्री. जाने यांच्या घरीं होते. ते सन १९३८ मध्ये श्री. द. रा. गोमकाळे यांच्याकडून वाचनाकरितां मला मिळाले. मी ते एपिग्राफिया इंडिका, पु. २४, पृ. २६०–६७ मध्ये ठशांसहित संपादिले आहेत. त्याच ठशांवरून ते येथे दिले आहेत.

वर्णन—श्री. जाने यांच्याकडून मला एकूण चार पत्रे मिळाले. त्यांचें वाचन केल्यावर त्यांच्यापैकी दोन एका ताम्रपटाचे व राहिलेले दोन दुसऱ्या ताम्रपटाचे आहेत असें मला आढळून आलें. या ताम्रपटांना 'अ' व 'ब' अशीं नांवें आपण देऊं. या ताम्रपटांचे आरंभीं तीन पत्रे होते असे दिसतें, पण 'अ' ताम्रपटाचा शेवटचा पत्रा आणि 'ब' ताम्रपटाचा पहिला पत्रा आता सापडत नाही. 'अ' ताम्रपटाचा पहिला पत्रा फक्त एका बाजूस आणि बाकीचे सर्व दोन्ही बाजूस कोरले आहेत. 'अ' ताम्रपटाचे पत्रे 'ब' च्या पत्र्यांपेक्षा थोडे जास्त मोठे असून वजनांत जास्त भरतात. 'अ' ताम्रपटाचे पत्रे ९·९ इंच लांब व ४·९ इंच रुंद असून त्यांचें वजन ६७½ तोळे आहे तर 'ब' ताम्रपटाचे पत्रे ९·६ इंच लांब व ४·८ इंच रुंद असून त्यांचें वजन ६४ तोळे आहे. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या बाजूपासून २ इंचांवर मध्यभागीं कडीकरितां अर्धा इंच व्यासाचें छिद्र आहे, पण दोन्ही ताम्रपटांच्या कड्या आणि त्यांना जोडलेल्या मुद्राहि सापडल्या नाहीत. सर्व पत्रे चांगल्या स्थितींत आहेत. त्यांवरील अक्षरें खोल कोरलीं असून तीं क्वचित् दुसऱ्या बाजूस उमटलेलीं दिसतात. जरा बारकाईने पाहिल्यावर सर्व पत्र्यांवर पूर्वी कोरलेलीं अक्षरें दाबून टाकून त्या जागीं दुसरीं कोरलेलीं आढळलीं. ही पूर्वींचीं अक्षरेंहि पेटिकाशीर्षक लिपीचींच होतीं. तेव्हा या ताम्रपटावरील पूर्वींचीं दान-

पत्रेंहि याच काळांतील असावीं. पण त्यांचीं अक्षरें काळजीपूर्वक दावून टाकल्यामुळे तीं कोणी व कशाकरितां दिलीं होतीं व कोणत्या कारणांमुळे नष्ट करण्यांत आलीं हें आता सांगतां येत नाही.

लिपी—पूर्वी सांगितल्याप्रमाणे हे दोन्ही ताम्रपट अपूर्ण आहेत. 'अ' ताम्रपटाच्या पत्र्यावर एकूण १८ ओळी व 'ब' ताम्रपटाच्या पत्र्यांवर २४ ओळी आहेत. दोन्ही ताम्रपटांवरील लिपी पेटिकाशीर्षक असून ती द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच आहे. तिचा प्रस्तुत ताम्रपटांतील उल्लेखनीय विशेष म्हणजे गाठ असलेलें 'त' अक्षर. हें दोन्ही ताम्रपटांत आढळतें. संयुक्त व्यंजनाचें दुसरें अक्षर म्हणून तें जेथे येतें तेथे त्याचें 'न' पासून भिन्नत्व दाखविण्याकरिता, तें लांबट आकाराचें दाखविलें आहे. उदाहरणार्थ 'अ' ताम्रपटांतील 'कार्त्तयुग'-(ओ. १२) आणि 'भुक्ति' (ओ. १३) पाहा.

भाषा—दोन्ही दानपत्रांची भाषा संस्कृत आहे. 'अ' ताम्रपटांतील सध्याचा सर्व लेख गद्यांत आहे. 'ब' ताम्रपटांतहि २७–२९ ओळींतील दोन शापाशीर्वादात्मक श्लोकांशिवाय सर्व भाग गद्यांतच आहे. दोन्ही दानपत्रांतील लेखनविशेष येणेप्रमाणे—(१) 'रि' बद्दल 'ऋ' आणि 'ऋ' बद्दल 'रि' योजिले आहेत, (२) 'लृ' बद्दल 'लि' लिहिला आहे. सक्लिप्तोपक्लिप्तः ('ब' ताम्रपटाची २२ वी ओळ पाहा); (३) 'स' बद्दल 'श' लिहिला आहे; शूर्य-('अ' ताम्रपटाची १४ वी ओळ); पाहा. संयुक्त व्यंजनांमध्ये 'र्' च्या नंतर आणि 'र्' व 'य्' च्या पूर्वी येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे. याशिवाय दीर्घाबद्दल ऱ्हस्व स्वर, व्याकरणदुष्ट रूपें इत्यादि दोष दोन्ही ताम्रपटांत आढळतात.

विषय—दोन्ही दानपत्रें वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेनाचीं असून त्यांमध्ये त्याची वंशावळ त्याच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच दिली आहे. त्यांमध्ये त्याच्या मातामहाचें (द्वितीय चन्द्रगुप्ताचें) नांव 'देवगुप्त' असेंच दिलें आहे. 'अ' दानपत्राचा आरंभ 'दृष्टम्' या

शब्दाने होतो. तें नन्दिवर्द्धन येथे दिलें होतें. 'ब' दानपत्राचा पहिला पत्रा गहाळ झाल्यामुळे त्यांतील आरंभींचा स्थलनिर्देश निश्चितपणे माहीत नाही. तथापि तो 'अ' ताम्रपटांतल्याप्रमाणेच बहुधा असावा. 'अ' ताम्रपटाने 'असि' भुक्तींतील शैलपुरमार्गावरील महल्ललाट गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. 'ब' ताम्रपटांत पाक्कण राष्ट्रांतील दीर्घद्रह आणि असि भुक्तींतील शैलपुर मार्गावरील महल्लम लाट अशीं दोन गावें दान दिल्याचा निर्देश आहे. महल्ललाट आणि महल्लमलाट हीं एकच असावीं; कारण त्यांचें वर्णन त्याच प्रकारचें आहे. तेव्हा 'ब' दानपत्र 'अ' दानपत्रानंतर दिलेलें दिसतें. दोन्ही दानपत्रें प्रवरेश्वर-षड्विंशतिवाटक येथे राहणाऱ्या तैत्तिरीयशाखेच्या काश्यपगोत्री सूर्य-स्वामी नामक ब्राह्मणास दिलीं होतीं. हीं दानें द्वितीय प्रवरसेनाने आपल्या वैजयिक धर्मस्थानीं स्वतःचें पुण्य, आयुष्य, बल, विजय व ऐश्वर्य यांच्या वृद्धीकरितां, तसेंच ऐहिक व पारलौकिक कल्याणाकरिता व स्वतःच्या अनुग्रहाकरिता दिलीं होतीं. पहिल्या ताम्रपटाचा काल-निर्देश असलेला पत्रा गहाळ झाला आहे, पण दुसऱ्या ताम्रपटाच्या अखेरीस द्वितीय प्रवरसेनाच्या अकराव्या शासनवर्षी कार्तिक शुक्ल त्रयोदशीस दिला होता व त्यावेळीं चित्रवर्मा सेनापतिपदावर होता असें म्हटलें आहे.

चर्चा—पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'ब' ताम्रपटांत जीं दोन गावें दिल्याचा उल्लेख आहे त्यांपैकी एक पूर्वीच 'अ' ताम्रपटाने दिलें होतें. तेव्हा नंतरच्या ताम्रपटांत पुनः त्याचा उल्लेख कां घालण्यांत आला तें समजत नाही. क्वचित् प्रसंगीं राजे लोक पूर्वी दिलेलें दान उल्लेखिणारे ताम्रपट देत असत हें खरें, पण तसें करतांना नवीन ताम्रपट कोणत्या कारणास्तव (उदाहरणार्थ शत्रूची स्वारी, अग्नीमुळे पहिल्या ताम्रपटाचा नाश इत्यादि) दिला हें त्यांत नमूद करीत. परंतु 'ब' ताम्रपटांत असें कांही कारण दिलें नाही. दोन्ही ताम्रपट एकाच राजाने दिले होते व त्यांच्या काळांतील अंतरहि दहा वर्षांपेक्षा जास्त असणें शक्य नाही.

तेव्हा 'ब' ताम्रपट किंवा निदान ज्यांमध्ये दोन गावांच्या दानाचा निर्देश आहे तो त्याचा पत्रा तरी बनावट असावा, अशी शंका मनांत येते. या शंकेला थोडा आधारहि सापडतो. तो हा की 'ब' ताम्रपटाच्या दुसऱ्या पत्र्यावरील लेखाचा आरंभ व शेवट 'अ' ताम्रपटाच्या दुसऱ्या पत्र्यावरील लेखांतल्या प्रमाणेंच आहे. तेव्हा तो पत्रा पूर्वीच्या ताम्रपटांतील पत्र्याच्या जागीं बेमालूमपणे सहज घालतां आला असता. पण याखेरीज 'ब' ताम्रपटाच्या बनावटपणाचीं कांही चिन्हें नाहीत. त्या ताम्रपटाचे दोन्ही पत्रे 'अ' ताम्रपटाच्या पत्र्यापेक्षा किंचित लहान आहेत हें मागे सांगितलें आहे. तेव्हा पत्रे बदलले असले तर एक नव्हे तर दोन्ही बदलले असले पाहिजेत. पण 'ब' ताम्रपटाचा तिसरा पत्रा बदलण्याची जरूरी होती असें दिसत नाही. दोन्ही ताम्रपटांच्या अक्षरांतील व व्याकरणदुष्ट प्रयोगांतील साम्यावरून ते वाकाटकांच्या सचिवालयांतील एकाच कारकुनाने लिहिले असावे असें दिसतें. 'ब' ताम्रपटांत सेनापति चित्रवर्म्याचा उल्लेख आहे त्यावरूनहि तो ताम्रपट खरा असावा असें वाटतें. कारण चम्मक ताम्रपटांतील उल्लेखावरून चित्रवर्मा द्वितीय प्रवरसेनाच्या निदान अठराव्या शासनवर्षापर्यंत सेनापतिपदावर होता असें दिसतें. तेव्हा 'ब' ताम्रपट बनावट दिसत नाही. त्यामध्ये 'अ' ताम्रपटांतील गावांचा उल्लेख पुनः येण्याचें कारण हें असावें की दुसरें गाव दान दिलें त्यावेळीं दोन्ही गावांचा एकत्र निर्देश करणारा ताम्रपट आपणांस दिला जावा, अशी विनंती दांन दिलेल्या ब्राह्मणाने द्वितीय प्रवरसेनास केलीअसावी.

स्थलनिश्चय--या ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **नन्दिवर्धन** हें नागपूर जिल्ह्यांतील रामटेकजवळचें नंदरधन किंवा नगरधन होय हें पूर्वीं दाखविलें आहे. **महल्ल-लाट** किंवा **महल्लम-लाट** याचा अर्थ बहुधा 'मोठें लाट' (लाट बुद्रुक) असावा. तें अमरावती जिल्ह्यांतील लाडकी किंवा घाट लाडकी असावें. हें गाव बेलोराच्या वायव्य दिशेस १८ मैलांवर आहे. महल्ललाट हें ज्या **शैलपुरच्या**

'मार्गी'त होतें तें लाडकीच्या पूर्वेस सुमारें १५ मैलांवर टेकड्यांनी वेष्टिलेलें सालबर्डी असावें. ज्या **असि** नामक भुक्तीमध्ये महल्ल लाट गांव अन्तर्भूत होतें तिचें मुख्य गाव हें सध्याचें बेलोऱ्याच्या दक्षिणेस दहा मैलांवरचें अष्टी असावें. **दीर्घद्रह** हें बहुधा अष्टीच्या उत्तरेस ३० मैलांवर वर्धा नदीच्या डाव्या तीरावरचें दीघी असेल. हे दोन्ही ताम्रपट ज्याला दान दिले होते तो ब्राह्मण **प्रवरेश्वरषड्विंशतिवाटक** येथे राहत होता. या गावाच्या नांवावरून तें छत्तीस गावाच्या विभागांतील मुख्य गाव होतें असें दिसतें त्या ठिकाणीं प्रथम प्रवरसेनाने स्वतःचें नांव देऊन उभारलेल्या शिवालयावरून हें ग्रामनाम पडलें असावें. ह्या गावाचा, तसेंच दीर्घद्रह ज्यांत अन्तर्भूत होत होतें त्या **पाक्कणराष्ट्र** विभागाचें मुख्य शहर पाक्कण याचाहि शोध आता लागत नाही.

वाचन[1]

ओळ

'अ' ताम्रपट : पहिला पत्रा

१ द्रिष्टम्[2][।*] सिद्धम् स्वस्ति[।*] ना(न)न्दिवर्द्धनादग्नि-
ष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्यतिरात्रवाजपेयबृहस्पतिसव-
२ साद्यस्क(स्क्र)चतुरश्य(श्व)मेधयाजिनः[3] विष्णुवृद्ध-
सगोत्रस्य सम्राट्[4] वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)प्रवर-
३ सेनस्य सूनो[:*] सूनोः अत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य
अंसभारसन्निवेशितशिवलिङ्गो-

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २४, पृ. २६४ वरील ठशांवरून.

२. 'दृष्टम्' असें वाचावें.

३. येथे आणि पुढेहि अनेक ठिकाणीं संधि केले नाहीत.

४. 'सम्राजो' असें वाचावें.

४ द्दहनशिवसुपरितुष्टसमुत्पादितराजवंशानाम्पराक्रमा-
धिगत भागीरत्थ्यमलजल-

५ मूर्द्धाभिषिक्तानान्दशाश्वमेधावभृथस्नातानाम्भारशिवा-
नाम्महाराजश्रि (श्री) भवनागदौहित्रस्य-

६ गौतमीपुत्रस्य पुत्रस्य ।[1] वाकाटकानाम्महाराजश्रीरुद्रसेन-
स्य सूनोरत्यन्तमाहेश्वरस्य-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

७ सत्यार्ज्जवकारुण्यशौर्य्यविक्क्रमनयविनयमाहात्म्यश्रीमत्व[2]-
धीम[त्त्व*] पात्रगतभक्तित्व-

८ धर्म्मविजयित्वम[नो]नैर्म्मल्यादिगुणै[:*] समुपेतस्य
वर्षशतमभिवर्द्धमानकोशद-

९ ण्डसाधनस[न्ता]नपुत्रपौतृ (त्रि) णः युधिष्ठिव (ष्ठि) र-
वृत्ते[:] वाक (का) टकानाम्महाराजश्रीप्रिथिवीसे[3]-

१० नस्य सु (सू) नोर्भगवतश्चक्क्रपाणेःप्रसादोपा [र्ज्जि]-
तश्रीसमुदयस्य ।[1] महाराजश्रीरुद्रसेन-

११ स्य सु (सू) नोर्म्महाराजश्रीदेवगुप्तसुतायाम्प्रभावति(ती)-
गुप्तायामुत्पन्नस्य शम्भोः

---

१. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

२. 'श्रीमत्त्व' असें वाचावें. हा शब्द इतर वाकाटक ताम्रपटांत आढळत नाही.

३. 'श्रीपृथिवीषेणस्य' असें वाचावें.

१२ सादधृतिकार्त्तयुगस्य[१] वाकाटकानाम्परममाहेश्वरमहा-
राजश्रीप्रवरसेनस्य

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१३ वचनात् [।*] शेलपुरमार्गे[२] असिभुक्तिमहल्ललाट-[३]
ग्रामेः(मः) प्रवरेश्वरषद्विशकवाट-
१४ [४]कवास्तव्याय ।।[५] तै[त्ति][६]रि(री)याय। काश्यपसगो-
त्रशूर्य्यस्वमिने[७] दत्तः[।*] यतोस्मत्सत्त(न्त)काः
सर्व्वा[द्ध्य]-
१५ क्षनिया(यो)गनियुक्ताः आज्ञासचारि[८]कुलपुत्राधिकृता
भटाश्छात्राश्च विश्रुतपूर्व्वयाज्ञय(या)-
१६ ज्ञापयितव्याः [।*] विदितमस्तु वः यथेहास्माभिरात्मनो
धर्म्मायुब्बल[९]विजयैश्वर्य्य-

---

१. 'धृतकार्त्तयुगस्य' असें वाचावें.

२. 'शैलपुरमार्गे' असें वाचावें.

३. 'ब' ताम्रपटांत या गावाचें नाम 'महल्लमलाटग्रामः' असें आलें आहे.

४. बहुधा 'प्रवरेश्वरषड्विंशति–' असें असेल.

५. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

६. यांतील खालचा 'त्' पूर्णपणें कोरला नाही.

७. 'सूर्य्यस्वामिने' असें वाचावें.

८. 'आज्ञासञ्चारि–' असें वाचावें.

९. 'धर्म्मायुर्ब्बल–' असें वाचावें.

१७ व(वि)वृद्धये।[1] इहामुत्रहितार्त्थमात्मानुग्रहाय ।।[1] वैजयिके धर्मस्थाने अपूर्व्वदत्या(त्त्या)

१८ उदकपूर्व्वमतिसृष्ट:[2] [।।*]

'ब' ताम्रपट

दुसरा पत्रा : पहिली बाजू

[3]७ सत्यार्ज्जवकारुण्यशौर्य्यविक्रमनयविनयमाहात्म(त्म्य)-धीमत्व(त्त्व)पात्रगतभक्तित्वधर्म्म-

८ विजयित्वमनोनैम्म(र्म)ल्यादिगुणै[:*] समुपेतस्य वर्ष-शतमभिवर्द्धमानकोशदण्डसा-

९ धनसन्तानपुत्रपौतृ(त्रि)ण: युधिष्ठरवृत्तेर्व्वाकाटका-नाम्महाराजश्रीपृथिविसेनस्य[4]

१० सूनोभ(र्भ)गवत:[5]श्चक्रपाणे:प्रसादोपार्ज्जितश्रीसमुदयस्य म्म(म)हाराजश्रीरुद्र-

---

१. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

२. येथे एक पुष्पचिन्ह कोरलें आहे.

३. या ताम्रपटाच्या इतर पत्र्यांवर आहेत त्याप्रमाणे गहाळ झालेल्या पहिल्या पत्र्यावर सहा ओळी लिहिल्या असाव्या; म्हणून दुसऱ्या पत्र्यावरील पहिली ओळ सातवी धरली आहे.

४. 'श्रीपृथिवीषेणस्य' असें वाचावें.

५. हा विसर्ग निरर्थक आहे.

११ सेनस्य सूनोर्म्महाराजाधिराजश्रीदेवगुप्तसुतायाः[1] प्रभा-
वति(ती)गुप्तायामुत्पन्नस्य

१२ शम्भोःप्रसाव(द)धृतिकार्त्तयुगस्य[2] ।[3] वाकाटकानाम्परम-
माहेश्वरमहे(हा)राजश्रीप्रवरसे-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१३ त(न)स्य वचना[त्*] । पाक्कणराष्ट्रे दीर्ग्घद्रहन्नाम[4]
ग्राम[:*] ।[3] शैलपुरमार्ग्गे असिभुक्ति-

१४ महल्लमलाटग्रामश्च एवं ग्रामद्वयं[3] ।। प्रवरश्वरषद्विषति-
वाटकवस्तव्य[5]-

१५ तैत्तिरिय[6]काश्यपसगोत्र[सु]र्य्यस्वामिन[7] दत्त[म्] । यतो-
स्मत्सन्तकाः सर्व्वद्ध्यक्ष[8]नियोग-

१६ नियुक्ताः आज्ञासञ्चारिकुलपुत्राधिकृताः भटाश्छात्राश्च
विषृ(श्रु)तपूर्व्वयाज्ञाज्ञा[9]-

१७ पयितव्या विदितमस्तु वः [।*] यथै(थे)हास्माभि-
रात्मनो धर्म्मायुर्ब्बलविजय(यै)श्वर्य्यविवृद्धये । इहा-

१. 'सुतायां' असें वाचावें.
२. '-धृतकार्त्तयुगस्य' असें वाचावें.
३. हें विरामचिह्न निरर्थक आहे.
४. 'दीर्ग्घद्रहं नाम' असें वाचावें.
५. 'प्रवरेश्वरषड्विंशतिवाटकवास्तव्य-' असें वाचावें.
६. 'तैत्तिरीय-' असें वाचावें.
७. 'सूर्य्यस्वामिने' असें वाचावें.
८. 'सर्व्वाध्यक्ष-' असें वाचावें.
९. 'विश्रुतपूर्व्वयाज्ञयाज्ञा-' असें वाचावें.

१८ सुत्रहितार्थमात्मानुग्रह(हा)य वैजैके[1] धर्म्मस्थाने अपू-
र्व्वदत्या[2] उदकपूर्व्वमति[सृ]ष्टः[3] [।*]

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१९ उचितांश्चास्य[4] पूर्व्वराजानुमतां चातुर्व्वैद्यग्रामसमर्य्यादा-
न्वितरामस्तद्यथा[5] अकरदायि

२० अभटच्छ(च्छा)त्रप्रावेश्य[म्*] अपारम्परगोबलवर्द्दः[6]
अपूष्पक्षिरसन्दोह[म्*] अचारासनच-[7]

२१ र्म्माङ्गार[म्*] अलवणक्लिन्नक्लेनिखनकः[8] सर्व्ववेष्टि-
परिहारपरिहृतः[9] सनिधिः[10] सोप-

---

१. 'वैजयिके' असें वाचावें,

२. 'अपूर्व्वदत्त्या' असें वाचावें.

३. '–मतिसृष्टम्' असें वाचावें. वर चौदाव्या ओळींतील 'ग्रामद्वयं' याचें तें विशेषण आहे.

४. 'उचितां चास्य' असें वाचावें.

५. 'मर्य्यादां वितराम–' असें वाचावें.

६. '–गोबलीवर्द्दम्' असें वाचावें. येथे आणि पुढेहि अनेक ठिकाणीं लेखकाने विशेषणांचें पुंल्लिंगी रूप इतर ताम्रपटांतल्याप्रमाणें योजिलें आहे, पण प्रस्तुत लेखांत 'ग्रामद्वयम्' याला जुळणारें नपुंसकलिंगी रूप पाहिजे.

७. 'अपुष्पक्षीर–' असें वाचावें.

८. '–क्रेणिखनकम्' असें वाचावें.

९. 'सर्व्वविष्टिपरिहारपरिहृतम्' असें वाचावें.

१०. 'सनिधि' असें वाचावें.

२२ निधिः[1] सक्लिप्तोपक्लिप्[2] अचन्द्रादित्यकालीय[3][ः] पुत्र-
पौत्रानुगाम्मिकः[4] भुञ्जता(तो)
२३ न केनचिद्व्याघात[ःक]र्त्तव्यः सर्व्वक्रयाभिस्स[5](स्सं)-
रक्षितव्य ः परिवर्द्धयितव्यश्च । यश्च(श्चा)स्मच्छा-
२४ सनमगणयमानः स्वल्पामपि परिबाधान्कुर्य्यात्कारयिर-
वा[6] अस्य ब्राह्मणैर्व्वेदितस्य

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२५ सदण्डनिग्रह(हं) कुर्य्याम ।। अस्मि(स्मि)श्च धर्म्मादर-
करणे अतीतानेकराजदत्तासंञ्चिन्त्यन[7]परिपा-
२६ लन(नं) कृतपुन्या(ण्या)नुकीर्तनपरिहारार्त्थ(र्त्थं) न
कीर्त्तयामः [।*] व्यासगीतौ चात्र श्लोकौ प्रमाणी-
२७ कर्त्तव्यौ । स्वदत्ताम्परदत्ताव्वा[8] हरेद्वा[9] वै वसुन्धरा[म्।*]
गवा(वां)शतसहस्रस्य[10] । हन्तुर्ह-

---

१. 'सोपनिधि' असें वाचावें.

२. 'सक्लप्तोपक्लृप्तम्' असें वाचावें.

३. 'आचन्द्रादित्यकालीयम्' असें वाचावें.

४. '–गामिकम्' असें वाचावें.

५. 'सर्व्वक्रियाभि–' असें वाचावें.

६. 'परिबाधां कुर्य्यात्कारयेद्वा' असें वाचावें.

७. 'राजदत्तसञ्चिन्तन–' असें वाचावें.

८. 'परदत्तां वा' असें वाचावें.

९. 'हरेद्यो' असें वाचावें.

१०. हें विरामचिन्ह निरर्थक आहे.

२८ रति दुष्कृत[म्*] ॥[१॥*] षष्ठि[1] वर्षसहस्राणि स्वर्गे
मोदति भूमिद [:*]। आच्छेत्ता चा-
२९ नुमन्ता च तान्येव नरके वसेत्[2] [॥२॥*] सव्वत्सरे एका-
दशमे[3] १० १ कार्त्तिकशुक्लपक्ष-
३० त्रयोदश्या[4] १० ३ सेन(ना)पतौ चित्रवर्म्मा(र्म्म)णि
ना[5] लिखित[म्*]।

---

६. द्वितीय प्रवरसेनाचा चम्मक ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट अमरावती जिल्ह्याच्या अचलपुर तहसिलींत अचलपुरच्या उत्तरेस चार मैलांवर असलेल्या चम्मक (प्राचीन चर्माङ्क) गावीं सन १८६८ मध्ये जमीन नांगरतांना सापडला होता. पुढे १८७९ मध्ये पंडित भगवानलाल इंद्रजी यांनी ऑर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न् इंडिया, क्रमांक ९, पृ. ५४ इ., मध्ये त्याचें वाचन प्रसिद्ध करून तो प्रकाशित केला. नंतर डॉ. बुल्हरने त्याचें अनुवादासहित संपादन प्रथम आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न् इंडिया, पु.

---

१. 'षष्टि' असें वाचावें.

२. वृत्त: अनुष्टुभ्.

३. 'संवत्सरे एकादशे' असें वाचावें.

४. 'त्रयोदश्यां' असें वाचावें.

५. येथे 'मणिना' असें विवक्षित असावें; पण लेखकाने मूळ लेखाची ताम्रपटावर नक्कल करतांना त्यांतील 'मणि' या अक्षरांसारखीं अक्षरें पूर्वी आल्यामुळे तीं दोन अक्षरें चुकीने गाळलेलीं दिसतात.

४, पृ. ११९ मध्ये आणि पुनः इंडियन ॲटिक्वरी, पु. १२, पृ. ३३९ इ. मध्ये केलें. शेवटीं डॉ. फ्लीटने कॉर्पस इन्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ३, पृ. २३५ इ. मध्यें तो ठसे व इंग्लिश अनुवाद यांसह प्रकाशित केला. मूळ ताम्रपट आता गहाळ झाल्यामुळे डॉ. फ्लीटने प्रसिद्ध केलेल्या ठशांवरून येथें त्याचें वाचन दिलें आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे एकूण सात पत्रे असून त्यांपैकी पहिला आणि शेवटचा एका बाजूवर आणि बाकीचे दोन्ही बाजूवर कोरले आहेत. पत्र्यांची लांबी ७½ इंच व रुंदी ३½ इंच आहे. त्यांच्या कडा उंच केल्या नाहीत. पहिल्या व शेवटच्या पत्र्यावरील कांही अक्षरें गंजामुळे खराब झालीं आहेत, पण बाकीचा लेख चांगल्या स्थितींत आहे. पत्र्यांच्या वरील बाजूस कडीकरितां छिद्र आहे. त्यांतून जाणारी कडी पाव इंच जाड व ३⅝ इंच व्यासाची आहे. तिला दुसऱ्या लहान कडीने मुद्रेशीं जोडलें आहे. ही कडी तांब्याची वर्तुलाकार असून तिचा व्यास २⅞ इंच आहे. तिच्यावर चार ओळींत कोरलेला लेख आहे. सात पत्र्यांचें एकूण वजन ६ पौंड १४ औंस आणि कडया व मुद्रा यांचें वजन १४½ औंस आहे.

अक्षरवटिका—लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून अक्षरांच्या डोक्यावरच्या पेटिका ५८ व ५९ या ओळींखेरीज इतरत्र पूर्णपणें खोदून काढल्या आहेत. ६० व्या ओळींत ८ व १० या संख्या आणि १९ व्या ओळींत ८००० ही संख्या चिन्हांनी दर्शविली आहे. उपध्मानीयाचें चिन्ह १३, १६ व ३२ ओळींत आलें आहे. लिपीचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत. (दीर्घ) ईकार परस्परविरुद्ध दिशांस वळविलेल्या वक्ररेषांनी दर्शविला आहे. उदाहरणार्थ 'श्रीभवनाग', ओ. ७, पहा. पण गौतमीपुत्रस्य (ओ. ८) यामध्यें (दीर्घ) ई उजवीकडे वळविलेल्या एकाच वक्ररेषेने दाखविलेली आढळते व्यंजनयुक्त औ द्विभागात्मक आहे. सामान्यत; 'त' ग्रंथिरहित व 'न' ग्रंथियुक्त आहे, पण अनेक

ठिकाणीं हीं अक्षरें कोरण्यांत घोटाळा झाला आहे. ओ. ९ मधील 'अत्यन्त' बद्दल 'अत्यत्न' पाहा.

भाषा—लेखाची भाषा संस्कृत आहे. ३६ ते ३९ ओळींतील दोन शापाशीर्वादात्मक श्लोकांखेरीज इतर सर्व भाग गद्यांत आहे. खालील लेखनविशेष उल्लेखनीय आहेत--'र्'च्या पूर्वी व नंतर येणाऱ्या, तसेंच 'य्' च्या पूर्वीच्या अक्षराचें द्वित्व केलें आहे. अनुस्वारानंतर येणाऱ्या 'व्' चेंहि 'संव्वत्सरे' (ओ. ६०) मध्ये द्वित्व केलेलें दिसतें.

विषय—वाकाटकांच्या इतर पूर्ण ताम्रपटांतील लेखांप्रमाणे प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने होतो. हा ताम्रपट वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेनाने प्रवरपुराहून दिला होता. मागील ताम्रपटांतल्याप्रमाणेच येथेहि त्याची वंशावळ दिली असून त्याच्या मातामहाचा उल्लेख देवगुप्त असाच केला आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश द्वितीय प्रवरसेनाने भोजकट राज्यांतील मधुनदी तीरावरील चर्मांङ्क नामक ग्राम हजार ब्राह्मणांना दान दिला हें नमूद करण्याचा होता. या गावाचा विस्तार राजमानाने आठ हजार निवर्तनें इतका होता. हें दान शत्रुघ्नराजाचा पुत्र कोंडराज याच्या विनंतीवरून केलें होतें. या कोंडराजाचा उल्लेख पट्टन ताम्रपटांतहि आला आहे. लेखाचा काल अठराव्या शासनवर्षी ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी असा दिला आहे. त्यावेळीं चित्रवर्मा हा सेनापति होता. हा याच पदावर अकराव्या शासनवर्षीहि होता, हें मागील ताम्रपटावरून आपणांस माहीत झालें आहे.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांतल्या स्थलनामांपैकी **प्रवरपुर** हें येथे प्रथमच उल्लेखिलें आहे. तें द्वितीय प्रवरसेनाने स्वतः वसवून त्याला आपलें नांव दिलें असावें. त्याच्या अकराव्या शासनवर्षापर्यंत त्याची राजधानी नंदिवर्धन होती. त्यानंतर त्याने प्रवरपुर नामक नगर वसवून तेथे राजधानी नेली असें दिसतें. या प्रवरपुराचा शोध पुष्कळ वर्षें लागला नव्हता. अलीकडे कांही वर्षांपूर्वी वर्ध्यापासून सहा मैलांवर धाम नदीच्या कांठीं पवनार येथे कांही गुप्तकालीन शिल्पें

सापडलीं आहेत त्यावरून तेथेच प्राचीन प्रवरपुर होतें असें अनुमान करतां येतें. **चर्मांक** हें प्रस्तुत ताम्रपट जेथे सापडला तें चम्मक होय, यांत संशय नाही. तें ज्या **मधुनदीच्या** तीरावर होतें तिला आता चंद्रभागा म्हणतात. ज्या 'राज्यां'त किंवा प्रांतांत चर्मांक अन्तर्भूत होत होतें त्याचें मुख्य शहर **भोजकट** हें अतिप्राचीन आहे. तें कृष्णाचा मेव्हणा रुक्मी याने वसविलें होतें. कृष्णाने रुक्मिणीचें हरण केल्यावर रुक्मीने प्रतिज्ञा केली की, कृष्णाला ठार मारून रुक्मिणीला परत आणल्याशिवाय आपण कुंडिनपुरास परत येणार नाही. त्याला ह्या प्रतिज्ञेची पूर्ति न करतां आल्यामुळे तो कुंडिनपुरास परत आला नाही. भोजकट नामक नवीन नगर स्थापून तेथे तो राहूं लागला. हें भोजकट म्हणजे अमरावतीपासून ८ मैलांवरचें भातुकली गाव होय असें म्हणतात. तेथे रुक्मीचें देवालय आहे आणि कांही वर्षांपूर्वी जैन तीर्थंकरांच्या मूर्ति सापडल्या होत्या त्यावरून तें गाव प्राचीन आहे यांत संशय नाही.

वाचन[1]

पहिला पत्रा

१ दृष्टं(ष्टम्) [।*] स्वस्ति [।*] प्रवरपुरादग्निष्टो-
माप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्या[2]तिरात्र-

२ वाजपेयबृहस्पतिसवसाद्यस्कचतुरश्वमेधयाजिनः

३ वि[ष्णु][3]वृद्धसगोत्रस्य सम्रा[ड्][4] वाकाटकानां महाराज-
[श्रि](श्री)प्रवरसेनस्य

---

१. डॉ. फ्लीटच्या गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. २४०-४१ समोरील ठशांवरून.

२. 'षोडश्यतिरात्र' असें वाचावें.

३. 'विष्णुवृद्ध' असें वाचावें.

४. 'सम्राजो' असें वाचावें.

४ सूनोः सूनोः अत्यन्त[स्वा]मिमहाभैरवभक्तस्य अ(अं)-
सभारसन्ति(न्नि)वेशि–

५ तशिवलि[ङ्गो]द्वहनशिवसुपरितुष्टसमुत्पादि[त]राजव-
(वं)शा–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

६ नाम्पराक्रमाधिगतभागीरत्थ्या(त्थ्य)मलजलमूद्र्धर्ना-
(र्द्धा)भिषिक्तानान्दशा–

७ श्वमेधावभृथस्नातानाम्भारशिवानां महाराजश्रीभवना-
गदौ–

८ हित्रस्य गौतमीपुत्रस्य पुत्रस्य वाकाटकानां महाराज-
श्रीरुद्रसे–

९ नस्य सूनोरत्यत्न(न्त)माहेश्वरस्य सत्यार्ज्जवकारुण्य-
शौर्य्यविक्रमन–

१० यविनयमाहात्म्या(त्म्य)धि(धी)मत्व(त्त्व)[1]हा(पा)-
त्रा(त्र)गतभक्ती(क्ति)त्वधर्म्मवी(वि)जयी(यि)त्व–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

११ मनोनैम्र्मा(र्म्म)ल्यादिगुणैस्समुपेतस्य वर्षशतमभिवर्द्ध-
मानकोश–

१२ दण्डसाधनसन्तानपुत्रपौत्रिणः युधिष्ठिरवृत्तेर्व्वाकाटका–

---

१. फ्लीटने येथे ‘माहात्म्याधिकत्व’ असें वाचन सुचविलें आहे; पण त्याचा अर्थ चांगलासा लागत नाही. पट्टन ताम्रपटाच्या (क्र. १३) ओळींत या ठिकाणीं धीमत्त्व आहे, तेंच विवक्षित असावें.

१३ नां महाराजश्रीपृथिविषेणस्य सूनोर्भगवतश्चक्रपाणेः प्रसा–

१४ दोपार्ज्जित[1]श्रीसमुदयस्य वाकाटकानां महाराजश्री-रुद्रसेन–

१५ [स्य*] सूनोर्म्महाराजाधिराजश्रीदेवगुप्तसुतायां प्रभाव–

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१६ ति(ती)गुप्तायामुत्पन्त(न्न)स्य शम्भोःप्रसादधृति(त)-कार्त्तयुगस्य

१७ वाकाटकानाम्परममाहेश्वरमहाराजश्रीप्रवरसेनस्य वचना[त्*]

१८ भोजकटराज्ये मधुनदीतटे चर्म्माङ्क[2]नामग्र(ग्रा)मः राजमानिकभु(भू)मि–

१९ सहस्रैरष्टाभिः ८००० शत्र(त्रु)घ्नराजपुत्रकोण्डराज-विज्ञाप्त्या नानागो–

२० त्रचरणेभ्यो ब्राह्मणेभ्यः सहस्राय दत्तः [।*]

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२१ यतोस्मत्सन्तका[:*] सर्व्वाद्ध्यक्षाधियोगनियुक्ता आज्ञासञ्च(ञ्चा)रिकुलपुत्राधिकृता

---

१. कोरक्याने प्रथम 'ज्जि' असें कोरलें होतें, तें पुढे त्याने 'र्ज्जि' असें दुरुस्त केलें.

२. कोरक्याने प्रथम 'ङ्का' कोरलें होतें, पण नंतर ते 'ङ्क' असें दुरुस्त केलें.

२२ भटाच्छ(च्छा)त्राश्च विश्रुतपूर्व्वयाज्ञयाज्ञापयितव्या विदितमस्तु वो यथे–

२३ हास्माकम्मनो[1] धर्म्मायुर्ब्बलविजयैश्वर्य्यविवृद्धये इहामुत्रहिता–

२४ र्थमात्मानुग्रहाय वैजै(जयि)के धर्म्मस्थाने अपूर्व्वदत्य(त्त्या) उदकपूर्व्व–

२५ मतिसृष्टः [।*] अथास्योचितां पूर्व्वराजानुमतां चातुर्वैद्यग्राममर्–

२६ य्यादान्वितरा[2]मस्तद्यथा अकरदायी[3] अभटछ्छ(च्छा)त्रप्रावेश्य[:*]

चौथा पत्रा : पहिली बाजू

२७ अपारम्परगोबलिवर्द्द[:*] अपुम्प(ष्प)क्षीरसन्दोह[:*] अच(चा)रा–

२८ सनचर्म्माङ्गार[:*] अलवणक्लिन्नक्रेणिखनक[:*] सर्व्ववेष्टि[4]परि–

२९ हारपरीहृतः[5] सनिधिस्सोपनिधिः सक्लिप्तोपक्लिप्तः[6]

---

१. ' यथेहास्माभिरात्मनो ' असें वाचावें.

२. ' मर्य्यादां वितराम–' असें वाचावें.

३. कोरक्याने प्रथम '–दायै' असें कोरलें होतें, पण नंतर तें '–दायी' असें दुरुस्त केलें.

४. ' विष्टि–' असें वाचावें.

५. ' परिहृतः ' असें वाचावें.

६. ' सक्लृप्तोपक्लृप्तः ' असें वाचावें.

३० आचन्द्रादित्यकालीयः पुत्रपौत्र(त्रा)नुगमकः भु(भुं)-
जतां न के–

३१ नचिद्व्याघातं(तः) कर्त्तव्यस्सर्व्वक्रियाभिस्स(स्सं)-
रक्षितव्यःपर(रि)वर्द्धयि–

३२ तव(व्य)श्च [।*] यश्चायं[1] शासनमगणयमानो(नः)
स्वल्प(ल्पा)मपि [प*]रिबाधां(धा)–[2]

चौथा पत्रा : दुसरी बाजू

३३ न्कु(ङ)कुर्य्यात्कारयिता वा[3] तस्य ब्राह्मणैर्व्वेदितस्य सव-
(द)ण्डनिग्रहं कुर्य्या–

३४ म ॥ अस्मि(स्मिं)श्च धर्म्माव(द)रकरणे अति(ती)-
तानेकराजदत्तसञ्चित्त(न्त)न–

३५ परिपालनं कृतपुण्यानुकीर्त्तनपरिहारार्तथं न कीर्त्त–
यामः [।*]

३६ व्यासगीतौ चात्र श्लोकौ प्रमानि[4](णी)कर्त्तव्यौ [।*]
स्वदत्तास्परदत्तां

३७ व्वा(वा)यो हरेत वसुन्धरां(राम्) । गवां शतसहस्रस्य
हत्तु(न्तु)–

---

१. येथे 'यश्चेदं' किंवा पट्टन ताम्रपटाच्या (क्र.१३) ३५ व्या ओळींतल्याप्रमाणे 'यश्चास्मच्छासन–' असें वाचावें.

२. येथे 'कुर्य्या' कोरलें होतें, नंतर तें खोडून टाकलें.

३. '–त्कारयेद्वा' वाचणें जास्त बरें.

४. या अक्षरापूर्वीचें उपध्मानीयाचें चिह्न खोडून टाकलें आहे.

पांचवा पत्रा : पहिली बाजू

३८ हंरति दुष्कृतं(तम्)[१] [।।१।।*] षष्टिं वर्षसहस्रानि(णि) स्वर्गे मोदति भू–

३९ मिदः [।*] आच्छेत्ता चानुमन्ता च[२] तान्येव नरके वसेदिति [।।२।।*] श्शा(शा)सन–

४० स्थितिश्चेयं ब्राह्मणैरीश्वरैश्चानुपालनीया [।*] तद्यथा राज्ञां स–

४१ प्ताङ्गे राज्ये अद्रोहप्रवृन्ता(त्ता)नां [अ*]ब्रह्मघ्नचौरा(र)पारदारिकराजा–

४२ पत्थ्यकारिप्रभृति(ती)नां सङ्ग्राम[म*]कुर्व्वतां अन्यग्राम(मे)ष्वन– ।।[३]

पांचवा पत्रा : दुसरी बाजू

४३ पर(रा)द्धानां आचन्द्रादित्यकालीयः[।*] अतोन्यथा कुर्व्वतामनुमोदतां वा[४]

४४ राज्ञः भूमिच्छेदं कुर्व्वन्तः(तः) अस्तेयमिति [।।*] प्रा(प्र)ति[ग्रा[५]]हिणश्चात्र

१. या व पुढील श्लोकाचें वृत्त : अनुष्टुभ्.

२. कोरक्याने प्रथम 'च्छ' कोरलें होतें, नंतर तें 'च' असें दुरुस्त केलें.

३. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

४. येथे प्रथम 'व्वा' असें कोरलें होतें, नंतर 'वा' अशी दुरुस्ती केली.

५. येथे प्रथम 'ग्वा' असें कोरलें होते, नंतर त्याचें 'ग्रा' केलें.

४५ वारनियुत्ता(क्त:) [।*] शाटचायन: गणार्य्य: वात्स्य-
देवार्य्य: भारद्वाज–

४६ कुमारशर्म्मार्य्य [:*] पाराशर्य्यगुहशर्म्मा काश्यपदेव-
(वा)र्य्य: महेश्वरार्य्य[1][:]

४७ मात्रार्य्य: कौण्डिण्य(न्य)रुद्रार्य्य[:*] सोमार्य्य[:*]
हरिशर्म्मार्य्य[:*]

सहावा पत्रा : पहिली बाजू

४८ भारद्वाजकुमारश[र्म्मा]र्य्य[:*] कौण्डिण्य(न्य)मा[तृ]-
शर्म्मा वरशर्म्मा

४९ गोण्डशर्म्मा नागशर्म्मा भारद्वा[ज*]शान्तिशर्म्मा रुद्र-
शर्म्मा वात्स्य:

५० भोजकद(दे)वार्य्य[:*] मघशर्म्मा देवशर्म्मा भारद्वाज-
मोक्षशर्म्मा

५१ [ना]गशर्म्मा रेवतिशर्म्मा धर्म्मार्य्य[:*] भारद्वाज-
शर्म्मार्य्य[:*]

५२ नन्दनार्य्य[:*] मूलशर्म्मा ईश्वरशर्मा वरशर्म्मा

सहावा पत्रा : दुसरी बाजू

५३ वात्स्यस्कन्दार्य्य[2][:*] भारद्वाजबप्पार्य[:*] धर्म्मार्य्य[:*]
आत्रेयस्कन्दार्य्य[:*]

---

१. हें 'र्य्य' अक्षर 'रा'च्या खाली कोरलें आहे.

२. 'वात्स्य' असें वाचावें.

५४ गौतमसोमशर्म्मार्य्य[:*] भतृ(र्तृ)शर्म्मा रुद्रश[र्म्मा]-
र्य्य[:*] मघार्य्य[:*] मातृ–

५५ शर्म्मार्य्य[:*] ईश्वरशर्म्मार्य्य[:*] गौतमसगोत्रमातृशर्म्मा-

५६ र्य्य[:*] कौण्डिण्य(न्य)देवशर्म्मार्य्य[:*] वरशर्म्मार्य्य[:*]
रोहार्य[:*]

सातवा पत्रा

५७ गौतमसगोत्रस्वामिदे[वा:*]र्य्य[:*] रेवतिशर्म्मार्य्य[:*]

५८ ज्येष्ठशर्म्मार्य्य[:*] शाण्डिल्यकुमारशर्म्मार्य्य[:*] स्वाति-
शर्म्मा–

५९ र्य्य[:*] श(शा)ट्यायण(न)काण्ड(ण्डा)र्य्यप्रभृतय:
[॥*] सेनापतौ

६० चित्रवर्म्मणि संव्वत्सरेष्टादश(शे) १० ८ ज्येष्ठमास-
शुक्ल–

६१ पक्षत्रयोदश्या(श्यां) शासनं लिखितमिति ॥

मुद्रा

१ वाकाटकललामस्य
२ क्रमप्राप्तनृपश्रिय: [।*]
३ राज्ञ:प्रवरसेनस्य
४ शासनं रिपुशासनं(नम्)[1] [॥*]

---

१. वृत्त : अनुष्टुभ्.

७. द्वितीय प्रवरसेनाचा सिवनी ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट मध्यप्रदेशाच्या सिवनी जिल्ह्यांतील पिंडराई नामक गावांत तेथील मालगुजार हजारी गोंड याच्या येथे होता. तो सन १८३६ मध्ये जेम्स प्रिन्सेपने एशियाटिक सोसायटीच्या जर्नल मध्ये (पु. ५, पृ. ७२६ इ.) त्याचें वाचन, इंग्रजी भाषांतर व ठसे छापून प्रकाशित केला. त्यानंतर डॉ. फ्लीटने आपल्या गुप्त इन्स्क्रिप्शन्स् या ग्रंथांत (पृ. २४३ इ.) त्याचें वाचन, इंग्रजी भाषांतर व ठसे प्रसिद्ध केले. त्याच ठशांवरून तो येथे संपादिला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे पांच पत्रे असून त्यांपैकी पहिला व शेवटचा एका बाजूवर आणि बाकीचे तीन दोन्ही बाजूंवर कोरले आहेत. पत्र्यांची लांबी सुमारें ८$\frac{3}{16}$ इंच व रुंदी ४$\frac{1}{2}$ इंच आहे. त्यांच्या कडा वाकवल्या नाहीत तथापि त्यांवरील लेख उत्तम स्थितींत आहे. पत्र्यांच्या डाव्या बाजूस कडी करितां छिद्र आहे. ही कडी पाऊण इंच जाड व ३$\frac{7}{8}$ इंच व्यासाची आहे. चम्मक ताम्रपटाच्या कडीप्रमाणें तिला ३$\frac{1}{16}$ इं. व्यासाची वर्तुलाकार मुद्रा जोडली आहे; तिच्यावर चार ओळींचा लेख आहे. पांचहि पत्र्यांचें वजन ३ पौंड ४$\frac{1}{4}$ औंस आणि कडी व मुद्रा यांचें ५$\frac{1}{4}$ औंस आहे.

लिपी—लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून तिचें वळण जांब ताम्रपटांतल्याप्रमाणें आहे. खालील विशेष उल्लेखनीय आहेत-'ख' चा खालचा भाग चौकोनी आहे; 'ड' व 'द' यांच्या आकृति स्पष्टपणें परस्परभिन्न दाखविल्या नाहीत; 'न' ची आकृति सध्याच्या नागरी लिपींतल्याप्रमाणे आहे; 'ब' दोन प्रकारचा आहे-चौरस आकाराचा आणि

डाव्या बाजूस खाच असलेला; स्वररहित व्यंजन लहान आकाराने किंवा त्यावरील आडव्या रेषेने दाखविलें आहे; उपध्मानीयाचें चिन्ह मुद्रेवरील लेखाच्यां तिसऱ्या ओळींत आलें आहे.

भाषा—या लेखाची भाषा संस्कृत असून मुद्रेवरील श्लोक व शेवटचे दोन शापाशीर्वादात्मक श्लोक यांखेरीज लेखाचा सर्व भाग गद्यांत आहे. लेखनाचे खालील विशेष आढळतात–‘र्’ नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे; ‘य’ आणि ‘व’ यांच्या पूर्वीच्या व्यंजनाचेंहि द्वित्व झालें आहे; ‘वन्श’ (ओ. ५ व १७) आणि ‘अन्स’ (ओ. ४) या शब्दांत अनुस्वाराबद्दल ‘न्’ चा उपयोग केला आहे; ‘क्लिप्तोपक्लिप्त’ (ओ. ३०) मध्ये ‘लृ’बद्दल ‘लि’ लिहिला आहे.

विषय—वाकाटकांच्या इतर पूर्ण ताम्रपटांप्रमाणे याचाहि आरंभ ‘दृष्टम्’ शब्दाने होतो. तो वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेनाने आपल्या विजयी धर्मस्थानाच्या ठिकाणीं अर्थात् स्वतःच्या राजधानींत असतांना दिला होता, पण इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे यामध्ये राजधानीचा उल्लेख नाही. द्वितीय प्रवरसेनाची वंशावळ त्याच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच दिली असून त्याच्या मातामहाचें नांव देवगुप्त असेंच यामध्ये आलें आहे. प्रस्तुत ताम्रपट देण्याचा उद्देश द्वितीय प्रवरसेनाने तैत्तिरीय शाखेच्या मौद्गल्यगोत्री देवशर्माचार्य नामक ब्राह्मणास ब्रह्मपूरक गाव दान दिला हें नमूद करण्याचा होता. हा गांव बेण्णाकार्परभोगांतील असून तो वटपूरकाच्या उत्तरेस, किणिहिखेटकाच्या पश्चिमेस, पवरज्जवाटकाच्या उत्तरेस आणि कोल्लपूरकाच्या पूर्वेस होता. त्याच्या जवळच्या गावाचें नांव करञ्जविरक असें होतें. हें दान द्वितीय प्रवरसेनाच्या शासनाच्या अठराव्या वर्षी फाल्गुन शुक्ल द्वादशीस दिलें होतें. त्या काळीं बाप्पदेव हा सेनापतीपदावर होता. या दानपत्राचा लेखक आचार्य हा होता.

प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या गावांचा शोध पुष्कळ काळपर्यंत लागला नव्हता. **कोल्लपूरक** हें गाव मात्र अचलपूरच्या दक्षिणेस २१ मैलांवरचें नकाशांत दिसणारें कोलापूर असावें असें डॉ. फ्लीटने सुचविलें होतें, पण तें बरोबर नाही. कारण त्या गावाचें खरें नांव खोलापूर असें असून तें यादवनृपति सिंघण याचा सेनापति खोलेश्वर याने खिस्तोत्तर तेराव्या शतकाच्या आरंभीं आपल्या नांवाने वसवून ब्राह्मणांस अग्रहार म्हणून दिलें होतें. तेव्हा तें प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें कोल्लपूरक असणें शक्य नाही व त्याच्या जवळपास चतुःसीमेचीं गावेंहि सापडत नाहीत. पाटणा संग्रहालय ताम्रपटाचें संपादन करीत असतां डॉ. अळतेकरांनी त्यांतील दान दिलेल्या श्रीपर्णका गावाची सीमा सांगण्याकरितां उल्लेखिलेलें ब्रह्मपूरक आणि प्रस्तुत ताम्रपटांतील त्याच नांवाचें गाव हीं एकच असावीं आणि तें गाव अचलपुराजवळचें ब्राह्मणवाडा असावें असें प्रतिपादिलें. पण या मतावरहि पूर्वीचाच आक्षेप येतो; कारण त्याच्या सभोंवार इतर कोणतींहि गावें सापडत नाहीत. प्रस्तुत ताम्रपटाने दान दिलेलें गाव **बेण्णाकार्पर भोगांत** अन्तर्भूत होतें हा निर्देश अत्यंत महत्त्वाचा आहे. तिरोडी ताम्रपटांतल्या बेण्णाकटाप्रमाणे या विभागाचें नांव बेण्णा किंवा वैनगंगा नदीवरूनच पडलें असावें. ही गोष्ट माझ्या ध्यानांत आल्यावर इतर गावांचा शोध लावणें कठीण काम नव्हतें. **करञ्जविरक** हें दक्षिणपूर्व रेल्वेच्या नागपूर–कलकत्ता मार्गावरील आमगाव स्टेशनपासून सहा मैलांवरचें कारंजा असावें. कारंजापासून तीन मैलांवर असलेलें बम्हनी हें दान दिलेलें प्राचीन **ब्रह्मपूरक** होय. बम्हनीच्या पश्चिमेस पांच मैलांवरचें कारंजाजवळचें कुल्पा हें प्राचीन **कोल्लपूरक** असावें. राहिलेलीं **पवरज्जवाटक** आणि **वटपूरक** हीं गावें बम्हनीच्या जवळ परसवाडा आणि वडगांव या नांवांनी अद्यापि विद्यमान आहेत. हीं सर्व गावें वैनगंगेच्या पूर्वतीरापासून वीस ते तीस मैलांवर आहेत. त्यामुळे तीं प्राचीन काळीं **बेण्णाकार्पर भोगांत** अन्तर्भूत होत होतीं यांत संशय नाही.

वाचन[1]

पहिला पत्रा

ओळ

१ दृष्टम् ॥ अग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्यतिरात्रवा-
जपे(पे)यबृहस्पतिसव-

२ साद्यस्क्रव(च)तुरश्वमेधयाजिनः विष्णुवृद्धसगोत्रस्य
सम्राट्[2] वाकाटकाना-

३ म्महाराजश्रीप्रवरसेनस्य सूनोः सूनोः अत्यन्तस्वामिमहा-

४ भैरवभक्तस्य अन्स[3]भारसन्निव(वे)शितशिवलिङ्गोद्वहन-
शिवसुपरितुष्ट-

५ समुत्पादितराजवन्शा(वंशा)नाम् पराक्रमाधिगतभागी-
रत्थ्या(थ्य)मलजलमूर्द्धाभि-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

६ षिक्तानाम् दशाश्वमेधावभृथस्नातानाम्भारशिवाना-
म्महाराजश्रीभवना-

७ गदौहित्रस्य गौतमि(मी)पुत्रस्य पुत्रस्य ।[4] वाकाट-
कानाम्महाराज श्री-

---

१. फ्लीटच्या गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. २४८–४९ समोरील ठशांवरून.

२. 'सम्राजो' असें वाचावें.

३. 'अंस–' असें वाचावें.

४. हें व यासारखीं ७–३१ ओळींतील विरामचिह्नें निरर्थक आहेत,

८ रुद्रसेनस्य सूनोः अत्यन्तमाहेश्वरस्य । सत्यार्ज्जवकारु-
ण्यशौ-

९ र्य्यविक्रमनयविनयमाहात्म्यधि(धी)मत्व(त्त्व)पात्रगत-
भक्तित्व[1]धर्म्मविजयि-

१० त्व मनोनैर्म्मल्यादिगुणसमुदितस्य । वर्षशतमभिवर्द्धमान-
कोश-

११ दण्डसाधनसन्तानपुत्रपौत्रिणः युधिष्ठिरवृत्तेर्व्वाकाटका-
नाम्महाराज-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१२ श्रीपृथिवि(वी)षेणस्य सूनो[:*] भगवतश्चक्रपाणेः
प्रसादोपार्ज्जित-

१३ श्रीसमुदयस्य । वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)रुद्रसेन-
स्य सूनोः

१४ पूर्व्वराजानुवृत्तमार्ग्गानुसारिणः सुनयबलपराक्रमो-

१५ च्छिन्नसर्व्वद्विषः महाराजाधिराजश्रीदेवगुप्तसुताया-
म्प्रभावति(ती)-

१६ गुप्तायामुत्पन्नस्य शम्भो[:*] प्रसादधृति(त)कार्त्त-
युगस्यः(स्य) वाकाटक-

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१७ वन्शाल [2]ारभूतस्य । महाराजश्रीप्रवरसेनस्य वचनात्
बेण्णा-

---

१. डॉ. फ्लीटने येथे 'पात्रागतभक्तित्व' असें वाचन सुचविलें आहे, पण तें आवश्यक नाही.

२. 'वंशालंकार-' असें वाचावें.

१८ कार्पंरभा(भो)गे प्रवर्द्धमानराज्यसव्वत्सरे[1]। अष्टा-
दशमे[2]। फाल्गु-

१९ नशुक्लद्वादश्याम् मौद्गल्यसगोत्राय । तैतिरि(री)याया-
द्ध्वर्य्य-

२० वे देवशर्म्माचार्य्यायोदकपूर्व्वम् सकोरट: सपञ्चाशत्कः

२१ ब्रह्मपूरकग्रामग्रामोतिसृष्टः [।*] वटपूरकस्योत्तरेण ।
किणिहिखे-

२२ टकस्यापरेण । पवरज्जवाटकस्य दक्षिणेन । कोल्लपूर-
कस्य

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२३ पूर्व्वेण । स्वसीमापर(रि)च्छ(च्छे)देन करञ्जविरक-
तटे । अत्रा(तो)स्मत्सन्तकाः

२४ सर्व्वाद्ध्यक्षन(नि)योगनियुक्ताः आज्ञासञ्चारिकुलपु-
त्राधिकृता भटाः[3]

२५ श्छात्राश्च विश्रुतपूर्व्वया आज्ञया आज्ञापयितव्याः[।*]
विदित-

२६ मस्तु तः(वः) यथैषोस्माभिः आत्मनो धर्म्मायुर्ब्बलविज-
यैश्वर्य्य[4]विवृध(द्ध)ये

---

१. 'संवत्सरे' असें वाचावें.

२. 'अष्टादशे' असें वाचावें.

३. 'भटा-' असें वाचावें.

४. येथे प्रथम 'व्रि' कोरलें होतें; नंतर तें 'वि' असें दुरुस्त करण्यांत आलें.

२७ इह(हा)मुत्रहितार्त्थमात्वा(त्मा)नुग्रहाय । वैजयिके धर्म्मस्थाने[३] । अभट–

चौथा पत्रा : पहिली बाजू

२८ च्छ(च्छा)त्रप्रावेश्यः अपारम्परगोबलिबर्द्दः अपुष्पक्षीर-सन्दोह[:*] अचा–

२९ रासनचर्म्माङ्गारः अलवण[२]क्लिन्व(न्न)क्रेणिखनकः सर्व्व-विष्टिपरिहार–

३० परिहृतः सनिधिः सोपनिधिः सक्लिप्तोपक्लि[३]प्तः आचन्द्रादित्य–

३१ कालि(ली)यः पुत्रपौत्रानुगामी । भुज्यमानो न केनचि-द्व्याघातयि–

३२ तव्यः सर्व्वक्रियाभिः संरक्षितव्यः परिवर्द्धयितव्या(व्य)-श्च [।*] यश्चास्म–

३३ च्छासनमगणयमानः स्वल्पामपि परिबाधान्कुर्य्यात्कार-यीत वा[४]

चौथा पत्रा : दुसरी बाजू

३४ तस्य ब्राह्मणैरावेदितस्य । सदण्डनिग्रहं कुर्य्यामि कारयेम वेति [।*]

---

१. 'अतिसृष्टः' असें पद येथे गळलें आहे.

२. प्रथम 'लि' असें कोरलें होतें. नंतर त्याची वेलांटी खोडण्यांत आली.

३. 'सक्लृप्तोपक्लृप्तः' असें वाचावें.

४. 'परिबाधाङ्कुर्य्यात्कारयेद्वा' असें वाचावें.

३५ सेनापतौ बाप्पदेवे लिखितमाचार्येण ॥ अस्मि(स्मि)-
श्च ध[र्म्मा]धिकर-

३६ णे अति(ती)तानेकराजदत्तास्संचिन्तनपरिपालनं[1] कृतपु-

३७ ण्यानुत्कीर्त्तयामः[2] [।*] एष्यन्तत्कालप्रभविष्णूनंगौर-[3]
वाद्विष्यान्वि-

३८ ज्ञापयामः ॥ व्यासगीतौ चात्र श्लोकौ प्रमाणीकर्त्तव्यौ ॥

३९ षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गे मोदति भूमिदः [।*] आच्छेत्ता
चानुमत्ता(न्ता)

४० च तान्येव नरके वसेत(त्)[5] ॥[१॥*] स्वदत्ताम्पर-
दत्ताव्वा[6] यो हरे-

४१ त वसुन्धराम(म्)[।*]गवां शतसहस्रस्य हन्तुर्हरति दुष्कृ-
तमिति[7] ॥

---

१. या राजाच्या इतर ताम्रपटांत ' धर्म्मादरकरणे ' असें पद आढळतें.

२. '–राजदत्तसंचिन्तनपरिपालनं ' असें वाचावें.

३. ' कृतपुण्यानुकीर्तनपरिहारार्थं न कीर्त्तयामः ' असें वाचावें.

४. ' एष्यत्कालप्रभविष्णूनां ' असें वाचावें.

५. या व पुढील श्लोकाचें वृत्त–अनुष्टुभ्.

६. '–म्परदत्तां वा ' असें वाचावें.

७. ' दुष्कृतम् ॥ इति ॥ ' असें वाचावें.

मुद्रा

१ वाकाटकललामस्य
२ क्रमप्राप्तनृपश्रियः [।*]
३ राज्ञःप्रवरसेनस्य
४ शासन(नं) रिपुशासनम्[1] [॥*]

---

८. प्रभावतीगुप्तेचा ऋद्धपूर ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट अमरावती जिल्ह्यांतील ऋद्धपूर गांवी महानुभाव पंथाचे महंत दत्तराज यांच्या संग्रहीं होता. श्री. य. रा. गुप्ते यांनी त्याचें संपादन दोनदां–प्रथम भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक, पु. ३, क्रमांक २–४, पृ. ८९ इ. आणि नंतर बंगाल एशियाटिक सोसायटीचें जर्नल, नवी माला, पु. २०, पृ. ५३ इ. यांमध्ये–केलें आहे. बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नल मध्ये त्यांनी या ताम्रपटाच्या पत्र्यांचे उलटे ठसे व इंग्रजी भाषांतरहि प्रसिद्ध केलें आहे, त्याच ठशांवरून हा ताम्रपट येथे संपादिला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून त्यांची लांबी $६\frac{३}{४}$ इंच व रुंदी $३\frac{६}{८}$ इंच आहे. पहिल्या व चौथ्या पत्र्यांच्या एका बाजूवर व बाकीच्यांच्या दोन्ही बाजूंवर कोरलें आहे. लेखाच्या एकंदर बत्तीस ओळी असून त्यांपैकी पहिल्या पत्र्यावर पांच, दुसऱ्या व तिसऱ्या पत्र्यांच्या प्रत्येक बाजूवर सहा, आणि चौथ्या पत्र्यावर तीन ओळी कोरल्या आहेत. अक्षरें खोल कोरलीं असून सर्व लेख चांगल्या स्थितींत आहे. प्रत्येक पत्र्याला कडीकरितां $\frac{१}{१६}$ इंच व्यासाचें छिद्र आहे, पण कडी किंवा तिच्यावर फिरणारी मुद्राहि सांपडली नाही. चारी पत्र्यांचें वजन ११६ तोळे आहे.

---

१. वृत्त–अनुष्टुभ्.

लिपी—या लेखाची लिपी द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतल्या प्रमाणे पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत–दीर्घ 'ई' दोन वेलांट्यांनी किंवा एका वेलांटींत बिंदु घालून दाखविली आहे; व्यंजन रहित ऐकार 'ऐहिक–' (ओ. १३) मध्यें आला आहे व्यंजन युक्त 'औ' द्विभागयुक्त आहे; 'ख' ला 'खनक' (ओ. १९) मध्ये खालीं गांठ आहे, पण 'लिखितं' (ओ. ३१) मध्ये ती दिसत नाही; 'ग' व 'श' यांच्या डाव्या बाजूच्या रेषांचें खालचें टोंक आंतल्या बाजूस वळविलें आहे; 'ड' आणि 'द' यांचे आकार भिन्न आहेत; 'ब'च्या डाव्या बाजूस खाच आहे; स्वररहित व्यंजन लहान आकाराने दाखविलें आहे; जिह्वामूलीयाचें चिन्ह २२ व्या ओळींत, आणि उपध्मानीयाचें १, ६, २२, २६ व २९ या ओळींत आलें आहे.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून शेवटच्या शापाशीर्वादात्मक श्लोकाखेरीज त्याचा सर्व भाग गद्यांत आहे. लेखनाचे विशेष इतर ताम्रपटांतल्या प्रमाणेंच खालील प्रकारचे आहेत—'र्'च्या पूर्वी व नंतर येणाऱ्या व्यंजनाचेंहि द्वित्व होतें; तसेंच 'य्' च्या पूर्वीच्या व्यंजनाचेंहि झालें आहे; 'लृ' या स्वराबद्दल लि लिहिला आहे. ओ. २० मधील 'उपक्लिप्त' पाहा.

विषय—प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटांतल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटाच्या लेखाचा आरंभ 'जितं भगवता' 'भगवान् विष्णूचा विजय झाला' या शब्दांनी झाला आहे. त्या ताम्रपटांत तसेंच द्वितीय प्रवरसेनाच्या बहुतेक पूर्ण ताम्रपटांत आरंभीं दिसणारा 'दृष्टम्' शब्द मात्र येथे आढळत नाही. तथापि या ताम्रपटाची लिपी व लेख यांवरून तो खरा आहे याविषयी संशय नाही.

प्रस्तुत लेख वाकाटक महाराज द्वितीय रुद्रसेन याची अग्रमहिषी आणि वाकाटक महाराज दामोदरसेन-प्रवरसेन याची जननी प्रभावतीगुप्ता हिचा आहे. तो द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या शासनवर्षी

दिला होता; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं या लेखाच्या प्रास्ताविक भागांत वाकाटकांची वंशावळ दिली नसून गुप्तांची दिली आहे. हाच प्रकार प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटांतहि आढळतो. तो ताम्रपट ती आपला अल्पवयी मुलगा युवराज दिवाकरसेन याच्या तर्फे राज्यकारभार पाहत होती तेव्हा दिला होता. त्या काळीं तिचा पिता द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याने तिला राज्यशासनांत साहाय्य करण्याकरितां पाठविलेल्या अधिकाऱ्यांचें वाकाटक दरबारीं प्रस्थ असल्यामुळे पुणें ताम्रपटांत गुप्तांची वंशावळ घातली गेली असें म्हणणें शक्य होतें, पण प्रस्तुत ताम्रपटांतील गुप्त वंशावळीचें तें कारण होऊं शकत नाही. कारण या ताम्रपटाच्या वेळीं द्वितीय प्रवरसेन वयांत आला होता. एवढेंच नव्हे तर तो एकोणीस वर्षें राज्य करीत होता. त्याच्या सर्व ताम्रपटांत वाकाटकांचीच वंशावळ दिली आहे. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांत गुप्तांची वंशावळ घालण्याचें खरें कारण प्रभावतीगुप्तेचा स्वतःच्या पितृकुलाविषयी अभिमान हेंच असावें.

या ताम्रपटांतील गुप्तांची वंशावळ पुणें ताम्रपटांतल्याप्रमाणे आहे. फरक एवढाच की यांत 'महाराजाधिराज' ही सम्राट्पदनिदर्शक पदवी द्वितीय चन्द्रगुप्तालाच लावली आहे. त्याच्या सर्व पूर्वजांच्या–दिग्विजयी समुद्रगुप्ताच्या सुद्धा–बाबतींत 'महाराज' हीच पदवी उल्लेखिली आहे. वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन व द्वितीय प्रवरसेन यांनाहि अर्थातच इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे 'महाराज' हीच पदवी लावली आहे. प्रभावतीगुप्तेचें वर्णन 'भगवत्पादानुध्याता' (भगवान् विष्णूच्या चरणांचें चिन्तन करणारी) या शब्दांनी केलें आहे, त्यावरून ती विष्णूपासक होती, हें उघड आहे.

हा ताम्रपट रामगिरिस्वामीच्या पादुकांजवळ (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) दिला होता. हा रामगिरिस्वामी म्हणजे भगवान् रामचंद्र होय. प्रस्तुत लेखाचा उद्देश कौशिक मार्गांतील अश्वत्थ नगरांतील एक

शेत, त्यांतील घर व शेतकऱ्यांकरिता बांधलेल्या चार झोपड्या यांसह, प्रभावतीगुप्तेने कांही ब्राह्मणांना दान दिलें हें नमूद करण्याचा होता. हे ब्राह्मण तैत्तिरीय शाखेचे व पाराशर गोत्राचे होते असें म्हटलें आहे; पण आश्चर्याची गोष्ट ही की यांत त्यांचीं नांवें दिलीं नाहीत. लेखाचा काळ द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या शासनवर्षी कार्त्तिक शुक्ल द्वादशी असा दिला आहे. प्रभावतीगुप्ता विष्णूपासक असल्याने तिने हें दान प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याच्या वेळीं दिलेलें दिसतें. तिचा पुणें ताम्रपट अशाच प्रसंगीं दिला होता. प्रस्तुत लेखाचा दूतक (सचिवालयांत राजाज्ञा कळविणारा) देवनन्दस्वामी व लेखक प्रभुसिंह होता.

चर्चा—प्रभावतीगुप्तेच्या वर्णनांतील एका विशेषणामुळे पुष्कळ वाद उत्पन्न झाला आहे. प्रस्तुत ताम्रपटाचे संपादक श्री. य. रा. गुप्ते यांनी तें विशेषण 'साग्रवर्षशतदिवपुत्रपौत्रा' असें वाचलें आणि त्याचे खालील दोन अर्थ सुचविले--(१) जिला पुत्र व पौत्र झाले आहेत आणि जी शंभर वर्षे जगून शेवटीं स्वर्गांत वास्तव्य करील, आणि (२) जिला कीर्तिमान् पुत्र आणि पौत्र आहेत आणि जी पूर्ण शंभर वर्षे जगली आहे. श्री. गुप्ते पुढे म्हणतात की लेखकाला या शब्दांचा वाच्यार्थ विवक्षित नसून प्रभावतीगुप्ता दीर्घ काळ जिवंत होती व तिला कीर्तिमान् पुत्र व पौत्र झाले होते हें सांगावयाचें होतें. त्यानंतर या ठिकाणाचा खरा पाठ 'दिवपुत्रपौत्रा' नसून 'जीवपुत्रपौत्रा' असा आहे असें दाखविण्यांत आलें आहे. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी हें वर्णन वाच्यार्थी घेऊन प्रभावतीगुप्ता द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या राज्यशासनवर्षी शंभर वर्षांची होती व तिला पुत्र व पौत्र झाले होते असा अर्थ केला आहे. या अर्थावर त्यांनी वाकाटक-नृपतींच्या कालाविषयी आपली कल्पना बसविली आहे. पण ती बरोबर दिसत नाही. वरील शब्दसमूहांतील 'जीवपुत्रपौत्रा' या भागाचा अर्थ 'जिचे पुत्र व पौत्र जिवंत आहेत' असा होतो. याच अर्थाचीं 'जीवसुता'

व 'जीवपुत्रा' हीं विशेषणें ऋग्वेद, महाभारत व रामायण या प्राचीन ग्रंथांत तसेंच कांही कोरीव लेखांतहि आढळतात. स्वतःचे पुत्र व पौत्र जिवंत असणें हें भाग्याचें लक्षण मानलें जात असल्यामुळे यासारखीं विशेषणें स्त्रियांच्या वर्णनांत अनेक ठिकाणीं येतात. 'जीवपुत्रपौत्रा' याच्यापूर्वीच्या दीर्घायुष्यवाचक 'साग्रवर्षशत' ह्या सामासिक शब्दाचा संबंध पुढील 'जीव' शब्दाशीं आहे. तेव्हा या सबंध शब्दसमूहाचा उद्देश प्रभावतीगुप्तेचें दीर्घायुष्य सांगण्याचा नसून तिचे पुत्रपौत्र दीर्घायुषी होते हें सांगण्याचा असावा. प्रभावतीगुप्तेसारख्या गतभर्तृका स्त्रीला शंभर वर्षांचें आयुष्य लोभनीय वाटणें शक्य नाही. कोणतीहि भारतीय स्त्री वैधव्यांतील आपल्या दीर्घायुष्याचा उल्लेख स्वतःच्या लेखांत अभिमानाने करणार नाही. तेव्हा ह्या शब्दसमूहांत उल्लेखिलेलें शंभर वर्षांचें आयुष्य तिचें नसून तिच्या पुत्रपौत्रांचें आहे हें उघड आहे. हा उल्लेखहि वाच्यार्थाने घ्यावयाचा नसून लहान मुलांना दीर्घायु किंवा आयुष्यान् हीं विशेषणें ज्या अर्थाने लावतात त्या अर्थी घेतला पाहिजे. अशा ठिकाणीं मुलांना दीर्घायुष्य लाभो अशी इच्छा व्यक्त करणें हा उद्देश असतो. तेव्हा प्रस्तुत विशेषणाचा अर्थ 'पूर्ण शंभर वर्षें आयुष्य उपभोगितील असे पुत्र व पौत्र जिला आहेत अशी' असा केला पाहिजे.

प्रभावतीगुप्तेच्या वर्णनांतील दुसरें विशेषण 'वाकाटकानां महाराजश्रीदामोदरसेनप्रवरसेनजननी' हें आहे. या विशेषणाचाहि अर्थ संशोधकांनी भिन्न भिन्न प्रकारांनी केला आहे. डॉ. मुजुमदारांच्या मतें प्रभावतीगुप्तेला दामोदरसेन व प्रवरसेन असे दोन मुलगे होते. पण तसें असतें तर 'वाकाटकानां महाराज' हे शब्द मृत दामोदरसनाला लावले त्याप्रमाणे जिवंत प्रवरसेनालाहि लावले असते. वाकाटक ताम्रपटांत हे शब्द ज्यांनी ज्यांनी राज्य केलें त्या सर्वांच्या बाबतींत मोठया कसोशीने योजिलेले दिसतात. हे शब्द दोघांनाहि लावण्याचा लेखकाचा उद्देश होता असें मानल्यास तत्पूर्वीच्या दिवाकरसेनाचें नांव यांत कां गाळलें

तें सांगतां येत नाही. पुणें ताम्रपट दिला त्या वेळीं प्रभावतीगुप्तेला प्रवरसेन हा मुलगा झाला होता. पण त्या ताम्रपटांत त्याचें नांव आलें नसून त्या वेळीं गादीवर असलेल्या 'युवराज' दिवाकरसेनाचा मात्र त्यांत उल्लेख केला आहे. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांतील उल्लेखहि मृत राजाचा किंवा राजपुत्राचा नसून त्या वेळीं राज्य करणाऱ्या राजाचा–अर्थात् केवळ द्वितीय प्रवरसेनाचा–आहे असें मानणें भाग आहे. म्हणून दामोदरसेन व प्रवरसेन हे एकच होते आणि दामोदरसेनानें राज्याभिषेकप्रसंगीं आपल्या कीर्तिमान् पूर्वजाचें प्रवरसेन हें नांव धारण केलें होतें, असें दिसतें.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **रामगिरि** हें नागपूर पासून २८ मैलांवरचें रामटेक होय. हें गाव वाकाटकांची पूर्वकालीन राजधानी नन्दिवर्धन या नगरापासून अवघें तीन मैल आहे. रामगिरीचा उल्लेख निर्वासित यक्षाचें निवासस्थान म्हणून कविकुलगुरु कालिदासानें मेघदूतांत केला आहे. त्या काव्यांतील वर्णनावरून रामगिरीवर भगवान् रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे असें दिसतें. प्रस्तुत ताम्रपटहि रामगिरिस्वामीच्या (म्हणजे भगवान् रामचंद्राच्या) पादुकांजवळच दिला होता. मेघदूतांतील रामगिरीचें व तेथून उत्तरेस जाणाऱ्या मार्गावरच्या स्थलांचें वर्णन रामटेकाच्या बाबतींत उत्तम प्रकारें जुळतें; शिवाय रामटेक हें कित्येक शतकांपासून आजपर्यंत पवित्र क्षेत्र म्हणून मानलें गेलें आहे. म्हणून तेंच प्राचीन रामगिरि होय यांत संशय नाही. प्रभावतीगुप्तेचीं तशींच द्वितीय प्रवरसेनाचीं कित्येक दानें प्रथम भगवंताच्या पादुकांना अर्पण करून नंतर ब्राह्मणांना दिलीं होती. हा भगवान् म्हणजे ज्याच्या पादुका रामगिरीवर स्थापल्या होता तो रामप्रभु होय. **अश्वत्थनगर** हें अमरावती जिल्ह्याच्या अचलपुर तहसिलींतील असतपुर असावें. ज्या **कौशिक** नामक 'मार्गां'त तें वसलें होतें त्याचा पत्ता मात्र लागत नाही.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ जित(तं) भगवता॥ रामगिरिस्वामिनःपादमूलाद्गु-
प्तान(ना)मादि-

२ राजो[2] महाराजश्रीघटोत्कचस्तस्य पुत्रो महाराजश्रीचन्द्र-

३ गुप्त[:*] तस्य पुत्रस्तत्पादपरिगृहि(ही)त(तो) लिच्छ-
विदौहित्रो

४ महादेव्या(व्यां) कुमारदेव्यामुत्पन्नो महाराजश्रीसमुद्र-
गुप्तस्तस्य पुत्र-

५ स्तत्पादानुद्ध्यातो न्यायागतानेकगोहिरण्यकोटिसहस्र-
प्रदस्सर्व्वराजो-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

६ च्छेत्ता पृथिव्यामप्रतिरथःपरमभागवतो महादेव्या-
(व्यां) दत्तदेव्यामु-

७ त्पनो(न्नो) महाराजाधिराजश्रीचन्द्रगुप्तस्तस्य दुहिता
धारणसगोत्रा

८ नागकुलोत्पन्नाया(यां) कुबेरा(र)नाग(गा)देव्यामुत्पन्ना
उभयकुलाल-

९ ङ्काभूता वाकाटकाना(नां) महाराजश्रीरुद्रसेनस्या-
ग्रमहिषी

---

१. बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नल्, पु. २० मध्ये पृ. ५८ व ६८ यांसमोरील ठशांवरून.

२. पुणें ताम्रपटांत 'गुप्तादिराजो' असें आहे.

१० वाकाटकानाम्महाराजश्रीदामोदरसेनप्रवरसेनजननी भग-
११ वत्पादानुद्ध्याता स(सा)ग्रवर्षशतजीवपुत्रपौत्रा श्र(श्री)-
महादेवी प्रभ(भा)वती[1]–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१२ गुप्ता ॥ कौशिकमार्ग (र्गे) अश्वत्थनगरे सब्रह(ब्राह्म)
णपुर(रो)गग्राममहत्तरा(रां)श्च
१३ कुशलमुक्त्वा सम(मा)ज्ञापयत(ति)[।*] ऐहिकामुत्रिक-
मस्मिन्नगरे स्वपुण्याप्या[यना]त्थे (त्थं)
१४ पराशरगोत्राणा(णां) तैत्तिरीयब्राह्मणानामप्यपुत्रापु-
त्राणां[2] अभ्य–
१५ न्तरनिवेशने[न*] सह कर्षकनिवेशनानि च[3] चत्वार(रि)
१६ भुक्ता(क्त)काभोगक्षेत्रमुदकपूर्व्व(र्व्वं) शासनेनो(न)
सति(नि)बद्धं(द्धम्) । उचितांश्चास्य[4]
१७ पूर्व्वराजानुमताञ्चातुर्व्विद्यग्राममर्य्यादान्वितरामस्तद्यथा[5]

---

१. ठशांवरून 'प्रभावती' मधील 'ती'चा इकार दीर्घ दिसते. श्री. गुप्ते 'प्रभावति' असें वाचतात.

२. 'ब्राह्मणानां सपुत्रापुत्राणां' असें वाचावें.

३. हा शब्द निरर्थक आहे.

४. 'उचितां चास्य' असें वाचावें.

५. 'मर्य्यादां वितराम–' असें वाचावें.

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१८ अकरदायी(यि) अभटच्छत्रप्रावेश्य(श्यं) अपुष्पक्षीर-
सन्दोह(हं) अचारा–

१९ सनचर्म्माङ्गार(रं) अलवणक्लिन्नक्रेणिखनक(कं) सर्व्व-
विष्टिपरिहारा(र)–

२० परिहृत(तं) सनिधानं सोपनिधानं सक्ल(क्लृ)-
प्तोपक्लि(क्लृ)प्तम(मा)चन्द्रा–

२१ दित्यकालीय(यं) पुत्रपौत्रानुगामि भुजन्ता(तां) न
केनचिद्व्याघात–

२२ ऽकर्त्तव्य: सर्व्वक्रियाभिस्संरक्षितव्यऽपरिवर्द्धयितव्यश्च
[।*] यश्च(श्चा)स्मा(स्म)–

२३ च्छासनमगणयमान[:*] स्वल्पामपि परिबाधा(धां)
कुर्य्यात्कारयि(ये)त वा तस्य

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२४ ब्राह्मण(णै)रावेदितस्य सदण्डनिग्रहं करिस्या(ष्या)-
म:[।*] अस्मि(स्मिं)श्च धर्म्मादर–

२५ करणे अनी(ती)तानेकराजदत्ता(त्त)सञ्चित(न्त)न-
परिपालनं पुण्यानुकीर्त्तन–

---

१. हें व यानंतरचीं विशेषणें नपुंसकलिंगीं एकवचनीं असावीं; कारण त्याचें विशेष्य ओ. १६ मधील 'भुक्तकाभोगक्षेत्रं' हें आहे.

२६ परिहारार्थं न कीर्त्तयामः [।*] सङकल्पाधि(भि)-
योगपराक्कमोपजि-

२७ तातान्वर्त्तमानामा(ना)ज्ञापयामः । व्यासगीतश्चात्र
श्लोकःप्रमाणं(णम् ।)

२८ स्वदत्ता(त्तां) परदत्तां वा यो हरेत वसुन्धराम् [।*]
गवां शतसहस्रस्य

२९ हन्तुःप्बिति दुष्कृतमिति[1] ।। वाकाटकाना(नां) महा-
राजश्रीप्रवर-

चौथा पत्रा

३० सेनस्य राज्यप्रशासतसव्वत्सरे[2] एकुनंविंशतिमे[3] ।। कार्त्तिक-
मा-

३१ सशुक्लपक्षद्वादश्या(श्याम् ।) दूतक(को) देवनन्द-
स्वामि(मी)[4][।*] ली(लि)खितं

३२ प्रभुसिङ्घेन[5] ।।

---

१. 'दुष्कृतम् ।। इति' असें वाचावें. वृत्त अनुष्टुभ्.

२. 'राज्यं प्रशासतः संवत्सरे' असें वाचावें.

३. 'एकोनविंशतितमे' असें वाचावें.

४. श्री. गुप्ते यांनी हें नांव 'देवन्दस्वामि' असें आपल्या दोन्ही लेखांत दिलें आहे, पण खरें वाचन वर दिल्याप्रमाणे आहे.

५. 'प्रभुसिंहेन' असें वाचावें.

९. द्वितीय प्रवरसेनाचा इंदूर ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट इंदूरचे कै. पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर यांचे संग्रहीं होता. तो कोठे सांपडला हें नमूद नाही, पण पं. इसलामपूरकरांच्या संग्रहीं असलेल्या इतर कांही ताम्रपटांप्रमाणे हाहि मूळचा इंदूरचा नसून संस्कृत हस्तलिखितें व प्राचीन वस्तु जमविण्याकरिता त्यांनी केलेल्या प्रवासांत कोठे तरी इतरत्र मिळाला असावा. त्यांनी तो डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांस दिला व त्यांच्याकडून श्री. सुशील बोस यांस प्रकाशनासाठी मिळाला. श्री. बोस यांनी तो एपिग्राफिया इंडिका, पु. २४, पृ. ५२ इ. मध्ये ठशांसहित प्रकाशित केला आहे. त्याच ठशांवरून येथे त्याचें वाचन केलें आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे तीन पत्रे असून त्यांची लांबी ७ इंच व रुंदी ३¾ इंच आहे. त्यांच्या कडा वांकविल्या नाहीत. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या बाजूच्या कडेपासून २ इंचांवर मध्यभागीं ५/१६ इंच व्यासाचें एक छिद्र कडीकरितां केलें आहे, पण कडी किंवा मुद्रा सांपडली नाही. अवशिष्ट लेखावरून असें दिसतें की या ताम्रपटाचे आरंभीं चार पत्रे असावे. त्यांपैकी पहिला पत्रा आता गहाळ झाला आहे. द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे तो पत्रा एकाच बाजूवर कोरला असावा. म्हणून प्रस्तुत लेखाच्या आरंभींच्या सुमारें सात ओळी आता नष्ट झाल्या आहेत. अवशिष्ट तीन पत्र्यांपैकी पहिल्या दोनवर दोन्ही बाजूने व शेवटच्यावर एका बाजूने कोरलें आहे. लेख चांगल्या स्थितींत आहे. त्याच्या अवशिष्ट भागाच्या एकूण चौतीस ओळी असून, त्यांपैकी दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर सहा आणि त्या व इतर पत्र्यांच्या कोरलेल्या बाजूवर प्रत्येकीं सात ओळी आहेत. पत्र्यांचें वजन नमूद केलें नाही.

लिपी—या लेखाची लिपी द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांतल्या प्रमाणे पेटिकाशीर्षक प्रकाराची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत. क्वचितच आढळणारा लृकार 'सक्लृप्तोपक्लृप्तः' (ओ. २३) मध्ये आला आहे; 'ग' व 'श' यांच्या डाव्या बाजूच्या रेषा खालच्या शेवटास आंत वळविल्या आहेत; 'पौत्रिणः' (ओ. ४) मध्ये 'ण' ला गाठ नाही. 'न' चें नागरी लिपींतील रूप 'रुद्रसेन'– (ओ. ६) मध्ये दिसतें; 'त' बहुधा ग्रंथिरहित आहे, पण क्वचित् त्याची 'न'-शीं अदलाबदल झाली आहे; उदाहरणार्थ 'सञ्चित्नन,' ओ. २८ पहा. शिवनी ताम्रपटांतल्या प्रमाणें 'ब' दोन प्रकारचा आहे.

भाषा—लेखाची भाषा संस्कृत असून शेवटच्या शापात्मक श्लोकाखेरीज सर्व भाग गद्यांत आहे. लेखनाचे विशेष येणेप्रमाणे-'र्' नंतर व 'य्' च्या पूर्वी व्यंजनाचें द्वित्व केलें आहे; 'परिदत्ताव्वा' (ओ. ३२) मधील 'व्' चे द्वित्व (न लिहिलेल्या) अनुस्वरामुळे असावें; 'ऋ' व 'रि' यांची कांही ठिकाणीं अदलाबदल झाली आहे.

विषय—प्रस्तुत दानपत्र वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेनाचें आहे. त्याची वंशावळ जांब ताम्रपटांतल्याप्रमाणेच दिली होती, पण तिचा आरंभींचा भाग—ज्यामध्ये प्रथम प्रवरसेन व भवनाग यांचें वर्णन होतें तो—पहिला पत्रा गहाळ झाल्यामुळे नष्ट झाला आहे. जेथून हा ताम्रपट देण्यांत आला त्या स्थलाचें नांवहि अर्थातच नष्ट झालें आहे. पण प्रस्तुत दान वैजयिक धर्मस्थानीं दिलें होतें त्यावरून हा ताम्रपट प्रवरपुर राजधानींतूनच दिला असावा. हा लेख निष्काळजीपणाने लिहिला आहे. कांही ठिकाणीं शब्द गाळले होते ते नंतर योग्य ठिकाणीं न लिहितां इतरत्र लिहिले आहेत. एका ठिकाणीं तर गावाच्या बद्दल ब्राह्मणाचेंच नांव लिहिलें आहे. या सर्व कारणांमुळे सर्व लेखाचा अर्थ लावणें कठीण झालें आहे. तथापि त्याचा उद्देश द्वितीय प्रवरसेनाचें एक भूदान नमूद करण्याचा होता असें दिसतें. लेखकाच्या निष्काळजीपणा-

मुळे या गांवाचें नांव लिहिलें गेलें नाही, तथापि त्याच्या चतुःसीमा दिल्या आहेत. तें गाव 'गोपुरक' नामक 'मार्गां'त असून आरामकाच्या उत्तरेस, कोविदारकाच्या पूर्वेस, कोशाम्रकाच्या दक्षिणेस आणि अंजनवाटकाच्या पश्चिमेस होतें. अकराव्या ओळींत प्रवरसेनाने हें दान स्वतःचें पुण्य, आयुष्य, बल व ऐश्वर्य यांच्या वृद्धीकरिता दिलें होतें असें म्हटलें आहे. पण विसावी ओळ व तेराव्या ओळींतले शेवटचे शब्द एकत्र वाचले असतां असें समजतें की त्या वाटकाचा अर्धा भाग चन्द्र नामक वाण्याने विकत घेऊन भगवंताच्या पादुकांजवळ ब्राह्मणांना दान दिला होता. या पादुका बहुधा रामगिरीवरील श्रीरामचंद्राच्याच असाव्या. सतराव्या व अठराव्या ओळींत हें ग्रामदान पूर्वी केल्यामुळे तें ताम्रपटांत नमूद केलें आहे, असें म्हटलें आहे. तरीहि हें दान आपण उदक सोडून देत आहों असें प्रवरसेन म्हणतो. या विविध उल्लेखांवरून असें दिसतें की चन्द्र नामक वाण्याने एका गावाचा अर्धा भाग विकत घेऊन कांही ब्राह्मणांस दान दिला आणि द्वितीय प्रवरसेनास त्याबद्दल ताम्रपट देण्याची विनंती केली. तेव्हा त्या राजाने राहिलेला अर्धा भाग स्वतःच्या पुण्यादिकांच्या वृद्धीकरिता त्याच ब्राह्मणांस दान देऊन सबंध गावाचा ताम्रपट दिला. हें दान खालील ब्राह्मणांस दिलें होतें—आरामक येथे राहणारा वाजिकौशिकगोत्री विशाखार्यांचा पुत्र गोंडार्य आणि त्याचे सहा पुत्र मनोरथार्य, गोवार्य, देवार्य, बप्पार्य, कुमारार्य आणि द्रोणार्य. या लेखाचा काळ (द्वितीय प्रवरसेनाच्या) तेविसाव्या शासनवर्षी वैशाख महिन्याच्या कृष्ण पक्षांतील पंचमी असा दिला आहे. या दानपत्राचा लेखक रज्जुक कोट्टदेव हा होता.

रज्जुक—या रज्जुक (किंवा राजुक) नामक अधिकाऱ्याचा प्रस्तुत ताम्रपटांतील उल्लेख महत्त्वाचा आहे. राजुक हा अशोकाच्या लेखांत प्रथम आढळतो. तो उच्च दर्जाचा अधिकारी असून त्याचा अंमल हजारों लोकांवर चालत असे. त्यांच्यावर निग्रहानुग्रह करण्याचा अधिकार त्याला असे. 'राजुक' हा शब्द संस्कृत 'रज्जु'पासून बनला अस-

त्यामुळे या अधिकाऱ्याचें मूळचें काम जमिनीचें मोजमाप करून सारा ठरविणें हें असावें. रज्जुकाचा उल्लेख चुटुकुलानंद सातकर्णि याच्या कोरीव लेखांत यतो. त्यानंतर मात्र हा अधिकारी क्वचितच आढळतो. प्रस्तुत ताम्रपटांतील त्याच्या उल्लेखावरून खिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या आरंभापर्यंत ही संज्ञा प्रचारांत होती असें दिसतें.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपट नक्की कोठे सापडला हें माहीत नसल्याने त्यांत उल्लेखिलेल्या गावांचा शोध करणें कठीण काम आहे; आणि त्यामुळेच त्यांतील एकाचाहि पत्ता अद्यापि लागला नव्हता. पुष्कळ प्रयत्नांनंतर कांही गावें बालाघाट जिल्ह्यांत प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या त्या त्या दिशांस मला सापडलीं. दान दिलेल्या गावाच्या उत्तरेचें **कोशम्ब** गांव द्वितीय प्रवरसेनाने तिरोडी ताम्रपटाने दान दिलेलें कोशम्बखंड असावें. तें तिरोडीच्या दक्षिणेस ६ मैलांवर कोसंब नांवाने अद्यापि विद्यमान आहे. पूर्वेचें **अंजनवाटक** हें कोसंबच्या आग्नेय दिशेस ५ मैलांवरचें अंजनवाडी असावें. पश्चिमेचें **कोविदारक** हें कदाचित् कोसंबाच्या नैऋत्येस ४ मैलांवरचें कुनारगाव असेल. हीं तीन गावें प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या दिशांस सापडत असल्यामुळे त्यांचा स्थलनिश्चय बरोबर असावा असें. वाटतें. **गेपुरक** आणि **आरामक** यांचा पत्ता मात्र जवळपास लागत नाही. तथापि वरील तीन गावांच्या शोधावरून प्रस्तुत ताम्रपट मूळचा मध्यप्रदेशाच्या बालाघाट जिल्ह्यांतील होता असें दिसतें.

वाचन[1]

ओळ

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१ द(दौ)हित्रस्य गौतमीपुत्रस्य पुत्रस्य वाकाटक(का)-
नाम्महार(रा)ज श्रीरुद्रसेनस्य सूनो[:*]

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २४, पृ. ५५ समोरील ठशांवरून.

२ अत्य[न्त]म (मा) हेश्वरस्य सत्यार्ज्जवकारुण्यशौर्य्यविक्र-
मनयविनयमाहात्म्य-

३ धि (धी) मत्व (त्त्व) पात्रगतभक्तित्वधर्म्मविजयित्वमनो-
नैर्म्मल्यादिगुणसमुदितस्य

४ वर्षशतमभ (भि) वर्द्धमानकोशदण्डसाधनसन्तानपुत्रपौ-
[त्रिण] [:*] युधिष्ठिर-

५ वृत्तेर्व्वाकाटकाना (नां) महाराजश्रीप्रि (पृ) थिविषेणस्य
सूनोः भगवतश्चक्रपाणे[:*]

६ प्रसादोपार्ज्जितश्रीसमुदयस्य वाकाटकाना(नां) महाराज-
श्रीरुद्रसेन-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

७ स्य सूनो[:*] महाराजाधिराजश्रि(श्री)देवगुप्तसुताया(यां)
प्रभावतिगुप्तायामुत्पन्न-

८ स्य वाकाटकानाम्महाराजश्रीप्रवरसेनस्य वचना[त्*]
गेपुरमार्ग्गे अस्म-

९ त्सन्तिका[1]स्सर्व्वाद्धयक्षनियोगनियुक्ताः आज्ञासंचारिकुल-
पुत्राधिकृता भटा-

१० [च्छा][2]त्राश्च व्युषितपूर्व्वमया[3]ज्ञयाज्ञापयितव्या[:।*] विदि-
तमस्तु वः

१. 'अस्मत्सन्तका-' असें वाचावें.

२. यांतील पहिलें व्यञ्जन पूर्णपणें खोदलें नाही.

३. 'विश्रुतपूर्व्वया' असें वाचावें.

११ यवा(थे)हास्माभिरात्मनो ध्धर्म्म(र्म्मा)युर्ब्ल(र्ब)ल-(लै)श्वर्य्यविवृद्धिय[1] इहामुत्रहितात्थं

१२ वैजयिके धर्म्मस्थाने आरामकस्य उत्तरपाश्र्वे कोबिदारिकाया(याः) पूर्व-

१३ पाश्र्वे मुल दतामिति[2]।

तिसरा पत्रा : पहिला बाजू

१४ कोशम्ब्रकस्य दक्षिणपाश्व(र्श्वे) अञ्जनव(वा)टकस्य अपरप(पा)र्श्वे विशाखार्य्यवाटक-

१५ स्य(वाटकं) अ(आ)रामकवास्तव्यवाजिकौशिकसगोत्र-विशाखार्यपुत्रगोण्डा-

१६ र्य्याय गोण्डार्य्यपुत्रसनोरथार्याय गोवार्य्याय देवार्य्याय

१७ बाप्पार्य्याय च कुमारार्य्याय द्रोणार्य्याय च पूर्व्वदत्ता इति कृत्वा

१८ यतोस्म(स्मा)भि[:*] शासननिबन्धऽकृत: अपूर्व्वदत्ता-(त्या) उदकपूर्व्वमतिसृष्ट: [।*]

१९ उचिता(तां)श्चास्य पूर्व्वराजानुमता(तान्) चातुर्व्व-(र्व्वै)द्यग्राममर्य्यादास्परिहा[3] वित-

---

१. 'विवृद्धयै' असें वाचावें.

२. 'मु(मू)ल(ले) दता(त्त)मिति' या शब्दांचा संबंध तिसाऱ्या ओळींतील 'भगवत्पाद-' याच्याशीं आहे.

३. 'ग्राममर्य्यादापरिहारान्' असें वाचावें.

२० राम:[:*] अत्र वाटा(ट)कार्द्ध(र्द्धं) वाणिजकचंद्रेण [क्र]यक्रीतं ब्राह्म[णे*]भ्यो भगवत्पाद[1]–

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२१ तद्यथा अकरदायी अभटच्छात्रप्रावेश्य[:*] अपारंपरतो-(गो)बलिवर्द्द[:*]

२२ अपुष्पक्षि(क्षी)रसन्दोहः अचार(रा)सनचमा(र्म्मा)-ङ्गार[:*] अलवणक्लित्व(न्न)केणिखनक[:*]

२३ सर्व्वविष्टिपरिहारपरिह्लि(हृ)तः सतिधिः[2] सोपतिथिः अक्लृप्तोपक्लृप्तः

२४ आचन्द्रादित्यकालीयः पुत्रपौत्रानुगामी भुञ्जता(तां) न केनचि[द्]

२५ व्याघात(तः) न[3] कर्त्तव्यस्सर्व्वक्र(क्रि)याभि[:*] स(सं)-रक्षितव्यःपरिवर्द्धयितव्यश्च [।*] यश्चा–

२६ स्मच्छासनमगनि(ण)यमाना(नः) स्वल्पामपि परिबा-धात्कुर्यात्कारयिन[4] वा

२७ तस्य ब्राह्मणैर्व्वेवि(दि)तस्य सदण्डनिग्रहं कुर्य्यामिः[5][।] अस्मिश्चं[6] धर्म्मं(र्म्मा)धि–

---

१. यापुढील शब्द 'मूले दत्तमिति' अशुद्ध रूपाने तेराव्या ओळीच्या शेवटीं आले आहेत.

२. 'सनिधिः सोपनिधिः' असें वाचावें.

३. हा शब्द येथे निरर्थक आहे.

४. 'परिबाधां कुर्य्यात्कारयेद्वा' असें वाचावें.

५. 'कुर्य्यामि' असें वाचावें.

६. 'अस्मिश्च' असें वाचावें.

चौथा पत्रा

२८ करणे[1] अतीतानेकराजदत्ता(त्त)सञ्चित्त(न्त)नपरि-
पालन(नं) कृतपुण्यानुकि(की)-

२९ र्त्तनपरिहारार्त्थं(र्थं)न कीर्त्तयामः[।*]संकल्पाभिद्योध[2]-
पराक्रम(मो)पजा(जि)तान्वत्थ(र्त्त)-

३० घाता(माना)नाज्ञापयामः[।*] एष्यत्कालप्रभव(वि)[ष्णा]-
(ष्णु)गौरवाद्भविषाद्विज्ञा[3]-

३१ पयामः[।*] व्यासगीतश्चात्र श्लोकःप्रमाणीकर्त्तव्यः।
स्वदत्ता(त्तां)

३२ परदत्ता(त्तां)व्वा[4] यो हरेत वसुन्धरा(राम्।) गवा(वां)
शतसहस्रस्य हन्तु[5]-

३३ ःपिबति दुष्कृत(तम्।।) संवत्सरे त्रयोविंशे वैशाख-
बहुलपञ्चम्यां

३४ आज्ञा स्वयं(यम्)[।।*] रजुककोट्टदेवेन लिखितम्[।*]

---

१. वाकाटकांच्या इतर ताम्रपटांत 'धर्मादरकरणे' असा पाठ आहे. तसें वाचावें.

२. 'संकल्पाभियोग-' असें वाचावें.

३. 'भविष्यान्विज्ञापयामः' असें वाचावें.

४. 'परिदत्तां वा' असें वाचावें.

५. वृत्त-अनुष्टुभ्.

१०. द्वितीय प्रवरसेनाचा दुदिया ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट छिंदवाडा जिल्ह्यांतील दुदिया गावीं कोणा गोंडांच्या संग्रहीं होता. तो डॉ. कीलहॉर्न यांनी एपिग्राफिया इंडिका, पु. ३, पृ. २५८ इ० मध्ये ठशांसहित प्रकाशित केला आहे. त्याच ठशांवरून येथे त्याचें वाचन केलें आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून, त्यांची लांबी ७ १/२ इंच आणि रुंदी ३ ५/८ इंच आहे. पहिल्या पत्र्याच्या एका बाजूवर आणि दुसऱ्या व तिसऱ्या पत्र्यांच्या दोन्ही बाजूंवर कोरलें आहे. चौथ्या पत्र्यावर मुळीच कोरलें नसून तिसऱ्या पत्र्यावरील अक्षरें शाबूत राहावीं म्हणून तो जोडला आहे. या पत्र्यांच्या कडा वाकविल्या नाहीत, तथापि त्यांवरील लेख उत्तम स्थितींत आहे. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या बाजूपासून १ १/४ इंचावर मध्यभागीं कडीकरितां ७/१६ इंच व्यासाचें छिद्र आहे. कडीची जाडी १/४ ते ३/८ इंच असून तिचा व्यास ३ ७/८ इंच आहे. तिच्यावर फिरणाऱ्या दुसऱ्या चपट्या कडीला जोडलेल्या ३ १/१६ इंच व्यासाच्या वर्तुलाकर मुद्रेवर चार ओळींचा लेख आहे. चार पत्र्यांचें वजन ३ ३/४ रत्तल आणि कड्या व मुद्रा यांचें वजन अर्धा रत्तल आहे.

लिपी—प्रस्तुत लेखाची लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून ती इंदूर ताम्रपटांतल्या सारखीच आहे. 'त' प्रमाणे 'न' व 'ब' दोन प्रकारचे आहेत; मुद्रेवर 'ल' अक्षराच्या उजव्या बाजूच्या रेषेने त्या अक्षराला कडें घातलें आहे; जिह्वामूलीयाचें चिन्ह लेखाच्या २२ व्या ओळींत आणि उपध्मानीयाचें सोळाव्या ओळींत तसेंच मुद्रेवरच्या तिसऱ्या ओळींत आलें आहे. विरामचिन्ह एक किंवा दोन आडव्या अथवा उभ्या रेषांनी दर्शविलें आहे.

भाषा—लेखाची भाषा संस्कृत असून शेवटचा शापात्मक श्लोक आणि मुद्रेवरचा श्लोक यांव्यतिरिक्त सर्व भाग गद्यांत आहे. इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच 'र्' च्या पूर्वी व नंतर, 'य्' च्या पूर्वी व अनुस्वाराच्या नंतर येणाऱ्या व्यंजनाचें कांही ठिकाणीं द्वित्व झालें आहे.

विषय—प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने होतो. हा ताम्रपट वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेनाने प्रवरपुराहून दिला असून यामध्ये त्याची वंशावळ जांब ताम्रपटांतल्याप्रमाणेच दिली आहे. या लेखाचा उद्देश द्वितीय प्रवरसेनाने चंद्रपुरसंगमिकेमधील दर्भमलक गावांतील पंचवीस निवर्तनें जमीन कौशिकगोत्री यक्षार्य ब्राह्मणास आणि हिरण्यपुरभोगाच्या कर्मकार गावांतील साठ निवर्तनें जमीन कौडिन्यगोत्री कालिशर्मा नामक ब्राह्मणास दान दिली हें नमूद करणें हा होता. प्रस्तुत ताम्रपटांतील राजाज्ञा आरम्भि राज्यांतील कुलपुत्र (अधिकारी), भट व छात्र यांना उद्देशून काढली आहे. तेव्हा उपरिनिर्दिष्ट दोन्ही गाव त्या 'राज्यां'त अन्तर्भूत होत होते असें दिसतें. या लेखाच्या काळीं नमिदास हा सेनापतिपदावर होता व त्याचा लेखक गोलदास होता.

प्रस्तुत लेखाची मिति द्वितीय प्रवरसेनाच्या तेविसाव्या शासनवर्षांतील वर्षाऋतूच्या चौथ्या पक्षांतील दहावा दिवस अशी दिली आहे. ही मिति पडताळून पाहतां येत नाही, पण विवक्षित तिथि भाद्रपद शुक्ल दशमी असावी असें वाटतें. वाकाटक लेखांत दोनच मित्या ऋतु, पक्ष व दिवस या रीतीने सांगितल्या आहेत. यांपैकी ही एक आहे. इतर सर्व लेखांतील कालनिर्देश चांद्रमास, पक्ष व तिथि यांनी केला आहे.

स्थलनिश्चय—प्रस्तुत लेखांतील स्थलनामांचा निश्चितपणें शोध लागला नाही. **चन्द्रपुर** हें सिवनीच्या दक्षिणेस आणि वैनगंगेच्या पश्चिमेस असलेलें चांदपुर असावें असें डॉ. कीलहॉर्नने म्हटलें आहे, पण त्याला इतर गावांचा पत्ता लावतां आला नाही. रायबहादूर

हीरालाल यांच्या मतें **आरम्मि** हें वर्धा जिल्ह्यांतील आर्वी, आणि **चन्द्रपुरसंगमिका** हें चांदूर असावें; कारण चांदूरजवळ चंद्रभागा आणि सरस्वती या नद्यांचा संगम होतो. हिरण्यपुर हें चांदूर जवळचें सोनेगांव, आणि कर्मकार हें त्याच्याजवळचें कलमगांव असावें असें त्यांनी म्हटलें आहे. पण हा स्थलनिश्चयहि सर्वस्वीं समाधानकारक वाटत नाही. **हिरण्यपुर** हें बहुधा हिरण्या नदीवर वसलें असावें. या नदीच्या उल्लेख वडगांव ताम्रपटांत आला आहे. इतरत्र दाखविल्याप्रमाणें हिरण्या ही सध्याची इरई नदी होय. **चंद्रपुर** हें चांदा जिल्ह्याचें मुख्य शहर चांदा हें असावें. त्याचें चंद्रपुर हें नांव अद्यापि प्रचलित आहे. चांद्याजवळ इरई व झरपट या नद्यांचा संगम होतो, बहुधा या दोन नद्यांनी होणाऱ्या भूकोनांतच चांदा शहर वसलें आहे. तेव्हा त्याला चंद्रपुरसंगमिका हें नांव उत्कृष्ट रीतीने जुळतें. इतर गांवें मात्र चांद्याच्या जवळपास सापडत नाहींत.

वाचन[1].

ओळ

पहिला पत्रा

१ दृष्टम् [।*]प्रवरपु[रा]त्[2] अग्निष्टोम(मा)प्तोर्य्यामोक्थ्य-
षोडश्यतिरा[3]त्रवाजपेयबृहस्पति-

२ सवसाद्यस्कचतुरश्वमेधयाजिन: विष्णुवृद्धसगोत्रस्य
सम्राट:(ज:) वाकाटकानाम्म-

१. एपिग्राफिया इंडिका, पु. ३, मधील पृष्ठ २६० व २६१ यां- समोरील ठशांवरून.

२. येथे आणि पुढेहि कित्येक ठिकाणीं सन्धि केले नाहीत.

३. प्रथम '-तिरोत्र-' असें कोरलें होतें,पण मागाहून '-तिरात्र-' असें दुरुस्त केलें.

३ हाराजश्रि(श्री)प्रवरसेनस्य सूनोः सूनोः अत्यन्त स्वामि-
महाभैरवभक्तस्य अंसभारस-

४ न्निवेशितशि[व*]लिङ्गोद्वहनशिवसुपरितुष्टसमुत्पादित-
राजवंशानाम्पराक्र-

५ माधिगतभागि(गी)रत्थ्यमलजलमूर्द्धाभिषिक्तानान्दशा-
श्वमेधावभृत(थ)स्नातानाम्भा-

६ रशिवानाम्महाराजश्रि(श्री)भवनागदौहित्रस्य गौतमि-
पुत्रस्य पुत्रस्य वाकाट-

७ कानाम्मह(हा)राजश्रीरुद्रसेनस्य सूनोः अत्यन्तमाहेश्व-
रस्य सत्यार्ज्जवकारुण्य-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

८ शौर्य्यविक्क्रमनयविनयमाहात्म्यधि(धी)मत्व(त्व)-
पात्रगतभक्तित्वधर्म्मविजयित्वमनोनैर्म्मल्य(ल्या)दिगु-[४]

९ णै[:*] समुदितस्य वर्षशतमभी(भि)वर्द्धमानकोशदण्ड-
साधनसन्तानपुत्रपौत्रिणः युधिष्ठिरवृत्तेर्व्वा-

१० काटकान(ना)म्महाराजश्रीपृथिविषेन(ण)स्य सूनोः
भगवतश्चक्क्रपाणे[:*] प्रसादोपाज्जि(र्ज्जि)तश्रीसमुद-

११ यस्य वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)रुद्रसेनस्य सूनोः
महाराजाधिराजदेवगुप्त-

१२ सुताया:(यां) प्रभावतिगुप्तायामुत्पन्नस्य वा[का]टकाना-
म्मह(हा)राजश्रीप्रवरसेनस्य

---

४. येथे ‘पात्रागतभक्तित्व’ वाचावें असें कीलहॉर्नने म्हटलें आहे. पण तें बरोबर नाही.

१३ वा(व)चनात् आरम्भिराज्ये अस्मत्सन्तकास्स[र्व्वा]-
ध्यक्षनियोगनियुक्ता: आज्ञासञ्चारिकुल-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१४ पुत्र(त्रा)धिकृता: भटाश्छात्र(त्रा)श्च व्युषतपूर्व्वया-
ज्ञयाज्ञापयितव्या:[।*] विदितमस्तु व(वः) यथेहास्माभि-
१५ रात्मनो धर्म्मायुर्ब्बलमैश्वर्य्यविवृद्धये इहामुत्रहितार्थ-
मात्मानुग्रहाय वैजयैके धर्म्मस्थाले चन्द्रपुर-
१६ सङ्गमिकाया: दर्भमलके भूमे[च]:पञ्चविशां कौशिक-
सगोत्र(त्रा)य यक्षार्य्याय हिरण्यपुरभोगे
१७ कर्म्मकारग्रामे भूमे[:*] षष्टि[:*] कौण्डिण्य(न्य)सगोत्राय
कालिशर्म्मायँ अपूर्व्वदत्या(त्त्या) उदकपु(पू)र्व्वं-
१८ मतिसृष्टः[।*] उचितारचास्य पुर्व्वराजानुमतां चातुर्व्वै-
द्यग्रामसयय(र्य्या)दांपरिहारार्त्थन्वितरामस्त-

---

१. 'विश्रुतपूर्व्वयाज्ञया' असें वाचावें.
२. 'बलैश्वर्य्य-' असें वाचावें.
३. 'वैजयिके' असें वाचावें.
४. '-संगमिकायां' असें वाचावें.
५. हें अक्षर निरर्थक आहे.
६. 'भूमेः पञ्चविंशतिः' असें वाचावें.
७. 'कालिशर्म्मणे' असें वाचावें.
८. '-मतिसृष्टा' असें वाचावें.
९. 'उचितां चास्याः' असें वाचावें.
१०. 'ग्राममर्य्यादां वितराम:' किंवा 'ग्रामपरिहारान्वितरामः' असें वाचावें. लेख क्रमांक २, ओ. १६ व क्रमांक ३, ओ. २५ पाहा.
११. 'म' नंतरचा विसर्ग खोडला आहे.

१९ त[1]द्यथा अकरदायिन्यौ[2] अभटच्छत्रप्रावेश्य[3] अपारम्परगो-
बलीवर्द्द[4] अपुष्पक्षि (क्षी) र–

तिसरा पत्रा : पहिली बाजू

२० सन्दोहौ[5] अचा (चा) रासनचर्म्माङ्गारौ । अलवणक्लिन्न-
क्रेणिखनकौ सर्व्ववे (वि) ष्टिपरिहारपरी (रि) हृतौ
२१ सनिधिस्सोपनि[धी][6] । सक्लि (क्लृ) प्तोपक्लि (क्लृ) प्तौ ।
आचन्द्रादित्यकालीयौ पुत्रपौत्रानुगामी(मिनौ) भुञ्जता-
(तां) न केनचि–
२२ व्या (द्व्या) घातऽकर्त्तव्यः सर्व्वक्रियाभिस्संरक्षितव्यः
परिवर्द्धयितव्यश्च[7][।*] यश्चास्मच्छासना(न)मगन(ण)य-
२३ मानः (नः) स्वल्पा (ल्पा) मपि परिबाधां[8] कुर्य्यात्कारयित
वा[9] तस्य ब्राह्मणैर्व्वेदितस्य सदण्ड–

---

१. हें अक्षर निरर्थक आहे,

२. 'अकरदायिनौ' असें वाचावें. विसाव्या ओळींतील '–चर्म्माङ्गारौ' इत्यादि विशेषणें पहा. हीं विशेषणें 'भूमिखण्डौ' या सारख्या अध्याहृत विशेष्याला उद्देशून योजिलेलीं दिसतात.

३. 'अभटच्छत्रप्रावेश्यौ' असें वाचावें.

४. '–बलीवर्द्दौ' असें वाचावें.

५. '-क्षीरसन्दोहौ' असें वाचावें.

६. 'सनिधिसोपनिधी' असें वाचावें.

७. 'संरक्षितव्यौ परिवर्द्धयितव्यौ च' असें वाचावें.

८. हा अनुस्वार पुढील अक्षरावर कोरला आहे.

९. 'कारयेद्वा' असें वाचावें.

२४ निग्रहङ्कुर्य्याम:(म।)अस्मी(स्मि)श्च धर्म्मादरकरणे
अतीतानेकराजदत्तां[1] सञ्चिन्तनपरिपालन(नं)
२५ कृतपुण्यानुकीर्त्तनपरिहारार्त्थन्न कीर्त्तयाम:[।*] सङ्कल्पा-
भिद्योध(योग)पराक्क्रमोपजात(जिता)न्वर्त्तमाना-

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२६ नाज्ञापयाम:[।*] एष्यतत्काल[2]प्रभविष्णुगौरवां(वा)द्भवि-
ष्यान्विज्ञापयाम:[।*] व्यासगीतश्चात्र श्लोक: ।[3]
२७ प्रम्नाणीकर्तव्य: । स्वदत्ताम्परद[त्तां]व्वा यो हरेत वसु-
न्धरान्(म्)[।*] गवा(वां) शतसहस्रस्य हन्तु(र्न्तु)र्ह-
२८ रति दुष्कृतम्[।।*][4] संव्वत्सरे त्रयोविंशतिमे[5] वर्ष(र्षा)-
पक्षे चतुर्त्थे दिवसे दशमे सेनापतौ ।[3]
२९ नमिदासे ।[3] लिखितं गोलदासेन ।।

मुद्रा

१ वाकाटकललामस्य ।[3]
२ वक्रमप्राप्यनृपश्रियम्[6] [।*]
३ राज्ञःप्रवरसेनस्य
४ शासनं रिपुशासनम् [।।]

---

१. 'राजदत्तसञ्चिन्तन–' असें वाचावें.
२. 'एष्यत्काल–' असें वाचावें.
३. हें विरामचिह्न निरर्थक आहे.
४. 'वृत्त–अनुष्टुभ्.
५. 'संवत्सरे त्रयोविंशतितमे' असें वाचावें.
६. '–प्राप्तनृपश्रिय:' असें वाचावें.

११. द्वितीय प्रवरसेनाचा तिरोडी ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट मध्यप्रदेशाच्या बालाघाट जिल्ह्यांतील कटंगी गावाच्या आग्नेयेस ८ मैलांवर असलेल्या तिरोडी गावीं मँगेनीज खाणींजवळ सापडला. त्या खाणींचे व्यवस्थापक श्री. टी. ए. वेल्स्टेड यांनी तो माझ्याकडे प्रकाशनार्थ पाठविला. मी तो एपिग्राफिया इंडिका, पु. २१, पृ. १६७ इ. मध्ये इंग्रजी भाषांतर व ठसे यांसह प्रसिद्ध केला. त्याच ठशांवरून तो येथे संपादिला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून प्रत्येकाची लांबी ७·७ इंच व रुंदी ३·८ इंच आहे. पहिल्या व चौथ्या पत्र्याच्या एका बाजूवर आणि इतर पत्र्यांच्या दोन्ही बाजूंवर कोरलें आहे. त्यांच्या कडा वाकविल्या नाहीत, तरीहि त्यांवरील लेख उत्तम स्थितींत आहे. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या कडेपासून २·१ इंच अंतरावर मध्यभागीं कडीकरिता ·४ इंच व्यासाचें एक छिद्र आहे. या कडीचा व्यास ३·३ इंच असून तिला सिवनी ताम्रपटाच्या मुद्रेप्रमाणे २·७ इंच व्यासाची तांब्याची चपटी वर्तुलाकार मुद्रा जोडली आहे. तिच्यावर चार ओळींचा लेख आहे. सर्व पत्र्यांचें वजन १२६ तोळे, आणि कड्या व मुद्रा यांचें वजन १८½ तोळे आहे. पहिल्या दोन पत्र्यांच्या कोरलेल्या बाजूवर सहा, तिसऱ्याच्या प्रत्येक बाजूवर पांच, आणि चौथ्याच्या कोरलेल्या बाजूवर चार ओळी आहेत.

लिपी—प्रस्तुत लेखाची लिपी द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—(दीर्घ) ईकार परस्परविरुद्ध जाणाऱ्या वक्र रेषांनी, किंवा (ऱ्हस्व) इकाराच्या वेलांटींत लहान वेलांटी काढून दाखविला आहे; व्यंजनयुक्त ओकार अक्षराच्या डोक्यावर दोन बाजूस दोन मात्रा

देऊन किंवा फक्त उजव्या बाजूस वक्र रेषेने दाखविला आहे; 'ड' आणि 'द' परस्परभिन्न दाखविले नाहीत. 'ब' हा इतर वाकाटक ताम्रपटांतल्याप्रमाणे दोन प्रकारचा आहे. विसर्गाचा उपयोग अनेक ठिकाणीं विराम चिह्न म्हणून केला आहे.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून मुद्रेवरचा श्लोक आणि शेवटचा शापात्मक श्लोक यांव्यतिरिक्त सर्व भाग गद्यांत आहे. लेखनाचे विशेष येणेंप्रमाणे—'र्' व अनुस्वार यानंतर आणि 'य्' च्या पूर्वी व्यंजनाचें द्वित्व केलें आहे; 'ऋ' बद्दल 'रि,' आणि 'ऌ'बद्दल 'लि' लिहिला आहे; क्वचित् 'रि'बद्दल 'ऋ' लिहिलेला आढळतो; 'सर्व्वक्रुयाभिः' (ओ. २४) पाहा. कांही ठिकाणीं शेवटचें व्यंजन गाळलें आहे; उदाहरणार्थ 'नरत्तङ्गवारिस्थाना' (ओ. १) पाहा.

विषय—हा ताम्रपट वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेन याने नरतङ्गवारिस्थानाहून दिला होता. यांत त्याची वंशावळ त्याच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच दिली आहे. प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने होतो. त्यामध्ये द्वितीय प्रवरसेनाने चान्द्रपुर येथे राहणाऱ्या त्रिवेदपारंगत अथर्ववेदी हर्करिगोत्री वरुणार्य नामक ब्राह्मणास कोशंबखंड गाव दान दिल्याचें नमूद केलें आहे. दान दिलेल्या गावाच्या पूर्वेस जमली, दक्षिणेस वर्धमानक, पश्चिमेस मृगसिम आणि उत्तरेस मल्लकपेधक हीं गावें होतीं. प्रस्तुत लेखांतील राजाज्ञा बेन्नाकटाच्या अपरपट्टांतील (पश्चिम विभागांतील) अधिकारी, भट व छात्र (पोलीस शिपाई) यांना उद्देशून असल्यामुळे दान दिलेलें गाव या विभागांत होतें असें दिसतें. प्रस्तुत दानपत्र स्वतः द्वितीय प्रवरसेनाच्या आज्ञेवरून राज्याधिकृत चमिदासाने लिहिलें असें शेवटीं म्हटलें आहे.

तिथीचें महत्त्व—प्रस्तुत दानपत्राचा काळ द्वितीय प्रवरसेनाच्या तेविसाव्या शासनवर्षी माघ कृष्ण द्वादशी असा दिला आहे. या प्रवरसेनाचे बरेचसे ताम्रपट राजधानीहून दिले होते, पण प्रस्तुत

ताम्रपट नरत्तङ्गवारिस्थानाहून दिला आहे. हें तीर्थस्थान असावें. माघ महिना फार पवित्र असून त्या महिन्यांत एखाद्या तीर्थक्षेत्रीं स्नान केल्यास विशेष पुण्य मिळतें असें पुराणांत म्हटलें आहे. पूर्णिमान्त माघाच्या कृष्णपक्षांतील एकादशीला ‘षट्तिला एकादशी’ म्हणतात. या दिवशींच्या उपोषणाचें माहात्म्य पद्मपुराणांत वर्णिलें आहे. तेव्हा द्वितीय प्रवरसेन या षट्तिला एकादशीस स्नान करण्यास नरत्तङ्ग-वारिस्थानाला गेला असावा. त्या दिवशीं उपोषण करून दुसऱ्या दिवशीं पारण्याच्या वेळीं त्याने प्रस्तुत ताम्रपट दिला असावा. हें दान त्याने स्वतःचें पुण्य, आयुष्य, बल आणि ऐश्वर्य यांच्या वृद्धीकरिता तसेंच ऐहिक व पारलौकिक कल्याणाकरिता आणि मातेच्या पुण्योपार्जनाकरिता दिलें होतें. यामध्ये प्रवरसेनाने आपल्या दिवंगत पित्याचा उल्लेख न करतां केवळ मातेचा केला आहे, त्यावरून प्रभावतीगुप्ता त्या वेळीं जिवंत होती असें दिसतें. कदाचित् ती त्याच्याबरोबर नरत्तंग-वारि तीर्थांसहि गेली असेल. चार वर्षांपूर्वींच तिने आपला ऋद्धपुर ताम्रपट दिला होता. असो.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थानांपैकी **नरत्तङ्गवारि** हें तीर्थ असावें हें मागे सांगितलेंच आहे. देवळी ताम्रपटांत उल्लेखिलेल्या नागपुर-नन्दिवर्धनासारखें हें जोडनांव दिसतें. त्याचा अर्थ ‘नरत्तंगाजवळचें वारि’ असा असावा. हें **वारि** अकोला जिल्ह्याच्या आकोट तहसिलींतील वाण नदीवरील सध्या उजाड झालेलें वारि गाव असावें. याला भैरवगड असेंहि म्हणतात व हें अद्यापि पुण्यक्षेत्र म्हणून गणलें जातें. नरतङ्ग हें ‘वारि’ गावापासून पश्चिमेस अठरा मैलांवरचें नरनाळा असावें. तेथे एक जुना किल्ला आहे. **कोसंबखंड** हें तिरोडीच्या ईशान्येस ६ मैलांवरचें कोसंब गाव असावें. ज्या **बेन्नाकट** नामक विभागांत तें अन्तर्भूत होत होतें त्याचें मुख्य नगर बेन्ना कोसंबाच्या पूर्वेस ३५ मैलांवरच्या बेणी नामक गावाच्या रूपाने अद्यापि विद्यमान आहे. या बेन्नाकटाचे बेण्णा (वेणा) किंवा

वनगंगा नदीने पूर्व आणि अपर (पश्चिम) असे दोन पट्ट (विभाग) केले होते. कोसंब्र गाव (प्राचीन कोसंबखंड) वैनगंगेच्या पश्चिम तीरापासून केवळ वीस मैलांवर आहे. तेव्हा तें बेन्नाकटाच्या अपरपट्टांत (पश्चिम विभागांत) अन्तर्भूत होत होतें यांत संशय नाही. कोसंब्रखण्डाच्या चतुःसीमेच्या गावांपैकी एकाचा—**जमली** गावाचा—पत्ता लागतो. तें कोसंबच्या पूर्वेस तीन मैलांवरचें जामुनतोला असावें. ज्याला दान दिलें होतें त्या ब्राह्मणाचें निवासस्थान **चांद्रपुर** हें कोसम्बच्या आग्नेय दिशेस वीस मैलांवरचें चांदपुर असावें. इतर गावांचा मात्र पत्ता लागत नाही.

वाचन[1]

पहिला पत्रा

ओळ

१ द्रि(दृ)ष्टम् [।*] नरत्तङ्गवारिस्थाना[त्*] । अग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्य[ति]रात्रवाजपेयबृहस्पतिस–

२ वसाद्यस्क्रचतुरश्वमेधयाजिनः[2] विष्नु(ष्णु)वृद्धसगोत्रस्य सम्राट(जो) वाकाटकानाम्महाराजश्री–

३ प्रवरसेनस्य सूनोः सूनोरत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य[3] ।[4] अंसभारसन्निवेशि–

४ तशिवलिङ्गोद्वहनशिवसुपरितुष्टसमुत्पादितराजवंशानां पराक्रमाधिगतभागी–

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २२, मधील पृ. १७२–१७३ समोरील ठशांवरून.

२. येथे व इतरत्रहि अनेक ठिकाणीं सन्धि केले नाहीत.

३. ‘न्त’ अक्षरावरची पेटिका पूर्णपणें कोरली नाही.

४. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

५ रत्थ्या(त्थ्य)मलजलमूर्द्ध्ना(र्द्धा)भिषिक्तानाम्महाराज[1]-
श्रीभवनागदौहित्रस्य गौतमी-

६ पुत्रस्य पुत्रस्य वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)रुद्रसेनस्य
सु(सू)नोः

दुसरा पत्रा : पहिली बाजू

७ अत्यन्तमाहेश्वरस्य सत्या[र्ज्ज]वकारुन्य(ण्य)शौर्य्यविक्र-
मनयविनयमाहात्म्यधि(धी)मत्व(त्त्व)-

८ गतभक्तित्वधर्म्मविजयित्वमनोनैर्म्म(र्म्म)ल्यादिगुणै[:*][2]
समुदितस्य वर्षशतमभिवर्द्धमा-

९ नकोशदण्डसाधनसन्तानपुत्रपौत्रिणः युधिष्ठिरवृत्तेर्व्वा-
काटकानां(ना)म्महा-

१० राजश्रीपृथिविसेनस्य[3] सूनो[:*] भगवतश्चक्रपाणेःप्रसा-
दोपार्जितश्रीसमुदयस्य

११ वाकाटकानाम्महाराजश्रीरुद्रसेनस्य सूनोः महाराजाधि-
राजश्रीदेवगुप्त-

१२ सुतायां(या)म्प्रभावतिगुप्तायामुत्पन्नस्य ।[4] वाकाटकाना-
म्महा-

---

१. यासारख्या इतर ताम्रपटांत येणारें ' दशाश्वमेधावभृथस्नातानां ' हें विशेषण येथे गाळलें आहे.

२. ' पात्रगतभक्तित्व ' वाचावें.

३. ' पृथिवीषेणस्य ' वाचावें.

४. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१३ राजश्रि(श्री)प्रवरसेनस्य वचना[त्*]। वेन्नाकटस्य अपर-
पट्टे ॥[1] अस्मत्सन्तकास्सर्व्वाद्ध्यक्षनियोग-
१४ नियुक्ता आज्ञासंचारिकुलपुत्राधिकृताः भटाच्छात्राश्च[2]
व्युषितपूर्व्वमयाज्ञायाज्ञापयितव्याः[3] [।*]
१५ विदितमस्तु वः यथेहास्माभिरात्मनो धर्म्मायुर्ब्बलसै-
श्वर्य्यविवृद्धये[4] इहामुत्रहि-
१६ तार्थं मातुः[पु]ण्योपचयार्त्थं जमल्या अपरपार्श्वे वर्द्ध-
मानकस्य उत्तरपार्श्वे
१७ मृगसिमस्य पूर्व्वपार्श्वे मल्लकपेधकस्य दक्षिणपार्श्वे
कोशम्बखण्डं नाम ग्रामः
१८ चाद्र (चांद्र) पुरवस्तव्यअथेर्व्वाण[5]हर्क्करिसगोत्रवरुणा-[6]
र्य्याय त्रिवेदाय दत्तः[7]

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१९ अपूर्व्वदत्या[8] उदकपूर्व्वमतिसृष्टः[।*] उचितांश्चास्य पूर्व-
राजानुमताचा (तांश्चा) तुर्वैद्यग्रामम-

---

१. हें विरामचिह्न निरर्थक आहे.
२. 'भटाश्छात्राश्च' असें वाचावें.
३. 'विश्रुतपूर्वयाज्ञया-' असें वाचावें.
४. '-ब्बलैश्वर्य्य-' असें वाचावें.
५. 'वास्तव्याथर्व्वण-' असें वाचावें.
६. 'गोत्रप्रवरनिबन्धकदम्बां'त या गोत्राचें नांव 'हार्करि' असें दिलें आहे.
७. हा शब्द निरर्थक आहे.
८. 'अपूर्व्वदत्त्या' असें वाचावें.

२० र्य्यादापरिहारान्वितराम: स्तद्यथा[1] अकरदायि:(यी) अभटच्छ(च्छा)त्रप्रावेश्य: अपारंपरगो–

२१ बलिवर्द्द[:*] अपुष्पक्षि(क्षी)रसन्दोह: अचारासनचर्म्मा-ङ्गार: अलवन(ण)क्लिण्ण(न्न)क्रे–

२२ णिखनक: सर्व्वविष्टिपरिहारपरिहृत: सनिधि: सोप-निधि[:*] सक्लि(क्लृ)प्तो–

२३ पक्लि(क्लृ)प्त: आचन्द्रादित्यकालीय: पुत्रपौत्रानुगामी भुञ्जतो न केनचिव्व्याघात[2]

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२४ कर्त्तव्य: सर्व्वक्र(क्रि)याभिस्संरक्षितव्य:परिवर्द्धयित-व्यश्च ॥ यश्चास्मच्छासनमगन(ण)य–

२५ मानस्स्वल्पामपि परिबाधात्कुर्य्यात्कारयित वा[3] तस्य ब्राह्मणैर्व्वेदितस्य सदण्डं निग्र–

२६ हं कुर्य्याम ॥ अस्मि(स्मिं)श्च धर्माद्धि(धि)करणे अतीतानेकराजदत्तां संचीन्तनपरि[4]–

२७ पालने(नं) कृतपुण्यानुकीर्त्तनपरिहारार्त्थन्न क(की)र्त्त-याम: संकल्पाभिद्यो(यो)गपरा–

२८ क्रमोपजिताव्व(व्व)र्त्तम(मा)नानाज्ञापयाम: एष्यत-[5]त्कालप्रभविष्णुगौरवा–

---

१. '–न्वितरामस्तद्यथा' असें वाचावें.
२. 'केनचिद्वयाघात:' असें वाचावें.
३. 'परिबाधां कुर्य्यात्कारयेद्वा' असें वाचावें.
४. 'राजदत्तसञ्चिन्तन–' असें वाजावें.
५. 'एष्यत्काल–' असें वाचावें.

चौथा पत्रा

२९ व्भ(द्भू)विष्यान्विज्ञापयामः [।*] व्यासगीतश्चात्र श्लोक-
ऽप्रमाणीकर्त्तव्यः[।*] स्वदत्ताम्पर-

३० दत्ताव्वा(दत्तां वा)यो हरेत वसुन्धराः(राम्) [।*]
गवान्शतसहस्रस्य ।[1] हन्तुर्हरति दुष्क्रित्तं ।[2]

३१ साव्वत्सरे त्रयोवीशे[3] ।[4] माघबहुलपक्षे द्वादश्या[म्*] ।
आज्ञा

३२ स्य(स्व)यं(यम् ।) राज्याधिकृतन(कृतेन) [च]मि-
दासेन लिखितमिति ।

मुद्रा

१ वाकाटकललामस्य
२ क्क(क्र)मप्राप्तन्रि(नृ)पश्रियम्(यः)[।*][4]
३ राज्ञ[:*] प्रवरसेनस्य ।
४ शासनं रिपुशासनम्[5] ॥

---

१. 'गवां शतसहस्रस्य' असें वाचावें. पुढील विरामचिह्न निरर्थक आहे.

२. 'दुष्कृतम्' असें वाचावें. वृत्त–अनुष्टुभ्.

३. 'संवत्सरे त्रयोविंशे' असें वाचावें.

४. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

५. वृत्त–अनुष्टुभ्.

१२. द्वितीय प्रवरसेनाचा वडगांव ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट चांदा जिल्ह्याच्या वरोडा तहसिलींतील वडगाव या गावीं एका गृहस्थाच्या संग्रहीं होता. त्याचा नातू भगवान शिवा गनार हा नागपूरला कांही कारणाने आला असतां तेथील संग्रहालय पाहण्यास गेला. तेथे त्याने कांही वाकाटक ताम्रपट प्रदर्शनींत पाहिले. ते पाहतांच त्याला आपल्या आजोबांच्या घरींहि असाच ताम्रपट पाहिल्याचें आठवलें. त्याने तो ताम्रपट नागपूर संग्रहालयाचे क्यूरेटर डॉ. एस्. एस्. पटवर्धन यांस आणून दिला. डॉ. पटवर्धनांनी तो वाचनार्थ माझ्या स्वाधीन केला. मी तो त्यांच्या ठशांसहित एपिग्राफिया इंडिका (पु. २७, पृ. ७४ इ.) मध्ये प्रकाशित केला. त्याच ठशांवरून तो येथे संपादिला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून त्यांपैकी पहिला व शेवटचा एका बाजूवर आणि बाकीचे दोन दोन्ही बाजूवर कोरले आहेत. त्यांची लांबी ६·५ इंच, रुंदी ३·५ इंच आणि वजन ९७ तोळे आहे. या पत्र्यांच्या डाव्या कडेपासून १·३ इंचावर मध्यभागीं केलेल्या छिद्रांतून जाणाऱ्या कडीने ते जोडले होते. या कडीचें वजन ३ तोळे आहे. या कडीवर फिरणारी इतर ताम्रपटांच्या प्रमाणे मुद्रा असावी, पण ती आता गहाळ झाली आहे. एकंदर लेख ४२ ओळींचा असून त्यांपैकी पत्र्यांच्या प्रत्येक कोरलेल्या बाजूवर सहा सहा ओळी आहेत. सबंध लेख उत्तम स्थितींत आहे. कोरक्याने कांही ठिकाणीं आपल्या चुका दुरुस्त केल्या आहेत. उदाहरणार्थ 'अंसभार' (ओ. ४) आणि 'सत्याज्र्जव' (ओ. ९) पाहा. पण पुष्कळ दुसऱ्या चुका तशाच राहिल्या आहेत. दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर खालच्या उजव्या कोपऱ्यांत 'मारदे-(दा)से' अशीं अक्षरें कोरलीं आहेत, तीं ४२ व्या ओळींतील अनव-

धानानें गळलेलीं असावीं. एकविसाव्या ओळींत मूळचीं कांही अक्षरें दाबून टाकून त्यांच्या जागीं 'विषुववाचनक' असा शब्द कोरला आहे. असें करण्यांत अगोदर झालेली चूक दुरुस्त करण्याचा उद्देश होता किंवा ताम्रपटांत ढवळाढवळ करण्याचा हेतु होता हें सांगणें आहे. पण हीं नंतरचीं अक्षरें इतर अक्षरांसारखींच असल्याने तीं वाकाटक काळांतच कोरलीं गेलीं यांत संशय नाही.

लिपी—या लेखाची लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. ती द्वितीय प्रवरसेनाच्या इतर लेखांतल्या सारखीच आहे, पण खालील विशेष उल्लेखनीय आहेत--'सूनोः' (ओ. ४) मधील व्यंजनयुक्त ऊकार लपेटी (cursive) वळणाचा आहे; 'दौहित्र' (ओ. ७) मधील व्यंजनयुक्त 'औ' द्विभागात्मक आहे; 'अधिकृत' (ओ. २३) मधील व्यंजनयुक्त 'ऋ' व 'क्लृप्तोपक्लृप्तः' (ओ. ३१) मधील व्यंजनयुक्त 'लृ' यांचीं रूपें उल्लेखनीय आहेत. २ आणि ३ या संख्यांची चिह्नें अनुक्रमें दुसऱ्या व तिसऱ्या पत्र्यांच्या दुसऱ्या बाजूवर आणि ४०० या संख्येचें चिह्न विसाव्या ओळींत आढळतें.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून शेवटच्या दोन शापाशीर्वादात्मक श्लोकांव्यतिरिक्त त्याचा सर्व भाग गद्यांत आहे. लेखनांत 'र्' नंतर व 'य्' च्या पूर्वी येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व इतर लेखांतल्याप्रमाणें केलें आहे.

विषय—या लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने झाला असून त्यांतील वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेनाची वंशावळ इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेंच आहे. त्याच्या मातामहाचें नांव 'देवगुप्त' असेंच येथेहि दिलें आहे. या लेखाचा उद्देश द्वितीय प्रवरसनानें दोन वेदांत पारंगत असलेल्या वाजिलोहित्य गोत्री रुद्रार्य नामक ब्राह्मणास सुप्रतिष्ठ आहारांतील वेलुसुक गावीं राजमानानें ४०० निवर्तनें जमीन दान दिली हें नमूद करण्याचा होता. तो ब्राह्मण एकार्जुनक येथे राहत होता. वेलुसुक गाव गृध्र-

ग्रामाच्या पूर्वेस, कदम्बसरकाच्या दक्षिणेस, नीलीग्रामाच्या पश्चिमेस आणि कोकिलाराच्या उत्तरेस होता. हें दान द्वितीय प्रवरसेनाचा हिरण्यानदीच्या तीरावर मुक्काम असतांना पंचविसाव्या शासनवर्षी ज्येष्ठ शुद्ध दशमीस दिलें होतें. त्यावेळीं बाप्पदेव हा सेनापतिपदावर होता. याचें नांव द्वितीय प्रवरसेनाच्या सिवनी ताम्रपटांतहि आलें आहे. प्रस्तुत दानपत्राचा लेखक मारदास हा होता.

चर्चा—हा ताम्रपट ज्या ब्राह्मणाला दिला होता त्याचें ‘ विषुववाचनक ’ असें वर्णन केलें आहे. त्यावरून प्रस्तुत दान विषुवसंक्रांतीच्या प्रसंगीं केलें असावें असें दिसतें. प्रस्तुत ताम्रपटाच्या तिथीपूर्वीचें विषुव म्हणजे चैत्र महिन्यांतील मेषसंक्रांति होय. या संक्रांतीस वेदमंत्रांचें पठन केल्याबद्दल दक्षिणा म्हणून हें दान दिलें असावें.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **सुप्रतिष्ठ आहाराचा** उल्लेख आणखी दोन ताम्रपटांत—प्रभावतीगुप्तेच्या ऋद्धपुर ताम्रपटांत व द्वितीय प्रवरसेनाच्या जांब ताम्रपटांत—आला आहे. या आहारांत हिंगणघाट, वरोडा व यवतमाळ तहसिलींचा कांही भाग मोडत होता असें दिसतें. दान दिलेली जमीन ज्यांत होती तें **वेलुसुक** गाव सध्या अस्तित्वांत नाही. त्याच्या जागीं वन्ना नदीच्या दक्षिण तीरावरचें चिंचमंडल वसलें आहे असें दिसतें. कारण त्याचीं सर्व सीमागावें त्या त्या दिशांस अद्यापि दाखवितां येतात. **गृध्रग्राम** हें चिंचमंडळाच्या पश्चिमेस ८ मैलांवरचें गदेघाट आणि **नीलीग्राम** पूर्वेस ५ मैलांवरचें नीलजाई असावें. **कदम्बसरक** हें उत्तरेस दोन मैलांवरचें कोसरा आणि कोकिलार हें वायव्येस ४ मैलांवरचें खैरी असावें. तेव्हा हीं सर्व सीमांवरील गावें चिंचमंडळाच्या आसमंतात् सापडतात. शिवाय चिंचमंडळ हें ज्या ठिकाणीं प्रस्तुत ताम्रपट सांपडला त्या वडगांवच्या दक्षिणेस केवळ पांच मैलांवर आहे. **हिरण्या नदी** वरोडा तहसिलींतील दक्षिणवाहिनी इरई होय. ही पुढें

वर्धा नदीला मिळते. दुदिया ताम्रपटांत उल्लेखिलेलें हिरण्यपुर याच नदीच्या काठीं असावें. ताम्रपट दिलेल्या ब्राह्मणाचें निवासस्थान **एकार्जुनक** हें इरई नदीच्या काठचें अर्जुनी असावें. हें गाव वरोडा तहसिलीचें मुख्य ठिकाण वरोडा याच्या ईशान्येस १६ मैलांवर आहे.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धम्[2][।*] दृष्टं (ष्टम्)[।*] हिरण्यानदि (दी) वासकादग्निष्टोम(मा)प्तोर्य्यामोक्थ्यषोडश्या (श्य) ति--

२ रात्रवाजपेयबृहप्स (स्प) तिसवसद्य:क्क (स्क[3]) [च*]तुरश्वमेधयाजिन:

३ विष्ण (ष्णु) वृ[द्ध]सगोत्रस्य सम्राट्[4] वाकाटकानां महाराजश्रि(श्री)प्रवरसेन–

४ स्य सूनो: सूनोरत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य अंस[भा][5]–

५ रसन्निव (वे) शितशिवलि[ङ्गो]द्वहनशिवसुपर (रि) तुष्टसमुत्पादित[रा]–

---

१. एपिग्राफिया इंडिया, पु. २७ पृ. ७६ व ७७ समोरील ठशांवरून.

२. हा शब्द चिह्नाने दर्शविला आहे.

३. 'साद्यस्क' असें वाचावें.

४. 'सम्राज:' असें वाचावें.

५ कोरक्याने प्रथम 'सा' कोरलें होतें नंतर तें 'भा' असें दुरुस्त

६ जवंशाना(नां) पराक्कम(मा)धिगतभागि(गी)रथ्य-
मलजलमु(मू)र्द्ध(र्द्धा)भिषिक्तानां दशा-

७ श्वमेधा[व*]भृथस्नातानां भारशिवानां महाराजश्री-
भवनागदौहित्रस्य

दुसरा पत्रा : पहिली बाजू

८ गौतमीपुत्रस्य वाक(का)टकाना(नां) महाराजश्रि-
(श्री)रुद्रसेनस्य सूनोरत्य-

९ न्तमाहेश्वरस्य सत्यार्ज्जव[1]कारुण्यशौर्य्यविक्रमनयविन-
यम(मा)हात्म्य-

१० धीमत्य(त्व)पात्रगतभक्तित्वधम्म(र्म्म)विजयी(यि)-
त्वमनोनैर्म्मल्यादिभीगु(भिर्गु)णैः

११ समुप(पे)तस्य वष(र्ष)शतमभिवर्द्धमानकोशदण्डा-
(ण्ड)साधनसन्ता-

१२ नपुत्रपौत्र(त्रि)णः युधीष्ठ[2](धिष्ठि)रवृत्तेः वाकाटकानां
महाराजश्रि(श्री)पृथिवी-

१३ षेणस्य सूनोर्भगवतः चक्रप(पा)णेः प्रसादोप(पा)-
र्ज्जितश्रि[3](श्री)समुद-

---

१. हें अक्षर प्रथम गळलें होतें. नंतर तें लहान आकारांत लिहिलें आहे.

२. या अक्षराची इ प्रथम दीर्घ कोरली होती, नंतर ती ऱ्हस्व करण्यांत आली.

३. कोरक्याने प्रथम 'क्रि' असें कोरलें, नंतर त्याचें 'श्रि' केलें.

१४ यस्य व(वा)काटकानां महाराजश्रीर(रु)द्रस(से)नस्य सूनोः महाराजा-[१]

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१५ धिराजा(ज)श्रि(श्री)देवगुप्तसुतायो(यां) प्रभावती-गुप्तायामुत्पन्नस्य शा(श)म्भो[:*]

१६ प्रसादधृति(त)कार्त्तयुगस्य वाकाटकानाम्परममाहै(हे)-श्वरमहा-

१७ राजं(ज)श्रीप्रवरसेनस्य वचना[त्*]॥ सुप्रतिष्ठ(ष्ठा)-हारे ग्रिद्रूग्रामस्य[२]

१८ [३]पूर्व्वतः कदम्बसरकस्य [द]क्ष(क्षि)णतः नीलीग्रामस्य प-

१९ श्चिमेनः(मतः) कोकिलारश्य(स्य) उत्तरतः वेलुसुक-ग्राल ग्रामः अत्रस्मा[४]

२० राजमानेनः[५] भूम(मे)न्नि(र्न्नि)वर्त्तनशतानी(नि) चत्वा-रि ४०० वीशतीम[६] सं-

---

१. या अक्षराखाली 'मारदे[से]' अशीं अक्षरें कोरलीं आहेत, पण तीं 'मारदासे' अशीं ४२ व्या ओळींत 'बाप्पदेवे' या शब्दानंतर व 'न' च्या पूर्वी वाचलीं पाहिजेत.

२. 'गृध्रग्रामस्य' असें वाचावें.

३. या शब्दापूर्वी या पत्र्याचा क्रमांक दाखविणारें संख्या-चिह्न २ हें कोरलें आहे.

४. 'एतस्मात्' असें वाचावें.

५. हा विसर्ग निरर्थक आहे.

६. 'विंशतितमे' असें पाहिजे. बहुधा 'पञ्चविंशतितमे' असें विवक्षित असावें. ४१ व्या ओळींतील शासनवर्ष पाहा. 'पञ्च' यांतलें ञ्च हें अक्षर ४२ ओळींत लिहिलें आहे.

२१ वत्सरे विषुववाचनक[1]वाजीलोहित्या(त्य)सगोत्रस्य

तिसरा पत्रा : पहिली बाजू

२२ एकार्जुनकव(वा)स्तव्यस्य[2] द्विवेदरुद्राय्या(र्य्या)य
दत्तानि [।*] यतोस्मत्सन्तकाः

२३ सर्व्वाध्यि(ध्य)क्ष[नि]योगनियुक्ताः आज्ञासञ्चार(रि)-
कुलपुत्राधिकृता भजा(टा)श्छ(श्छा)-

२४ त्र(त्रा)श्च विश्रुतपूर्व्वय[3]ज्ञाप्थितव्याः[।*] विदितमस्तु
वः यथेहास्मा-

२५ भिरात्मनो धर्म्मायू(यु)र्ब्बलविजयि(यै)श्वर्य्य[वि]-
वृद्धये इहामुत्र-

२६ ही(हि)तार्त्थमात्मानुग्रहाय वैजयिके धर्म्मस्थाने अपूर्व्व-
दत्या(त्त्या) [उ]द-

२७ कपूर्व्वमती(ति)सृष्टः[4] [।*] अथास्योचिता(तां) पूर्व्व-
राजानुमता(तां) चातुर्व्वै(र्व्वै)द्या-

२८ ग्रहारमर्य्या[5]दान्वितरामः [।*] तद्यथा अकरदायी अभट-
च्छात्र-

---

१. हीं अक्षरें मोठ्या आकाराचीं असून पूर्वीचीं अक्षरें आंत ठोकून त्यावर कोरलेलीं दिसतात.

२. '-सगोत्राय' आणि '-वास्तव्याय' असें वाचावें.

३. 'विश्रुतपूर्व्वयाज्ञया-' असें वाचावें.

४. याचें विशेष्य 'ग्रामः' असें घेतलें पाहिजे, पण या दानपत्राचा लेखक हें विसरला की, यामध्ये संबंध गाव दान दिला नसून फक्त कांहो निवर्तनें जमीन दिली आहे.

५. 'मर्य्यादां [illegible]ाम' असें वाचावें.

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२९ प्रावेश्य: अपारंपरगोबलीवर्द्द: अपुष्पक्षीरसन्दोह:

३० अचारासनचर्म्माङ्गार: अलवणक्ली(क्लि)न्नक्रे[ण](णि)-
खनक: सनि[धि:]

३१ सोपन(नि)धि: सक्लृप्तोपक्लृप्त: सर्व्ववे(वि)ष्टिपरिहार-
परिहृत:

३२ [1]आचन्द्रादित्या(त्य)कालीय: पुत्रपौत्रा[नु][ता](गा)मि-
(मी) भुज्यमा-

३३ न: न केनचिद्व्याघातयितव्य: सर्व्वक्रियाभिस्संरक्षि-
तव्य:

३४ परी(रि)वर्द्धय(यि)तव्या(व्य)श्च [।*] यस्माच्छासन-
मरणयमान[2]: स्वल्पामपी(पि)

३५ परिबाधा(धां) कुर्य्यात्कारयात व[3]: तस्य ब्राह्मणैर्व्वेदी(दि)-
तस्य सदण्डां(ण्डं)

३६ निग्रह(हं) कुय्यम: (कुर्य्याम) [।] अस्मि(स्मि)श्च
धर्म्माद[र*]रकरणे अतीतानेकराज[दत्त*]सञ्चि-

३७ न्तनपरिप(पा)लन(नं) कृतपुण्यनुकीर्त्तनं[4] कीर्त्तयाम:
[।*] व्यासगीतो(तौ) चात्र

---

१. या शब्दापूर्वी या पत्र्याचा क्रमांक दाखविणारें ३ या संख्येचें चिह्न कोरलें आहे.

२. 'योस्मच्छासनमगणयमान:' असें वाचावें.

३. 'कारयेद्वा' असें वाचावें.

४. 'कृतपुण्यानुकीर्त्तनपरिहाराय' असें वाचावें.

३८ श्रोका (श्लोकौ) प्रमासिकर्त्तव्यौ[१] ॥ स्वदत्ता(त्तां) परदत्तां वा हरेद्यो वै वसुन्धराम् [।*]

३९ गवां शतसहस्रस्य हतुर्हरति[२] दुष्कृत(तम्) ॥[३] [१॥*] षष्टि वर्षसह-

४० स्रानि(णि) स्वर्ग्गे मोदति भूमिदः[।*] आच्छेत्ता चानु-मन्त(न्ता) च त(ता)न्येक(व) नरका(के)

४१ वसेदिति(वसेत् ॥२॥ इति) ॥ संवत्सरे पञ्चवीङशा-तीम[४] ज्येष्ठसुक्लदशम्या:[५]

४२ सेन(ना)स(प)तौ बा[प्प][६]देवे न[७] लीखीतं[८] ❀ [ञ्च][९] मस्तु[१०] ॥

---

१. 'प्रमाणीकर्त्तव्यौ' असें वाचावें.

२. 'हन्तु' यांतील 'न्' विनाकारण खोडला आहे.

३. या व पुढील श्लोकांचें वृत्त—अनुष्टुभ्.

४. 'पञ्चविंशतितमे' असें वाचावें.

५. 'शुक्लदशम्यां' असें वाचावें.

६. या संयुक्त व्यञ्जनाचें दुसरें (खालचें) अक्षर 'ह' असें कोरलें होतें, नंतर त्याचें 'प' केलें.

७. 'मारदासेन' असें वाचावें. 'मारदासे' हीं अक्षरें येथे अनवधानाने गाळलीं होतीं, ती चुकीने दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर खालच्या उजव्या कोनांत लिहिलीं आहेत.

८ 'लिखितम्' असें वाचावें.

९. 'ञ्च' हें 'पञ्च' याचा अवशिष्ट अंश असून तो शब्द 'वीशतीम' (ओ. २०) याच्या पूर्वी यावयास पाहिजे होता.

१०. 'सिद्धमस्तु' किंवा 'शुभमस्तु' असें वाचावें.

१३. द्वितीय प्रवरसेनाचा पट्टन ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट मध्यप्रदेशाच्या बैतुल जिल्ह्यांतील पट्टन गावीं एका शेतकऱ्याला शेत नांगरतांना सन १९३५ मध्ये सापडला. नंतर तो नागपूरच्या संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांनी हस्तगत करून माझ्याकडे वाचनार्थ पाठविला. मी तो एपिग्राफिया इंडिका, पु. २४, पृ. ८१ इ. मध्ये ठशांसहित प्रकाशित केला आहे. त्याच ठशांवरून येथे त्याचें वाचन केलें आहे. ताम्रपट आता नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे पांच पत्रे असून त्यांपैकी पहिला आणि शेवटचा एका बाजूवर आणि बाकीचे दोन्ही बाजूंवर कोरले आहेत. प्रत्येक पत्र्याची लांबी ६·९ इंच, रुंदी ४ इंच आणि जाडी $\frac{१}{१०}$ इंच आहे. पत्र्यांच्या कडा लेखाच्या सुरक्षिततेकरितां वाकविल्या नाहीत. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या कडेपासून १·९ इंच अंतरावर मध्यभागीं कडीकरितां अर्धा इंच व्यासाचें छिद्र आहे. ताम्रपटाचे पत्रे नागपूर संग्रहालयामध्ये आले तेव्हा कडी सरळ केली होती आणि पत्रे व मुद्रा तिच्यापासून अलग झाली होती. पत्रे आरंभीं चांगले गुळगुळीत केले नव्हते. शिवाय, ते बरेच गंजले आहेत. ४५ व्या ओळीच्या उजवीकडचीं तसेंच पुढील दोन ओळींतील बरीचशीं अक्षरें पत्र्यांच्या परस्परघर्षणाने अस्पष्ट झालीं आहेत, तथापि तीं बऱ्याच प्रयत्नान्तीं वाचतां येतात. पत्र्यांच्या प्रत्येक कोरलेल्या बाजूवर सहा ओळी आहेत, पण तिसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर पांचच ओळी लिहिल्या आहेत. मुद्रेवर नेहमीचा श्लोक चार ओळींत लिहिला आहे.

लिपी—प्रस्तुत लेखाची लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत--(दीर्घ) ईकार बहुधा वेलांटींत

लहानशा वक्ररेषेने दाखविला आहे, पण क्वचित् परस्परविरुद्ध दिशेस जाणाऱ्या वक्र रेषांनी किंवा वेलांटींत बिंदु घालून दर्शविला आहे; व्यंजनयुक्त ओकार क्वचित् लपेटीरीतीचा आणि औकार सर्वत्र द्विभागयुक्त आहे; 'ज' व 'ञ' यांना डाव्या बाजूंना खाच नाही; शेवटचें व्यंजन लहान आकाराने किंवा त्याच्या डोक्यावर आडवी रेघ काढून सूचित केलें आहे; उपध्मानीयाचें चिन्ह ताम्रपटावरील लेखाच्या १५, १८ व ३५ व्या ओळींत आणि मुद्रेवरच्या चौथ्या ओळींत आलें आहे. विरामचिन्ह दोन किंवा तीन उभ्या दंडांनी व त्यानंतर लहानश्या किंचित् वक्र आडव्या रेषेने दाखविलें आहे.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून मुद्रेवरचा श्लोक आणि ताम्रपटांतील शेवटचे शापाशीर्वादात्मक श्लोक यांव्यतिरिक्त सर्व भाग गद्यांत आहे. त्यामध्ये शुद्धलेखन, सन्धि, वाक्यरचना, नामांचीं व क्रियापदांचीं रूपें, कृदन्तें, तद्धित रूपें इत्यादिकांच्या अनेक चुका आहेत. ह्या चुका लेखकाच्या अज्ञानामुळे किंवा निष्काळजी-पणामुळे झाल्या असाव्या. उदाहरणार्थ, 'सुनोः' (ओ. ४) मध्ये दीर्घ स्वराबद्दल ह्रस्व स्वर, 'प्रिथिवि'-(ओ. १४) मध्ये 'ऋ' बद्दल 'रि', आणि 'क्लिप्तोपक्लिप्तः' (ओ. ३३) मध्ये 'ऌ' बद्दल 'लि' योजिला आहे. 'गुणै समुपेतस्य' (ओ. १२) यासारख्या ठिकाणीं सन्धीच्या चुका आढळतात. पूर्व्वाया (ओ. २५) आणि 'कारयीत' (ओ. ३६), 'कुर्य्यामः' (ओ. ३७) इत्यादि ठिकाणीं अशुद्ध रूपें योजिलीं आहेत; 'कारावक' (ओ. ४६–४७) यांतील कृदन्त आणि 'राजक्य' (ओ. २२) मधील तद्धितान्त चूक आहे. 'सुतायाः प्रभा-वतीगुप्तायाम्' (ओ. १७) यांत समन्वयाच्या, आणि 'मूर्ध्नाभि-षिक्ताना–'(ओ. ७) यामध्ये समासाच्या नियमांचें पालन केलें नाही. कांही ठिकाणी 'र्' च्या पूर्वी व नंतर, आणि 'य्' च्या पूर्वी येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे तें व्याकरण नियमांस धरून आहे.

विषय—वाकाटकांच्या इतर अनेक दानपत्रांप्रमाणे प्रस्तुत लेखाचा आरंभ 'दृष्टम्' शब्दाने होतो. हा लेख वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेनाचा असून त्यामध्यें त्याची वंशावळ त्याच्या इतर दानपत्रांतल्याप्रमाणेच दिली आहे. यांतहि त्याच्या मातामहाचें नांव देवगुप्त असेंच दिलें आहे. हा ताम्रपट प्रवरपुराहून दिला असून त्याचा उद्देश अश्वत्थखेटक येथील महापुरुषाच्या (विष्णूच्या) पादुकांच्या (देवळांतील) अन्नसत्राला द्वितीय प्रवरसेनाने नारायणराजाच्या विनंती-वरून राजमानाने ४०० निवर्तनें जमीन दान दिली, हें नमूद करणें हा होता. हा गाव लोहनगर भागांत वरदाखेट नामक मार्गांत होता. हें दानपत्र द्वितीय प्रवरसेनाच्या सत्ताविसाव्या शासनवर्षी कार्तिक कृष्ण सप्तमीस लिहिलें असून त्याचा लेखक सेनापति कात्यायन याचा सेवक कालिदास हा होता. कौण्डराजाचा सेवक ईश्वरदत्त या सुवर्णकाराने हा ताम्रपट कोरला, आणि पितामह व नन्द यांनी हें राजशासन तयार करविलें, असें शेवटीं म्हटलें आहे.

चर्चा—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें सत्ताविसावें संवत्सर हें द्वितीय प्रवरसेनाच्या शासनाचें शेवटचें ज्ञात वर्ष होय. या ताम्रपटांतील प्रवरपुराच्या उल्लेखावरून त्या नगरीं निदान द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत वाकाटकांची राजधानी होती यांत संशय नाही. या ताम्रपटांत ज्या कौंडराजाचा निर्देश आहे तो आणि चम्मक ताम्रपट ज्याच्या विनंतीवरून द्वितीय प्रवरसेनाने दिला होता तो शत्रुघ्न राजाचा पुत्र कोंडराज हे एकच असावेत.

कालिदास—प्रस्तुत ताम्रपटांत लेखक म्हणून ज्या कालिदासाचा उल्लेख आला आहे तो आणि सुप्रसिद्ध संस्कृत कवि कालिदास हे एकच काय, असा प्रश्न येथे उपस्थित होतो. कालिदास गुप्तकालांत होऊन गेला हें मत आता अधिकाधिक विद्वन्मान्य होत आहे. तथापि त्या कवीचा कोरीव लेखांतील नामोल्लेख शके ५५६ (इसवी सन ६३४)

च्या ऐहोळे शिलालेखाच्या पूर्वीं सांपडत नाही. गुप्तकालीन कोरीव लेखांत कालिदास हें नांव आल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

प्रस्तुत ताम्रपटांत कालिदासाचें नांव लेखक म्हणून आलें आहे खरें, पण केवळ यामुळे तो कविकुलगुरु कालिदास असणें शक्य नाही असें म्हणतां येत नाही. हीं दानपत्रें सामान्यतः सांधिविग्रहिकाच्या (परराष्ट्रखात्याच्या प्रमुखाच्या) किंवा सेनापतीच्या कचेरींतील कारकून लिहीत असत, पण कित्येकदां त्यांमध्ये मोठमोठ्या अधिकाऱ्यांचीं नांवें लेखक म्हणून उल्लेखिलीं जात. उदाहरणार्थ, तिरोडी ताम्रपटांत तत्कालीन राज्याधिकृताचें नांव लेखक म्हणून आलें आहे. कालिदासाचें निवास-स्थान उज्जयिनी होतें असें मानण्यांत येतें, पण द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दींत तो विदर्भांत आला असणें असंभनीय नाही. सेतुबंध या प्राकृत काव्याच्या रामदास नामक टीकाकाराने अशी परंपरागत कथा उल्लेखिली आहे की, कालिदासाने तें काव्य महाराजाधिराज विक्रमादित्याच्या आज्ञेने महाराज प्रवरसेनाकरिता रचलें. हा विक्रमाहित्य म्हणजे गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त आणि प्रवरसेन म्हणजे वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन हेच असणें शक्य आहे. या काव्याकरिता कालिदास विदर्भांत कांही काळ राहिला असावा. तेथे असतांना तो नन्दिवर्धन राजधानीजवळच्या रामगिरीवर (सध्याच्या रामटेकवर) गेला असतां त्याला मेघदूत काव्याची कल्पना सुचली असें दिसतें. विदर्भांत असतांना प्रस्तुत ताम्रपटांतल्या उल्लेखाप्रमाणे कालिदास सेनापतीच्या कार्यालयांत नियुक्त केला गेला असल्यास आश्चर्य नाही. तेव्हा प्रस्तुत दानपत्र त्याने लिहिलें असावें असें मानण्यास हरकत नसावी.

पण प्रस्तुत दानपत्राचा थोडा बारकाईने विचार केल्यास वरील मत ग्राह्य वाटत नाही. या दानपत्राच्या लेखकाला संस्कृत भाषेचें फार थोडें ज्ञान होतें असें दिसतें. मागे दाखविल्या प्रमाणे या लेखांत अनेक शुद्धलेखनाच्या व व्याकरणाच्या चुका आढळतात. त्या चुकांबद्दल या

ताम्रपटाचा कोरक्या जबाबदार नसून त्या लेखकाच्याच अज्ञानामुळे झाल्या असाव्या. कालिदासाचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व सर्वमान्य आहे. त्याने एका उपमेंत शुद्ध भाषेचें महत्त्व सूचित केलें आहे.[1] त्याच्या ग्रंथांत इतर कवींच्या ग्रंथांच्या मानाने फारच थोडे व्याकरणदुष्ट प्रयोग आढळतात. तेव्हा कविकुलगुरु कालिदासाच्या हातून प्रस्तुत दानपत्रांतल्या सारख्या शुद्धलेखन, विशेषण–विशेष्य समन्वय, संधि, नामांचीं व क्रियापदांचीं रूपें, कृदंतें इत्यादिकांच्या बाबतींत चुका झाल्या असतील हें संभवनीय वाटत नाही. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटाचा लेखक कविकुलगुरु कालिदास नसून त्याचा समकालीन तन्नामधारी साधा कारकून होता असें मानणें भाग आहे. वाकाटकांच्या ताम्रपटांत या सारखीं 'दास'-पदान्त अनेक नांवें आढळतात. उदाहरणार्थ, सेनापति नमिदास, राज्याधिकृत चमिदास आणि लेखक चक्रदास, गोलदास आणि मारदास हीं नांवें पाहा.

स्थलनिश्चय--प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **वरदाखेट** हें अमरावती जिल्ह्याच्या मोरशी तहसिलींतील वरुड असावें. हें गाव पट्टनच्या दक्षिणेस सुमारें १२ मैलांवर आहे. **लोहनगर** हें वरूडच्या नैर्ऋत्येस ९ मैलांवरचें लोणी असावें. दान दिलेली जमीन ज्या **अश्वत्थखेटक** गावांत होती तें मात्र आता कोठे आढळत नाही. त्याच्या जागीं सध्याचें पट्टन वसलें असावें. पट्टन गावाविषयीं अशी दंतकथा प्रचलित आहे की त्या ठिकाणचें जुनें गाव सुलेमान शहा नामक मुसलमान साधूच्या शापाने उलटें होऊन जमितींत पुरलें गेलें. पट्टन गावांत खणलें असतां अद्यापि मोठया आकाराच्या विटा, मणी, जुनीं नाणीं सांपडतात, त्यावरून तें गाव जुन्या गावाच्या ठिकाणीं वसलें आहे हें उघड आहे. शिवाय तें वरूडजवळ असल्यामुळे प्राचीन

---

१ पाहा 'संस्कारवत्येव गिरा मनीषी तया स पूतश्च विभूषितश्च ॥' कुमारसंभव, सर्ग १, श्लो. २८.

वरदाखेट नामक 'मार्गांत' अन्तर्भूत होत असावें. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांतील अश्वत्थखेटकाचें वर्णन पट्टन गावाला लागू पडतें.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ दृष्ट:(ष्टम्) [।*] स्वस्ति ॥ प्रवरपुरात् अग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषो–

२ डश्यतिरात्रवाजपेयबृहस्पतिसवसाद्यस्कचतुरश्व–

३ मेधयाजिनः विष्णुवृद्धसगोत्रस्य सम्राट्[2] वाकाटका–

४ नाम्महाराजश्रीप्रवरसेनस्य सु(सू)नोः सु(सू)नोरत्यन्त्य(न्त)स्वामिम–

५ हाभैरवभक्तस्य अन्सभार[3]सन्निवेशितशिवलिङ्गोद्वहनशि–

६ वसुपरितुष्टसमुत्पादितराजवङशा[4]नाम्पराक्क्रमाधिगतभा–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

७ गीरथ्या(थ्य)मलजलमूधर्ना(र्धा)भिषिक्तानान्दशाश्वमेधावभृथस्नाता–

८ नाम्भारशी(शि)वा[5]नाम्महाराजश्रीभवनाग[दौ]हित्रस्य गौतमीपु–

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २३, पृ. ८६–८८ समोरील ठशांवरून.

२. 'सम्राजः' असें वाचावें.

३. 'अंस–' असें वाचावें.

४. 'वंशाना–' असें वाचावें.

५. 'वा' अक्षरावरची पेटिका पूर्णपणे कोरली नाही.

९ त्रपुत्रस्य[1] वाकाटकानाम्महाराजश्रीरुद्रसेनस्य सु(सू)नोर–
१० त्यन्त्य(न्त)माहेश्वरस्य सत्यार्ज्जवकारुन्य(ण्य)शौर्य्य-विक्क्रमन–
११ यविनयमाहात्म्यधीमत्व(त्त्व)पात्रगतभ[क्तित्व]पात्रगतभ-
१२ क्तित्व[2]धर्म्मविजयित्वमनोनैर्म्मल्यादिगुणै[:*] समुपेतस्य

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१३ वर्षशतमभिवर्द्धमानकोशदण्डसाधनसन्तानपुत्रपौ–
१४ तृ(त्रि)णः युधिष्ठिरवृत्तेर्व्वाकाटकानाम्महाराजश्रीप्रि-थिविसे–
१५ नस्य[3] सु(सू)नोर्भगवतश्चक्क्रपाणेःप्रसादोपार्ज्जितश्रीसमु–
१६ दयस्य वाकाटकानाम्महाराजश्री[रु]द्रसेनस्य सु(सू)नो–
१७ म्म(र्म्म)हाराजाधिराजश्रीदेवगुप्तसुतायाः[4] ाव[ति]गुप्ता–
१८ यामुत्पन्नस्य शम्भोःप्रसादधृति[5]कार्त्तयुगस्य वाकाटकाना-

---

१. इतर सर्व वाकाटक ताम्रपटांत 'गौतमीपुत्रस्य पुत्रस्य' असे शब्द असल्यामुळे त्यांचा अन्वय संदिग्ध होत असे. प्रस्तुत ताम्रपटांतील पाठावरून 'अत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य' इत्यादि विशेषणांचें विशेष्य 'गौतमीपुत्रस्य' नसून 'रुद्रसेनस्य' हें आहे.

२. 'पात्रगतभक्तित्व' ह्या सामासिक शब्दाची व्यर्थ पुनरुक्ति झाली आहे.

३. 'पृथिवीषेणस्य' असें वाचावें.

४. 'सुतायां' असें वाचावें.

५ 'धृत'– असें वाचावें.

१९ स्परममाहेश्वरमहाराजश्रीप्रवरसेनस्य वचना[त्]॥
२० लोहणगराभागे[१] वरदाखेटमार्ग्गे अश्वस्थ (त्थ) खेटके
२१ सब्राह्मणपुरोगो ग्रामो वक्तव्यः [।*] अत्र ग्रामे रा–
२२ जक्यमानेन[२] भूमेर्न्निवर्तनशतानि[३] चत्वारि महापुरुषपा–
२३ दमूलसत्रोपयोज्यं[४] नारायणराजविज्ञाप्येन दत्तम्[४] [।*]

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२४ यतोस्मत्सन्तकास्सर्व्वाद्ध्यक्षनियोगनियुक्ताः आज्ञासञ्चा–
२५ रिकुलपुत्राधिकृता भटा[श्छा]त्राश्च विश्रुतपूर्व्वा (र्व्व)–
याज्ञया–
२६ ज्ञापयितव्याः [।*] विदितमस्तु व (वो) यथे (थै)षा[५]–
स्माभिरात्म–
२७ नो धर्म्मायुर्ब्बलविजयैश्वर्य्यविवृद्धये इहामुत्रहिता–
२८ र्त्थमात्मानुग्रहाय वैजयिके धर्म्मस्थाने अपूर्व्वदत्या–
(त्त्या) उदक–
२९ पूर्व्वम्प्रतिसृष्टः [।*] अथास्योचितापूर्व्वरा[जा]नु[मतां]
चातु–

---

१. 'लोहनगरभागे' असें वाचावें.

२. 'राजकीय–' असें वाचावें.

३. 'ता' च्या डाव्या बाजूची रेघ खोडली आहे.

४. –'सत्रोपयोज्यानि' आणि 'दत्तानि' असें वाचावें.

५. 'एषा' याच्याशीं २९ व्या ओळींतील 'प्रतिसृष्टः' याचा अन्वय जमत नाही. 'एषा [भूमिः*] प्रतिसृष्टा' किंवा 'एषो[ग्रहारः*] प्रतिसृष्टः' असें वाचावें.

चौथा पत्रा : पहिली बाजू

३० व्यैं(व्वैं)द्याग्रा(ग्र)हारमर्य्यादान्वितराम[1]:[।*] तद्यथा अकरदायी अभट-

३१ च्छ(च्छा)त्रप्रावेश्य: अपारम्परगोबलिवर्द्दः अपुष्पक्षीर-सन्दोह[:*] अ-

३२ पा(चा)रासनचर्म्माङ्गार:अलवणक्केणिखनक: सर्व्ववे-(वि)ष्टिपरीहा-

३३ हारपरिहृत[:*] सनिधि: सोपनिधिस्सक्लि(क्लृ)प्तो-पक्लि(क्लृ)प्त: आचन्द्रादित्यका-

३४ लीय: पुत्रपौत्रानुगामी भुज्यमान(नो) न केनचिद्व्याघा-तयितव्य:

३५ सर्व्वक्र(क्रि)याभिस्स(स्सं)रक्षितव्य:परिवर्द्धयितव्यश्च [।*] य[श्चा]स्मच्छासनम-

चौथा पत्रा : दुसरी बाजू

३६ गणयमान[:*] स्वल्पामपि परिबाधां कुर्य्यात्कारयीत[2] वा तस्य ब्राह्म-

---

१. '-मर्य्यादां वितराम:' असें वाचावें. या दानपत्राच्या लेखकाने हें दान ब्राह्मणांना दिलें नसून देवाला दिलें आहे हें ध्यानांत न घेतां ब्राह्मणांना दिलेल्या दानपत्रांचें अनुकरण केलें आहे. 'ब्राह्मणैर्वेदितस्य' (ओ. ३६-३७) हे शब्द पहा. शिवाय यांतील कांही परिहार थोड्याशा भूमिदानाला अनुरूप नसून सबंध गाव दान दिला असतां लागू पडणारे असे आहेत.

२. 'कारयेद्वा' असें वाचावें.

३७ णैर्व्वेदिलस्य सदण्डनिग्रहं कुर्य्याम:(म)[।*] अस्मिश्च[1] धर्म्मादरक–

३८ [र*]णे अतीतानेकराजदत्ता(त्त)सञ्चिन्तनपरिपालन- (नं) कृतपुन्या(ण्या)–

३९ नुकीर्त्तनपरिहारार्त्थंन्न[2] कीर्त्तयाम: [।*] व्यासगीतौ चात्र श्लोकौ

४० प्रमाणीकर्त्तव्यौ [।*] स्वदत्ताम्परदत्तां व्वा(वा) यो हरेत वसुन्धराम् [।*]

४१ गवां शतसहस्रस्य हन्तुर्हरति दुष्कृत[म्] ॥[3] [१॥*]–

पांचवा पत्रा

४२ षष्टिवर्षसहस्राणि स्वर्ग्गे मोदति भूमिद[:।*] आच्छेत्ता

४३ चानुमन्ता च तान्येव नरके वसेदिति ॥ [२॥*] सांव्वत्सरे सप्ताविङ्शे[4]–

४४ कार्त्तिकबहुलपक्षसप्तम्यां सेनापतिकात्यायन–

४५ सन्तकेन लिखित(तं) कालिंदासेन[5] [।*] [कौण्डराज- सन्तकेन सुव][6]र्ण्ण–

---

१. 'अस्मिश्च' असें वाचावें.

२. हा अनुस्वार निरर्थक आहे.

३. या व पुढील श्लोकाचें वृत्त–अनुष्टुभ्.

४. 'संवत्सरे सप्तविंशे' असें वाचावें.

५. 'लि' च्या वेलांटींत दिसणारा बिंदु ताम्रपत्रांतील दोषामुळें उत्पन्न झाला असावा.

६. या कंसांतील अक्षरें मूळ पत्र्यावर निःसंदेह रीतीनें वाचतां येतात.

४६ कार[1] ईश्वरदत्तेन खातं(तम्)॥ अस्य शासनस्य कारा–
४७ वकौ पितामहनन्दौ ॥

मुद्रा

१ वाकाटकललामस्य
२ क्रमप्राप्तनृपश्रियः [।*]
३ राज्ञः प्रवरसेनस्य
४ शासनं रिपुशासनम् [॥*][2]

---

१४. द्वितीय प्रवरसेनाचा पाटणा संग्रहालय ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट प्रथम डॉ. अ. स. अळतेकर यांनी बिहार आणि ओरिसा सोसायटीच्या जर्नल (पु. १४ पृ. ४६५ इ.) मध्ये ठशां-शिवाय प्रकाशित केला. तो नक्की कोठे सापडला हें पुष्कळ काळ माहीत नव्हतें. त्यावरच्या आपल्या लेखांत 'तो मध्यप्रदेशांत कोठे तरी सापडला होता' असें डॉ. अळतेकरांनी म्हटलें आहे. डॉ. काशीप्रसाद जायसवाल यांनी आपल्या 'हिस्टरी ऑफ इंडिया, इ० स० १५० ते ३५०' (पृ. ७४) या ग्रंथांत म्हटलें आहे की, हा ताम्रपट जबलपुरांत सापडला होता. याच्या उलट कै. रायबहादूर डॉ. हीरालाल यांच्या मतें हा रामटेकजवळ सांपडलेल्या ताम्रपटाच्या नंतर गहाळ झालेल्या

---

१. 'सुवर्णकारेण' असें वाचावें.

२. वृत्त–अनुष्टुभ्.

पत्र्यांपैकी असावा. या ताम्रपटांत दान दिलेलें गाव व त्याच्या चतुःसीमा यांचा निर्देश आहे, पण त्याचें प्राप्तिस्थान निश्चितपणें माहित नसल्यामुळे त्या गावांचा शोध लागला नव्हता. सन १९३६ मध्ये बराच पत्रव्यवहार केल्यावर हा ताम्रपट नक्की कोठे सांपडला तें मला माहित झालें आणि त्यायोगें मला त्यांत निर्दिष्ट केलेल्या गावांचा शोध लावतां आला. नंतर मी त्याविषयी एक टिप्पण नागपूर युनिव्हर्सिटीच्या जर्नल मध्ये (क्रमांक २, पृ. ४८ इ.) प्रसिद्ध केलें. पाटणा संग्रहालयाचे त्या वेळचे क्यूरेटर कै. रायसाहेब मनोरंजन घोष यांच्या कृपेने मला प्रस्तुत ताम्रपटाचा उत्तम छाप मिळाला. त्यावरून त्याचें वाचन येथे दिलें आहे.

नरसिंगपूरचे डॉ. पी. एन्. सेन यांनी पुरविलेल्या माहितीवरून असें कळतें की प्रस्तुत ताम्रपट सन १९१९ मध्ये बालाघाट येथे डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेडंट ऑफ पोलिस यांच्या बंगल्याकरिता किंवा त्याला जोडून असलेल्या औट हाऊस करिता पाया खणत असतां सापडला. तो डॉ. सेन यांच्या हातीं आला. त्यांनी तो ताम्रपट आपले बंधु रायबहादूर मन्मथनाथ सेन यांच्याकडे पाठविला. रा. ब. सेन त्या वेळीं संताळ परगण्यांत जमात्रा येथे सब् डिव्हिजनल ऑफिसर होते. त्यांनी तो ताम्रपट पाटण्याच्या पुरातत्त्वखात्याच्या सुपरिन्टेंडंट मार्फत पाटण्याच्या संग्रहालयाला दिला. तेव्हापासून तो त्या संग्रहालयांत सुरक्षितपणें ठेवला आहे.

वर्णन—या पत्र्याची लांबी ७·२५ इंच व रुंदी मध्ये ४·२ इंच आहे. पत्रा गुळगुळीत असून उत्तम स्थितींत आहे. त्याच्या कडया वाकविल्या नाहीत. अक्षरें चांगल्या रीतीने कोरलीं आहेत. डाव्या बाजूस कडेपासून एक इंचावर मध्यभागीं ·३५ इंच व्यासाचें छिद्र कडीकरिता केलें आहे. या पत्र्याचें वजन ३० तोळे आहे.

लिपी—लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची आहे; तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—'ऐहिका' मधील 'ऐ' आणि 'मधुकज्झर्या'

मधील ‘ज्ञ’ हीं अक्षरें क्वचितच येतात म्हणून त्यांच्या आकृति लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. ‘कुटुम्बिनो’ (ओळ ८) मधील व्यंजनयुक्त ऱ्हस्व इकाराची वेलांटी उजव्या बाजूस वळविली आहे. व्यंजनयुक्त औकार द्विभागात्मक आहे. ‘ड’ व ‘द’ यांच्या आकृति भिन्न आहेत.

भाषा—भाषा संस्कृत असून प्रस्तुत पत्र्यावरील सर्व लेख गद्यांत आहे. इतर ताम्रपटांतल्या प्रमाणे र् नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे.

प्रस्तुत पत्रा हा एका ताम्रपटाचा तिसरा पत्रा असावा. पहिल्या दोन पत्र्यांवर जेथून ताम्रपट दिला त्या स्थलाचें नांव आणि दात्याची वंशावळ आली असावी. प्रस्तुत पत्र्यावरील लेखांत आरंभीं द्वितीय प्रवरसेनाचें वर्णन आलें आहे. तो प्रभावतीगुप्तेचा पुत्र असून त्याला भगवान् शंकराच्या कृपाप्रसादाने शूलायुध मिळालें होतें असें म्हटलें आहे. इतर ताम्रपटांत त्याच्या शूलायुधाचा उल्लेख आढळत नाही. त्या ठिकाणीं त्याने भगवान् शंकराच्या कृपाप्रसादाने पृथ्वीवर कृतयुग चालू केलें होतें, असें वर्णन येतें. त्यापेक्षा प्रस्तुत ताम्रपटांतील वर्णन चांगलें आहे.

उद्देश—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेन याने श्रीपर्णिका नामक गांव भारद्वाजगोत्री वेदार्यांचा पुत्र गंगार्य, कौंडिन्यगोत्री वसुरार्य आणि तैत्तिरीयशाखी व कौंडिन्यगोत्री रुद्रार्य या तीन ब्राह्मणांस दान दिला हें नमूद करण्याचा होता. हा गाव ‘सुन्धाति’ मार्गांत ‘ब्रह्मपुरका’च्या पूर्वेस ‘भिल्लुकद्रथा’च्या पश्चिमेस ‘मधुकज्झरी’च्या उत्तरेस आणि ‘दर्भविरका’च्या दक्षिणेस होता. हें दान पूर्वीच्या यशपूर मार्गांतील माणपल्लिका गावाच्या बदली होतें. पहिलें दान कां रद्द केलें याचें कारण मात्र येथे दिलें नाही. सिवनी ताम्रपटां-तल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटांतील गावहि ‘सपञ्चाशत्क’ असा दिला

होता. याचा अर्थ निश्चित नाही. 'पन्नास गावासह' असा अर्थ विवक्षित असावा असें फ्लीटचें मत होतें, पण तें बरोबर दिसत नाही. यांत जमीनमहसुलाच्या एखाद्या विशिष्ट हक्काचा उल्लेख असावा असें डॉ. अळतेकर म्हणतात. मनुस्मृतींत पशूंच्या किंमतीवर व ग्रामवासीयांच्या प्राप्तीवर एकपन्नासांश किंवा शेंकडा दोन टक्के कर राजानें घ्यावा असें म्हटलें आहे. तोच कर येथे विवक्षित दिसतो. प्रस्तुत गाव दान देतांना गावकऱ्यांकडून तो कर घेण्याचा अधिकारहि राजानें ब्राह्मणांस दिला होता असें दिसतें.

प्रस्तुत दान द्वितीय प्रवरसेनानें आपल्या मातेच्या पुण्यवृद्धीकरितां आणि ऐहिक व पारलौकिक कल्याणाकरिता दिलें होतें असें येथे म्हटलें आहे. त्यावरून हा पत्रा रामटेक ताम्रपटाचा नव्हे हें स्पष्ट होतें. कारण त्या ताम्रपटांतील दान द्वितीय प्रवरसेनानें स्वतःचें पुण्य, आयुष्य, बल आणि ऐश्वर्य यांच्या प्राप्तीकरिता, तसेंच ऐहिक व पारलौकिक कल्याणाकरितां दिलें होतें असें त्यांत म्हटलें आहे.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें **ब्रह्मपुरक** हें व सिवनी ताम्रपटानें दिलेलें त्याच नांवाचें गाव हीं एकच असावीं असें डॉ. अळतेकरांनी म्हटलें आहे व तें अचलपुराजवळचें सध्याचें ब्राह्मणवाडा होय असें अनुमान त्यांनी केलें आहे. पण तें बरोबर दिसत नाही; कारण सिवनी ताम्रपटानें दिलेलें ब्रह्मपूरक गाव बेन्नाकार्पर भोगांत अन्तर्भूत होतें. या भोगांत बेन्ना किंवा वैनगंगातीराजवळचा प्रदेश मोडत असे हें मागे दाखविलें आहे.[1] तेव्हा ब्रह्मपूरक अमरावती जिल्ह्याच्या अचलपुर तहसिलींत असणें शक्य नाही. याच कारणास्तव प्रस्तुत ताम्रपटांतील मधुकज्झरी आणि चम्मक ताम्रपटांत उल्लेखिलेली मधुनदी एक होय हें डॉ. अळतेकरांचें अनुमानहि चिन्त्य आहे. प्रस्तुत पत्रा बालघाट येथे सापडला असल्यामुळे त्यांत उल्ले-

---

१ क्रमांक १५ पाहा.

खिलेलीं गावें बालाघाटजवळच शोधलीं पाहिजेत हें उघड आहे. सर्व्हेच्या विस्तृत नकाशावरून त्यांतील कांही गावें मला त्या भागांत सापडलीं. **ब्रह्मपुरक** हें बालाघाटच्या वायव्येस बारा मैलांवरचें बम्हनी गाव असावें. लालबुऱ्यापासून समनापूरला जाणाऱ्या रस्त्यावर तें वसलें आहे. तेव्हा समनापूर हें प्राचीन **सुन्धा** किंवा **सुन्धाति** असावें. **मधुकज्झरी** हें बह्मनीच्या आग्नेयेस मुरझर, आणि **मिल्लुकद्रथ** हें बह्मनीच्या ईशान्येस दोन मैलांवरचें मुगरदरा हें असावें. दान दिलेलें **श्रीपर्णका** गाव मात्र सध्या त्या प्रदेशांत आढळत नाही, पण तें बह्मनी व मुगरदरा यांच्या मध्यभागीं असावें असें वाटतें. **दर्भविरक** या गावाचाहि पत्ता लागत नाही.

वरील विवेचनावरून तिरोडी ताम्रपटांतल्या प्रमाणे प्रस्तुत ताम्रपटांतीलहि कांही गावें बालाघाट जिल्ह्यांत सापडतात हें दिसून येईल. सिवनी ताम्रपटांतील कांही गावें भंडारा जिल्ह्यांत आढळतात हें मागे दाखविलें आहे. तेव्हा द्वितीय प्रवरसेनाच्या खास अमलाखालील प्रदेशांत बालाघाट व भंडारा जिल्हे अन्तर्भूत होते व त्याचें राज्य दक्षिण कोसलाच्या पश्चिम मर्यादेपर्यंत पसरलें होतें यांत संशय नाही.

वाचन[१]

ओळ **तिसरा पत्रा : पहिली बाजू**

१ प्रभावतिगुप्तायास्समुत्पन्नस्य[२][३] शम्भो[:*] प्रसादधृति(त)-
शूल(ला)यु–

---

१. पाटणा संग्रहालयाने पाठविलेल्या छापावरून.

२. या अक्षरावरच्या वेलांटींतील बिंदु पत्र्याच्या दोषामुळे उत्पन्न झाला असावा.

३. इतर ताम्रपटांतल्या प्रमाणे 'प्रभावतिगुप्तायां समुत्पन्नस्य' असें वाचावें.

२ धस्य वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)प्रवरसेनस्य वचना[त्*] सुन्धाति-

३ मार्ग्गे ब्रह्मपुरकस्य पूर्व्वत[:*] मिल्लुकद्रथस्थापरत[:*]

४ मधुकज्झर्य्या[:*] चोत्तरत[:*] दर्भविरकस्या(स्य) दक्षिणत[:*] श्रीपर्ण्णका

५ नाम्न(म्ना) ग्रामः तत्र कुटुम्बिनो ग्रामवासिनश्च वक्तव्या [:*]

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

६ यथास्माभिः यशपुरे मार्ग्गे[1] माणपल्लिकाया ऽ पूर्व्वप्रतिग्र-

७ हप्रतिवस्तु मातृभट्टारिकानां(णां) पुण्योपचये ऐहिकामुष्मि-[2]

८ भारद्वाजसगोत्रवेद्यार्य्यपुत्रगङ्गार्य्य-कौण्डिण्य(न्य)सगो-

९ त्रवसुरार्य्यस्य[3] कौण्डिण्य(न्य)तैत्तिरिकरुद्रार्य्याण(णां) ससीमान्तं[4]

१० परिच्छेदेन सपञ्चाशत्को ग्रामो दत:(त्तः ॥)

---

१. कदाचित् 'यशपुरमार्ग्गे' असें विवक्षित असेल.

२. हें पद अपूर्ण राहिलें आहे. 'ऐहिकामुष्मिकहितार्थं' असें वाचावें. इतर ताम्रपटांत 'इहामुत्रहितार्थं' असें पद येतें.

३. 'वसुरार्य्य-' असें वाचावें आणि पुढील नामाशीं समास करावा. लेखकाने तीन्ही नामांचा समास करून शेवटीं अनेकवचन योजिलें आहे.

४. या अक्षराचा अनुस्वार कदाचित् खोडला असेल.

१५. द्वितीय प्रवरसेनाचा रामटेक ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट नागपूरपासून २८ मैलांवर रामटेक-जवळ मनसर गावीं मॅंगेनीजसाठी खणत असतांना सापडला. याचे मूळचे पांच पत्रे होते असें दिसतें. ते मॅंगनीजच्या ठेकेदारांनी आपसांत वाटून घेतले. त्यांपैकी कांही ठेकेदार परगावीं गेल्यावर, या ताम्रपटाची बातमी नागपूरचे बॅरिस्टर श्री. जी. पी. डिक यांस समजली. त्यांना मोठ्या प्रयासानें त्यांपैकी एकच पत्रा मिळवितां आला. तो त्यांच्या संग्रहीं ते इंग्लंडला परत जाईपर्यंत होता. नंतर तो पत्राहि गहाळ झाला. सुदैवानें त्यांनी त्याचे छाप व फोटोग्राफ कै. डॉ. रायबहादूर हीरालाल यांजकडे पाठविले होते. त्यांवरून त्यांनी त्यावर एक लहानसें टिप्पण आपल्या ‘मध्यप्रदेश व वऱ्हाड यांतील कोरीव लेख’ या इंग्रजी पुस्तकांत प्रसिद्ध केलें आहे. हा पत्रा प्रकाशित झाला नव्हता, म्हणून मी कै. हीरालाल यांस त्याचे छाप मला देण्याविषयी विनंती केली. त्यांनी ते मला पाठविले, पण तेहि पोष्टांत गहाळ झाले. शेवटीं त्यांनी आपल्या जवळचे त्याचे फोटोग्राफ मजकडे पाठविले. त्यांवरून मी ठशांसहित त्याचें वाचन नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल (क्रमांक ३, पृ. २०–२१) मध्ये प्रसिद्ध केलें. त्याच ठशांवरून त्याचें वाचन येथे दिलें आहे.

वर्णन—पुढे दाखविल्याप्रमाणे प्रस्तुत पत्र्यावर एक वाकाटक दानपत्र कोरलें आहे. असें दानपत्र बहुधा पांच पत्र्यांवर कोरलें असतें. त्यांपैकी पहिल्या दोन पत्र्यांवर दान देणाऱ्या राजाची प्रथम प्रवरसेनापासून वंशावळ दिलेली असते. तिसऱ्या पत्र्यावर दान दिलेल्या ब्राह्मणाचें नांव, शाखा व गोत्र, दानाचा प्रसंग, दान दिलेल्या गावाचें नांव किंवा भूमीचें प्रमाण, त्याच्या चतुःसीमा वगैरे माहिती लिहिली असते. चौथ्या पत्र्यावर दानाच्या अटी व ब्राह्मणास करांदिकांपासून दिलेली

सूट यांचा निर्देश असतो. त्यानंतर पांचव्या पत्र्यावर शापाशीर्वादात्मक श्लोक, दानाचें शासनवर्ष, सेनापति, लेखक व दूतक यांचीं नांवें इत्यादि माहिती असते. प्रस्तुत पत्र्यावर दानाच्या अटी, करांदिकांपासून सूट, यांचा निर्देश असल्यामुळे हा पत्रा चौथ्या क्रमांकाचा असावा.

डॉ. हीरालाल यांनी मला पाठविलेल्या या पत्र्याच्या फोटोग्राफची लांबी ५·६ इंच व रुंदी ३·१ इंच होती. डाव्या बाजूस कडेपासून सुमारें १·३ इंचावर मध्यभागीं $\frac{3}{10}$ इं. व्यासाचें छिद्र कडीकरिता केलेलें दिसलें. या फोटोग्राफचें स्केल (प्रमाण) माहीत नसल्यामुळे मूळ पत्र्याची नक्की लांबी व रुंदी समजत नाही. फोटोग्राफवरून हा पत्रा चांगल्या स्थितींत होता असें दिसतें, कारण त्यावरील लेखाच्या शेवटच्या दोन ओळींतील दोनतीनच अक्षरें गंजामुळे खराब झालीं आहेत. पत्र्याच्या प्रत्येक बाजूवर पांच ओळी आहेत. पहिल्या बाजूवरील शेवटची ओळ जागेच्या अभावीं इतरांपेक्षा लहान झाली आहे.

अक्षरवटिका—अक्षरवटिका द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांतल्या प्रमाणे पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत--वाकाटकांच्या ताम्रपटांत व्यंजनयुक्त औकार द्विभागात्मक असतो. या ताम्रपटांतहि 'पौत्रा–' (ओ. ७) या शब्दांत तो दोन वक्ररेषांनी दाखविला आहे, पण उजव्या बाजूची रेषा उजवीकडे न वळवतां डावीकडे वळविली आहे. दीर्घ ईकाराची वेलांटी सामान्यतः डावीकडे वळविली आहे (उदाहरणार्थ, 'क्षीर,' ओ. ४ पहा), पण 'भुञ्जीतः' (ओ. ७–८) मध्ये ती उजवीकडे वळलेली दाखविली आहे. जिह्वामूलीय आणि उपध्मानीय यांचीं चिन्हें ओ. ४ व ८ यांत आलीं आहेत.

भाषा—लेखाची भाषा संस्कृत असून त्याचा अवशिष्ट भाग पूर्णपणें गद्यांत आहे. पुढे दिलेल्या वाचनावरून प्रस्तुत लेख अत्यंत

निष्काळजीपणाने लिहिलेला दिसतो. संधींचा अभाव, विसर्गांचा अयोग्य लोप, 'ण' बद्दल 'न', 'कारयीत' यासारखीं अशुद्ध रूपें अनेक ठिकाणीं दिसतात. पण यासारख्या चुका वाकाटकांच्या अनेक ताम्रपटांत आढळतात. पहिल्या ओळीच्या शेवटीं व तिसऱ्या ओळींत 'आत्मानुग्रहाय' नंतर लेखकाने अनवधानाने कित्येक अक्षरें गाळलीं आहेत.

विषय—या ताम्रपटाचे पहिले तीन पत्रे गहाळ झाल्यामुळे त्यांतील दानविषयक माहिती-दाता व दान घेणारा यांचीं नावें, दानाचा प्रसंग, विषय इत्यादि-नष्ट झाली आहे. तथापि याची अक्षरवटिका द्वितीय प्रवरसेनाच्या पाटणा संग्रहालयांतील व इतर ताम्रपटांतल्या सारखीच असल्यामुळे तो त्याच वाकाटक नृपतीने दिला होता असें दिसतें. आरंभींच्या शब्दावरून प्रस्तुत ताम्रपट दात्याने आपलें स्वतःचें पुण्य, आयुष्य, बल व ऐश्वर्य यांच्या वृद्धीकरिता दिला होता असें दिसतें. तेव्हा प्रस्तुत पत्रा पाटणा संग्रहालयांतील ताम्रपटाच्या गहाळ झालेल्या पत्र्यांपैकी असणें शक्य नाही. कारण तो ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाने आपल्या मातेच्या पुण्यवृद्धीकरिता व ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाकरिता दिला होता, असें त्यांत म्हटलें आहे. यानंतरच्या भागांत इतर वाकाटक ताम्रपटांतल्या प्रमाणे अग्रहाराच्या मर्यादा दिल्या आहेत. शेवटीं, कोणीहि या दानाच्या उपभोगांत व्यत्यय आणूं नये, कोणी आणल्यास व ब्राह्मणांनी तक्रार केल्यावर त्यास दंड व शिक्षा केली जाईल अशी ताकीद दिली होती, पण तिचा थोडाच भाग प्रस्तुत पत्र्यावर आला आहे. शेवटचा पत्रा गहाळ झाल्यामुळे शासनवर्ष, लेखक व दूतक यांचीं नावें, इत्यादि माहिती नष्ट झाली आहे.

प्रस्तुत ताम्रपटाचे अनेक पत्रे गहाळ झाल्यामुळे त्यायोगें आपल्या ऐतिहासिक ज्ञानांत कांहीच भर पडत नाही.

वाचन[1]

ओळ

चौथा पत्रा : पहिली बाजू

१ सर्व्वाद्ध्यक्षनियोगनियुक्ता आज्ञासञ्चारिकुलपुत्राधगत–[2]

२ पूर्व्वसमाज्ञया[3] ।[4] वक्तव्या अथास्माभिरात्मधर्म्मायुर्ब्बल–

३ मैश्वर्य्यविवृद्धये[5] इहामुत्र चात्मानुग्रहाय[6] अभट–

४ श्छत्रप्रावेश्य[7][:*] अपारम्परगोबलिवर्द्द[:*] अपु[ः]फ[8]क्षीर–सन्दो–

५ ह[:*] अपाचासन[9]चर्म्माङ्गार[:*] अलवणक्लिन्नो–

---

१. नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल, क्रमांक ३, पृ. २८ समोरील फोटोवरून.

२. 'कुलपुत्राधिकृता भटाश्छात्राश्च' असें वाचावें. जांब ताम्रपट (क्रमांक ३), ओळ २१ पाहा.

३. 'विश्रुतपूर्व्वसमाज्ञया' असें वाचावें. तिरोडी आणि चम्मक ताम्रपटांत 'विश्रुतपूर्व्वयाज्ञया' असा पाठ आहे.

४. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

५. '–र्ब्बलैश्वर्य्य–' असें वाचावें.

६. येथे 'एष ग्राम उदकपूर्व्वमतिसृष्टः। अथास्योचिताम्पूर्व्वराजानुमतां चातुर्व्वैद्याग्रहारमर्यादां वितरामस्तद्यथा' यासारखे शब्द गळले आहेत.

७. 'अभटच्छात्रप्रावेश्यः' असें वाचावें.

८. 'अपुष्प–' असें वाचावें.

९. इतर ताम्रपटांत 'अचारासन–' असा पाठ आहे. पट्टन ताम्रपटांत मात्र येथल्याप्रमाणेच पाठ आहे.

चौथा पत्रा : दुसरी बाजू

६ क्रेणिखनक[1][:*] सर्व्वे (वि) ष्टिपरिहारपरिहि (हृ) तः सपरिक्लिप्तो-

७ परिक्लिप्त[2] आचन्द्र (न्द्रा) दित्यकालीय[:*] पुत्र[पौ]त्रानुगामी [।*] भु-

८ ञ्जीतः[3] न केनचिव्या (द्व्या) घातःकर्त्तव्य[:*] सर्व्वक्रियाभि (भी) रक्षि-

९ तव्यः परिवर्द्धयितव्यश्च [।*] यश्चास्मच्छासनमगनयमान[4]

१० स्वल्पामपि परिबाधा कूर्य्यात्कारयीता वा[5] तस्य ब्राह्मणै[6]-

---

१६. दुर्ग येथील अपूर्ण ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट मध्यप्रदेशाच्या दुर्ग जिल्ह्यांतील पूर्वीच्या पानाबारस जमीनदारीच्या मोहल्ला या मुख्य गावीं सापडला. त्याचा एक छाप कै. डॉ. हीरालाल यांच्याकडे वाचनाकरिता पाठविला होता, पण तो त्यांना महत्त्वाचा न वाटल्यामुळे त्यांनी त्याचा उल्लेख

---

१. 'अलवणकिण्वक्रेणिखनकः' असें वाचावें. पुणें ताम्रपट ओळ १७ पाहा.

२. 'सक्लृप्तोपक्लृप्तः' असें वाचावें.

३. 'भुञ्जतः' असें वाचावें.

४. '-मगणयमानः' असें वाचावें.

५. 'परिबाधां कुर्य्यात्कारयेद्वा' असें वाचावें.

६. हें वाक्य येणेंप्रमाणे पूर्ण करावें '- र्वेदितस्य सदण्डनिग्रहं कुर्य्याम ।'

आपल्या 'मध्यप्रदेश व वऱ्हाड यांतील कोरीव लेख' या पुस्तकांत केला नाही. १९३४ सालीं त्यांच्या पत्रांतील एका उल्लेखावरून मला त्याची माहिती झाली. नंतर माझ्या विनंतीवरून त्यांनी तो छाप मजकडे पाठविला. सुदैवाने त्यावर त्यांनी त्याच्यावर ताम्रपटाच्या मालकाचें नांव लिहून ठेवलें होतें. त्यावरून दुर्गचे डेप्युटी कमिश्नर श्री. बंब्रावाले यांनी चौकशी केली असतां असें समजलें की हा ताम्रपट मोहल्ला येथे सापडला होता. आता तो नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला आहे. त्यावरील लेख मी प्रथम भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, पु. १५, यामध्ये ठशासह आणि नंतर एपिग्राफिया इंडिका, पु. २२, पृ. २०७ इ. मध्ये ठशाशिवाय प्रसिद्ध केला. पूर्वीच्याच छापावरून केलेलें त्याचें वाचन येथे दिलें आहे.

वर्णन—प्रस्तुत पत्रा कोणा वाकाटक नृपतीच्या ताम्रपटाच्या चार पांच पत्र्यांपैकी अगदी आरंभींचा आहे. त्यावर एकाच बाजूने कोरलें आहे. त्याची लांबी ८ इंच, रुंदी ३·७५ इंच आणि वजन १९½ तोळे आहे. त्याची जाडी $\frac{1}{20}$ इंच असल्यामुळे उपलब्ध सर्व ताम्रपटांत तो पातळ दिसतो. डाव्या बाजूस कडेपासून १·९ इंच अंतरावर मध्यभागीं ·३५ इंच व्यासाचें कडीकरिता केलेलें छिद्र आहे, पण कडी मात्र सापडली नाही. प्रस्तुत पत्र्याचा आकार आणि छिद्राचें स्थान यांवरून तो पाटणा संग्रहालय ताम्रपटाच्या पत्र्यांपैकी नव्हे हें उघड आहे.

या पत्र्यावर फक्त पांच ओळी कोरल्या आहेत. अक्षरें सुंदर काढलीं असून, पत्रा पातळ असतांहि, मागील बाजूवर उमटलेलीं दिसत नाहीत. पत्र्याच्या कडा उठावदार केल्या नाहीत. तथापि लेख उत्कृष्ट स्थितींत आहे.

अक्षरवटिका—अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकाराची आहे. अक्षरांचें वर्णन ऋद्धपूर ताम्रपटांतल्या प्रमाणें आहे. त्यांचे उल्लेखनीय विशेष येणेप्रमाण—व्यंजनयुक्त औकार द्विभागात्मक आहे; 'ड' चा

पृष्ठभाग वाटोळा असून तें 'द' हून फारसें भिन्न नाही; 'षोडश्य-' (ओ. १) पाहा; 'म' ची खालची पेटी डाव्या बाजूच्या रेषेला जोडली आहे, 'अग्निष्टोमा-' (ओ. १) पाहा; हा 'म' पुढे शरभपुरनृपति व तीवरदेव यांच्या तामपटांतल्या आकृतींत परिणत झाला. (स्वररहित) 'त्' व 'म्' हीं व्यंजनें लहान आकाराने दाखविलीं असून 'म्' च्या खाली पेटी नसून लांबट गाठ आहे.

भाषा--या लेखाची भाषा संस्कृत असून सर्व भाग गद्यांत आहे. इतर लेखांतल्या प्रमाणे 'य्' च्या पूर्वी आणि 'र्' च्या नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे.

चर्चा-प्रस्तुत लेखाच्या आरंभींचा स्थाननिर्देश वगळल्यास त्याचा इतर भाग द्वितीय प्रवरसेन आणि द्वितीय पृथिवीषेण यांच्या ताम्रपटांतल्या सारखाच आहे. अवशिष्ट भागांत प्रथम प्रवरसेन या एकाच वाकाटक नृपतीचें नांव आलें आहे. त्याच्या वर्णनानंतर त्याचा पौत्र प्रथम रुद्रसेन याचें वर्णन—भारशिव महाराज भवनाग याचा दौहित्र व स्वामिमहाभैरवाचा अत्यंत भक्त इत्यादि—सुरू होतें, पण तें अपूर्ण राहिलें आहे. प्रस्तुत ताम्रपट पद्मपुराहून दिला जाणार होता असें आरंभींच्या उल्लेखावरून समजतें.

या ताम्रपटावरील लेख अपूर्णच राहिला असें दिसतें. कारण वाकाटकांच्या पूर्ण झालेल्या ताम्रपटांच्या आरंभीं येणारा 'दृष्टम्' हा शब्द याच्या आरंभीं आढळत नाहीं. पहिल्या ओळीच्या आरंभीं तीन अक्षरांना पुरेशी जागा सोडली आहे त्यावरून लेख पूर्ण झाल्यावर तेथे 'दृष्टम्' हा शब्द कोरण्याचें योजिलें होतें हें स्पष्ट दिसतें. शिवाय प्रस्तुत पत्र्याच्या शेवटच्या ओळींत पांच अक्षरांना पुरेशी जागा मोकळी राहिली आहे. तेथे इतर वाकाटक ताम्रपटांतल्याप्रमाणे 'भवनागदौहित्रस्य' याच्या नंतर येणारा 'गौतमीपुत्रस्य' हा शब्द कोरतां आला असता. किंबहुना त्यांतील पहिल्या अक्षराच्या वरच्या मात्रा

कोरण्यास सुरवातहि झाली होती असें या पत्र्यावरील खुणांवरून दिसतें, पण तें अक्षर कोरण्यापूर्वीच कोरक्याला थांबण्याविषयी आज्ञा झाली असावी. पुढे हा लेख इतर ताम्रपटावर लिहिला गेला किंवा नाही तें समजण्यास आज साधन नाही.

कालनिश्चय—प्रस्तुत ताम्रपट कोणी देण्याचें योजिलें होतें हेंहि सांगणें कठीण आहे. द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतील अक्षरवटिकेशीं याच्या अक्षरांचें साम्य लक्षांत घेतां हा ताम्रपट त्याचाच असावा असें वाटणें शक्य आहे, पण द्वितीय प्रवरसेनाचे आतापर्यंत सापडलेले बहुतेक ताम्रपट आरंभींच्या 'नन्दिवर्धन' किंवा नंतरच्या 'प्रवरपुर' या राजधानींतून दिले होते. प्रस्तुत ताम्रपट त्याचा असता तर त्यांत बहुधा प्रवरपुराचा निर्देश आला असता. पद्मपुर हें तीर्थ असल्याचा उल्लेख नाही, किंवा 'वासकात्' यासारखा शब्दहि त्याला जोडला नाही. तेव्हा पद्मपुर ही तत्कालीन वाकाटक राजधानी असावी असें अनुमान करण्यास हरकत नाही. मागे दाखविल्याप्रमाणें प्रस्तुत ताम्रपटाची अक्षरवटिका द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतल्यापेक्षा नंतरची दिसते. तेव्हा हा ताम्रपट द्वितीय प्रवरसेनानंतरच्या कोणा वाकाटक नृपतीने पद्मपुर या आपल्या राजधानीहून दिला असावा असें म्हणण्यास हरकत नाही.

द्वितीय प्रवरसेनाचा पुत्र नरेन्द्रसेन याच्या कारकीर्दींत हें राजधानीचें स्थलांतर झालें असावें. बालाघाट ताम्रपटांत 'द्वितीय पृथिवीषेणाने आपल्या निमग्न वंशाचा उद्धार केला' असें वर्णन आलें आहे. त्यावरून त्याचा पिता नरेन्द्रसेन याच्या कारकीर्दींत विदर्भावर कोणा परकी राजाने स्वारी केल्यामुळे वाकाटक वंशाला अवनतावस्था आली होती असें अनुमान करतां येतें. ही स्वारी नलवंशी भवदत्तवर्म्याने केली असावी, कारण त्याने विदर्भाचा पश्चिम भाग काबीज केल्यावर वाकाटकांची पूर्वींची राजधानी नन्दिवर्धन येथूनच आपला ऋद्धपुरचा

ताम्रपट दिला होता. या आपत्कालांत कोसला व मेकला या आपल्या पूर्वेकडील राजनिष्ठ मांडलिकांच्या राज्याशेजारीं पद्मपुर येथे नरेन्द्रसेनाने आपली राजधानी नेली होती असें दिसतें. नंतर नरेन्द्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याने नलांना विदर्भांतून हाकून लावलें, एवढेंच नाही तर त्यांच्या राज्यावर स्वारी करून त्यांची पुष्करी ही राजधानीहि उद्ध्वस्त केली असें पोडागड येथील शिलालेखावरून स्पष्ट दिसतें.

पद्मपुरच्या निर्देशाचें महत्त्व—ताम्रपटांतील पद्मपुराचा निर्देश आणखीहि एका दृष्टीने महत्त्वाचा आहे. खिस्तोत्तर आठव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेलेल्या भवभूतीने दक्षिणापथामध्ये विदर्भांतील पद्मपुर येथे आपले पूर्वज राहत होते असें आपल्या महावीरचरित व मालतीमाधव या नाटकांत म्हटलें आहे. हे पूर्वज मोठे मीमांसक होते व त्यांनी वाजपेयासारखे मोठे श्रौत यज्ञ केले होते. वाकाटक नृपतिहि श्रौतविद्येचे अभिमानी असून त्यांनीहि मोठमोठे सोमयाग केले होते. तेव्हा त्यांनी भवभूतीच्या पूर्वजांस आपल्या राजधानीस मोठ्या सन्मानाने बोलावून त्यांचा योगक्षेम चालविला असला तर त्यांत आश्चर्य नाही. वाकाटकांच्या कालानंतर मात्र विदर्भांत कोणी मोठें राजघराणें राज्य करीत नसल्यामुळे भवभूतीला उत्तरेंत जावें लागलें आणि शेवटीं त्याला कनोजच्या यशोवर्म्याच्या दरबारीं राजाश्रय मिळाला, असें दिसतें.

स्थलनिश्चय—भवभूतीच्या नाटकांतील उल्लेखावरून **पद्मपुर** विदर्भांत होतें यांत संशय नाही. प्राचीन विदर्भ हा आधुनिक वऱ्हाडपेक्षा मोठा होता. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकावरून त्याचा अर्धा भाग वर्धा नदीच्या पूर्वेस पसरला होता असें स्पष्ट दिसतें. सिवनी, इंदूर व तिरोडी ताम्रपटांतील स्थलनिर्देशावरून हल्लीचे बालाघाट व भंडारा हे जिल्हे द्वितीय प्रवरसेनाच्या खास अमलाखाली होते, हें उघड आहे. शिवाय, 'पद्मपुर' या नांवाचीं गांवें सध्या वऱ्हाडांत सापडत नसून चांदा व भंडारा जिल्ह्यांत निदान सहा तरी

आढळतात. या गावांपैकी भंडारा जिल्ह्यांतील आमगांवाजवळचें 'पद्मपुर' हेंच प्राचीन पद्मपुर असावें. या गावांत बरेच प्राचीन अवशेष आढळतात. त्यांमध्ये विष्णु व इतर हिंदू देवांच्या, त्याचप्रमाणे पार्श्वनाथ व ऋषभदेव या जैन तीर्थंकरांच्या मूर्ति, मोठमोठे शिलास्तंभ, ८ फू. × १ फू. ७ इं. × १ फू ६ इं. अशा विशाल आकाराची गणेशपट्टी हे अवशेष उल्लेखनीय आहेत. तेथे मोडकळीस आलेल्या कांही देवळांचे अवशेषहि दृष्टीस पडतात. तेथून आणलेली भगवान् शंकराची उत्कृष्ट कोरीव काम केलेली विशाल मूर्ति नागपूरच्या संग्रहालयांत ठेवली आहे. विदर्भातील दुसऱ्या कोणत्याहि पद्मपुरीं असे अवशेष असल्याचें ऐकिवांत नाही. तेव्हा आमगांवाजवळचें पद्मपुर हेंच एका काळीं वाकाटकांच्या राजधानीचें नगर व भवभूति कवीचें जन्मस्थान पद्मपुर होय असें म्हणावयास हरकत नाही.

ओळ

वाचन[1]

१ पद्मपुरात्[2][।*] अग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्यषोडश्यतिरात्र-
वाजपेयबृहस्पतिसवसाद्यस्क्रचतुरश्व-
२ मेधयाजिनः विष्णुवृद्धसगोत्रस्सम्राजः वाकाटकानाम्महा-
राजश्रीप्रवरसेनस्य सूनोः सूनोः
३ अत्यन्तस्वामिमहाभैरवभक्तस्य अंसभारसन्निवेशित-
शिवलिङ्गोद्वहनशिवसुपरि-

१ मूळ ताम्रपटावरून. या पत्र्यावरील लेखाचा ठसा भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (पु. १५) प्रसिद्ध झाला आहे.

२. या शब्दाच्या अगोदर तीन अक्षरें कोरण्यास पुरेशी जागा रिकामी ठेवली आहे. इतर ताम्रपटांत त्या ठिकाणीं 'दृष्टम्' असा शब्द येतो.

४ तुष्टसमुत्पादितराजवंशानां पराक्रमाधिगतभागि(गी)-
रथ्यमलजलमूर्द्धना(र्द्धा)भिषिक्त(क्ता)नाम्

५ दशाश्वमेधावभृत(थ)स्नातानाम्भारशिवानाम्महाराज-
श्रीभवनागदौहित्रस्य[1]

---

१७. द्वितीय पृथिवीषेणाचा बालाघाट ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट सन १८९३च्या मे महिन्यापूर्वी बालाघाट जिल्ह्यांतील एका ठिकाणीं झाडाला बांधून ठेवलेला आढळला. तो नंतर बंगाल एशियाटिक सोसायटीकडे पाठविण्यांत आला. त्याच्या संपादनाचें काम प्रो. कीलहॉर्नकडे सोपविण्यांत आलें होतें. त्यावरचा त्यांचा लेख त्यांच्या निधनानंतर एपिग्राफिया इंडिकामध्ये (पु. ९, पृ. २६७ इ.) ठशांसह प्रसिद्ध झाला आहे. त्याच ठशांवरून त्याचें वाचन येथे केलें आहे. सध्या ताम्रपट कोठे आहे तें माहीत नाही.

वर्णन—या ताम्रपटाचे पांच पत्रे असून त्यांची लांबी सुमारें ६$\frac{3}{4}$ इं. आणि रुंदी सुमारें ४ इं आहे. त्यांपैकी दोन पत्र्यांवर कांहीच कोरलें नाही. बाकीच्या तीन पत्र्यांपैकी पहिल्या व तिसऱ्या पत्र्यांच्या एका बाजूवर आणि दुसऱ्या पत्र्याच्या दोन्ही बाजूंवर लेख आहे. पत्र्यांच्या कडा जाड केल्या नव्हत्या, तरीहि लेख चांगल्या स्थितींत आहे. हे पत्रे प्रत्येक पत्र्याला डाव्या बाजूच्या कडेपासून १$\frac{1}{4}$ इं. अंतरावर मध्यभागीं केलेल्या छिद्रांतून गेलेल्या कडींत ओवले आहेत. ही कडी वर्तुलाकार असून तिची जाडी $\frac{3}{4}$ इं. व व्यास सुमारें ३ इं. आहे. या

---

१. या शब्दानंतर १·३ इंच जागा रिकामी राहिली आहे. एका अक्षराच्या अस्पष्ट खुणा या ठिकाणीं मूळ पत्र्यावर दिसतात.

कडीवर फिरणाऱ्या दुसऱ्या एका लहान तांब्याच्या कडीला २$\frac{3}{7}$ इं. व्यासाचा वर्तुलाकार तांब्यांचा पत्रा जोडला आहे. त्यावर मुद्रेचा लेख कोरावयाचा होता, पण तें काम झालें नाही.

हा ताम्रपट वाकाटक नृपति द्वितीय पृथिवीषेणाने देण्याचें योजिलें होतें, पण तो कांही कारणाने पूर्णपणे कोरला गेला नाही असें दिसतें. त्याच्या फक्त तीन पत्र्यांवर ३५ ओळी कोरल्या आहेत.

लिपी—प्रस्तुत लेखाची लिपी पेटिकाशीर्षक असून ती द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतल्या सारखी आहे, फक्त अक्षरांचें वळण जास्त वाटोळें आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत 'अज्झित–' (ओ. ३१) मधील 'झ' हें इतरत्र क्वचित येणारें अक्षर ध्यानांत घेण्यासारखें आहे; 'ड' व 'द' यांचे आकार भिन्न आहेत; 'व' हें अक्षर कांही ठिकाणीं चौकोनी तर इतरत्र वाटोळें काढलें आहे; जिह्वामूलीयाचें चिह्न तिसाव्या ओळींत आलें आहे; विसर्ग एका खाली एक काढलेल्या दोन वक्र रेषांनी दाखविला आहे. कांही ठिकाणीं 'रि' बद्दल 'ऋ,' 'ण' 'व' 'न' यांचा घोटाळा, आणि अनुस्वाराबद्दल 'ङ्' व 'न' हे लेखनाचे विशेषहि उल्लेखनीय आहेत.

चर्चा—मागे सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत ताम्रपट वाकाटक नृपति द्वितीय पृथिवीषेणाने देण्याचें योजिलें होतें. त्याची द्वितीय प्रवरसेनापर्यंतची वंशावळ इतर ताम्रपटांतल्या प्रमाणेंच दिली आहे. दहाव्या ओळींतील कांही शब्द मात्र लेखकाच्या निष्काळजीपणामुळे गळलेले दिसतात. द्वितीय प्रवरसेनाच्या वर्णनांत त्याने पूर्वीच्या राजांच्या चरित्राचें अनुसरण केलें होतें आणि उत्तम राजनीति, बल व पराक्रम यांच्या योगें सर्व शत्रूंचा उच्छेद केला होता ही जास्त माहिती आली आहे. पुढे द्वितीय प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र नरेन्द्रसेन याने स्वतः पूर्वीच प्राप्त केलेल्या गुणांच्या योगें वंशलक्ष्मी हस्तगत केली, आणि त्याच्या आज्ञा कोसला, मालव व मेकला या देशाचे अधिपति सादर पाळीत

असत असें म्हटलें आहे. नरेन्द्रसेनानंतर त्याला कुन्तल राजकन्या अज्झितभट्टारिकेपासून झालला पुत्र द्वितीय पृथिवीषेण हा गादीवर आला. त्याने आपल्या अवनत वंशाचा उद्धार करून महाराज ही पदवी धारण केली व तो परमभागवत म्हणजे भगवान् विष्णूचा निस्सीम उपासक होता ही माहिती त्याच्या वर्णनांत आली आहे. या द्वितीय पृथिवीषेणाने वेम्बार येथील आपल्या शिबिरांतून प्रस्तुत ताम्रपट देण्याचें योजिलें होतें, पण त्याच्या शासनांतील आरंभींचे तीन पत्रे कोरल्यावर कांही कारणाने तें काम बंद पडलें असें दिसतें. प्रस्तुत ताम्रपट पूर्णपणें लिहिला गेला नव्हता हें त्याच्या आरंभीं इतर पूर्ण ताम्रपटांतल्या प्रमाणें 'दृष्टम्' हा शब्द कोरण्याकरिता पुरेशी जागा ठेवली असतांहि तो शब्द कोरला नाही त्यावरून स्पष्ट दिसतें. दानपत्र पूर्णपणें लिहिलें गेलें नसल्यामुळे शासनवर्ष, लेखक व दूतक यांचेहि उल्लेख त्यामध्ये आले नाहीत.

स्थलनिश्चय—द्वितीय पृथिवीषेणाच्या तत्कालीन शिबिराचें स्थान **वेम्बार** ह्याचा शोध बरेच दिवस लागला नव्हता. दुर्ग ताम्रपटावरील आपल्या लेखांत मी तें वैनगंगेच्या पश्चिमेस दोन मैलांवर आणि चांद्याच्या पूर्वेस २८ मैलांवर असलेलें बेंबाल हें असावें असें दाखविलें आहे.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ ... [2] वेम्बारवासकादग्निष्टोमाप्तोर्य्यामोक्थ्य -
२ षोडश्यतिरात्रवाजपेयबृहस्पतिसवसाद्य-

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. ९ मधील २७०-२७१ या पृष्ठांसमोरील ठशांवरून.

२. येथे तीन अक्षरांपुरती जागा सोडली आहे. इतर ताम्रपटांच्या आरंभीं 'दृष्टम्' शब्द येतो.

३ स्कचतुरश्वमेधयाजिन[:*] विष्णुवृद्धसगोत्र-
४ स्य सम्राट(जो) वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)-
प्रवरसे-
५ नस्य [सू]नोस्सूनोः अत्यन्तस्वामिमहा-
६ भैरवभक्तस्य ।[1] अन्स[2]भारसण्णि(न्नि)वेशितशिव-
७ लिङ्गोद्वहनशिवसुपरितुष्टसमुत्पादित-
८ राजवङ्शाना[3]म्पराक्रमाधिगतभागिरत्थ्यामल[4]-
९ जलमूर्द्[5]ध्नाभिषिक्तानान्दशाश्वमेधाव-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१० भृथस्नाताना[6]म्भारशिवानाम्महाराज श्रि(श्री)रुद्रसे-
११ नस्य सूनोः अत्यन्तमाहेश्वरस्य सत्यार्ज्जव-
१२ कारुन्य(ण्य)शौर्य्यविक्रमनयविनयमाहा-
१३ त्म्यधिमत्व[7]पात्रगतभक्तित्वधर्म्मा(र्म)विजयित्व-
मणो(नो)-
१४ नैर्म्मा(र्म)ल्यादिर्गु(गु)णसमुदितस्य वर्ष्ष(र्ष)शत-
१५ मभिवर्द्धमानकोशदण्डसाधनसन्तानपुत्र-

१. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

२. 'अंस–' असें वाचावें.

३. 'वंशाना–' वाचावें.

४. 'भागीरत्थ्यमल–' असें वाचावें.

५. '–जलमूर्द्धाभिषिक्ताना–' असें वाचावें.

६. येथे 'महाराजश्रीभवनागदौहित्रस्य गौतमीपुत्रस्य पुत्रस्य वाकाटकानाम्' असे शब्द अनवधानामुळे गळले आहेत.

७. 'धीमत्त्व' असें वाचावें.

१६ पौतृ(त्रि)णः युधिष्ठिरवृत्तेर्[१]व्वाकाटकानाम्महा–
१७ राज[श्रि](श्री)पृथिविषेणस्य सूनो[:*] भगवत–
१८ श्चक्रपाणे[:*] प्रसादोपार्ज्जितश्रि(श्री)–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१९ समुदयस्य वाकाटकानाम्महाराजश्रि(श्री)रुद्र–
२० सेनस्य सूनोः [२]पूर्व्वराजानुवृत्तमाग्गा(र्ग्गा)णु(नु)सा–
२१ रिणः सुनयबलपराक्रमोच्छि(च्छि)ण्ण(न्न)सर्व्वद्वि–
२२ षः महाराजाधिराजश्रि(श्री)देवगुप्तसुताया–
२३ म्प्रभावतीगुप्तायामुत्पण्ण(न्न)स्य वाकाट–
२४ कवङ्शा(वंशा)लङ्कारभूतस्य शम्भोःप्रसादाद्ध्र(द्धृ)–
२५ तकार्त्तयुगस्[३]य वाकाटकानाम्महाराज्ज(ज)श्रि(श्री)–
२६ प्रवरसेनस्य सूनोः पूर्व्वाधिगतगुण–
२७ विश्वा[सा ?] दपहृतवङ्[४]शश्रियः कोसला–

तिसरा पत्रा

२८ मेकलामालवाधिपति[भि*]रभ्यर्च्च(र्च्चि)तशासन-
स्य प्र–

---

१. प्रथम 'ठिव' असें कोरलें होतें, नंतर 'र्व्वा' अशी दुरुस्ती करण्यांत आली.

२. द्वितीय प्रवरसेनाचें वर्णन करणारें हें आणि पुढील विशेषण त्याच्या सिवनी ताम्रपटांतच आढळतें.

३. येथे एक अनावश्यक 'इ' अक्षर खोदलें आहे.

४. 'वंश–' असें वाचावें.

२९ तापप्रलातारिसनस्य[१] वाकाटकानाम्महा-
३० राजश्रि(श्री)नरेन्द्रसेनस्य सूनोxकुन्तलाधिपति-
३१ सुताया(यां) महादेव्यामज्झितभट्टारिकायामु-
३२ त्पन्नस्य तेजःक्षमासन्निधानभु(भू)त-
३३ स्य ।[२] द्विमग्नवङशस्योद्धर्त्तुः[३] वाकाटकाना-
३४ म्परमभागवतमहाराजाधिराजश्रि(श्री)पृथिविषे-
३५ णस्य वचना[त्*] अस्मत्सन्तका[:*] सर्व्वाद्धिचक्ष[४]-

---

१. '–प्रणतारिशासनस्य' असें वाचावें.

२. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

३. 'निमग्नवंशस्य' असें विवक्षित असेल.

४. हें वाक्य अपूर्ण राहिलें आहे. 'सर्व्वाध्यक्षनियोगनियुक्ताः कुलपुत्राधिकृता भटाश्छात्राश्च विश्रुतपूर्वयाज्ञयाज्ञापयितव्याः' असें वाचावें.

ज्येष्ठ शाखेच्या मांडलिकांचे लेख

१८. भरतबलाचा बह्मनी ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट पूर्वीच्या रीवा संस्थानाच्या सोहागपूर तहसिलींतील बह्मनी गावीं सापडला होता. डॉ. बहादूरचन्द्र छाबडा यांनी त्यावर एक लहानसें टिप्पण 'भारतकौमुदी', भाग १ (पृ. २१ इ.) मध्ये प्रसिद्ध केलें व नंतर तो ताम्रपट एपिग्राफिया इंडिका, पु. २७ (पृ. १३२ इ.) मध्ये ठसे व इंग्रजी भाषांतर यांसह प्रकाशित केला. त्यांतील ऐतिहासिक माहितीवर मी इंडियन हिस्टॉरिकल रीसर्च इन्स्टिटयूटच्या 'इंडिका' नामक रौप्यमहोत्सवग्रंथांत (पृ. २६८ इ.) एक लेख प्रसिद्ध केला आहे. डॉ. छाबडांच्या लेखाबरोबर छापलेल्या ठशांवरून या ताम्रपटाचें वाचन येथे दिलें आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे तीन पत्रे असून ते सुमारें ७$\frac{3}{4}$ इं. लांब व ४$\frac{1}{2}$ इं. रुंद आहेत. ते एका $\frac{1}{4}$ इं. जाडीच्या कडींत ओवले आहेत ही कडी पत्र्यांच्या डाव्या बाजूस मध्यभागीं असलेल्या $\frac{3}{4}$ इं. व्यासाच्या छिद्रांतून जाते. कडीचीं दोन टोकें एका लहानशा मुद्रेच्या मागील बाजूस जोडलीं आहेत. मुद्रेवर चिन्ह किंवा अक्षरें दिसत नाहीत. पत्र्यांवरील लेख उत्तम स्थितींत आहे. पहिल्या आणि तिसऱ्या पत्र्यांच्या एका बाजूवर कोरलें आहे. एकंदर लेख ४९ ओळींचा असून त्यांपैकी पहिल्या पत्र्यावर १२ ओळी, दुसऱ्या पत्र्याच्या प्रत्येक बाजूवर १३ ओळी आणि तिसऱ्या पत्र्यावर अकरा ओळी कोरल्या आहेत. सर्व पत्रे, कडी आणि मुद्रा यांचें वजन ९४ तोळे आहे.

अक्षरवटिका—अक्षरवटिका कीलशीर्षक प्रकारची व दक्षिणी पद्धतीची आहे. तिचें प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटाशीं बरेंचसें साम्य आहे, पण तींत त्या ताम्रपटांतल्याप्रमाणे उत्तरी अक्षरांचें मिश्रण आढळत नाही. लिपीचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—व्यंजनरहित ऱ्हस्व इकार दोन बिंदूंवर काढलेल्या दोन परस्परांस जोडलेल्या वक्ररेषांनी दाखविला आहे ('इति', ओ. ३ पाहा); व्यंजनयुक्त 'ई'चें दीर्घत्व ऱ्हस्व इकाराच्या वेलांटींत टिंब देऊन दाखविलें आहे ('आसीद्', ओ. १ पाहा); व्यंजनरहित 'ए' 'ओ' आणि 'औ' यांची अनुक्रमें, ओ. २५ व १६ यांतील रूपें उल्लेखनीय आहेत. 'म'च्या डोक्यावर चौकोनी पेटी काढली आहे ('सुविमल', ओ. १ पाहा). दोन या संख्येचें चिह्नहि उल्लेखनीय आहे. इतरत्र दिसतें त्याप्रमाणे ती संख्या एकावर एक काढलेल्या वक्र रेषांनी दर्शविली नसून तिचें चिह्न नागरी लिपींतल्या सारखें आहे.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून त्याचा कांही भाग पद्यांत व बाकीचा गद्यांत आहे. पदाच्या शेवटच्या 'न्' बद्दल अनुस्वार, 'र्' च्या पूर्वी व नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व, क्वचित् अनुस्वाराबद्दल 'ङ्', 'व्' बद्दल 'ब्', 'ऋ' बद्दल 'रि' इत्यादि लेखनाचे विशेषहि उल्लेखनीय आहेत. लेखनांत अनेक चुका झाल्या आहेत, त्या खालील वाचनाच्या तळटीपांत दुरुस्त केल्या आहेत.

विषय—हा लेख मेकला देशावर राज्य करणाऱ्या पांडववंशी भरत किंवा भरतबल राजाचा आहे. त्याचा उद्देश मेकला देशाच्या उत्तरराष्ट्रांतील पंचगर्ता विषयांत असलेला वर्द्धमानक नामक गाव त्या राजानें माध्यन्दिनशाखी व वत्सगोत्री लोहित नामक ब्राह्मणाला दान दिला, हें नमूद करण्याचा होता. या ताम्रपटाचा लेखक राहसिक ईशानाचा पुत्र शिव, आणि कोरक्या सुवर्णकार ईश्वराचा पुत्र मिहिरक हा होता. त्याचा काळ शासनवर्ष २, भाद्रपद कृष्ण त्रयोदशी, पुष्य नक्षत्र, असा दिला आहे.

जयबल
|
वत्सराज—(राज्ञी) द्रोणभट्टारिका
|
महाराज नागबल—(राज्ञी) इन्द्रभट्टारिका
|
महाराज भरत ऊर्फ इन्द्र—(राज्ञी) लोकप्रकाशा.

यांतील पहिल्या दोन राजांच्या बाबतींत राजपदवी योजिली नाही याचें कारण त्यांचें वर्णन पद्यांत केलें आहे, हें असावें. त्यानंतरच्या नागबल व भरतबल यांचें वर्णन प्रथम गद्यांत व नंतर एक दोन श्लोकांत केलें आहे. त्या दोघांचीहि 'महाराज' पदवी उल्लेखिली असून ते परममाहेश्वर म्हणजे शंकराचे निस्सीम उपासक, ब्राह्मणांचे महान् आश्रयदाते आणि परमगुरुदेवताधिदैवतविशेष (म्हणजे अत्यंत आदरणीय, देवतेसारखे व साक्षात् परमेश्वर असे) होते असें म्हटलें आहे. राजांच्या दैवी अंशाचा उल्लेख करणारीं अशीं विशेषणें वाकाटकांच्या कोरीव लेखांत आढळत नाहीत.[1] पण यासारखे 'परमदेवताधिदैवत' हें विशेषण सोरो आणि पतियाकेल्ला ताम्रपटांत आलें आहे, हें डॉ. छाबडा यांनी दाखविलें आहे.

पांचव्या श्लोकावरून भरत किंवा भरतबल नृपति इंद्र या नावांनेहि प्रसिद्ध होता असें दिसतें. सहाव्या आणि आठव्या श्लोकांत त्याची इंद्राशीं तुलना केली आहे त्यावरूनहि ही गोष्ट सिद्ध होते. भरतबलानें कोसला देशाची राजकन्या देवकुलोत्पन्न लोकप्रकाशा हिच्याशीं विवाह केला होता. ती दक्षिण कोसलच्या पांडववंशांतील असावी हें डॉ. छाबडा यांचें मत ग्राह्य वाटत नाही. त्या काळीं दक्षिण कोसलावर पांडववंशी

१. गुप्तांच्या कांही दानपत्रांत 'परमदैवत' हें विशेषण तत्कालीन राजाला लावलेलें आढळतें. ए. इं., पु. १९, पृ. १३३, १३५, १३८, १४२ पाहा.

राजाचें राज्य होतें काय याचा संशय आहे. तें होतें असें मानलें तरी ते राजे भरतबलाचे समानोदक नसले तरी निदान सगोत्र मानले गेले पाहिजेत, कारण भरतबलहि पांडववंशांतच जन्मला होता. तेव्हा या दोन कुलांत असा शरीरसंबंध होणें हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें शक्य नाही. तेव्हा लोकप्रकाशा दक्षिण कोसलच्या 'शूर' वंशांतील असावी. गुप्त संवत् १८२[1] (खिस्तोत्तर ५०१–२) या वर्षी दिलेल्या आरंग ताम्रपटावरून त्या काळीं राज्य करणाच्या द्वितीय भीमसेनाच्या पूर्वी त्याचे निदान पांच पूर्वज राज्य करीत होते असें दिसतें. त्यांचीं नांवें अशीं–शूर, दयित (किंवा प्रथम दयितवर्मन्), विभीषण, प्रथम भीमसेन आणि द्वितीय दयितवर्मन्. तेव्हा भरतबलाने जिच्याशीं विवाह केला होता ती लोकप्रकाशा दक्षिण कोसलाच्या प्रथम भीमसेनाची कन्या असावी.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें हे मेकला देशाचे राजे आपण पांडवकुलांत जन्मलों असें मानीत असत. अकराव्या श्लोकांतील वर्णनांत श्लेषाच्या योगें या राजवंशाला सौम्य म्हणजे चंद्रवंशोत्पन्न म्हटलें आहे. पांडव हे सोमवंशी होते हें सुविख्यात आहे.

डॉ. छाबडांनी दाखविल्याप्रमाणें अकराव्या श्लोकांत केवळ भरतबल या नरेन्द्राचें (राजाचें) वर्णन नसून त्यांत वाकाटक नृपति नरेन्द्रसेन याचीहि स्तुति अभिप्रेत आहे. बालाघाट ताम्रपटावरून नरेन्द्रसेनाच्या आज्ञा कोसला, मेकला व मालव या देशांचे अधिपति शिरसावंद्य मानीत असत असें समजतें. याचा अर्थ हे राजे त्या वाकाटक नृपतीचे मांडलिक होते असा करण्यांत येतो. आरंग ताम्रपटांत कोसला देशाचे राजे वाकाटकांच्या अधिराज्याचा स्पष्टपणें उल्लेख करतांना दिसत नाहीत. त्याप्रमाणेंच मेकला देशचा राजा भरतबलहि वाकाटकांचें

---

१. या लेखाचें वर्ष २८२ नसून १८२ आहे, हें मी इतरत्र दाखविलें आहे. ए. इं., पु. २६, पृष्ठ २८८.

स्वामित्व स्पष्टपणें जाहीर करीत नाही, तथापि वरील श्लोकांत त्याने तें सूचित केलें असणें असंभवनीय नाही.

अधिकारी—ज्या अधिकाऱ्यांना प्रस्तुत दानपत्राची वार्ता कळविली आहे त्यांमध्ये ग्रामकूट, द्रोणाग्रकनायक, देववारिक व गंडक यांचा निर्देश आहे. यांतील ग्रामकूटाशिवाय इतर अधिकाऱ्यांचा उल्लेख इतरत्र आढळत नाही. ग्रामकूट हा अर्थातच ग्रामाधिकारी किंवा पाटील होय. द्रोणाग्रकनायक हा द्रोणाग्रकाचा मुख्य असावा. हें द्रोणाग्रक म्हणजे कौटिलीय अर्थशास्त्रांत उल्लेखिलेलें द्रोणमुख असावें. चारशें ग्रामांमध्ये एक द्रोणमुख असावें असें त्या अर्थशास्त्रांत म्हटलें आहे. त्या मुख्य ग्रामाच्या नायकाला द्रोणाग्रकनायक अशी संज्ञा असेल. देववारिक हा देवालयांचा व तीर्थांचा निरीक्षक असावा असें डॉ. छाबडा म्हणतात. कदाचित् देववारिक हें दौवारिकाबद्दल चुकीने पडलें असेल. तसें असल्यास हा अधिकारी म्हणजे शुक्रनीतिसारांत उल्लेखिलेला प्रतीहार असावा. हा प्रतीहार नगर किंवा ग्राम यांतील संरक्षक दलाचा (पोलिसांचा) प्रमुख असे. गंडक म्हणजे भट किंवा सैनिक असावा. या अधिकाऱ्यांकडे सारावसुलीचें व गावांतील सुरक्षिततेचें व सुव्यवस्थेचें काम असे. म्हणून त्यांस भूमिदानाची माहिती कळविणें जरूर असे.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांतील स्थलांचा शोध डॉ. छाबडा यांनी लावला आहे. **मेकला** हें अमरकंटकसभोवारच्या प्रदेशाचें नांव. अमरकंटक पर्वतावर उगम पावणाऱ्या नर्मदेला मेकलसुता म्हणतात. **वर्धमानक** म्हणजे जेथे हा ताम्रपट सापडला तें बम्हनी गाव. **पंचगर्ता** याचा अर्थ पांच प्रवाह जेथे मिळतात ती दरी असा असावा. बम्हनीच्या आसमन्तात् जवळ जवळ वाहणारे असे पांच ओढे असून पुढे ते शोण नदास जाऊन मिळतात. सहडोलच्या दक्षिणेस तीन मैलांवर पाचगांव नामक गाव आहे, तें कदाचित् प्राचीन पंचगर्ता विषयाचें मुख्य गाव असेल.

वाचन[1]

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धम्[2][।*] स्वस्ति:[3][।*] आसीद्यः पाण्डवानां सुविमलयशसामन्वये भूरिधाम्ना(म्नां) रा–

२ जाभूत्मे(न्मे)कलायां क्षितिपतितिलकः संप्रसूतोरुकीर्त्ति(र्त्तिः) [।*] श्रीमां(मान्) श्रीसं–

३ विधा[ता*] जयबल इति यः ख्याप्यते स्वैर्य्यशोभिः लोकेस्मि(स्मिन्) सर्व्वदे(दै)[व*]

४ प्रवरगुणगणालङ्कृतश्चार(रु)मूत्ती(र्त्ति)ः[4][॥१*] तस्याहवाहृतजयः प्रथि[तो दया*]–

५ वां(वान्) वत्सेश्वरः प्रतिसमो गुणवान्विधिज्ञः [।*] पुत्त्रोभवद्रिपुग्रहोप[5]–

६ वनानि येन वन्यैर्मृगैः प्रचुरतामुपपादितानि ॥[6] [२॥*] महानुभाव[:*]

७ सुकृतप्रशंन्सि(सी) गुणान्तरज्ञः पुरुषोपभोग्यः [।*] सद्धर्म्मशीलो(लः) सुनय[प्र]–

८ धानः श्रीवत्सराज(जो) नृपतिर्व्व(र्ब्ब)भूव[7] ॥ [३॥*] तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातः प–

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २२७, पृ. १४०–४१ समोरील ठशांवरून.

२. हा शब्द चिह्नाने दर्शविला आहे.

३. हा निसर्ग निरर्थक आहे.

४. वृत्त–स्रग्धरा.

५. 'गृहो–' असें वाचावें.

६. वृत्त–वसंततिलका.

७. वृत्त–उपजाति.

९ रममाहेश्वरः परमब्रह्मण्यः परमगुरुदेवताधिदैवत-
विशेष[:*]

१० श्रीमां[1] श्रीमत्यां देव्यां द्रोणभट्टारिकायामुत्पन्नः
श्रीमहाराजना-

११ गबलः [।*] तुरगखुरनिपातक्षुण्णमार्ग्गा धरित्रि(त्री)
मलिनयति दिगन्तां(न्तान्)

१२ पा(पां)सुरूक्षाकुलान्तां(न्तान्) [।*] मदमलिनकपोला
वारणा यस्य

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१३ य(या)तः प्रशममुपनयन्ते शीकरार्द्रां[2](द्रान्) क्षणेन ।[3]
[।४।।*] ततस्तस्य पुत्रस्तत्पादा-

१४ नुध्यातः परममाहेश्वरः परमब्रम(ह्म)ण्यः परमगुरु-
देवताधिदैवत-

१५ विशेषः श्रीमत्यां देव्यामिन्द्रभट्टारिकायामुत्पन्नः श्री-
महाराजभरत[:*]

१६ इन्द्रो दयाशीलगुणान्विताया औदार्य्यचातुर्य्यसमं(म)-
न्विताया[:।*] पु-

१७ त्त्र[:*] प्रसूतोमलचारुकान्तिः शैलेन्द्रपुत्र्या इव कार्त्तिकेयः[4]
[।।५।।*] इन्द्रो दा-

---

१. 'श्रीमान्' असें वाचावें.

२. डॉ. छाबडा हें विशेषण 'धरित्री' याचें समजतात, पण अर्थाकडे दृष्टि दिली असतां तें दिगन्तान् याचें समजलें पाहिजे.

३. वृत्त-मालिनी. ४. वृत्त-इन्द्रवज्रा.

१८ रणिसंभवेथ हुतभुक्ततेजोज्वलस्नेहवांत्सद्वृत्त[1]स्थिति-विप्रमन्द्र[2]-

१९ विधृतप्र(प्रा)प्तप्रमाणोन्नति[:।*] दृष्टः साधुसुखोदयाय हि नृणां ध-

२० र्म्मार्थसंपादकः वेद्यामध्वरसंस्थिते वसुहुतः पूज्यः सतां सर्व्व-

२१ दा[3] । [।६॥*] येनोत्तुङ्गरिपुद्रुमैरविरलैर्भ्भ(र्भ्भ)ग्नैः समस्ता दिशश्छ(श्छ)न्ना दिध्व(ग्व)र-

२२ दन्तिनेव गुरुणा व्याक्रि(क्र)म्य विस्फूर्ज्जता[:*] । यस्यैव(वं) विचचेष्ट(ष्टि)तस्य नृ-

२३ पतेः कृत्स्ने महीमण्डल(ले) सौराज्यश्री(श्रि)यमाद-धातु विपुला[4] धर्म्मार्थकाम-

२४ प्रदाः[5] [।।७।।*] श्रीभरतः क्षितिनाथः क्षितिपतितिलकः सुरेन्द्रसमवि(वी)र्य्यः [।*]

---

१. 'हुतभुक्तेजोज्ज्वलः स्नेहवान् सद्वृत्त' असें वाचावें.

२. 'मन्त्र' असें वाचावें.

३. वृत्त—शार्दूलविक्रीडित.

४. डॉ. छावडा 'नृपतेः' बद्दल 'नृपतिः' आणि 'आदधातु' बद्दल 'आदधाति' असे पाठ सुचवितात. यापेक्षा 'विपुला' बद्दल 'विपुलां' आणि 'धर्म्मार्थकामप्रदाः' बद्दल 'धर्म्मार्थकामप्रदा' असे पाठ घेतले असतां अर्थ जास्त चांगला निघेल असें वाटतें. असे पाठ घेतल्यास शब्दांचा अन्वय पाहा—'यस्य कृत्स्ने महीमण्डले धर्म्मार्थकामफलप्रदा मही विपुलां सौराज्यश्रियमादधातु।

५ वृत्त—शार्दूलविक्रीडित.

२५ विनिहतरिपुगुणलक्ष्मि(क्ष्मीं) दधार यः संश्रृ(श्रि)तां स्वभुजो:(जे)[1] [॥८॥*] एकैव[2]

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

२६ स्फटिकविमलशुभ्रं वि(बि)भ्रति(ती) शीलतोयान्[3] । यमनियमु(म)तटान्तप्रान्तशु–

२७ द्धप्रव(वा)हं(हम्) [।*] प्रशमगुणगणोम्मिया(र्म्मिर्या) जनं पावयंति(यन्ती) स्वयमिह सुर–

२८ लोकादागता जाह्नवीव[4] ॥ [९॥*] श्रीमच्चान्द्रा(न्द्रां)शुक्कि(की)र्त्तेर्भरतव(ब)लनृपस्योत्तम(मा) र(रा)ज–

२९ पत्नि(त्नी । जाता अ(था) कौ(को)सलायाम्मरजकुलजा किति(कीर्ति)म(मु)च्चैर्दधाता(ना) ॥(।) शश्वद्धर्म्मा(र्थ)–

३० कार(म)प्रतिविहिततमातीवलोकप्रकाशा[5] याता र(पौ)त्रैः प्रपौत्रैर्न[य]विनयर–

---

१. वृत्त–आर्या.

२. 'एकैव' ह्या शब्दांचा पुढील श्लोकाशीं संबंध नाही. त्यांचा अन्वय श्लो. १० मधील 'भरतवलस्य राजपत्नी' या शब्दांशीं करावा.

३. 'तोयम्' असें वाचावें. पुढील विरामचिह्न निरर्थक आहे.

४. वृत्त–मालिनी.

५. '–प्रतिविहिततमा:' आणि 'अतीव' यांचा येथे केलेला संधि बरोबर नाही. 'शश्वद्धर्म्मार्थकामप्रतिविहिततमा:' याचा विग्रह 'शश्वद्धर्म्मार्थकामैः प्रतिविहितं तमः यया' असा करावा म्हणजे राणीचें 'लोकप्रकाशा' हें नांव सार्थ होईल.

३१ तै राजसि(सिं)घै(है): प्रतिष्ठा [म्*][1] ॥ [१०॥*]
योसौ संपूर्णशक्तित्रयविनिपतितानेकसामं(म)न्त-

३२ मूर्द्धप्रोद्घृष्टोत्फुल्लपपर्दतिचलनय(यु)[2]गाक्रान्तदिक्र॰
(क्च)क्रवाल: [।*] सौम्य: सो-

३३ यण्य(ञ्च) वंश: प्रभव इति जने कीर्त्यें(र्त्य)ते यस्य
चोच्चै: स श्रीमां(मान्)सवभुवास्त्र-

३४ तिर्यं[3] गुणा(ण)गणोदि(दी)र्णवैरो ने(न)रेन्द्र:
[॥११॥*] तत: मेकलायं(यां) उत्तरराष्ट्रे पा[ञ्च][4]ग-

३५ र्त्ताविषये वर्द्धमानके ।[5] ग्रामकु(कू)टद्रोणाग्रकनायक-
देववारिकगण्डक-

३६ प्रमुखां(खान्) सर्वां(र्वा)नेव यथाप्रतिवासिन: समा-
ज्ञापयति विदितमस्तु

३७ महैयपादैरयं[6] ग्रासा(म:) साद्र[गा:][7] सोपरिकर: अचाट-
भटप्रवेशी(श्य:) सनि-

---

१. या व पुढील श्लोकाचें वृत्त-स्रग्धरा.

२. येथे 'पद्मद्युति' असा पाठ डॉ. छाबडा यांनी सुचविला आहे.

३. 'सार्वभौमप्रथित-' असें वाचावें.

४. हें अक्षर 'ण्ड' सारखें दिसतें, पण येथे डॉ. छाबडांचा पाठ स्वीकारला आहे.

५. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

६. येथे 'मदीयपादै:' असें विवक्षित असेल, पण तें दात्याच्या तोंडीं विलक्षण दिसतें.

७. 'सोद्रङ्ग:' असें वाचावें.

३८ धि: सोपनिधि:[1] श्चो(चो)रदण्डवर्जितं[2] चतु:सि(सी)-
मापर्य्यन्त आचन्द्रार्कक्षित(ति)-

तिसरा पत्रा

३९ तारकानिरोधेन मात(ता)पित्रोरात्मनश्च पुण्याभिवृध-
(द्ध)ये वत्ससगोत्रश्रीमा-
४० द्धिच(द्धच)न्दिनलोहितसरस्व(स्वा)मिन:(ने)
प्रतिपादिते(त इ)त्यवगम्य यथोचितभागभो-
४१ गेनाज्ञाश्रवणविधेयैर्भवितव्यमिति [।*] स्वयमाज्ञापना
[।*] ये चास्मद्वङशे[3] समुत्प-
४२ द्यन्ते राजान:[4] स्तैरपीयं दत्तिरनुमोदनीयानुपालनीया च
[।*] य:[5]श्चैमां(तां) दत्ति(त्तिं) विलोपमा-
४३ प(पा)दयिष्यति स पञ्चभिर्महा[पा*]तकै: संयुक्त[:*]
स्य(स्या)दिति [।*] बहुभिर्वसुधा भुक्ता राज-
४४ भिस्सगरादिभि: [।*] यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य
तदा फलं(लम्)[6] [।।१२।।*] षष्टिं वर्षस-

---

१. हा विसर्ग निरर्थक आहे.

२. 'चोरदण्डवर्जं' असें वाचावें. हें पद 'अचाटभटप्रवेशी-(श्य:)' याच्या पूर्वी घातलें पाहिजे.

३. '–द्वंशे' असें वाचावें.

४. हा विसर्ग निरर्थक आहे.

५. हा विसर्गहि निरर्थक आहे.

६. या व पुढील श्लोकांचें वृत्त–अनुष्टभ्.

४५ हस्राणि स्वर्ग(र्गे) मोदति भूमिद [।*] आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव नरके वसेत् [॥१३॥*] स्व-

४६ दत्ता(त्तां) परदत्ता(त्तां) बा(वा) यत्नाद्रक्ष नराध(धि)प [।*] मही(हीं) महि(ही)मतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपालन[म्*] ॥ [१४॥*]

४७ समाप्तं चेदं शासनं(नम्) [॥*] प्रवर्द्धमान [1] । विजय-राज्यसंवत्सरे २ भ(भा)द्रपदकृष्णत्र-

४८ योदश्यां पुष्यनक्षत्त्रेण [।*] लिखितं[2]ञ्चेदं शासनं राह-सिकेशानपुत्रेण शिवेनो-

४९ त्कीर्णञ्च सुवर्ण्णकारेश्वरपुत्रेण मिहिरकेने(णे)ति ॥

---

१९ व २०. व्याघ्रदेवाचे नचना येथील शिलालेख

उपलब्धि—हे दोन शिलालेख जनरल कनिंगहॅम् यांस १८८३–८४ या सालीं सापडले. त्यांनी त्यांचे छाप व त्यांपैकी मोठ्या शिलालेखाचें स्वतः केलेलें वाचन आपल्या आर्किऑलॉजिक सर्व्हे ऑफ इंडिया रिपोर्टांत (पु. २२१, पृ. ९७ इ.) प्रसिद्ध केलें. नंतर हे शिलालेख ठसे व इंग्रजी भाषांतर यांसह डॉ. फ्लीटने कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह), ग्रंथ तिसरा (पृ. २३३ इ.) यांत प्रसिद्ध केले. त्याच ठशांवरून येथे त्यांचें वाचन दिलें आहे.

वर्णन—हे लेख पूर्वीच्या जसो संस्थानांतील कुठारा गडाच्या बाहेर आणि नचने की तलाई या गावाजवळ एका मोठ्या मोकळ्या

१. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

२. हा अनुस्वार निरर्थक आहे.

शिलाखंडावर कोरले आहेत. क्रमांक १९ चा लेख अपूर्ण असून तो त्या शिलाखंडाच्या एका बाजूवर कोरला आहे. क्रमांक २० चा लेख त्याच शिलाखंडाच्या समोरच्या पृष्ठभागावर कोरला असून तो पूर्ण आहे. पहिला लेख अपूर्ण असण्याचें कारण शिलाखंडाची ती बाजू खडबडीत आहे हें असावें. म्हणून दुसऱ्या बाजूवर त्या लेखाचा आरंभ पुनः करून तो पूर्ण करणें जरूर झालें असावें.

क्रमांक १९ च्या लेखाने १ फू., ९$\frac{3}{4}$ इं. लांब व ७$\frac{1}{2}$ इं. रुंद जागा व्यापली आहे. क्रमांक २० चा लेख १ फू., ९ इंच लांब व १ फू. रुंद जागेंत लिहिला आहे. मोठ्या लेखाच्या मध्यभागीं एका चक्राची आकृति कोरली आहे. जायस्वालांच्या मतें हें वाकाटकांचें विशिष्ट चिन्ह असावें.

अक्षरवटिका—दोन्ही लेखांची अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिच्या कालाविषयीं विद्वानांमध्ये मोठा मतभेद उत्पन्न झाला आहे. फ्लीटने या प्रश्नाचा विचार बारकाईने केला नव्हता. त्यावेळीं त्याची जरूरीहि नव्हती; कारण त्या काळीं पृथिवीषेण नांवाचा एकच वाकाटक राजा ज्ञात होता. त्या (प्रथम) पृथिवीषेणाच्या काळीं त्याचा मांडलिक व्याघ्रदेव याने हे लेख कोरविले असें मत डॉ. फ्लीटने प्रतिपादिलें. त्यानंतर प्रकाशित झालेल्या बालाघाट ताम्रपटावरून दुसरा एक पृथिवीषेण प्रथम पृथिवीषेणाच्या चौथ्या पिढींत होऊन गेला हें माहीत झालें. तेव्हापासून प्रस्तुत शिलालेखांत उल्लेखिलेला पृथिवीषेण पहिला किंवा दुसरा या प्रश्नावर विद्वानांमध्ये दोन तट पडले आहेत. डॉ. सुखटणकर, डॉ. जायसवाल, प्रो. हेमचंद्र रायचौधुरी, डॉ. अळतेकर इत्यादिकांच्या मतें तो प्रथम पृथिवीषेण असावा. पण कै. रा. ब काशीनाथ नारायण दीक्षित यांनी असें दाखविलें आहे की या लेखांची अक्षरवटिका प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटांतील अक्षरवटिकेपेक्षा नंतरची आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुत

ताम्रपटांत उल्लेखिलेला पृथिवीषेण हा द्वितीय प्रथिवीषेण असावा असें आपलें मत व्यक्त केलें. प्रो. जूव्हो डुब्रुइल व डॉ. मुजुमदार यांचेंहि मत तसेंच आहे. अलीकडे डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी या प्रश्नाला पुनः चालना दिली असून 'नचना व गंज शिलालेखांची अक्षरवटिका द्वितीय विंध्यशक्तीच्या वाशीम ताम्रपटाच्याहि अक्षरवटिकेपेक्षा अगोदरची आहे' असें म्हटलें आहे. या मताला प्रमाण म्हणून प्रस्तुत लेखांतील 'व' या अक्षराचें त्रिकोणाकृति रूप आणि 'ज' व 'त' या अक्षरांचीं जुनीं रूपें यांचा निर्देश त्यांनी केला आहे. या प्रमाणांवरून प्रस्तुत लेख प्रथम पृथिवीषेणाच्या काळचेच आहेत असें त्यांचें निश्चित मत आहे. हा मतभेद लक्षांत घेतां प्रस्तुत प्रश्नाचा जरा बारकाईने विचार करणें जरूर झालें आहे. डॉ. सरकार यांचें मत असें दिसतें की 'व' अक्षराचें त्रिकोणाकृति रूप प्रथम पृथिवीषेणाच्या काळानंतर लौकरच प्रचारांतून गेलें, आणि द्वितीय पृथिवीषेणाच्या काळीं 'व' चें काटकोनाकृति रूप प्रचलित होतें; म्हणून प्रस्तुत लेख द्वितीय पृथिवीषेणाच्या काळचे असणें शक्य नाही. पण तत्कालीन कोरीव लेखांच्या पुराव्यावरून हें मत बरोबर दिसत नाही. वास्तविक पाहतां 'व' अक्षराचें काटकोणाकृति रूप प्रथम पृथिवीषेणाच्या काळापूर्वींच प्रचारांत आलें होतें. उदाहरणार्थ, समुद्रगुप्ताच्या एरण शिलालेखाच्या 'कुलवधूः' (ओ. २०), 'विचिन्त्य' (ओ. २४) इत्यादि ठिकाणचें 'व' चें रूप पाहा. दुसरें असें की 'व' चें त्रिकोणाकृति रूप प्रथम पृथिवीषेणाच्या काळानंतर लागलीच प्रचारांतून गेलें नाही. कारण तें द्वितीय चंद्रगुप्ताच्या सांची शिलालेखांत आढळतें; उदाहरणार्थ, 'महाविहारे' (ओ. १), 'सर्व्वगुण-' (ओ. ८) इत्यादि ठिकाणचें त्या अक्षराचें रूप पाहा. किंबहुना 'व'चें त्रिकोणाकृति रूप यानंतरहि पुष्कळ काळ प्रचारांत राहिलें असें दिसतें. वाकाटकांच्या लेखांत सामान्यतः त्या अक्षराचें काटकोणाकृति रूप दिसतें, तर नलवंशी स्कन्दवर्म्याच्या पोडागड शिलालेखांत (उदाहरणार्थ, 'भवदत्तस्य', ओ. ३; 'अप्रवेश्यम्', ओ. ८) आणि अर्थपतीच्या केसरी-

बेडा ताम्रपटांत (उदाहरणार्थ, 'विभः', ओ. १ ; 'ध्रुव', ओ. ७ या ठिकाणीं) त्रिकोणाकृति रूप आढळतें. स्कन्दवर्मा व अर्थपति हे द्वितीय पृथिवीषेणापूर्वी होऊन गेले नव्हते. वर उल्लेखिलेले सर्व लेख पेटिका-शीर्षक लिपींतच लिहिले आहेत तेव्हा 'व' चें त्रिकोणाकृति रूप हें प्रस्तुत लेख प्रथम पृथिवीषेणाच्या काळचे आहेत हें सिद्ध करण्यास 'रामबाण' प्रमाण नाही. हीच गोष्ट 'ज' व 'त' यांच्या तथाकथित जुन्या रूपांविषयीहि आहे. प्रस्तुत लेखांतील 'व' चें रूप जास्त कोनाकृति (angular) आहे हें खरें. पण याचें कारण लेखकाने त्या काळीं आपल्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या 'व' च्या रूपाचें अनुकरण केलें असावें हें होय. या बाबतींत लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की, बघेलखंडांत नचना व गंज येथील प्रस्तुत लेखच पेटिकाशीर्षक लिपींत लिहिले आहेत. त्या प्रदेशांत त्याकाळीं प्रचलित लिपी कीलशीर्षक (nail-headed) होती. हस्ती नृपतीचा मझगवां ताम्रपट व भरतबलाचा बम्हनी ताम्रपट यांची लिपी पाहा. नचना व गंज येथील शिलालेखांच्या लेखकाने वाकाटक सम्राटाला खूष करण्याकरितां पेटिकाशीर्षक लिपीचा उपयोग केला असला तरी त्याला ती लिपी चांगली परिचित नव्हती. म्हणून त्याने स्वतःला सराव असलेल्या कीलशीर्षक लिपींतील 'व'च्या रूपाचें न कळत अनुकरण केलें असें दिसतें. अशीच गोष्ट प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटाच्या बाबतींत झाली आहे. त्या ताम्रपटाचा लेखक उत्तर हिंदुस्थानांतील असल्यामुळे त्याला पेटिकाशीर्षक लिपीचा सराव नव्हता. त्याने त्या ताम्रपटाची मुद्रा पेटिकाशीर्षक लिपींत लिहिण्यास आरंभ केला, पण 'वाकाटक' अशीं पहिलीं चार अक्षरें त्या लिपींत लिहिल्यावर त्याने तो प्रयत्न सोडून दिला आणि बाकीचा लेख कीलशीर्षक लिपींतच कोरला. म्हणून 'व' चें त्रिकोणाकृति रूप हें प्रस्तुत लेख द्वितीय पृथिवीषेणाच्या पूर्वीच्या काळाचे आहेत हें सिद्ध करण्यास पुरेसें कारण नाही. 'ज' व 'त' यांच्या रूपांच्या बाबतींतहि तेंच म्हणतां येतें. असो.

भाषा—प्रस्तुत लेखांची भाषा संस्कृत असून दोन्ही लेख गद्यांत आहेत. क्रमांक २० च्या 'अनुध्यात' (आ. २) मध्ये 'य' च्या पूर्वी झालेलें 'ध्'चें द्वित्व एवढाच लेखनविशेष उल्लेखनीय आहे.

विषय—क्रमांक १९ चा लेख अपूर्ण आहे. त्याच्या पहिल्या ओळींत वाकाटक महाराज पृथिवीषेणाचा उल्लेख आहे, पण त्याचा मांडलिक व्याघ्रदेव याचें नांव अपूर्ण राहिलें आहे. क्रमांक २० च्या लेखांत या दोघांचीं नांवें आलीं असून व्याघ्रदेवाने आपल्या माता-पित्यांच्या पुण्योपार्जनाकरितां (देऊळ, विहीर किंवा तळें यासारखें) कांही केल्याचा उल्लेख आहे. या लेखांत कालनिर्देश नाही, पण तो वर दाखविल्याप्रमाणे द्वितीय पृथिवीषेणाच्या काळचा असल्याने सन ४७० ते ४९० या काळांत कोरला गेला असावा. प्रस्तुत लेखांतील व्याघ्रदेव हा उच्चकल्पवंशी व्याघ्र असावा. त्याच्या वंशजांचे लेख याच भागांत सापडले आहेत त्यांवरून तो या प्रदेशांतच राज्य करीत होता, यांत संशय नाही. या व्याघ्राचा पुत्र जयनाथ याचे ताम्रपट गुप्तसंवत् १७४ व १७७ या वर्षांचे सांपडले आहेत. त्यांवरून तो सुमारें गुप्तसंवत् १७० ते १९० पर्यंत राज्य करीत असावा. तेव्हा त्याचा पिता व्याघ्र याचा काल गुप्तसंवत् १५० ते १७० किंवा इ. स. ४७० ते ४९० हा येतो. हाच काळ वाकाटक सम्राट् द्वितीय पृथिवीषेणाचा असल्याने उच्चकल्पवंशी व्याघ्र हा त्याचा मांडलिक होता व त्यानेच हे दोन लेख कोरविले होते, असें म्हणण्यास हरकत नाही.

वाचन

ओळ

क्रमांक १९

१ वाकाटकाणां(नां) महा[2]राजश्रि(श्री)पृथिविषेण · · ·
२ · · · [व्या] [घ्र?]

---

१. फ्लीटच्या गुप्त इन्स्क्रिप्शन्स् (कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ३) पृ. २३४ समोरील ठशांवरून.
२. हें अक्षर प्रथम गाळलें होतें. नंतर तें खाली कोरलें आहे.

क्रमांक २०

१ वाकाटकाणा(नां) महाराजश्रि(श्री)-

२ पृथिविषेणपादा[1]नुद्ध्यातो

३ व्याघ्रदेवो मातापित्रो[:*] पुन्या(ण्या)र्थे

४ कृतमिति[2] [।*]

२१. व्याघ्रदेवाचा गंज येथील शिलालेख

उपलब्धि—हा लेख कै. राखालदास बॅनर्जी यांना सन १९१९ मध्ये आढळला. तो कै. डॉ. विष्णु सीताराम सुखटणकर यांनी त्याचे ठसे व इंग्रजी भाषान्तर यांसह एपिग्राफिया इंडिका, पु. १७, पृ. १२ इ., मध्ये प्रसिद्ध केला. त्याच ठशांवरून त्याचें वाचन येथे केलें आहे.

वर्णन—प्रस्तुत लेख पूर्वीच्या अजयगड संस्थानांतील गंज गांवानजीक मलुहा टोंगी नामक टेकडीजवळ एका डोंग्याच्या तळाशीं सापडलेल्या मोकळ्या शिलाखंडावर कोरला आहे. त्याच्या जवळच एका प्रवाहाचें पाणी अडवून धरण्याकरिता बांधलेल्या बांधाचे अवशेष दिसतात. या लेखाचें प्राप्तिस्थान नचना लेख जेथे सांपडला त्या कुठारा गावापासून फार दूर नाही.

मागील दोन लेखांपेक्षा प्रस्तुत लेख चांगल्या स्थितींत आहे. या लेखाने २ फू., १ इं. लांब व १ फू. रुंद जागा व्यापली आहे. नचन्याच्या लेखांतल्याप्रमाणे प्रस्तुत लेखाच्याहि मध्यभागीं एका चक्राची आकृति काढली आहे.

---

१. हें अक्षरहि प्रथम गाळलें होतें. मागाहून तें ओळीखाली लिहिलें आहे.

२. ‘ कृतवानिति ’ असें वाचावें.

लिपी—प्रस्तुत लेखाची लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून अक्षरांचें वळण मागील दोन लेखांतल्या सारखेंच आहे. डॉ. सुखटण-करांनी म्हटल्याप्रमाणें अक्षरें लहान मोठ्या आकाराचीं असून ओबड-धोबड दिसतात. लेखनाचे विशेष मागील दोन लेखांतल्या सारखेच आहेत.

विषय—हा लेख वाकाटक महाराज पृथिवीषेणाच्या चरणांचें चिन्तन करणाऱ्या व्याघ्रदेवाचा आहे. हा व्याघ्रदेव पृथिवीषेणाचा मांड-लिक होता, हें उघड आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश व्याघ्रदेवाने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपार्जनाकरिता कांही कृत्य केलें हें नमूद करण्याचा होता. हें कृत्य बहुधा जवळच वाहणाऱ्या प्रवाहाला बांध घालणें हें असावें. मागे दाखविल्याप्रमाणें हा व्याघ्रदेव इ. स. ४७० ते ४९० या कालांत होऊन गेलेला उच्चकल्प नृपति व्याघ्र असावा. त्याचा सम्राट् अर्थातच वाकाटक महाराज द्वितीय पृथिवीषेण हाच असला पाहिजे.

ओळ

वाचन[१]

१ वाकाटकाणा(नां) महाराज[श्रि][२](श्री)-

२ पृथिविषेणपादां(दा)नुद्ध्यातो व्याघ्रदे-

३ वो मातापित्रो[:*] पुन्या(ण्या)र्थे कृतमिति[३] [।*]

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. १७, पृ. १२ समोरील ठशांवरून.

२. वरचा इकार स्पष्ट नाही.

३. 'कृतवानिति' असें वाचावें.

वत्सगुल्म शाखेचे लेख

२२. द्वितीय विंध्यशक्तीचा वाशीम ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट विदर्भाच्या अकोला जिल्ह्यांतील वाशीम गावीं पंडित वासुदेवशास्त्री धनागरे यांस सापडला. तो प्रथम डॉ. य. खु. देशपांडे व श्री. द. ब. महाजन यांनी सन १९३९ मध्ये भरलेल्या भारतीय इतिहास परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाचा अहवालांत (पृ. ४५९ इ.) ठशांसहित प्रसिद्ध केला. नंतर श्री. महाजन आणि मी यांनी तो एपिग्राफिया इंडिकामध्ये नवीन ठसे व इंग्रजी भाषांतर यांसह संपादिला. त्याच ठशांवरून त्याचें वाचन येथे दिलें आहे. ताम्रपट सध्या वाशीम येथे धनागरे यांच्या संग्रहीं आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे चार पत्रे असून त्यांची लांबी ६.१ इंच, आणि रुंदी ३.४ इंच आहे. पहिल्या आणि चौथ्या पत्र्यांच्या एका बाजूवर आणि दुसऱ्या दोन पत्र्यांच्या दोन्ही बाजूंवर कोरलें आहे. पत्र्यांच्या कडा जाड केल्या नाहीत किंवा वाकविल्याहि नाहीत. तथापि लेख उत्तम स्थितींत आहे. प्रत्येक पत्र्याच्या डाव्या बाजूच्या कडेपासून १.२ इंच अंतरावर मध्यभागीं कडीकरिता ·२५ इंच व्यासाचें छिद्र आहे. त्यांतून घातलेल्या कडींत सर्व पत्रे ओंवले आहेत पण कडीवर मुद्रा नाही. सर्व पत्रे व कडी यांचें वजन ४७½ तोळे आहे. लेखाच्या एकूण ३० ओळी असून त्यांपैकी पत्र्याच्या प्रत्येक बाजूवर पांच पांच कोरल्या आहेत.

अक्षरवटिका—अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकारची असून सामान्यतः द्वितीय प्रवरसेनाच्या दानपत्रांतल्या सारखी आहे. तिचे

खालील विशेष उल्लेखनीय आहेत--व्यंजनरहित औकार द्विभागात्मक आहे;-'पौत्रस्य' (ओ. ३) पाहा; 'ख'ला कांही ठिकाणी गांठ नाही; उदाहरणार्थ 'रक्खध' (ओ. ३२) पाहा; 'त' व 'व' या अक्षरांमध्ये अनेक ठिकाणीं भिन्नता नाही; उदाहरणार्थ, 'वचनात्' (ओ. ५), 'हेमन्त' (ओ. २८), 'अनुमण्णति' (ओ. २६) पाहा; संयुक्त व्यंजनाचा पहिला किंवा दुसरा अवयव असतांना 'ण्' नें तेंच रूप योजिलें आहे; उदाहरणार्थ, 'अहिरण्णधाण्ण' (ओ. २०) पाहा. लेखाच्या २८ व २९ ओळींत ३०, ७ व ४ या संख्यांचीं दर्शक चिन्हें योजिलीं आहेत, तसेंच कोरलेल्या पत्र्यांच्या पहिल्या बाजूवर समासांत अनुक्रमदर्शक १ ते ४ या संख्यांचीं चिह्नें कोरलीं आहेत. त्यांपैकी चार या संख्येचें चिह्न उल्लेखनीय आहे. कारण त्यामध्ये 'क' या अक्षराच्या डोक्यावर वक्ररेषा जोडली नसून, त्याच्या खाली आडव्या रेषेच्या उजव्या टोंकाला ती जोडली आहे. शेवटचें स्वररहित व्यंजन लहान आकारानें दर्शविलें असून त्यावर पेटिका खोदली नाही; 'वचनात्' (ओ. ५) पाहा. विरामचिह्न म्हणून अर्धचंद्राकृति वक्ररेषेचा उपयोग केला आहे. पण बहुतेक ठिकाणीं हें विरामचिह्न निरर्थक आहे.

भाषा—लेखाची भाषा कांही भागांत संस्कृत व इतरत्र प्राकृत आहे. पहिल्या पांच ओळींत राजवंशाचें वर्णन संस्कृतमध्ये आहे, त्यानंतरचा दानविषयक भाग प्राकृतांत असून शेवटीं हीरहडगल्ली ताम्रपटांतल्या प्रमाणे मंगलवाक्य संस्कृतमध्ये आहे. पल्लव व बृहत्फलायन नृपतींच्या आरंभींच्या ताम्रपटांतल्याप्रमाणें प्रस्तुत ताम्रपटांतहि शेवटीं शापाशीर्वादात्मक श्लोक घातले नाहीत. संस्कृत भागांतील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे वाकाटकांचें गोत्र इतर ताम्रपटांतल्या प्रमाणे विष्णुवृद्ध असें दिलें नसून वृष्णिवृद्ध असें दिलें आहे. यांतील पहिलें रूपच गोत्रप्रवरग्रंथांत आढळतें, अतएव तेंच शुद्ध आहे. या लेखाचा प्राकृत भाग विशेष अभ्यासनीय आहे. कारण दक्षिण भारतांत जीं थोडीं

प्राकृतांत लिहिलेलीं दानपत्रें सांपडलीं आहेत त्यांपैकी हें आहे. या भागांतहि संस्कृत शब्दांचें मिश्रण आहे. उदाहरणार्थ, 'स्वस्तिशान्तिवाचने' (ओ. ८–९), 'समन्चमहाकरण' (ओ. २४) इ. पाहा. प्राकृत भागांतील दान दिलेल्या गांवाचे मर्यादापरिहार दाखविणारे शब्दसमुच्चय पल्लव नृपति शिवस्कंदवर्मन् याच्या ताम्रपटांतहि आढळतात. पण त्यांमध्ये अनेक ठिकाणीं संयुक्त व्यंजनांचा उपयोग केला आहे; उदाहरणार्थ, 'चातुवेज्जग्गाममज्जाता' (ओ· १९) पाहा. क्वचित् संयुक्त व्यंजनाबद्दल एकच व्यंजन योजलें आहे, जसें 'रेवतिजेसि' (ओ. १८). कांही ठिकाणीं यांतील प्राकृत भाषा व्याकरणकारांच्या नियमानुसार नाही. उदाहरणार्थ, 'तिण्णा' (ओ. १७) पाहा. वररुचीच्या (६, ५६) नियमाप्रमाणें 'तिण्णि' असें रूप पाहिजे. खालील रूपेंहि उल्लेखनीय आहेत—'तस्य' या अर्थाचें 'से' (ओ. १९); 'च' या अर्थाचें 'य' (ओ. ७, १९, २५ व २६); आणि 'एत्थङ्गामे' यांतील सन्धींतील अनुनासिक. प्रस्तुत दानपत्र महाराष्ट्रांतील असल्यामुळे त्यांत महाराष्ट्रीचा उपयोग व्हावा हें स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ, 'आपुणो', ओ. ९ (शुद्ध रूप 'अप्पणो' बद्दल) पाहा. पण यांत शौरसेनींतल्या सारखीं रूपें आढळतात हें विशेष आहे. उदाहरणार्थ, 'आधिवण्णिक' (ओ. ९) हें तद्धित रूप, आणि 'रक्खध', 'रक्खापेध', 'परिहरध', 'परिहरापेध' हीं क्रियापदाचीं रूपें पाहा. यांमध्ये शौरसेनींतल्याप्रमाणे 'थ्' चा 'ध्' झाला आहे. तसेंच 'दाणि' (ओ. ८) हें रूप पाहा. उलट 'मज्जाता' (ओ. ९) मध्ये 'द्' चा 'त्' पैशाचींतल्या प्रमाणे झाला आहे. तेव्हा प्राकृत वैयाकरणांच्या नियमानुसार कांटेकोरपणें सर्वत्र प्राकृत भाषा लिहिल्या व बोलल्या जात, असें दिसत नाही.

चतुर्थ्यर्थीं 'सि' (किंवा क्वचित् 'सिं') ज्यांच्या अंतीं आहेत अशीं रूपें विशेष उल्लेखनीय होत. उदाहरणार्थ, 'जिवुज्जेसिं' (सं. जीवार्याय), 'रुद्दजेसि' (सं. रुद्रार्याय), इत्यादि ओ. १०–१८ मधील रूपें पाहा.

प्राकृत व्याकरणकारांच्या मतें प्राकृतांतून चतुर्थी पूर्णपणें नष्ट झाली असून तिची जागा षष्ठीने घेतली आहे. प्राकृतांतील षष्ठयन्त रूपांच्या शेवटीं 'स्स' (अतिप्राचीन लेखांत 'स') येतो, आणि अशींच रूपें इतर प्राकृत कोरीव लेखांत दिसतात. प्रस्तुत ताम्रपटांतील चतुर्थीचें 'सि' (किंवा 'सिं') प्रत्ययान्त रूप लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी यासारख्या प्राचीन मराठी ग्रंथांत राहिलें आहे.

लेखनाचे पुढील विशेषहि उल्लेखनीय आहेत--'र्' नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व (उ. 'धर्म्म', ओ. ४) तसेंच 'ज्' बद्दल 'य्' चा उपयोग (उ. 'करेज्ज', ओ. २६), आणि अनुस्वाराबद्दल परसवर्ण (उ. 'विन्ध्य-शक्ते-', ओ. ५ आणि 'अचम्मङ्गालिक', ओ. २२).

विषय—इतर पूर्ण दानपत्रांप्रमाणें प्रस्तुत दानपत्राचाहि आरंभ 'दृष्टम्' (पाहिलें आहे) या शब्दाने होतो. 'सिद्धम्' हा मंगलवाचक शब्द हीरहडगल्ली ताम्रपटांतल्याप्रमाणे पहिल्या पत्र्यावर समासांत लिहिला आहे. प्रस्तुत लेख वाकाटक नृपति, धर्ममहाराज विन्ध्यशक्ती-च्या कालचा असून त्याचा उद्देश नान्दीकडाच्या उत्तरमार्गांतील ताका-लक्खोप्पक गावानजीकचें आकासपद्द हें गाव विन्ध्यशक्तीने दान दिलें हें नमूद करण्याचा होता. ज्यांना दें दान दिलें ते ब्राह्मण अथर्व-चरणी किंवा अथर्ववेदी होते. या वेदाच्या दुसऱ्या एका ब्राह्मणाला तिरोडी ताम्रपट मिळाला होता. यांतील कांही ब्राह्मणांचीं नांवें 'आर्य' पदान्त आहेत. दान दिलेल्या गावांतील जमिनीचे किंवा उत्पन्नाचे चार भाग करून त्यांतील तीन भाग तेरा ब्राह्मणांस व राहिलेला चौथा भाग एका ब्राह्मणास दिला होता. उपरिनिर्दिष्ट तेरा ब्राह्मणांचे हिस्सेहि समान नव्हते. त्यांपैकी नवांना (प्रत्येकीं) अर्धा हिस्सा आणि इतर चौघांना (प्रत्येकीं) दोन हिस्से दिलें होते.

काल—ताम्रपटाची मिती ३७वें शासनवर्ष, हेमन्तांतील पहिल्या पक्षांतील चौथा दिवस, अशी दिली आहे. ही मिती महत्त्वाची

आहे. कारण वाकाटकांच्या ताम्रपटांत ऋतु, पक्ष व दिवस यांत सांगितलेली अशी आणखी एकच मिती आली आहे;* हें दानपत्र सेनापति विष्णु याने लिहिल होतें व तें वत्सगुल्मांतून दिलें होतें.

चर्चा—प्रस्तुत लेखांत विन्ध्यशक्तीची वंशावळ येणेप्रमाणे दिली आहेः—प्रवरसेन—त्याचा पुत्र सर्वसेन—त्याचा पुत्र विन्ध्यशक्ति. विन्ध्यशक्तीच्या वर्णनांत त्याने अग्निष्टोम, आप्तोर्याम, वाजपेय, ज्योतिष्टोम, बृहस्पतिसव, साद्यस्क्र आणि चार अश्वमेध केले होते, आणि 'हारीतीपुत्र' व 'धर्ममहाराज' अशीं बिरुदें धारण केलीं होतीं, अशी माहिती दिली आहे. हीं बिरुदें प्रस्तुत ताम्रपटांतच वाकाटक नृपतींना लावलेलीं दिसतात. तीं कदम्बांच्या ताम्रपटांतून घेतलीं असावीं. प्रस्तुत ताम्रपट सापडण्यापूर्वी विन्ध्यशक्तीचा उल्लेख फक्त पुराणांत व अजंठयाच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील लेखांत, वाकाटक वंशाचा मूळ पुरुष म्हणून आलेला माहीत होता. म्हणून त्यानेच प्रस्तुत ताम्रपट दिला होता असें डॉ. देशपांडे यांस वाटलें. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटामुळे वाकाटक वंशावळ विन्ध्यशक्तीच्या पूर्वी दोन पिढया जाते असा डॉ. देशपांडे यांचा ग्रह झाला. त्यानंतर डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी असें दाखविलें की प्रस्तुत ताम्रपटांतील राजवंशावलीचें वर्णन सदोष आहे; कारण त्यांत 'धर्ममहाराज' ही पदवी विन्ध्यशक्तीस तीनदा लावलेली दिसते. शिवाय इतर ताम्रपटांत प्रथम प्रवरसेनाने जे यज्ञ केले असल्याचा उल्लेख आहे बहुतांशीं तेच विन्ध्यशक्तीने केले होते, असें मानावें लागतें. म्हणून तिसऱ्या ओळींतील श्रीप्रवरसेनपौत्रस्य आणि चौथ्या ओळींतील श्रीसर्वसेनपुत्रस्य हे सापेक्ष समास घेऊन त्यांचा अर्थ अनुक्रमें 'श्रीप्रवरसेनस्य पौत्रस्य' व 'श्रीसर्वसेनस्य पुत्रस्य' असा केला पाहिजे. असें केलें असतां त्यापूर्वीचीं षष्ठयन्त विशेषणें व 'धर्ममहाराजस्य' हें बिरुद हीं 'श्रीप्रवरसेनस्य'

---

* क्रमांक १० ची मिती पाहा.

व 'श्रीसर्वसेनस्य' या विशेष्यांस जोडतां येतील. असा अन्वय लावला असतां प्रवरसेन, सर्वसेन व विन्ध्यशक्ति या तिघांनीहि धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती असा अर्थ होईल आणि त्यामुळे पुनरुक्ति नाहीशी होईल. तसेंच, आरंभींचा 'अग्निष्टोमाप्तोर्याम...चतुरश्वमेधयाजिनः' हा समास व 'सम्राजः' हें पद हीं 'श्रीप्रवरसेनस्य' याच्याशीं अन्वित होतील आणि त्यायोगें हे यज्ञ करणारा व सम्राट् पदवी धारण करणारा वाकाटक नृपति प्रवरसेन होय, विन्ध्यशक्ति नव्हे, हें स्पष्ट होईल. हा अर्थ इतर वाकाटक ताम्रपटांतील विधानांशीं सुसंगत आहे.

तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांतील वंशावळींत आरंभीं उल्लेखिलेला नृपति प्रथम प्रवरसेन हा होय. तो पुराणांतील वर्णनावरून विन्ध्यशक्तीचा पुत्र होता असें समजतें. तेव्हा ज्याने प्रस्तुत ताम्रपट दिला होता तो द्वितीय विन्ध्यशक्ति मानला पाहिजे. तो प्रथम विन्ध्यशक्तीचा पणतू होतो. म्हणून या ताम्रपटांतील वंशावळ खालीलप्रमाणे देतां येते—

प्रथम प्रवरसेन
|
(पुत्र)
सर्वसेन
|
(पुत्र)
द्वितीय विन्ध्यशक्ति

ही वाकाटक वंशाची दुसरी शाखा होय; कारण द्वितीय प्रवरसेन व द्वितीय पृथिवीषेण यांच्या ताम्रपटांवरून पहिल्या शाखेंत प्रथम प्रवरसेनानंतर त्याचा पौत्र व गौतमीपुत्राचा पुत्र प्रथम रुद्रसेन हा गादीवर आला होता.

उपरिनिर्दिष्ट नृपतींचीं नांवें अजंठ्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील लेखांतहि आलीं होतीं, पण तो लेख अत्यंत खराब झाल्या-

मुळे त्यांचीं नांवें डॉ. भाऊ दाजी, पं. भगवानलाल इंद्रजी व डॉ. बुल्हर यांना बरोबर वाचतां आलीं नव्हतीं. तींहि मी आता वाचलीं आहेत.*

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **वत्सगुल्म** ही या शाखेची राजधानी होती. हें नगर म्हणजे जेथे ताम्रपट सापडला तें वाशीम होय. वत्सगुल्म या स्थलनामाची उपपत्ति विविध प्रकारें दिली जाते. वात्स्यायनाच्या 'कामसूत्रा'वरील टीकेंत म्हटलें आहे की वत्स व गुल्म हे सख्खे भाऊ असून दक्षिणापथाचे राजपुत्र होते. त्यांनी वसविलेल्या देशास वात्सगुल्मक असें नांव पडलें. 'वत्सगुल्ममाहात्म्यां'त निराळीच व्युत्पत्ति दिली आहे. त्यांत म्हटलें आहे की, वत्स हा एक ऋषि होता. त्याने आपल्या उग्र तपश्चर्येने देवांच्या गुल्मास म्हणजे समूहास स्वर्गांतून खाली येऊन आपल्या आश्रमाच्या सभोंवार वसती करण्यास लावलें, म्हणून त्या प्रदेशास वत्सगुल्म असें नांव मिळालें. या दोन्ही व्युत्पत्त्या अर्थातच काल्पनिक आहेत. वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त वात्सगुल्मक देशाचा व त्यांतील कांही विशिष्ट चालीरीतींचा उल्लेख आहे. वत्सगुल्माचा उल्लेख राजशेखरानेहि आपल्या 'कर्पूरमंजरी' व 'काव्यमीमांसा' या ग्रंथांत केला आहे. **नान्दीकड** हें एका विषयाचें (जिल्ह्याचें) मुख्य स्थान होतें. तें सध्याचें हैदराबाद प्रदेशांतील नान्देड होय. **ताकालक्खोप्पक** आणि त्याजवळचें **आकासपद्द** हीं कोठे होतीं, तें निश्चितपणें सांगतां येत नाही. नांदेड—वाशीम मार्गावर ताकली गोहन आणि ताकली अशीं दोन गावें नांदेडहून अनुक्रमें ४० व ४५ मैलांवर नकाशांत दिसतात. त्यांपैकी एक प्राचीन ताकालक्खोप्पक असावें. ताकलीगोहनच्या पश्चिमेस ७ मैलांवर आसुंड नांवाचें गाव आहे. तें कदाचित् प्राचीन आकासपद्द

* क्रमांक २४ च्या लेखाची चर्चा पाहा.

असेल. नांदीकड व नांदेड हीं एकच होत याविषयीं मात्र संदेह नसल्यामुळे या शाखेच्या अमलाखाली दक्षिण वऱ्हाड व हैदराबाद प्रदेशाचा उत्तर भाग होता हें स्पष्ट आहे.

चम्मान[1]

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धम्[2] [।*] दृष्टम् [।*] वत्सगुल्माद्धर्म्ममहाराजस्याग्नि-
ष्टोमाप्तोर्य्यामवाजपेयज्योति-

२ ष्टोमबृहस्पतिसवसाद्यस्क(स्क्र)चतुरश्वमेधयाजिन-
स्सम्राज(जो) वृ-

३ ष्णि[3]वृद्धसगोत्रस्य हारितीपुत्रस्य श्रीप्रवरसेनपौत्रस्य[4]

४ धर्म्ममहाराजस्य श्रीसर्व्वसेनपुत्रस्य[5] धर्म्ममहाराजस्य

५ [6]वाकाटकानां ।[7] श्रि(श्री)विन्ध्यशक्तेर्व्वचनात् [।*]
नान्दीकडस [8]उत्तरमग्गे

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २६ मधील १५० व १५१ पृष्ठांसमोरील ठशांवरून.

२. हें अक्षर समासांत तिरप्या ओळीच्या बाजूला लिहिलें आहे.

३. इतर ताम्रपटांतल्या प्रमाणें 'विष्णुवृद्ध-' असें वाचावें.

४. 'श्रीप्रवरसेनस्य पौत्रस्य' असें वाचावें.

५. 'श्रीसर्व्वसेनस्य पुत्रस्य' असें वाचावें.

६. या ओळीच्या बाजूला समासांत या पत्र्याचा क्रमांक १ लिहिला आहे.

७. हें विरामचिह्न निरर्थक आहे.

८. कोरक्याने प्रथम 'दा' कोरलें होतें. नंतर त्याने त्याचें 'उ' केलें.

दुसरा पत्रा : पहिली बाजू

६ ताकालक्खोप्पकाब्भासे आकासपद्देसु अम्हसन्तका साव्वायोगणि–

७ युत्ता आणत्ति[1]भडा सेसा य साञ्चरन्तर(कु)लपुत्ता[2] भाणितव्वा [।*] आम्हेहिं

८ दाणि[3] आपुणो[4] विजयवेजयिके[5] आयुबलवद्धणिके[6] स्वस्ति–

---

१. आणत्ति (संस्कृत आज्ञप्ति) याला इतरत्र दूतक म्हटलें आहे. याच्याकडे राजाज्ञा कार्यान्वित करण्याचें काम असे.

२. संस्कृतमध्ये लिहिलेल्या ताम्रपटांत 'आज्ञासञ्चारिकुल-पुत्राः' असें येतें. क्रमांक ३, ओ. २१ पाहा.

३. समासांत या ओळीशीं समान्तर या पत्र्यांचा क्रमांक दर्शविणारें २ या संख्येचें चिह्न कोरलें आहे.

४. हेमचंद्राच्या व्याकरणांत (८, १, २९;, ४, २७७) 'दाणि' आणि 'दाणिं' अशीं शौरसेनींतील दोन्ही रूपें दिलीं आहेत. हीरहडगल्ली ताम्रपटांत 'दाणि' हें रूप आलें आहे. एपि. इंडिका, पु. १, पृ. ५ पाहा.

५. प्राकृत व्याकरणकार याचें महाराष्ट्रींतील शुद्ध रूप 'अप्पणो' असें देतात. वररुचि, ५, ४६ (भामहाची टीका) आणि हेमचंद्र, ८, ३, ५६ पाहा.

६. हुल्श् यांनीं मयिदवोलु ताम्रपटांतील यासारखे पदसमुच्चय मागधी प्राकृतांतील प्रथमेचीं रूपें होत असें म्हटलें आहे. पण तीं हेत्वर्थक सप्तमीचीं एकवचनी रूपें मानणें जास्त बरें. हीरहडगल्ली आणि ब्रिटिश म्यूझियम ताम्रपटांत 'वद्धनीयं' किंवा 'वद्धनीये' यानंतर 'कातूण' किंवा 'कातूणं' येतें तें पाहा.

९ शान्तिवाचने[1] इहामुत्तिके धामत्याणे एत्थङ्गामे आथि-
व्वणिक[2]चर-

१० णस्स आद्धक।[3] भालन्दायणसगोत्तेसिं जिवुज्जेसिं।[3]
कपिञ्जल-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

११ सगोत्तेसिं[4]। रुद्दजेसि। श्राविष्ठायण[5]सगोत्तेसि। भट्टि-
देवज्जेसि

१२ कोसि[क]सगोत्तेसि। देअजेसि। कोसिकसगोत्तेसिं।
वेण्हुज्जेसि।

१३ कोसी(सि)कसगोत्तेसि। विधिज्जेसि। पैप्पलादिसगो-
त्तेसि। पितु-

---

१. या तऱ्हेचा पदसमुच्चय संस्कृत ताम्रपटांत आढळत नाही. त्याबद्दल 'आत्मानुहाय' असें पद येतें.

२. या ठिकाणचें व २५-२६ ओळींत 'रक्खध', 'रक्खापेध', 'परिहरेध' आणि 'परिहरापेध' या रूपांत दिसणारें थ् चें ध् मध्ये झालेलें रूपान्तर शौरसेनीचें गमक आहे.

३. ओळ १०-१८ यांमधील विरामचिह्नें निरर्थक आहेत.

४. 'सि' वरील अनुस्वार अस्पष्ट आहे.

५. 'श्राविष्ठ' किंवा 'श्राविष्ठायन' हें गोत्र 'गोत्रप्रवर-निबन्धकदम्बां'त दिलें नाही, पण सांगोली ताम्रपटांत (ए. इं., पु. १४, पृ. १६७) कांही श्राविष्ठगोत्री ब्राह्मणांचा उल्लेख आला आहे आणि प्रस्तुत ताम्रपटांतील ब्राह्मणांप्रमाणे ते अथर्ववेदी होते हें उल्लेखनीय आहे. या ब्राह्मणांचा उल्लेख 'काशिकें'त (३, २, १३५) आला आहे.

१४ जेसि भालन्दायणसगोत्तेसि । चान्दजेसि कोसिकसगोत्ते-
(त्ते)सि जेट्ठजे–

१५ सि । पदे(टे)हि दोहि भालन्दायणसगोत्तेसि बुद्धजेसि
कोसिकसगोत्तेसि ।

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१६ भाद्दिलज्जेसि । कोसिकसगोत्तेसि । सिवज्जेसि । कोसि-
कसगोत्तेसि

१७ हरिण्णजेसित्ति एताण ब्राम्हणाणं[1] भागा तिण्णा[2] ३
कोसिकसगोत्तेसि

१८ [3]रेवतिजेसि । भागो १ चउत्थोति आचन्दादिच्च-
कालको अपुव्वद–

१९ त्तीय दत्तो । पुव्वरायाणुमते य सें[4] चातुवेज्जगामम-
ज्जाता[5]परिहारे वित–

---

१. हीरहडगल्ली ताम्रपटांत (ओ. २७) 'एतेसि बम्हणाणं' असे शब्द आहेत.

२. शुद्ध रूप तीन्ही लिंगीं तिण्णि असें आहे. वररुचि, ४, ५६ पाहा.

३. समासांत या ओळीशीं समांतर असें या पत्र्याचा तीन क्रमांक दर्शविणारें संख्याचिह्न कोरलें आहे.

४. हें 'तद्' याचें षष्ठीचें एकवचनी रूप आहे.

५. 'द्' चा 'त्' झालेलें असें हें शब्दरूप हीरहडगल्ली ताम्रपटांतहि आढळतें. प्राकृत व्याकरणकारांच्या मतें हा बदल पैशाची प्राकृताचा निदर्शक आहे.

२० राम ।[1] तं जथा अरट्ठसंव्विणयिक । अलवणकेण्णक्ख-[2]
नक । अहिरण्णधाण्ण–

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२१ प्पणयप्पदेय । अपुप्फक्खिरग्गहण ।[3] अपरम्परगोबलि-
वद्दं [।]

२२ अचारसिद्धिक ।[4] अचम्मङ्गालिक । अभडप्पावेस । अख-
ट्टाचोल्लकवेणे–

२३ सिक । अकरद । अवह । सणिधि । सोपणिधि ।
सकुतुप्पन्त[5] ।

२४ ससञ्चसहाकरण । साव्वजातिपरिहारपरिहितञ्च[।*]
जतो उपरिलि–

२५ खित । शासणवादप्पमाणं[6] करेत्ता रक्खध रक्खापेध य
परिहरध

चौथा पत्रा

२६ परिहरापेध य [।*] जो वु आबाधं करेज्ज कतव्व
अनुमण्णति[7]

१. ओळी २० ते २७ यांतील विरामचिन्हें निरर्थक आहेत.

२. 'केण्ण' आणि संस्कृत दानपत्रांतील किण्व एक असावें. क्रमांक ६, ओ. २८ पाहा.

३. 'ण' वरची वेलांटी खोडलेली दिसते.

४. कोरक्याने प्रथम 'द' अक्षर खोदून नंतर त्याचें 'च' केलेलें दिसतें.

५. हें व संस्कृत दानपत्रांतील 'सक्लृप्तोपक्लृप्त' एक असावें.

६. या अक्षरांच्या वाचनांत डॉ. छाबडांची मदत झाली आहे.

७. या शब्दांतील 'म' च्या नंतर एक अक्षर खोडलें आहे.

२७ तिस्स[1] एतेहि । उपरिलिखितेहिं । ब्राम्हणेहिं । परिकुपिते स[2][द]ण्ड–

२८ निग्रह करेज्जामेत्ति [।] साव्वच्छरं ३० ७ हेमन्ता(न्त)- पक्खं पढमं[3]

२९ [दि]व[स] ४ समुपासत्थि[4] लिखितमिमं शास[नं] सेणा- पतिणा

३० वण्हुण[5] इति ॥ सिद्धिरस्तु ॥ –– ॥[6]

---

२३. देवसेनाचा इंडिया ऑफिस ताम्रपट

उपलब्धि—हा ताम्रपट लंडन येथील इंडिया ऑफिसमध्ये आहे, पण तो तेथे केव्हा व कसा गेला तें माहीत नाही. तो कोठे सापडला हेंहि माहीत नाही. तो डॉ. रँडल यांनी न्यू इंडियन् अँटिक्वरी, पु. २ (पृ. १७७ इ.) मध्ये ठशासहित प्रसिद्ध केला. नंतर मी त्यावर त्या संशोधनमासिकाच्या त्याच पुस्तकांत (पृ. ७२१ इ.) एक टिप्पण प्रसिद्ध केलें. येथे त्याच ठशावरून त्याचें वाचन केलें आहे.

---

१. 'तस्स' असें वाचावें.

२. 'परिकुपितेहि वेदितस्स' असें वाचावें.

३. समासांत या ओळीशीं समांतर असें या पत्र्याचा क्रमांक दर्शविणारें ४ या संख्येचें चिह्न खोदलें आहे.

४. या शब्दाचीं शेवटलीं तीन अक्षरें पूर्वींचीं अक्षरें खोडून त्या जागीं लिहिलीं आहेत.

५. 'वण्हुणा' असें वाचावें.

६. या दोन दोन दंडांमध्ये एक पुष्पाकृति खोदली आहे.

वर्णन—हा पत्रा एका ताम्रपटाचा पहिला पत्रा असून त्याचे इतर पत्रे गहाळ झाले आहेत. त्याची सध्याची लांबी ९¾ इंच व रुंदी २⅓ इंच असून वजन २५ तोळे आहे; पण त्याचा कडीकरिता केलेल्या छिद्राजवळचा डावीकडचा कांही भाग आता मोडून गहाळ झाल्यामुळे मूळ पत्रा यापेक्षा जास्त लांब व वजनदार असला पाहिजे. या पत्र्याचीं शाबूत टोकें वाटोळीं केलीं आहेत. त्याच्या कडा वाकविल्या नाहीत किंवा जाड केल्या नाहीत; तथापि त्यावरील लेख बऱ्या स्थितींत आहे. लेख फक्त तीन ओळींचा आहे. प्रस्तुत पत्रा ताम्रपटाचा पहिला पत्रा असल्यामुळे तो एकाच बाजूवर कोरला आहे. त्यावरील लेख अपूर्ण आहे.

अक्षरवटिका—या लेखाची अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकाराची असून ती द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतल्या सारखीच आहे. तिचा उल्लेखनीय विशेष हा की 'क', 'र' व संयुक्त व्यंजनांतील दुसरें व्यंजन 'य्' यांच्या वक्ररेषा द्वितीय प्रवरसेनाच्या लेखांतल्यापेक्षा जास्त वर आणल्या आहेत. 'त' व 'न' या अक्षरांचा घोटाळा यांतहि आढळतो.

भाषा—भाषा संस्कृत असून अवशिष्ट सर्व भाग गद्यांत आहे. कांही ठिकाणीं प्राकृत भाषेचा प्रभाव दृष्टीस पडतो; उदाहरणार्थ, सचरन्तक, ओ. २, आणि यप्पज्जस्स, ओळ ३, पाहा. लेखनाचा उल्लेखनीय विशेष एवढाच की र् नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व झालें आहे; मार्ग्ग, ओ. १, आणि धर्म्म, ओ. ३, पाहा.

विषय—प्रस्तुत ताम्रपट वाकाटक महाराज देवसेन याने वात्स्यगुल्मांतून दिला होता. त्याचा उद्देश त्या राजाने नाङ्गरकटकाच्या उत्तर मार्गांतील एक गाव (कदाचित् ओळ ३ मध्ये उल्लेखिलेलें यप्पज्ज) शांडिल्यगोत्री धर्मस्वामी व भवस्वामी या ब्राह्मणांना दिला होता, हें नमूद करण्याचा होता. ही राजाज्ञा त्या प्रदेशांतील दौरा करणारे (संचरन्तक) राजसेवक, भट, भोजक व दण्डनायक यांना उद्देशून काढली आहे. या पत्र्यावरील लेख अपूर्ण असल्यामुळे दान दिलेल्या गावाचे

परिहार (सूट), भावी राजांना दानाच्या संरक्षणाविषयी प्रार्थना, शासन-वर्ष, लेखकाचें व दूतकाचें नांव हीं नष्ट झालीं आहेत.

चर्चा—वाकाटकांच्या बहुतेक इतर पूर्ण दानपत्राच्या आरंभीं 'दृष्टम्' असा शब्द येतो. पण तो प्रस्तुत लेखांत दिसत नाही. शिवाय इतर दानपत्रांत आरंभीं राजवंशाजवळ येते, तसा प्रकार यांत दिसत नाही. शिवाय यांत व्याकरणाच्या अनेक चुका आहेत. यावरून डॉ. रँडल यांनी अनुमान केलें आहे की लेखकाच्या किंवा कोरक्याच्या अशा अनेक चुकांमुळे हें दानपत्र पूर्ण होण्यापूर्वीच त्याज्य ठरविलें गेलें असावें. पण हें अनुमान बरोबर दिसत नाही. वाकाटकांच्या दानपत्रांच्या आरंभीं बहुधा 'दृष्टम्' असा शब्द येतो खरा, पण तो सर्व लेखांत आढळत नाही. उदाहरणार्थ, प्रभावतीगुप्तेच्या ऋद्धपूर ताम्रपटांत तो दिसत नाही. वत्सगुल्म शाखेच्या शेवटच्या नृपतींनी (निदान देवसेनाने) कांही कारणास्तव आपल्या दानपत्रांचा संक्षेप केला असण्याचाहि संभव आहे. सर्वसेनानंतर इतर नृपतींचे ताम्रपट अद्यापि सापडले नसल्याने या बाबतींत निश्चित विधान करणें शक्य नाही. व्याकरणाच्या अशुद्धि तर यापेक्षाहि जास्त प्रमाणांत कांही खऱ्या ताम्रपटांत आढळतात. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटास अप्रमाण किंवा बनावट मानणें योग्य होणार नाही. देवसेन नृपतीच्या काळचा एकच ताम्रपट सापडला असल्यामुळे त्याचें महत्त्व विशेष आहे. किंबहुना वत्सगुल्म ही वाकाटकांची राजधानी होती ही गोष्ट या ताम्रपटावरूनच प्रथम कळली. नंतर ती द्वितीय विन्ध्यशक्तीच्या वाशीम ताम्रपटावरून पक्की झाली.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **वात्स्यगुल्म** हें वत्सगुल्माहून निराळें नाही. तें हल्लीचें अकोला जिल्ह्यांतील वाशीम होय हें मागे दाखविलें आहे. **नाङ्गरकटक** हें एका जिल्ह्याचें नांव असावें. नाङ्गर हें 'माङ्गर' बद्दल चुकीने पडलें असल्यास त्याचें मुख्य गाव अकोला जिल्ह्यांतील मंगरूळ (प्राचीन

माङ्गरपुर) असण्याचा संभव आहे. हें गाव वाशीमच्या ईशान्येस सुमारें २५ मैलांवर आहे. हें गाव प्राचीन असावें; कारण त्याच्या जवळ दीड हजारापेक्षा अधिक सातवाहन नाण्यांचा संचय कांहीं वर्षांपूर्वी सापडला होता. दान दिलेल्या गावाचें नांव **यप्पज्ज** असणें शक्य आहे, पण त्या प्रकारचें गाव जवळपास आढळत नाही.

ओळ

वाचन[1]

१ स्वस्ति [।*] वात्स्यगुल्मात् [।*] वाकाटकानाम्महाराज-
[श्री]देवसेनस्य वचना[त्*] उत्तरमार्ग्ग (र्गे)

२ नाङ्गरकटके अस्मत्सन्तर (क)भटभोजकदण्डनायकाद्याः
सचरन्तक[2]कुलप्रका (पुत्रका)

३ वक्तव्य (व्या) यथैष (षो) स्माभिग्रा (र्ग्रा) मः श (शा)-
ण्डिल्यसगोत्रस्य धर्म्मस्व (स्वा) मिन (नो) भवस्व(स्वा)-
मित (नो)[3] यप्पज्जस्स[4]

---

१. न्यू इंडियन् अँटिक्वरी, पु. २, पृ. १८० समोरील ठशावरून.

२. 'सञ्चरन्तः' असें वाचावें.

३. कदाचित् 'शाण्डिल्यसगोत्राय धर्म्मस्वामिने भवस्वामिने च' असें विवक्षित असेल.

४. हा प्राकृत शब्द दिसतो. कदाचित् हें दान दिलेल्या गावाचें नांव असेल.

वत्सगुल्म शाखेच्या अमात्यांचे व मांडलिकांचे लेख

२४. वराहदेवाचा अजंटा येथील लेख

उपलब्धि—ह्या लेखाचा शोध डॉ. भाऊ दाजी यांनी लावला. त्यांनी त्याची यथादृष्ट प्रत, वाचन व इंग्रजी भाषांतर हीं रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नल (पु. ७, १८६२, पृ. ५६ इ.) मध्ये प्रसिद्ध केलीं. त्यांना त्यांमध्ये विन्ध्यशक्ति, प्रवरसेन व देवसेन हीं राजनामें आणि हस्तिभोज व वराहदेव हीं अमात्यनामें आढळलीं. या राजनामांपैकी पहिलीं दोन हीं त्यापूर्वी पुराणांवरून आणि सिवनी ताम्रपटावरून ज्ञात झालेल्या वाकाटक नृपतींचीं होत हें त्यांनी दाखवून दिलें. त्यानंतर हा लेख प्रास्ताविक माहिती व इंग्रजी भाषांतर यांसह पं. भगवानलाल इंद्रजी यांनी 'पश्चिम भारताच्या लेण्यांतील उत्कीर्ण लेख' (१८८१), पृ. ६९ इ. या ग्रंथांत प्रकाशित केला. त्यांना त्यामध्ये वाकाटक नृपतींचीं पुढील नांवें आढळलीं—विन्ध्यशक्ति; प्रवरसेन; [रुद्र] सेन; (एक राजनाम नष्ट); देवसेन आणि हरिषेण. पं. भगवानलालांचें वाचन त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें मोठ्या कुशलतेने केलें असून डॉ. भाऊ दाजींच्या वाचनापेक्षा तें पुष्कळ चांगलें आहे. त्यानंतर हा लेख डॉ. बुल्हर यांनी ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, पु. ४ (१८८३) (पृ. १२४ इ. व प्लेट ६७) मध्ये प्रसिद्ध केला. हा ठसा पं भगवानलाल यांनी घेतलेल्या छापांवरून तयार केला होता, पण अक्षरें स्पष्ट दिसण्यासाठी त्यांत

मागाहून हाताने फेरबदल केलेला दिसतो. डॉ. बुल्हरचें वाचन पं. भगवानलालांच्या वाचनाहून फारसें निराळें नव्हतें, पण त्यांना राजवंशावलींत [रुद्र]सेनानंतर पृथिवीषेण व (दुसरा) प्रवरसेन अशीं आणखी दोन नांवें वाचतां आलीं. या लेखांतील ऐतिहासिक माहितीवर सन १९४० मध्ये भारतीय इतिहास परिषदेच्या लाहोर येथे भरलेल्या चौथ्या अधिवेशनांत मी एक निबंध वाचला होता, तो त्या अधिवेशनाच्या अहवालांत प्रसिद्ध झाला आहे. नंतर गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट फॉर इंडिया यांनी मजकडे पाठविलेल्या छापावरून मी हा उत्कीर्ण लेख हैदराबाद आर्किऑलॉजिकल सीरीज, क्रमांक १४ (१९४१) मध्ये ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह प्रकाशित केला.* त्याच ठशावरून त्याचें वाचन येथें केलें आहे.

वर्णन—प्रस्तुत लेख हैदराबाद प्रदेशांतील अजंटयाच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांत व्हरांडयाच्या एका टोकास डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरला आहे. तो उन्हापावसामुळे विशेषतः पहिल्या आठ ओळींच्या मध्यभागीं आणि डाव्या बाजूस वरपासून खालपर्यंत फार खराब झाला आहे. शिवाय डाव्या बाजूच्या खालील कोनांत शेवटच्या दोन ओळींत प्रत्येकीं सुमारें बारा, आणि २५ व २६ ओळींच्या मध्यभागीं आणखी दोन अक्षरें भिंतीचा टवका निघाल्यामुळे नष्ट झालीं आहेत.

या लेखाने ४ फूट रुंद आणि ३ फूट, ६ इंच उंच अशी जागा व्यापली आहे. त्याच्या एकूण २७ ओळी आहेत. अक्षरें सुंदर रीतीने लिहिलीं असून फार काळजीपूर्वक कोरलेलीं दिसतात.

अक्षरवटिका—अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकाराची असून अक्षरांच्या वरच्या पेटिका देवटेक येथील शिलालेखांतल्या प्रमाणे पूर्णपणें खोदल्या आहेत. लिपीचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—

* या लेखाचा ठसा ए. इं., पु. २६, पृ १४३ समोरहि छापला आहे.

व्यंजनरहित 'ऊ' काराचें दीर्घत्व शिरोभागाच्या उभ्या रेषेच्या खालीं आणखी एक वक्र रेषा काढून दाखविलें आहे (उ. 'ऊर्ध्व–', ओ. १७ पाहा); व्यंजनयुक्त (दीर्घ) ई डाव्या बाजूस वळविलेल्या कुरळ्या वक्र रेषेने दाखविली आहे (उ. उदीर्ण्ण–, ओ. १ पाहा); व्यंजनयुक्त औकार द्विभागात्मक आहे (उ. क्षमौदार्य्य–, ओ. १६ पाहा); 'य' अद्यापि त्रिभागात्मक राहिला आहे; 'ल' अक्षराला उजव्या बाजूस उंच दण्ड आहे, पण कांही ठिकाणीं त्याला लहान रूप प्राप्त झालें आहे (उ. 'लाटा–' ओ. १४ पाहा).

भाषा—या लेखाची भाषा संस्कृत असून सबंध लेख पद्यांत आहे. एकंदर श्लोक बत्तीस आहेत. 'र्' नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व (उ. निर्व्वापण, ओ. १) आणि अनुस्वाराबद्दल 'ङ्' चा उपयोग (उ. वङ्श, ओ. ३) हे लेखनाचे विशेष उल्लेखनीय आहेत. उपध्मानीयाचें चिन्ह ओळ २ व १० मध्ये, आणि जिव्हामूलीयाचें ओळ १० मध्ये आलें आहे.

विषय—हा लेख वाकाटक नृपति हरिषेण याचा अमात्य वराहदेव याचा आहे. त्याचा उद्देश वराहदेवाने स्तंभ, चित्रावलि, व शिलाकृति यांनी भूषित केलेलें वेश्म (लेणें) बौद्ध संघाला दान दिलें, हें नमूद करण्याचा होता. या लेखांत मिती दिली नाही, पण वराहदेव हा इ. स. ४७५–५०० या कालांत होऊन गेलेल्या हरिषेणाचा अमात्य होता, म्हणून या लेखाचा काळ खिस्तोत्तर पांचव्या शतकाचा शेवट हा समजण्यास हरकत नाही. फर्ग्युसन आणि बर्जेस यांनीहि या लेण्याच्या स्थापत्यशैलीवरून तें सन ५०० च्या सुमारास कोरलें गेलें असावें असें अनुमान केलें आहे.

प्रस्तुत लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्या भागांत पहिले वीस श्लोक येतात. त्यांत तत्कालीन वाकाटक नृपति हरिषेण याची वंशावळ दिली असून आनुषंगिक रीतीने देवसेन व हरिषेण या नृपतींचे अमात्य

हस्तिभोज व वराहदेव यांचेंहि वर्णन केलें आहे. दुसऱ्या भागांत वराहदेवानें ज्यांत चैत्यमन्दिर (बुद्धाचें देवालय) व मंडपरत्न (उत्कृष्ट विहार) आहेत असें लेणें कोरवून तें आपल्या मातापित्यांच्या पुण्योपार्जनाकरिता बौद्ध संघाला अर्पण केलें असें वर्णन केलें आहे.

चर्चा—या लेखाचें महत्त्व पहिल्या भागांत आहे; कारण त्यांत वाकाटक नृपतींची वंशावळ त्या वंशाचा मूळ पुरुष विंध्यशक्ति याच्यापासून दिली आहे. यांत विंध्यशक्ति हा द्विज (ब्राह्मण) होता व त्यानें मोठमोठ्या युद्धांमध्ये जय मिळवून आपलें सामर्थ्य वाढविलें होतें असें म्हटलें आहे. नंतर त्याचा मुलगा (प्रथम) प्रवरसेन याचीं पदकमलें विरोधी नृपतींच्या किरीटांतील रत्नांचीं किरणें चुम्बीत असत असें वर्णन आलें आहे.

प्रथम प्रवरसेनाच्या नंतर गादीवर आलेल्या त्याच्या पुत्राचें वर्णन सातव्या श्लोकांत केलें होतें, पण तो भाग खराब झाल्यानें त्याच्या नांवापैकी शेवटचा 'सेन' एवढाच भाग अवशिष्ट राहिला आहे. भगवानलालनी प्रथम हें नांव वाचलें. त्यांना 'सेन'च्या मागे 'द्र' सारख्या अक्षराचे अवशेष आहेत असें वाटल्यावरून तें नांव भद्रसेन, चन्द्रसेन, इन्द्रसेन, रुद्रसेन यासारखें एखादें असावें असें त्यांनी अनुमान केलें. या नांवापैकी 'रुद्रसेन' हें नांव त्यांनी या लेखाच्या वाचनांत दिलें आहे. याचें कारण इतकेंच असावें की त्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या सिवनी व चम्मक ताम्रपटांत प्रथम प्रवरसेनानंतर प्रथम रुद्रसेनाचें नांव आलें होतें. त्यानंतर बुल्हरनेहि आपल्या वाचनांत हेंच नांव दिलें आहे. पण या बाबतींत विशेष लक्षांत घेण्याची गोष्ट ही की उपरिनिर्दिष्ट ताम्रपटांत प्रथम रुद्रसेन हा प्रवरसेनाचा पौत्र होता असें स्पष्ट म्हटलें आहे. याच्या उलट प्रस्तुत लेखांत प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र गादीवर आला असें विधान केलें आहे. तेव्हा एक तर लेखकानें हें नातें सांगतांना प्रमाद केला असावा, किंवा भगवानलाल व बुल्हर यांचें वाचन तरी चूक असावें, असे दोन पर्याय या बाबतींत सुचतात. यांपैकी

पहिला पर्याय संभवनीय नाही. कारण हा लेख वाकाटक नृपति हरिषेण याच्या अमात्याने कोरविला असून तो काळजीपूर्वक लिहिलेला दिसतो. पण प्रस्तुत राजनाम जेथे आलें होतें तेथील भाग अत्यंत खराब झाल्यामुळे वाचनांत चूक होणें संभवनीय आहे. भगवानलाल आणि बुल्हर यांनी ज्या छापावरून वाचन केलें तो छाप काळजीपूर्वक पाहिला असतां असें दिसतें की 'द्र' या संयुक्त अक्षरापैकी वरचें 'द्' हें व्यंजन पूर्णपणे नष्ट झालें आहे. त्याच्या खाली एक गाठ दिसते; तिचें वाचन 'र' असें केलें आहे, पण तें बरोबर नाही. या लेखांत अधोलिखित 'र्' चीं अनेक उदाहरणें आहेत, पण त्यांपैकी एकाहि ठिकाणीं तें अक्षर ग्रंथिरूपाने दिसत नाही. सर्वत्र त्याची आकृति चन्द्रासारखी आहे. मला मिळालेल्या नव्या छापांत तर ही ग्रंथिहि दिसत नाही. याच्या मागचें 'रु' हें अक्षर तर पूर्णपणे नष्ट झालें आहे, हें भगवानलाल व बुल्हर या दोघांनीहि कबूल केलें आहे. तेव्हा 'रुद्रसेन' हें वाचन अत्यंत संशयास्पद आहे.

वाशीम ताम्रपटांत प्रथम प्रवरसेनाचा पुत्र आणि उत्तराधिकारी म्हणून सर्वसेनाचें नांव आलें आहे. तेव्हा येथे नष्ट झालेलें राजनाम सर्वसेन असावें अशी कल्पना सहजच सुचते. 'सर्व्वसेनः' हा पाठ 'रुद्रसेनः' या पाठाइतकाच वृत्तानुकूल आहे. तेव्हा सातव्या श्लोकाचा द्वितीयार्ध 'सर्व्वसेनः प्रवरसेनस्य जितसर्व्वसेनः सुतोभवत्।' असा होईल. या पाठाच्या योगें उत्पन्न झालेल्या यमकाने तर हा पाठ जास्तच संभवनीय वाटतो. कारण या लेखाच्या कर्त्यास यमकाची मोठी हौस होती, असें दिसतें. त्याने त्याचा उपयोग प्रस्तुत लेखांत अनेक ठिकाणीं केला आहे. खालील उदाहरणें पाहा--

ओळ २-अभिवृद्धशक्तिः ...दानशक्तिः ...विन्ध्यशक्तिः।
७-प्रवरसेनस्य पुत्रोभूत्प्रवरोर्ज्जितोदारशासनप्रवरः।
१०-११-हस्तिभोजः ...दिग्गन्धहस्तिप्रतिमो बभूव।
१४-हरिषेणो हरिविक्क्रमप्रतापः।

सर्वसेनाचें 'जितसर्व्वसेन:' हें वर्णन त्याच्या नांवावरून सुचलें असावें. तेव्हा प्रथम प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र सर्वसेन याने राज्य केलें असें म्हणण्यास हरकत नाही.

यानंतरच्या आठव्या श्लोकांत पं. भगवानलालना कोणतेंहि राजनाम वाचतां आलें नाही; पण सातव्या ओळीच्या मध्यभागीं 'प्र-(किंवा पृ)थिवी' अशीं अक्षरें वाचतां येतात, म्हणून तेथे पृथिवीषेणासारखें नांव असावें असे बुल्हरला वाटलें. मागील श्लोकांत रुद्रसेन हें राजनाम उल्लेखिलें आहे हें भगवानलालचें मत त्यानें स्वीकारल्यामुळें हा पृथिवीषेण वाकाटक ताम्रपटांत प्रथम रुद्रसेनाचा पुत्र म्हणून ज्याचा उल्लेख येतो तो असावा, असें त्याने अनुमान केलें. पण सातव्या श्लोकांतील खरा पाठ 'रुद्रसेन:' नसून 'सर्व्वसेन:' असावा, हें आपण ठरविलें आहे. शिवाय आठव्या श्लोकांतलें 'पृथिवी–' हें बुल्हरचें वाचन हि अत्यंत संशयास्पद आहे. जें अक्षर 'थि' असें त्याने वाचलें त्याचा वरचा भाग निमुळता असून खालचा उघडा आहे. तेव्हा तें 'थि' असणें शक्य नाही. कारण या लेखांत सर्वत्र 'थ' वर्तुलाकृति आहे. उदाहरणार्थ, प्रथितो–(ओ. १५), प्रथितगुणोपभोग–(ओ. २१) इ. पाहा. हें अक्षर 'श्री' असावें. त्याच्या खालची 'र' कारात्मक वक्ररेषा आता अस्पष्ट झाली आहे. त्यापुढील अक्षर 'विं' असें दिसतें. त्यानंतरचें अक्षर 'ध्य' असावें. त्यांतील अधोलिखित 'य' ची लांबट वक्र रेषा स्पष्ट आहे. त्यापुढील दोन अक्षरें 'सेन:' हीं बहुतेक निश्चित आहेत. तेव्हा हें राजनाम 'श्रीविंध्यसेन:' असें असावें. या श्लोकांत आरंभीं 'सत्पुत्र:' असा शब्द आहे, तो पूर्वीच्या संपादकांनी वाचला नव्हता. त्यावरून हा विन्ध्यसेन सर्वसेनाचा पुत्र होता यांत संशय नाही. वाशीम ताम्रपटांत सर्वसेनाचा पुत्र म्हणून (द्वितीय) विन्ध्यशक्तीचें नांव आलें आहे. विन्ध्यसेन व विन्ध्यशक्ति हीं नांवें भिन्न नाहीत. तेव्हा वाशीम ताम्रपटावरूनहि आठव्या श्लोकांतील 'श्रीविन्ध्यसेन:' हें आमचें वाचन समर्थित होत आहे. या श्लोकाचा द्वितीयार्ध फार

खंडित झाला आहे, पण अवशिष्ट भागावरून या विन्ध्यसेनाने कुन्तलाधिपतीवर विजय मिळविला होता, असें दिसतें.

यापुढील नवव्या श्लोकांत पं. भगवानलालनी 'प्रवरसेनस्य पुत्रोभूत्' इत्यादि वाचलें होतें. व त्यावरून या श्लोकांत प्रथम प्रवरसेनाच्या दुसऱ्या एका मुलाचें वर्णन आलें आहे असा त्यांचा ग्रह झाला. तेथील खरा पाठ 'प्रवरसेनस्तस्य पुत्रोभूत्' असा असून तो बुल्हरने प्रथम वाचला. हा प्रवरसेन प्रथम पृथिवीषेणाचा पुत्र द्वितीय प्रवरसेन असावा असें बुल्हरला वाटलें, पण हें मत बरोबर नाही. वर दाखविल्याप्रमाणे याच्या मागील श्लोकांत पृथिवीषेणाचा उल्लेख नसून विन्ध्यसेनाचा आहे. दुसरी गोष्ट ही की द्वितीय प्रवरसेन हा प्रथम पृथिवीषेणाचा पुत्र नसून पौत्र (द्वितीय रुद्रसेनाचा पुत्र) होता. तेव्हा नवव्या श्लोकांत वर्णिलेला प्रवरसेन हा विन्ध्यसेन (किंवा द्वितीय विन्ध्यशक्ति) याचा पुत्र असून द्वितीय रुद्रसेनाचा पुत्र द्वितीय प्रवरसेन याच्याहून भिन्न होता.

दहाव्या श्लोकांत या प्रवरसेनाच्या पुत्राचें वर्णन केलें होतें, पण त्याचें नांव आता नष्ट झालें आहे. तो केवळ आठ वर्षांचा असतांना गादीवर आला आणि त्याने उत्तम रीतीने राज्य केलें, असें या श्लोकांत म्हटलें आहे.

अकराव्या श्लोकांत या राजाचा पुत्र देवसेन याचें वर्णन आलें आहे. यानेच इंडिया ऑफीस ताम्रपट दिला होता. देवसेनाच्या वर्णनाच्या अनुषंगाने त्याचा हस्तिकोश व अमात्य हस्तिभोज याचें वर्णन १२ ते १६ श्लोकांत आलें आहे. हे श्लोक अत्यंत खंडित झाले आहेत, पण अवशिष्ट भागावरून त्याच्या अंगच्या गुणांची बरीचशी कल्पना येते. त्याचें वक्षःस्थल विशाल आणि भरदार होतें, नेत्र कमलांप्रमाणे होतें आणि तो अत्यंत गुणवान्, विनयसंपन्न, लोकांचा हितकारक व प्रेमळ होता. त्याने शत्रुपक्षाचा नाश केला होता. लोकांचा हितचिंतक व पालनकर्ता असल्यामुळे तो त्यांना त्यांच्या मातापित्याप्रमाणे व मित्रांप्रमाणे प्रिय झाला होता व ते त्याच्याकडे सदैव

निःशंकपणें येत असत. त्याच्यावर राज्याचा भार टाकून देवसेन राजा विषयोपभोगांत यथेच्छ रममाण होत असे.

यानंतर सतराव्या श्लोकांत पुनः राजप्रशस्तीला सुरवात होऊन देवसेनाचा पुत्र हरिषेण याचें वर्णन आलें आहे. त्यापुढील श्लोकांत त्याच्या विजयांचें वर्णन होतें. पण तो अत्यंत खंडित झाला आहे. अवशिष्ट भागांत कुन्तल, अवन्ति, कलिंग, कोसल, त्रिकूट, लाट व आन्ध्र या देशांचा उल्लेख आहे. हे देश हरिषेणाने जिंकले असावे.

श्लोक १९ व २० यांमध्ये हस्तिभोजाचा पुत्र व हरिषेणाचा सचिव याचें वर्णन आलें आहे. एकोणिसाव्या श्लोकाच्या उत्तरार्धांत त्याचें नांव आलें होतें, पण तें आता नष्ट झालें आहे. तथापि तिसाव्या श्लोकावरून तें वराहदेव होतें असें दिसतें. त्याच्या अंगीं दातृत्व, क्षमा, औदार्य इत्यादि गुण असून त्याने न्यायाने प्रजापालन केलें व तो राजा व प्रजा या दोघांनाहि प्रिय झाला, असें म्हटलें आहे. जीवित, तारुण्य, संपत्ति व सुख हीं नश्वर आहेत याची जाणीव उत्पन्न झाल्यामुळे त्याने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपार्जनाच्या उद्देशाने हें वेश्म (लेणें) यतिश्रेष्ठांकरिता खोदविलें. चोवीसाव्या श्लोकांत या वेश्माचें वर्णन आलें आहे. तें गवाक्ष, द्वार, चित्रावलि, वेदिका, अप्सरांच्या मूर्ति इत्यादिकांनी भूषित केलें होतें व सुंदर स्तंभांवर आधारलें होतें. त्याच्या अन्तर्भागीं चैत्यमंदिर (बुद्ध–प्रतिमागृह) असून जवळच विपुल जलाशयाचें कुंड व नागराजाचें लेणें होतें. हें वर्णन अजंट्याच्या सोळाव्या लेण्याला पूर्णपणें लागू पडतें. तिसाव्या श्लोकांत म्हटलें आहे की वराहदेवाने हें लेणें बौद्ध संघाला अर्पण केलें. शेवटच्या ३१–३२ या श्लोकांत हें रत्नत्रयाला (बुद्ध, धर्म व संघ यांना) अर्पण केलेलें अत्यन्त उत्कृष्ट मंडपयुक्त लेणें सदैव टिकून राहो व सर्व जगहि निर्दोष होऊन शांत व दुःखरहित अशा स्थितिप्रत प्राप्त होवो, अशी आशा व्यक्त केली आहे.

स्थलनिश्चय—लेखांत उल्लेखिलेल्या देशांपैकी **कुन्तल** हा भीमा व वेदवती या नद्यांमधील प्रदेश होय. त्यांमध्ये सातारा व सोलापूर हे जिल्हे तसेंच त्याच्या दक्षिणेचे मुंबई, म्हैसूर व मद्रास यांतील कानडी जिल्हे यांचा समावेश होत असे. कांही प्राचीन ग्रंथकारांच्या मतें कुन्तलाची उत्तर मर्यादा गोदावरी नदी ही होती. राजशेखराच्या मतें कुन्तल हें महाराष्ट्राचें दुसरें नांव होतें असें दिसतें. 'उदयसुन्दरी' कथेचा कर्ता सोड्ढल हा गोदावरी तीरावरील प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) ही कुन्तलाची राजधानी होती, असें म्हणतो. **अवन्ति** हें पश्चिम माळव्याचें नांव. याची राजधानी उज्जयिनी होती. **कलिंग** देशांत महानदी व गोदावरी यांमधील पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशाचा अन्तर्भाव होत असे. **कोसल** हें छत्तीसगड व त्याच्या पूर्वेकडील ओरिसांतील कांही प्रदेशाचें नांव होतें. **त्रिकूट** निश्चितपणें कोणत्या प्रदेशाला म्हणत हें पुष्कळ काळ माहीत नव्हतें. कालिदासाच्या 'रघुवंशां'तील (सर्ग ४, श्लो. ५९) वर्णनावरून त्रिकूट हें अपरान्त किंवा उत्तर कोकणांतील एका पर्वताचें नांव होतें हें माहीत झालें होतें. त्या पर्वताचें नांव ज्याने घेतलें होतें त्या त्रैकूटक राजवंशाच्या अमलाखाली गुजराथ, उत्तर कोंकण व उत्तर महाराष्ट्र हे प्रदेश होते, हेंहि उत्कीर्ण लेखांवरून ज्ञात झालें होतें. पण पश्चिम घाटाच्या नक्की कोणत्या भागाला त्रिकूट नांव होतें हें माहीत नव्हतें. अलीकडे सापडलेल्या अंजनेरी ताम्रपटांत नाशिक जिल्ह्यांतील एका देवालयाकरिता पूर्वत्रिकूट विषयांतील जनतेवर कांही कर बसविल्याचा उल्लेख आहे, त्यावरून त्रिकूट हें नाशिकच्या पश्चिमेस असलेल्या पर्वताचें नांव होतें, हें सिद्ध झालें आहे. **लाट** हें मही व तापी यांच्यामधील मध्य व दक्षिण गुजराथचें नांव होतें. पण कांही कोरीव लेखांवरून त्यांत कधी कधी खेडा जिल्ह्यापर्यंत मही नदीच्या उत्तरेच्या प्रदेशाचा समावेश होत असे, असें दिसतें. शेवटला **आन्ध्र** देश हें गोदावरीच्या दक्षिणेच्या तेलगूभाषी प्रदेशाचें नांव होतें हें सुप्रसिद्ध आहे.

ओळ

वाचन[1]

१ उदीर्ण्णलोकत्रयदोषवह्निनिर्व्वापण(णं) – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*] ⏓ – ⏑ – – – ⏑ [य]ति[2] प्रणम्य पूर्वां प्रवक्ष्ये क्षितिपानुपूर्व्वी[म्[3] ॥१॥*]

२ [म]हाविमर्द्देष्वभिवृद्धशक्तिः क्रुद्धस्सुरैरप्यनिवार्य्य[वीर्यः ।*] ⏓ – ⏑ – – रणदानशक्तिः द्विजःप्रकाशो भुवि विन्ध्यश[क्ति]ः [॥२॥*]

३ पुरन्दरोपेन्द्रसमप्रभावः स्वबाहुवीर्य्या[र्ज्जि]तस-[र्व्वलोकः ।*] ⏓ – ⏑ – – ⏑ ⏑ – टकानां[4] बभूव वाकाटकवङश(वंश)केतुः [॥३॥*]

४ रणे[बु][5] हर्य्युद्धतरेणुजालसञ्छादितार्क्कस्स च [कर्म्म]- – – [।*] ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – नरातीन् कृत्वा-[भिवाद ?] प्रवणांश्चकार[6] [॥४॥*]

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १४६ समोरील ठशावरून.

२. पूर्वीच्या संपादकांनी हा शब्द वाचला नव्हता. क्र. २६ च्या लेखांत बुद्धाला मुनि म्हटलें आहे.

३. या व पुढील दोन श्लोकांचें वृत्त–उपजाति.

४. हीं तीन अक्षरें बहुतेक निश्चित आहेत. पूर्ण शब्द 'उद्धृत-कंटकानाम्' असावा.

५. हें पं. भगवानलालांचें वाचन. डॉ. बुल्हरने रणे 'स्वहर्य्य–' असें वाचलें.

६. वृत्त–उपजाति.

५ [विनि]र्जितारि[स्सुरराजकार्य्यें] चकार पुण्येषु परं प्रयत्नं(त्नम्) [।*] ⏑̲ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑̲ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –[1] [॥५॥*] [अरि*]नरेन्द्रमौलिविन्यस्तमणिकिरणलीढ[क्र]माम्बुजः [।*]

६ प्रवरसेनस्तस्य पुत्रोभूद्विकसन्नवेन्दीवरेक्षणः[2] [॥६॥*] रविमयूख – ⏑ – ⏑̲ ⏑ ⏑, ⏑̲ ⏑̲ – ⏑ – – ⏑ – ⏑ – [।*] [सर्व्व]सेनः[3] प्रवरसेनस्य जितसर्व्वसेन[स्सु]तो[भ]-वत् [॥७॥*]

७ [सत्पुत्रः][4] पार्त्थिवेन्द्रस्य प्रशशास धर्म्मेण मेदिनी[म्।*] कुन्तलेन्द्रं वि[जि]त्य – ⏑̲ ⏑̲ ⏑̲ श्रीविंध्यसेन[5] ⏑ – ⏑ ⏑̲[6] [॥८॥*] प्रवरसेनस्तस्य पुत्रोभूत्प्र[व]रोर्जितोदा[रशासन-प्र]वरः [।*]

---

१. वृत्त–उपेन्द्रवज्रा किंवा उपजाति.

२. ६–९ या श्लोकांचें वृत्त कीलहॉर्नने म्हटल्याप्रमाणें एक प्रकारचें मात्रासमक आहे. एपि. इंडिका, पु. ८, पृ. २७ पाहा. डॉ. वेंकटसुब्बय्या त्याला गीतिका म्हणतात. जर्नल ऑफ ओरिएंटल् रीसर्च, पु. ९, पृ. ४६ इ. आणि १७९ इ. पाहा.

३. भगवानलाल व बुल्हर यांनी हें नांव 'रुद्रसेन' असें वाचावें असें सुचविलें होतें.

४. पूर्वीच्या संपादकांनी हा शब्द वाचला नव्हता.

५. हें राजनाम 'पृथिवीषेण' असें वाचावें असें बुल्हरने सुचविलें होतें.

६. '–नृपोभवत्' असें वाचावें.

८ ⏓ ⏓ ⏑ – ⏑ – ⏑ – ⏓ ⏓ ⏓, ⏓ ⏓ – ⏑ – – ⏑ –
⏑ ⏑ [॥९॥*] तस्यात्मजः – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏓ –
⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*] ⏓ – ⏑ – – ⏑ सवाप्य
राज्यमष्टाब्दको य॒ प्र[शशास] स[म्यक्*][1] [॥१०॥*]

९ [तस्या*][त्मजो]भून्नरदेव – –, ⏓ – ⏑ – – भुवि
देवसेनः [।*] यस्योपभोगैर्ल्ललितैर्व्वि – – ⏓ देव-
राजस्य ⏑ – ⏑ – भूः [॥११॥*] पुण्यानुभावात्क्षिति-
पस्य

१० [सम्य][क्*] ⏓ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*]
⏓ – ⏑ – – ⏑ गुणाधिवासः ⏓ – ⏑ कोशो[2] भुवि
हस्तिभोजः [१२॥*] प्र – ⏑ – – ॱपृथुपीनवक्षास्स-
रोरुहाक्षxक्षपि–

११ [ता*] [रिपक्षः ।][3] ⏓ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ बाहुर्द्दि-
ग्गन्धहस्तिप्रतिमो बभूव[4] [१३॥*] हितो विनीतः
[प्रणयप्रधानो] मनोनुकूलोनुविधानवर्त्ती [।*] निरत्ययं

---

१. १०–१२ या श्लोकांचें वृत्त–इन्द्रवज्रा किंवा उपेन्द्रवज्रा.

२. हा शब्द 'श्रीहस्तिकोशो' असा असावा. हस्तिकोश नांवाचा अधिकारी पृथ्वीमूल नृपतीच्या गोदावरी ताम्रपटांत उल्लेखिला आहे. बाँबे ब्रँच् ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटीचें जर्नल्, पु. १६, पृ. ११८ पाहा.

३. हीं अक्षरें बहुधा स्पष्ट आहेत.

४. वृत्त–उपजाति.

१२ – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – – ⏑ – – ⏑ कश्च[1]
[॥१४॥*] त[थै*]व लोकस्य हिताशयत्वात्सुखेन सम्य-
क्परिपालनेन [।*] पितेव मातेव सखेव नित्यं प्रियो-
भिगम्यश्च बभूव

१३ [सत्यम्*][2] [॥१५॥*] ⏑ – ⏑ – – – ⏑ ⏑ –, ⏑ –
⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*] स्वस्थस्समावेश्य स
तत्र राजा ससञ्ज भोगेषु यथेष्टचेष्टः[3] [॥१६॥*] अथ
तस्य सुतो बभू-

१४ व राजा ··· ··· ··· ··· [।*] हरिरामहर-
स्मरेन्दु[4]कान्तिर्हरिषेणो[5] हरिविक्रमप्रतापः [॥१७॥*] स
कुन्तलावन्तिकलिङ्गकोसलत्रिकूटलाटान्ध्र-

१५ ⏑ – ⏑ जानिमान् [।*] ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ शौर्यविश्रु-
तानपि स्वनिर्द्देशगुणाति – ⏑ –[6] [॥१८॥*] प्रथितो
भुवि हस्तिभोजसूनुस्सचिवस्तस्य महीपते[र्ब्बभूव ।]
सकलक्षिति-

---

१. वृत्त–उपेन्द्रवज्रा किंवा उपजाति.

२. वृत्त–उपेन्द्रवज्रा.

३. वृत्त–उपजाति.

४. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'स्मरेव' असें वाचलें, पण तें व्याकरणदुष्ट आहे. तें 'स्मरेन्द्रकान्ति' असें वाचावें ही बुल्हरची सूचना अनावश्यक आहे, कारण 'रे' नंतरचें अक्षर स्पष्टपणे 'न्दु' असेंच आहे.

५. वृत्त–औपच्छन्दसिक.

६. वृत्त–वंशस्थ.

१६ . . . .[1]
[॥१९॥*] [राज][2]प्रजेष्टः स्थिरधीरचेतास्त्यागक्षमौ-
दार्य्यगुणैरुपेत[ः।*] धर्म्मेण धर्म्मप्रवणश्शशास देशं
यशःपुण्यगुणांशु[3]–
१७ – – [॥२०॥*] विशेषतः . . . . . प्रति पुण्यो-
पचयं परं चकार [।*] यत ऊर्ध्वमिमां सहायधर्म्मा
[निरतो] लोकगुरौ चकार काराम्[4] [॥२१॥*] आयुर्व-
[योवि]तसुखानि (नि)
१८ – –, ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ [चञ्च]लानि [।*]उ[द्दिश्य][5]
मातापितरावुदारं न्यवीविशद्वेश्म यती[न्द्रसेव्यम्] ॥२२॥
[सजला]म्बुद[वृ]न्दलम्बिताग्रे[6] भुजगेन्द्राध्युषिते मही-
धरेन्द्रे [।*]
१९ . . . . [वी ?]रश्रीपतिना धरानि[7]-
कुञ्जे[8] [॥२३॥*] गवाक्षनिर्य्यूहसुवीथिवेदिका[सु रे]न्द्र-
कन्याप्रतिमाद्यलङ्कृतम् [।*] मनोहरस्तम्भविभङ्ग–

---

१. वृत्त–औपच्छन्दसिक.

२. पूर्वीच्या संपादकांनी हा शब्द वाचला नसला तरी नवीन ठशांत तो बराच स्पष्ट दिसतो.

३. 'शुभ्रः' असें वाचावें. वृत्त–इन्द्रवज्रा.

४. वृत्त–औपच्छन्दसिक. ५. वृत्त–उपजाति.

६. या श्लोकाचा हा प्रथम पाद मीच प्रथम वाचला आहे. भगवानलाल आणि बुल्हर यांनी शेवटचीं चार अक्षरें 'उद्धिताग्रे' अशीं वाचलीं, पण त्यांचा चांगलासा अर्थ लागत नाही.

७. भगवानलाल व बुल्हर यांनी येथे 'शरा–' असें वाचलें.

८. वृत्त–औपच्छन्दसिक.

२० – ⏑ –[1] [नि]वेशिताभ्यन्तरचैत्यमन्दिरम्[2] [।।२४।।*]
⏑ – ⏑ – – तलसन्निविष्टं [वितान] – – ⏑ मनोभि-
रामं(मम्) [।*] ⏑ – प्रकामाम्बुमहानिधानं[3] नागेन्द्रवे-
श्मादिभिर–

२१ ⏑ – ⏑ –[4] [।।२५।।*] – – – [म्र्म]ह[ति] समीरणे
समन्तात् – – – विविधविलास – ⏑ – – [।*]
ग्रीष्मा[र्कस्य च] किरणोपतापतप्तं सर्वर्तुप्रथितगुणो-
पभोगयोग्य[म्][5] [।।२६।।*]

२२ . . . . सुरेन्द्रमन्दिराणां रुचिमन्मन्दरकन्द[रानुरू-
पम् ।] . . . . जनैर्यथे-
प्सितं(तम्)[6] [।।२७।।*] असमस्य विरोचने गिरेर्विक–

---

१. बुल्हरने 'मेदुरम्' असें संदेहाने वाचलें, पण येथील अक्षरें पूर्णपणें नष्ट झालीं आहेत. 'भूषितम्' असें वाचावें.

२. हा शेवटचा पाद मीच पूर्णपणे वाचला आहे. त्यावरून हें चैत्यमन्दिर लेण्याबाहेर बांधलें होतें हें बर्जेसचें मत निर्मूल ठरतें. हें चैत्यमन्दिर लेण्याच्या आंत मागील बाजूस असून त्यांत बुद्धाची भव्य मूर्ति आहे. क्रमांक २६, ओळ २४ मधील 'निवेशितान्तर्मुनि-राजचैत्यम्' पाहा.

३. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'ञ्चाम्बुमहानिधानम्' असें वाचलें, पण त्याने अर्थ चांगला लागत नाही. क्रमांक २६, ओ. २६ मध्येहि 'प्रकामाम्बुमहानिधानम्' असेंच वर्णन येतें तें पाहा.

४. '–रप्यलङ्कृतम्' असें वाचावें.

५. वृत्त–प्रहर्षिणी.

६. या आणि पुढील श्लोकाचें वृत्त–औपच्छन्दसिक.

२३ ·· ·· ·· श्रमान्तकतया निवहेन ·· ·· ·· ··
·· ·· [।।२८।।*] – – विशालमिति यस्य जनेन
नाम प्रीतिप्रसादविकचप्रणयेन चक्रे [।*] एतस्य
२४ – ⏑ ⏑ ⏑ –[1] र्लयनं सुरेन्द्रमौलिप्रभोपचित[मङ्गल-
संग्रहाय][2] [।।२९।।*] निवेद्य सङ्घाय ⏑ – ⏑[3] भक्त्या
सबन्धुवर्गस्स वराहदेवः [।*] नृदेवसौख्यान्यनुभूय – –[4]
२२ – – ण[5] शास्ता सुगतप्रशस्तः[6] [।।३०।।*] सान्द्राम्भोद-
भुजङ्गभोग ⏑ ⏑ –[7] र्य्यावत् ⏑ – – ⏑ –, – – नूत्न-
मनःशिलालकपिलैर्य्यावत्करैर्भा[स्करः] । तावच्छे-
२६ ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – – – – ⏑ – से[व्य]तामन्तर्म-
ण्डपरत्नमेतदमलं रत्नत्र[यो*]द्भावि[तं](तम्)[8] ।।३१।।[*]
विविधलयनसानुस्सेव्यमानो महद्भिर्गिरिरय
२७ ⏑ ⏑ – – – ⏑ – – ⏑ – द्धयः [।*] जगदपि च
समस्तं व्यस्तदोषप्रहाणा[द्वि]शतु पदमशोकं निर्ज्वरं
शान्तमार्य्यम्[9] [।।३२।।*]

---

१. येथे नष्ट झालेल्या अक्षरांपैकी शेवटचीं दोन 'गिरे–' हीं असावीं.

२. वृत्त–वसन्ततिलका.

३. 'सुवेश्म' असें वाचावें.

४. 'सम्यग्' असें वाचावें.

५. 'धर्मेण' असें वाचावें.

६. वृत्त–उपजाति.

७. 'निकरै–' असें वाचावें.

८. वृत्त–शार्दूलविक्रीडित.

९. वृत्त–मालिनी.

२५. वराहदेवाचा घटोत्कच लेण्यांतील लेख

उपलब्धि—हा लेख पंडित भगवानलाल इंद्रजी यांनी पश्चिम भारताच्या लेण्यांतील कोरीव लेख (आर्किऑलॉजिक सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया) (१८८१), पृ. ८८ इ. मध्ये ठशाशिवाय पण इंग्रजी भाषांतरासह प्रसिद्ध केला. त्यांनी त्याचें बहुतांशीं निर्दोष असें वाचन प्रसिद्ध केलें व दहाव्या ओळींत ज्याचा उल्लेख आला आहे तो हस्तिभोज बहुधा वाकाटक नृपति देवसेन याचा सचिव असावा असें अनुमान केलें. शिवाय, तेराव्या ओळींत उल्लेखिलेला देवराज हा अजंटयाच्या सव्वीसाव्या लेण्यांतील लेखांत उल्लेखिलेला तन्नामक अश्मक नृपति असावा असेंहि त्यांनी प्रतिपादिलें, आणि त्यावरून हें घटोत्कच लेणें अजंटयाच्या सोळा, सतरा व सव्वीस या लेण्यांनंतरचें आहे असें त्यांनी अनुमान केलें. नंतर हा लेख डॉ. बुल्हर यांनी आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न् इंडिया, पु. ४, पृ. १३८ इ. मध्ये ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह प्रसिद्ध केला. हा ठसा पं. भगवानलाल यांनी घेतलेल्या छापावरून तयार केला असून अक्षरें स्पष्ट करण्याकरिता त्यावर थोडाबहुत संस्कार केलेला दिसतो. डॉ. बुल्हरचें वाचन व भाषांतर पं. भगवानलालच्यापेक्षा कांही बाबतींत भिन्न आहे. देवराज हा अश्मक नृपति होय, हें प. भगवानलालचें मत त्यांस मान्य नव्हतें. देवराज म्हणजे देवांचा अधिपति इन्द्र होय, असें त्यांनी म्हटलें आहे. शिवाय, या लेखांत ज्याचें वर्णन आहे तो सचिववंश वल्लूरचा असून हें वल्लूर मलबारच्या ब्राह्मणांपैकी असावें असेंहि डॉ. बुल्हरनी अनुमान केलें आहे. भगवानलाल आणि बुल्हर यांच्या चुकीच्या वाचनामुळे या सचिव वंशाविषयी कांही विपरीत ग्रह पसरले होते, म्हणून हैदराबाद प्रदेशाच्या पुरातत्त्व खात्याने पाठविलेल्या व तांत्रिक पद्धतीने घेतलेल्या छापावरून

मी हा लेख ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह त्या प्रदेशाच्या लेखमालेंत (हैदराबाद आर्किऑलॉजिक सीरीज् मध्ये) प्रसिद्ध केला. त्याच ठशावरून त्याचें वाचन येथे दिलें आहे.

वर्णन—हा लेख अजंट्याच्या पश्चिमेस अकरा मैलांवर असलेल्या गुलवाडा गावाजवळील घटोत्कच लेण्यांत आहे. तो त्या लेण्याच्या व्हरांड्यांत मागील भिंतीवर डाव्या बाजूच्या कडेला कोरला आहे. आरंभीं याच्या बावीस ओळी होत्या असें दिसतें, पण त्यांपैकी शेवटच्या चार ओळी आता जवळजवळ पूर्णपणें नष्ट झाल्या आहेत. राहिलेल्या अठरा ओळींपैकीहि पहिल्या दहाच थोड्याबहुत वाचतां येतात, पण त्यानंतरच्या आठ ओळींचा उजवीकडचा बहुतेक भाग दगडाचा पृष्ठभाग खराब झाल्याने आता अगदी अस्पष्ट झाला आहे. तथापि वाकाटक नृपति हरिषेणाचा सचिव वराहदेव याची पूर्ण वंशावळ देणारा असा हा एकच लेख असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. त्याच्या सध्याच्या स्थितींत जेवढें वाचणें शक्य आहे तेवढें वाचण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

लिपी—या लेखाने ४ फूट रुंद व २ फूट, ४ इंच उंच इतकी जागा व्यापली आहे. लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून सामान्यतः अजंट्याच्या क्रमांक १६ व १७ लेण्यांतल्या लेखांच्या सारखी आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—व्यंजनयुक्त (दीर्घ) ऊकार कांही ठिकाणीं उजवीकडच्या दोन आडव्या रेषांनी आणि कांही ठिकाणीं डावीकडच्या रेषांनी दाखविला आहे; उ० 'गुरूणां', ओ. १ व 'वल्लूर'–ओ. ३ पाहा; 'भू'च्या बाबतींत मात्र त्या अक्षराचा दंड उजवीकडे वाकवून व त्याला एक आडवी रेषा जोडून ऊकार दाखविला आहे; 'बभूव', ओ. ९ पाहा. 'त्' ला गाठ नाही, पण 'न्' ला ती आहे; य् हा त्रिभागात्मक आहे, पण अधोलिखित रूपांत द्विभागात्मक आहे; 'ल्' ची उजवीकडची रेषा एकदम डावीकडे वळविली आहे;

पदाच्या शेवटचें व्यंजन लहान आकाराने व शिरोमात्रेने दाखविलें आहे; 'तस्मात्', ओ. ९ पाहा. जिह्वामूलीयाचें चिह्न पांचव्या व नवव्या ओळींत आणि उपध्मानीयाचें चौथ्या, पांचव्या व दहाव्या ओळींत आलें आहे.

भाषा—या लेखाची भाषा संस्कृत असून सर्व भाग पद्यांत आहे. त्याच्या प्रत्येक ओळींत एक एक श्लोक आहे. सबंध लेख सोप्या, पण सुंदर शैलींत लिहिला असून त्यांत व्याकरणदुष्ट प्रयोग क्वचितच आढळतात पांचव्या ओळींत द्वितीय भूतकाळार्थी 'आस' हें रूप योजिलें आहे, तें पाणिनीच्या २, ४, ५२ या सूत्राच्या विरुद्ध आहे. इतर लेखांतल्या प्रमाणे 'र्' च्या नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व आणि अनुस्वाराबद्दल 'ङ्' चा प्रयोग हे लेखनाचे विशेष येथेहि दृष्टीस पडतात.

विषय—प्रस्तुत लेखाचा उद्देश वाकाटकांच्या सचिवाने एक विहार लेणें कोरविलें हें नमूद करण्याचा असावा. या सचिवाचें नांव आता नष्ट झालें आहे, पण पुढे दाखविल्याप्रमाणें तो हस्तिभोजाचा पुत्र वराहदेवच असावा. लेखाच्या आरंभीं बुद्धाची स्तुति मुनींमध्ये श्रेष्ठ मुनि, देवांमध्ये श्रेष्ठ देव, गुरूंमध्ये श्रेष्ठ गुरु इत्यादि प्रकारें केली आहे. दुसऱ्या श्लोकांत त्रिरत्नांपैकी दुसरीं दोन रत्नें धर्म व संघ यांची प्रशंसा केली आहे. तिसऱ्या श्लोकापासून सचिववंशाचें वर्णन सुरू होतें. दक्षिणेंत वल्लूर नामक श्रेष्ठ ब्राह्मणांचा वंश आहे. तो पुण्यश्लोक असून थोर लोकांनी त्याचा संमान केला आहे. या वंशामध्ये भृगु, अत्रि, गर्ग, अंगिरस् या सुप्रसिद्ध पुरातन ब्राह्मणांसारखा यज्ञपति नामक द्विजश्रेष्ठ होऊन गेला. त्याला देव नामक एक कर्तबगार, विद्वान्, नीतिनिपुण व क्रियाशील असा पुत्र झाला. त्याच्या प्रभावाने राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक कृत्यांचें अनुष्ठान करतें झालें. त्याच्या सोमनामक पुत्राने क्षत्रिय व ब्राह्मण जातीच्या स्त्रियांशीं विवाह केला.

क्षत्रिय पत्नीपासून त्याला रवि नामक राजचिह्नांनी युक्त असा पुत्र झाला. त्याने आपला अंमल सर्व प्रदेशावर बसविला. ब्राह्मण स्त्रियांपासून सोमाला वेदविद्येमध्ये संतुष्ट असलेले पुत्र झाले, ज्यांच्या योगें दक्षिण दिशेमध्ये त्यांचें वल्लूर नामक वसतिस्थान सुप्रसिद्ध झालें आहे.

क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या सोमाचा पुत्र रवि याला प्रवरनामक पुत्र झाला. त्यालाहि कीर्तिमान् असा कीर्ति नामक पुत्र झाला. या कीर्तीचा पुत्र हस्तिभोज हा वाकाटक नृपति देवसेनाचा सचिव होता. त्याच्या कुलीनत्वाची व दानशूरत्वाची अद्यापि प्रशंसा होते, असें श्लोक १० मध्ये म्हटलें आहे. पुढील दोन (११ व १२) श्लोकांतहि त्याची प्रशंसा केली होती, पण ते श्लोक आता अतिशय खंडित झाले आहेत. तेराव्या श्लोकाचा आरंभ 'अथ' शब्दाने होतो, तेव्हा तेथे नवीन विषयाचा आरंभ झाला आहे, हें सूचित केलें आहे. त्यांत देवराजाचा पुत्र हरिषेण याचा उल्लेख आला आहे. हा अर्थातच वाकाटकनृपति देवसेनाचा पुत्र हरिषेण होय. याच्याच कारकीर्दीत अजंट्याचीं १६, १७ व १९ क्रमांकांचीं लेणीं कोरलीं गेलीं. भगवानलाल व बुल्हर यांना 'देवराजसूनुर्हरिषेणो' हे शब्द वाचतां न आल्यामुळे त्यांतील ऐतिहासिक माहिती त्यांच्या ध्यानांत आली नव्हती. भगवानलालनी हा देवराज अश्मक राजाचा मन्त्री होता असें म्हटलें, तर बुल्हरला देवराज हें कोणा व्यक्तीचें नांव नसून त्याचा अर्थ देवांचा राजा इंद्र असावा असें वाटलें. चौदाव्या श्लोकांत हरिषेणाची स्तुति आली असावी. पुढे तेराव्या श्लोकाप्रमाणे पंधराव्या श्लोकाचाहि आरंभ अथ शब्दानेच होतो त्यावरून तेथेहि विषयान्तर झालें होतें हें उघड आहे. त्यांत अनेक गुणांनी युक्त अशा हस्तिभोजाच्या प्रिय तनयाचें वर्णन आलें होतें. पुढे याच संबंधांत हस्तिभोजाच्या अनेक पुत्रांचा उल्लेख आला आहे. या दोन (१६ व १७) श्लोकांतील ज्याचें वर्णन आता अत्यंत खंडित झालें आहे त्या वराहदेवाचें नांव मात्र सुदैवाने पुढील १८ व्या श्लोकांत अद्यापि अंशतः वाचतां येतें. यापुढील श्लोकांत वराहदेवाचें

वर्णन व त्याने घटोत्कच लेणें कोरविल्याचा उल्लेख आला असावा; पण तो भाग आता पूर्णपणे नष्ट झाला आहे.

चर्चा—बुल्हरने म्हटल्याप्रमाणे पांचव्या श्लोकांत ज्याचें वर्णन आलें आहे तो देव तत्कालीन राजाचा प्रधान सचिव असावा. त्या राजाचा उल्लेख या लेखांत आला नाही, पण मागील विवेचनावरून तो वाकाटक वंशांतीलच असला पाहिजे हें ध्यानांत येईल. हे वल्लूरचे सचिव आणि त्यांचे समकालीन वाकाटक नृपति यांचीं नांवें खाली दिलीं आहेत—

सचिव	समकालीन वाकाटक नृपति (राज्यारोहणाच्या संभवनीय वर्षांसह)
यज्ञपति	
देव	विन्ध्यशक्ति (इ. स. २५०)
सोम	प्रथम प्रवरसेन (इ. स. २७०)
रवि	सर्वसेन (इ. स. ३३०)
प्रवर	विन्ध्यसेन (इ. स. ३५५)
श्रीराम	द्वितीय प्रवरसेन (इ. स. ४००)
कीर्ति	(नांव नष्ट) (इ. स. ४१०)
हस्तिभोज	देवसेन (इ. स. ४५०)
वराहदेव	हरिषेण (इ. स. ४७५)

या सचिववंशाला वल्लूर असें नांव होतें. तें दक्षिणेंतील त्याच्या निवासस्थानावरून पडलें होतें हें पांचव्या श्लोकावरून स्पष्ट आहे. सातव्या श्लोकामध्ये भगवानलालनी 'मलये' असें वाचलें. त्याचाच अनुवाद करून डॉ. बुल्हरने हा सचिववंश मलबार ब्राह्मणांपैकी असावा असें प्रतिपादिलें. पण खाली दाखविल्याप्रमाणे 'मलये' हें वाचन अत्यंत संशयास्पद आहे, आणि याशिवाय हें कुटुंब दक्षिणेंतील मलबारसारख्या दूर प्रदेशांतून आलें होतें हें मानण्यास यत्किंचितहि आधार नाही. तें मूळचें हैदराबादच्या दक्षिण भागांतलेंच असावें. पुढे दाखविल्या-

प्रमाणे वल्लूर हें हैदराबादच्या येलगंडल जिल्ह्यांतील वेलूर असावें. या कुटुंबाला ज्याचा आश्रय होता तें वाकाटक घराणेंहि याच प्रदेशांत उदयास आलें असें दिसतें, कारण 'वाकाटक' नांवाचा पहिला उल्लेख वेलूरपासून आग्नेयेस सुमारें १५० मैलांवर असलेल्या अमरावती येथील एका स्तंभावरील लेखांत आहे. हीं दोन्ही कुटुंबें एकाच काळांत उदयास आलीं व तीं कित्येक पिढ्या परस्परांशीं संबद्ध होतीं. तेव्हा तीं मूळचीं एकाच प्रदेशांतील—दक्षिणच्या मध्यभागांतील—असणें सुतराम् संभवनीय आहे. शिवाय हें मत मान्य केल्यास वाकाटक हे सातवाहनांच्या अस्तानंतर या प्रदेशांत कसे उदयास आले याचीहि उपपत्ति लावतां येते.

कालनिश्चय—प्रस्तुत लेखावरून घटोत्कच लेण्याच्या कालावरहि प्रकाश पडतो. या काळाचा अंदाज अनेकांनी अनेक प्रकारें केला आहे. घटोत्कच लेणें अजंठ्याच्या १६, १७ व २६ क्रमांकांच्या लेण्यानंतरचें असावें हें भगवानलालचें मत त्या लेण्याच्या स्थापत्यपद्धतीवरून समर्थित होतें असें बर्जेसने प्रथम म्हटलें होतें. पण नंतर बुल्हरने प्रस्तुत लेखांतील 'देवराज' हा अश्मकवंशी राजाचा तन्नामक मंत्री नव्हे असें प्रतिपादिल्यावर बर्जेसने आपलें मत बदललें. बौद्ध लेणीं व त्यांतील कोरीव लेख यांविषयींच्या आपल्या ग्रंथांत (आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, ग्रंथ ४) बर्जेसने म्हटलें आहे की, 'हें लेणें बहुधा हस्तिभोजाने खोदविलें असावें. म्हणून तें त्याच्या मुलाने अजंटा येथे खोदविलेल्या लेण्यांपेक्षा अगोदरचें आहे.' मागे दाखविल्याप्रमाणे घटोत्कच लेणेंहि हस्तिभोजाच्या वराहदेव नामक पुत्रानेच खोदविलें होतें. अर्थातच तें अजंट्याच्या सोळा, सतरा व एकोणीस क्रमांकाच्या लेण्यांच्या काळचेंच आहे यांत संशय नाही. या लेण्यांत स्थापत्यशैलीचा फरक असल्यास तो कारागिरांच्या कुशलतेमुळे घडून आला असावा.

स्थलनिश्चय—प्रस्तुत लेखांत **वल्लूर** या एकाच स्थलनामाचा उल्लेख आहे. हें गाव हैदराबाद प्रदेशाच्या येलगंडल जिल्ह्यां-

तील, हैदराबादच्या ईशान्येस सुमारें तीस मैलांवर असलेलें, वेलूर असावें. हें गाव गुलवाडयाच्या दक्षिणेस असल्यामुळे 'वल्लूरचा हा ब्राह्मणवंश अद्यापि दक्षिणेंत सुप्रसिद्ध आहे' हें प्रस्तुत लेखांतील वल्लूर-संबंधी विधान वेलूरला उत्तम रीतीने लागू पडतें.

ओळ वाचन[१]

१ मुनिर्मुनीनाममरोमराणां गुरुर्गुरूणां प्रवरो वराणां(णाम्) [।*] जयत्यनाभोगविबुद्धबुद्धिर्बुद्धाभिधानो निधिरद्भु-तानां(नाम्)[२] [॥१॥*]

२ धर्म्मस्ततो धर्म्मविदा प्रणीतस्तथा [ग*][ण]श्चाग्र्य-तमो गणानां(नाम्) [।*] भवन्ति य[स्मि]न्निहि[ताः] सु[पा]त्रे[३] कारायका[रा]स्तनया ह्युदाराः [॥२॥*]

---

१. हैदराबाद प्रदेशाच्या पुरातत्त्व खात्याने पाठविलेल्या ठशा-वरून.

२. श्लोक १–२ यांचें वृत्त–उपजाति.

३. या श्लोकाच्या द्वितीयार्धाचें वाचन निस्संदेह नाही. भगवानलालनी '–तनयाप्युदारा' असें आणि बुल्हरने '–तनयाप्यु-दाराः' असें वाचलें. बुल्हरने पुढे असें म्हटलें की, 'तनयाऽप्युदाराः' किंवा 'तनया ह्युदाराः' असें वाचलें पाहिजे. 'दा'च्या पूर्वीचें अक्षर निश्चितपणें 'ह्यु' हेंच आहे आणि 'भवन्ति' या रूपावरून कर्ता अनेकवचनी असला पाहिजे हें उघड आहे. तेव्हा 'तनया ह्युदाराः' हाच पाठ विवक्षित असावा.

३ अस्ति प्रकाशो दिशि दक्षिणस्यां वल्लूरनाम्नां द्विजसत्त-
मानां(नाम्) [।*] आ ब्रह्मणस्संभृतपुण्यकीर्त्तिर्व्वंङशो[1] महीयान्म[हि]तो महद्भिः[2] [॥३॥*]

४ त[स्मिन्न]भूदाहितलक्षणानां[3] द्विजन्मनां [प्रा]थमकल्पि-
कानां(नाम्)[4] [।*] भृग्वत्रिगर्ग्गाङ्गिर[सां] समानो द्विज-
र्षभो [य]ज्ञ[पति][5] ᳵप्रकाशः[6] [॥४॥*]

१. भगवानलालनी '–व्व्रंशो' आणि बुल्हरने '–वंशो' असें वाचलें. 'र्' नंतर 'व्' चें द्वित्व झालेलें दिसतें. शिवाय, 'श्' हा बराच ओळीच्या खालीं लिहिलेला दिसतो, तेव्हा त्यावर 'ङ्' या अक्षराला पुरेशी जागा आहे. 'वङ्शजासु' हा सहाव्या ओळींतील शब्द पाहा. '–व्वंशो' असें वाचावें.

२. वृत्त–इन्द्रवज्रा.

३. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'आहतलक्षणानां' असें वाचलें, पण 'ह' वरची वेलांटी अद्यापि अस्पष्टपणे दिसते. रघुवंशांतील (६, ७१) 'ककुत्स्थ इत्याहितलक्षणोऽभूत्' पाहा.

४. भगवानलाल यांनी 'प्राथमकल्पकानां' असें वाचलें होतें; नंतर बुल्हरने 'प्राथमकल्पिकानां' असा शुद्ध पाठ दिला.

५. भगवानलालना या वंशाच्या मूळ पुरुषाचें नांव पूर्णपणे देतां आलें नाही. 'यज्ञ. . प्रकाश' हें त्याचें नांव असावें असें त्यांनी म्हटलें आहे. पण प्रस्तुत लेखकाने 'प्रकाश' या शब्दाचा 'प्रसिद्ध' या अर्थी उपयोग इतरत्र (ओळी ३ व १०) केला आहे. बुल्हरने 'यज्ञधरः' आणि 'यज्ञपतिः' असे दोन पाठ सुचविले, आणि त्यांतील दुसरा पसंत केला. नवीन ठशांत हें नांव बरेचसें स्पष्ट आहे. शेवटच्या अक्षरावरची वेलांटी 'यज्ञपति' हेंच नांव सुचविते. 'प्र' अक्षरावर उपध्मानीयाच्या चिह्नाचे अवशेष आहेत.

६. श्लोक ४–१२ यांचें वृत्त–उपजाति.

५ तदात्मजो देव इवास देवXकृती गृही[ती][1] नयवान्क्रिया-
वान् [।*] सराजकं राष्ट्रमुपेत्य यस्मिन्धर्म्याXक्रिया-
⁒[पा]र्थ[2] इव प्रचक्रे [॥५॥*]

६ सोमस्ततः सोम [इ]वापरोभूत्स ब्राह्मणक्षत्रियवङ्शजासु[3]
[।*] श्रुतिस्मृतिभ्यां विहिता[र्त्थ]कारी द्वयीषु भार्य्यासु
मनो दधार [॥६॥*]

७ स क्षत्रियायां कुलशीलवत्यामुत्पादयामास नरेन्द्रचिह्नं-
(ह्नम्) [।*] सुतं सुरूपं रविनामधेयं कृताधिपत्यं
वि[ष]ये[4] समग्रे [॥७॥*]

---

१. भगवानलालनी ‘गृहस्थो’ असें वाचलें, पण बुल्हरने दाखविल्याप्रमाणे ‘ह’वरची वेलांटी स्पष्ट आहे. त्यापुढील अक्षर बुल्हरने वाचलें नव्हतें. त्यावरहि इकार स्पष्ट आहे. म्हणून ‘गृहीती’ असा पाठ असावा. ‘गृहीती षट्स्वङ्गेषु’ (दशकुमारचरित, बाँबे संस्कृत सीरीज, १९१९, पृ. १००) पाहा.

२. भगवानलालनी ‘पार्त्थ’ आणि बुल्हरने ‘नाथ’ असें वाचलें. यांतील पहिल्या अक्षरावर उपध्मानीयाचें चिह्न स्पष्ट आहे, आणि या श्लोकांतील ‘देव’ या मंत्र्याची देवाशीं (म्हणजे कृष्णाशीं) तुलना विवक्षित दिसत असल्यामुळे ‘पार्थ’ हाच पाठ बरोबर दिसतो. यांतील दुसरें अक्षर ‘र्त्थ’ किंवा ‘थ’ नसून ‘र्थ’ असेंच आहे.

३. भगवानलाल आणि बुल्हर यांनी ‘वंशजासु’ असें वाचलें; पण ‘श’वरचें कवर्गीय अनुनासिक (ङ्) स्पष्ट आहे. अर्थातच ‘-वंशजासु’ असें शुद्ध रूप होईल.

४. भगवानलाल आणि बुल्हर यांनी ‘मलये’ असें वाचलें,

(पुढील पानावर चालू)

८ द्विजासु चान्यासु सुतानुदारान्स [प्राप*][1] वेदेषु समाप्त-
कामान् [।*] वल्लूरनाम्ना[2] दिशि दक्षिणस्यामद्यापि येषा-

(मागील पानावरून पुढे चालू)
पण यांतील पहिलें अक्षर 'म' सारखें दिसत नसून 'वि' असें दिसतें. दुसरें अक्षर आता फार खराब झालें आहे. भगवानलालच्या काळींहि तें तशाच स्थितींत असावें. आ. स. वे. इं. (प्लेट ६०) मध्ये तें 'ल' असें दिसतें खरें, पण तें विश्वसनीय नाही. कारण तो ठसा संस्कार करून छापलेला स्पष्ट दिसतो. प्रस्तुत लेखांत 'ल' या अक्षराची उजवीकडची रेषा सर्वत्र वक्ररूपाने डाव्या बाजूकडे वळविली आहे, (उदाहरणार्थ 'आहितलक्षणानां' व 'प्राथमकल्पिकानां', ओ. ४, 'कुलशील–', ओ. ७, 'वल्लूर', ओ. ८, 'धवलां', ओ. १४ आणि 'फलमखिल–', ओ. १७ पाहा. या सर्व ठिकाणीं 'ल'ची उजवीकडची रेषा डावीकडे वाकविलेली दिसेल. प्रस्तुत स्थळीं मात्र तथाकथित 'ल'चा उजवीकडचा भाग उभा आहे. तेव्हा तें अक्षर 'ल' नव्हे. येथील खरा पाठ 'विषये' असा दिसतो.

१. भगवानलालनी 'सोम' आणि बुल्हरने 'समस्त' असें वाचलें. या दोन्ही पाठांत या श्लोकांत आवश्यक असलेलें क्रियापद मिळत नाही. येथील अक्षरें आता फार खराब झालीं आहेत. म्हणून 'प्राप' असें सुचविलें आहे.

२. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'वल्लूरनाम्ना' असेंच वाचलें, आणि बुल्हरने तें 'वल्लूरनाम्नां' असें वाचावें असें सुचविलें, पण तसें वाचणें जरूर नाही. श्लो. ३ मध्ये म्हटल्याप्रमाणे या ब्राह्मणांचें वल्लूर असें नांव होतें तें त्यांच्या वल्लूर नामक निवास-स्थानावरून पडलें असावें. भवभूतीच्या पूर्वजांचें 'उदुम्बरनामानः' हें 'मालतीमाधवां'तील वर्णन पाहा.

[न्व]सति[द्वि]जानां(नाम्) [॥८॥*][1]

९ रवेस्सुतो भूत्प्रवराभिधानः श्रीरामनामाथ बभूव
तस्मात् [।*] तस्यात्मजxकीर्त्तिरभूत्सुकीर्त्तिर्ब्बभूव[2]
तस्मादथ हस्ति[भोजः][3] [॥९॥*]

१० वाकाटके राजति देवसेने गुणैःप्रकाशो[4] [भुवि][5] [ह]स्ति-
भोजः [।*] अद्यापि यस्याभिजनप्र[दा]न ⏑ – ⏑ – –
⏑ ⏑ – ⏑ – – [॥१०॥*]

---

१. 'येषां वसति-' असें वाचावें.

२. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'तदात्मज-' असें वाचलें, पण 'त' नंतरच्या अक्षराखाली य् दिसतो, त्यावरून 'तस्यात्मज-' हेंच वाचन बरोबर असावें.

३. भगवानलाल यांनी ह[स्तिभोजः] आणि बुल्हरने [हस्ति-भोजः] असें वाचलें. यांतील पहिलीं दोन अक्षरें निश्चित आहेत, पण शेवटचीं दोन आता खराब झालीं आहेत.

४. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'गुणैषिकोशो' असें वाचलें, पण त्याचा अर्थ नीटसा लागत नाही. त्यांना 'षि' ची वेलांटी म्हणून वाटलेलें चिह्न वस्तुतः 'प्र' वरचें उपध्मानीयाचें आहे. 'गुणैःप्रकाशो' असा पाठ दिसतो. या कवीने इतरत्र (ओ. ३–४) 'प्रकाश' शब्द योजिला आहे.

५. भगवानलाल आणि बुल्हर यांच्या काळीं 'भुवि' हा शब्द स्पष्ट होता, पण तो आता खराब झाला आहे. 'हस्तिभोजः' यांतील 'ह' हें अंशतः खराब झालें आहे, पण इतर अक्षरें अवशिष्ट रेषांवरून वाचतां येतात.

११ धीरेषु धीमत्सु सहोत्थितेषु कृत्य[प्र]मा[णेषु] गुणान्वितेषु [।*] ⏑̱ – ⏑ – – नुपतेर्यदे –, ⏑̱ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [॥११॥*]

१२ यस्यासनार्द्धं [पु]रुषा[1] ⏑ – –, ⏑̱ – ⏑ मात्संसदि – ⏑ – – [।*] ⏑̱ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑̱ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [॥१२॥*]

१३ अथ देवराजसूनुर्हरिषेणो[2] · · हस्तिभोज · · · [।*] ·[3] · [॥१३॥*]

---

१. भगवानलालनी 'पुरुषा' असें वाचलें, पण बुल्हरच्या मतें तें 'सुरसा' असावें. येथील अक्षरें संदिग्ध आहेत, तथापि अवशिष्ट रेषांवरून तीं वाचतां येतात.

२. भगवानलालना 'देवराज' एवढेंच, आणि बुल्हरला 'देवराजस्य' असें वाचतां आलें. 'देवराज' याच्या नंतरचें अक्षर स्पष्टपणें 'सू' असेंच आहे. त्यानंतरच्या अक्षराचा वरचा भाग खराब झाला आहे, पण खालचा उकार स्पष्ट आहे. त्याच्या पुढील अक्षर 'ह' आहे. तें तिसऱ्या ओळींतील 'महद्भिः' यांतील 'ह' सारखेंच आहे. त्यानंतरचें अक्षर निश्चितपणें 'रि' असेंच आहे. तेव्हा 'हरिषेणो' असेंच नांव असलें पाहिजे. त्याचीं शेवटचीं दोन अक्षरें नव्या ठशांत स्पष्ट आहेत. पूर्वीच्या संपादकांना हें महत्त्वाचें नांव वाचतां न आल्यामुळे त्यांना या देवराजाचा शोध लावतां आला नाही.

३. वृत्त–आर्या.

१४ शशिकरधवलां नि[री]क्ष्य की[र्त्ति] ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑
– ⏑ – ⏑ – – [।*] ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – ⏑
– –, ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –[1] [॥१४॥*]

१५ अथ गुणशतसंभृतात्मभूतः प्रियतन[यो*] ⏑ ⏑ – ⏑ –
⏑ – – [।*] ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –, ⏑ ⏑
⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – – [॥१५॥*]

१६ तस्यात्मजेषु बहुषु ⏑ ⏑ ⏑ ⏑ – –, – – ⏑ – ⏑ ⏑
⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*] – – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑
⏑ – ⏑ – –, – – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ –
–[2] [॥१६॥*]

१७ फलमखिल ⏑ – ⏑ – ⏑ – –, ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑
– ⏑ – ⏑ – – [।*] ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – ⏑
– –, ⏑ ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –[3] [॥१७॥*]

१८ सम्यग्विभावित इहास्ति वराह[देवः*] – – ⏑ – ⏑ ⏑
⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – – [।*] – – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑
⏑ – ⏑ – –, – – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ –
–[4] [॥१८॥*][4]

---

१. श्लोक १४ व १५ यांचें वृत्त–पुष्पिताग्रा.

२. वृत्त–वसन्ततिलका.

३. वृत्त–पुष्पिताग्रा. २७. वृत्त–वसन्ततिलका.

४. याच्या पुढील चार ओळींतील एखादें अक्षर क्वचित् वाचतां येतें, पण पूर्ण असा एकहि शब्द दिसत नाही.

२६. अजंटा येथील क्रमांक १७च्या लेण्यांतील लेख

उपलब्धि—ह्या लेखाच्या प्रती पूर्वी अनेकांनी घेतल्या होत्या. पण त्याचें पहिलें वाचन डॉ. भाऊ दाजी यांनी केलें. फेब्रुवारी सन १८६३ मध्ये त्यांनी ह्या व अजंट्याच्या इतर लेखांचे छाप घेतले आणि त्यावरचे आपले निबंध रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेपुढे १० जुलै १८६३ रोजीं वाचले. त्यांनी आपल्या निबंधाबरोबर या लेखाची यथादृष्ट प्रत, त्याचें वाचन आणि इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध केलें. डॉ. भाऊ दाजींना या लेखांतील नऊ राजनामें वाचतां आलीं. त्यांपैकी धृतराष्ट्र, हरिसाम्ब, शौरिसाम्ब आणि रविसाम्ब हीं एका वंशांतील आणि बाकीचीं पांच उपेन्द्रगुप्त, स्काच, नीलदास, स्काच आणि कृष्णदास—हीं दुसऱ्या वंशांतील होतीं असें त्यांनी प्रतिपादिलें. तेराव्या ओळींत त्यांनी अचित्य नामक सचिवाचें नांव वाचलें. तो रविसाम्बाचा सेवक असावा असें त्यांना वाटलें. एकविसाव्या ओळींत उल्लेखिलेला हरिषेण हा वाकाटक नृपति होय हें डॉ. भाऊ दाजींच्या ध्यानांत आलें नाही. या लेखाचा उद्देश कोणता होता, त्यांत उल्लेखिलेल्या नृपतींचीं राज्यें कोठे होतीं, त्यांच्या राजधान्या कोणत्या होत्या याविषयी त्यांनी कांहीहि लिहिलें नाही.

यानंतर हा लेख पं. भगवानलाल इंद्रजी यांनी पश्चिम भारताच्या लेण्यांतील कोरीव लेख (आर्किऑलॉजिक सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया) (१८८१), पृ. ७३ इ. मध्ये प्रास्ताविक माहिती व इंग्रजी भाषांतर यांसह प्रसिद्ध केला. त्यांनी या लेखाचें वाचन आपल्या नेहमीच्या कुशलतेने पूर्णपणें केलें. त्यांनी प्रथमच खालील दहा राजनामें वाचलीं व हे राजे एकाचे वंशाचे असून त्यांनी अश्मक देशावर राज्य केलें

असें प्रतिपादिलें—धृतराष्ट्र, हरिसांब, शौरिसाम्ब, उपेन्द्रगुप्त, अगज किंवा प्रथम काच, भिक्षुदास, नीलदास, द्वितीय काच, कृष्णदास आणि रविसाम्ब. शिवाय त्यांनी यांत उल्लेखिलेला हरिषेण हा वाकाटक नृपति असून हे अश्मक राजे त्याचे मांडलिक असावे, असें प्रतिपादिलें. बाराव्या ओळींतल्या खंडित वर्णनावरून त्यांनी असाहि तर्क केला की कृष्णदासाच्या वडील मुलाने--त्याचें नांव आता नष्ट झालें आहे—रविसाम्ब नामक आपल्या लहान भावाला ठार मारलें होतें; पण नंतर त्याला पश्चात्ताप झाला होता. ज्या विहार लेण्यांत प्रस्तुत लेख कोरला आहे तें या राजाने किंवा त्याच्या अचिन्त्य नामक सचिवाने खोदविलें असावें. या लेखाच्या काळाविषयी पं. भगवानलालनी म्हटलें आहे की हा लेख अजंट्याच्या सोळाव्या लेण्याच्या काळचा असून तो छत्तीसगड व वैनगंगेच्या परिसरांतील खिस्तोत्तर पांचव्या किंवा सहाव्या शतकांत प्रचलित असलेल्या लिपींत कोरला आहे.

यानंतर हा लेख डॉ. बुल्हरने ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, ग्रंथ ४ (१८८३) (पृ० १२८ इ० व प्लेट ५६) मध्ये प्रकाशित केला. हा ठसा पं. भगवानलाल यांनी घेतलेल्या छापावरून तयार केला होता. अक्षरें स्पष्ट करण्याकरितां नंतर त्यांत बराच फेरबदल केला होता, असें दिसतें. डॉ. बुल्हरचें वाचन पं. भगवानलालच्या वाचनाहून फारसें भिन्न नाही. त्यांनी तींच राजनामें वाचलीं, पण बाराव्या श्लोकाच्या अर्थाविषयी पं. भगवान-लालनी केलेलें चुकीचें विधान दुरुस्त केलें. त्यांनी दाखविलें की त्या श्लोकाचा खरा अर्थ रविसाम्ब हा अपघाताने किंवा व्याधीने अकालीं मरण पावला असा आहे. त्यापुढील श्लोकांत तत्कालीन राजाच्या अचित्य नामक सचिवाने हें विहारलेणें दान दिलें असें म्हटलें आहे, असेंहि त्यांनी प्रतिपादिलें. या लेखाचा काळ खिस्तोत्तर पांचव्या शतकाचा शेवट किंवा सहाव्या शतकाचा आरंभ असावा असें बुल्हरचें मत होतें.

शेवटीं प्रस्तुत लेख गव्हर्मेंट एपिग्राफिस्ट यांनी पाठविलेल्या छापावरून मी हैदराबाद आर्किऑलॉजिकल सीरिज, नं. १५, मध्ये ठसा व इंग्रजी भाषांतर यांसह सन १९४९ मध्ये प्रसिद्ध केला. त्याच ठशावरून येथे त्याचें वाचन केलें आहे.

वर्णन—हा लेख हैदराबाद प्रदेशांतील अजंटयाच्या सतरा क्रमांकाच्या लेण्यांत व्हरांडयाच्या बाजूच्या भिंतीवर कोरला आहे. तो उन्हापावसामुळे पुष्कळच खराब झाला आहे. डाव्या बाजूच्या प्रत्येक ओळींतील कित्येक अक्षरें त्यांवर पावसाचें पाणी गळत राहिल्यामुळे पूर्णपणें नष्ट झालीं आहेत. तथापि या लेखाचा मथितार्थ समजण्यास फारशी अडचण येत नाही.

अक्षरवटिका—या लेखाने ४ फूट रुंद व ४ फूट, ५ इंच उंच जागा व्यापली आहे. याची अक्षरवटिका पेटिकाशीर्षक प्रकारची आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—व्यंजनयुक्त (दीर्घ) ई एका कुरळ्या वक्ररेषेने दाखविली आहे. ही रेषा बहुधा डावीकडे (उ. 'मरीचि–', ओ, २०, 'न्यवीविशत्', ओ. २३ इ०) व क्वचित् उजवीकडे (उ. 'प्रदीप्त'– ओ. ६; 'व्यवीवृधत्', ओ. १३) वळविली आहे. व्यंजनयुक्त 'औ' द्विभागात्मक आहे; 'कान्तरूपौ,' ओ. ८ पाहा; 'च' आणि 'व' यांच्या आकृति कांही ठिकाणीं एकसारख्या आहेत, उ० 'मरीचि–', ओ. २० आणि 'रवि'–, ओ. २९ पाहा. जिह्वामूलीयाचें चिह्न १, ४ आणि ६ ओळींत आणि उपध्मानीयाचें ११ व १३ ओळींत आलें आहे.

भाषा—या लेखाची भाषा संस्कृत असून तो पूर्णपणें पद्यांत आहे. त्यांत एकूण २९ श्लोक आहेत. कांही ठिकाणीं पहिल्या श्लोकार्धाची समाप्ति आडव्या रेषेने आणि सबंध श्लोकाची दोन उभ्या रेषांनी दाखविली आहे. लेखनाचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—'र्' नंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे, 'कर्म्मणो', ओ. १, 'कीर्ति', ओ. ५, पाहा; 'भूव स्तूप–' यामध्ये विसर्गाचा लोप पाणि-

निसूत्र ८, ३, ३६, यावरील वार्त्तिकानुसार झाला आहे. पण 'अनूचिवां', ओ. १८ मध्ये पदान्तीच्या न् चा अनुस्वार केला आहे तो मात्र नियमाविरुद्ध आहे.

विषय—पुढे दाखविल्याप्रमाणे हा लेख ज्या राजाने कोरविला होता त्याचें नांव आता नष्ट झालें आहे, पण तो वाकाटकनृपति हरिषेणाचा मांडलिक असून बहुधा खानदेशावर राज्य करीत असावा. या लेखाचा उद्देश या राजाने अजंटयाचें सतरा क्रमांकाचें विहार लेणें व एकोणीस क्रमांकाचें गंधकुटी लेणें खोदविलें होतें, हें जाहीर करण्याचा होता. तेव्हा त्याचा काळ खिस्तोत्तर पांचव्या शतकाची अखेर हा येतो. सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील लेखाप्रमाणे हा लेखहि वाकाटक सम्राट् हरिषेणाच्या कारकीर्दीतील आहे.

प्रस्तुत लेखाचा डाव्या बाजूचा बराचसा भाग नष्ट झाल्यामुळे त्यांतील माहिती पूर्णपणें देणें शक्य नाही. कांही ठिकाणीं नष्ट झालेल्या भागांतील अर्थ तर्काने लावावा लागतो. लेखाचा आरंभ संसाररूपी वृक्षाला वज्रासारखा असणाऱ्या भगवान् बुद्धाच्या नमनाने झाला आहे. नंतर विहारदात्याची खालील वंशावळ दिली आहे--

(नाम नष्ट)
|
(पुत्र)
धृतराष्ट्र
|
(पुत्र ?)
हरिसाम्ब
|
(पुत्र)
शौरिसाम्ब
|
(पुत्र ?)
उपेन्द्रगुप्त

उपेन्द्रगुप्त
|
(धाकटा पुत्र)
प्रथम काच
|
(पुत्र ?)
भिक्षुदास
|
(पुत्र)
नीलदास
|
(पुत्र ?)
द्वितीय काच
|
(पुत्र)
कृष्णदास
|
(नाम नष्ट) — रविसाम्ब

या वंशाच्या मूळ पुरुषाचें नांव नष्ट झालें आहे, पण दुसऱ्या श्लोकांतील वर्णनावरून 'जनांचें पालन करणारा' या अर्थाचें तें असावें असें दिसतें. हरिसाम्ब, उपेन्द्रगुप्त, भिक्षुदास आणि द्वितीय काच यांचें तत्पूर्वींच्या राजांशीं नक्की कोणतें नातें होतें तें अवशिष्ट भागावरून स्पष्ट नाही. प्रथम काचाविषयीं म्हटलें आहे की तो उपेन्द्रगुप्ताचा धाकटा मुलगा होता; पण त्याचा वडील भाऊ कां गादीवर आला नाही तें सांगितलें नाही.

कृष्णदासाच्या राणीचेंहि नांव नष्ट झालें आहे. तिच्यापासून त्याला प्रद्युम्न व साम्ब यांसारखे पुत्र झाले होते असें म्हटलें आहे. त्यांपैकी वडील मुलगा गादीवर बसला. दोघा भावांनी मिळून अश्मकादि देश

जिंकले. ते आनंदाने एकत्र राहत असल्यामुळे त्यांचें परस्परांवरचें प्रेम व यश वृद्धिंगत होत गेलें. कांही काळाने रविसाम्बाला त्याच्या पूर्वीच्या कर्मांमुळे अकालीं मृत्यु आला. तेव्हा वडील भावाला अत्यंत दुःख झालें. संसाराची अनित्यता पटल्यामुळे त्याने धार्मिक वृत्तीने आपला काळ घालविण्यास सुरवात केली. तो विद्या, दातृत्व, दया, आनंद, मैत्री, क्षमा, सामर्थ्य, बुद्धिमत्ता इत्यादि गुणांनी युक्त असलेल्या महात्म्यांची सेवा करूं लागला. आणि सदाचारी नृपतींचें अनुकरण स्वतःच्या वर्तनांत करूं लागला. तो याचकांना विपुल धन देत असे, इतकें की ते याचकच इतर याचकांचे मनोरथ पूर्ण करून त्याची कीर्ति वाढवीत असत. बंदींत असलेल्या व भयत्रस्त अशा अनेकांस पुष्कळ धन खर्चून तो मुक्त करीत असे. भगवान् बुद्धाच्या ध्यानाने सिद्धि मिळविण्यांत संपत्तीच्या योगें अडथळा येतो हें जाणून त्याने स्तूप, विहार इत्यादिकांनी भूमीला सुशोभित केलें आणि दानाने याचकांना संतुष्ट केलें. त्या काळीं प्रजेचें हित करणारा श्रेष्ठ नृपति हरिषेण हा पृथ्वीचें पालन करीत होता. नंतर त्याने सुन्दर अशा सह्य पर्वताच्या टेकडीवर भगवान् बुद्धाचें चैत्य मंदिर आंत असलेला हा एकाश्मक (monolithic) असा मंडप खोदविला. त्याच्या जवळच त्याने चांगलें, हलकें, स्वच्छ व थंडगार पाण्याचें मोठें टाकें बनविलें. त्याच्या पश्चिमेस त्याच टेकडीवर त्याने एक मोठी गन्धकुटी (चैत्य लेणें) खोदविली. जगाच्या हिताकरिता झटणाऱ्या या दात्याला भगवान् बुद्धाच्या ध्यानाने होणाऱ्या सिद्धीकरिता अभीष्ट अशी सर्व कल्याणपरम्परा प्राप्त होवो आणि जोंपर्यंत सूर्य आपल्या किरणांनी अंधकाराचा नाश करीत असेल तोंपर्यंत हा मण्डप सज्जनांचें कल्याण करीत राहो अशी इच्छा शेवटल्या दोन श्लोकांत व्यक्त केली आहे.

चर्चा—वरील सारांशावरून ज्याचें नांव दुर्दैवाने नष्ट झालें आहे तो या वंशांतील शेवटचा राजा वाकाटक नृपति हरिषेण याचा समकालीन व मांडलिक होता हें दिसून आलें असेल. त्याच्या पूर्वीं दहा

राजे होऊन गेले होते. तेव्हा या वंशाचा मूळ पुरुष सुमारें खिस्तोत्तर २७५ ते ३०० या काळांत होऊन गेला असावा.

दहाव्या श्लोकांत अश्मक देशाचा उल्लेख आला आहे. त्यावरून हे राजे अश्मक देशावर म्हणजे सध्याच्या खानदेशांत राज्य करीत होते असा तर्क पं. भगवानलाल यांनी केला होता. पण तो बरोबर दिसत नाही; कारण या राजांनी अश्मकावर स्वारी केली होती, अश्मक हा त्यांचा मूळचा देश नव्हे, हें त्या श्लोकावरून स्पष्ट दिसतें. सुत्तनिपातावरून अश्मक देश गोदावरीच्या परिसरांत आणि मूलकाला लागून होता असें दिसतें. त्या ग्रंथांत म्हटलें आहे कीं अश्मक देशांत गोदावरी तीरावर राहणाऱ्या बावरि नामक ब्राह्मणाचे शिष्य मूलक देशाची राजधानी प्रतिष्ठान या नगरीं प्रथम जाऊन नंतर त्यांनी उत्तर भारतांत प्रयाण केलें. तेव्हा अश्मक हा गोदावरीतीरचा प्रदेश असून त्यांत सध्याच्या अहमदनगर व बीड जिल्ह्यांच्या कांही भागांचा अंतर्भाव होत असावा. अश्मक हा अजंटयाचा दक्षिणेस असल्यामुळे तो व त्या पर्वताच्या उत्तरेस असलेला खानदेश हे एक असणें शक्य दिसत नाही.

तथापि हे राजे खानदेशांत कोठे तरी राज्य करीत असावे हा तर्क असंभवनीय नाही. या राजांपैकी भिक्षुदास, नीलदास आणि कृष्णदास या तीन राजांचीं नांवें 'दास'पदान्त आहेत. त्यावरून पश्चिम खानदेशांतील शिरपुर गावीं सन १८४४ मध्ये ज्याचा ताम्रपट सापडला तो महाराज रुद्रदासहि याच वंशांतला असावा असा तर्क पंडित भगवानलाल यांनी केला होता. याच्यापुढे जाऊन त्यांनी कृष्णदासाच्या ज्या वडील पुत्राचें नांव प्रस्तुत लेखांत नष्ट झालें आहे तो हा रुद्रदासच असावा असें प्रतिपादिलें. यानंतर महाराज स्वामिदास व भुलुंड यांचे ताम्रपट इंदूर येथे पं. वामनशास्त्री इस्लामपुरकर यांच्या संग्रहीं असलेले प्रसिद्ध झाले. हे ताम्रपटहि मूळचे खानदेशांतील असावे हें मी

इतरत्र दाखविलें आहे.* स्वामिदास, भुलुंड व रुद्रदास यांच्या ताम्रपटांत उल्लेखिलेलीं ६७, १०७ व ११७ हीं वर्षें कलचुरि-चेदि संवताचीं आहेत हेंहि मी इतरत्र दाखविलें आहे. अर्थात् रुद्रदास याचा काळ (११७ + २४९=)इ. स. ३६६ हा येतो. तेव्हा तो पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेलेल्या कृष्णदासाचा पुत्र असणें शक्य नाही. प्रस्तुत अजंट्याच्या लेखांत उल्लेखिलेले राजे खिस्तोत्तर २७५–५०० या काळांत राज्य करीत होते. खानदेशांतील स्वामिदास, भुलुंड व रुद्रदास हे त्यांचे समकालीन असल्यामुळे त्याच वंशाच्या दुसऱ्या शाखेचे असावेत. त्यांची राजधानी वल्ख हिचा उल्लेख त्यांच्या ताम्रपटांत आला आहे. हें नगर सध्याचें खानदेशांतील वाघली असावें असें मी इतरत्र दाखविलें आहे. अजंट्याच्या प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेल्या राजांची राजधानी कोठे होती तें मात्र माहीत नाही.

स्थलनिश्चय—खानदेशाचें प्राचीन नांव **अश्मक** नव्हे हें आपण वर पाहिलें. पण तें **ऋषीक** असणें संभवनीय आहे. वराहमिहिर ऋषीक दक्षिण भागांत आहे, असें सांगतो. रामायणांत सुग्रीवाने सीतेच्या शोधाकरितां ज्या देशांस जाण्याची सूचना वानरांस केली त्यांमध्ये विदर्भाबरोबर ऋषीकाचा उल्लेख आला आहे. महाभारतांतहि ऋषीक आणि विदर्भ यांचा एकत्र उल्लेख केला आहे. तसेंच कर्णाने जिंकलेल्या देशांमध्ये ऋषीक आणि अश्मक यांचा निर्देश आला आहे. 'दशकुमारचरिता'मध्ये अश्मकाधिपतीप्रमाणे ऋषीकेश्वरहि विदर्भ राजाचा मांडलिक होता, असें म्हटलें आहे. पुळुमावीच्या नाशिक येथील लेण्यांतील लेखांत गौतमीपुत्र सातकर्णीने जिंकलेल्या देशांमध्ये असक (अश्मक) व मूलक या देशांबरोबर असिक (ऋषीक) याचेंहि नांव आलें आहे. या सर्व संदर्भांवरून ऋषीक हा अश्मक, मूलक व विदर्भ यांच्या जवळ असलेला देश होता, हें स्पष्ट दिसतें. हें वर्णन खानदेशालाच लागू पडतें.

* संशोधनमुक्तावलि, सर दुसरा, पृ. ७५ पाहा.

कारण त्याच्या पूर्वेस विदर्भ (वऱ्हाड) व दक्षिणेस मूलक (औरंगाबाद जिल्हा) हे आहेत. मूलकाच्या दक्षिणेस अश्मक देश (सध्याच्या अहमदनगर व बीड जिल्ह्याचा कांही भाग) होता. ऋषीक हें नांव खिस्तोत्तर सातव्या शतकापर्यंत प्रचलित होतें, त्यानंतर मुसलमानी राजवटींत त्या देशाला सध्याचें खानदेश हें नांव मिळालें.

मांडलिक वंश—प्रस्तुत लेखांत वर्णिलेला राजवंश खिस्तोत्तर तृतीय शतकाच्या अखेरीस उदयास आला. त्याचे आरंभींचे राजे सातवाहनानंतर पश्चिम महाराष्ट्रांत ज्यांनी आपलें साम्राज्य स्थापलें त्या आभीर सम्राटांचे मांडलिक असावे. आभीरांच्या अस्तानंतर त्यांनी वाकाटकांचें स्वामित्व कबूल केलें, असें दिसतें. अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील एका खंडित श्लोकांत विदर्भाधिपति वाकाटक सम्राट् हरिषेण याने त्रिकूट देश जिंकल्याचा उल्लेख आहे. खानदेश हा त्रिकूट व विदर्भ यांमध्ये असल्यामुळे त्याच्या राजानेहि हरिषेणाचें स्वामित्व स्वीकारलें असल्यास नवल नाही. प्रस्तुत लेखांत आलेल्या हरिषेणाच्या उल्लेखावरूनहि हीच गोष्ट स्पष्ट दिसते. 'दशकुमारचरिता'च्या विश्रुतचरित नामक आठव्या उच्छ्वासांत आलेल्या विदर्भनृपतीच्या कथेंत बराच ऐतिहासिक भाग असावा असें दिसतें. त्या कथेंत हरिषेणाच्या पुत्राच्या काळची विदर्भांतील परिस्थिति वर्णिली आहे हें मी इतरत्र दाखविलें आहे.* त्या कथेंत ऋषीकेश्वर हा विदर्भनृपतीचा मांडलिक होता असें म्हटलें आहे त्यावरूनहि प्रस्तुत लेखांत वर्णिलेलें खानदेशचें राजघराणें वाकाटकांचें स्वामित्व कबूल करीत होतें असें दिसतें.

कृष्णदासाच्या मुलानंतर या राजवंशाचें काय झालें याची माहिती मिळत नाही. वाकाटकांच्या अस्तानंतर उदयास आलेल्या कलचुरींनी उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रदेशांवर स्वामित्व प्रस्थापित केलें. आद्य

* मागे, पृ. ६२–६४ व संशोधनमुक्तावलि, सर दुसरा, पृ. ८५ इ. पाहा.

कलचुरि नृपति कृष्णराज याच्या चांदीच्या नाण्यांचे (कृष्णराजरूपकांचे) संचय खानदेशच्या सीमांवर असलेल्या नाशिक व वऱ्हाड या प्रदेशांत सापडले आहेत. अलीकडे कृष्णराजाचें तसलेंच नाणें खानदेशांतहि सांपडलें आहे.* त्यावरून खानदेश त्या कलचुरि नृपतीच्या साम्राज्यांत मोडत होता, यांत संशय नाही.

ओळ वाचन[1]

१ ⏑ – ⏑ – – ⏑ [भव*]द्रुमाशनिं[2] प्रणम्य विद्यात्रय-
पारगं मुनिम् [।*] विहारदातुर्व्यवदातकर्म्मणो[3] गुणा-
भिधानोपनयxकरिष्यते ।। [१।।*][4]
२ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ [पा*]लनेन[5] लब्धात्मभावस्य नरा-

* असलें एक नाणें नन्दूरबारचे श्री. शिवलदास शम्भुभाई देसाई यांनी अलीकडे मजकडे पाठविलें होतें.

१. हैदराबाद आर्किऑलॉजिकल सीरिज, क्रमांक १५, मध्ये छापलेल्या ठशांवरून.

२. भगवानलाल व बुल्हर यांनी '–मावनिं' असें वाचलें, पण मा च्या पूर्वीचें अक्षर 'द्रु' आहे. तेव्हा 'द्रुमाशनिं' या पाठाच्या खरेपणाविषयीं शंका नाही. प्रस्तुत कवीने १२ व्या श्लोकांतहि 'अशनि' शब्द योजिला आहे.

३. 'कर्मणो' असें बुल्हरने वाचलें पण 'र्म्म' मधील खालचा 'म' ठशांत स्पष्ट दिसते.

४. वृत्त–वंशस्थ.

५. भगवानलालनी '–नेश' असें वाचलें, पण या संदर्भांत त्याचा अर्थ जुळत नाही. बुल्हरचा पाठ 'नेन' हा बरोबर दिसतो. त्याच्या मागील अक्षर 'ल' आहे. येथील पाठ 'नाम्ना जनपालनेन' असा असावा.

धिपस्य[।*] धृतातपत्रस्य बभूव पुत्रस्सितातपत्रो धृतराष्ट्र-संज्ञः[1] [।।२।।*]

३ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – स्य राज्ञो हरिसाम्बोम्बुरुहेन्दु-कान्तवक्त्रः [।*] नृपतेस्तनयो बभूव तस्याप्यमलश्रीः क्षितिपालशौरिसाम्बः[2] ।। [३।।*]

४ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ [ते]न[3] पृथुकीर्तिर्द्युतिमानुपेन्द्र-गुप्तः [।*] समभूद[वर][4]स्सुतोथ तस्य क्षितिपxकाच इति प्रकाशनामा ।। [४।।*]

५ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – – द्युति[5]कीर्तिन्यसनाय भिक्षुदासः [।*] प्रथितो भुवि नीलदासनामा नृपतिस्तस्य सुतो नराधिपस्य ।। [५।।*]

६ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – – [रैः] प्रथितxकाच इति

---

१. वृत्त–उपजाति.

२. श्लोक ३–७ यांचें वृत्त-औपच्छन्दसिक.

३. भगवानलालनी ‘नेश’ असें वाचलें. बुल्हरनेहि दुसरें अक्षर ‘श’ असेंच वाचलें, पण ठशावरून ‘तेन’ असा पाठ दिसतो.

४. भगवानलालनी ‘दगजः’ असें संदिग्धपणें वाचलें, आणि तें कदाचित् ‘दवर’ असेल असें म्हटलें. ‘दव’ हीं अक्षरें स्पष्ट आहेत असें बुल्हरनेहि म्हटलें आहे. येथील पाठ ‘–दवर–’ किंवा कदाचित् ‘–दपर–’ असा असेल.

५. भगवानलाल आणि बुल्हर यांनी ‘द्भुवि’ असें वाचलें, पण यांतील दुसरें अक्षर स्पष्टपणें ‘ति’ आहे, आणि पहिलें बहुत-करून ‘द्यु’ असावें.

प्रदीप्तकीर्त्तिः [।*] नृपतेरथ तस्य कृष्णदासः कुलवंश-
द्युतिवर्द्धनो बभूव ॥ [६॥*]

७ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – – स्तनया चन्द्रकरावदात-
वेशा [।*] अभवत्परिपूर्ण्णचन्द्रवक्त्रा विनयाचारविभूष-
णातिचन्द्रा[1] ॥ [७॥*]

८ – – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [अ*]र्त्थिस्थलोद्यो[2]-
(द्द्यो)तकरीमवाप [।*] तस्यां च तस्याम्बुरुहायताक्षा-
वुत्तप्तचामीकरकान्तरूपौ[3] ॥ [८॥*]

९ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – – [प्रद्यु]म्नसाम्बप्रतिमौ
कुमारौ [।*] धराधिपाख्यां[4] प्रथमो बभार दध्रे द्वितीयो

---

१. भगवानलालनी 'चन्द्रा' एवढेंच वाचलें, पण बुल्हरने हें नांव 'सुचन्द्रा' असें वाचलें. 'चन्द्रा'च्या मागील अक्षरावर वेलांटी दिसते. 'चन्द्र' शब्दाचा पुनः पुनः प्रयोग केला असल्यामुळे राणीचें नांव 'चन्द्र'शब्दान्त असावें. कदाचित् तें 'अतिचन्द्रा' असेल.

२. हीं तीन अक्षरें येथे प्रथमच वाचलीं जात आहे. या श्लोकार्धांतील वर्णन राणीच्या 'अतिचन्द्रा' नांवावरून सुचलेलें दिसतें.

३. वृत्त–इन्द्रवज्रा (किंवा उपजाति).

४. येथे पूर्वीच्या संपादकांनी भिन्न भिन्न वाचन केलें आहे. 'धराधिपत्ये प्रथमावतारम्' (भाऊ दाजी); 'एकाधिपत्यप्रथमाव-तारम्' (भगवानलाल); 'एकाधिपत्यं प्रथमो बभार' (बुल्हर). नवीन ठशावरून वर दिलेलें वाचन बरोबर आहे असें दिसेल.

[र]विसाम्बसंज्ञाम्[1][2] ॥ [९॥*]

१० ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ –, ⏑ – ⏑ [नियो-
च्छ्रित][3]मश्मकादि[कम्] [।*] [कृ]तार्थसत्वा(त्त्वा)[व]-
भिभूय[4] भूयसा रराजतुश्चन्द्रदिवाकराविव[5] ॥ [१०॥*]

११ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ –, ⏑ – ⏑ – – ह
निबद्धमानयो[6]: [।*] विवृद्धसौहार्द्दयशःप्रतानयोस्सदानु-
कूल्येन सुखं विजह्रुषो[7]: ॥ [११॥*]

१२ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – [अमान][8]वैरप्यनिवा-
र्य्यशासन: [।*] पुराकृतोद्भावितभीमविक्रम: कनीयसि

---

१. भाऊदाजीनी प्रथम 'रविसाम्ब–' असें वाचलें, व तेंच नंतरच्या संपादकांनी स्वीकारलें आहे. या नांवाचें पहिलें अक्षर अस्पष्ट आहे, तथापि 'हरिसाम्ब', 'शौरिसाम्ब' या नांवावरून येथील नांव रविसाम्ब असणें शक्य आहे.

२. वृत्त–उपजाति.

३. हीं चार अक्षरें येथे प्रथमच वाचलीं जात आहेत. तीं स्पष्ट आहेत.

४. भगवानलाल आणि बुल्हर यांनी 'नु ताभ्यामभिभूय' असें वाचलें.

५. श्लोक १०–१३ यांचें वृत्त–वंशस्थ.

६. हीं सात अक्षरें स्पष्ट आहे.

७. भाऊदाजी व भगवानलाल यांनी 'विजह्वती:' असें वाचलें, पण तें व्याकरणदुष्ट आहे. वरील पाठ बुल्हरने प्रथम दिला.

८. हा शब्द प्रथमच पूर्णपणे वाचला जात आहे.

प्राख्यदनित्यताशनि[म्][1] ॥ [१२॥*]

१३ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ –, ⏑ – ⏑ धैर्य्यादिव

कायधीरुजः[2] [।*] अनित्यसंज्ञासचिवस्तत[3]ऽपरं व्यवीवृध-

त्पुण्यमहामहीरुहम् ॥ [१३॥*]

१४ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – – नुजात-

तोषा[न्] [।*] भूयश्श्रुतत्यागदयाप्रमोदमैत्रीक्षमावीर्य-

धियस्सिषेवे[4] ॥ [१४॥*]

१५ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – – ⏑

⏑ – नरेन्द्रान् [।*] प्रशस्तवृत्तान्सुविशुद्धवृत्तो वृत्तेन

---

१. भाऊ दाजींनीं ‘प्रेत्य च नित्यताशनिः’ असें आणि भगवानलालनी ‘प्र······शनिः’ असें वाचलें ‘प्रा’ च्या नंतरचें अक्षर ‘ख्य’ आहे. ‘धराधिपाख्याम्’ (ओ.९) यांतील ‘ख्य’ पाहा. पुढील अक्षरें फारशीं अस्पष्ट नाहीत. ‘अनित्य’ शब्दाची पुनरुक्ति पुढील श्लोकांत आहे.

२. हा सामासिक शब्द प्रथमच वाचला जात आहे.

३. हा समास भिन्न भिन्न प्रकारें वाचला गेला होता— उदाहरणार्थ, ‘अनित्यसंज्ञासचिव–’ (भाऊ दाजी); अचित्यसंज्ञासचिव–’ (भगवानलाल); ‘अचित्यसंज्ञासचिव–’ (बुल्हर). यांतील दुसरें अक्षर स्पष्टपणें ‘नि’ आहे आणि पांचवे ‘ज्ञा’ आहे. तेव्हा भाऊ दाजीचें वाचन बरोबर होतें. त्यांनी केलेला त्याचा अर्थ मात्र चूक होता. ‘अनित्यसंज्ञासचिवः’ याचा अर्थ ‘संसाराच्या अनित्यतेची जाणीव ज्याला सदैव आहे असा’ याप्रमाणें केला पाहिजे. छांदोग्य उप. १, २ यावरील शांकर भाष्यांत ‘सचिव’ शब्दाचा असा उपयोग केला आहे.

४. श्लोक १४ ब १५ यांचें वृत्त–उपजाति.

सभ्यानुचितोनुचक्रे[१] ।। [१५।।*]

१६ – – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, – – ⏑ – – ⏑ ⏑

– चकार [।*] अन्यार्त्थिकस्यार्त्थिजन[२]स्तथैव कीर्ति

कृतार्थः प्रथयास्बभूव[३] ।। [१६।।*]

१७ ⏑ – ⏑ – – ⏑ – ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – [या]

न्भ[य]विप्लुताक्षान् [।*] अमूमुचद्वित्तविसर्गशक्त्या

पुत्रानिवेष्टान्[४]करुणाभिमृष्टः[६] ।। [१७।।*]

१८ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ –, ⏑ – ⏑ – –

प्रणयेन पुत्रवत् [।*] अनूचितवां(वान्) सोपि हि यस्य

हृद्गतां विद[न्] नृवध्या[५]शयशुद्धिसम्पदम्[६] ।। [१८।।*]

---

१. पूर्वीच्या सर्व संपादकांनी 'सम्यक्षुभितोनुचक्रे' असें वाचलें, पण तें ठशावरून बरोबर दिसत नाही आणि त्याचा अर्थहि नीटसा लागत नाही. यांतील तिसरें अक्षर 'नु' आणि चौथें 'चि' आहे. तेव्हा 'सभ्यानुचितोनुचक्रे' हाच पाठ येथे शक्य आहे.

२. भाऊ दाजींनी 'अन्यार्थिकस्यार्थिजन' असें वाचलें, पण भगवानलालनी त्यांतील दुसरें अक्षर गाळलें आणि बुल्हरने 'अर्त्थिकस्यार्थिजन' असें वाचलें, पण तें वृत्तानुकूल नाही. येथे दिलेला पाठ ठशावरून बरोबर दिसतो.

३. वृत्त—इन्द्रवज्रा.

४. भगवानलाल यांनी 'पुत्राभिचेष्टान्' आणि बुल्हरने 'पुत्राधिचेष्टान्' असें वाचलें. पण यांतील एकहि संदर्भाला जुळत नाही. शिवाय, 'ष्टा' च्या पूर्वीचें अक्षर स्पष्टपणें 'वे' आहे, 'चे' नाही. म्हणून येथील शुद्ध पाठ वर दिल्याप्रमाणें आहे.

५. 'नृवद्ध्याशय–' असें वाचावें.

६. वृत्त—वंशस्थ.

१९ – – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, – – ⏑ – – ⏑

करणि सद्यः [।*] सर्वज्ञभावप्रणिधानसिद्धि सत्याभि-

धानां विभवादपेयुः[1][2] ।। [१९।।*]

२० ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ [स*]म्भार-

चयाधियोगा[त्*][3] [।*] यशोंशुभिश्चन्द्रमरीचिशुभ्रैर्ज्ज-[4]

गत्समग्रं समलञ्चकार[5] ।। [२०।।*]

२१ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –, ⏑ ⏑ – – वदना-

रविन्दचन्द्रे [।*] परिपालयति[6] क्षितीन्द्रचन्द्रे हरिषेणे

हितकारिणि प्रजानाम्[7] ।। [२१।।*]

---

१. भाऊ दाजी यांनी 'सत्याभिधानानि' असें आणि भगवानलाल यांनी 'सत्याभिधानाभिभवात्' असें वाचलें. सन्दर्भा-करून या श्लोकांत 'संपत्ति निःश्रेयसप्राप्तींत विघ्न उत्पन्न करते' हें शुकवचन दिलें आहे असें दिसतें.

२. वृत्त—इन्द्रवज्रा (किंवा उपजाति).

३. भगवानलालनीं '–म्बारचयांधियोगः' असें वाचलें; बुल्हरच्या मतें 'च' आणि 'योगः' एवढींच अक्षरें निश्चित आहेत. पहिल्या अक्षराचें खालचें व्यंजन 'भ' आहे. शेवटचा शब्द 'अधि-योग' असल्यामुळे तो पञ्चम्यन्त असला पाहिजे.

४. भगवानलालनी 'यशोम्बुभिः' आणि बुल्हरने 'यशों-शुभिः' असें वाचलें. ठशावरून बुल्हरचें वाचन बरोबर आहे असें दिसतें.

५. वृत्त—उपेन्द्रवज्रा किंवा उपजाति.

६. 'ल' नंतर एक निरर्थक दंड आहे.

७. वृत्त—औपच्छन्दसिक.

२२ — — ⏑ — — ⏑ ⏑ — ⏑ — —, — — ⏑ नत्यद्भुत-
पुण्यराशिः [।*] चक्रे भुव[1] स्तूपविहारभूषां दानोदयै-
श्चार्त्थिजनप्रमोदम्[2] ।। [२२।।*]

२३ — — ⏑ — — ⏑ ⏑ — ⏑ — —, — — नाकुल-
नादवद्भिः[3] [।*] नित्यं वितानार्थधिया वहद्भिरम्भोधरै-
श्शश्रीमति सह्यपादे[4] ।। [२३।।*]

२४ ⏑ — ⏑ — — ⏑ ⏑ — ⏑ — —, ⏑ — ⏑ गाम्भीर्य्यगुणै-
रुपेतम् [।*] निवेशितान्तर्मुनिराजचैत्यमेकाश्मकं मण्ड-
परत्नमेतत्[5] ’ ।। [२४।।*]

२५ ⏑ — ⏑ — — ⏑ ⏑ — ⏑ — —, ⏑ — ⏑ — — विपुलां

---

१. बुल्हरने ‘ भुवः ’ असें वाचन सुचविलें आहे, पण त्याची जरूरी नाही. येथील विसर्ग पाणिनिसूत्र ८, ३, ३६ यावरील वार्त्तिकाने गाळला आहे.

२. श्लोक २२ व २३ यांचें वृत्त इन्द्रवज्रा (किंवा उपजाति).

३. हेंच वाचन भाऊ दाजींनी दिलें होतें. भगवानलालनी ‘ नानिलनादवद्भिः ’ असें वाचन सुचविलें, पण त्याचा अर्थ चांगलासा लागत नाही. बुल्हरने ‘ नाद ’ शब्दापूर्वीचीं दोन अक्षरें गाळलीं आहेत.

४. हा श्लोकार्ध पूर्णपणे येथेच वाचला आहे. अजंटा पर्वताचें ‘ सह्यपाद ’ असें येथील वर्णन पूर्वीच्या संपादकांच्या लक्षांत आलें नव्हतें.

५. श्लोक २४–२७ यांचें वृत्त– उपजाति.

विसृज्य [।*] अचीकरद्दित्यमभानकल्पमल्पात्मभिः[1][2]
कल्पनयाप्यशक्यम् ॥ [२५ ॥*]

२६ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – – नयना-
भिरामम् [।*] न्यवीविशत्साधुलघुप्रसन्नशीतप्रकामाम्बु-[3]
महानिधानम् ॥ [२६॥*]

२७ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –, ⏑ – ⏑ – न्नेत्रमनो-
भिरामम् [।*] अन्यांगदेशेस्य दिशि प्रतीच्यामकार-
यद्गन्धकुटीमुदाराम् ॥ [२७॥*]

२८ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ –, [जग]द्धितायोद्यत-
सर्व्वकर्म्मण[:] [।*] मुनीन्द्रभावप्रणिधानसिद्धये[4]

---

१. पूर्वीच्या सर्व संपादकांनी 'अचीकरच्चैत्यम्' असें वाचलें, पण 'र' नंतरचें संयुक्त व्यंजन स्पष्टपणें 'द्द' आहे, 'च्च' नव्हे. 'दान' या अर्थी 'दित्य' शब्दाचा प्रयोग तत्कालीन कोरीव लेखांत आढळतो.

२. येथील अक्षरांची पूर्वीचीं वाचनें—'–मिहानकल्पम्' (भाऊ दाजी आणि बुल्हर); '–महीनकल्पम्' (भगवानलाल). पहिल्या 'म' वरील वेलांटी खोडलेली दिसते; त्यानंतरचें अक्षर 'मा' असें वाचलें पाहिजे. तें 'ही' नाही.

३. भगवानलालनी 'प्रसन्नं' असें वाचलें, पण ठशांत 'न्न' वर अनुस्वार दिसत नाही.

४. भाऊ दाजींचें 'मुनीन्द्रनाथ' हें चुकीचें वाचन भगवानलाल व बुल्हर यांनीहि स्वीकारिलें आहे; पण त्यांत पुनरुक्ति हा दोष आहे. येथे दिलेल्या वाचनाची श्लोक १९ मधील 'सर्वज्ञभावप्रणिधानसिद्धिम्' याशीं तुलना करावी.

भवन्त्वभीष्टा भुवि सर्व्वसम्पदः[1] ।। [२८।।*]

२९ ⏑ – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑–, ⏑ – ⏑ – सप्रणयेन

मण्डपः [।*] करोतु तावत्कुशलोदयं सतां विहन्ति[2] याव-

द्रविरंशुभिस्तमः ।। [२९।।*]

परिशिष्ट

द्वितीय प्रवरसेनाचा पांढुर्णा ताम्रपट

उपलब्धि—या ताम्रपटविषयीं माहिती नागपूर संग्रहालयाचे असिस्टंट क्यूरेटर श्री. वि. प्र. रोडे यांचेकडून ऑक्टोबर १९५७ मध्ये मला प्रथम कळली. हा ताम्रपट मध्यप्रदेशाच्या छिंदवाडा जिल्ह्यांतील पांढुर्णा गावाजवळ अलीकडेच सापडला होता असें समजतें. त्यानंतर तो छिंदवाडा येथे त्या वेळीं असलेले कमिश्नर श्री. एम्. जी. कर्णीकर यांचे हातीं आला. माझ्या विनंतीवरून त्यांनी तो प्रकाशित करण्यास मला परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. नंतर भोपाळ येथील पुरातत्त्वखात्याचे सुपरिंटेंडंट श्री. कृष्णदेव यांनी त्याचे छाप घेऊन मजकडे पाठविले, याबद्दल मी त्यांचाहि ऋणी आहे. हा ताम्रपट यथावकाश सविस्तर प्रकाशित होईल. पण प्रस्तुत पुस्तकांतील विवेचनास पूर्णता यावी म्हणून त्यांतील माहिती येथे संक्षेपाने दिली आहे.

---

१. श्लोक २८–२९ यांचें वृत्त–वंशस्थ.

२. हेंच वाचन भाऊ दाजींनी दिलें होतें; पण भगवानलालनी 'निहन्ति' असें चुकीने वाचलें व तेंच बुल्हरनेंहि स्वीकारलें.

वर्णन—हा ताम्रपट वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनाचा आहे. या राजाच्या इतर ताम्रपटांप्रमाणें हाहि पेटिकाशीर्षक लिपींत कोरला असून त्याची भाषाहि संस्कृतच आहे. याचे पांच पत्रे आहेत. ते ज्या कडींत गोवले होते ती सापडली आहे, पण तींत ओवलेली मुद्रा मात्र मिळाली नाही. कडीसहित ताम्रपटाचें वजन दोन शेर पस्तीस तोळे आहे.

प्रस्तुत ताम्रपटाच्या पहिल्या दोन व शेवटल्या दोन पत्र्यांवरील अक्षरें चांगल्या रीतीने कोरलीं आहेत. तिसऱ्या पत्र्याच्या दोन्ही बाजूं-वरील अक्षरांचें कोरीव काम मात्र कमी प्रतीचें आहे. त्यावरून तो पत्रा मूळ पत्र्याबद्दल मागाहून घातला गेला असें दिसतें. त्यांतील मजकुराची भाषाहि प्राकृतमिश्रित अशी अशुद्ध संस्कृत आहे. त्यावरूनहि हा संशय दृढ होतो.

विषय—हा ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाने प्रवरेश्वर नामक देवकुलस्थानांतून (देवालयांतून) दिला होता.* या राजाची वंशावळ येथे त्याच्या इतर ताम्रपटांतल्या प्रमाणेंच दिली आहे. दुसऱ्या पत्र्या-वरील लेखाच्या शेवटीं म्हटलें आहे की द्वितीय प्रवरसेनाने पूर्वी पृथिवी-राजाने (अर्थात् प्रथम पृथिवीषेणाने) दान दिलेल्या विजयपल्ली-वाटकाच्या बदलीं† वारुच्च राज्यांतील (विभागांतील) ध्रुववासकांत‡ ब्राह्मणवाटक नामक गावाच्या पश्चिमेस, अजकर्ण गावास जाणाऱ्या मार्गाच्या उत्तरेस, बदरीग्रामाच्या पूर्वेस, आणि दर्भपथाच्या पश्चिमेस

---

* 'प्रवरेश्वरदेवकुलस्थानात्' (ओ. १) पाहा.

† 'पृथिवि(वी)राजप्रवृत(त्त)स्य विजयपल्लीवाटकस्य प्रतिवस्तु' (ओ. १९–२०) पाहा. क्र. १४, ओ. ६ पाहा.

‡ 'ध्रुववासक(के)' (ओ. २०). कदाचित् 'ध्रुववाटके' विवक्षित असेल.

कांही भूमि दान दिली होती. ही भूमि किती होती, ती कोणास व कोणत्या प्रसंगीं दिली होती ही माहिती तिसऱ्या पत्र्यावरील लेखांत आली असावी; पण तो पत्रा बदलून त्याच्या जागीं दुसरा पत्रा घालण्यांत आल्याने ही मूळ लेखांतील माहिती आता नष्ट झाली आहे. बदलून घातलेल्या पत्र्यावरील लेखांत म्हटलें आहे की राजमानाने दोन हजार निवर्तनें भूमि वाजसनेय शाखेचे कौंडिन्यगोत्री यज्ञार्य, भोजार्य, सोमार्य व धर्मार्य हे ज्यांमध्ये प्रमुख आहेत अशा ब्राह्मणांस दिली होती. याशिवाय आणखीहि कांही भूमिदानांचा या तिसऱ्या पत्र्यावरील लेखांत उल्लेख आहे. आरम्मि राज्यांतील (विभागांतील) लेखपल्लिका गावामध्ये पंचवीस निवर्तनें भूमि आणि त्याच राज्यांतील संगमिका गावांतील आणखी पंचवीस निवर्तनें भूमि काल्लार गावांतील वाजसनेय शाखेच्या कौंडिन्यगोत्री सोमार्याला तिलवाचनक (श्राद्ध) प्रसंगीं दिली होती.* या दोन दानांच्या मिती शासनवर्ष २९ मधील वर्षाऋतूच्या अनुक्रमें पांचव्या पंधरवडयाचा सातवा व सातव्या पंधरवडयाचा नववा दिवस अशा दिल्या आहेत. मूळ ताम्रपटाच्या शेवटच्या म्हणजे पांचव्या पत्र्यावर त्याची मिती 'शासनवर्ष २९ वैशाख मास, कृष्ण पक्ष, दशमी' अशी दिली आहे. वाकाटकांच्या बहुतेक ताम्रपटांतील मित्या† या दुसऱ्या प्रकारच्या—संवत्सर, चैत्रादि मास व तिथि—अशा दिल्या आहेत. तेव्हा तिसऱ्या पत्र्यावरील लेखांतल्या, ऋतु, पंधरवडा व दिवस, या प्रकारें दिलेल्या उपरिनिर्दिष्ट दोन्ही मित्या

---

* येथील अशुद्ध प्राकृतमिश्रित भाषा पाहा—'राजक्यमानेन भूमि पाणुविसा निवेशान निवर्त्तणेन सह चेहामुष्मिके धर्म्मस्थाने तिलवाचनके सव्वत्सरे २० ९ वास ५ दिव ७.'

† याला दोन अपवाद दुदिया ताम्रपट (क्र. १०, ओ. २८) व वाशीम ताम्रपट (क्र. २२, ओ. २८–२९) आहेत.

बनावट दिसतात. त्या दिवशींचीं दोन भूमिदानें ज्याला दिलीं होतीं असें म्हटलें आहे, त्या सोमार्य ब्राह्मणाने हा बनावट पत्रा तयार करण्याचा उपद्व्याप केला असावा. मूळ ताम्रपटांतील दोन हजार निवर्तनांचें भूमिदान ज्यांना दिलें होतें त्या ब्राह्मणांपैकीं तो होता. तेव्हा प्रस्तुत ताम्रपट त्याच्या स्वाधीन केला असावा. नंतर आणखी कांही भूमिदानें अनधिकृत रीतीनें मिळविण्याकरिता त्याने नवा पत्रा तयार करवून त्यावर पेटिकाशीर्षक लिपींतच लेख कोरवून घेतला. पण संस्कृत भाषेच्या त्याच्या अज्ञानामुळे त्याची लबाडी आता उघडकीस आली आहे.

चर्चा—प्रस्तुत ताम्रपटांतील प्रवरेश्वर नामक देवकुलाचा (देवळाचा) उल्लेख महत्त्वाचा आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी बेलोरा ताम्रपटांचें संपादन करीत असतां त्यांत उल्लेखिलेल्या प्रवरेश्वर-षड्विंशतिवाटक नामक विभागावरून वाकाटक नृपति प्रथम प्रवरसेन याने प्रवरेश्वर नामक देवालय बांधलें असावें व तें ज्यामध्ये होतें त्या सव्वीस गावांच्या विभागास वरील नांव दिलें असावें, असा तर्क मी केला होता.* त्याला प्रस्तुत ताम्रपटांतील प्रवरेश्वरदेवकुलाच्या निर्देशाने पुष्टि मिळत आहे. तसेंच आतापर्यंत द्वितीय प्रवरसेनाचें शेवटचें ज्ञात शासनवर्ष सत्ताविसावें होतें.† प्रस्तुत ताम्रपटांत त्याचें एकोणतिसावें शासनवर्ष उल्लेखिलें असल्याने त्याने सुमारें तीस वर्षें राज्य केलें असावें‡ हा माझा तर्कहि समर्थित होत आहे.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटाच्या खऱ्या व बनावट पत्र्यांत उल्लेखिलेल्या कांही गावांचा शोध सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत

---

* मागे पृ. ६८ पाहा.

† क्रमांक १३, ओ ४३ पाहा.

‡ मागे, पृ. ४३ पाहा.

नकाशांवरून मला लावतां आला. पृथिवीराजाने (प्रथम पृथिवीषेणाने) पूर्वी दान दिलेलें विजयपल्लीवाटक हें छिंदवाडा जिल्ह्यांतील कन्हान नदीच्या काठचें बिजागोर असावें. ब्राह्मणवाटक हें मुलताई तहसिलींतील मुलताईच्या उत्तरेस सुमारें १२ मैलांवरचें ब्राह्मणवाडा आणि बदरीग्राम हें त्या ब्राह्मणवाडयाच्या दक्षिणेस तीन मैलांवरचें बोरगांव असावें. लेख-पल्लिका हें मुलताईच्या ईशान्येस सुमारें दहा मैलांवरचें लाखापूर दिसतें. संगमिका हें कन्हान व बेल या नद्यांच्या संगमाजवळचें संगम असावें. ज्या काल्लारगावीं सोमार्य ब्राह्मण राहात होता तें कदाचित उपरि-निर्दिष्ट ब्राह्मणवाडयाजवळचें खेरली गाव असेल. इतर गावांचा पत्ता लागत नाही.

सूची

The Mahadeo Hari Wathodkar Memorial Lectures

1. ***The Social Institutions in Ancient India*** (1944)
   By the late Dr. K. L. Daftari, B. A., B. L., Hon. D. Litt. — Rs. 3-0-0

2. ***The Matrix of Indion Culture*** (1945)
   By Dr. D. N. Mujumdar, M. A., Ph. D. — Rs. 8-8-0

3. ***The Dawn of Renascent India*** (1949)
   By Dr. K. K. Datta, M. A., Ph. D. — Rs. 2-0-0

4. ***The Indian Ideal*** (1953)
   By Shri. A. D. Gorwala — Re. 1-0-0

For Copies apply to—

The Registrar,
Nagpur University,
Nagpur-1